# संपूर्ण आगरकर

५

## भाग पहिला

★

संपादक

प्रा. माधव दामोदर आळतेकर, एम. ए.

किंमत २ रुपये

मॉडर्न बुक डेपो. प्रकाशन

संपूर्ण आगरकर

# निबंध संग्रह

[ भाग पहिला ]

संपादक

प्रो. माधव दामोदर अळतेकर, एम. ए.

प्रकाशक

आगरकर–प्रकाशन–मंडळ, पुणें.

किंमत २ रुपये ] [ १९३७

प्रकाशक—शं. ल. गोखले,
चिटणीस, आगरकर-प्रकाशन-मंडळ, पुणें २.

× × ×

in marathi 141061

[ सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन ]

× × ×

मुद्रक—प्र. भा. काळे,
प्रतिभा प्रेस, ३३५ शनवार पुणें २.

# प्रस्तावना

केसरीचे एक संस्थापक आणि आपल्या लेखणीच्या जोरावर त्या पत्राला सुदृढ स्थिति प्राप्त करून देणारे त्याचे पहिले संपादक; न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि फर्ग्युसन कॉलेज यांचे एक उत्पादक व फर्ग्युसन कॉलेजचे दुसरे प्रमुखाध्यापक असे गोपाळ गणेश आगरकर हे १८५६ सालीं जन्मले आणि १८९५ सालीं मृत्यु पावले. वर उल्लेखिलेल्या संस्थांसंबंधीं त्यांचें नांव प्रसिद्ध आहेच; पण विशेषेंकरून सुधारक पत्राचे संस्थापक आणि संपादक म्हणून ते सर्वांना माहीत आहेत. या पत्रांतून त्यांना जें कांहीं विशेष सांगावयाचें आणि शिकवावयाचें होतें तें त्यांनीं महाराष्ट्रास सांगितलें आणि शिकविलें. सुधारक पत्रांतील निवडक लेखांचा एक संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर रा. सी. ग. देवधर यांनीं प्रसिद्ध केला. त्याला निबंधसंग्रह भाग १ हे नांव आहे. आगरकरांच्या मृत्यूनंतर सुधारक पत्र कित्येक वर्षें चालू होतें; पण त्यांत पहिला जोम राहिला नाहीं. सुधारक पहिल्या जोमानें चालवावा म्हणून दोन तीन वेळां प्रयत्न झाले, पण ते सिद्धीला गेले नाहींत. तथापि या बाबतींत जो शेवटचा प्रयत्न झाला त्याचा एक परिणाम निबंधसंग्रह भाग २ व ३ हे प्रसिद्ध होण्यांत झाला. ेनवीन भाग तयार करतांना त्यांच्या संपादकांनीं लेखांची निवड करण्यांत किंवा त्यांचा अनुक्रम लावण्यांत विशेष काळजी घेतली नाहीं असें दिसतें; पण या दोन नव्या भागांत आगरकरांचे बरेच महत्त्वाचे निबंध प्रकाशित झाले ही मोठी कामगिरी त्यांच्या संपादकांनीं केली यांत शंका नाहीं. तिसरा भाग अतिशय गचाळ तऱ्हेनें छापलेला आहे. पुढें ज्या प्रकाशकांनीं हे दोन नवे भाग छापले त्यांनींच पहिल्या भागाची नवी आवृत्ति काढली. ती काढल्याचें श्रेय त्यांना आहे हें खरें; पण या आवृत्तींत बाह्यांगाकडे लक्ष मुळींच दिलेलें दिसत नाहीं. आगरकरांनीं आपल्या हयातींत विविधविषयसंग्रह म्हणून एक निबंधसंग्रह प्रसिद्ध केला होता. विविधविषयसंग्रहांत सामाजिक सुधारणेचे वादविवादात्मक विषय घेतलेले नाहींत; तर ज्यांत कसलाही विवाद नाहीं, पण शुद्ध विद्यानंद आहे, अशा लेखांचा त्यांत समावेश झालेला आहे. याशिवाय

आगरकरांचा **वाक्यमीमांसा** म्हणून व्याकरणविषयक एक लहानसा ग्रंथ, **आमचे डोंगरांतील १०१ दिवस** हा वर्णनात्मक निबंध आणि शेक्सपीयरच्या हॅम्लेट नाटकाचें "**विकारविलसित**" या नांवाचें भाषांतर हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

निबंधसंग्रहाचे तीन भाग आणि विविधविषयसंग्रह यांत मिळून जे निबंध आले आहेत त्यांशिवाय केसरींत व सुधारकांत प्रसिद्ध झालेले पण पुस्तकरूपानें प्रसिद्ध न झालेलें असे आगरकरांचे पुष्कळ लेख असले पाहिजेत हें उघड आहे. आगरकरांच्या निदान प्रसिद्ध पुस्तकांची व्यवस्थित प्रकारें छापलेली पुनरावृत्ति निघावी अशी पुष्कळांची इच्छा होती, व त्या इच्छेला मूर्त स्वरूप इतक्या दिवसांनीं येत आहे याचें श्रेय 'संपूर्ण–आगरकर–प्रकाशन–मंडळ" या संस्थेला म्हणजे हें नांव घेऊन उत्साहानें काम करणाऱ्या व्यक्तींना आहे. त्यांतील हा पहिला ग्रंथ आहे. हा ग्रंथ म्हणजे आगरकरांचा "निबंधसंग्रह" भाग १ ला याची जशीच्या तशी पुनरावृत्ति आहे. कांहीं किरकोळ चुका मुद्रणदोषामुळें वगैरे त्यांत होत्या त्या अर्थात् दुरुस्त केलेल्या आहेत आगरकरांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक वगैरे विषयांसंबंधीं महत्वाचे सर्व विचार विशदपणानें किंवा सूत्ररूपानें या भागांत प्रकट झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. निबंधसंग्रह भाग १ यामध्यें जी तत्त्वें ग्रथित केलेलीं आहेत, जे सिद्धांत सांगितले आहेत, त्यांचेंच विशेष विवेचन कधीं कधीं निरनिराळ्या प्रसंगांच्या अनुरोधानें तर कधीं कधीं तात्विक दृष्टीनें पुढील दोन भागांत आलेल्या निबंधांत केलेलें आढळून येतें. शिवाय भाग १ मध्यें जरी आगरकरांच्या राजकीय व आर्थिक मतांचें बरोबर ज्ञान, सूक्ष्मदृष्टि वाचकांस होण्यास हरकत पडत नाहीं, तरी त्या विषयावरचे निबंध त्यांत अगदीं थोडे आहेत. त्यामुळें स्थूलदृष्टि वाचकाला या इतर मतांचें योग्य आकलन होणें जरा कठीण पडतें. अशा प्रकारचे निबंध पुढील दोन भागांत बरेच आलेले आहेत हा त्या भागांचा एक विशेष आहे. आगरकर हे केवळ समाजसुधारक होते, राजकीय व इतर बाबतींत त्यांचें लक्ष्य नव्हतें असा समज कित्येकांनीं करून घेतला व त्याचा त्यांनीं प्रसारही केला. तो समज चुकीचा आहे इतकेंच नव्हे तर आर्थिक प्रश्न (ज्यांचें स्वरूप खरोखर राजकीय आहे) त्यांची चर्चा

प्रथम आगरकरांनींच मराठींत सांगोपांग केली हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे.

आगरकरांच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टी आतां सर्वांना माहीत झालेल्या आहेत. १८९५ सालीं त्यांचा मृत्यु झाल्यानंतर त्यांचीं दोन तीन लहान चरित्रें प्रसिद्ध झालीं होतीं. तीं अगदींच त्रोटक होतीं. पुढें १९१६ पर्यंत आगरकरांच्या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांखेरीज त्यांचा परिचय मराठी वाचकांना आणि लोकांना होण्याचें साधन नव्हतें. त्या सालीं आगरकरांचा स्मृतिदिन फार मोठ्या प्रमाणावर व थाटानें मुंबईत साजरा झाला, व त्या प्रसंगीं सर्व जातींचे व निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचे एक सहभोजनही झालें. या समारंभानिमित्त आगरकरांचीं दोन लहान चरित्रें (एक मराठींत प्रस्तुत लेखकानें लिहिलेलें व एक इंग्रजींत प्रो. वसंत नारायण नाईक यांनीं लिहिलेलें अशीं) प्रसिद्ध झालीं. तसेंच मनोरंजन या त्यावेळीं फार सुप्रसिद्ध असलेल्या मासिकाचा एक खास **आगरकर** अंक म्हणून त्याच प्रसंगासाठीं प्रसिद्ध झाला व त्यांत कै० रावबहादुर महाजनी वगैरे आगरकरांना प्रत्यक्ष ओळखणाऱ्या मंडळींचे महत्त्वाचे लेख प्रसिद्ध झाले व आगरकरांच्या विस्तृत चरित्राचीं अधिक साधनें उपलब्ध झालीं. आगरकरस्मृतिदिनाचे अध्यक्ष रँगलर परांजपे होते व त्यांत प. वा. सर नारायणराव चंदावरकर, लोकमान्य टिळक वगैरे थोर मंडळींनीं प्रत्यक्ष भाग घेतला. हा आगरकरस्मृतिदिन पुढें बरींच वर्षें मुंबईत साजरा होत असे व त्या प्रसंगीं प्रो. धों. के. कर्वे, प. वा. गोपाळराव देवधर, प. वा. प्रो. वासुदेवराव पटवर्धन, प. वा. ना. म. समर्थ, प्रो. गोविंदराव भाटे, प्रो. वामन मल्हार जोशी, प्रो. द. वा. पोतदार वगैरे थोर मंडळींचीं माहितीनें भरलेलीं आणि आगरकरांच्या तत्त्वांचीं सांगोपांग चर्चा करणारीं अशीं भाषणें झालीं. पुढें १९३० सालीं प्रस्तुत लेखकानें लिहिलेला आगरकरांसंबंधीं चरित्रात्मक निबंध हा विस्तृत ग्रंथ प्रसिद्ध झाला. अशा प्रकारें आगरकरांच्या चरित्राची माहिती देणाऱ्या व त्यांच्या तत्त्वांचें विवेचन करणाऱ्या पुस्तकांची व लेखांची हकीगत आहे. १९१६ सालच्या आगरकरस्मृतिदिनामुळें लोकांची आगरकरांसंबंधीं ज्ञान मिळविण्याची उत्सुकता वाढली व त्यांच्यासंबंधीं सर्वत्र आदर उत्पन्न झाला

त्यांची महाराष्ट्रानें कांहीं काळ केलेली हेळसांड दुराग्रहात्मक होती हें

सर्वांना पटलें. खुद्द पुणें शहरांत तीन वर्षांपूर्वी आगरकर-दिन साजरा झाला व त्याचें स्मारक म्हणून आगरकर हायस्कूल ही मुलींची दुय्यम शाळाही तेथें स्थापन झालेली आहे.

अशा प्रकारें गेल्या वीस बावीस वर्षांत आगरकरांच्या नांवलौकिकाचें जोरानें पुनरुज्जीवन झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या आयुष्यांत तत्त्वनिष्ठेमुळें पुष्कळ हालअपेष्टा सोसल्या ही गोष्ट खरीच; पण लहानपणचीं सर्व वर्षें अत्यंत खडतर दारिद्र्यांत गेलीं असतांनाही चिपळूणकर, टिळक, आपटे वगैरे मंडळीबरोबर लोकशिक्षणाला अत्यंत अल्प वेतनावर स्वतः ला वाहून घेण्याचें त्यांनीं ठरविलें; जाणूनबुजून, आनंदानें, ह्या वेळीं मोठाल्या नोकऱ्या पदवीधरांना मिळत तरीसुद्धां, ठरविलें ही गोष्ट त्यांच्या उज्ज्वल देशाभिमानाची निदर्शक आहे. स्वार्थत्याग आणि सेवा ही त्यांच्या आयुःक्रमाचीं दोन महत्त्वाचीं सूत्रें होतीं; त्याबरोबर आपणांला जें खरें आणि कल्याणदायक वाटतें तें लोकांना निःसंदिग्ध भाषेंत कळवावयाचें; त्यामुळें वेळींप्रसंगीं कांहीं लोक रागावले तरी त्याची फिकीर करावयाची नाहीं; त्यामुळें आपलें कितीही नुकसान झालें तरी त्याची परवा करावयाचा नाहीं; इष्ट असेल तें बोलणार आणि शक्य असेल तें करणार असा त्यांचा बाणा होता; आणि त्या व्रतापासून आमरण त ढळलें नाहींत; कसल्याही परिस्थितींत त्यांचा निश्चय फिरला नाहीं; कोणाच्याही कृपेसाठीं किंवा कोणाच्याही क्रोधामुळें त्यांच्या वर्तनांत चलबिचल झाली नाहीं.

आगरकरस्मृतिदिनाच्या दिवशीं भाषण करतांना प. वा. नारायण महादेव समर्थ म्हणाले:—" किती तरी माणसें लहान किंवा मोठ्या फायद्याच्या आशेनें धरलेल्या व्रतापासून चळलीं; किती तरी माणसांनीं आप्तस्वकीयांची भीड पडली अशी सबब सांगून पुरस्कार केलेल्या सुधारणांचा आपल्या आचरणानें धिक्कार केला; किती तरी माणसें लोकसत्तेच्या भयानें किंवा राजसत्तेच्या भयानें गडबडली आणि धरलेल्या मार्गापासून घसरली; कोणी लोकप्रियता मिळवण्यासाठीं तत्त्वांचा त्याग केला; तर कोणी राजमान्यतेच्या लोभानें मनांतले विचार मनांत दाबले. पण घेतलेल्या व्रतापासून आगरकर कधींही ढळले नाहींत; माघार ही त्यांनीं कधीं घेतलीच नाहीं; दुसरे पुढें जाण्याला घाबरले पण या वीराला भयाची भावना माहीतच नव्हती. त्यांनीं जें

हातीं घेतलें तें शेवटास नेलें. त्यांचें धैर्य अतुलनीय; त्यांच्या निश्चयाचा आणि छातीचा पुरुष दुसरा झाला नाहीं." हें वर्णन करणाऱ्यांनीं आगरकरांना प्रत्यक्ष पाहिलें होतें आणि त्यांत अतिशयोक्ति बिलकुल नाहीं; दुसऱ्यांनींही दिलेलीं वर्णनें अशींच आहेत.

ज्या वयांत आसमंतात् असणाऱ्या परिस्थितीचा मनावर विशेष परिणाम घडतो ते वय कष्ट करण्यांत, हालअपेष्टा सोसण्यांत, आप्तजनांचे कटु अनुभव घेण्यांत गेल्यामुळें एक इष्ट व एक अनिष्ट असे परिणाम होण्याचा संभव असतो. इष्ट परिणाम म्हणजे समाजाची वस्तुस्थिति बरोबर कळतें; सामाजिक रचनेंतील व व्यवहारांतील बऱ्यावाईट गोष्टी बिनचूक आढळून येतात; कोठें खडा बोंचतो आहे, कोठें काय दुखत आहे, कशामुळें कोणास त्रास होत आहे; निरनिराळ्या चालीरीतींच्या मुळाशीं काय आहे; माणसें वागतात त्यांत खरेंपणा खोटेंपणा किती आहे इत्यादि गोष्टींचा नीट उमज पडतो. त्याबरोबरच सर्व माणसांबद्दल व गोष्टींबद्दल एक प्रकारचा अनादर, एक प्रकारची चिरड, एक प्रकारचा संताप, एक प्रकारचा द्वेष हीं उत्पन्न होऊन अप्रसन्नता उत्पन्न होते, हा अनिष्ट परिणाम होय. आगरकरांच्याबद्दल विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्यावर उपरोक्त वर्णिलेला इष्ट परिणाम झाला, पण अनिष्ट परिणाम झाला नाहीं. आगरकरांची वृत्ति उत्साही, आनंदी व प्रसन्न अशी होती. त्यांत चिरचिर, मळमळ, असली भानगड नव्हती आणि त्यांच्या निबंधांचें काळजीपूर्वक पर्यालोचन केलें म्हणजे त्यांतही हीच वृत्ति आपणांस आढळून येतें. सामाजिक रचनेंतील व्यंगें त्यांना पूरेपूर कळलीं होतीं व सामाजिक व्यवहारांतील ढोंगाची माहिती त्यांना उत्तम प्रकारें होती. त्या व्यंगांची सुधारणा व ढोंगाचा आविष्कार यांबद्दल लिहितांना त्यांनीं कोणाची भीडभीड धरली नाहीं; पण त्यांच्या लेखांत द्वेष, असत्य, मत्सर, चिडखोरपणा, कुचकेनासकेपणा या गोष्टी बिलकूल आढळावयाच्या नाहींत. प्रतिपक्षावर बाण हाणण्याच्या कामांत ते निष्णात होते; पण आगरकरांनीं अधर्मयुद्ध केव्हांही केलें नाहीं व "युद्धांत वाटेल तें करावें" या मुत्सद्देगिरीच्या तत्त्वाचा म्हणजे लुचे असून सचे म्हणून मिरवणाऱ्यांच्या तत्त्वाचा त्यांनीं कधींही अंगीकार केला

नाहीं किंवा पुरस्कार केला नाहीं. त्यांच्या स्वभावाचें हें तत्त्व त्यांच्या निबंधांत पदोपदीं प्रत्ययाला येतें.

आगरकर १८५६ सालीं जन्माला आले व १८९५ सालीं (जून १७) मृत्यु पावले. या अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यांतील पहिलीं तेवीस-चोवीस वर्षें विद्यार्जन करण्याच्या प्रयत्नांत गेलीं. हा प्रयत्न म्हणजे एक खडतर तपश्चर्या होती. घरांत अक्षरशः अठरा विश्वे दारिद्य; कसलाही उद्योग म्हणून करावयाचा नाहीं, अशी वडिलांची प्रतिज्ञा, त्यामुळें आईच्या माहेराकडून जें साहाय्य होईल त्यावर तरुण गोपाळची सारी मदार होती. कऱ्हाडच्या शाळेंत प्राथमिक शिक्षण व इंग्रजीची सुरवात हीं झालीं. हायस्कूलचें शिक्षण मिळविण्यासाठीं गोपाळरावांनीं कऱ्हाडहून रत्नागिरीचा पायीं प्रवास केला. तेथें जमत नाहीं असें पाहून ते कऱ्हाडास परत आले. त्या ठिकाणीं कांहीतरी मिळवावें या हेतूनें दवाखान्यांतील कांपौंडरची नोकरी कांहीं दिवस केली. पण अंतःकरणांत उच्च शिक्षण मिळवावें अशी सारखी तळमळ होती. एक मामा वऱ्हाडांत अकोल्याला होते. तिकडे गोपाळराव मामीला पोचविण्यासाठीं म्हणून गेले आणि मग तेथेंच राहून तेथील हायस्कूलांत प्रविष्ट झाले व अनेक हालअपेष्टा सोसून तेथून मॅट्रीकच्या परीक्षेला बसून तींत पसार झाले. या सर्व गोष्टींमुळें बराच कालव्यय झाला. टिळक आणि आगरकर यांचीं वयें सारखीं होतीं. परंतु आगरकर टिळकांच्या नंतर तीन वर्षांनीं प्रवेशपरीक्षा उतरले याचें कारण शिक्षण मिळविण्यासाठीं धांवपळ करण्यांत त्यांचीं कित्येक वर्षें निघून गेलीं. पुढें जवळ पैसा नसतांना रा. ब. महाजनीसारख्या शिक्षकाच्या मदतीनें गोपाळराव डेक्कन कॉलेजांत गेले. तेथेंही बक्षीस मिळव, नाटक लिही, अगदीं दारिद्र्यांत दिवस काढ असें करून आगरकरांनीं बी. ए. ची मजल गांठली. यापुढें त्यांना कॉलेजांतील फेलोशिप मिळाली व दोन खऱ्या सुखाच्या वर्षांचा त्यांना लाभ झाला. या दोन वर्षांत टिळकांचा व त्यांचा स्नेह विशेष जमला. एवढी हालअपेष्टा सोसून एम्. ए. पर्यंत शिक्षण मिळविल्यानंतर नोकरीचा मार्ग न धरतां स्वसंतोषानें, उत्साहानें देशसेवा करण्याच्या हेतूनें, शिक्षणाच्या कार्याला अत्यल्प वेतनावर राहून आयुष्य वाहण्याचें व्रत आगरकरांनीं ग्रहण केलें व त्यांत मृत्यु येईपर्यंत खळ पडला नाहीं.

अशा तऱ्हेचें कार्य करण्याची कल्पना आगरकरांच्या डोक्यांत विद्यार्थी

दशेपासून घोळत होती. तिला टिळकांच्या स्नेहसंबंधानें दृढता आली व पुणें हायस्कूलांतील नोकरी सोडल्यानंतर नवीन हायस्कूल काढण्याच्या उद्योगांत या वेळीं निबंधमालाकर्ते विष्णु कृष्ण चिपळूणकर होते; त्यांचा व या दोन तरुणांचा परिचय होऊन त्या कल्पनेला मूर्त स्वरुप आलें आणि पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचा व केसरी व मराठा या पत्रांचा जन्म झाला. शाळा काढून विद्यार्थ्यांना विशिष्ट शिक्षण द्यावयाचें आणि वर्तमानपत्रें काढून सामान्य जनतेला शिक्षण द्यावयाचें अशा हेतूनें या सर्व उद्योगांना सुरवात झाली; व या उद्योगांत वामन शिवराम आपट्यांसारखी मंडळी सामील झाली. चिपळूणकर १८८२ सालीं वारले. त्याच सुमारास कोल्हापुरच्या महाराजांच्या व तेथील दिवाणांच्यासंबंधीं कांहीं लेख केसरी व मराठा पत्रांत आले. ते आपली बदनामी करणारे आहेत असें कोल्हापुरच्या दिवाणांना वाटून त्यांनीं केसरीचे संपादक आगरकर व मराठ्याचे संपादक टिळक यांजवर मुंबई हायकोर्टांत फिर्याद गुदरली व यांत कांहीं आरोप सिद्ध होऊन दोघां आरोपींना १०१ दिवस तुरुंगांत जाण्याची सजा न्यायाधिशांनीं ठोठावली. सर्व जनतेची सहानुभूति या तरुण संपादकद्वयांकडे होती. आगरकर-टिळकांचे या खटल्यांतील वकील फेरोझशहा मेहता व काशीनाथ त्रिंबक तेलंग हे मुंबईचे दोन नामांकित पुढारी होते. आगरकर टिळकांना शिक्षा झाली हें खरें; पण कोल्हापूरच्या दिवाणांबद्दल सबंध महाराष्ट्रभर अत्यंत प्रतिकूल समज झाला व या दोन तरुण पदवीधरांच्याबद्दल लोकांत आदर अतिशय वाढला. तुरुंगांत गेलेल्या दिवसांचे "आमचे डोंगरींतील १०१ दिवस" या छोटेखानी पुस्तकांत आगरकरांनीं मोठें सुंदर वर्णन केलेलें आहे. स्वार्थत्यागाची तपश्चर्या केल्यामुळें आगरकर-टिळक हीं चांगलीं माणसें आहेत हे लोकांना कळलेंच होतें. पण कारागृहवासामुळें त्यांची लोकप्रियता एकदम वाढली आणि मोठ्या माणसांत त्यांची गणना होण्यास वेळ लागला नाहीं.

१८८४ सालीं शाळा चालविणाऱ्या या मंडळीनें कॉलेज काढण्याचें ठरविलें. त्यासाठीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही संस्था स्थापन झाली आणि तिच्या मार्फत फर्ग्युसन कॉलेज १८८५ च्या आरंभाला सुरू झालें. आज हें कॉलेज म्हणजे केवढी मोठी संस्था झाली आहे त्याचें वर्णन करण्याची जरुरी

नाहीं. ज्या जागेंत हें कॉलेज कायमचें म्हणून करण्यांत आलें ती जागा त्या वेळीं भयाण होती. आतां तेथें नवें शहर निर्माण झालें आहे व तें निर्माण होण्याला त्या भागांत फर्ग्युसन कॉलेजचें अस्तित्व हेंच मुख्य कारण होय. फर्ग्युसन कॉलेज हें टिळक-आगरकरांच्या उज्ज्वल तत्त्वांचें व परंपरेचें मूर्त स्वरूप होय. त्यांनीं घालून दिलेला स्वार्थत्यागाचा व देशसेवेचा धडा पुढें पुष्कळ मोठमोठ्या माणसांनीं गिरविला व त्यांच्या उद्योगामुळें कॉलेजचा सारखा उत्कर्ष होत जाऊन, त्याला आजचें भव्य स्वरूप प्राप्त झालेलें आहे. असो. कॉलेज सुरू झाल्यानंतर एकदोन वर्षांत संमतिवयाच्या कायद्याचा मसुदा हिंदुस्थानसरकारपुढें येऊन त्यासंबंधीं सर्व देशभर मतभेद उत्पन्न झाला. या वेळेपर्यंत टिळक व आगरकर दोघेही नव्या विचारांचे म्हणून लोक त्यांना ओळखत होते, पण येथून पुढें टिळकांचें मत जुन्या लोकांच्या विचाराकडे झुकलें आणि ते व आगरकर यांच्यांत मतभेद उत्पन्न झाला. आगरकर पक्के सुधारक म्हणून प्रसिद्धीला आले व टिळक हे जुन्या किंवा सनातनी लोकांचे कैवारी व पुढारी झाले. या मतभेदाचे दोन परिणाम झाले टिळकांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटी राजीनामा देऊन सोडली व आगरकरांना केसरी सोडावा लागला. मराठा व केसरी हीं वर्तमानपत्रें टिळकांनीं आपल्याकडे घेतलीं व त्यासंबंधीं सर्व जबाबदारी पतकरली. कांहीं वेळानें सुधारक हें नवीन पत्र आगरकरांनीं काढलें व तें केसरी इतकेंच प्रख्यात झालें. केसरीच्या यशाचा पाया आगरकरांनीं घातला व पुढें टिळकांनीं केसरीला वाढविलें व तें महाराष्ट्रांतील अत्यंत लोकप्रिय पत्र झालें.

निबंधसंग्रह म्हणून जे तीन भाग आगरकरांच्या लेखांचे प्रसिद्ध झाले आहेत व त्यांची ही पुनरावृत्ति आतां प्रसिद्ध होत आहे ते सर्व लेख सुधारकांतील आहेत. केसरीच्या पहिल्या सहा वर्षांत आगरकरांच्या हातचे कितीतरी लेख त्यांत आले असले पाहिजेत हें उघड आहे. **"केसरींतील निवडक निबंध"** म्हणून दोन भाग आर्यभूषण छापखान्यानें आगरकर केसरीचे संपादक असतांनाच प्रसिद्ध केले. (आर्यभूषण हा केसरीचा पहिल्यापासूनचा छापखाना होय टिळकांनीं केसरी छापखाना पुढें काढला. त्यावेळेपर्यंत आर्यभूषणांतच केसरीची छपाई होत असे.) पण या दोन भागांतील सर्वच लेख आगरकरांचे नाहींत. कांहीं त्यांच्या त्या वेळच्या सहकाऱ्यांनीं लिहिलेले

आहेत. पण या भागांतील बरेचसे निबंध आगरकरांचे आहेत. जे निबंध दुसऱ्यांचे आहेत ते निराळे करून खुद्द आगरकरांचे या दोन भागांतील निबंध वेगळे काढणें आवश्यक आहे व त्यांना "आगरकरांचे केसरींतील निबंध" असे नांव देतां येईल. सुधारकांतील निबंधांच्या तीन भागांपैकीं आतां पुनः प्रसिद्ध होत असलेला हा पहिला भाग निःसंशय विशेष महत्त्वाचा आहे. आगरकरांच्या सर्व विचारसरणींचें सार त्यांत समाविष्ट झालेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; याशिवाय आगरकरांनीं प्रसिद्ध केलेला विविधविषयसंग्रह हा छोटा निबंधसंग्रहही महत्वाचा आहे. ज्यासंबंधीं राजकीय किंवा सामाजिक मतभेदाचा प्रश्नच उद्भवत नाहीं अशा विषयांवर मोठे आकर्षक लेख या विविधविषयसंग्रहांत दिलेले आहेत. त्यावरून आगरकरांची व्यापक दृष्टि व निरनिराळ्या विषयांचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची लालसा हीं दृष्टोत्पत्तीस येतात व विचार आणि ज्ञानानंद यांपैकीं कोणत्याही बाबतींत ते "एकांडे शिलेदार" नव्हते हे पूर्णपणें पटतें.

निबंधसंग्रह भाग १ यांत बरेचसे लेख सामाजिक विषयांसंबंधीं आहेत हें खरें; पण त्यांत कित्येक लेख राजकीय व धार्मिक प्रश्नांची चर्चा करणारे आहेत व तसेच अनेक लेख पुढील दोन भागांत आलेले आहेत. त्यावरून आगरकरांची राजकीय, आर्थिक वगैरे मतें कळून येतात. हीं मतें त्यावेळीं राष्ट्रीय वृत्तीची म्हणून सुरू झालेली राष्ट्रीय सभा तिच्या पुढाऱ्यांच्या मतांना धरून होतीं हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. हें सांगण्याचें कारण असें कीं आगरकरांनीं केवळ सामाजिक विषयांसंबंधानेंच चर्चा केली, राजकीय विषय त्यांना वर्ज्य होते, अशी एक समजूत कोठें कोठें आढळतें, ती अगदीं चुकीची आहे हें स्पष्टपणें कळावें हें होय. समाज आणि राजकारण हे विषय अगदीं निरनिराळे आहेत, त्यांच्यांत एक मोठी दुर्भेद्य अशी भिंत आहे, अशी समजूत आगरकरांची नव्हती व अशी समजूत शास्त्रीयदृष्ट्या बिलकूल चुकीची आहे ही गोष्ट आतां सर्वांना मान्य आहे. हिंदुस्थानाला पारतंत्र्यांतून सोडवून त्याची सर्व प्रकारें उन्नति कशी करावयाची हाच आगरकरांच्या सर्व विवेचनाचा विषय आहे व तें विवेचन करतांना सामाजिक म्हणजे आंतर सुधारणेला विशेष महत्त्व दिलें पाहिजे, ती सुधारणा झाल्याशिवाय दुसऱ्या सुधारणा होणें फार कठीण आहे हें मत

आगरकरांनीं विशेष पुढें आणलें; पण त्याचा अर्थ त्यांनीं दुसऱ्या सुधारणांना विरोध केला किंवा त्यांची विशेष काळजी घेतली नाहीं असा मुळींच होत नाहीं. आगरकर जसे सामाजिक सुधारक होते तसे राजकीय सुधारक होते व ही गोष्ट १९१६ सालीं भरलेल्या आगरकरदिनप्रसंगीं मुंबईत भाषण करतांना खुद्द टिळकांनींच स्पष्ट केली होती. तशीच आंतर सुधारणा ही सर्व सुधारणेच्या मुळाशीं आहे हें आगरकरांनीं प्रतिपादन केलेलें तत्त्व महात्मा गांधी यांना पूर्णपणें मान्य आहे, हें सर्वश्रुत आहे.

आगरकरांनीं आपल्या लेखणीच्या जोरानें एक नवी विचारसरणी महाराष्ट्रांत आणली यांत शंका नाहीं; किंबहुना सामाजिक व इतर सर्व व्यवहारांना त्यांनीं विचाराची जोड दिली असें म्हणणें रास्त होईल. एखादी गोष्ट चांगली का तर आजपर्यंत चालत आली आहे म्हणून, परंपरागत आहे म्हणून, मग तिचे परिणाम सुष्ट असोत किंवा दुष्ट असोत हा प्रकार त्यांना मान्य नव्हता. जर एखाद्या गोष्टीचे परिणाम दुष्ट असतील तर ती परंपरागत का असेना टाकून द्यावी; आणि एखाद्या गोष्टीचे परिणाम कल्याणकारक आहेत तर मग ती नवीन असली, परंपरेच्या बाहेरची असली तरी सुद्धां तिचा स्वीकार करावा अशी आगरकरांची शिकवण आहे. आणि परिणामाचा हा सुष्टपणा किंवा दुष्टपणा केवळ क्षणिक सुखावरून किंवा क्षणिक दुःखावरून ते ठरवीत नव्हते; तर शाश्वत सुख किंवा शाश्वत कल्याण यांचा पूर्ण विचार करून ते आपला निर्णय ठरवितात. क्षणिक सुखोपभोगाला आगरकर बिलकूल किंमत देत नव्हते आणि म्हणूनच त्यांना केवळ जडवादी किंवा मजावादी म्हणणें म्हणजे त्यांचें अत्यंत मिथ्या असें वर्णन होईल. आणि ते कल्याणवादी होते, श्रेयोवादी होते, प्रेयोवादी नव्हते, म्हणूनच कित्येक "सुखंच मे शयनंच मे" या तत्त्वावर समाजशास्त्राची रचना करणाऱ्यांना त्यांचें उज्ज्वल लिखाण कडू वाटतें. त्यांच्या वेळीं जुनें म्हणजे आज ज्यांना सनातनी आपण म्हणतों ते लोक त्यांजवर तुटून पडले; आज ते तसे तुटून पडतातच; पण आपण सनातनी नसून अत्यंत आधुनिक आहोंत असें म्हणणारे कित्येक "आगरकर तसे फार पुढें गेलेले नव्हते" असें सांगतांना आपण ऐकतों याचें कारण आगरकर जसे बुद्धिवादी होते, विचारशील होते, तसे अत्यंत

तत्त्वनिष्ठ होते व " तत्त्वें बदलतात म्हणून तत्त्वनिष्ठेला जागा नाहीं " हें मत कित्येक आधुनिक म्हणून स्वतःचें वर्णन करणारे आपलें अगदीं मोठें महत्त्वाचें मत समजतात. त्यांना ही आगरकरांची तत्त्वनिष्ठा पाहून चमत्कारिक वाटतें. महाराष्ट्रांत बुद्धिवादाची ध्वजा तत्त्वनिष्ठेच्या भक्कम पायावर आगरकरांनीं उभी केली आणि म्हणूनच ती भयंकर वादळांना, मोठाल्या वातचक्रांना दाद न देतां फडफडत राहिलेली आहे. आगरकर क्षणिक सुखाचे भोक्ते नव्हते; चिरंतन कल्याण त्यांना पाहिजे होतें. क्षणिक सुखाच्या लालसेनें जसे सनातनी दुराग्रही बनतात तसे एका विशिष्ट मनोवृत्तीचे " आधुनिक " उल्लू बनतात. दुराग्रही सनातनी व्यभिचाराचें व दुराचाराचें समर्थन धर्माच्या नांवाखालीं करतात तर उल्लू आधुनिक बरोबर तशाच किंवा तशासारख्या गोष्टींचें समर्थन " आधुनिकते "च्या नांवाखालीं करतात आणि म्हणून अशा दोन्ही दुष्ट लोकांवर आगरकरांनीं कोरडे ओढलेले आहेत. जुन्या लोकांच्या बहुभार्यकत्वावर प्रहार करणाऱ्या आगरकरांनीं घरीं पहिली बायको असतांना विधवेशीं लग्न लावून त्याचें पुनर्विवाह म्हणून समर्थन करणाऱ्या खोट्या सुधारकांना थारा दिलेला नाहीं हें सुप्रसिद्ध आहे. समतेच्या मुळाशीं संमति पाहिजे, आणि समाजांतील व्यवहार बलात्काराच्या तत्त्वावर न होतां संमतीच्या तत्त्वावर व्हावेत असें म्हणणाऱ्या आगरकरांची विचारसरणी जशी सनातनी बलात्कारवाल्यांना कटु वाटली तशीच ती आधुनिक बलात्कारवाल्यांनाही सुखदायक वाटत नाहीं यात नवल नाहीं. सध्याच्या काळीं आगरकरांच्या निबंधांचें सूक्ष्म विचारपूर्वक अध्ययन हा समाजशास्त्राच्या अभ्यासाचा एक उत्तम उपाय आहे. कारण त्यांच्या निबंधांत प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांची फोड अतिशय सोपेपणानें आणि अतिशय सरळपणानें केलेली आहे, शिवाय ती पूर्ण स्वतंत्रपणानें केलेली आहे. त्यांत जुन्या बुवाशाहीला जशी जागा नाहीं तशाच नवीन " दडपशाही "च्या तत्त्वज्ञानालाही थारा नाहीं.

बुद्धिवाद म्हणजे कोणत्याही गोष्टीची सत्यासत्यता, इष्टानिष्टता ही बुद्धीच्या म्हणजे विचारशक्तीच्या ( हिलाच प्राचीन ग्रंथांत तर्कशक्ति असें नाव दिलेलें आहे ) कसाला लावून पहाणें. समाजांत सत्यासत्यता किंवा इष्टानिष्टता ही पुष्कळ वेळां फक्त पुष्कळ दिवस चालत आलेल्या चालीरी-

तींच्या किंवा कांहींही कारणानें बहुमान्य झालेल्या देवतांच्या किंवा व्यक्तींच्या वचनांच्या अनुरोधानें ठरवितात. अशा चालीरीति किंवा अशीं वचनें हीं अगदीं निरपवाद व त्रिकालाबाधित सत्य समजण्याची प्रवृत्ति उत्पन्न होते आणि त्यांच्या प्राबल्यामुळें नवीन गोष्टींना व विचारांना प्रतिबंध होतो. किंबहुना विचार करण्याचें सर्व कार्य प्राचीनांनीं उत्तम प्रकारें उरकलेलें आहे, आपलें काम म्हणजे त्यांनीं घालून दिलेले विधिनिषेध ( विधि म्हणजे करावयाच्या गोष्टी, निषेध म्हणजे न करावयाच्या गोष्टी ) यथायोग्य प्रकारें पाळावयाचें, दुसरें कांहीं नाहीं, असा हट्ट धरणाऱ्यांना पुराणमतवादी किंवा सनातनी म्हणावयाचें व या हट्टाला ज्यांनीं सोडून दिलेलें आहे त्यांना सुधारक म्हणावयाचें. पुराणमतवादी याला पूर्ण प्रतियोगी असा शब्द नवमतवादी हा होऊं शकतो व नवमतवादाचा खरा अर्थ सुधारक शब्दाच्या वर दिलेल्या अर्थाप्रमाणें आहे. तथापि जेव्हां कांहीं विशिष्ट विचार आणि तेवढेच विचार म्हणजे नवमतवाद असें म्हणण्याची प्रथा पडते ( या प्रथेमुळें त्या शब्दाच्या वास्तविक अर्थाला बाध येतो ) त्यावेळीं तो शब्द सोडून देऊन वरील अर्थ ध्वनित करण्यासाठीं सुधारक हा शब्द योजणें बरें असें म्हणावें लागतें. असो; तर बुद्धिवाद म्हणजे बुद्धीच्या म्हणजे विचारशक्तीच्या कसाला लावून प्रत्येक गोष्टीची इष्टानिष्टता पहाणें. याविरुद्ध जीं तत्त्वें वर सांगितलीं त्यांना अधिकारवाद असें म्हणतां येईल. अधिकृत म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टी किंवा अधिकारी असें ज्यांना—देवांना किंवा माणसांना किंवा ग्रंथांना-समजण्याची प्रथा आहे, परंपरा आहे, चाल आहे, त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी याच सत्य आहेत, त्यांचा विचार करावयाचा नाही असा जो आग्रह तो अधिकारवाद. सध्यां जर्मनी इटली वगैरे नाझी किंवा फ्यासीस्ट देशांत व रशिया वगैरे बोल्शेव्हीक देशांत नव्या तऱ्हेचा का होईना अधिकारवादच पूर्ण अंमल करतो आणि म्हणून त्यांना Authoritarian states म्हणतात ही गोष्ट या बाबतींत लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. अधिकारवाद हा बुद्धिवादाचा प्रबळ शत्रु आहे. तो नवी नवी नांवें घेऊन बुद्धिवादाला शह घालीत असतो. कधीं कधीं तो आपल्याला बुद्धिवाद हें नांव घेण्याचेंही धाडस करतो. अशा तोतया बुद्धिवादाला आगरकरासारखा अस्सल बुद्धिवादी कधींही भीक घालीत नाहीं, आणि या तोतयेपणा-

चा धिक्कार यालाच वर तत्त्वनिष्ठा हें नांव दिलेलें आहे. ज्या तत्त्वावर आगरकरांची निष्ठा होती तीं तत्त्वेंसुद्धां खरीं का खोटीं, इष्ट का अनिष्ट, सुष्ट का दुष्ट हें बुद्धीच्या म्हणजे विचाराच्या कसावर त्यांनीं पारखून पाहिलें होतें. विचाराचा कस लावण्याच्या अनेक पद्धति आहेत. त्यांत एखाद्या गोष्टीचें संपूर्ण ज्ञान मिळविणें, तिच्याबाबत सर्व पुरावा गोळा करणें, तिचा अथपासूनचा इतिहास पहाणें आणि मग त्या सर्वांचा सारासार विचार करून निर्णय ठरविणें हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. तो एकोणीसाव्या शतकांत ऐतिहासिक पद्धति म्हणून प्रसिद्धीस आला. त्या मार्गानें तत्त्वांची सिद्धि झाली म्हणजे तीं तत्त्वें गृहीत धरण्यास हरकत नाहीं. अर्थात् त्या तत्त्वासंबंधीं कधीं कधीं नवी माहिती व नवा पुरावा उत्पन्न झाला तर तोही विचारांत घेणें हें बुद्धिवादाच्या नियमाला अनुसरून आवश्यक असतें. त्या नवीन गोष्टींचा योग्य विचार करून प्रस्थापित तत्त्वांत कांहीं फेरबदल करावा लागला तर तो करणें हें अर्थात् योग्य असतें. असा फरक करण्यास बुद्धिवादी नेहमीं तयार असतो. पण कधीं कधीं असा फरक करावा लागतो म्हणून जगांत निश्चित तत्त्व असें नाहींच असा हट्ट धरणें ही गोष्ट मात्र बुद्धिवाद्यांना मान्य होणार नाहीं. शिवाय एखादी परिस्थिति एखाद्या तत्त्वाला किंवा नियमाला अपवाद उत्पन्न करते. हा अपवाद केवळ त्या परिस्थितीवर अवलंबून असतो व त्यामुळें तो नियम सर्वस्वीं किंवा सदासर्वदा खोटा ठरला असें मानण्याची प्रवृत्ति ही बुद्धिवादाची नसून वितंडवादाची आहे. आगरकर हे वितंडवादी नव्हते. कित्येक धार्मिक म्हणून समजल्या जाणाऱ्या गोष्टी ते दूषणीय समजत होते; पण धर्मप्रवृत्ति ही गोष्ट मनुष्यजातींत फार दृढतर रुजलेली आहे हें ऐतिहासिक सत्य ते विसरले नव्हते आणि म्हणून त्या प्रवृत्तीविषयीं फार जपून बोललें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत आहे व ते बुद्धिवादाच्या तत्त्वांना धरून आहे.

बुद्धिवादाचा पुरस्कार आगरकरांनीं केला व तसें करतांना मुख्यत्वेंकरून जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर आणि मिलचा शिष्य जॉन मोर्ले ( पुढें लॉर्ड मोर्ले ) यांच्या ग्रंथांचा त्यांनीं उपयोग केलेला दिसतो. या सर्वांना नास्तिक म्हणण्याची प्रथा होती व त्याच शब्दाचा अहेर आगरकरांना त्यांचे प्रतिपक्षी करीत. नास्तिक हा शब्द परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल श्रद्धा नसणारा या

अर्थानें योजितात, व परमेश्वरावरची श्रद्धा ही सर्व सद्गुणांच्या मुळाशीं आहे अशी ज्यांनीं कल्पना केलेली आहे ते लोक नास्तिकांना दुराचारी, दुष्ट समजतात. म्हणजे परमेश्वरावर श्रद्धा ठेवतों असें म्हणणाऱ्यांकडून जर कधीं कधीं दुराचार होत असेल तर तिकडे कानाडोळा करावयाचा व नास्तिक म्हणून आपणच ज्याला वाईट नांव दिलें ते सदाचारी असले तरीही त्यांना दुष्ट म्हणावयाचें ही लाजिरवाणी खोड मनुष्यजातीला सर्व देशांत व सर्व काळात जडलेली आढळते. खरें पाहिलें तर माणसाच्या आचरणावरून तो दुष्ट आहे का सज्जन आहे हें ठरविलें पाहिजे व धर्मश्रद्धेवरून आचरण हें उत्तम का अधम हें ठरविणें चुकीचें असून आचरणाच्या प्रकारावरून धर्मश्रद्धा आहे का नाहीं हें पाहिलें पाहिजे. ज्ञानी पुरुषांचीं लक्षणें त्यांच्या आचरणांत व्यक्त होतात असें महाराष्ट्रकविश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांनीं फार सुंदरपणें भावार्थदीपिकेंत स्पष्ट केलेलें आहे. अशा दृष्टीनें मिल काय स्पेन्सर काय किंवा आगरकर काय यांचें आचरण उत्कृष्ट, यांचा सर्व काळ परहित करण्यांत गेला, यांनीं न्याय आणि दया यांचा आश्रय केला तेव्हां देवाला ( तो असल्यास ) तेच जवळ हे उघड आहे. पण ही दृष्टि शहाण्या लोकांनाच येतें. इतरांनीं आगरकरांना नास्तिक म्हणावें यांत नवल नाहीं. नास्तिक शब्दांचा अर्थ देवाच्या अस्तित्वावर श्रद्धा नसणारा हा सरळ आहे. पण श्रद्धेचा हट्ट धरणारे लोक नास्तिक हा शब्द आणिक एका अर्थानें उपयोगांत आणतात. देव आहे किंवा नाहीं याबद्दल खात्री न झाल्यामुळें त्यासंबंधीं निश्चित मत न देणाऱ्यालाही नास्तिक म्हणण्याचा प्रघात आहे; पण तो बरोबर नाहीं. अशा माणसांना अज्ञेयवादी म्हणणें योग्य आहे व अज्ञेयवादी हा बुद्धिवादी असतो हें या बाबतींत लक्षांत ठेविलें पाहिजे. केवळ श्रद्धेचे पुरस्कर्ते हे बुद्धिवादाचे वैरी आहेत असें आढळतें आणि म्हणून हा नसणारा अर्थ त्यांनीं नास्तिक या शब्दांत ढकललेला आहे. केवळ नास्तिक हा बरेच वेळां केवळ आस्तिकासारखाच श्रद्धावादी म्हणजे हट्टवादी असतो. अज्ञेयवाद्याची जर खात्री पटली कीं, देव आहे तर तो आस्तिक बनेल; पण श्रद्धावादी आस्तिकाला जितकें बुद्धीचें वावडें तितकेंच हट्टवादी नास्तिकालाही तें असतें. हे सर्व भेद तात्त्विक आहेत व ते सरळपणें लक्ष्यांत ठेविले पाहिजेत. पण मनुष्याच्या बरेवाईटपणाचा खरा निकष त्याच्या आचरणाच्या बरेवाईटपणावर

अवलंबून ठेविला पाहिजे. हा निकष पुष्कळ धार्मिकांना मान्य नसतो किंवा एकंदरीत अधिकारवाद्यांना तो मान्य नसतो असें सामान्यपणें म्हणण्यास हरकत नाहीं. आगरकरांना किंवा बुद्धिवादी आहेत त्यांना हाच निकष मान्य आहे आणि महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत सर्व थोर पुरुषांनींही याच निकषाला मान्यता दिलेली आहे. त्या पुरुषांना धार्मिक लोक पूज्य समजतात; पण ते सर्व पुरुष आचरणाला केवढें महत्त्व देत होते हें ते पुष्कळ वेळां विसरतात; आणि म्हणून आगरकरांना त्या पुरुषांच्या मालिकेंत घालणें योग्य आहे हें त्यांना लौकर कळत नाहीं.

असो. तेव्हां बुद्धिवाद ही आगरकरांच्या विचारसरणींतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ज्या विशिष्ट तत्त्वांना अनुसरून प्रपंच चालला पाहिजे असें आगरकरांचें स्पष्ट मत होतें त्यापैकीं पहिलें तत्त्व म्हणजे स्थित्यंतरक्षमता हें होय. विश्व हें स्थितिपर नसून गतिपर आहे, प्रत्येक गोष्टींत बदल हा होत असतो व तो बदल आपणांस थांबवितां येणें शक्य नाहीं, तेव्हां तो बदल आपणांस ज्या प्रकारें हितकारक होईल त्या प्रकारें त्याला साहाय्य करणें, विश्वाच्या गतींत आपली गति मिळविणें, या तत्त्वाला गतितत्त्व हें नांव आहे व हें गतितत्त्व आगरकरांच्या मतें अत्यंत महत्त्वाचें आहे. सनातनी लोकांना हें गतितत्त्व सामान्यपणें मान्य नसतें. एकदां गतितत्त्व पटलें, बदल झाल्याशिवाय राहणार नाहीं हें एकदां उमजलें, म्हणजे नवीन गोष्टींची व सुधारणांची भीति माणसाला वाटत नाहीं. अर्थात् गतीला साहाय्य करावयाचें तें जाणूनबुजून बुद्धिपुरस्सर केलें पाहिजे ही आगरकरांची स्पष्ट शिकवण आहे. प्रवाहपतित सनातनी आणि प्रवाहपतित सुधारक यांना आगरकर एकाच माळेचे मणि समजतात. किंबहुना खरा सुधारक जो आहे तो प्रवाहपतित होऊंच शकत नाहीं. गतितत्त्वाचें स्पष्टीकरण करतांना, सामाजिक व्यवहारांत स्थिर तत्त्व नाहींच असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. गलबताला जसें सुकाणूं असतें तसेंच समाजाच्या व्यवहारांत स्थैर्य असावें लागतें. पण कधीं कधीं स्थैर्याचें रूपांतर शिलावस्थेंत होऊन मुळीं गतिच अशक्य होते. त्यासाठीं गति हें महत्त्वाचें तत्त्व आहे हें विसरून चालत नाहीं. पण केवळ गति आणि तिला दिशा दाखविणारें दुसरें कांहीं नाहीं असें झाल्यास तेंच गलबत कोणत्या खडकावर आपटेल याचा नियम रहात नाहीं. अशा

स्थितींत गतीचेही नियम व मर्यादा ठरवाव्या लागतात. स्थितीच्या व गतीच्या मर्यादा ओळखून हें गतितत्त्व आखावें लागतें आणि आगरकरांच्या निबंधांत तें तशाच पद्धतीनें आखलेलें आहे हें ते निबंध लक्ष्यपूर्वक वाचणाऱ्यांच्या ध्यानांत सहज येईल. पण प्रत्येक तत्त्व अमर्याद आहे, किंवा अमर्यादपणा हेंच अत्यंत महत्त्वाचें तत्त्व आहे असा हट्ट धरणाऱ्यांना हें बुद्धिवाद्यांचें गतितत्त्व पटण्यास कठीण जातें. " कोठें आदळलांत तरी हरकत नाहीं पण कुठें तरी धावत चला " असला कारभार शास्त्रीय गतितत्त्वाला मान्य नाहीं. आगरकर हे शास्त्रीय गतितत्त्वाचें पुरस्कर्ते होते आणि कोणीही विचारी माणूस तसाच असणार हे उघड आहे.

गतितत्त्वांचा बुद्धिवादाप्रमाणेंच आगरकरांनीं धडाडीनें पुरस्कार केला व या दोन तत्त्वांना अनुसरून समाजरचनेंत व व्यवहारांत कोणत्या गोष्टींना प्रमुख स्थान दिलें पाहिजे याचा त्यांनीं पूर्ण ऊहापोह केलेला आहे. या गोष्टींत न्याय आणि दया यांचा प्रमुखत्वानें समावेश होतो. समता आणि संमति या गोष्टींचा उदयसुद्धां वरील दोहोंमधून होत असतो. कारण समता तरी न्याय व दया यांना अनुसरून असली पाहिजे आणि संमति देणाऱ्याची स्थिति स्वतंत्रपणें संमति देण्यासारखी असली पाहिजे. या सर्व तत्त्वांचा अंमल केवळ शाब्दिक होतां उपयोगी नाहीं तर तो खराखुरा झाला पाहिजे. पुष्कळ वेळां होतें काय कीं बाह्यतः याच तत्त्वांचा अंमल होत आहे असें दिसतें पण वस्तुतः त्या तत्त्वांतील अंतस्थ सार चिरडून जात आहे असें आढळतें. उदाहरणार्थ, शहाण्या व मूर्ख अशा दोन माणसांतील करार घ्या. यांत दोन्हीही माणसें कायद्याप्रमाणें करार करण्यास लायक असतील, पण कायद्याप्रमाणें लायख असणें म्हणजे अमुक वयाचा मनुष्य असणें, तो प्रत्यक्ष वेडा नसणें इत्यादि. असें नसूनही तो मनुष्य लबाड नसेल, व्यवहारी नसेल व त्या करारांत त्याचें नुकसान होण्याचा पुष्कळसा संभव राहील. म्हणून अशा प्रसंगीं कधीं न्यायाचा, कधीं दयेचा, कधीं दोहोंचा अंमल करावा लागतो. व्यवहारांत कोणतीही गोष्ट केवळ एका तत्त्वाचा अतिरेक करून होत नाहीं तर ती अनेक तत्त्वांचा मिळून परिणाम असते; व या अनेक तत्त्वांची योग्य प्रकारें सांगड घालणें ही सर्व व्यवहारांतील, प्रपंचांतील किंबहुना परमार्थांतील सुद्धां श्रेष्ठ शहाणपणाची

रूण आहे. आगरकरांनीं सुचविलेल्या सुधारणा याप्रमाणें कित्येक महत्वाच्या तत्वांना अगदीं धरून होत्या म्हणून त्यांत एक प्रकारचें स्थैर्य, टिकाऊपणा आलेली आहेत. सास्वा सुनांचा छळ करीत तेव्हां सुनांची बाजू आपण घेतों. यांत तत्त्व कोणतें? सुनांचीच बाजू घेणें हें तत्त्व नव्हे. कारण विशिष्ट परिस्थितींत सास्वांचा छळ सुनाही करतात. मग तुमचा पक्ष कोणता? सासू का सून? याला उत्तर संतापाच्या किंवा उद्वेगाच्या भरांत दिलें कीं त्यांत पुष्कळ वेळां चूक होते. तें विचारपूर्वक दिलें पाहिजे आणि मग तें काय येईल? तर कोणी कोणाचा छळ करूं नये हें तत्त्व याच्या मुळाशीं आहे आणि जर सासू सुनेचा नाहक छळ करीत असेल तर आम्ही सुनेला त्यांतून सोडविणार व जर सून सासूला उगाच त्रास देत असेल तर सासूची बाजू आम्ही घेणार असें न्यायी व शहाणा माणूस म्हणेल.

आणखी एका महत्वाच्या तत्वाचा उल्लेख करणें आवश्यक आहे. तें तत्व म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य हें होय. प्रत्येक व्यक्तीला महत्व आहे व त्या महत्वाला नैसर्गिक कारणांखेरीज इतर कारणांनीं प्रतिबंध करणें हें अन्यायाचें होतें. पुष्कळशा सामाजिक चाली पुष्कळ व्यक्तींना जाचक होतात याचें कारण समाजांतील प्रत्येक व्यक्तीला सारखें महत्व आहे ही गोष्ट समाजांतील बलिष्ट माणसें लक्षांत घेत नाहींत. जातिभेद ही संस्था अशा प्रकारें व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालणारी आहे. समाजाच्या कल्याणासाठीं व समाज योग्य प्रकारें चालावा म्हणून व्यक्तीच्या स्वातंत्र्याला कांहीं मर्यादा घालावी लागते हें खरें; तथापि ती मर्यादा अमर्याद होऊन जर व्यक्तीचें व्यक्तिमत्व नाहींसें करील तर त्यानें समाजाचें कल्याण होणार नाहीं, उलट समाजाला अधोगति प्राप्त होईल. व्यक्तीला जर स्वातंत्र्यबुद्धीच उरली नाहीं, व्यक्ति जर केवळ यंत्रासारखी झाली तर हळूहळू अशा व्यक्तींचा समाज रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाहीं. व्यक्तींवर समाजाच्यासाठीं कांहीं बंधनें घालणें जरूर असतें; पण तीं बंधनें अगदीं आवश्यक तेवढीं असावींत; त्यामुळें व्यक्तित्वाला बाध येऊं नये असें समाजरचनेचें व समाजव्यवहाराचें धोरण ठेवावें लागतें. तसें धोरण ठेवणें म्हणजेच व्यक्तित्वाला महत्त्व देणें होय आणि हें व्यक्तिमहत्त्वही बुद्धिवाद आणि गतितत्त्व यांच्याप्रमाणें

आगरकरांच्या शिकवणींतील फार महत्त्वाचें अंग आहे. बालविवाह नसावेत, विधवापुनर्विवाहाला प्रतिबंध असूं नयेत, लोकांनीं जमविलेल्या किंवा लादलेल्या विवाहाच्या ऐवजीं स्वयंवर म्हणजे वधूवरांनीं एकमेकांना पसंत करून केलेला विवाह अस्तित्वांत यावा, स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच शिक्षण द्यावें व कोणत्याही धंद्यांत इच्छा असल्यास शिरण्याची मुभा असावी, जातीमुळें कोणालाही विद्याप्राप्तीला किंवा कोणत्याही उद्योगांत शिरण्याला अडथळा होऊं नये वगैरे सुधारणा या व्यक्तिमत्वाच्या तत्त्वामुळें इष्ट व न्यायाच्या ठरतात हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. बलात्कार नसावा आणि संमति असावी असें म्हणणें म्हणजेसुद्धां व्यक्तिमत्वाला मान्यता देणें आहे. या बाबतींत जरा चमत्काराची गोष्ट ही कीं पुराणसमाजांतील बलात्काराचें जें तत्त्व तेंच कित्येक अत्यंत पुरोगामी म्हणून मिरविणाऱ्या आधुनिक समाजांत आज प्रबळ आहे. एका बाजूनें जर्मनी, इटली व दुसऱ्या बाजूनें रशिया हे जरी परस्परांवर दांत ओंठ खात असले तरी दोघेही बलात्कारवादी आहेत व स्वातंत्र्यप्रिय लोकांना दोघेही दूषणीय वाटतात.

अशा प्रकारें हीं सर्व सामान्य तत्त्वें ग्राह्य मानलीं म्हणजे स्थलकालपरत्वें निरनिराळ्या सुधारणा इष्ट ठरतात. हिंदुस्तानांत बालविवाह जारीनें सुरू होता. त्यामुळें वधूवरांच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम होई; म्हणून प्रौढ विवाहाचा उपदेश आगरकरांनीं केला. आतां समजा प्रौढ विवाहाचा जर कोणी असा अर्थ करील कीं वयाची पन्नाशी उलटेपर्यंत कोणी लग्नें करावयाचींच नाहींत तर त्याचाही परिणाम समाजावर तसाच व्यक्तीवर अत्यंत अनिष्ट होईल. कांहीं विशिष्ट वयांत स्त्रीपुरुषें एकत्र येणें हें हितावह असतें. त्या वयाच्या पूर्वी त्यांनीं एकत्र येणें जसें अनिष्ट असतें तसेंच त्या वयांत त्यांनीं एकत्र न येणें हेंही अनिष्ट असतें. तेव्हां कोठें कोठें फाजील प्रौढ विवाहाचा निषेध करावा लागतो. सध्या अमेरिकेंत व युरोपांत तसा निषेध होत आहे; पण हा निषेध म्हणजे बालविवाहाचें मंडन मात्र नव्हे ही गोष्ट सरळ वृत्तीच्या व शहाण्या माणसास कळण्यासारखी आहे. आतां बालविवाह दुसरीं माणसें जमवितात, त्यावेळीं वधूवरांची संमति कोणी विचारीत नाहींत व ती देण्याची पात्रताही त्यांत आलेली नसते. फाजील प्रौढ विवाहांत तर वधूवरांना

आपण काय करतों हें कळण्याची पात्रता असते व संमति देण्याची लायखी त्यांना असते आणि तिसरी मंडळी कांहीं अशा प्रकारचीं लग्नें जमवूं शकत नाहींत. तेव्हां न्यायाच्या दृष्टीनें बालविवाहांत जितका दोष आहे तितका फाजील प्रौढ विवाहांत नाहीं हें कबूल केलें पाहिजे; पण केवळ न्याय आहे म्हणून त्यांतील सर्व अनिष्टता नाहींशी होते असें मात्र नाहीं. असो; तर याप्रमाणें बुद्धिवाद, गतितत्त्व, व्यक्तिस्वातंत्र्य, न्याय, दया, समता, इत्यादि तत्त्वांना धरून सर्व सुधारणा झाल्या पाहिजेत. बाबावाक्यं प्रमाणम् हा सनातन्यांचा दोष जर सुधारकांच्या आंगीं आला तर सुधारकांचें सुधारकत्व नष्ट होईल. सुधारकाची बुद्धि कधीं मंदावता कामा नये. नव्या नव्या परिस्थितीला लक्ष्यांत घेऊन उपरोक्त तत्त्वानुसार स्थळकाळविशिष्ट सुधारणा सुचविण्याची ताकद व चपलता त्या बुद्धींत सारखी असली पाहिजे. विधवाकेशवपनावर आगरकरांनीं इतके कोरडे ओढले आहेत याचें कारण अन्याय आणि बलात्कार हें त्यांना नको होतें. आतां जर जाणत्या स्त्रिया आपले केस "बॉब" करूं लागल्या तर तसें करण्याची त्यांना मुखत्यारी आहे. पण "बॉब" करण्यास मुखत्यारी असणें म्हणजे बलात्कारानें केशवपन करणें मात्र न्यायाचें व इष्ट ठरत नाहीं.

व्यक्तीला योग्य व्यक्तिमत्त्व येण्यासाटीं प्रत्येक व्यक्तीला शिक्षण मिळालें पाहिजे; नाहींतर शिक्षण न मिळालेल्या माणसांना अज्ञानांत काळ कंठावा लागतो. हें शिक्षण कांहीं किमान मर्यादेपर्यंत सर्वांना अवश्य मिळालें पाहिजे आणि ज्याअर्थी समाजांत फार मोटी संख्या गरीब लोकांची आहे त्याअर्थी त्या मर्यादेपर्यंतचें शिक्षण मोफतही मिळण्याची तरतूद झाली पाहिजे असें मत आगरकरांनीं स्पष्टपणें सांगितलेलें आहे. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक असावें, सक्तीचें असावें आणि मोफत असावें या सूत्राचा उपदेश हिंदुस्तानांत आगरकरांनीं प्रथम केला हें लक्षांत टेविलें पाहिजे. कै. गोपाळराव गोखले हे सुधारक पत्र चालविण्यांत आगरकरांचे सहकारी होते. ते वरिष्ठ कायदेमंडळाचे अत्यंत श्रेष्ठ आणि कर्तृत्ववान् सभासद म्हणून पुढें गाजले. त्यांनी प्राथमिक शिक्षणाचें बिल वरिष्ठ-कायदेकौन्सिलापुढें मांडलें. सरकारनें त्याला विरोध केला आणि केसरीच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे "गोखल्यांचें बिल बुडालें!" पण गोखल्यांनीं हें बिल आणतांना फार मेहनत घेतली

होती ती अगदींच वाया गेली नाहीं. पुढें राजे पांचवे जॉर्ज हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनीं प्राथमिक शिक्षणासाठीं एक मोठी देणगी हिंदुस्थानसरकारकडून जाहीर करविली आणि १९२१ सालीं मॉंटेग्यू सुधारणेचा कायदा अंमलांत आल्यावर प्राथमिक शिक्षणाचें बिल मुंबईत डॉ. र. पु. परांजपे शिक्षणमंत्री असतांना पसार झालें. येथें सांगावयाचें इतकेंच कीं या अत्यंत महत्त्वाच्या व पूर्ण राष्ट्रीय स्वरूपाच्या सुधारणेची घोषणा प्रथम आगरकरांनीं केली. हें प्राथमिक शिक्षण स्त्री-पुरुषांना व सर्व जातींना भेदाभेद न करता दिलें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत होतें. सर्वप्रकारचें शिक्षण, प्राथमिक, दुय्यम व उच्च, स्त्रियांना व पुरुषांना सारखें द्यावें व एकत्र द्यावें असेंही मत त्यांनीं प्रतिपादन केलेलें आहे. सारखेंच आणि एकत्र शिक्षण स्त्री-पुरुषांना द्यावें या मताला कित्येकांचा विरोध आहे व स्त्रियांसाठीं निराळीं हायस्कूलें, कॉलेजें, व विद्यापीठें काढणें हें त्या विरोधाचें निदर्शक आहे. या विरोधाची छाननी करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु शिक्षणाच्या कामांत स्त्रियांचा "सवता सुभा" उभा करण्याला आगरकर अनुकूल नव्हते व समाजहिताच्या व व्यक्तिकल्याणाच्या दृष्टीनें स्त्रियांना व पुरुषांना शिक्षण एकच व एकत्र दिलें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत होतें, हें या बाबतींत लक्षांत ठेविलें पाहिजे.

आगरकरांनीं सर्व प्रकारच्या सुधारणा सुचविल्या आणि समाजांत जेथें जेथें दूषण होतें तें नाहींसें व्हावें असा प्रयत्न केला. जुन्या गोष्टींतील उत्तम आहे तें राहील; त्याला धक्का लागणें शक्य नाहीं; पण या हिंदुसमाजरूपी जरठ वृक्षाला खच्ची करून ( म्हणजे त्यांतील दूषणस्थळें नाहींशी करून ) त्याला नवीन कल्पनांचें भरपूर पाणी घालावें म्हणजे तो वृक्ष पुनः फोफावेल, अशी त्यांची शिकवण आहे. या नवीन कल्पना इंग्रजी शिक्षणामुळें आल्या, ही गोष्ट त्यांनीं प्रांजलपणें कबूल केली आहे. त्यांची सुधारणा म्हणजे इंग्रजी चालीचें अनुकरण नव्हतें. असलें अनुकरण म्हणजेही आंधळेपणा आहे व तशा आंधळेपणाला आगरकर अत्यंत दोष देतात. प्रत्येक गोष्ट विचारपूर्वक करावी असें आगरकर सांगतात व साहेबांचे दोष अर्थात् आपण आचरणांत आणूं नयेत असें त्यांचें म्हणणें आहे. आणि म्हणूनच केवळ "खाण्यापिण्याच्या नाविन्यानें" स्वतःला सुधारक म्हणविणाऱ्यांची सुधारणा त्यांना

कधींही म्हणतां येणार नाहीं. आतां ज्या वृत्तीपासून मनुष्यास सामाजिक स्थितींत विशेष सुखप्राप्ति होत असेल, किंवा होण्याचा संभव असेल तिचें काळजीपूर्वक संगोपन करून ती होईल तितकी दृढ व विस्तृत करणें, व ज्या वृत्तीमुळें समाजास पीडा होत असेल किंवा होण्याचा संभव असेल तिची वाढ खुंटवून ती हळू हळू समूळ नाहींशी करून टाकण्याचा प्रयत्न करणें, या अगदीं निराळ्या गोष्टी आहेत. यांचा त्या त्या वृत्तींच्या अस्तित्वाशीं कांहींएक संबंध नाहीं. त्या आपल्या मनुष्याच्या विवक्षित स्थितींत अस्तित्वांत यावयाच्याच.

धर्मसंबंधानें लिहितांना समता ठेवण्याचें आणखी एक मोठें कारण असें आहे कीं, दुसऱ्या कोणत्याही वृत्तीपेक्षां या वृत्तीपासून मनुष्याच्या आचरणावर व विचारावर विशेष महत्त्वाचे परिणाम घडले आहेत. अंतःकरणावर ज्या वृत्तीचा पक्का अंमल बसला असतां, सिंहासनस्थ राजांना अधिकार व ऐश्वर्य यांचा त्याग करून, व आप्तमित्रांस सोडून देऊन, अरण्यांत संचार करणें व फलमूलांवर आहार करणें यांत कांहींच कठिण वाटेनासें होतें; ज्या वृत्तीमुळें विवाहित स्त्रियांनीं आपले पति व विवाहित पुरुषांनीं आपल्या स्त्रिया यांबद्दल पर्वा न करतां आपल्या मनास शुद्ध वाटलेलें वर्तन करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं; ज्या वृत्तीमुळें मातापितरांस अपत्यवात्सल्याचा दृढ पाश तोडून त्यांविषयीं उदासीन होण्यास, किंबहुना त्यांचा नाश करण्याविषयीं प्रवृत्त होण्यासही शंका वाटत नाहीं; जी वृत्ति प्रबल झाली असतां नानातऱ्हेच्या यातना सोसण्यास, जाळून घेण्यास, बुडवून घेण्यास, किंवा पुरून घेण्यास मनुष्य तयार होतो; ज्या वृत्तीचें एखाद्या राष्ट्रावर वर्चस्व झालें असतां तें दुसऱ्या राष्ट्रांस जाळण्यास, कापण्यास, लुटण्यास किंवा पाहिजे तें करण्यास बिलकुल भीत नाहीं; सारांश ज्या वृत्तीमुळें कधीं कधीं लोकांच्या नीतिमत्तेस, विद्येस, भूतदयेस, व सदाचरणास पराकाष्ठेचें साहाय्य झालें आहे, व कधीं कधीं जिच्यामुळें लोकांत साहस, क्रौर्य, विदार, व अमानुषपणा यांची परमावधि झाली आहे, अशा वृत्तीविषयीं लिहितांना किंवा बोलतांना पराकाष्ठेची सरलता राखली पाहिजे, हें उघड आहे. असें न केल्यास कोणत्याही पक्षाचा फायदा न होतां उलट मोठें नुकसान होण्याचा संभव आहे. ज्या वादांत मनुष्याच्या वृत्तींत खिळून

गेलेल्या प्रबल आग्रहाच्या हातीं सुकाणूं आहे, तो वाद करतांना फारच खबरदारी ठेविली पाहिजे, हें जितकें सांगावें तितकें थोडें होणार आहे.

पण धर्मसंबंधानें आज आह्मास जें लिहावयाचें आहे त्यांत कोणत्याही प्रकारचा वाद उत्पन्न होण्याचा संभव नाहीं; कारण प्रस्तुत लेखांत कोणत्याही प्रकारच्या धर्ममतांवर टीका करण्याला किंवा तीं मोडून काढून त्यांच्या जागीं अमूक बरीं आहेत असें म्हणून त्यांचें मंडन करीत बसण्याला जागा नाहीं. तसें करणें केवळ अप्रासंगिक होणार आहे. मनुष्याच्या अंतःकरणांत धर्मवृत्तीचा आविर्भाव झाल्यापासून तींत आजपर्यंत कोणकोणते फेरफार झाले आहेत, व धर्मकल्पना सांप्रत कालीं मोठमोठ्या विचारी पुरुषांच्या लिहिण्यांत कोठपर्यंत येऊन पोंचली आहे, येवढेंच काय तें प्रस्तुत निबंधांत तिऱ्हाइताच्या नात्यानें सांगावयाचें आहे; दुसरें कांहीं नाहीं.

मनुष्याला एकदां पूर्णावस्था प्राप्त झाली होती, पण तींतून तो कांहीं कारणामुळें भ्रष्ट झाला, हें मत आम्हांस संमत नाहीं, असें जें मागें म्हटलें आहे, तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आमच्या अल्प समजुतीप्रमाणें मनुष्याची पूर्णावस्था अजून यावयाची आहे. कदाचित् सध्यां आपल्या दृष्टीपुढें जें विश्व आहे, व ज्या पृथ्वीवर आपण रहात आहों, तें विश्व व ती पृथ्वी अस्तित्वांत येण्यापूर्वी दुसरें एक विश्व व दुसरी एक पृथ्वी असून तीवर आपल्यासारखे प्राणी होते, व ते प्रथम अस्तित्वांत आले तेव्हां त्यांची पूर्णावस्था होती, पण कांहीं कारणांमुळें ते पतित होऊन त्या विश्वाचा व त्या पृथ्वीचा लोप झाला, असें पाहिजे तर मानितां येईल. पण तसें करण्यांत कांहीं फायदा दिसत नाहीं; कारण एक तर तसें मानण्यास कांहीं एक आधार नाहीं; दुसरें, तसें मानिलें तरी आपल्या डोळ्यापुढें जी सृष्टि आहे, व ज्या भूगोलावर आपण वास करीत आहों, त्यासंबंधानें एकदां पूर्णावस्था होती, असें मानण्यास बिलकुल जागा नाहीं. आम्ही ज्या विश्वांत आहों त्याच्या पूर्वीं दुसरीं विश्वें होऊन गेलीं असतील किंवा नसतील; त्याविषयीं वाद करीत बसण्यांत अर्थ नाहीं; कारण त्या विश्वांचा इतिहास समजण्याचीं साधनें आम्हास अनुकूल नाहींत; तेव्हां आमचा जो वादविवाद व्हावयाचा तो सांप्रत विश्वाविषयीं, व विशेषतः तदंतर्गत आपल्या भूगोलाविषयीं आणि त्यावरील प्राण्यांत अतिश्रेष्ठ प्राणी जे आपण त्यांविषयीं व्हावयाचा व व्हावा, हें योग्य आहे.

बिलकुल मान्य नव्हती. त्याचप्रमाणें कसल्याही प्रकारचें ढोंग त्यांना खपत नव्हतें. आगरकर ढोंगाचे मोठे शत्रु होते. ढोंग, छपवाछपवी, लबाडी या गोष्टी त्यांना बिलकुल पसंत नाहींत. त्यांच्या जोरदार लेखणीच्या तडाख्यांनीं सर्व ढोंगी लोकांची दाणादाण उडाली आणि याही बाबतींत तें ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम या मंडळींच्या पंक्तींत उत्तम शोभून दिसतात. केवळ बहुजनसमाजाला खूष करण्यासाठीं किंवा स्वतःच्या क्षुल्लक किंवा मोठ्या स्वार्थासाठीं "मनस्येकं वचस्येकं कार्यमन्यत्" असें वागणें त्यांना मान्य नव्हतें आणि अशा प्रकारें वागणाऱ्यांना ते दुरात्मे समजत. त्यांना जसें जुन्या तऱ्हेचें ढोंग खपत नव्हतें तसेंच नव्या तऱ्हेचें ढोंगही खपत नव्हतें. सत्य–निर्भेळ सत्य–निर्भयपणें लोकांपुढें मांडणें हें महाव्रत त्यांनीं पतकरलेलें होतें. त्यांचें स्वतःचें वर्तन त्या व्रताला अगदीं अनुरूप होतें. साधी राहणी, अत्यंत स्वार्थत्याग, पूर्ण प्रसन्न आणि निर्मत्सरी वृत्ति, दुःखितांना साहाय्य, उन्मत्तांना तडाखे, अशाप्रकारें त्यांनीं आपली जीवितयात्रा चालविली. त्यांच्या आयुष्यांतील निरनिराळ्या प्रसंगाची साधार छाननी प्रस्तुत लेखकानें त्यांच्यासंबंधीं लिहिलेल्या चरित्रात्मक निबंधांत केली आहे व आज सहासात वर्षांत त्यांतील एकही विधान कोणी खोडून काढलेलें नाहीं. आगरकरांच्या चरित्राविषयीं व चारित्र्याविषयीं जे विशेष जिज्ञासू असतील त्यांनीं तो निबंध पहावा.

महाराष्ट्रांतील एक अत्यंत थोर पुरुष व मराठींतील एक उत्कृष्ट लेखक या दोन्ही नात्यांनीं आगरकरांचें स्थान अढळ आहे. त्यांची लेखनरीति अंतःकरणापासून उत्पन्न झालेली आहे. त्यामुळें तींत वक्तृत्व हा जसा गुण आहे त्याचप्रमाणें कधीं कधीं अतिशय लांबलचक वाक्यरचना हा दोषही आढळतो. पण त्यांची भाषा ओजस्वी, तेजस्वी, व निरनिराळ्या रसांना प्रसंगानुरूप अनुकूल अशी आहे. इंग्रजी कल्पनांना सुंदर मराठी अन्वर्थक शब्दांत व्यक्त करण्याची हातोटी त्यांना फार उत्कट साधलेली होती. ही हातोटी टिळकांनाही उत्कृष्ट साधलेली होती. त्यांच्या या हातोटीचीं उदाहरणें त्यांच्यासंबंधीं चरित्रात्मक निबंधांत बरींच दिलेलीं आहेत. कोणत्या इंग्रजी ग्रंथकारांचा त्यांच्यावर विशेष परिणाम झाला याचा उल्लेख वर केलेलाच आहे. टिळकांच्यावरही त्याच ग्रंथकारांचा विशेष परिणाम

झालेला होता. संमतिवयाचा वाद उपस्थित होण्यापूर्वी टिळक–आगरकर ही जोडी एक मताची, एक विचाराची होती व परंपराप्रिय लोक त्या दोघानांही सुधारक व नास्तिक समजत. पुढें या संमतिवयाच्या वादाला तीव्र स्वरूप आलें. आणि पुराणाप्रिय लोकांचें पुढारीपण टिळकांनीं स्वीकारलें व सुधारकांचें नेतृत्व आगरकरांच्याकडे आलें. न्यायमूर्ति रानडे, डॉ. भांडारकर वगैरे मंडळी त्या वेळीं जुन्या समाजाच्या दृष्टीनें सुधारक म्हणून प्रसिद्ध होती; पण त्यांच्या दृष्टीचा पाया बुद्धिवाद हा नव्हता, म्हणून त्यांना फार तर उदारमतवादी म्हणतां येतें; बुद्धिवादी सुधारक म्हणतां येत नाहीं. आगरकरांचा विशेष हा कीं त्यांनीं बुद्धीच्या पायावर आपली सुधारणेची इमारत रचली. त्यांचा दुसरा विशेष हा कीं बहुजनसमाजाला कळणाऱ्या भाषेंत त्यांनीं आपले लेख लिहिले व बहुजनसमाजांतून ते केव्हांही पृथक् झाले नाहींत. समाजांत राहून समाजाची सुधारणा करणें या तत्त्वावर त्यांचा अढळ विश्वास होता व आपलें म्हणणें खरें व कल्याणकारक असल्यास आज ना उद्यां समाज आपलें ऐकेल असा त्यांना भरंवसा होता. त्यांची लेखनपद्धति विशेष आकर्षक होती. तिच्यांतील टवटवीतपणा अद्यापिही कायम आहे. मराठी वर्तमानपत्रांना उदयकाल येण्यास ज्यांचें श्रम कारणीभूत झाले त्यांत आगरकरांची प्रमुखत्वानें गणना टिळकांनीं त्यांच्या संबंधीं लिहिलेल्या मृत्युलेखांत केलेली आहे. आगरकरांना सर्व प्रकारच्या विषयांची वर्णनें लिहिण्याची हौस होती हें त्यांच्या विविधविषयसंग्रह या छोट्याशा निबंधसंग्रहावरून लक्षांत येण्यासारखें आहे.

उपमा दृष्टांतादि अलंकारांचा यथोचित उपयोग करून विषय प्रतिपादन सुलभ करण्याची हातोटी आगरकरांना फार साधलेली आहे. तसेंच समाजाच्या रचनेची व व्यवहाराची अगदीं बारीक सारीक माहिती सुद्धां त्यांनीं करून घेतली होती असें स्पष्ट दिसतें. दारिद्र्यांत दिवस काढतांना व विद्यार्जनासाठीं खडतर प्रयत्न करतांना ही माहिती त्यांना बरीचशी आपोआप मिळाली असावी, असें म्हणण्यास हरकत नाहीं. निरनिराळे रस ते फार खुलवितात व लेखनाच्या बाबतींत त्यांची व्हाल्टेअर या फ्रेंच ग्रंथकाराशीं कित्येकांनीं तुलना केलेली आहे ती अनुचित नाहीं. अर्थात व्हाल्टेअरची आयुर्मर्यादा आगरकरांच्या मानानें दुप्पट होती, त्याला मोठमोठ्या लोकांचा

आश्रय मिळाला होता, आणि त्याची ग्रंथरचना विपुल होती. पण त्याच्या लेखनांतील बरेच महत्त्वाचे गुण आगरकरांच्या लेखनांत आहेत यांत शंका नाही. विनोद हा गुण आगरकरांच्या लेखनांत भरपूर आढळतो व हा विनोद कोठेंही मत्सरयुक्त असा नाहीं हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. कुचकेपणाला कोणी कोणी खोचदार विनोद असें नांव देतात, पण कुचकेपणाला आगरकरांच्या वृत्तींतच जागा नव्हती ती त्यांच्या लेखांत तरी कुठून मिळणार ! आगरकरांनीं केवळ अज्ञान किंवा प्रामाणिकपणें श्रद्धाळू असलेल्या लोकांवर केव्हांही प्रहार केलेला नाहीं. सज्ञान व ढोंगी लोकांवर त्यांचा कटाक्ष आहे हें सुधारणानिंदकांची वर्गवारी पाडतांना त्यांनीं जें विवेचन केलें आहे त्यावरून लक्ष्यांत येतें. अज्ञानी लोकांविषयीं त्यांच्या टिकाणीं अनुकंपा होती व त्यांचें अज्ञान घालविण्याचा उद्योग त्यांनीं आयुष्यभर केला. त्याचप्रमाणें बलात्काराचें तत्त्वच ते दुष्ट समजत होते; त्यामुळें लोकांचीं मनें विचारानें वळवून आपल्या बाजूला आणावयाची असा त्यांचा प्रयत्न असे. सोटेशाहीचा उपयोग करून समाजाला नवें वळण देण्याची पद्धत त्यांना मान्य नव्हती व मान्य होण्यासारखी नव्हती. शहाण्या व विचारी लोकांच्या मताला मान द्यावा व जर एखादी गोष्ट समाजाच्या कल्याणाची असेल तर तेथें 'बहुमत' या शब्दाचा शाब्दिक अर्थ न घेतां तो विचारी लोकांचें मत असा घ्यावा असें त्यांनीं सांगितलें आहे. त्याचें कारण उघड आहे. प्रत्येक तत्त्वाला मर्यादा आहेत तशीच बहुमताच्या तत्त्वालाही शहाणपणाची मर्यादा आहेच. अर्थात् ही मर्यादा मान्य करणें म्हणजे एखाद्या दुष्ट्टाचार्यानें दंडेली करून सगळ्या जगावर जुलूम करणें असा मात्र अर्थ नव्हे. दोन्ही टोकांच्या मर्यादा समजणें हें सामान्यपणें सोपें नाहीं, पण त्या समजल्याशिवाय कल्याणप्राप्ति होत नाहीं.

आगरकरांच्या संबंधीं पुष्कळसें विवेचन प्रस्तुत लेखकानें त्यांच्या चरित्रात्मक निबंधांत केलेलें आहे, त्याची येथें द्विरुक्ति करणें रास्त होणार नाहीं. पण त्यांची शिकवण थोडक्यांत ध्यानांत यावी म्हणून या प्रस्तावनेला हें थोडेंसें दीर्घ स्वरूप द्यावें लागलें. वास्तविक आगरकरांच्या निबंधांचें लक्ष्यपूर्वक वाचन हाच त्यांची शिकवण उत्तम प्रकारें कळण्याचा सरळ मार्ग आहे. " संपूर्ण

आगरकर प्रकाशन मंडळा"च्या चिटणीसांनीं हा प्रस्तावनेचा आग्रह धरला नसतां तर ती लिहिण्याचेंही कारण पडलें नसतें. हा निबंधसंग्रह विद्यालयांतून अभ्यासासाठीं नेमिला तर त्या दृष्टीनें त्याचें विवेचन करणें हें विद्यालयांतील अध्यापकांचें काम आहे. त्यांत हात घालणें हा या प्रस्तावनेचा किंवा ग्रंथाच्या शेवटीं ज्या थोडयाशा टीपा दिलेल्या आहेत त्यांचा हेतु नाहीं हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. आगरकरांच्या तत्त्वप्रणालीचें स्वरूप माहीत असलें तर वाचकांना त्यांचें निबंध वाचणें थोडेसें अधिक सुलभ जाईल ही दृष्टि ठेवून या प्रस्तावनेंत जें थोडेसें विवेचन केलेलें आहे तें सर्व प्रकारच्या वाचकांस उपयोगाचें होईल अशी उमेद आहे.

आगरकरांच्या ग्रंथांखेरीज त्यांच्यासंबंधीं माहिती मिळण्याला उपयोगी पडतील अशीं कांहीं पुस्तकें उपलब्ध आहेत त्यांत "मासिक मनोरंजन-आगरकर अंक," न. चिं. केळकरकृत "टिळकचरित्र भाग पहिला", रा. वि. स. खांडेकर यांनीं लिहिलेलें आगरकरांचें छोटें चरित्र व कर्नाटक छापखान्यानें प्रसिद्ध केलेल्या "अर्वाचीन ग्रंथकार" पुस्तकांतील आगरकरांवरील निबंध तसेंच संमति वयोवादाच्या वगैरे माहितीसाठीं प्रो. न. र. फाटक यांनीं लिहिलेलें "रानडेचरित्र" यांचा प्रमुखत्वानें निर्देश केला पाहिजे.

मराठी वाङ्मयांत आगरकरांना महत्त्वाचें स्थान आहे; त्या दृष्टीनें त्यांच्या ग्रंथांचें अध्ययन झालें पाहिजे. पण भाषेच्या बाह्य गुणाबरोबरच त्यांच्या लेखनांतील अंतरंग म्हणजे सर्वांगीण सुधारणेची शिकवण ही सर्वांच्या आंगांत भिनावी म्हणजे आपल्या देशाला ऊर्जित काळ येण्यास फारसा अवधि लागणार नाहीं येवढें म्हणून ही प्रस्तावना येथें पुरी करतों.

व्हिलेपार्लें
ता. ७ जून १९३७ } माधव दामोदर अळतेकर

## अनुक्रमणिका

प्रस्तावना


१ सुधारक काढण्याचा हेतु ... ...
२ आमचें काय होणार ? ... ...
३ तरुण सुशिक्षितांस विज्ञापना ... ... ४८
४ ओंवळ्याची मीमांसा ... ... ... ६१
५ सोंवळ्याओंवळ्याची पुरवणी ... ... ६७
६ समाजोत्कर्षाचा एक मुख्य घटक ... ... ७३
७ आमचें अजून ग्रहण सुटलें नाहीं ... ... ७८
८ स्त्रियांना चरितार्थसंपादक शिक्षण देण्याची आवश्यकता ... ८१
९ विवाहनिराकरण अथवा घटस्फोट ... ... ८५
१० घटस्फोट अथवा काडीमोड ... ... ८९
११ स्वयंवर ... ... ... ... ९३
१२ प्रियाराधन ... ... ... ९८
१३ वल्लभोपासना ... ... ... १०२
१४ स्वातंत्र्याच्या वृथा वल्गना ... ... १०८
१५ सामाजिक स्थित्यंतरें ... ... ... ११२
१६ करून कां दाखवीत नाहीं ? ... ... ११७
१७ जान कां करीत नाहीं ? ... ... ... १२२
१८ सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल (सांप्रतकाल) ... १२६
१९ सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल (नंबर २) ... १३१
२० अशी वेळ कधीं आली नव्हती ... ... १३६
२१ इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार ... १४१
२१ होऊंच द्या तर दोन हात ! ... ... १४५
२२ दहाण्याचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार ... १५६
२३ सुधारणा आणि कलह ...

२४ गुलामांचें राष्ट्र... ... ... ... १८६
२५ शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय ? ... ... २१२
२६ प्राथमिक शिक्षण सरकारचें अवश्य कर्तव्य आहे ... २१६
२७ मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता ... २२१
२८ स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाहीं ? ... २२६
२९ स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें, व तेंही एकत्र द्यावें ... २३०
३० वडीलपणाचे हक्क ... .... ... २३८
३१ आमचे दोष आम्हांस कधीं दिसूं लागतील ? ... २४२
माहिती... टीपा

# निबंधसंग्रह

## भाग पहिला

### सुधारक काढण्याचा हेतु : : : : १

पर्वत, नद्या, सरोवरें, झाडें, पाणी, रानें, समुद्रकिनारे, हवा, खाणी, फुलें व जनावरें ज्यांत स्पष्टपणें दाखविलीं आहेत असा एक, व ज्यांत पारधी व पारधींचीं हत्यारें, शेतकरी व शेतकीचीं अवजारें, बाजार व त्यांतील कोट्यवधि कृत्रिम जिन्नस, न्यायसभा व त्यांत येणारे शेंकडों लोक, राजसभा व त्यांत बसणारे-उठणारे सचीव, मंत्री वगैरे प्रमुख पुरुष, भव्य मंदिरें व उत्तुंग देवालयें, बागा व शेतें, झोपड्या व गोठे, अनेक पदवीचे व अनेक धंदे करणारे पुरुष व स्त्रिया आणि त्यांचीं अर्भकें, हीं ज्यांत व्यवस्थित रीतीनें काढिलीं आहेत असा एक, मिळून प्रत्येक खंडांतील ठळक देशाचे दोन दोन चित्रपट तयार करवून ते पुढें ठेवले, आणि त्यांकडे निःपक्षपातबुद्धीनें कांहीं वेळ पहात बसलें, तर विचारी पुरुषाच्या मनावर काय परिणाम होतील बरें? प्रथम सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचें अवलोकन केलें तर त्यावरून असें दिसून येईल कीं, विस्तृतता, बहुविधता, मनोरमता, अद्‌भुतता, उपयुक्तता व विपुलता यांपैकीं कोणत्याही गुणांत या भरतखंडाचा त्रिकोणाकृति पट ग्रीस, इटली, ऐर्लंड, युनायटेड स्टेट्स्, ऑस्ट्रेलिया यांपैकीं पाहिजे त्या रमणीय देशाच्या चित्रपटापाशीं तुलना करण्याच्या हेतूनें मांडला तर असें म्हणावें लागेल कीं, आमच्या वांट्यास सर्वोत्तम न म्हटला तरी उत्तमांपैकीं एक देश आला आहे. सह्य, विंध्य व कैलास यांसारख्या प्रचंड पर्वतांनीं ज्याची तटबंदी झाली आहे; सिंधु, भागीरथी, नर्मदा, तापी, कृष्णा इत्यादि नदांनीं व नद्यांनीं ज्यांतील क्षेत्रें भिजविण्याचें व उतारूंचीं व व्यापाराचीं गलबतें व आगबोटी वाहण्याचें काम प्रत्य-

रलें आहे; हिंदीमहासागरानें ज्याला रचना होऊन शेंकडों बंदरें करून दिलीं आहेत; गुजराथ, माळवा, बंगाल, वऱ्हाड, खानदेश इत्यादि सुपीक प्रांतांनीं ज्यास हवें इतकें अन्नवस्त्र पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे; ज्याच्या उदरांत कोठें ना कोठें तरी हवा तो खनिज पदार्थ पाहिजे तितका सांपडण्यास पंचाईत पडत नाहीं; ज्याच्या रानांत पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या वनस्पति वाढत आहेत, व सर्व प्रकारचे पशुपक्षी संचार करीत आहेत; ज्यांत कोठें उष्ण कटिबंधांतली, कोठें शीत कटिबंधांतली व कोठें समशीतोष्ण कटिबंधांतली हवा खेळत आहे; सारांश, ज्यांतील कित्येक अत्यंत रमणीय प्रदेशांस 'अमरभूमि,' 'नंदनवन,' 'इंद्रभुवन,' 'जगदुद्यान' अशा संज्ञा प्राप्त झाल्या आहेत; असा हा आमचा हिंदुस्थान देश आधिभौतिक संपत्तींत कोणत्याही देशास हार जाईल, किंवा यांतील सृष्ट पदार्थांचा चित्रपट दुसऱ्या कोणत्याही देशाच्या चित्रपटापेक्षां कमी मनोरम ठरेल असें वाटत नाहीं.

याप्रमाणें सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचें अवलोकन करून पूर्ण समाधान पावल्यावर, दुसऱ्या पटाकडे वळल्याबरोबर चित्तवृत्तींत केवढा बदल होतो पहा! या दुसऱ्या ऐतिहासिक चित्रपटाच्या केवळ लांबीचाच विचार केला, तर कदाचित् आमच्या पटाची लांबी सर्वांत अधिक भरण्याचा संभव आहे. वैदिक कालापासून आजतागायतपर्यंत आम्हांस जितकीं शतकें मोजतां येणार आहेत, तितकीं बहुशः दुसऱ्या कोणत्याही देशास मोजतां येणार नाहींत. या विस्तीर्ण कालावधींत अनेक राष्ट्रांची उत्पत्ति, अभिवृद्धि व लय होऊन तीं प्रस्तुत नामशेष मात्र राहिलीं आहेत; कांहींचा मुळींच मागमूस नाहींसा झाला आहे; व कांहींचा ऱ्हास झाला तरी त्यांनीं संपादिलेल्या विद्यांचीं व कलांचीं रूपांतरें कोठकोठें अद्यापि दृष्टीस पडत असल्यामुळें, तीं त्यांच्या गतवैभवाची साक्ष देत आहेत. ज्याप्रमाणें कांहीं वनस्पति व कीटक परिणतावस्था प्राप्त झाली असतां, आपलें तेज नूतनोत्पन्न अंकुरांत ठेवून आपण पंचत्वाप्रत पावतात, त्याप्रमाणें अमेरिकेंतील व आशियांतील आणि विशेषतः युरोपांतील पुष्कळ राष्ट्रांची स्थिति झाली. ग्रीक विद्या आणि कला रोमन लोकांच्या हातीं पडून ग्रीस देशाचा अंत झाला. रोमन लोकांची सुधारणा अर्वाचीन युरोपीय राष्ट्रांकडे येऊन रोमन लोक नष्ट

झाले. आशिया व अमेरिका यांतील जुन्या राष्ट्रांचीही कांहीं अंशीं अशीच स्थिति झाली, व त्यांच्या सुधारणेच्या कांहीं खुणा अद्यापि कोठकोठें दृष्टीस पडतात. चीन व हिंदुस्थान हे दोन देश मात्र खूप जुने असून काळाच्या जबड्यांतून वांचले आहेत, व कदाचित् आणखीही अनेक शतकें वांचण्याचा संभव आहे. पण अशा प्रकारच्या वांचण्यांत विशेष पुरुषार्थ आहे कीं काय हा मोठा विचारणीय प्रश्न आहे. अशा प्रकारचें केवळ वांचणें म्हणजे बऱ्याच अंशीं योगनिद्रेंत प्राण धरून राहिलेल्या योग्याच्या जगण्यासारखें होय. हिंदुस्थानच्या अस्तित्वाशीं तोलून पहातां, जुन्या ग्रीक व रोमन लोकांचें अस्तित्व कांहींच नाहीं असें म्हणतां येईल. पण तेवढ्या स्वल्प काळांत त्यांनीं केवढाले पराक्रम केले व केवढी अमर कीर्ति संपादिली! भाषापरिज्ञानप्रवीणांनीं अलीकडे असा सिद्धांत केला आहे कीं, हिंदुलोक, ग्रीक लोक व रोमनलोक व जर्मन शाखेपासून निघालेले अर्वाचीन युरोपांतील इंग्लिश, डच वगैरे लोक एकाच पूर्वजांपासून झालेले असावे. या सर्वांस ते आर्यकुलोद्भव राष्ट्रें म्हणतात. हें खरें असेल तर काय सिद्ध होतें कीं, एकाच झाडाचें बीं चार प्रकारच्या जमिनींत पडून त्यापासून चार प्रकारच्या वृक्षांचा उद्भव व्हावा, व प्रत्येकाला निराळ्या तऱ्हेची वाढ लागून त्यांचा शेवटही निराळ्या तऱ्हेचा व्हावा, त्याप्रमाणें एकाच आर्य कुलापासून उत्पन्न झालेले आम्ही सर्व खरे, पण स्थानांतराप्रमाणें आम्हा सर्वांचा इतिहास निराळ्या प्रकारचा झाला! आर्य लोकांची युरोपांत जी शाखा गेली, तीपासून ग्रीस देशांत एक उत्तम राष्ट्र उद्भवलें. त्याचीच एक मुळी इटाली देशांत जाऊन तीपासून जो नवीन अंकुर उत्पन्न झाला, त्यानें मातृवृक्षास नाहींसें करून आपला विस्तार बराच दूरवर नेला. पुढें त्यालाही वार्धक्यावस्था येऊन, त्याचा ऱ्हास होण्याच्या सुमारास त्यापासून बरींच नवीन रोपें अस्तित्वांत आलीं. तीं हीं अर्वाचीन युरोपांतील राष्ट्रें होत.

इकडे हिंदुस्थानांत आर्यलोकांची जी शाखा आली, तिचा निराळ्याच तऱ्हेचा इतिहास झाला. तिकडे जुन्या वृक्षानें नव्या अंकुरांत आपले गुण ठेवून आपण नाहींसें व्हावें, पुनः त्या नवीन अंकुरानें तसेंच करावें व प्रत्येक नवीन राष्ट्रोद्भव पहिल्यापेक्षां बहुतेक गुणांत वरिष्ठ व्हावा, असा प्रकार झाला. इकडे अशा प्रकारची राष्ट्रोद्भवपरंपरा अस्तित्वांत आली नाहीं. मूळ

आर्यशाखा येथें येऊन तिच्यापासून जें झाड येथें लागलें, तेंच आजमित्ती-पर्यंत अस्तित्वांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रीक, रोमन, सिथियन, तार्तर, मोगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या, त्यांमुळें त्याला बराच त्रास झाला. कधीं त्याच्या कांहीं फांद्या मोडून पडल्या; कधीं तें मुळापासून उपटून पडत आहे कीं काय असें वाटलें; पण कर्मधर्मसंयोगानें युरोपांतील ग्रीक व रोमन शाखांवर आणि इकडील इराणी शाखेवर जो प्रसंग गुदरला, तो या भारतीय आर्यशाखेवर गुदरला नाहीं! यामुळें हें जरठ झाड कसें तरी अजून उभें आहे! पण त्यांत कांहीं त्राण उरलेलें नाहीं! तें आंतून अगदीं शुष्क होत आलें आहे, व त्याचें खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व यापासून नवीन शाखांचा उद्भव होऊन यास फिरून नवीनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयाचें! असें केलें तरच त्याचें पूर्वस्वरूप पूर्ण नष्ट न होतां, त्यापासून नूतन शाखावृत वृक्ष अस्तित्वांत येईल; पण तसें न केलें तर त्यावर प्रस्तुतकालीं चोहोंकडून जे तीव्र आघात होत आहेत, त्यांखालीं तें अगदीं जेर होऊन, अखेरीस जमिनीवर उलथून पडेल.

हिंदुस्थानचा पूर्व इतिहास व सांप्रत स्थिति सुधारकाच्या वाचकांच्या लक्षांत थोडक्यांत यावी, यासाठीं वर ज्या रूपकाचें साहाय्य घेतलें आहे, त्यापासून लेखकाचा भाव त्यांच्या मनांत उतरला असेल अशी त्याची आशा आहे. त्याचें स्पष्ट म्हणणें असें आहे कीं, हिंदू लोक रानटी अवस्थेंतून निघाल्यावर कांहीं शतकेंपर्यंत राज्य, धर्म, नीति वगैरे कांहीं शास्त्रें, वेदांत, न्याय, गणितादि कांहीं विद्या, व काव्य, गीत, नर्तन, वादनादि कांहीं कला, यांत त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडल्यावर त्यांच्या सुधारणेची वाढ खुंटली, व तेव्हांपासून इंग्रजी होईपर्यंत ते कसें तरी राष्ट्रत्व संभाळून राहिले! यामुळें त्यांचा इतिहासपट इतर देशांच्या इतिहासपटांहून फारच कमी मनोवेधक झाला आहे. आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीति—सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें

व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व, ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठिण झालेल्या लांकडासारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ही आमची शिलावस्था आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे. आजमित्तीस या शिक्षणाच्या टांकीचे आघात फारच थोड्यांवर पडत आहेत. पण दिवसेंदिवस ते अधिकाधिकांवर पडूं लागतील असा अजमास दिसत आहे. ज्यांना या टांकीपासून बराच संस्कार झाला आहे, ते समुदायापासून अगदीं विभक्त झाल्यासारखे होऊन, उभयतांत सांप्रतकालीं एका प्रकारचें वैषम्य उत्पन्न झालें आहे. या वैषम्यास विशेष कारण कोण होत आहेत हें येथें सांगण्याची गरज नाहीं. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं, मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सांडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आमच्या राजकर्त्यांकडून येत आहेत, म्हणून त्या आम्हीं स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाहीं. त्यांचें अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे, असें जें आम्ही म्हणतों, तें अशासाठीं कीं, त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनीं त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे. त्याशिवाय गत्यंतर नाहीं. समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास, जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास ( पुरुषास व स्त्रीस ) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे, व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल, त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थलें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे, तें पुनः पुनः दाखवावें, यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे. कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाविषयीं जें लोकमत असेल, तें पुढें आणणें हेंच काय तें पत्रकर्त्यांचें कर्तव्य असें जे

मानीत असतील, ते तसें खुशाल मानोत. लोकमत अमुक टप्प्यापर्यंत येऊन पोंचलें आहे, सबब कोणत्याही व्यक्तीनें किंवा सरकारानें त्यापुढें जाऊं नये, असें म्हणणें म्हणजे झाली आहे तेवढी सुधारणा बस आहे, पुढें जाण्याची गरज नाहीं, असेंच म्हणण्यासारखें होय. व्यक्तीनें किंवा सरकारानें साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें किंवा कायदे करणें हें सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगीं लोकांच्या गाढ अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें, व्यक्तीस लोकांची पर्वा न करितां स्वतंत्रपणें वर्तावें लागतें व सरकारास लोकमताविरुद्ध कायदे करावे लागतात. बारकाईचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, प्रजासत्ताक राज्यांत सुद्धां अनेकदां बहुमताविरुद्ध अधिकृत लोकांचें म्हणजे सरकाराचें वर्तन होत असतें. तथापि सामान्यतः सरकाराचें वर्तन लोकमतास धरून असेल तितकें बरें. पण जे लोक हा सिद्धान्त कबूल करतात ते, लोकमत दिवसेंदिवस सुधारत चाललें आहे, असें समजतात. तेव्हां आतां असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, लोकमताची सुधारणा व्हावी तरी कशी? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा? लोकाग्रणींनीं हें काम पत्करलें नाहीं तर तें कोणी पतकरावयाचें? जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्याची चालू स्थितिसुद्धां कायम न राहतां उलट त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल. म्हणून कोणी तरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें, व समाजांतील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढें आणण्याचें, अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तींच्या सुद्धां आंगीं नसेल त्या समाजांनीं वर डोकें काढण्याची आशा कधींही करूं नये.

हे विचार बरोबर असतील तर त्यांवरून हें दिसून येईल कीं, जे कोणी कोणत्याही मिषानें किंवा रूपानें लोकांपुढें लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील, त्यांनीं लोकांची मर्जी संपादण्यासाठीं, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित

साधण्यासाठीं त्यांच्या दोषांचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी त्यांस सुमार्ग न दाखवितां केव्हां एखाद्या खड्ड्यांत नेऊन घालतील हें सांगवत नाहीं. प्रस्तुत स्थितींत अशा लोकाग्रणींचें वर्तन आमच्या देशास फारच विघातक होणार आहे. ज्यांना समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व ल्याचीं कारणें ठाऊक नाहींत; कदाचित् पितृतर्पणापुढें ज्यांचें ज्ञान गेलेलें नाहीं; विषयोपभोगाशिवाय अन्य व्यवसाय ज्यांना अवगत नाहीं; वरिष्ठाची प्रशंसा आणि कनिष्ठाशीं गर्वोक्ति यांहून अन्य प्रकारचें भाषण ज्यांस फारसें माहीत नाहीं; अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनीं अहर्निश परिश्रम करून, पदार्थधर्मांचें केवढें ज्ञान संपादिलें आहे, विपद्विनाशक व सुखवर्धक किती साधनें शोधून काढिलीं आहेत, व राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत हें ज्यांना ऐकून सुद्धां ठाऊक नाहीं, अशा गृहस्थांनीं आम्ही हिंदु लोक नेहमीं परतंत्रच असलों पाहिजे; कांहीं केलें तरी अधिक राज्याधिकार उपभोगण्याची पात्रता आमच्या आंगीं यावयाची नाहीं; राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्हीं कधीं स्वप्नांत सुद्धां आणूं नये; स्थानिक स्वराज्य, राष्ट्रीय परिषद्, कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद, स्वसंतोषानें शिपाईगिरी करण्याची इच्छा धरणें—या व या तऱ्हेच्या दुसऱ्या उठाठेवींत आम्हीं पडणें हें शुद्ध मूर्खपण होय, [ असें म्हणावें यांत नवल नाहीं. ] अशा प्रकारचें प्रतिपादन करणाऱ्या लोकांस लोकाग्रणी न म्हणतां लोकशत्रु म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. तसेंच जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढीं सारीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें हें घोर पातक, अशी ज्यांची समजूत; जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयीं कल्पना; पंचामृतानें व धूपदीपानें केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा विशेष प्रशस्त मार्ग नाहीं, असे ज्यांचे धर्मविचार; आहे ही सामाजिक स्थिति अत्युत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेंही अवकाश नाहीं; सध्या येथें स्त्रियांचे पुरुषांशीं, मुलांचे आईबापांशीं, जे संबंध चालत आहेत तेच उत्तम आहेत व अनंत काल तेच चालले पाहिजेत; ज्ञान संपादणें हें पुरुषांचें कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य; पुरुष स्वामी, स्त्री दासी;

स्वातंत्र्य पुरुषांकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे; विवाहाशिवाय स्त्रीस गति नाहीं, व गृहाशिवाय तिला विश्व नाहीं; वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण; अशा प्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजविषयक कल्पना, असे लोकाग्रणी काय कामाचे? अशांच्या उपदेशानें व उदाहरणानें आम्हांस चांगलें वळण कसें लागणार व इतर सुधारलेल्या राष्ट्रांस होत असणाऱ्या सुखाचा लाभ आम्हांस कशानें होणार? निदान सुधारकास तरी असले लोकाग्रणी व त्यांचें वर्तन मान्य नाहीं. ज्या तत्त्वाचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्हीं आनंदानें तयार झालें पाहिजे. तीं तत्त्वें हा सुधारक महाराष्ट्र लोकांपुढें वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज ज्याचा जारीनें अंमल चालत आहे, त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार असल्यामुळें, फार त्रास पडणार आहे. पण त्याची तो पर्वा करीत नाहीं; कारण ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षां अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय. कोट्यवधि अक्षरशत्रु व विचारशून्य मनुष्यांनीं आपल्या अडाणी समजुतीप्रमाणें चांगलें म्हटलें किंवा वाईट म्हटलें; अज्ञान व धर्मभोळ्या लोकांच्या आचरट धर्मकल्पनांची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून, त्यापासून निघेल तेवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण उदरंभरू हजारों टवाळांनीं शिव्यांचा वर्षाव केला किंवा छी:—थू: करण्याचा प्रयत्न केला; शेंकडों अविचारी व हेकड लोकांनीं नाकें मुरडलीं किंवा तिरस्कार केला—सारांश ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचें रूप बिलकुल समजलेलें नाहीं किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हें ठाऊक नाहीं, अशांच्या पर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पडल्या तरी, जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे, अशानें वरच्यासारख्या क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें, बोलावें व सांगावें हेंच त्यास उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे.

## [ प्रस्तावना ]

राज्य, धर्म, व्यवहार इत्यादि सामाजिक गोष्टींच्या संबंधानें सध्या या देशांत ज्या पद्धति, जे पंथ, आणि जे आचार रूढ आहेत, त्यांपैकीं कांहीं हळू हळू नाहींतसे व्हावे, कांहींत थोडाबहुत फेरफार व्हावा, व कांहीं अगदीं नवीन अस्तित्वांत यावे असें अलीकडे पुष्कळांस वाटूं लागलें आहे, आणि त्यांचा स्थलावकाशाप्रमाणें सुधारकासारख्या पत्रांत अवश्य विचार झाला पाहिजे, व होईल. पण तो करूं लागण्यापूर्वी एक गोष्ट करणें फार जरूर आहे. ती ही कीं, सामाजिक सुधारणेच्या ज्या तत्त्वांच्या अनुरोधानें आम्ही सध्यां येथें रूढ असलेल्या राजकीय, धार्मिक किंवा व्यावहारिक संस्थांत फेरफार करावा, अथवा त्यांपैकीं कांहीं मुळींच नाहींशा करून, त्यांच्या ठिकाणीं नवीनांची स्थापना करावी, असें म्हणणार, तीं तत्त्वें कोणतीं हें अगदीं थोडक्यांत का होईना, पण प्रथम सांगितलें पाहिजे. त्याशिवाय पुढील लेख नीट समजणार नाहींत. तारवास जसें सुकाणूं, समुद्रपर्यटन करणाऱ्यांस जसें दिङ्‌निर्णायक यंत्र, सुवर्णकारास जशी निकषशिला, अंधास जशी यष्टि व इमारतीस जसा पाया तशी सामाजिक रचनेस, व्यवस्थेस व स्थित्यंतरास हीं तत्त्वें आहेत. ऐरिश लोकांस स्वतंत्र पार्लमेंट सभा स्थापूं देण्यासाठीं मि. ग्लाडस्टन यानें ब्रिटिश पार्लमेंटांत आणलेलें बिल बऱ्याच प्रतिनिधींस नापसंत झालें, तेव्हां तो असें म्हणूं लागला कीं, "या माझ्या बिलांतील पुष्कळ कलमें किंवा सारीं कलमें जरी तुम्हांस नापसंत झालीं, तरी त्याबद्दल माझें कांहींएक म्हणणें नाहीं. त्यांच्या जागीं मला किंवा तुम्हांला दुसरीं घालतां येतील. माझी सध्यां तुमच्यापुढें एवढीच प्रार्थना आहे कीं, ज्या तत्त्वावर हें बिल रचिलें आहे त्या तत्त्वास तुम्ही आपली संमति द्या." तात्पर्य काय कीं, कोणत्याही कामास हात घालण्यापूर्वी त्याचें पर्यवसान कोठें आहे, हें अगोदर स्पष्टपणें पाहिलें पाहिजे. आपणास अमुक गोष्ट अमुक वळणावर न्यावयाची आहे, किंवा नेली पाहिजे, असें एकदां ठरून आलें म्हणजे त्या वळणावर ती गोष्ट नेण्याचे बरे वाईट उपाय ठरविण्यांत म्हणण्यासारखा त्रास पडत नाहीं.

आमची तर अशी समजूत आहे कीं, आज ज्या कित्येक सामाजिक गोष्टीं-विषयीं आमच्या लोकांत विशेष मतांतर दिसत आहे तें अस्तित्वांत येण्यास पुष्कळ अंशीं सामाजिक सुधारणेच्या मूल तत्त्वांचें अपूर्ण आकलन कारण होत आहे. कोणत्याही प्रयत्नानें जर त्यांस त्यांचें पूर्ण आकलन होईल तर सामाजिक सुधारणा अडथळा न होतां मोठ्या झपाट्यानें होऊं लागेल. रोगाचें निदान झाल्यावर औषधांची योजना करणें, अर्थ समजल्या-वर त्याचें स्पष्टीकरण करणें, व उत्तर समजल्यावर रीति बसविणें फार कठीण जात नाहीं !

तेव्हां आतां 'आमचें काय होणार ?' किंवा 'आमची भावी स्थिति काय होणार ?' या प्रश्नास उत्तर देण्यापूर्वी एकंदर मनुष्यसुधारणेचा कल कोणीकडे आहे हें पाहिलें पाहिजे. तर मग आतां आम्ही या छोटेखानी पत्राच्या चार दोन कालमांत मानवी सुधारणेचा ओघ कोणीकडे आहे हें ठरविणार ! मिल्ल, कोंट, स्पेन्सर यांसारख्या प्रचंड तत्त्ववेत्त्यांस ज्या गोष्टी-चा निर्णय पांच-पांचशें पानांच्या स्वतंत्र ग्रंथांत बरोबर करतां आला नाहीं, तो हे फिनिक्सवृत्ति सुधारकबोवा एक दोन आर्टिकलांत करणार ! अशा प्रकारचा उपहास कोणीं केल्यास त्यास आम्ही पात्र नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं. तथापि ज्याप्रमाणें मुंगीपासून हत्तीपर्यंत जीवकोटींतल्या प्रत्येक प्राण्यास, जीवरक्षणासाठीं कसल्यातरी प्रकारच्या अन्नाची आवश्यकता आहे, आणि म्हणून ज्याप्रमाणें त्यानें तें संपादण्याचा आणि सेवन करण्याचा प्रयत्न करणें वास्तविकरीत्या उपहासास्पद नाहीं, त्याप्रमाणें थोडाबहुत विचार करून, अनुकूलता असल्यास, तो आपल्या बांधवांपुढें मांडणें हें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचें कर्तव्य होय व तो तसें करूं लागेल तर त्यांत उपहास करण्यासारखें कांहीं नाहीं. कवीनें म्हटलें आहे—

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं ।
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी ॥

शिवाय दुसरी आणखी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, कोणत्याही बिकट कूटाचें उत्तर काढणें व काढलेलें उत्तर समजून घेऊन तें दुसऱ्यास थोडक्यांत सांगणें, या दोहोंत फार अंतर आहे. कमींत कमी शेंकडा नव्याण्णव लेखकांचा व्यवसाय दुसऱ्या प्रकारचा असतो, आणि

सुधारकाचा कर्ता त्यांतच मोडतो, हें कांहीं सांगायला पाहिजे असें नाहीं! असो; आतां मनुष्यसुधारणेच्या मुख्य तत्त्वांची कोणती दिशा आहे, हें प्रथम पहावयाचें.

या दिवसांत संध्याकाळीं सात वाजण्याचे सुमारास आकाशाकडे पाहिलें असतां, त्यांत एक दक्षिणोत्तर पसरणारा पट्टा दृष्टीस पडेल. या पट्ट्यास आमचे लोक 'आकाशगंगा' किंवा 'स्वर्नदी' म्हणतात. इंग्लिश लोक त्याला 'क्षीरपथ' (Milky Way) म्हणतात. नग्न चक्षूनें या क्षीरपथाकडे पाहिलें असतां, चोहोंकडे धुकें पसरलें आहे कीं काय असा भास होतो. पण याच धुक्यावर मोठीशी दुर्बीण लाविली, आणि तिच्या भिंगांतून त्याकडे पाहिलें म्हणजे धुकें नाहींसें होऊन, आकाशांतील इतर प्रदेशांत उपनेत्रांच्या साहाय्याशिवाय स्पष्ट दिसणाऱ्या मोठमोठ्या तारकावृंदांप्रमाणें नवीन तारकावृंद दिसूं लागतात, व त्यांपलीकडे दुसरें एक धुकें दिसतें! या धुक्यावर पुनः आणखी मोठी दुर्बीण लाविली असतां, तसाच परिणाम होतो! म्हणजे या दुसऱ्या धुक्यांत चकचकणारा नवीन तारकावृंद दिसूं लागून त्यापलीकडे तिसरें धुकें दिसतें! अशा रीतीनें क्षीरपथाचें अवलोकन ज्यानें एकवार केलें आहे, तो या विश्वांतील कोणत्याही गोष्टीचा अंत आपणांस स्पष्टपणें दिसून आला आहे असें म्हणण्यास धजणार नाहीं. तथापि कोणत्याही समंजस मनुष्यास ही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, ज्याला दुर्बिणीचें किंवा सूक्ष्मदर्शक यंत्राचें साहाय्य आहे, त्याला ज्या गोष्टी स्पष्ट दिसतात, त्या, ज्याला त्यांचें साहाय्य नाहीं, त्याला दिसत नाहींत; तसेंच, ज्यानें शास्त्राभ्यास केला आहे, ज्यानें इतिहास वाचला आहे, ज्यानें जगाचा पुष्कळ अनुभव घेतला आहे, व ज्यानें विचारांत दीर्घ काल घालविला आहे, अशा तत्त्ववेत्त्यास मनुष्यप्रवृत्तीची दिशा जितकी नीट समजणार आहे, तितकी अशिक्षितास समजण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें अंधारांत सगळ्या रंगांचा लोप होतो, त्याप्रमाणें फार दूरच्या भविष्यकालाविषयीं विद्वान् आणि अविद्वान् यांचें सारखेंच अज्ञान असतें. तथापि ज्याप्रमाणें दुर्बिणवाल्यास त्या यंत्राच्या साहाय्यामुळें दूरस्थ तारकसमूहाविषयीं दुसरें कांहीं समजलें नाहीं, तरी त्याच्या अनंतत्वाविषयीं खात्री होते, त्याप्रमाणें विद्यारूप दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे, त्याच्या ज्ञानचक्षुस फार

दूरची मनुष्यावस्था नीट रीतीनें न्याहाळतां आली नाहीं, तरी तिच्या उन्नतीला सीमा नाहीं, येवढें पक्कें दिसून येतें. अशिक्षिताची तशी खात्री होत नाहीं. ज्याप्रमाणें साधारण मनुष्यास आकाश जसें दिसतें, तसेंच तें असेल असें वाटतें, त्याप्रमाणें सामाजिक स्थित्यंतराविषयीं ज्यानें म्हणण्यासारखा विचार केलेला नाहीं, त्याला समाजाच्या स्थितींत विशेष बदल होईल असें वाटत नाहीं. या विश्वांतील कोणतीही सचेतन किंवा अचेतन वस्तु स्थिर नाहीं; प्रत्येक क्षणास प्रत्येकींत दृश्य किंवा अदृश्य फेरफार होत आहेत, असें एकदां कळून येणें फार महत्त्वाचें आहे. कारण जग सारखें बदलत चाललें आहे अशी खात्री झाल्यानें, विचारी मनुष्यास येवढाच विचार येतो कीं, ज्याअर्थीं स्थित्यंतराचें रहाटगाडगें सदां फिरत राहणार, त्याच्या गतीस कोणीही प्रत्यवाय करूं शकत नाहीं; त्याअर्थीं जेणेंकरून त्याची गति आपणास सुखावह होईल असें वर्तन करणें आपल्या ताब्यांत असल्यास निदान तसें तरी करावें, म्हणजे बरेंच सुख मिळेल. सध्यां पृथ्वीवर जे ज्ञानी पुरुष आहेत त्या सर्वांच्या अंत:करणाची अलीकडे अशी खात्री होत चालली आहे कीं, जगाचीं स्थित्यंतरें अनादि व अनंत आहेत. तस्मात् आपणांस अनुकूल अशा स्थित्यंतरांस आपण सहायभूत व्हावें, हें आपणास योग्य आहे.

वरील सर्व लेखावरून वाचकांच्या ही गोष्ट ध्यानांत येऊन चुकली असेल कीं, मनुष्यसुधारणेचा ओघ कोणीकडे वहात आहे, हें प्रथम दाखविण्यांत आमचा इतकाच हेतु आहे कीं, त्या ओघापुढें जशी इतर देशांची, तशी आमच्या हिंदुस्थान देशाचीही प्रतिष्ठा बिलकूल चालणार नाहीं. त्याच्या जुवास ज्याप्रमाणें इतर देशांतील लोकांनीं आपले खांदे बिनतक्रार लाविले आहेत, त्याप्रमाणें आजउद्यां आम्हासही तसें केलें पाहिजे. जर आम्ही अगदीं नष्ट न झालों, तर तो प्रवाह आम्हांस जिकडे घेऊन जाईल तिकडे जाण्याचा धीर केला पाहिजे; आणि याप्रमाणें बुद्धीची जर एकवार खात्री झाली, तर पुढला मार्ग फारच सोपा आहे. तेव्हां मनुष्यसुधारणेचा अनिवार्य कल कोणीकडे आहे, हें दाखवूं लागण्यांत सांप्रत विषयाचा खरा आरंभ आहे. आतांपर्यंत फक्त प्रस्तावना झाली.

## विषयप्रवेश

मागल्या अंकांत फक्त प्रस्तावना झाली; आज विषयप्रवेश करावयाचा.

तो करतांना मनुष्यसुधारणेचा अनिवार्य कल कोणीकडे आहे, हें प्रथम पहावयाचें.

मनुष्यसुधारणेचा ओघ कोणीकडे वहात आहे, हें थोडक्यांत समजण्यास मनुष्यांच्या व्यवहाराच्या मुख्य शाखांचा उगम कसा व कोठें झाला; पुढें त्यांत काय काय फेरफार होत गेले; त्यांची सांप्रत स्थिति कशी आहे; व या स्थितीवरून पुढें त्यास कोणत्या प्रकारचें स्वरूप येण्याचीं चिन्हें दिसत आहेत; हें पाहिलें पाहिजे.

सुलभ रीतीनें विषयाचें प्रतिपादन व आकलन होण्यासाठीं मनुष्यांच्या सामान्य सामाजिक व्यवहारांचे राज्यविषयक, धर्मविषयक, व अवांतर असे तीन वर्ग कल्पून, क्रमानें प्रत्येकाचा थोडाथोडा विचार करूं.

पृथ्वीवरील अगदीं रानटी लोकांशिवाय बाकी सर्व लोकांत कशा प्रकारची तरी राज्यव्यवस्था स्थापित होऊन 'राजा' आणि 'प्रजा,' 'शास्ता' आणि 'शासित,' असे दोन भेद दृष्टीस पडूं लागतात. मनुष्यजातींतील व्यक्तींचे असे दोन वर्ग होणें अगदीं स्वाभाविक आहे. अशा वर्गांशिवाय मनुष्यसमाज अस्तित्वांतच फार वेळ राहणार नाहीं. रानटी देशांत राजापासून प्रजेस केवढाही त्रास होत असो, ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, तशा स्थितींत पराकाष्ठेचा क्रूर व जुलमी असा राजा जरी असला, तरी त्यापासून समाजाला नुकसानाहून अधिक फायदा होतो; कारण ज्या स्थितींत सांपल्यास प्रत्येक मनुष्य दुसऱ्या मनुष्यास मारण्यास व लुटण्यास टपलेला असतो, त्या स्थितींत एकच इसम अरेराव होऊन पाहिजे त्यास मारील व लुटील, पण तसें करण्यांत बाकीच्यांची आपआपसांतील मारामार व लुटालूट होऊं देणार नाहीं; तर त्या एकट्याच्या जुलमापासून समाजास होणारी पीडा एकंदरीनें अधिक हितावह होते. अशा स्थितींत व्यक्तिमात्राचा किती छळ होतो, हें पहात बसून चालावयाचें नाहीं. सारी दृष्टि समाजाच्या अस्तित्वावर दिली पाहिजे. कसा तरी तो चालेल तरच व्यक्तिमात्राचे हाल कमी होत जाण्याचा संभव असतो. मनुष्यासारख्या बलहीन प्राण्यास, क्रूर पशूंच्या व आपल्या जातींतील पशुतुल्य व्यक्तींच्या त्रासांतून सुटण्यास कसा तरी समाज करून राहणें व आपल्याचपैकीं एकाद्या बलवंताच्या छत्राचा आश्रय करणें, याहून स्वसंरक्षणाचा दुसरा मार्ग नसतो.

व्याघ्रसिंहादि जे सामर्थ्यवान् व क्रूर हिंस्रपशु आहेत, ते एकमेकांच्या सहवासाची मुळींच पर्वा करीत नाहींत. किंबहुना एकांतवासच त्यांना विशेष प्रिय असतो. भूक लागेल तेव्हां एकाद्या सावजावर झडप घालावी, तहान लागली म्हणजे एकाद्या डबक्यांत तोंड घालावें, व या दोहोंपासून पीडा होत नसली म्हणजे एकाद्या घळींत, झाडींत, किंवा गुहेंत स्वस्थ झोंप घेत पडून रहावें, असा त्यांचा आयुष्यक्रम असतो! तीव्र दाढा, प्रखर नखें, आणि प्रचंड शक्ति यांच्या जिवावर त्यांना आपल्या जातभाईची किंवा दुसऱ्या कोणत्या प्राण्यांची मैत्री करण्याची इच्छाच होत नाहीं! कळप करणें, समाज करणें, एके ठिकाणीं राहणें, एकमेकांस मदत करणें, शत्रूवर साऱ्यांनीं जमून जाणें, किंवा त्याचा हल्ला आला असतां एका जुटीनें वागून स्वसंरक्षण करणें, हीं सारीं लचांडें बलहीन किंवा बल असून संरक्षणाचें कोणतेंही साधन नाहीं, अशा जनावरांच्या पाठीमागें लागलीं आहेत. ज्या मानानें स्वसंरक्षणाचीं साधनें अधिक त्या मानानें समाजाचा जास्त तिटकारा व एकांतवासाची जास्त आवड जनावरांत दिसून येतात. मुंगीसारख्या क्षुद्र कीटकांपासून हत्तीसारख्या धिप्पाड पशूपर्यंत हा नियम लागू पडण्यासारखा आहे. याला कदाचित् एखादा दुसरा अपवाद असेल; पण त्यानें या स्थूल नियमास क्षीणतां न येतां उलट बळकटी येते. मनुष्य तरी संगमनशील होण्याचें हेंच कारण. राजानें किंवा त्याच्या अधिकाऱ्यांनीं कितीही त्रास दिला तरी तो सहसा बंड करावयास प्रवृत्त होत नाहीं, याचेंही मुख्य कारण हेंच आहे. उद्यां जर मनुष्याला एकाएकीं सिंहाच्या दाढा आणि पंजे येऊन त्यांचा उपयोग करण्यासारखें सामर्थ्यही प्राप्त होईल, तर तो आतां जसा समाजप्रिय आहे तसा मुळींच राहणार नाहीं. तात्पर्य काय कीं, मनुष्य जात्या बलहीन असल्यामुळें, राजापासून कितीही त्रास झाला तरी तो सोसून समाजांत राहणें यांतच त्याचें अधिक कल्याण आहे. तो तशा रीतीनें राहत आला आहे हेंच त्या गोष्टीचें प्रमाण होय. एकंदरीनें अशा स्थितींत त्याला अधिक सुख न होतें तर तो समाज करून राहताचना.

एकदां समाज होऊन आपआपसांतील तंटे बंद झाल्यावर, राजापासून व त्याच्या अधिकाऱ्यांपासून होणारी पीडा कशी टळेल इकडे लोकांचें लक्ष लागतें.

या संकटांतून ते लवकर पार पडत नाहींत. तसें न होण्यास अनेक कारणें होतात. मनुष्यांच्या निरनिराळ्या समाजाला कुटुंब, टोळी, जात, राष्ट्र वगैरे विशेष कारणांसाठीं पृथक् संज्ञा देण्यांत आल्या आहेत. या संज्ञांनीं निर्देश होत असलेल्या मनुष्यसमूहांत वारंवार तंटेबखेडे व मारामाऱ्या होत असतात. त्यांतून आपला बचाव होण्यासाठीं कुटुंबांतील माणसें त्यांतील प्रौढ व सामर्थ्यवान् इसमाच्या अंकित होऊन राहातात, व ज्याअर्थी इतर कुटुंबांच्या त्रासापासून त्यांचें संरक्षण करण्यास कुटुंबाधीश आपला प्राण धोक्यांत घालण्यास तत्पर असतो इतकेंच नाहीं, तर तें काम त्याकडूनच होण्यासारखें असतें, त्याअर्थीं तीं सारीं त्याच्या तंत्रानें वागतात, आणि त्यानें हवातसा अंमल चालविला तरी तो निमूटपणें सोसून घेतात. ज्या रीतीनें एका कुटुंबांत एका मनुष्याचें वर्चस्व होतें, त्याच रीतीनें एका टोळींत, जातींत व राष्ट्रांत एका पुरुषाचें आणि त्याच्या आप्तांचें वर्चस्व स्थापित होऊन त्याला ‘ राजा ’, ‘ लोकपाल ’, ‘ लोकनियंता ’, प्रजापति ’ अशीं नांवें प्राप्त होतात; आणि तो सांगेल तें करण्याची आणि तो वागवील तसें वागण्याची संवय लागते. अशा रीतीनें जे एकवार परवश झाले त्यांना तीच स्थिति बरी वाटूं लागते. बुद्धिबल किंवा शरीरबल, ऐश्वर्य आणि सौंदर्य, यांबद्दल मनुष्यांच्या अंत:करणांत जन्मत: पूज्यबुद्धीचीं बीजें असतात. पिढ्यानुपिढ्या यांचें संगोपन करीत गेलें असतां, तीं इतकीं दृढ होऊन जातात कीं, पुढें ज्यांना एकदां पूज्य मानण्याची मनाला संवय लागली, ते त्या पूज्यतेस मुळींच पात्र नसले तरी त्यांचा अवमान किंवा धिक्कार करणें बरें वाटत नाहीं. ही पूज्य मानणारांची गोष्ट झाली. दुसऱ्या पक्षींही बऱ्याच अंशीं असाच प्रकार घडतो. ज्यांना नेहमीं प्रशंसा करून घेण्याची संवय असते, त्यांच्या मनांत आपण त्या प्रशंसेस पात्र आहों, अशी वृत्ति उद्भवून, ती पुढें इतकी दृढ होऊन जाते कीं, कांहीं राजकुलांतील व उच्च कुलांतील स्त्रीपुरुषांच्या अंगीं कोणत्याही प्रकारचा प्रशंसनीय गुण नसतां, त्यांस आपण परमपूज्य आहों, असें वाटूं लागतें, आणि लोकांनीं आपण होऊन मान दिला नाहीं तर, त्यांना दडपून त्यांच्याकडून तो घेण्याचा ते प्रयत्न करतात ! या रीतीनें एका पक्षाकडून स्तुति करून घेण्याविषयीं उत्सुकता, व दुसऱ्या पक्षाकडून ती करण्याविषयीं उत्कंठा असल्यामुळें, थोड्या वर्षांच्या आंत

राजघराण्यांतील पुरुषांस, विशेषतः सिंहासनस्थ राजास 'ईश्वरांश', 'ईश्वरावतार', 'काळकारण', 'न्यायमूर्ति', 'सद्‌गुणनिधान', कृपासागर' अशीं विशेषणें लावण्याचा प्रघात पडतो, व अज्ञान लोकांच्या मनांत त्याविषयीं असल्या कल्पना पूर्णपणें बिंबून जातात. या अतिशयोक्तीमुळें राजे उद्धट व क्रूर आणि प्रजा नीच व भेकड होत जातात. राजाचा जुलूम प्रजेस दुःसह होऊं लागतो. जोंपर्यंत हा राजकीय जुलूम शस्त्रहीन अनाथ प्रजेवर होत असतो तोंपर्यंत तिची दाद कोठेंही लागत नाहीं. पण तोच राज्यांतील मोठमोठ्या कुलांवर होऊं लागला म्हणजे राज्यांत दुफळ्या होऊं लागतात. राजा आणि त्याच्या पक्षास अनुकूल असलेल्या सरदारांचीं घराणीं एकीकडे आणि गांजलेले सरदार व प्रजा दुसरीकडे, असे दोन तट होऊन तंट्यास आरंभ होतो. ह्या तंट्याचा परिणाम भांडणारांच्या मगदुराप्रमाणें कोठें राजांच्या अनियंत्रित सत्तेची छाटाछाट, व कोठें तिची अधिक वृद्धि असा होतो. जेथें राजसत्तेचा अंमल कमी होतो, व मोठ्या कुलांतील पुरुष पुढें सरसावतात, तेथें पुढें पुढें त्यांचीच सत्ता प्रबल होत जाऊन राजसत्ता संपुष्टांत येते, किंवा मुळींच लयास जाते. कालेंकरून राज्य करणारीं श्रीमंतांचीं कुलेंही पूर्वीच्या राजांप्रमाणें जुलमी होत जातात, व पुनः सामान्य लोकांत आणि त्यांत तंटे होऊन, लोक आपली सत्ता चालवूं लागतात. अशा रीतीनें ज्या लोकांच्या अंगीं कांहीं नैसर्गिक ओज आहे. ते हळू हळू राजांच्या व श्रीमंत किंवा लढाऊ सरदारकुळांच्या जुलमांतून सुटून, अखेरीस राज्याधिकार आपल्या हातांत घेतात. युरोपांतील मोठमोठ्या जुन्या व नव्या देशांत राज्यक्रांत्या होऊन क्रमानें वर सांगितल्याप्रमाणें स्थित्यंतरें घडून आलीं आहेत. ज्या लोकांत म्हणण्यासारखा तक्वा नसतो, ते फार त्रास झाला असतां थोडीशी धडपड करतात, आणि फिरून आपल्या सनातसिद्ध पद्धतीप्रमाणें वर्तूं लागतात ! आम्ही हिंदुलोक, मुसलमानलोक, चिनी लोक हे सारे या दुसऱ्या कोटींतले लोक आहों.

राजसत्तेंत होणाऱ्या रूपांतराच्या या ऐतिहासिक स्वरूप विवेचनावरून असें दिसून येईल कीं, राजसत्ता कधीं एकाच्या व कधीं अनेकांच्या हातीं असते. ज्या देशांत ती अनेकांच्या हातीं असेल, तेथें ती त्यांतील मोठमोठ्या सरदारकुलांच्या, लोकांच्या किंवा त्यांनीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातांत असते. जेथें

ती राजाकडून निघून श्रीमंत कुलाकडे येते, तेथें ती कालांतरानें लोकांकडे कोणत्या तरी रूपानें गेल्याशिवाय राहात नाहीं. तेव्हां आतां थोडक्यांत येवढेंच ध्यानांत ठेवावयाचें कीं, कांहीं राष्ट्रांत राजसत्ता एकाच्या व कांहींत अनेकांच्या हातीं असते. युरोपांतील बहुतेक राष्ट्रांत ती कांहीं अंशीं तरी अनेकांच्या म्हणजे लोकांच्या हातांत, व आशियाखंडांत ती बहुतेक पूर्णपणें एकाच्या म्हणजे राजाच्या हातांत आहे. दोहोंतील हा भेद त्यांतील लोकांच्या प्रकृतींतील मूळ भेदामुळें झाला आहे असें वाटतें, व हा, कांहीं केलें तरी, समूळ नाहींसा होईल किंवा नाहीं याची शंका आहे.

राष्ट्र एकसत्तात्मक असो, किंवा अनेकसत्तात्मक असो, विवक्षित स्थितींत त्याला दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करून त्यावर आपला अंमल बसवितां येतो. वास्तविक पाहिलें असतां अनेकसत्तात्मक राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्रावरील अंमल, त्यांतील लोकांस एकसत्तात्मक राष्ट्राच्या अमलापेक्षां अधिक सुखावह व्हावा, असें प्रथमदर्शनीं वाटतें. पण सर्व बाबतींत तसा प्रकार घडून येईलच असें खात्रीनें सांगतां येत नाहीं.

येथपर्यंत राजसत्तेच्या आद्य स्थितीचें आणि सांप्रत स्थितीचें आणि तींत होणाऱ्या फेरफारांचें स्वल्प दिग्दर्शन झालें. तिच्या भावी स्थितीविषयीं व तींत होणाऱ्या फेरफारांविषयीं विशेष लिहिण्यांत अर्थ नाहीं; कारण या प्रकरणाच्यासंबंधानें आजपर्यंत जे असत्या भविष्यकथनांत पडले त्यांस फारसें यश आलेलें नाहीं. तथापि विषयपूर्ततेसाठीं यासंबंधानें मोठमोठ्या तत्त्ववेत्त्यांनीं जें लिहिलें आहे त्याचा पांचचार वाक्यांत गोषवारा देऊन या मुद्द्याचा निरोप घेतों. त्यांच्या विचारांचा असा झोंक आहे कीं, पृथ्वीवर राजकीय घडामोडी होतां होतां तींत अखेरपर्यंत जीं राष्ट्रें टिकतील, त्या सर्वांत हरएक प्रकारचा राज्यव्यवहार अगदीं सौम्य अशा लोकसत्तात्मक राजसभेकडून होत जाईल; म्हणजे सर्व देशांत राजसत्ता लोकांच्या किंवा लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातांत असून तिची मर्यादा अत्यंत संकुचित असेल, व तिचा अंमल अतिशय सुखदायक व सौम्य असेल. प्रथम यूरोपखंडांतील सर्व देशांत लोकसत्तात्मक राज्यांची दृढ स्थापना होईल, व पुढें आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रेलेशिआ वगैरे सर्व लहान

थोर खंडांत व बेटांत लोकसत्ताक राज्यें स्थापण्यांत येतील; हें झाल्यावर ज्या ज्या लोकसत्तात्मक राष्ट्रांची कांहीं कारणामुळें विशेष मैत्री झाली असेल त्यांचे पृथक् राष्ट्रीय समूह होतील; व असें होतां होतां अखेरीस पृथ्वीवरील सर्व लोकसत्तात्मक राष्ट्रांचें एक राष्ट्र झाल्यासारखें होऊन सर्व देशांतील सर्व प्रकारचे लोक एकमेकांशीं सहोदरांप्रमाणें वागूं लागतील!

तत्त्ववेत्त्यांच्या या स्वप्नसृष्टीवरून, व सांप्रतकालीं राजसत्तेस जें स्वरूप प्राप्त झालें आहे त्यावरून, राजकीय उठाठेवींत पडलेल्या किंवा राजकीय विषयांविषयीं चर्चा करून सामान्य जनांस बुद्धिवाद सांगणाऱ्या आमच्या देशांतील लोकाग्रणींनीं येवढीच गोष्ट ध्यानांत आणावयाची कीं, जीवनार्थ कलहांत भारतीय आर्यांचा शेवटपर्यंत निभाव लागावा हें इष्ट असेल, तर ज्या उपायांनीं राजसत्ता त्यांच्या हातीं येईल ते आपण करीत असलों म्हणजे आपलें कर्तव्य झालें, असें समजून स्वस्थ बसतां कामा नये; तर ज्या उपायांनीं राजसत्ता प्राप्त झाली असतां तिचें संरक्षण व तिचा सदुपयोग करतां येईल, असें शिक्षण त्यांस अगोदर दिलें पाहिजे, हें ध्यानांत आणून त्या कामास अगोदर लागलें पाहिजे.

## धर्मविचार

मागल्या अंकांत राज्यविषयक विचार कोठपर्यंत येऊन ठेपला आहे, हें सांगितलें. आज धर्मविचारांचा इतिहास थोडक्यांत सांगावयाचा.

धर्मसंबंधानें लिहिणाऱ्या कोणत्याही मनुष्याचे तद्विषयक विचार कसेही असोत, त्यानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ज्या विषयाचें आकलन फक्त मनुष्यासच होत आहे इतकेंच नाहीं, तर जो विषय मनुष्याच्या डोक्यांत विचारवृत्ति उद्बुद्ध झाल्यापासून कोणत्या तरी रूपानें येऊं लागतो, व त्याच्या स्थितींत कितीही बदल झाला तरी त्याच्या डोक्यांतून जो समूळ निघत नाहीं, अशा विषयाविषयीं लिहितांना पराकाष्ठेच्या शांततेचें आणि समीक्षतेचें अवलंबन केलें पाहिजे. काम, क्रोध, मद, मत्सर, दया, अनुकंपा, लोभ वगैरे बऱ्यावाईट मनोवृत्ति जशा मनुष्यांत नैसर्गिक आहेत तशी धर्मवृत्तीही नैसर्गिक आहे. जशा इतर वासना किंवा वृत्ति तशी धर्मवृत्ति किंवा धर्मवासना समजली पाहिजे. मनुष्याच्या मनोवृत्तींपैकीं कांहीं स्वाभाविक व कांहीं आगंतुक असें

मनुष्याच्या अंतःकरणांत धर्मवृत्ति नैसर्गिक आहे, असें जें वर म्हटलें आहे तेवढ्यावरून असें समजतां कामा नये कीं, मनुष्याच्या पाहिजे त्या अवस्थेंत ही वृत्ति स्पष्टपणें दिसत असते. ज्याअर्थी विवक्षित स्थितींत ती दिसूं लागते, त्याअर्थी तिचीं बीजें सूक्ष्मरूपानें त्याच्या अंतःकरणांत असलीं पाहिजेत हें उघड आहे. पण त्यांना दृश्य स्वरूप येण्यास कांहीं ठिकाणीं काल जावा लागतो. कांहीं असे प्राणी आहेत कीं, त्यांना मनुष्य म्हटल्याखेरीज इलाज नाहीं. पण त्यांच्या भाषेंत देव, धर्म वगैरे अर्थसूचक शब्द नाहींत तेव्हां त्या वस्तूंच्या कल्पनाही त्यांना नसल्या पाहिजेत हें उघड आहे. कारण ज्यांना भाषेचा उपयोग समजूं लागला आहे, त्यांना थोड्या दिवसांत आपल्या मनांतील पाहिजे ती कल्पना व्यक्त करण्यासारखी शब्दयोजना करतां येते. निदान एकाला दुसऱ्याच्या मनांतील भाव समजण्यास शब्दांसारखें दुसरें साधन नाहीं. ज्या लोकांस भाषेचा उपयोग ठाऊक झाला आहे, पण ज्यांमध्यें धर्मविषयक कल्पना व्यक्त करणारे शब्द दृष्टीस पडत नाहींत, ते धर्मसंबंधानें विचार करीत असतील, असें म्हणणें म्हणजे पशुपक्ष्यादि जीवकोटींतील खालच्या प्रतीचे प्राणीही सृष्टिकर्त्याविषयीं प्रतिदिवशीं मनांतल्या मनांत ध्यान व प्रार्थना करीत असतील असें म्हणण्यासारखें होय. तात्पर्य काय कीं, प्राण्यांच्या शब्दांवरून व कधीं कधीं त्यांच्या बाह्य कृतींवरून त्यांचे मनांतील विचार आपणास समजतात. ज्या गोष्टीविषयीं या दोहोंचा अभाव असेल त्या गोष्टीविषयीं ते चिंतन करीत असतील, असें पाहिजे तर आग्रहानें म्हणतां येईल; पण दुसऱ्यास तें सिद्ध करून देतां येणार नाहीं. तेव्हां धर्मसंबंधानें अज्ञान लोकांचें म्हणणें कांहींही असलें तरी ज्यांना अर्वाचीन न्याय, मीमांसा, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रांतील सिद्धान्त मान्य झाले आहेत, व ज्ञानसंपादनार्थ भूगोलभर प्रवास करण्यांत आयुष्य घालविणाऱ्या सत्यप्रिय शोधकांनीं प्रसिद्ध केलेली माहिती व पुस्तकें ज्यांनीं थोडींबहुत वाहिलीं आहेत, त्यांना मनुष्याच्या विवक्षित स्थितींत त्याच्या अंतःकरणांत कोणत्याही प्रकारची धर्मकल्पना नसते, असें कबूल करावें लागतें. पुढें जेव्हां तिचा आविर्भाव होऊं लागतो, तेव्हां त्याच्या बाकीच्या कल्पनाप्रमाणें ती फारच ग्राम्य असते. रानटी स्थितींतील मनुष्याला विश्वाचे व्यापार, पदार्थांचे धर्म, वस्तूंत होणाऱ्या रूपांतरांचीं कार्यकारणें समजत

नसल्यामुळें तो अगदीं भांबावून गेलेला असतो, व स्वतःच्या मनांतील ज्या वृत्तींचा अनुभव त्यास प्रत्येक क्षणीं होत असतो, त्याच प्रकारच्या वृत्ति ज्या अनंत वस्तु त्याच्या सभोंवतीं असतात त्यांचे ठायींही वसत असतील, अशी भावना त्यास होऊं लागते. ह्या भावनेचें स्वरूप ज्यांना नीटपणें जाणण्याची इच्छा असेल त्यांनीं अगदीं लहान मुलांच्या बोलण्याचालण्याकडे लक्ष द्यावें, म्हणजे तें त्यांस कळून येईल. जमिनीवर पडलें असतां जमिनीला मारणें, खेळाच्या घोड्यास व गाड्यास आपल्यासारखीच समजूत असेल असें वाटणें, मांजर कुत्रीं, राघू वगैरे प्राण्यांना आपल्यासारखें समजून त्यांशीं लडिवाळपणा करणें, त्यांवर रागावणें, किंवा त्यांना मारणें, आणि त्यांच्याविषयीं वडील माणसांपाशीं कागाळ्या सांगणें—वगैरे बाललीला ज्यांनीं ज्ञानदृष्टीनें पाहिल्या असतील त्यांना मनुष्याच्या रानटी स्थितींतील धर्मकल्पनांचें स्वरूप तेव्हांच समजणार आहे. सुधारलेल्या देशांतील मुलांच्या बाल्यावस्थेंतील कल्पना आणि रानटी लोकांतील प्रौढांच्या कल्पना.— यांत फारसा भेद असत नाहीं. रानटी लोकांस ऊन, पाऊस, वारा, वीज, पूर वगैरे निर्जीव सृष्टपदार्थांपासून, व व्याघ्रसिंहादि वन्य पशूंपासून आपला बचाव कसा करावा हें समजत नसल्यामुळें त्यांची भीति त्यांस उत्पन्न होते, व ज्या कारणांनीं आपले मनोविकार क्षुब्ध व संतुष्ट होतात त्याच कारणांनीं त्यांचेही मनोविकार क्षुब्ध व संतुष्ट होत असतील असें वाटूं लागतें, या वाटूं लागण्यांत धर्मकल्पनेचा मूळ आरंभ आहे. ज्या बाह्य सृष्टपदार्थांपासून आनंद होईल त्याला मित्र म्हणावा, व ज्यांपासून त्रास होईल त्याला शत्रु म्हणावा; मित्राची मर्जी राखण्याचा व शत्रूस दंड करण्याचा प्रयत्न करावा—या रीतीनें पदार्थपूजा अस्तित्वांत येते. बाह्य सृष्टींतील वस्तुसमुदायांस व प्राणिसमुदायांस आपल्यासारखींच मनें आहेत, अशी भावना एकदां झाली म्हणजे मनुष्य कोणत्या निर्जीव वस्तूस, किंवा कोणत्या झाडास, किंवा जनावरास भिऊं लागणार नाहीं, व देव म्हणून स्तवूं लागणार नाहीं, हें सांगतां येणार नाहीं.

## धर्मविचारांची वाढ.

सृष्टींतील सचेतन व अचेतन वस्तूंपासून होणारा त्रास व आनंद यांच्या

प्राथमिक अनुभवामुळें अज्ञानावस्थेंतील मनुष्यांच्या अंतःकरणांतील धर्म-कल्पनाबीजास अंकुर कसा फुटतो, हें मागल्या अंकांत सांगितलें. आज या अंकुराची वृद्धि कशी होत जाते, व आतांपर्यंत तिची वाढ किती झाली आहे, हें पहावयाचें.

सृष्टींतील एकंदर वस्तुसमुदायाचे सचेतन व अचेतन असे दोन स्थूल विभाग करण्यास हरकत नाहीं. मात्र अचेतन वस्तूंत चंद्रसूर्यापासून अत्यंत सूक्ष्म परमाणु घेतले पाहिजेत व सचेतन वस्तूंत शेवाळापासून मनुष्यापर्यंत लहानमोठ्या हरएक वनस्पतीचा, कीटकाचा व मोठ्या प्राण्यांचा समावेश केला पाहिजे; किंवा सोईसाठीं निर्जीव वस्तु, वनस्पति आणि प्राणी असे तीन वर्ग कल्पिले तरी चालेल. धर्मसंबंधानें या तीन वर्गांतील वस्तूंचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, प्रत्येक देशांतील लोकांनीं विवक्षित स्थितींत या वर्गांपैकीं प्रत्येक वर्गांतील कांहीं वस्तूंस देव मानिलें आहे. हे वस्त्वधिष्ठायी किंवा वस्त्वंतर्गत देव अगदीं साध्या प्रकारचे असतात, व त्यांत आणि त्यांच्या पूजकांत फारसें अंतर नसतें, हें स्वल्प विचारांतीं दिसून येईल. मनुष्याप्रमाणें यांनाही भुकेपासून व तहानेपासून पीडा होते! मनुष्याप्रमाणेंच हे मांस व धान्य खातात, व पाणी आणि सुरा पितात! ज्या गोष्टींपासून मनुष्यांस सुखदुःखें होतात, त्यांपासून तीं यांसही होतात! ज्याप्रमाणें मनुष्यांना मरण आहे, त्याप्रमाणें यांनाही आहे! मनुष्य ज्या रीतीनें जन्मास येतो, त्याप्रमाणें हेही येतात! दोहोंत भेद येवढाच कीं, मनुष्यांच्या वासनांहून यांच्या वासना विशेष प्रबल; मनुष्यांच्या कर्तृत्वाहून यांचें कर्तृत्व विशेष मोठें; व मनुष्यांच्या उपभोगसामर्थ्याहून व आयुर्मर्यादेहून यांचे उपभोगसामर्थ्य आणि आयुर्मर्यादा विशेष विस्तृत! असल्या देवांच्या आपआपसांत लढाया व तह होतात, ते एकमेकांच्या स्त्रिया पळवून नेतात, व त्यांच्या पातिव्रत्याचें हरण करतात! आणि मनुष्यांत कांहीं कारणामुळें संग्राम माजला तर ते आपापल्या मनुष्य-भक्तांस मदत करण्यास येतात! सारांश, पाहिजे त्या देशांतील मनुष्यांच्या पूर्वस्थितीची आणि विचारांची माहिती काढून पहा, तींत देवांच्या संबंधानें असा प्रकारच्या कल्पना सांपडल्याशिवाय राहणार नाहींत. सृष्टींतील ठळक ठळक निर्जीव वस्तूंत प्रथम सचेतनत्व व क्रियाकर्तृकत्व भासून पुढें जसजसा

कार्यकारणांचा संबंध कळत गेला असेल, तसतसे हे गुण त्यांच्यांतून काढून घेऊन त्यांचा आरोप मनुष्यांनीं वनस्पतीवर व प्राण्यांवर केला असेल, असें वेदादि जुन्या ग्रंथांवरून दिसतें, असें अलीकडील पंडितांचें म्हणणें आहे. धर्मसंबंधानें ज्यांचे विचार फार पुढें गेले आहेत त्यांची गोष्ट राहू द्या; ज्यांना अजून पूर्वधर्मविचारांनीं सोडिलें नाहीं, त्यांच्या वृत्तीकडे किंचित् पहा, म्हणजे वर जें म्हटलें आहे त्याचें यथार्थत्व दिसून येईल. आमच्या रोजच्या संध्या, आमच्या देव्हाऱ्यांतील देवांच्या पूजा, आणि आमच्या श्रावण्यांतील मंत्र यांचा अर्थ समजण्याचा किंचित् प्रयत्न केला, व त्यांतील तंत्रांकडे तत्त्वदृष्टीनें क्षणभर पाहिलें, तर मनुष्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या धर्मकल्पनांच्या वृद्धीचा इतिहास समजण्यास बरेंच साहाय्य होणार आहे. सूर्य, चंद्र, अग्नि, मृत्तिका, पाषाण, धातू वगैरे अनेक निर्जीव वस्तूंपैकीं कांहींस आम्हीं साक्षात् देव मानतों व कांहींस देवांच्या प्रतिमा करण्याकडे लावतों. या प्रतिमा कांहींशा जनावरांच्या व मनुष्यांच्या वळणावर केलेल्या असतात. सारांश काय कीं, निर्जीव वस्तूंपैकीं कांहींत देवत्व आहे, असें अद्यापि आपण मानितों; व कांहींस इतर दैवतांचीं पूजोपकरणें केलें आहे.

निर्जीव वस्तूंच्या विचारानंतर वनस्पतीकडे वळलें असतां, त्यांपैकीं कांहींस आपण देव मानतों, हें सर्वांस कबूल केलें पाहिजे. आपट्याची व शमीची पूजा कोणत्याही जातीच्या हिंदु लोकांस ठाऊक नसेल असें वाटत नाहीं. उंबर, वड, पिंपळ यांच्या पूजेचे प्रसंग ठरीव आहेत, पण तुळशीची मात्र तशी गोष्ट नाहीं. शुचिर्भूत ब्राह्मणाच्या घरांत एका बाजूनें "पूजा व वैश्वदेव" आणि दुसऱ्या बाजूनें "तुळशीला पाणी आणि प्रदक्षिणा" हीं नित्य होत नाहींत, असें बहुशः दृष्टीस पडणार नाहीं. ज्याप्रमाणें निर्जीव वस्तूंपैकीं कांहीं देव मानिल्या असून, कांहीं देव मानलेल्या दुसऱ्या वस्तूंच्या पूजेस उपयोगीं पडतात, त्याप्रमाणें वनस्पतींपैकीं ज्यांस देव मानिलें आहे त्यांपैकीं कांहीं, व न मानिलेल्यांपैकीं कांहीं, देव मानिलेल्या इतर वस्तूंच्या पूजेस उपयोगीं पडतात. बेलाच्या झाडाची पूजा फारशी प्रचारांत नाहीं, पण त्याच्या त्रिदलांशिवाय शिवाची पूजा सांग व शिवकारक होत नाहीं. तुळस पूजा घेत असून पूजोपकरण झाली आहे. या दोहोंशिवाय पुष्कळ झाडांचीं पानें व

फुलें देवांस प्रिय आहेत, हें सर्वांस ठाऊकच आहे. निदान फुलांविषयीं तरी कोणासही शंका येणार नाहीं. ज्यांना पानांविषयीं किंचित् भ्रांति पडल्यासारखें होईल त्यांनीं श्रावणांतल्या मंगळागौरी, आणि त्यांच्या पूजेसाठीं 'पत्र्या' गोळा करण्याविषयीं तरुण कन्यकांची उत्कंठा मनांत आणावी म्हणजे झालें! रुईच्या पानांच्या आणि फुलांच्या माळांचा हनुमंताला किती हव्यास आहे हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच!

पाषाणादि निर्जीव वस्तु व अर्कवृक्षादि वनस्पति मात्र देवतात्वाप्रत पावल्या आहेत इतकेंच नाहीं, तर प्राणिवर्गाच्याही अनेक अवयवांची पूजा आपण फार वर्षांपासून अंगीकारली आहे. मच्छ, कूर्म, वराह, नारसिंह हे परमेश्वराचे अवतार! उंदीर गणपतीचें वाहन! गाय तर साऱ्या हिंदूंस पूज्य! हिच्या दुधानें, तुपानें, व दह्यानें आमची पुष्टि होते, आणि हिच्या शेणाच्या आणि मूत्राच्या सेवनानें आमच्या पापांचें क्षालन होतें! गिरिजारमण नंदिवाहनावर आरूढ होऊन कैलासावर संचार करणार, तेव्हां 'शिववंदन कामांहीं वंदावा प्रथम देव नंदी न' असें मुळींच होण्याचा संभव नाहीं. तेव्हां शिवालयांत प्रवेश करतांना, व त्यांतून परत फिरतांना, द्वारस्थ जो नंदी त्याची कृपा होण्यासाठीं आर्जव करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यांतील सर्वांत कार्यकर मार्गाचें अवलंबन आम्ही करतों, हें आबालवृद्धांस ठाऊक आहे! याशिवाय आणखी पुष्कळ जनावरेंही आम्हांस पूज्य झालीं आहेत. पण त्यांचा येथें उल्लेख करीत बसून जागा अडविण्याची गरज नाहीं, कारण एक तर प्रस्तुत विषयाचा हा ऐतिहासिक विचार चालला आहे; दुसरें असें कीं, जनावरांच्या ठायीं देवत्वाची कल्पना करून त्यांस पुजणें व भजणें ह्या गोष्टी हिंदु लोकांतच आढळतात असें नाहीं. इतिहासाच्या वाचकांस त्या प्रत्येक देशाच्या इतिहासांत दिसून येतात. भेद इतकाच कीं, हिंदुस्थानांत उंदरांची आणि सापांची पूजा होत असली तर ईजिप्तांत सुसरींची किंवा मांजरांची होत असेल!

या सर्व विवेचनावरून आतां वाचकांच्या ध्यानांत ही गोष्ट येईल कीं, मनुष्याची बुद्ध पशुवरस्था किंचित् नाहींशी होऊन तो विचार करूं लागला, म्हणजे सृष्टींतील भव्य जड पदार्थांविषयीं, झाडाझुडपांविषयीं, व लहान मोठ्या जंतूंविषयीं त्याला एका प्रकारची भीति उत्पन्न होऊन,

त्याच्या अंत:करणांत धर्मकल्पनेचा आविर्भाव होतो, व उत्तरोत्तर तिचा स्पष्ट विकास होत जाऊन ती शुद्ध होत जाते. वारा, पाऊस, पूर, चंद्रसूर्यांच्या गति वगैरे गोष्टींचीं कारणें, व त्या घडून येण्याचे प्रसंग नीट कळून येऊं लागले, म्हणजे त्या वस्तूंवरील धर्मश्रद्धा हळू हळू उडूं लागते, व असाच प्रकार देव मानलेल्या वनस्पतींच्या व जनावरांच्या संबंधानें हळू हळू घडून येतो. हें सर्व विचारांतर होण्यास विशेषतः कार्यकारणांचें ज्ञान कारण होतें. अशा रीतीनें मनुष्याच्या धर्मकल्पनांत थोडा थोडा फरक होतां होतां, बहुतेक अचेतन व सचेतन पदार्थांतील देवतात्व नाहींसें होऊन, त्या सर्वांचें आदिकारण एक परमेश्वर आहे, असा बुद्धीचा ग्रह होतो. नंतर या परमेश्वराच्या गुणांविषयीं व स्वरूपाविषयीं नानातऱ्हेच्या कल्पना निघूं लागतात. पहिल्या मूर्तिपूजेचा अंमल अगदीं नाहींसा न होतां एकेश्वरापर्यंत धर्मकल्पना जाऊन थडकली, तर आचार आणि विचार यांचें द्वंद्व लागून विलक्षण तऱ्हेचा धर्म उत्पन्न होतो. तोंडानें वारंवार परमेश्वर निर्गुण आहे असें म्हणत असावें, व हातानें पार्थिव करून त्याची अक्षतांनीं, बिल्वपत्रांनीं, व पंचामृतांनीं पूजा करीत असावें! जो मेला तो पंचत्वाप्रत मिळाला, असें मनांत वाटत असावें, पण क्षौर, सपिंडी, व शय्यादान केल्याशिवाय व अशौच धरल्याशिवाय स्वास्थ्य वाटूं नये! वर्णव्यवस्था मनुष्यकृत आहे, अशी खात्री होऊन जावी, पण अतिशूद्राचा स्पर्श झाला असतां सचैल स्नान करण्याची बुद्धि व्हावी! बहुतेक व्यवहार सृष्टिनियमांप्रमाणें चालत आहेत, असें एकीकडे वाटत असून तदनुसार वर्तन होत असावें, पण कोणत्याही अडचणींत साधारण उपाय चालत नाहींत, असें दिसल्याबरोबर ज्योतिष्यांच्या व मंत्राक्षऱ्यांच्या घरीं खेटे घालावे, किंवा देवांच्या मूर्ति पाण्यांत कोंडून ठेवाव्या, अथवा त्यावर अभिषेकाची धार धरावी, अशी इच्छा उत्पन्न व्हावी! पण अलीकडे या दुटप्पी वृत्तीचाही लोप थोडथोडा होऊं लागला आहे.

## धर्मविचारांची उन्नतावस्था

आतांपर्यंत या विषयाच्या संबंधानें जें लिहिण्यांत येऊन गेलें आहे तेवढ्यावरून वाचकांच्या हें ध्यानांत आलें असेल कीं, मनुष्य अज्ञानावस्थेंत असतां बाह्य सृष्टींतील सचेतन व अचेतन वस्तूंच्या व्यापारांचे जे परिणाम

त्याच्या अंतःकरणावर घडतात, त्यामुळें त्या पदार्थांचे ठायीं आपल्या मनोवृत्तीसारख्या मनोवृत्ति असतील अशी त्याची भावना होऊन तो निर्जीव वस्तूंची, प्राण्यांची, वनस्पतींची, व अखेरीस विश्वाची पूजा करूं लागतो. या वस्तूंच्या पूजनांत कांहीं अर्थ नाहीं; यांच्या ठायीं आपल्यासारख्या मनोवृत्ति असतील असें मानणें चूक आहे; मनुष्य हाच सर्वांत श्रेष्ठ प्राणी होय; निर्जीव व सजीव वस्तूंचे व्यापार व्यवस्थित नियमानें चालतात; या वस्तूंपासून आपला उपयोग करून घ्यावयाचा असेल तर, त्यांच्यावर रागावण्यांत, त्यांना शिक्षा करण्यांत, किंवा त्यांची प्रार्थना करण्यांत कांहीं होणार नाहीं; त्यांच्या व्यापारांचे नियम शोधून काढून तदनुसार त्यांपासून आपली कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे; अशी मनुष्याच्या मनाची खात्री होण्यास फार काल लागतो. ज्यांची अशा प्रकारची खात्री झाली आहे ते वनस्पतिपूजकांस, प्राणिपूजकांस व विश्वपूजकांस नांवें ठेवतात व त्यांस मूढ समजतात. पण हें त्यांचें करणें कांहीं अंशीं चुकीचें आहे. अगदीं लहान मुलांस जर आपण असें सांगूं लागलों कीं पृथ्वी व सूर्य यांमध्यें चंद्र आल्यानें त्यास ग्रहण लागतें, आणि तें त्याला समजलें नाहीं, तर त्याबद्दल त्यांवर रागावण्यांत काय होणार आहे ! कोणतीही क्लिष्ट गोष्ट समजण्यास अगोदर तिच्या घटकांचें ज्ञान झालें पाहिजे. साखर, तांदूळ, केशर, पाणी, व विस्तव यांची माहिती असल्याशिवाय साखरभात कसा करतां येईल ! तसेंच शास्त्राभ्यासामुळें ज्यांना खऱ्या कार्यकारणसंबंधाचा निश्चय कसा करावा हें कळूं लागलें आहे, त्यांनीं ज्यांना तो कळत नाहीं त्यास मूर्ख म्हणण्यांत व त्यांचा धिक्कार करण्यांत काय अर्थ आहे ! रानटी किंवा अज्ञान मनुष्यास मन म्हणजे काय हें बिलकुल समजत नसतें, त्यामुळें पहिल्यापासून त्याला दोन प्रकारच्या सत्त्वांचा भास होत असतो. जागृदवस्थेंत होणारे अनुभव आणि स्वप्नावस्थेंत होणारे अनुभव यांत फारसा भेद वाटत नाहीं. पहिल्या स्थितींतील सुखदुःखानुभव त्याला जितका खरा वाटतो, तितकाच दुसऱ्या स्थितींतीलही वाटतो. ज्याप्रमाणें निजलेल्या मनुष्याचें एका प्रकारचें स्वत्व मंद पडून दुसऱ्या प्रकारचें स्वत्व पुढें होतें, त्याप्रमाणें मेलेल्या मनुष्याचेंही एका प्रकारचें स्वत्व नाहींसें होऊन दुसऱ्या प्रकारचें स्वत्व येत असावें व तो एका तऱ्हेनें आपणांतून

नाहींसा झाला तरी दुसऱ्या तऱ्हेनें तो जिवंत असला पाहिजे, व आपल्या सभोंवतीं वावरत असला पाहिजे ही कल्पना मनुष्याच्या प्रथमावस्थेंत प्रत्येक ठिकाणीं अस्तित्वांत असते. आपल्या मेलेल्या आप्तांचीं शरीरें नाहींशीं झालीं तरी त्यांचे आत्मे नाहींसे झाले नाहींत, हा विश्वास सर्व ठिकाणच्या रानटी लोकांत आढळून येतो, व याच विश्वासापासून हळूहळू पदार्थपूजा, प्राणिपूजा, वनस्पतिपूजा, व विश्वपूजा अस्तित्वांत येतात. जिवंतपणीं ज्यांचें वर्तन आपणांस सुखावह झालें असेल ते मरणोत्तरही पिशाचरूपानें किंवा वायुरूपानें आपला निरंतर परामर्ष घेत जातील, अशी कल्पना उत्पन्न होऊन त्यांची मर्जी प्रसन्न ठेवण्यासाठीं त्यांच्या थडग्यांत किंवा चितेवर त्यांना प्रिय अशा वस्तु अर्पणें, त्यांचीं प्रार्थना करणें, कांहीं संकट आलें असतां त्यांचा सल्ला विचारणें व साहाय्य मागणें,—सारांश जिवंतपणीं कोणाचीही मर्जी संपादण्याचे जे मार्ग त्यांचें मरणोत्तरही अवलंबन करण्याचा प्रचार पडतो. याच्या उलट जे जिवंतपणीं आपणांस प्रतिकूल असतील ते मेल्यावरही पिशाचरूपानें आपणांस त्रास देत रहातील असें वाटून पंचाक्षऱ्याकडून किंवा मांत्रिकाडून त्यांना दंडण्याचा व गाडण्याचा प्रयत्न करणें, अथवा ज्या वस्तु त्यांना प्रिय होत्या असें ठाऊक असेल, त्या त्यांना विवक्षित कालीं पोंचविण्याचें कबूल करून त्यांस वश करून घेण्याची खटपट करणें वगैरे प्रचार अस्तित्वांत येतात ! पुढें अनेक कारणांमुळें हींच पिशाचें वृक्षांच्या व जनावरांच्या रूपानें आपणांस आनंद देणारीं किंवा पीडा देणारीं होतात, असें वाटूं लागून झाडांची आणि जनावरांची आराधना करण्यास प्रारंभ होतो. येथपर्यंत धर्मविचारांची मजल आल्यावर, मग पृथ्वीवरील मोठमोठ्या वस्तूंत आपल्या प्रसिद्ध आप्तांनीं मरणोत्तर प्रवेश केला असेल, असें वाटणें अगदीं साहजिक आहे; व या वाटण्यास आरंभ झाला म्हणजे प्रथम नद्या, पर्वत, अरण्यें वगैरे वस्तु सचेतन अशा भासूं लागून, अखेरीस चंद्रसूर्यादि तारकागणही सचेतन वाटूं लागतात, आणि त्यांचा आपल्या पूर्वजांशीं संबंध आहे, किंवा ते आपले पूर्वजच आहेत, असा विश्वास उत्पन्न होऊन त्यांची पूजा करण्याचा प्रघात पडतो !

अशा रीतीनें धर्मकल्पनेची उत्पत्ति व अभिवृद्धि होते. आपल्या देशांत

धर्मसंबंधानें जसल्या नानाविध कल्पना रूढ आहेत, तसल्या इतर देशांतही आहेत. सर्वांचा आरंभ पिशाचकल्पनेपासून झाला आहे, व प्रत्येक देवता मनुष्यांनीं आपल्या स्वभावाच्या वळणावर नेली आहे. देशकाल-भिन्नत्वामुळें निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वस्तूंस देवता मानण्याचा प्रघात पडतो, व एकाच देशांत एका देवतेहून दुसरी देवता विशेष पूज्य, व एका स्थानाहून दुसरें स्थान देवतांच्या वासास विशेष प्रिय, अशा प्रकारच्या कल्पना अस्तित्वांत येऊं लागतात. जो तो आपापली देवता इतर देवतांहून श्रेष्ठ मानूं लागतो, आणि तिचा अभिमान धरून तिच्यासाठीं इतरांशीं भांडूं लागतो! हीं भांडणें पुढें धर्मयुद्धास कारण होतात, व शेवटीं साऱ्या देवता दुय्यम प्रतीच्या ठरून त्या सर्वांहून श्रेष्ठ असा एक देवाधिदेव किंवा परमेश आहे, अशी कल्पना होते. ज्याप्रमाणें मनुष्यांत राजा सर्वांत श्रेष्ठ त्याप्रमाणें देवतांत परमेश्वर श्रेष्ठ; व ज्याप्रमाणें प्रजा राजांच्या आज्ञा पाळतात, त्याप्रमाणें दुय्यम प्रतीच्या देवता या सर्वश्रेष्ठ परमेश्वराची आज्ञा पाळतात, आणि त्याच्या हुकमांत वागतात, असें वाटूं लागतें.

येथून पुढला पल्ला फार थोडा आहे. दुय्यम प्रतीच्या देवतांचें देवतात्व नाहींसें होऊन सर्वश्रेष्ठ परमेशाच्या कृपेनें सारें विश्व झालें आहे, त्याच्या इच्छामात्रेंकरून अनंत ब्रह्मांडें अस्तित्वांत येतात व लयास जातात; तो सर्वव्यापी आहे; तो अविनाशी आहे; तो निरंतर आहे; तो निर्गुण आहे; तो निराकार आहे, तथापि तो सर्व लहान वस्तूंहून लहान व सर्व थोर वस्तूंहून थोर आहे, वगैरे परस्परांशीं असंबद्ध व परस्परविरोधी अशा गुणांचें स्थान होऊन बसतो; व याच्या पुढेंही मनुष्याचा धर्मविचार थोडासा गेला म्हणजे परमेशस्वरूप जीवास अगम्य आहे, अशी बुद्धीची भावना होऊं लागते.

याप्रमाणें धर्मकल्पनेच्या वंशावळीची हकीगत आहे. ती येथें विस्तारपूर्वक दाखवितां आली नाहीं, आणि म्हणून ती पुष्कळांस दुर्बोध होण्याचा संभव आहे. पण त्या गोष्टीस इलाज नाहीं. येथें या विषयाच्या संबंधानें अधिक लिहिणें म्हणजे विषयांतर होणार आहे. शिवाय, हा विषय इतका विस्तृत आहे, व त्यासंबंधानें अलीकडे इतके शोध झाले आहेत कीं आज त्याविषयीं जी माहिती मिळण्यासारखी आहे, तिचा एक शतांश देण्यास सुधारकाचे

पंधराचे पंधरा कालम दर आठवड्यास भरून काढले तरी दोन वर्षांत ती सविस्तर दिली जाणार नाहीं! आतांपर्यंत जें लिहिलें आहे, तेवढ्यावरून धर्मकल्पना प्रथम अस्तित्वांत येते कशी, पुढें तिचीं जीं रूपांतरें होतात तीं कोणत्या कारणांमुळें, व तिची मजल कोठवर जाऊन पोंचते—इतक्या गोष्टींचें स्थूल स्वरूप वाचकांच्या लक्षांत आलें म्हणजे आमचें काम झालें. राजकल्पना व धर्मकल्पना यांच्या अभिवृद्धींत बराच फरक आहे. राजकीय संबंधानें राजसत्ता प्रथम एकाकडे असणें योग्य वाटत असून हळू हळू ती अनेकांकडे असणें योग्य वाटूं लागतें. एकसत्तात्मक, अनेकसत्तात्मक, व सर्वसत्तात्मक—अशी राजकीय कल्पनेची वाढ आहे. धर्मकल्पनेचा प्रकार हिच्या उलट आहे. देवतात्व प्रथम विश्वांतील सर्व वस्तूंत भासतें; नंतर तें त्यांतील ठळक ठळक वस्तूंत भासूं लागतें; व अखेरीस तें फक्त एका वस्तूंत गोळा होतें! ज्यांना विश्वांतील सचेतन व अचेतन पदार्थांचे धर्म समजले आहेत; ज्यांची मूर्तिपूजेवरील भक्ति उडाली आहे; ज्यांना सृष्टीचा कर्ता सृष्टींतील कोणत्याही निर्जीव किंवा सजीव वस्तूहून निराळ्या तऱ्हेचा आहे, असें वाटूं लागलें आहे, ते या शेवटल्या कोटींत असतात; म्हणजे त्यांना या विश्वाचें एक आदिकारण आहे असें वाटत असून त्याचें स्पष्ट ज्ञानही आपणांस आहे, किंवा करून घेतां येईल असें वाटत असतें. जे लोक असें कारण असेल असें मानीत नाहींत, त्यांस वरील कोटींतले लोक नास्तिक म्हणून त्यांचा तिरस्कार करतात, व त्यांस पतित मानतात. एका अंगाला नास्तिक म्हणजे बेधडक परमेश्वर नाहीं असें म्हणणारे थोडेसे लोक, व दुसऱ्या अंगाला एकच परमेश्वर आहे, व त्याच्या स्वरूपाचें आणि गुणांचें ज्ञान मनुष्यमात्रास करून घेतां येतें इतकेंच नाहीं, तर तें करून घेणें, त्याला शरण जाणें, त्याला भजणें, त्याला भिणें, व त्याच्या इच्छेप्रमाणें वर्तन करणें हेंच मनुष्यास योग्य आहे, व असें करणारे मनुष्य जन्ममरणापासून मुक्त होऊन त्या ईशस्वरूपांत जाऊन मिळतात किंवा मोक्षाप्रत पावतात, असें मानणारे दुसरे लोक यांच्या दरम्यान कांहीं लोक आहेत ते असें म्हणतात कीं जगत्कारण आहे हें आम्हांस कबूल आहे, पण आमच्या सध्यांच्या ज्ञानेंद्रियांनीं त्याच्या स्वरूपाचें खरें ज्ञान आम्हांस कधींही होण्याचा संभव नाहीं. येथील कित्येक तत्त्ववेत्त्यांचा विचार येथपर्यंत येऊन ठेपला

असून, इतर सुधारलेल्या देशांतही अलीकडे हेंच मत प्रबल होत चाललें आहे. तेव्हां ईश्वरस्वरूप आमच्या सांप्रतच्या ज्ञानेंद्रियास अगम्य आहे, हा धर्मसंबंधाचा शेवटचा सिद्धांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## अन्य सामाजिक प्रवृत्तींचा कल

[कांहीं आठवडे दुसऱ्या विषयांच्या प्रसंगोपात्तत्वामुळें या विषयाकडे दुर्लक्ष करावें लागलें; त्यामुळें कदाचित् वाचकांस असें वाटलें असेल कीं, त्याचा शेवट न लावतां तो आम्हीं कांहीं विशेष कारणासाठीं अपुरताच सोडून दिला असावा. कित्येकांनीं तर अशीही शंका घेतल्याचें आमचें ऐकण्यांत आलें आहे कीं, या विषयावर लिहीत असतां एकदोन ठिकाणीं जीं वादग्रस्त स्थलें आलीं व ज्यांविषयीं निदान अप्रत्यक्ष रीतीनें तरी जो थोडा स्पष्टपणें अभिप्राय देणें आम्हांस भाग पडलें, तो पुष्कळांस न रुचण्यासारखा असल्यामुळें, व तसें झाल्यास या नवीन वर्तमानपत्रास धक्का पोंचण्याची भीति वाटल्यामुळें, आम्ही कांहीं एक न बोलतां हळूच त्याची वाट सोडून दिली, व बाकीच्या पत्रकर्त्यो-प्रमाणें वाचकसमुदायास रुचतील असे सामान्य विषय घेऊन त्यांवर लिहूं लागलों ! ही दिव्य कल्पना कांहीं अंशीं सुधारक थोड्या महिन्यांनीं अजी-बात बंद होणार, किंवा दुसऱ्या एकाद्या पत्राच्या बगलेंत शिरणार म्हणून जी कंडी उठली होती, व कंडीखोरांच्या कृपेनें जी पुनःही उठवण्याचा संभव आहे तिच्या माळेंतलीच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं ! नेहमीं लोकांस आवडतील, म्हणजे ज्यांतील अभिप्राय सर्वथैव व सर्वदा सर्वांस पसंत पडतील, असेच लेख सुधारकांत येत जातील, असें आम्ही कधीं कोठें लिहून किंवा बोलून गेल्याचें आम्हांस स्मरत नाहीं; व तसें करण्यापासून सुधारकाच्या नामार्थास सार्थकत्व येईल असेंही वाटत नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, ज्याप्रमाणें कित्येक लोकांस आपल्या लेखावरून कांहीं तरी मजा व्हावी, किंवा ‘ येन केन प्रकारेण ’ त्याकडे वाचकांचें लक्ष वेधावें, अशासाठीं ज्या बाबतींत सामान्य जनांच्या विचाराप्रमाणें आपले विचार असतां, त्यांहून ते उलट प्रकारचे आहेत असें दाखविण्यांत, किंवा ज्या गोष्टींत लोकांहून आपलें मत

निराळें आहे, अशाविषयीं तें त्यांच्यासारखेंच आहे, असें भासविण्यांत मोठा पुरुषार्थ वाटतो, तसें करणें मात्र आम्हांस पसंत नाहीं. ज्या प्रश्नाविषयीं विरोध नाहीं त्याविषयीं तो आहे असें बुध्याच प्रतिपादणें; व ज्याविषयीं एकमत नाहीं त्याविषयीं तें आहे, असें दाखविणें; या दोन्हीही गोष्टी अप्रामाणिकत्वदर्शक आहेत, आणि वर्तमानपत्र काढण्यांत चरितार्थासाठीं कांहीं तरी धंदा चालवितां यावा येवढाच ज्यांचा हेतु असेल त्यांशिवाय इतराच्या हातून वरच्यासारखें अप्रामाणिकपणाचें वर्तन सहसा होणार नाहीं. याहून यासंबंधानें येथें अधिक पाल्हाळ करणें म्हणजे निष्कारण विषयांतर होणार आहे; सबब त्या दोषाची दिशा टाळून कांहीं दिवस खालीं ठेवलेलें विषयसूत्र पुनः हातीं घेतों.

या विषयाचे राज्यविषयक, धर्मविषयक, व अवांतर असे तीन भाग कल्पिले आहेत, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. यांपैकीं पहिल्या दोहोंचें विवेचन आजपर्यंत बरेंच झालें आहे, तेव्हां आज अवशिष्ट राहिलेल्या भागास हातीं धरण्यास हरकत नाहीं. पहिल्या भागाविषयीं शेवटची कल्पना सार्वत्रिक लोकसत्तेची, व दुसऱ्याविषयीं जगत्कारणाच्या अगम्यत्वाची आहे, हें वाचकांच्या ध्यानांत असेलच.

अवांतराच्या भागांत अर्थात् अनेक प्रकरणांचा समावेश होतो. पण विस्तारभयास्तव त्या सर्वांचा अगदीं स्वल्प विचारसुद्धां येथें करतां येण्याचा संभव नाहीं. येथें त्या सर्वांस जी दिशा लागणार आहे तिचें दिग्दर्शन करून व पांच चार ठळक प्रकरणांविषयीं चार शब्द लिहून, हें व्याख्यान समाप्त केलें पाहिजे. तेव्हां आतां राज्यविषयक व धर्मविषयक गोष्टींशिवाय ज्या इतर सामाजिक गोष्टी राहिल्या त्यांस कोणती दिशा लागणार हें पहावयाचें. ज्यांनीं कोणत्याही मोठ्या समाजास प्राप्त झालेल्या स्थित्यंतराचा इतिहास थोडासा वाचला असेल त्यांना मनुष्याच्या सामाजिक व्यवहारांस कोणती दिशा लागत चालली आहे, हें सहज समजण्यासारखें आहे. अनियंत्रित राजांचा अंमल कमी होत जाणें, व सृष्टयंतर्गत सामर्थ्यांचे आपण गुलाम आहों, व त्याच्या सर्वशक्तिमत्वापुढें आमचें कांहीं एक न चालतां त्याच्या इच्छेनुरूप आम्हांस निरंतर वागलें पाहिजे, या चुकीच्या कल्पनेचा लय होत जाऊन, मनुष्य प्रयत्न करील तर सृष्टयंतर्गत पदार्थांचें

ज्ञान त्यास प्राप्त करून घेतां येऊन कालांतरानें त्या पदार्थांसच त्यास आपले दास करून घेतां येईल, असा विश्वास वाढत जाणें—या दोनच गोष्टींचा नीट विचार केला तरी बाकीच्या गोष्टींविषयीं बरीच समजूत पडणार आहे. सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशीं बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला म्हणजे त्याच्या खऱ्या सुधारणेस आरंभ होतो. जोंपर्यंत त्याच्या मनांत या वृत्तीचा प्रादुर्भाव झाला नाहीं तोंपर्यंत त्याच्या हातून घडत असलेल्या क्रिया किंवा त्याचें वर्तन बलात्कारानें, जबरदस्तीनें, किंवा सत्तीनें होत असतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें होत असलेलें वर्तन केवळ वाईटच असेल असा नियम नाहीं. पुष्कळदां तें चांगलेंही असण्याचा संभव आहे. पण तें परप्रेरित असल्यामुळें त्याच्या चांगुलपणाची किंवा वाईटपणाची जबाबदारी त्या वर्तन करणारावर असत नाहीं. शिवाय, असें वर्तन बळजोरीनें करविण्यांत तें करविणाऱ्यांचें विशेष लक्ष स्वहिताव असल्यामुळें, अनेक प्रसंगीं तें करणाहित मुळींच साधत नाहीं. यामुळें जोंपर्यंत कोणत्याही राष्ट्रांतील लोकसमूहांत स्थूल मानानें स्वामी आणि किंकर असे दोनच भाग होऊन राहिलेले असतात तोंपर्यंत त्यांत सुखावस्थेची परमावधि होण्याचा संभव नाहीं. स्वातंत्र्य हें स्वभावतः सुखावह, आणि पारतंत्र्य हें स्वभावतः दुःखावह असें आहे. पण मनुष्याच्या व कांहीं इतर प्राण्यांच्या शरीरांची व मनाची घटना विशेष प्रकारची असल्यामुळें त्यांस आपलें स्वाभाविक स्वातंत्र्य मर्यादित करून घेण्यांत व समाजावस्थेंत अवश्य असणाऱ्या पारतंत्र्याचा अंगीकार करण्यांत दुःखाहून अधिक सुख प्राप्त होतें; आणि म्हणूनच तो कितीही त्रास सोसावा लागला तरी समाज सोडून जात नाहीं. पण यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, स्वभावतः सुखावह असें जें स्वातंत्र्य त्याचा आवश्यकतेबाहेर संकोच करून घेण्यांत कोणत्याही प्रकारचा फायदा आहे. पण चमत्कार असा आहे कीं, मनुष्य एकांतावस्था टाकून जसजसा समाजप्रिय होत जातो तसतशी त्याची स्वातंत्र्यासक्तिही थोडीशी क्षीण होत जाते, व अखेरीस त्यास ही शुद्ध दास्यावस्थाही असह्य वाटेनाशी होते. पण ही त्याची

अंत्यावस्था नव्हे. आपणांस जे स्वामी म्हणवीत असतात त्यांचें दुष्ट वर्तन व त्यामुळें मनास व शरीरास वारंवार होणारी पीडा यामुळें अत्यंत सहनशील मनुष्यास आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची इच्छा उत्पन्न होते. एकदां या इच्छेनें त्याच्या अंतःकरणांत बळकट मूळ धरलें कीं, त्याच्या उन्नतावस्थेस आरंभ झाला म्हणून समजावें. ज्यांना नेहमीं दुसऱ्यावर जुलूम करण्याची किंवा सत्तेचा अंमल बजावण्याची संवय असते, ते असें म्हणतात कीं, मनुष्य हा अप्पलपोटा प्राणी आहे; स्वहितासारखी त्याला दुसरी प्रिय वस्तु नाहीं; व कोणतीही गोष्ट करण्यांत स्वहितसाधनाहून त्याचा अन्य हेतु असत नाहीं. जुलमी लोकच अशा तत्त्वशास्त्राचे प्रतिपादक व प्रसारक असण्याचें कारण असें कीं, एक तर ज्या वृत्तीच्या धोरणानें त्यांचें वर्तन अहोरात्र होत असतें त्या वृत्तीशीं इतर वृत्तींपेक्षां त्यांचा विशेष सहवास असल्यामुळें त्यांच्या डोळ्यांपुढें सर्वत्र तीच दिसत असते व आपल्या अंतःकरणाप्रमाणें इतरांच्या अंतःकरणांतही तिचेंच [illegible] राज्य असेल अशी त्यांची भावना होते. दुसरें असें कीं, त्यांच्या जुलमास [illegible]ळलेले व त्रासलेले लोक संत[illegible] जाऊन स्वसंरक्षणासाठीं हवें तें धाडस करण्यास प्रवृत्त होत असतात. त्यांना आसमंतातील सर्व सचेतन जगत् स्वार्थपरायण होऊन आपल्या नाशास उद्युक्त झालें आहे, असें वाटत असतें, व आपणच त्यांच्या संतापाचें व घा[illegible] आदिकारण आहों याचें भानही नाहींसें होतें! परंतु स्वातंत्र्याचा उ[illegible] प्राप्त होत असलेल्या मनुष्यांचें वर्तन ज्यांनीं थोड्या काळजीनें पाहिलें असेल त्यांना असें दिसून आलें असेल कीं, स्वातंत्र्याचा नित्य अनुभव घेणारा मनुष्य स्वहितपरायण असत नाहीं इतकेंच नाहीं, तर बराच परोपकारी, निदान परहितचिंतक तरी असतो. आपल्या श्रमाचें सारें फल आपणासच उपभोगावयास सांपडावें, ही मनुष्याच्या अंतःकरणाची पूर्णावस्था नव्हे; त्या फलाची हवी तशी व्यवस्था लावण्याची मोकळीक आपणास असावी, ही त्याची आकांक्षा असते; व ही जसजशी परिपूर्ण होत जाते तसतशी त्याची स्वार्थबुद्धि क्षीण होत जाऊन तो पराकाष्ठेचा परहितैषी होत जातो. तात्पर्य काय कीं, बलात्कार, जबरदस्ती, बळजोरी, सक्ति इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या शर्थींच्या व्यवहारांपासून मनुष्याच्या सुखास पूर्णावस्था येण्याचा संभव नसल्यामुळें तसले व्यवहार नाहींसे होत असून त्यांच्या जागीं समत,

संमति, अनुरोध, रुकार, पसंती इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थाच्या व्यवहारांचा प्रचार सर्वत्र पडत आहे. तेव्हां येथून पुढें राजा व प्रजा; कुलेश व कुलावयव; पति आणि पत्नी; मातापितरें व अपत्यें; स्वामी आणि सेवक; गुरु आणि शिष्य; विक्रेता आणि ग्राहक; यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्कारानें न होतां संमतिपूर्वक होत जाणार आहेत.

## बलात्कार विरुद्ध संमति

मागल्या अंकांत असें सांगितलें आहे कीं, जों जों मनुष्यांची सुधारणा होत जाते तों तों त्यांच्या अन्योन्यव्यवहारांतील बलात्काराचें तत्त्व लयास जाऊन त्याच्या जागीं संमतितत्त्व प्रस्थपित होतें; व या कारणास्तव येथून पुढें राजा व प्रजा, कुलाधिपति व कुलावयव, पति व पत्नी, मातापितरें व अपत्यें, स्वामी आणि सेवक, गुरु आणि शिष्य, विक्रेता आणि ग्राहक यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्कारानें न होतां, संमतिपूर्वक होत जाणार आहेत.

त्याचें स्वच्छंदी वर्तन दोन प्रकारांनीं विघातक होण्याचा संभव असतो; एक दुसऱ्याला आणि दुसरें त्याचें त्याला. जर कोणत्याही व्यक्तीची वागणूक त्याची त्याला किंवा दुसऱ्याला अपायकारक होण्याचा संभव नसेल तर त्याला ती हवी तशी करूं देण्यास प्रत्यवाय कशासाठीं करावा, हें समजत नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, हें वर्तनतत्त्व अशा भावार्थानें किंवा विविक्तत्वानें सांगितलें असतां तें कळण्यास सुलभ व आचरण्यास सुकर असें वाटतें. पण नित्य व्यवहारास तें लावूं लागलें असतां फार अडचणी येतात. कारण ज्याप्रमाणें प्राण्यांच्या शरीरांतील अवयव निराळे आहेत व त्यांना पृथक् कामें करावीं लागतात, तरी त्या सर्वांना एकमेकांवर कमी अधिक अवलंबून असावें लागून एकमेकांस सहायभूत व्हावें लागतें, त्याप्रमाणें समाजाचे अवयवही जरी निराळे आहेत, आणि ते पृथक् कामें करीत असतात, तरी त्यांचें एकमेकांवर अवलंबन असून त्यांना एकमेकांस सहायभूत व्हावें लागतें; आणि असें न होईल तर, ज्याप्रमाणें शरीरांतील चैतन्याचा लय होऊन त्याबरोबर सर्व अवयवांचा नाश होईल, त्याप्रमाणें समाजाचे अवयवही एकमेकांस साहाय्य न करतील तर समाजाची वाताहत

होऊन प्रत्येकास आपापल्या चरितार्थासाठीं व संरक्षणासाठीं खुद्द स्वतःवर अवलंबून रहावें लागेल. व्यक्तीच्या शरीरांतील अवयवांत आणि समाजाच्या शरीरांतील अवयवांत एक मोठा भेद आहे तो हा कीं, ज्याप्रमाणें समाजाच्या प्रत्येक अवयवास ज्ञान, संवेदन, इच्छा इत्यादि मनोधर्म पृथक्त्वानें असल्यामुळें सुखदुःखाचा अनुभव प्रत्येकास होत असून, तें संपादण्याविषयीं किंवा टाळण्याविषयीं प्रत्येकाचा प्रयत्न निरंतर चालू असतो, त्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील प्रत्येक अवयवाची स्थिति नाहीं. त्यांपैकीं प्रत्येकास मन नाहीं. त्या सर्वांचे व्यापार नीट चालणें ही गोष्ट ज्या एका व्यक्तीचे ते अवयव आहेत त्या व्यक्तीस कल्याणकारण आहे. समाज हा काल्पनिक पुरुष आहे. समाजाचें कल्याण म्हणजे या काल्पनिक पुरुषाचें कल्याण नव्हे; तर त्याच्या अवयवांचें कल्याण होय. व्यक्तीची तशी गोष्ट नाहीं. व्यक्तीच्या अवयवांस स्वतंत्र मन नसल्यामुळें व्यक्तीचें जें कल्याण तेंच त्यांचें कल्याण होय. व्यक्तिशरीर आणि समाजशरीर यांतील या महत्त्वाच्या भेदामुळें त्याविषयीं विचार करतांना व लिहितांना ही गोष्ट नेहमीं डोळ्यांपुढें ठेवावी लागते कीं, व्यक्तीच्या अवयवांच्या हितासाठीं जे नियम घालावयाचे ते वास्तविक पहातां ते ज्या व्यक्तीचे अवयव असतील त्या व्यक्तीच्या हितासाठीं असतात; व समाजाच्या हितासाठीं जे नियम करावयाचे ते वास्तविक पहातां, समाजाच्या अवयवांच्या हितासाठीं असतात. तेव्हां व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं, समाजाचें हित साधलें म्हणजे झालें, असें बोलणें म्हणजे असंबद्ध प्रलाप करण्यासारखें होय; कारण व्यक्तींच्या हिताहून निराळें असें समाजाचें हित नाहीं. तथापि अशा अर्थाचीं वाक्यें नेहमीं उच्चारण्यांत येतात व तीं चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडून येतात; तेव्हां वरील अर्थाहून त्यांचा कांहीं तरी भिन्न अर्थ असला पाहिजे. सूक्ष्म विचारांतीं असें दिसून येईल कीं, जेव्हां अशा प्रकारचे लोक समाजाच्या हिताविषयीं कळकळ व व्यक्तींच्या हिताविषयीं उदासीनता दाखवितात, तेव्हां त्यांचा खरा भावार्थ असा असतो कीं, समाज म्हणजे त्यांतील बहुतेक किंवा निदान प्रमुख लोक. व्यक्तींच्या फायद्याची परवा करण्याची गरज नाहीं, म्हणजे कोणत्याही गोष्टीमुळें पुष्कळांचें कल्याण होत असून, थोड्यांस पीडा होत असेल तर ती बेधडक करण्यास

हरकत नाहीं. कित्येकजण हा स्थूल अर्थ संकुचित करून, राष्ट्राच्या राजाचें किंवा त्यांतील श्रेष्ठ लोकांचें जें कल्याण तें साऱ्या राष्ट्राचें किंवा समाजाचें कल्याण असा विशिष्ट अर्थ करतात. अशा अर्थानुरोधानें ज्या समाजांत वर्तन होत असतें, त्यांत एका पक्षाकडे संपत्ति आणि सत्ता व दुसऱ्या पक्षाकडे दारिद्र्य आणि दास्य अशी वांटणी झालेली असते. अशा समाजांतील सामान्य लोकांस शुद्ध वन्यावस्थेंतील सुखाहून अधिक सुख होत असेल असें जरी मानितां आलें, तरी त्यांत त्यांचें पूर्ण समाधान होण्यासारखें तें नसलेंच पाहिजे हें उघड आहे. प्रत्येकानें वन्य पशूप्रमाणें रानोमाळ फिरत असावें, यापेक्षां ओबडधोबड समाजरचना होऊन कांहींनीं स्वामी व कांहींनीं किंकर व्हावें, ही स्थिति बरी. कारण कशा तरी रीतीनें समाज एकवार अस्तित्वांत आल्याशिवाय, त्यांतील अवयवांस त्यापासून होणाऱ्या सुखाचा लाभ होऊं लागणें अशक्य आहे पण मनुष्यें समाज स्थापूं लागल्याबरोबर त्यांत जीं शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्यानें इतरांहून श्रेष्ठ असतील त्यांच्या हातीं सत्ता व बहुतेकांच्या श्रमांचें फळ जाणें अगदीं स्वाभाविक आहे. तेव्हां समाजाच्या प्रथमावस्थेंत जे सामर्थ्यवान् असतील त्यांच्या हातीं सत्ता असणें व दुर्बलांना दास्य करावें लागणें हें ज्या दिशेकडे उतार असेल त्या दिशेस पाण्याचा ओघ जाण्यासारखें होय. हा ओघ बंद करून सर्वांस सारखें, निदान होईल तितकें सारखें, सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणें म्हणजे सुधारणा होत जाणें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या देशांत अशी व्यवस्था होऊं लागली नाहीं, त्या देशांत खऱ्या सुधारणेस आरंभ झाला नाहीं व तेथें पुढें झालेल्या कवींनीं आपल्या पूर्वजांच्या स्थितीचें काल्पनिक चित्र कितीही मनोरम काढिलें असलें, तरी त्याकडे जो इतिहासदृष्टीनें पाहील त्याला त्यांत बरेंच मिथ्यात्व भासल्याशिवाय राहणार नाहीं. रानटी स्थितींतील राजांच्या जुलमी कृत्यांस कवींनीं कितीही सजवून टाकिलें असलें, तरी सामाजिक तत्त्वशोधकास भ्रामक व मिश्र रंगांचें पृथक्करण करून मूळ रंग कसे आहेत हें स्पष्टपणें प्रतीतीस आणून देणाऱ्या विचाररूप उपनेत्रांचें साहाय्य असल्यामुळें, असें स्पष्ट दिसून येतें कीं, ज्या काव्यांत, पुराणांत किंवा कोणत्याही प्रकारच्या दुसऱ्या ग्रंथांत कवींनीं किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या लेखकांनीं राजांचें जे

हित तें समाजाचें हित, किंवा समाजांतील विशिष्ट वर्गाचें जें हित तें साऱ्या समाजाचें हित, असें प्रतिपादण्याचा प्रयत्न केला असेल तें काव्य, तें पुराण किंवा तो ग्रंथ वाचण्यास कितीही रसाळ असला तरी ऐतिहासिक दृष्टीनें त्यावरून त्या वेळची समाजाची स्थिति सुधारलेली नसावी, त्यांत बलात्काराचा बराच अंमल चालत असावा, व स्वातंत्र्यसुखाचा अनुभव फार थोड्यांस होत असून बाकीच्यांस दास्यत्वाचे कष्ट सोसणें भाग पडत असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. तात्पर्य काय कीं, समाजाच्या आद्यस्थितींत बहुतेक व्यवहार बलात्कारानें होत असतात; आणि म्हणून त्याच्या सर्व अवयवांस सुखाचा सारखा वांटा मिळत नाहीं. तो मिळूं लागण्यास ते व्यवहार समाजघटकांच्या अन्योन्य संमतीनें होऊं लागले पाहिजेत. हें संमतितत्त्व प्रस्थापित होण्यास फार काल लागतो व मोठी यातायात पडते. कारण कोणतीही गोष्ट दुसऱ्याच्या संमतीनें करणें म्हणजे ती संमति देण्याचें किंवा न देण्याचें स्वातंत्र्य त्याकडे असणें अवश्य आहे. अशा प्रकारचें स्वातंत्र्य प्रत्येक वयांत आलेल्या मनुष्यास उपभोगण्यास मिळणें, म्हणजे त्याहून वयांत आलेल्या इतर लोकांची अशी खातरी होऊन जाणें कीं, प्रत्येक सुजाण इसमास आपापल्या समजुतीप्रमाणें जें बरें वाटेल तें करण्याची व वाईट वाटेल तें न करण्याची मोकळीक देण्यांतच समाजाचें हित आहे. पण अशी समजूत एकाएकीं कोठून होणार? ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागाच्या वर्तनाचा संबंध इतर भागांशीं मुळींच नाहीं असें होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें समाजांतील कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनाचा संबंध साक्षात् किंवा परंपरेनें इतर व्यक्तींस थोडाबहुत पोंचत नाहीं, असें होऊं शकत नाहीं. या बाबतींत व्यक्तीच्या शरीराच्या आणि समाजाच्या शरीराच्या स्थितींत फार साम्य आहे. ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीराच्या कोणत्याही भागास झालेल्या दुखापतीचा परिणाम सर्व शरीरभर पसरतो, त्याप्रमाणें समाजांतील कोणत्याही स्थितींतला इसम घेतला तरी त्याच्या प्रत्येक कृत्याचा बरावाईट परिणाम सर्वांस जाऊन पोहोंचतो, असें सहज दाखवितां येईल. येवढें खरें आहे कीं, तो इसम अगदीं क्षुद्र असला तर त्याच्या वर्तनाचा परिणामही अगदीं क्षुद्र होईल; पण क्षुद्र तरी झालाच पाहिजे; मुळींच होत नाहीं असें कधींही म्हणतां येणार नाहीं.

जमीनीवर जेवढ्या जोरानें आपण चालतों तेवढ्या जोरानें पायाखालची जमीन खालीं जात असते; किंवा जेवढ्या जोरानें आपण पर्वतास टिचकी मारतों, तेवढ्या जोरानें पर्वत मागें सरतो;—या पदार्थशास्त्रांतील गोष्टी जशा नाकबूल करतां येणार नाहींत, त्याप्रमाणेंच समाजावर घडत असलेल्या व्यक्तीच्या वर्तनाची गोष्ट होय. पाण्यांत टांकलेल्या खड्यानें त्याच्या परमाणूंस आघात होऊन उत्पन्न होणाऱ्या व पसरत जाणाऱ्या वर्तुलांप्रमाणें व्यक्तीच्या वर्तनाची गोष्ट आहे. या वर्तनाचा समाजावर जो परिणाम होतो तो त्या वर्तनाचें स्वरूप, समाजाची स्थिति, काल, आणि अंतर यांच्या प्रमाणांत असतो. या चार गोष्टींनीं तो मर्यादित होत असल्यामुळें, कित्येक प्रसंगीं तो अगदीं सूक्ष्म असतो. तथापि तो मुळींच होत नाहीं, असें नसल्यामुळें एका व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीच्या वर्तनाविषयीं उदासीन होतां येत नाहीं. कारण उदासीन होणें म्हणजे या वर्तनापासून स्वतःवर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष करण्यासारखें होय. तेव्हां समाजांतील मनुष्यें एकमेकांच्या वर्तनाकडे लक्ष देणार, व आपआपल्या समजुतीप्रमाणें दुसऱ्यास वागविण्याचा प्रयत्न करणार, व करीत आलीं आहेत, असें विचारानें आणि इतिहासावरून दिसून येतें. दुसऱ्याच्या वर्तनाचा आपणावर जो परिणाम होतो तो आपणास सुखकर व्हावा, म्हणून मनुष्यांनीं दुसऱ्याच्या वर्तनास आपल्या मर्जीप्रमाणें वळण लावण्याचा केलेला जो प्रयत्न त्यामुळें समाजाच्या आद्य स्थितींत बलात्कारतत्त्व प्रस्थापित होतें, व उत्तरोत्तर त्या तत्त्वाचें अनुसरण करण्यांत आपलें व्हावें तितकें हित होत नाहीं, अशी सर्वांची खात्री होत जाऊन त्याचा ऱ्हास होऊं लागतो; आणि त्याच्या जागीं संमतितत्त्व रूढ होऊं लागतें. अशा प्रकारचें वर्तनतत्त्वांतर आमच्या देशांत कसें व किती होत आलें आहे, हें पुढल्या खेपेस पांचचार ठळक उदाहरणांनीं दाखवून जमल्यास सांप्रत विषयाच्या या भागाचा निरोप घेऊं.

## नवरा-बायको

समाजांतील व्यवहार येथून पुढें बलात्काराच्या तत्वावर होणें कमी कमी होत जाऊन ते संमतितत्त्वावर होऊं लागतील हें दाखविण्यासाठीं कांहीं ठळक उदाहरणें आजच्या अंकांत देऊं असें मागल्या अंकांत म्हटलें आहे, त्याप्रमाणें तीं देण्यास आरंभ करतों.

समाजाचे मुख्य घटक कुटुंबें होत, व कुटुंबाचे मुख्य घटक स्त्रीपुरुष होत. तेव्हां कुटुंबाचा विचार करतांना प्रथम स्त्रीपुरुषामधील संबंधाचा विचार केला पाहिजे. ह्याच विचार प्रथम करण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, ज्याप्रमाणें अन्नसेवनानें व्यक्तीचें पोषण होऊन तो जिवंत राहतो, त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या समागमानें जातीचें पोषण होऊन ती अस्तित्वांत राहते. व्यक्तीच्या अस्तित्वास जसें अन्न त्याप्रमाणें समाजाच्या अस्तित्वास कशा तरी प्रकारचें लग्न आवश्यक आहे. तेव्हां समाजाच्या अस्तित्वासच जी गोष्ट अपरिहार्य आहे, तिचाच विचार प्रथम करणें योग्य आहे.

सांप्रत कालीं या देशांतील उंच जातींतल्या लोकांतही स्त्रीपुरुषांचे जे संबंध आहेत ते फार समाधानकारक आहेत असें नाहीं. त्यांत सुधारणा करण्यास पुष्कळच अवकाश आहे. इंग्लंड किंवा अमेरिका याखारख्या फार पुढें गेलेल्या देशांतील स्त्रीपुरुषांचे संबंध पाहिले म्हणजे आमचा मागसपणा आमच्या डोळ्यांपुढें ढळढळीत उभा राहून तो नाहींसा करण्याविषयीं आम्ही पराकाष्ठेचे उत्कंठ होतों, आणि त्यांच्या गृहस्थितीप्रमाणें आमची गृहस्थिति केव्हां होईल म्हणून विचार करूं लागतों. युरोपिअन किंवा अमेरिकन लोकांतील कुटुंबांची स्थिति सर्वांशीं निर्दोष आहे, किंवा तींतील प्रत्येक गोष्ट आम्ही अनुसरण्यासारखी आहे असें आमचें म्हणणें नाहीं. तथापि त्या लोकांच्या कुटुंबस्थितीहून आमचीच कुटुंबस्थिति शतपटीनें बरी, व त्या लोकांनींच आमचें अनुकरण करणें योग्य आहे, असें जें कित्येक मिथ्या देशाभिमान्यांचें म्हणणें आहे, तें मात्र आम्हांस संमत नाहीं. दोष वर्ज करतां एकंदरीनें युरोपीय किंवा अमेरिकन कुटुंबस्थिति आमच्याहून श्रेष्ठ आहे, व आम्ही कितीही कांकूं केलें तरी विद्याप्रसार होत जाईल त्याप्रमाणें आमचीं कुटुंबेंही त्याच वळणावर जाणार, याबद्दल आम्हांस बिलकुल शंका नाहीं. मनुष्यसुधारणेचीं अत्यंत परिणत तत्त्वें आज युरोपांत दृष्टीस पडत आहेत, व ज्या देशास आपली सुधारणा करून घ्यावयाची असेल त्यास देशकालानुरोधानें त्याच तत्वांचा कमी अधिक अंगीकार केला पाहिजे; आणि हें जर बरोबर असेल तर विवाहसंबंधानेंच युरोपीय लोकांचा कित्ता आम्हीं घेणार नाहीं, असें म्हणून कसें चालेल हें आम्हांस समजत नाहीं. या गोष्टीच्यासंबंधानें त्यांच्यांत जेवढें कांहीं त्याज्य आहे

तेवढें टाकणें बरोबर आहे. पण जेवढें चांगलें आहे ( आणि तेंच पुष्कळ आहे ) तेवढें उचलण्यास हरकत नाहीं, आणि उचललेंच पाहिजे; कारण विवाहपद्धतीची सुधारणा करावयाची असेल तर त्यांच्या विवाहपद्धतींत जेवढा चांगला भाग आहे तेवढा उचलण्याशिवाय ती करण्याचा दुसरा मार्ग नाहीं.

येवढ्यावरून असें कोणी समजू नये कीं युरोपीय विवाहपद्धति पूर्णावस्थेप्रत पावली आहे. विवाहपद्धतिचशी काय, मनुष्यांच्या संस्थांपैकीं कोणतीच संस्था अजून सुष्ठुतेच्या पूर्णत्वास गेली नाहीं, असें आम्हांस वाटतें. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं एकंदरीनें युरोपीय लोकांची विवाहपद्धति बरी आहे, व आम्हीही हळू हळू तिच्याच वळणावर जाणार ती आमच्यापेक्षां बरी आहे; पण आमचीही अगदीं रानटी आहे असें नाहीं. दहा वर्षांच्या आंतील मुलींचीं लग्नें लावून त्यांस आईबापें हयातसल्या नवऱ्यांच्या माथीं मारतात; शरीरयष्टीची धनुकली झालेले वृद्ध कपी

परोपकाराय भवेद्वश्यं ॥ वृद्धस्य भार्या करदीपिकेव ॥

या सुभाषितास यथार्थत्व आणण्यासाठीं आठ नऊ वर्षांच्या मुलींशीं लग्न लावून प्रपंचास पुनः आरंभ करण्याचा आव घालतात; लग्न म्हणजे काय वस्तु आहे हेंही ज्यांस कळलें नाहीं अशांस त्या पाशांत गुंतावें लागून दुर्दैवानें तो तुटला म्हणजे नैसर्गिक मनोविकारापासून व समाजकृत अनेक प्रतिबंधांपासून होणारा छल आमरण सोसावा लागतो; अल्प वयांत पारतंत्र्य आल्यामुळें व संसाराची गोणी पाठीवर बसल्यामुळें, उपयुक्त ज्ञानाचा संग्रह करण्यास, शरीराची वाढ पूर्ण होऊं देण्यास, ज्याच्याशीं किंवा जिच्याशीं सारा जन्म कंठावयाचा त्याचा किंवा तिचा स्वभाव, रूप, योग्यता वगैरे पाहण्यास, वधूवरांस मुळींच मोकळीक नाहीं, इत्यादि गोष्टी अत्यंत शोचनीय आहेत, त्यांत बलात्काराचा पुष्कळ भाग आहे, आणि तो काढून टाकण्याविषयीं प्रत्येक देशहितेच्छूनें व परमुलचिंतकानें प्रयत्न केला पाहिजे, हें उघड आहे. तथापि या संबंधाचा पूर्वापार इतिहास पाहिला असतां असें दिसून येईल कीं, रानटी लोकांत स्त्रियांस जे कष्ट भोगावे लागतात, व त्यावर जो बलात्कार होतो, त्यापुढें आमच्या स्त्रियांवर होत असलेला बलात्कार आणि त्यांना भोगावे लागत असलेले कष्ट हे कांहींच

नाहींत. जातीच्या अस्तित्वास अत्यंत अवश्य जो स्त्रीपुरुषांचा समागम तो आजपर्यंत एकंदरींत तीन प्रकारांनीं घडून आला आहे. १ ला. पुरुषांनीं स्त्रिया जिंकून किंवा चोरून मिळवायाच्या; २ रा. स्त्रिया बापापासून किंवा इतर पालकांपासून विकत घ्यावयाच्या; ३ रा. स्त्रीपुरुषांचा विवाह त्यांच्या संमतीनें व्हावयाचा. हे तीनही प्रकार हिंदुस्थानांत एके वेळीं अस्तित्वांत होते, व अजूनही कमी अधिक प्रमाणानें आहेत. गोंड वगैरे जे रानटी लोक आहेत त्यांत बायका चोरण्याची पद्धत अजूनही थोडीबहुत दृष्टीस पडते. मुलींचा विक्रय तर हिमालयाच्या पायथ्यापासून कन्याकुमारी-पर्यंत प्रत्येक दिवशीं होत आहे. मुलीच्या बापास बरीच किंमत दिल्या-शिवाय उतारवयाच्या बिजवराला नवरी मिळत असेल असें वाटत नाहीं. लग्नाचा तिसरा प्रकार मात्र आमच्या देशांत फारसा दृष्टीस पडत नाहीं. वधूस वर व वरास वधू पसंत होऊन मग त्यांच्या गांठी बांधल्या जाव्या, हा जो विवाहाचा प्रशस्त प्रकार तो पुराणांत व संस्कृत नाटकांत मात्र कित्येक स्थळीं पाहण्यांत येतो, आणि ‘स्वयंवर’ म्हणून जो शब्द आपल्या कानीं वारंवार पडतो त्यावरून कांहीं अंशीं अशा तऱ्हेची विवाहपद्धति लोकांस एकदां थोडीबहुत प्रशस्त वाटली असावी, असें दिसतें. पण येवढ्यावरून त्याविषयीं कोणत्याही प्रकारचे निश्चयात्मक अनुमान करतां येत नाहीं. कारण ज्या देशांत किंवा जातींत खऱ्या स्वयंवराची किंवा संमति-पूर्वक विवाहाची चाल आहे किंवा होती असें म्हणतां येईल, त्या देशांत किंवा त्या जातींत बहुभार्यत्वाची चाल असण्याचा संभव नाहीं. तरुण वधूस संमत असेल तो वर वरण्याची परवानगी असेल तर जो पांचचार बायका आधींच करून बसला आहे, व सहावीचें पाणिग्रहण करूं पहात आहे अशास ती कधींही वरणार नाहीं, हें स्पष्ट आहे. बहुभर्तृकत्व आणि बहुभार्यत्व या विवाह-पद्धति ज्या देशांत बायका चोरून आणण्याचा किंवा विकत घेण्याचा प्रघात असतो त्यांत विशेष दृष्टीस पडतात. संमतितत्त्वास अनुसरून विवाह होऊं लागले म्हणजे एकपत्नीकत्वच स्थापित झालें पाहिजे. बहुभर्तृकत्व आणि बहुभार्यत्व हीं स्त्रियांच्या निकृष्ट अवस्थेचीं व त्यावर होत असलेल्या बलात्काराचीं उत्तम दर्शक आहेत. परराष्ट्राशीं लढाई करून जय झाला असतां धरून आणिलेल्या कैद्यांपैकीं पुरुषांस मारून टाकून, मुलांस व

बायकांस विकण्याची चाल पूर्वी सर्वत्र प्ररूढ होती. या चालीमुळेंच बहुपत्नीक विवाह होऊं लागले असावे, असें दिसतें. बहुभर्तृकत्वापेक्षां बहुभार्यत्वाची चाल बरी आहे, व बहुशः पहिल्या चालीचा लय होऊं लागला म्हणजे दुसरी अस्तित्वांत येते असें म्हणण्यास हरकत नाहीं; पण या दोनही अप्रशस्त चाली एकाच कालीं एकाच देशांत किंवा जातींत असूं शकणार नाहींत, असें म्हणतां येणार नाहीं. ज्या द्रौपदीस कवींनीं महापतिव्रता करून सोडिलें आहे, व जिला पांच पांडवाकडे आळीपाळीनें जावें लागत असे, त्याच द्रौपदीच्या नवऱ्यांपैकीं एकानें सुभद्रा नांवाची बलरामभगिनी कपटानें काढून नेऊन बलात्कारानें आपली बायको केली होती ! याच नरपुंगवाचा साथी जो भगवान् श्रीकृष्णपरमात्मा त्यानें अर्वाचीन चट साऱ्या सुलतानांस हटवून टाकिलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं ! या वृंदावनस्थ जारशिरोमणीनें अथवा "शिनळानें" सोळा सहस्र व्रजनारींस आपल्या जनानखान्यांत आणून टाकिलें होतें ! तुर्कस्थानच्या सुलतानाच्या जनानखान्यांत सोळाशें कामनयना असतील किंवा नाहीं याची शंका आहे ! सारांश, आपल्या महाभारताकडे जे कोणी ऐतिहासिक दृष्टीनें पाहातील त्यांना या देशांत फार प्राचीनकाळीं आर्यस्त्रिया पुष्कळ नवरे करीत व आर्यपुरुष पुष्कळ बायका करीत, आणि या बायका चोरून, मारामारी करून, अथवा किंमत देऊन मिळविण्याची चाल असे, असें सिद्ध करून दाखविण्यास त्यांत हवा तितका पुरावा सांपडणार आहे; तसेंच या कालापूर्वी म्हणजे बहुभर्तृकत्वाची आणि बहुभार्यत्वाची चाल पाडण्यापूर्वी, स्त्रीपुरुषांच्या संबंधास कोणत्याही प्रकारचा आळा नसे व अगदीं जवळच्या आप्तांशींही पतिपत्नीचा संबंध ठेवण्यास शंका वाटत नसे, हें ब्रह्मदेवादिकांच्या आख्यायिकांवरून स्थापित करतां येण्यासारखें आहे. अशा स्थितींत स्त्रियांवर किती जुलूम होत असेल, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. ही स्थिति नाहींशी होऊन बहुभर्तृकत्वाची चाल पडली, तरी स्त्रियांच्या स्थितींत म्हणण्यासारखा बदल होत असेल असें वाटत नाहीं; कारण पांचचारजणांनीं एक बायको राखणें, किंवा पांचपंचविसांनीं पांचचार बायका राखणें म्हणजे कोणत्या तरी कारणांनीं समाजांत स्त्रियांची तूट पडत असली पाहिजे, किंवा बऱ्याच स्त्रिया अविवाहित रहात असल्या पाहिजेत असें

माननें भाग पडतें. अनेक स्त्रिया अविवाहित रहात असल्यामुळें, विवाह करणाऱ्या स्त्रियांस अनेक नवरे करावे लागत असतील, ही कल्पना बरोबर नाहीं; कारण अशी कल्पना करणें म्हणजे स्त्रियांस स्वातंत्र्य असतें असें मानावें लागतें. पण समाजाच्या अशा स्थितींत तें स्वप्नांत सुद्धां असण्याचा संभव नाहीं. तेव्हां स्त्रियांची तूटच पडत असावी, असें मानणें जरूर आहे. ही तूट दुष्काळाच्या भयानें मुली मारून टाकण्याच्या प्रघातामुळें पडत असो, किंवा प्रबल शत्रूंनीं चाल करून बायका पळवून नेल्यामुळें पडत असो; या किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कांहीं कारणांनीं ती पडत असली पाहिजे यांत संशय नाहीं. याच्या उलट ज्या स्थितींत बहुभार्यकत्वाची चाल रूढ असते त्या स्थितींत शत्रूकडील बायका लुटून आणिल्यामुळें, किंवा पुष्कळ पुरुष अविवाहित रहात असल्यामुळें स्त्रिया फाजील होत असाव्या, हें उघड आहे. तथापि यासंबंधानें येवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ज्या ठिकाणीं बहुभार्यकत्वाची चाल पूर्णपणें रूढ असेल तेथेंही फार थोड्यांसच पुष्कळ बायकांशीं विवाह करण्यास सांपडत असेल. पुष्कळ बायकांशीं विवाह करून त्यांपासून होणाऱ्या विपुल संततीचें संगोपन करण्यास विपुल संपत्ति पाहिजे; व ज्याअर्थी अशी संपत्ति कोणत्याही देशांत फारच थोड्यांच्या वांट्यास येते, त्याअर्थी अशा प्रकारची सुलतानी चैन करण्याचें भाग्य फारच थोड्यांस प्राप्त होत असेल हें उघड आहे. बहुभार्यत्व हें स्त्रीविक्रयाचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. बालविवाहावरून कन्येचा आणि पुत्राचा विक्रय करण्याचा हक्क आईबापांस आहे असें अप्रत्यक्ष रीतीनें सिद्ध होतें. सारांश, आतांपर्यंत विवाहप्रकरणांत आमच्या देशांत एका किंवा दुसऱ्या रूपानें बलात्कारतत्त्वच अंमल गाजवीत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि थोड्या वर्षांत हें मागें पडून संमतितत्त्व तत्स्थानापन्न होईल अशीं चिन्हें अलीकडे उपस्थित झालेल्या सामाजिकविषयवादविवादावरून दिसूं लागलीं आहेत.

## कुटुंब

मागल्या अंकांत कुटुंबाचे मुख्य अवयव जे पति आणि पत्नी, त्यांमधील संबंधाचें विवेचन करून असें दाखविलें कीं, जोंपर्यंत समाजाची स्थिति

रानटी असते, एका समाजाच्या इतर समाजांशीं वारंवार लढाया होत असतात व बहुतेक व्यवहार बलात्कारानें होत असतात, तोंपर्यंत स्त्रियांची स्थिति सुधारत नाहीं. त्यांना गुलामाप्रमाणें काम करावें लागतें इतकेंच नाहीं, तर समाजांतील अनेक पुरुष लढाईंत पडत असल्यामुळें व दुसऱ्या समाजांतील बायका कैद करून किंवा पळवून आणण्याची चाल असल्यामुळें स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येहून फार मोठी होते, व त्यामुळें ज्याच्या अंगीं पोषण्याचें सामर्थ्य असेल त्यालाच हव्या तितक्या बायका करतां येतात. हें बहुभार्यकत्व प्रत्येक देशाच्या पूर्वइतिहासांत दृष्टीस पडतें. बहुभार्यकत्वाबद्दल आमची निर्भर्त्सना करणारे जे युरोपिअन लोक त्यांतही ही चाल एकदा प्ररूढ होती; पण त्यांच्यांतून ती आम्हांपेक्षां फार लौकर नाहींशी झाली. ती नाहींशी होण्यास मुख्य कारण बलात्काराचा ऱ्हास आणि समताप्रस्थापक संमतितत्त्वाचा उदय. लढाया कमी होऊन स्त्रीपुरुषांची संख्या सारखी होऊं लागली, व उद्योगवृद्धि होऊन श्रमविभागाची आणि श्रमानें उत्पन्न केलेल्या जिनसांची अदलाबदल करण्याची पद्धत पडूं लागली, म्हणजे एकपत्नीक विवाह अधिकाधिक होत जाऊन स्त्रियांवर कमी बलात्कार होऊं लागतो. समाजांत ज्यांच्याकडे लढाईसारखीं मर्दुमकीचीं कामें असतात, किंवा ज्यांच्या पदरीं पुष्कळ संपत्ति असते, तेवढेच काय ते अरेराव बनून जाऊन हव्या तितक्या बायका करतात किंवा अंगवस्त्र ठेवतात; इतरांस एकेका बायकोवर निर्वाह करावा लागून प्रपंचव्यवस्था बऱ्याच अशीं तिच्या धोरणानें व संमतीनें करावी लागते.

याप्रमाणें समाजाच्या स्थित्यंतराप्रमाणें कुटुंबांतील मुख्य अवयव जे पति आणि पत्नी त्यांतील संबंधांत अंतर होत असतें, हें इतक्या विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत स्पष्टपणें आलें असेल. तेव्हां आतां पतिपत्नीचा पृथक् विचार करणें सोडून सर्व कुटुंबाचा विचार करूं लागण्यास कांहीं हरकत नाहीं.

ज्याप्रमाणें इंग्लंडांतील विद्वान् लोकांस त्याप्रमाणें येथील विद्वान् लोकांसही सर हेनरी मेन यांचें नांव अवगत आहे. हा गृहस्थ पराकाष्ठेचा शोधक होता. हा नुकताच परलोकवासी झाला. हा पूर्वी हिंदुस्थानांत असून पुढें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलचा मेंबर होता. याचे एन्शंट लॉ,

व्हिलेज कम्युनिटीज, वगैरे ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांत यानें आशिया खंडांतील व युरोपखंडांतील आर्य लोकांच्या सांप्रत राज्यपद्धति, धर्मपद्धति व अवांतर सामाजिक पद्धति कोणत्या पूर्वपद्धतींपासून उत्पन्न झाल्या, या गोष्टीचा मोठ्या बारकाईचा विचार केला आहे. त्याचें असें म्हणणें आहे कीं आर्य लोकांत आज जे राजकीय किंवा सामाजिक आचार प्ररूढ आहेत त्यांचें बीज आर्य लोकांच्या पूर्वकुटुंबव्यवस्थेंत दिसून येतें. हीं जुनीं आर्यकुटुंबें मनुष्याच्या इतर जातींतील कुटुंबांहून फार निराळ्या तऱ्हेचीं होतीं. या कुटुंबांत कुलपतीचा अधिकार फार जारीनें चालत असे. कुटुंबांतील पाहिजे त्या इसमानें संपादिलेल्या वित्ताची हवी तशी व्यवस्था करणें, पाहिजे त्याला हवी ती शिक्षा करणें, प्रसंगविशेषीं एखाद्यास ठारसुद्धां मारणें—अशा प्रकारची जबर सत्ता कुलाधिपतीच्या हातांत असे. कुटुंबांतील मुलें व बायका त्याच्या धाकांत असत, आणि तो मेल्यानंतर कुटुंबांत जो सर्वांत वडील असेल त्याकडे त्याचे अधिकार जात. कुटुंब चालविणारा वडील भाऊ मेला असतां, तत्स्थानापन्न होणाऱ्या धाकट्या भावाकडे मेलेल्या भावाच्या बायकांची व्यवस्था येऊन, पाहिजे तर त्याला त्या आपल्या बायका करतां येत असत! या सर्व प्रकारांवरून अशा कुटुंबास मेनसाहेबानें पॅट्रिआर्केल फ्यामिलीझ् म्हणजे श्रेष्ठायत्त कुटुंबें अशी संज्ञा दिली आहे; व त्याचें असें म्हणणें आहे कीं, ही आर्यकुटुंबाची आद्यस्थिति होती, व हिच्यापासून त्यांच्या पुढील सर्व राज्यपद्धतींचा आणि कुटुंबपद्धतींचा उद्भव झाला. [यासंबंधानें अलीकडे ज्यांनीं विशेष शोध केले आहेत ते मेनसाहेबाच्या या विचारसरणीवर दोन आक्षेप घेतात. ते असें म्हणतात कीं, श्रेष्ठायत्त कुटुंब हेंच आर्य लोकांचें आद्यकुटुंब धरून चालणें बरोबर नाहीं; कारण अशा प्रकारची कुटुंबव्यवस्था स्थापित होण्यापूर्वी हिच्यापेक्षां वाईट प्रकारची व्यवस्था अस्तित्वांत असली पाहिजे व होती, हें आर्यांच्या जुन्या ग्रंथांचें नीट पर्यालोचन केलें असतां, व सध्यां पृथ्वीवर जे रानटी लोक आहेत, व ज्यांची बरीच माहिती विश्वसनीय प्रवाशांकडून प्रसिद्ध झाली आहे ती पाहिली असतां, दिसून येईल. कोणत्याही लोकांत आद्यकुटुंबव्यवस्था सर मेन म्हणतो त्या प्रकारची असूं शकण्याचा संभव नाहीं. श्रेष्ठायत्त कुटुंबव्यवस्थेहून मनुष्यांची आद्यकुटुंबव्यवस्था विशेष निकृष्ट

असली पाहिजे. अशा स्थितींत कोणत्याही प्रकारची विवाहपद्धति स्थापित झालेली नसते. पशुप्रमाणें स्त्रीपुरुषांचें समागम हवे तसे होत असतात. कोणीं कांहीं संपत्ति जोडली असली तर ती सारी त्याच्या पश्चात् वडील मुलाकडे जाईल, किंवा त्याचा साऱ्या मुलांस सारखी वांटून मिळेल, असें नसतें. बहुशः ती मेलेल्या इसमाच्या बायकोकडे किंवा तिच्या मुलीकडे जाते. मुलास आपला चरितार्थ चालविण्याचें सामर्थ्य आलें म्हणजे तो बापापासून निघून मन मानेल तिकडे चालता होतो व वयांत आलेल्या मुलीस बाप विकून टाकतो; नाहीं तर कोणीतरी तिला पळवून नेतो. सारांश, मनुष्याची प्रथमावस्था बऱ्याच अंशी पश्ववस्थेसारखी असते, असें म्हणण्यास हरकत नाहीं; आणि वास्तविक पहातां जोंपर्यंत मनुष्यें शिकारीवर किंवा पारधीवरच चरितार्थ करीत असतात, तोंपर्यंत पारध करून राहणाऱ्या जनावरापेक्षां त्यांची स्थिति विशेष श्रेष्ठ वा असावी, हें समजत नाहीं. मनुष्यास आपली स्थिति उत्तरोत्तर सुधारीत नेण्याची नैसर्गिक बुद्धिशक्ति आहे, व ज्याप्रमाणें तो तिचा उपयोग करीत जातो, त्याप्रमाणें त्याची स्थिति सुधारत जाते, व ती पशूंच्या स्थितीहून भिन्न आणि श्रेष्ठ होत जाते, हें खरें आहे. पण जोंपर्यंत त्याच्याकडून तिचा बराचसा उपयोग होऊं लागला नाहीं, तोंपर्यंत त्याच्या आणि त्याच्या खालच्या पशूंच्या वर्तनांत फारसें अंतर पडण्याचा संभव नाहीं. आर्य लोकांत श्रेष्ठायत्त कुटुंबव्यवस्था स्थापित होण्यापूर्वीं ते पारध करून रहात असले पाहिजेत. श्रेष्ठायत्त कुटुंबव्यवस्था कोणत्याही केवळ पारध करून वनचराप्रमाणें आयुष्य कंठणाऱ्या लोकांत दिसून येत नाहीं. तिचा प्रादुर्भाव मनुष्यांच्या दुसऱ्या अवस्थेंत म्हणजे ते गुरें बाळगूं लागून धनगरासारखें राहूं लागले म्हणजे होतो,

या स्थितींत शत्रूंपासून गुरांचें संरक्षण करण्यासाठीं, त्यांच्या पोटाकरितां गवताचीं रानें हुडकून काढण्यासाठीं, व काढलेल्यांचा बंदोबस्त ठेवण्यासाठीं, आणि जनावरांची नित्य व्यवस्था ठेवून त्यांच्या धारा वगैरे काढण्यासाठीं व दूधदुभतें करण्यासाठीं, कुटुंबांतल्या कुटुंबांत निरनिराळीं कामें निरनिराळ्या इसमांकडे वांटून द्यावीं लागतात, आणि गरज पडल्यास परक्या कुटुंबाशीं भांडण्यास व मारामारी करण्यासही सर्वांस तयार असावें लागतें. या स्थितींत गृहकृत्यांत जो प्रमुख असतो त्याच्याच धोरणानें बाह्य कृत्येंही

चालत असतात. त्यामुळें जशी घरांत त्याची जरब असते, तशी ती बाहेरही असते. सारांश काय कीं, मनुष्यांस धनगरावस्था प्राप्त झाली असतां त्यांच्यांत श्रेष्ठायत्त कुटुंबाची व्यवस्था स्थापित होऊन तिचींच तत्त्वें त्यांच्या बाह्य वर्तनासही मार्गदर्शक होतात. या स्थितींत कांहीं काल लोटल्यावर मनुष्यास शेतकीची युक्ति सुचते, आणि ते शेतकरी बनतात. या स्थितींतही कुटुंबव्यवस्था पूर्ववत् चालते. शेतकऱ्याच्या स्थितींत कांहीं दिवस काढल्यावर मनुष्यें हळू हळू औद्योगिक पंथाचा स्वीकार करून तदनुसार वर्तन करूं लागतात. याप्रमाणें मनुष्यांच्या गृहस्थितींत सुधारणा होत असतां, तीं ज्या समाजांत असतात त्याची सुधारणा होत असते; कारण समाज म्हणजे अनेक कुलांचा समुदाय किंवा संघ होय. तेव्हां हें स्वाभाविकच आहे कीं अवयवांत सुधारणा होऊं लागली तर ती अवयवींत झालीच पाहिजे; कारण अवयवी अवयवांहून भिन्न नाहीं. ज्याप्रमाणें कुटुंबाचा स्वामी दक्ष, उद्योगी, निःपक्षपाती व ममताळू असल्यानें, कुटुंबांतील माणसें आनंदी व सुखी असतात, त्याप्रमाणें समाजपति गुणज्ञ, निःपक्षपाती, उद्योगी आणि निश्चयी असला तर त्याची प्रजा संतुष्ट राहून त्याला फार चहाते. तेव्हां पारधीवृत्ति, धनगरवृत्ति, शेतकरीवृत्ति, आणि व्यापारवृत्ति अशा मनुष्यसुधारणेच्या मुख्य चार वृत्ति झाल्या. जीं कुटुंबें आणि राष्ट्रें या चार वृत्तींतून गेलेलीं असतात, तीं बरींच सुधारलेलीं असतात. यानंतर कुटुंबस्थितींत व राष्ट्रस्थितींत जे फेरफार होत जातात त्यांचें स्थलसंकोचामुळें आजच वर्णन करण्याची सोय नसल्यामुळें, आज येथेंच मुक्काम करणें भाग आहे.

---

## तरुण सुशिक्षितांस विज्ञापना : : : : ३

[तरुण सुशिक्षित देशबांधवहो, हा सुधारक अत्यंत प्रेमपूर्वक जी विज्ञापना तुम्हांस पुढें करीत आहे तिकडे लक्ष द्याल आणि तिची सार्थकता करण्याविषयीं प्रयत्न कराल, अशी आशा आहे.

असें म्हणतात कीं, ज्या देशांतील लोकांनीं राष्ट्रीय स्वातंत्र्य स्थापिलें आहे; ज्या देशांतील लोकांनीं राजांचा जुलूम नाहींसा करून प्रजासत्ताक राज्यपद्धति स्थापिल्या आहेत; ज्या देशांतील लोक, सामाजिक व धार्मिक गोष्टींची सुधारणा करण्यासाठीं सरकारवर अवलंबून न राहतां, ती आपली आपण करूं लागले आहेत; आणि ज्या देशांतील लोकांस सर्व प्रकारच्या प्रक्रांतीस लागणाऱ्या साधनांची अनुकूलता साध्य झाली आहे; त्या देशांतील युनिव्हर्सिट्यांतले शिक्षक आणि शिष्य पूर्वसंप्रदायप्रिय असतात. कोणतीही जुनी पद्धत टाकणें, नवीचा अंगिकार करणें वगैरे गोष्टी त्यांस आवडेनाशा होतात. सारांश जे चालत आलें आहे तेंच बरें आहे, त्याची सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्यानें नवीन लचांडें उद्भवण्याचा संभव आहे, आणि त्यांचा परिहार कसा करावा हें ठाऊक नसल्यामुळें त्यापासून हित न होतां उलट नुकसान होण्याची भीति आहे; सबब जे चालू आहे त्याचेंच संरक्षण करावें आणि त्यापासून होईल तितकें सुख उपभोगावें, असें त्यांस वाटत असतें; आणि कांहीं अंशीं असें होणें फार स्वाभाविक आहे. ज्याप्रमाणें जलोदधीचा अत्यंत क्षोभ करणारा प्रचंड प्रभंजन कांहीं वेळ मोठ्या जोरानें वाहिल्यावर, आणि समुद्रावर व जमिनीवर त्यानें अनेक उत्पात करून सोडल्यावर, जणूं काय विगलितवीर्य होत्साता शांत होतो, आणि वातावरणांत पराकाष्ठेची निश्चलता उत्पन्न होऊन सर्व सचेतन व अचेतन वस्तु जागच्याजागीं निश्चेष्ट झाल्यासारखी भासूं लागतात; त्याप्रमाणें ज्या देशांत मोठमोठ्या राज्यक्रांत्या झाल्या आहेत; ज्यांतील लोकांनीं राज्यस्वातंत्र्यासाठीं व विचारस्वातंत्र्यासाठीं अनेक तुंबळ युद्धें केलीं आहेत; जो देश अनेक वर्षांनीं शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागला आहे; व ज्यांतील लोकांस विशेष गुरुत्वाचा कोणताही अन्याय दूर करणें राहिलें नाहीं;—अशा देशांतील लोकांस थोडीशी स्तिमितता यावी—विशेषतः राज्यक्रांति म्हणजे काय, ती घडवून आणण्यास केवढे प्रयास पडतात, ती होऊं लागली म्हणजे प्रजेस किती हाल सोसावे लागतात, वगैरे गोष्टी त्यांस नीटपणें समजतात; अशा त्या देशांतील सुशिक्षित लोकांस ती ती यावी, हें अगदीं स्वाभाविक आहे. तेव्हां इंग्लंडसारख्या देशांतील युनिव्हर्सिटयांच्या प्रोफेसरांनीं व कॉलेजांतील

विद्यार्थ्यांनीं ग्लाडस्टनसारख्या मंत्रिगणशिरोमणीस विरुद्ध होऊन हार्टिंग्टन्‌सारख्या संकुचितदर्शनाच्या व मर्यादित औदार्याच्या लोकाग्रणीचें प्रोत्साहन करावें; आणि तदनुषंगानें वागण्याविषयीं तत्परता दाखवावी, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण ज्या देशांतील लोकांस राजकीय, सामाजिक व धार्मिक असमता, अज्ञान आणि अन्याय यांपासून पराकाष्ठेचा त्रास होत आहे, किंवा परवशता प्राप्त झाली आहे; ज्या देशांतील सामान्य लोकांस गूढ अज्ञानानें व्यापिलें आहे; ज्या देशांतील लोकांस विपत्तीपासून होणाऱ्या यातना सोसाव्या लागत आहेत, पण त्यांच्या परिहारार्थ काय करावें हें समजत नाहीं सारांश ज्या देशांत राजकीय समता नाहीं, विद्या नाहीं, वित्त नाहीं, शारीरिक व मानसिक सामर्थ्य म्हणण्यासारखें नाहीं, अशा देशांतील युनिव्हर्सिट्यांत आणि कॉलेजांत इतर ठिकाणांपेक्षां थोडीशी अधिक चळवळ नसेल तर त्या देशाची अखेर गति काय होईल, हें सांगतां येणें फार कठीण आहे. विचार करणें, सुखदुःखाचा अनुभव घेणें व क्रिया करणें या तीन गोष्टींपैकीं पहिलींत, दुसरींत, किंवा तिसरींत प्रत्येक मनुष्य चूर होऊन गेलेला असतो. मोठमोठ्या ग्रंथांचीं पारायणें करावीं, रात्रीच्या रात्रीं चिंतनांत घालवाव्या, विचार व्यवस्थित झाला कीं तो पुस्तकद्वारानें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी साधनानें लोकांपुढें आणावा, अशा रीतीनें कित्येक लोक आपलीं आयुष्यें कंठीत असतात. अशांस बाह्य सुखांचा फार उपभोग घेतां येत नाहीं, व बाह्य क्रिया करतां येत नाहीं. वाचनापासून होणारा जो आनंद तोच यांचें स्थाईक व आवडतें सुख आणि विचार करण्यास व लिहिण्यास लागणारी जी शारीरिक हालचाल तीच यांची बाह्य क्रिया. दुसरा वर्ग सुखाभिलाषी लोकांचा. यास मानासिक सुखापेक्षां शरीरसुखाची चाड विशेष असते. वारुळांत जशी एक खुशालचेंडू राणी मुंगी असते म्हणून सांगतात, तीसारखे हे सुखपरायण लोक होत. सुखोपभोगासाठीं सर्व प्राणिमात्र धडपडत असतो, व ज्यास जो प्राप्त होईल त्यानें त्यापासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे; पण ज्या सुखोपभोगामुळें निरंतर तो घेतां येण्याची शक्यता नाहींशी होते; बुद्धीस मांद्य येतें; गात्रें निःशक्त होतात; उत्साह नाहींसा होतो; आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां, उलट नुकसान किंवा त्रास सोसावा

लागतो, अशा सुखोपभोगांत निमग्न असण्यांत काय फायदा आहे बरें ? पण असे लोक कोणत्याही देशांत थोडेथोडके नसतात. ज्या ठिकाणीं अविद्या आणि वित्त यांचा संयोग दृष्टीस पडतो, त्या ठिकाणीं व्यसनासक्ति दृष्टीस पडत नाहीं असें सहसा होत नाहीं. सुदैवानें ज्यांना सुखोपभोग करून घेतां येत असेल त्यांनीं सुखांची निवड करतांना ती आपणांस व इतरांस शेवटपर्यंत हितावह होतील किंवा नाहीं, येवढें पहात जावें म्हणजे झालें. या सुखपरायण वर्गाशिवाय लोकांचा आणखी एक तिसरा वर्ग असतो. या वर्गांतील लोकांची क्रियाप्रवृत्ति फार जबरदस्त असते; व एका दृष्टीनें यांस समाजाचे आधारस्तंभ म्हणतां येईल. यांनीं काबाडकष्ट करून आवश्यकतेचे आणि चैनीचे पदार्थ उत्पन्न करावे, आणि त्यांचा उपभोग वरील दोन वर्गांतील किंवा मधल्या वर्गांतील लोकांनीं घ्यावा, असें आजपर्यंत बऱ्याच अंशीं होत आलें आहे व पुढेंही अल्प काळांत या स्थितींत विशेष फेरबदल करतां येईल असें वाटत नाहीं. तथापि निरपेक्ष बुद्धीनें व आस्थापूर्वक परिश्रम केले असतां, ही असमता थोड्या वर्षांत बरीच दूर करतां येण्यासारखी आहे. ज्या देशांत ही असमता वाढत जाऊं लागली असेल, त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला आहे, असें समजावें. जेव्हां या असमतेची परमावधि होते, तेव्हां घनघोर राज्यक्रांति होऊन समाजचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात, किंवा त्यांत अपूर्व स्थित्यंतरें होतात. निरंतर कष्ट साहण्यास खालच्या प्रतीचे प्राणीसुद्धां तयार असत नाहींत तर मनुष्य कसा असेल ? कष्ट सादृणें म्हणजे जीवितत्त्व क्षीण करून घेणें होय; आणि तसें करून घेण्यास बहुतेक मनुष्यें तयार होतील तर हळू हळू सारी मनुष्यजात नाहींशी होईल ! परंतु मनुष्यें अस्तित्वांत आलीं आहेत व दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत आहे. यावरूनच त्यांच्या नाशास अनुकूल अशा कारणांपेक्षां त्यांच्या अस्तित्वास व वृद्धीस अनुकूल अशीं कारणें या पृथ्वींतील परमाणुसंघांत निगूढ आहेत, असें सिद्ध होतें. तेव्हां काय दिसून येतें कीं, विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकाळीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात, ते कायमचे नव्हत. हळू हळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावीं लागून, साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत

जाणार आहे; व जों जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येऊं लागेल. येवढें खरें आहे कीं, कांहीं झालें तरी सर्वांच्या बुद्धि सारख्या तीव्र होतील व पाहिजे त्या कामांत पाहिजे त्याला पडतां येऊन तें उत्तम रीतीनें वठवितां येईल, असें पूर्णपणें होण्याचा संभव फार थोडा आहे. तथापि प्रस्तुतकालीं निरनिराळ्या वर्गांतील लोकांत व स्त्रीपुरुषांत जें विलक्षण अंतर दृष्टीस पडत आहे तें पुष्कळच संकुचित करतां येणार आहे; आणि ज्या देशांत तें तसें करण्याचा प्रयत्न झपाट्यानें चालत राहील तेच देश अखेरीस तगतील. बाकीचे, सर्वत्र जो जीवनार्थ कलह मोठ्या निकरानें चालला आहे त्यांत भांडतां भांडतां नाहींसे होतील. यासाठीं ज्यांना हें अस्तित्वतत्त्व स्पष्टपणें कळून आलें असेल व ज्यांच्या मनांत कर्तव्यबुद्धि व परोपकारबुद्धि पूर्णपणें जागृत झाली असेल त्यांनीं, आपापल्या देशाचा जीवनार्थ कलहांत टिकाव लागण्यासाठीं, रात्रंदिवस निरपेक्ष बुद्धीनें झटलें पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून जे स्तब्ध राहतील त्यांच्या माथ्यावर देशास विपद्दशा आणिल्याची, आणि त्याचा नाश अपरिहार्य केल्याची भयंकर जबाबदारी येणार आहे; म्हणून सुशिक्षित देशबांधवहो, जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरें म्हणून घ्यावयाचें असेल व तुमची आज जी स्थिति आहे, तीहून तुमच्या मुलांची व नातवंडांची स्थिति अधिक वाईट होऊं नये अशी तुम्हांस वास्तविक इच्छा असेल, तर ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगांप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षे फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत उचित होय. या कामीं तुमच्याकडून हलगरज झाल्यास या देशाला लौकरच जे दिवस येणार आहेत त्यांचा नुसता विचार डोळ्यांपुढें आला तरी भय वाटल्यावांचून रहात नाहीं! इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड-स्टेट्स् वगैरे देशांतल्या सर्व वर्गांतील लोकांमधले व स्त्रीपुरुषांमधले संबध कसे आहेत, हें नित्य नजरेपुढें येत असूनही, जर तुम्ही आपले डोळे मिटाल, व बालविवाहासारखे अनेक व्याधि तुम्हांस अत्यंत पीडित असून, त्यांच्या प्रतिकारार्थ कांहींच न कराल, तर तुमच्या संततीस तुमच्या मूर्ख-पणाबद्दल, आळसाबद्दल व आपलपोटेपणाबद्दल फारच त्रास सोसावा लागेल.

तसें होऊं न देणें हें तुमचें कर्तव्य आहे, व तें अल्पायासानें कसें करतां येईल, हें सांगावें येवढाच या लेखाचा उद्देश आहे.

आज जीं सुधारलेलीं राष्ट्रें आहेत, त्यांपैकीं प्रत्येकांत विचार करणारे, उपभोग घेणारे, व श्रम करणारे असे तीन ठळक वर्ग दृष्टीस पडत असून ते उत्पन्न करणारीं कारणें दिवसेंदिवस क्षीण होत आहेत, आणि जसजशीं तीं अधिकाधिक क्षीण होत जातील तसतशी समाजस्थ असमता नाहींशी होऊन विचार, उपभोग आणि शरीरश्रम ह्या गोष्टी सर्वांस सम प्रमाणानें कराव्या लागतील आणि तसें झालें, म्हणजे समाजास खरी बळकटी आणि स्थिरता आली व उन्नतावस्था प्राप्त झाली असें म्हणतां येईल, असें मागल्या अंकांत सांगितलें आहे; तसेंच ही असमता दूर करण्याच्या खटपटीचा विशेष बोजा पहिल्या वर्गातील लोकांवर पडतो हेंही सांगितलें आहे.

इंग्रजी शिक्षण मिळालेले बहुतेक सुशिक्षित लोक सामाजिक प्रश्नांविषयीं विचार करूं लागले आहेत, व उत्तरोत्तर त्यांच्या विचारांचा परिणाम त्यांच्या आचरणावर होऊं लागेल यांत संशय नाहीं. पण अशा रीतीनें जें वर्तनांतर होतें तें स्थाईक होण्याचा संभव असत नाहीं इतकेंच नाहीं, तर कोणतीही गोष्ट चांगली आहे तेव्हां ती करणें जरूर आहे, असें वाटून ती करूं लागणें यांत जें मनास शिक्षण मिळतें, तें अप्रत्यक्ष रीतीनें घडून येणाऱ्या वर्तनांतरापासून कधींच प्राप्त होत नाहीं. आसमंतातील वस्तुस्थितीच्या आधीन होऊन ती नेईल तिकडे जाणें यांत कोणताही पुरुषार्थ नाहीं. ज्या ठिकाणीं स्त्रीचा वाराही येण्याचा संभव नाहीं, अशा ठिकाणीं ब्रह्मचर्य आचरल्याबद्दल फुशारकी मारण्यांत काय हांशील आहे! आपणावर अमुक प्रकारचें संकट येणार आहे असें कळून त्याच्या परिहारार्थ जाणूनबुजून उपाय योजणें यांतच मनुष्याचें मनुष्यपण आहे. लोकसंख्या वाढत जाऊन अन्नाची पंचाईत पडूं लागली म्हणजे विवाहकाल सहजच लांबत जाईल, आपण होऊन तो लांबविण्याची गरज नाहीं; व्यापारधंदा, सरकारी नोकऱ्या, आगगाडीचा प्रवास इत्यादि कारणांनीं जातिबंध आपल्या आपण शिथिल होऊं लागले आहेत, तेव्हां ते वाईट आहेत असें म्हणून एकमेकांस दुखविण्याची गरज नाहीं; सामान्य शिक्षणाचा व विशेषतः शास्त्रज्ञानाचा जसजसा प्रसार होत जाईल तसतशा धर्मसंबंधीं वेडेपणाच्या समजुती लयास जातील, सबब

त्यांवरच टीका करण्याची गरज नाहीं; कोणतीही सुधारणा करण्याविषयीं लोकांच्या मनांत दृढ इच्छा उद्भवल्याशिवाय, केवळ कायद्याच्या जुलमानें सुधारणा होऊं शकत नाहीं; व ती इच्छा उद्भवली असतां कायदा करण्याची आवश्यकता रहात नाहीं, कारण मग ती लोकांचे लोकच करतात; पराधीनास बलहीनता येते, व बलहीनांच्या कपाळीं पराधीनता ब्रह्मदेवानें लिहिली आहे, सबब हिंदुस्थानच्या लोकांनीं राष्ट्रोन्नति करण्याचा शुद्ध प्रयत्न करणें वेडेपण होय;—अशा रितीनें सामाजिक व राजकीय प्रश्नांविषयीं विचार करणाऱ्या लोकांस विचारी म्हणावें किंवा नाहीं, याचा संशय आहे. हे असल्या विचारांनीं मनुष्यांत आणि इतर प्राण्यांत कांहीं अंतर नाहीं असें दाखवूं पहातात! मागल्या पिढ्यांस आलेल्या संकटाची माहिती आणि त्यांच्या परिहारार्थ त्यांनीं योजिलेल्या उपायांचें ज्ञान, त्यांच्या साहाय्यानें म्हणजे पूर्व पिढ्यांच्या अनुभवानें भावी विपत्ति टाळण्याचा प्रयत्न मनुष्य करणार नाहीं, व वस्तुस्थितीचा गुलाम होऊन ती वागवील तसें वागेल तर प्राणिवर्गांत त्यास प्राप्त झालेलें श्रेष्ठत्व त्याचेकडे कसें राहील, आणि सध्यां जीं सुखें उपभोगण्यास सांपडत आहेत तेवढ्यांचा तरी त्यास कायम उपभोग कसा लाभेल, हें सांगतां येत नाहीं. तात्पर्य, अगदीं शुष्क गोष्ट असली तरी तिच्यासाठीं बुद्धिपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. जे लोक असें करीत नाहींत ते हळू हळू दैववादी बनून निरुद्योगी व निरुत्साह होत्साते क्षीण होत जातात व शेवटीं समूळ नष्ट होतात. तस्मात् सुशिक्षित बांधवहो, तुम्हांस अशी प्रार्थना आहे कीं, वर जें म्हटलें आहे तें तुम्हांस मान्य असेल तर तुम्हीं कालावर व वस्तुस्थितीवर अवलंबणें पुरें करून, ज्या सुधारणा तुम्हांस अत्यंत आवश्यक अशा वाटत आहेत त्या करण्याविषयीं बुद्धिपूर्वक प्रयत्न करण्यास लागलें पाहिजे. या आवश्यक सुधारणांपैकीं कांहीं अशा आहेत कीं, त्या वृद्ध लोकांच्या हातून होण्याचा संभव नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांपैकीं पुष्कळांस त्यांची संमतीही मिळण्याची आशा नाहीं. उदाहरणार्थ, पुनर्विवाह व ऋतूत्तर कन्याप्रदान. तसेंच, कित्येक तरुण सुशिक्षितांस या दोन गोष्टी व अशाच प्रकारच्या इतर गोष्टी कितीही चांगल्या वाटूं लागल्या असल्या, व त्यांची आवश्यकता भासूं लागली असली, तरी त्या करण्यास प्रवृत्त होण्यास त्यांची छाती होणार नाहीं. केवळ सगळेच असे असतील असें आमचें म्हणणें नाहीं.

एखाद्याचें धैर्य, निश्चय व कार्यनिष्ठा असामान्य असल्यास, तो लोकमताची किंवा अगदीं जवळच्या आप्तांचीही पर्वा न करतां, आपल्या मनास जी गोष्ट प्रशस्त वाटली ती करण्यास प्रवृत्त होईल. पण असे लोक फार विरळ असतात. अशांची संख्या वाढेल तितकी वाढणें इष्ट आहे, आणि तिच्या कमीअधिक वाढीवर समाजाची सुधारणा शीघ्र होणें किंवा न होणें हें अवलंबून आहे. तथापि सध्यांचें जग सामान्य विचाराच्या, सामान्य धैर्याच्या व सामान्य समजुतीच्या लोकांचें झालेलें आहे. वृद्धतरुणांच्या आचारविचारांत कालमानानें व शिक्षणभेदानें थोडाबहुत फरक होतो, पण त्यामुळें त्यांत जमीनअस्मानाचें अंतर पडतें असें नाहीं, व असें होणें इष्टही नाहीं; कारण असें होऊं लागेल तर कोणत्याही घरीं कोणासही सुखाचा लवलेश मिळेनासा होऊन साऱ्या समाजांत अहोरात्र चलबिचल माजून राहील, कोणाचा धाक कोणावर चालणार नाहीं व सगळ्याच प्रकारच्या सुधारणांस प्रचंड व्यत्यय येईल. सुधारणा करण्याची इच्छा जशी तरुणांस असते तशी वृद्धांस असत नाहीं. समाजाच्या असलेल्या स्थितीचें संरक्षण करण्याविषयीं वृद्ध लोक अत्यंत उत्कंठ असतात. त्याचें पाऊल पुढें पडावें, अशी तरुणांस आकांक्षा असते. हे समाजनौकेचे भरताड होत; तरुण शिडें होत ! पहिल्याशिवाय समाजांत स्थिरता रहाणार नाहीं; दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाहीं ! तेव्हां ज्यांच्या मनांत समाजाचें कल्याण व्हावें असें असेल, ते या दोहोंचें फारकत व्हावें असें कधींही चिंतणार नाहींत. दोहोंचाही उपयोग आहे; व दोघांनाही आपापला कार्यभाग उरकण्याची मोकळीक पाहिजे. प्रत्येक गोष्टींत बाबानें बेस्याला आपलें वळण गिरविण्यास लावणें हें जसें वाईट, तसें आपली प्रत्येक गोष्ट बाबा ऐकून घेत नाहींत म्हणून बेस्याला त्याचा विषाद येणें हेंही वाईट. दोघांच्या संमतीनें जेवढें चालेल तेवढें हवेच आहे. पण ज्या गोष्टींत दोघांचें ऐक्य होण्याचा संभव नसेल त्या ज्याच्या त्यास आपल्या मनाप्रमाणें करावयास सांपडल्या तरच घरांत व बाहेर शांतता आणि समाधान राहण्याचा संभव आहे. आज ज्यांचें असें अधिक वय होऊन गेलें आहे; वागण्याची पूर्व पद्धत ज्यांच्या अंगीं खिळून जाऊन स्वभावतुल्य झाली आहे; अनेक वर्षांच्या विश्वासामुळें व तदनुसार आचरणामुळें ज्यांच्या धर्मविषयक व नीतिविषयक कल्पना वज्रलेप झाल्या

आहेत; जुनाट झालेल्या झाडाप्रमाणें ज्यांचीं मनें किंवा शरीरें वळण्याची आशा उरली नाहीं; अशांनीं आम्ही ज्या गोष्टी पुढें सांगणार आहों, त्यांत पडावें, अशी आमची इच्छा नाहीं व तुम्ही त्यांत पडा, असें आम्ही त्यांस म्हणणारही नाहीं. जे आज अपत्यवंत आहेत, ते आपल्या अपत्यांची व्यवस्था कशीही लावोत; त्याबद्दल आम्ही कुरकुर करणार नाहीं. पण ज्यांच्यावर अद्यापि संसाराचा भार पडलेला नाहीं; ज्यांच्याकडे पितृत्वाचा अधिकार अद्यापि आलेला नाहीं; नवीन ज्ञान संपादण्याचें व विचार कायम करण्याचें ज्यांचें वय अद्यापि गेलें नाहीं; ज्यांच्या ईर्षेला पराभव ठाऊक नाहीं; ज्यांची हिंमत कशानेंही खचलेली नाहीं; जगाच्या दुःखमय अनुभवामुळें ज्यांच्या अंतःकरणांत अनौदार्य, संशय, परदुःखपराङ्मुखता आणि परहितौदासीन्य यांचा प्रादुर्भाव झाला नाहीं—अशा विद्यालयीन व इतरस्थ तरुण सुशिक्षितांनीं आम्ही जी कल्पना सुचवीत आहों तिचा विचार करून ती अमलांत आणण्याविषयीं मंडळी स्थापावी, अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

आम्हांमधील बालविवाहाची चाल इतर सर्व वाईट चालींपेक्षां आम्हांस विशेष विघातक होत आहे, हें अलीकडे सर्व समंजस लोकांस कबूल झालें असून, ती बंद व्हावी अशी इच्छा बरीच पसरली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण ती बंद करण्याचा उपाय मात्र आमच्याकडून झाला नाहीं; व जोंपर्यंत तो करण्याचें काम अनपत्यवान् तरुण सुशिक्षित लोक आपल्या अंगावर घेणार नाहींत तोंपर्यंत त्याची योजना मनापासून कोणीही करणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. ही गोष्ट तरुणांनीं मनावर घेतली असतां आजपासून पंचवीस वर्षांच्या आंत हा रोग येथें कधीं होता किंवा नव्हता, अशा रीतीनें त्याची त्यांस वाट लावितां येईल! तेव्हां असा हा रामबाण उपाय असावा तरी काय हें जाणण्याची वाचकांस मोठी उत्कंठा झाली असेल यांत संशय नाहीं;पण स्थलसंकोचामुळें ती आज पुरवितां येत नाहीं हें पाहून फार दिलगिरी वाटते; तथापि, ज्यांनीं इतके दिवस दम काढला त्यांना आणखी आठ दिवस तो काढतां येईल, असें समजून फार खेद न करतां सध्यां रजा घेतों!

तरुण सुशिक्षितांनीं जो विषय आपल्या हातीं घ्यावा म्हणून आज आम्ही

प्रत्यक्षपणें सुचविणार आहों, त्याची गेल्या दोन अंकांत जितकी प्रस्तावना करावयाला पाहिजे होती तितकी केली आहे. आज आम्हांस ज्या सुधारणा करणें अवश्य आहे त्यांपैकीं बहुतेक जुन्या पिढीच्या लोकांकडून होण्यासारख्या कां नाहींत याचें दिग्दर्शन गेल्या अंकांत केलें आहे, तें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या घटकेस हिंदुस्थानांत नव्या व जुन्या कल्पनांचा ज्या प्रकारचा झगडा सुरू आहे तशा प्रकारचा झगडा येथें पूर्वीं कधींही झाला नसेल. आजपर्यंत हिंदुस्थानावर ज्यांनीं स्वाऱ्या केल्या, किंवा येथें आपलीं राज्यें स्थापिलीं त्यांच्या आणि आम्हां एतद्देशीय हिंदूंच्या राजकीय आणि सामाजिक विचारांत विशेष अंतर नसल्यामुळें हिंदूंनीं आपल्या जिंकणारांपासून अवश्य शिकलें पाहिजे असें विशेष कांहीं नव्हतें. किंबहुना हिंदू लोकांपाशींच आपल्या परकी राज्यकर्त्यांस शिकविण्यासारख्या कांहीं गोष्टी होत्या. यामुळें आजपर्यंत ज्यांनीं हिंदुस्थानास जिंकून त्यांत आपली सत्ता स्थापिली त्यांनीं हिंदूंचा शारीरिक किंवा बाह्य पराभव केला इतकेंच म्हटलें पाहिजे. पण इंग्रजांनीं आम्हांवर जें राज्य स्थापिलें आहे त्याची अगदीं निराळी गोष्ट आहे. या राज्यामुळें आमच्या स्थितींत पराकाष्ठेचा बदल होत आहे. प्रथम प्रथम या स्थित्यंतराचें स्वरूप आमच्या लक्षांत बरोबर आलें नाहीं. पण अलीकडे पांचपंचवीस वर्षांत पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार झाल्यापासून जेवढे म्हणून त्याच्या पाशांत सांपडले आहेत त्यांची स्थिति विलक्षण होऊन गेली आहे; व उत्तरोत्तर या शिक्षणाचा परिणाम बहुतेकांवर होणार हें स्पष्ट दिसत आहे. पुष्कळांचें असें म्हणणें आहे कीं, पाश्चिमात्य शिक्षण फार थोड्यांस प्राप्त झालें असल्यामुळें, त्यानें हिंदु लोकांच्या स्थितींत विशेष फेरफार झाला आहे, असें म्हणतां येणार नाहीं. पण आमच्या मतें असें समजणारांची चूक आहे. केवळ शाळांच्या द्वारें पाश्चिमात्य विचारांचा प्रसार होऊन त्यामुळें आमचें जें स्थित्यंतर होत आहे तेवढ्याचाच विचार केला तर तें विशेष विस्तृत नाहीं, हें कबूल करावें लागेल. पण शाळांशिवाय ज्या दुसऱ्या अनेक द्वारांनीं हिंदू समाजांतील प्रत्येक वर्गांतल्या लोकांवर परिणाम घडत आहेत त्यांचा नीट विचार केला तर असें दिसून येईल कीं, ज्याच्या आचारांत व विचारांत पाश्चिमात्य कल्पनांनीं थोडाबहुत तरी फेरफार झाला नाहीं, असा एक वर्गही नाहीं. शाळाखात्याशिवाय इतर खात्यांचा संबंध प्रत्येक दिवशीं

प्रत्येक वर्गातील वयांत आलेल्या मनुष्यांशीं येऊन पोंचत आहे, व तदनुषंगानें त्यास आपल्या वागणुकींत प्रतिदिवशीं कमी अधिक फेरफार करावा लागत आहे. मोजणीखातें, जमीनजमाबंदीखातें, न्यायखातें, पब्लिक वर्क्सखातें, वैद्यकखातें, लष्करी खातें, स्यानिटरी खातें, अबकारी खातें इत्यादिकांनीं आमच्या इकडील शेतकऱ्यांवर, कारागिरांवर, व्यापाऱ्यांवर, सावकारांवर, वाण्याउदम्यांवर, व सामान्य मजुरांवर केवढे परिणाम घडत आहेत. या खात्यांशीं लोकांचा जो व्यवहार होतो तो सरकारानें घालून दिलेल्या नियमांप्रमाणें व्हावा लागतो. त्यामुळें त्या नियमांचें वळण त्यांस न कळत लागत चाललें आहे; व तें नकळत लागत आहे म्हणून मुळींच लागत नाहीं असें म्हणणें बरोबर नाहीं. याशिवाय तारायंत्र, आगगाडी, पोष्टखातें, सेव्हिंग्ज बँक्स, पोस्टल बँक्स वगैरे ज्या गोष्टी सरकारानें किंवा खासगी मंडळ्यांनीं व्यापाराच्या सोईसाठीं व इतर सोईसाठीं स्थापिल्या आहेत, त्यांचा लोकांच्या धर्मविचारांवर, नीतिविचारावर व नित्याचरणावर केवढा परिणाम होत आहे याचा जो लक्षपूर्वक विचार करील त्याला, आणखी शेंपन्नास वर्षे असाच क्रम चालला तर हिंदुस्थानच्या पहिल्या स्थितीचा मागमूस नाहींसा होण्याइतकें त्याचें स्थित्यंतर होणार आहे, असें कबूल करावें लागेल. तात्पर्य काय कीं, जिकडे पहावें तिकडे पाश्चिमात्य कल्पनांनीं व आचारांनीं आम्हांस वेढल्यासारखें झालें आहे व त्यांच्या पेंचांतून आम्हांस निसटून जातां येईल, असें वाटत नाहीं! पण निसटून जाण्याचा तरी प्रयत्न करण्याची काय गरज आहे? ज्या युरोपीय कल्पनांचा प्रवात इकडे पडत आहे त्यांपैकीं जेवढ्या अहितकारक असतील तेवढ्या वर्ज करून बाकीच्यांचा अंगीकार करण्यास काय हरकत आहे? दुसऱ्या विषयाविषयीं लिहीत असतां असें दाखविलें आहे कीं, यूरोपांत आज जी सुधारणा दृष्टीस पडत आहे ती मागील अनेक सुधारणांचें सार आहे, व ज्या राष्ट्रांस जीवनार्थकलहांत टिकावयाचें असेल त्यांना त्या सुधारणेचा स्वीकार केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. हें खरें असेल तर ती सुधारणा आपल्या घरीं चालून आली असून आपण तिचा निषेध करणें म्हणजे आपल्या हातानें जाणूनबुजून आपलें नुकसान करून घेण्यासारखें होय. निदान आमची तरी अशी समजूत आहे कीं, इंग्रजांच्या राज्यामुळें ज्या गोष्टी येथें प्रस्थापित झाल्या आहेत व होऊं

पद्धात आहेत, त्यांपैकीं बहुतेक स्वीकरणीय व अनुकरणीय आहेत. सबब त्यांचा येथें जो आपोआप प्रसार होत आहे त्यास विरुद्ध जाणें हें तर इष्ट नाहींच; पण ज्यांना त्यांचें चांगुलपण समजण्यासारखें शिक्षण मिळालें आहे त्यांनीं बुद्धिपुरस्सर त्यांचा स्वीकार व प्रसार केला पाहिजे. असें केलें तरच त्या लौकर मूळ धरतील; आणि त्यांच्या फलांचा लाभ थोड्या वर्षांत आम्हांस होऊं लागून जीवनार्थकलहांत हार न जाण्याची आशा आम्हांस करतां येऊं लागेल. हें बुद्धिपुरस्सर सुधारणा करण्याचें काम तरुण सुशिक्षितांशिवाय इतरांच्यानें होण्यासारखें नाहीं, म्हणून इतका वेळ त्यांची विनवणी चालविली आहे.

तरुण सुशिक्षित मित्रहो, 'शरीर धड तर मन धड' (A sound mind in a sound body.) अशी जी इंग्रजी भाषेंत सुप्रसिद्ध म्हण आहे ती तुम्हा सर्वांच्या ऐकण्यांत आलीच असेल. ज्याप्रमाणें जोरदार वृक्ष निपजण्यास मूळ अंकुर जोरदार पाहिजे, त्याप्रमाणें देशांत सुदृढ स्त्रीपुरुषें निपजण्यास, सुदृढ मुलें होण्यास वैद्यशास्त्रांत जो खऱ्या विवाहाचा काल सांगितला त्याचें कोणाकडूनही उलंघन होतां कामा नये. या कालाचें उलंघन आम्हांकडून अनेक वर्षें होत असल्यामुळें आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी, श्रम करण्यास नादान, उत्साहशून्य, व भेकड अशी होत आहे. आमच्या शरीरसामर्थ्याचा लोप होत असल्यामुळें आमचें मानसिक सामर्थ्यही नाहींसें होत आहे. याशिवाय बालविवाहापासून आम्हांवर जीं इतर अरिष्टें गुदरत आहेत त्यांचा येथें अगदीं अल्प उल्लेख करण्यासही जागा नाहीं. बालविवाह बंद झाल्यास, आज प्रत्येक घरीं ज्या एकदोन हतभाग्य बालविधवा दृष्टीस पडतात त्या दृष्टीस पडेनाशा होतील; पुरुषांच्या अंगीं अधिक पौरुष दृष्टीस पडूं लागेल; तरुणास अधिक उद्योग करण्याची हिंमत येईल, व धाडसाचीं कामें अंगावर घेण्याची छाती होऊं लागेल; ज्याला त्याला आपापल्या मनाप्रमाणें आपली बायको पसंत करण्याची सवड मिळूं लागल्यामुळें, स्त्रीपुरुषांच्या सुखाची वृद्धि होऊन संसारयात्रा अधिक रमणीय होईल; विवाहापूर्वी मुलींस ज्ञान संपादण्यास अधिक फुरसत मिळाल्यामुळें पुढें त्यांच्याकडून अपत्यसंवर्धनाचें व प्रपंच चालविण्याचें काम चांगल्या रीतीनें होऊं लागेल. पण हें सर्व होण्यास बालविवाहाची चाल

बंद झाली पाहिजे, व ती बंद होणें किंवा न होणें हें सर्वथैव तुमच्याकडे आहे.

या कामासाठीं सर्व सुशिक्षित तरुणांनीं महाराष्ट्रबालविवाहनिषेधक नांवाची मंडळी स्थापावी, अशी आमची सूचना आहे. आज जे अशा मंडळीचे सभासद होण्यास तयार असतील त्यांनीं एकत्र जमून "आम्ही आपले, आपल्या मुलींचे, आपल्या मुलांचे व ज्या मुलींचें व मुलांचें पालकत्व आमच्याकडे येईल त्यांचे अल्पवयांत विवाह करणार नाहीं." अशा शपथा घ्याव्या. जर अशा मंडळीस खरोखरीच कांहीं सुधारणा व्हावी अशी उत्कट इच्छा असेल तर मुलींचें लग्न बारा वर्षें झाल्यावर व मुलाचें लग्न अठरा वर्षें झाल्यावर करावयाचें, असा निर्बंध कायद्यानें करून घेतला पाहिजे. जो अशा मंडळीचा सभासद झाला त्यानें तींत नवीन तरुण लोक आणण्याचा होईल तितका प्रयत्न केला पाहिजे. असा क्रम कांहीं वर्षे चालला तर बालविवाहनिषेधक मंडळीच्या सभासदांची संख्या दोन हजारांवर सहज जाईल व इतकी मंडळी अशा सामान्य उद्देशानें एका कामांत निगडीत झाली म्हणजे तिला दुसऱ्या सुधारणाही झपाट्यानें करतां येतील. प्रत्येक सभासदानें वर्षाची रुपया दीड रुपया वर्गणी देण्यास तयार झालें पाहिजे. या वर्गणीपासून जो फंड उभारला जाईल त्याच्या मदतीनें अनेक आवश्यक व उपयुक्त गोष्टी करतां येतील. अलीकडे पांचचार ठिकाणीं अशा प्रकारच्या मंडळ्या स्थापित झाल्या आहेत, व अशा प्रकारची मंडळी स्थापावयाची झाली म्हणजे काय काय करावें लागतें, अशाविषयीं राजे सर टी. माधवरावांसारख्यांनीं पुष्कळ शोध करून टिप्पणें प्रसिद्ध केलीं आहेत; तेव्हां अशा मंडळ्यांचे नियम वगैरे कसे असावे, याविषयीं येथें विशेष लिहिण्याची गरज नाहीं. अगोदर अशी मंडळी स्थापण्याविषयीं व कायदेशीर बंधनें करून घेण्याविषयीं कांहींचा निर्धार झाला पाहिजे. तो एकदां झाला म्हणजे पुढचा मार्ग सोपा आहे. आम्हांस अशी आशा आहे कीं, कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं हें काम आपल्या हातीं घेतल्यास त्यांस ताबडतोब यश येणार आहे. ज्यांच्या अंगीं विचारशक्ति आणि उत्साह यांचा संगम झालेला असतो, त्यांना कोणतीही सुधारणा करण्यास अवघड जात नाहीं. सबब येथील डेक्कन कॉलेजांतील, फर्ग्यूसनकॉलेजांतील, व सायन्सकॉलेजांतील, व त्याप्रमाणेंच मुंबई येथील एल्फीन्स्टन, फ्रीचर्च वगैरे सर्व कालेजांतील

सुशिक्षित, सुजाण, सुविचारी व प्रौढ विद्यार्थ्यांस आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या स्वहितकर व राष्ट्रहितकर कार्यांत पुढारीपण घ्यावें. पुढील देशस्थिति सर्वांशीं त्यांच्या हातीं आहे. वरील विद्यालयांत सध्यां असणाऱ्या विद्यार्थ्यांनीं या कामास आरंभ केल्यास, त्यांच्या पाठीमागून त्यांच्या जागीं येणारे विद्यार्थी त्यांचें अनुकरण करतील. येवढेंच नाहीं, तर कॉलेजांतील विद्यार्थी अशा कामांत पडल्यास त्याचा परिणाम शाळांतील प्रौढ मुलांवरही होऊं लागेल व या रितीनें धाग्याशीं धागा लागून जाऊन अल्पकाळांत सुंदर सुधारणापट तयार होईल, आणि ज्यांना तो वापरण्यास सांपडेल त्यांची अनेक प्रकारची आपदा नाहींशी होईल इतकेंच नाहीं, तर त्यांस अननुभूतपूर्व अशा अनेक संसारसुखांचा उपभोग मिळूं लागेल.

येथपर्यंत सुधारकानें आपलें काम केलें आहे, व वर निर्दिष्ट केल्यासारखी बालविवाहनिषेधक मंडळी अस्तित्वांत आल्यास तिचा पहिला सभासद होण्यास, सर्वानुमतें योग्य वाटतील तीं बंधनें करून घेण्यास, आणि अशा मंडळीचा प्रसार होऊन तिनें आरंभिलेल्या कामास यश येण्यासाठीं आपणांकडून होईल तेवढी मदत करण्यास तो पूर्ण राजी आहे, हें तो या लेखाच्या द्वारें प्रसिद्धपणें सांगत आहे. आतां ज्यांची तो इतका वेळ विनवणी करीत आहे ते आपलें कर्तव्य बजावण्यास कितपत तयार होतात, हें मात्र पहावयाचें राहिलें आहे !

---

## सौख्याची मीमांसा : : : ४

ऐसें कैसें रे सोंवळें । शिवतां होतसे ओंवळें ॥

रामदास

[ या प्रांतांत व बंगाल प्रांतांत मत्स्याशन करणाऱ्या कांहीं वरिष्ठ जाती आहेत, त्यांच्या सोंवळ्याची एक मौज सांगतात. ती अशी कीं, क्षारोदकांत वाढणारी ही भाजी त्यांनीं घरीं आणिली आणि ती धुऊन व चिरून पाकसिद्धीसाठीं एखाद्या पातेल्यांत व्यवस्थेनें ठेऊन दिली आणि मग तिला

एखादें आंगरखा घातलेलें पोर शिवलें कीं, ती विटाळून जाऊन पोक्त स्त्रियांच्या व पुरुषांच्या आहारास अयोग्य होते! असें झाल्यावर तिची वाट लावण्याचें काम घरांतील नोकरांवर किंवा सोंवळें नेसूं न लागलेल्या बाळंतिणीवर आणि लहान मुलींवर अथवा मुंज न झालेल्या मुलांवर येऊन पडतें! हा आचार खरोखरीच कोठें रूढ असल्यास,तो पाहून आम्हां महाराष्ट्रीय ब्राह्मणांस त्याच्या वैलक्षण्याबद्दल हसूं आल्यावांचून राहणार नाहीं. पण आमच्यांत जे विचारी असतील त्यांनीं ही गोष्ट ऐकून आपलें हसूं आवरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण या आचारांत जितकी हास्यास्पदता आहे तितकी, किंबहुना तीहून कांकणभर अधिक,हास्यास्पदता आम्हां महाराष्ट्रीय ब्राह्मणांत रूढ असलेल्या अनेक आचारांत आहे. तेव्हां नकट्यांनीं नकट्यांस हंसत सुटण्यांत काय अर्थ आहे? विचारी पुरुषांनीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जे आचार चमत्कारिक धर्मकल्पनांवर बसविलेले असतात, ते विवेकाच्या कसाला लावून पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जे लोक तसल्या आचारांचें अनुकरण करीत असतात त्यांच्या मनांत त्यांच्या औचित्याचा विचार कधींच येत नाहीं. पूर्वापार चालत आलेल्या गाढ विश्वासशृंखलांनीं निगडित होऊन गेल्यामुळें मागून आलेलें लोण डोळे मिटून पुढल्यांस नेऊन पोंचविणें येवढेंच ते आपलें कर्तव्य समजतात! धर्ममंदिराची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे, असें हिंदु धार्मिकांचेंच म्हणणें आहे असें नाहीं. पृथ्वीवरील कोणत्याही प्रकारच्या धार्मिकांस विश्वासाशिवाय त्राता नाहीं व थारा नाहीं. यासंबंधानें बुद्धिवादाचें नांव काढलें कीं, त्यांच्या अंगावर कांटा उभा राहतो! एखाद्या दिवाळखोर कर्जबाजाऱ्यास ज्याप्रमाणें आपल्या प्राप्तीचा आंकडा आपल्या खर्चाच्या आंकड्यांशीं ताडून पहाण्याचें धैर्य होत नाहीं, किंवा ज्यांची जीविताशा फार प्रबल झाली आहे त्यांना आपल्या रोगाची चिकित्सा सुप्रसिद्ध भिषग्वर्यांकडून करवत नाहीं, त्याप्रमाणें श्रद्धाळू धार्मिकांस आपल्या धर्मसमजुती व त्यांवर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशींत घालण्याची छाती होत नाहीं. या तीव्र धगीचा खरपूस ताव देण्यास तयार होण्यांत त्यांची त्यांस धडगत दिसत नाहीं! त्यांना अशी भीति वाटते कीं, ते हिणकस ठरल्यास, पुढें काय करावें? आम्हांस असें वाटतें कीं, असलें भित्रेपण फार दिवस

चालावयाचें नाहीं. विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोंपर्यंत विश्वासानें किंवा श्रद्धेनें प्रत्येक गोष्टींत आपला अंमल चालविला यांत कांहीं वावगें झालें नाहीं. जसा लोकांत तसा मनास कोणी तरी शास्ता पाहिजे; व ज्याप्रमाणें मुळींच राजा नसण्यापेक्षां कसला तरी राजा असणें बरें, त्याप्रमाणें वर्तनाचें नियमन करणारें असें कोणतेंच तत्त्व नसल्यापेक्षां विश्वासासारखें एखादें स्खलनशील तत्त्व असणें देखील इष्ट आहे. पण हें कोठपर्यंत ? अधिक चांगलें तत्त्व अस्तित्वांत आलें नाहीं तोंपर्यंत. तें आलें कीं जुन्या प्रमादी तत्त्वानें आपलीं राजचिन्हें श्रेष्ठ तत्त्वाच्या स्वाधीन केलीं पाहिजेत. हें सरळ अधिकारांतर येथून पुढें विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे, व तसें होण्यांतच मनुष्यतेस प्राप्त होण्यासारखें ऐहिक व पारमार्थिक सुख लौकर प्राप्त होऊं लागणार आहे, अशी आमची समजूत आहे, व ती तशी असल्यामुळें विश्वासावलंबी कल्पनांस आणि आचारांस विवेकाची आंच देऊन झाडून पहाणें, हें सुधारकाच्या अनेक कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य होऊन बसतें; आणि तें त्यानें अगदींच बजावलें नाहीं तर त्याच्या नांवास अयथार्थत्व येईल, असें वाटून प्रस्तुतचा कांहीं अंशीं अप्रिय असा विषय हातीं घेतला आहे.

सोंवळ्या-ओंवळ्याचा विधिनिषेध ब्राह्मणेतर जातींत नाहीं, तेव्हां आजचा विषय कांहीं अंशीं एकदेशीय आहे, असें म्हटलें पाहिजे. ... 'ब्राह्मण' शब्दांत ब्राह्मण व शूद्र यांच्या दरम्यान जितक्या पोटजाती ... व ज्यांनीं ही कटकट आपल्या पाठीमागें लावून घेतली आहे, त्या ... समावेश केला पाहिजे, हें उघड आहे. या विषयाच्या संबंधानें एका वि... व सुशिक्षित गृहस्थाशीं बोलत असतां त्यानें असें म्हणून दाखविलें ... आम्हा ब्राह्मणांच्या घरांत गैरसोय होण्यास मुख्य दोन कारणें होतात. जुन्या व निरुपयोगी वस्तु पिढ्यान्‌पिढ्या पोटाशीं धरून ठेवण्याची हौ... दुसरें सोंवळ्या-ओंवळ्याची रिपरीप! पहिल्या गोष्टीमुळें घरांत जागेची चण होऊन त्रास होतो; दुसरीमुळें बायकांचीं व पुरुषांचीं कामें ... वाढून कालहानि होते, व दुखण्याबाण्यांत कधीं कधीं फारच वाईट प... होतात. ह्या गृहस्थानें आमच्या सोंवळ्या-ओंवळ्याविषयीं असें मत त्यानें तें देतांना अर्थात् त्याच्या उपयोगीपणावर विशेष नजर दिली

हें सांगायला पाहिजे असें नाहीं. सोंवळें किंवा शुचिता आणि ओंवळे किंवा अमंगलता यांपैकीं पहिला गुण संग्रहणीय व दुसरा त्याज्य आहे, हें कोणाही समंजस मनुष्यास कबूल केलें पाहिजे, व शुचितेची हिंदुस्थानांतील सर्व वर्गांत जितकी वृद्धि होईल तितकी होणें इष्ट आहे. पण ह्या शुचितेचें आम्हीं जें प्रस्थ करून ठेवलें आहे त्या अर्थाची शुचिता आदरणीय आहे किंवा नाहीं, व तिच्यापासून फायदा आहे किंवा नाहीं, हें बरेंच विचारणीय आहे. ब्राह्मण लोकांचें स्वयंपाकघर व स्वयंपाकाचीं भांडीं; जेवणाचीं ताटें व पाणी पिण्याचीं भांडीं; मुखमार्जन व स्नानविधि; झाडणेंसारवणें, वगैरे गोष्टींत जी बरीच स्वच्छता दिसून येते ती इतर वर्गांनीं अनुकरण करण्यासारखी आहे; आणि ही नको असें म्हणणें म्हणजे महिषीवृत्तीविषयीं प्रेम प्रकटित करण्यासारखें होय. तेव्हां ज्या सोंवळ्याचा स्वच्छतेशीं संबंध आहे, तें सोंवळें रक्षणीय आहे. तसेंच जें ओंवळें म्हणजे अमंगलता तें त्याज्य आहे. पण यापलीकडे सोंवळ्या-ओंवळ्याचा बडिजाव करणें व तें धर्माची एक प्रचंड बाब करून ठेवणें म्हणजे व्यवहारांत नसत्या अडचणी उपस्थित करणें आणि वर्गावर्गांत सलोखा न होण्यासारखी अट घालून ठेवण्यासारखें होय. या अर्थाच्या सोंवळ्याचें मंडन विवेकदृष्ट्या करतां येणें अत्यंत दुर्घट आहे. केवळ दीर्घकालीन आग्रहाशिवाय त्याचा पाठपुरावा करतां येणार नाहीं. [illegible]ला विवेकाची कातरी लाविली कीं त्याच्या चिंधड्या होतात! शिवाय, [illegible] दिवसांच्या सलगीमुळें आम्हांस उघडपणें जरी त्याचा अनादर करवे[illegible] झाला आहे, तरी जेथें जेथें म्हणून त्याकडून व्यवहारांत विशेष अड[illegible] येते, तेथें तेथें आम्ही त्याला कांहीं तरी शास्त्रार्थ काढून धाब्यावर [illegible]वून ठेवतों. या संबंधानें आम्हांत व पूर्वपद्धतीच्या लोकांत वादस्थल [illegible]न येवढेंच आहे कीं, जेथें फार मोठी नड येईल तेथेंच सोंवळ्याचा [illegible]ढिला करावा असें ते म्हणतात; आमचें असें म्हणणें आहे कीं, ज्या [illegible] तो रक्षणीय असेल तेवढ्याशिवाय अन्य गोष्टींत आपण त्याची पर्वा [illegible]नये. जेवढें आवश्यक सोंवळें तेवढें ठेवावें असें आमचें म्हणणें आहे; [illegible]ज्यानें व्यवहार अत्यंत दुर्घट होतो तेवढेंच सोवळें काढून टाकावें, असें [illegible]द्धतीच्या लोकांचें म्हणणें आहे. हा मतभेद दिसण्यांत थोडा दिसतो, [illegible]प्रत्येक पक्ष आपापल्या मताप्रमाणें आचरण करूं लागेल तर त्यांत

जमीनअस्मानाचें अंतर पडेल. आमच्या समजुतीप्रमाणें खरकटें आणि निर्लेप; ओंवळ्यांतलीं धोतरें आणि मुकटे; लुगड्याला कुणब्याचा स्पर्श आणि पांढऱ्या कपड्याला कुणब्याचा स्पर्श; हरणाचें कातडें आणि इतर जनावरांचें कातडें— यांतील भेदाभेद उरत नाहीं. पूर्वपद्धतीच्या लोकांस हें आमचें म्हणणें बिलकूल पसंत पडावयाचें नाहीं. आमच्या युक्तिवादाचें खंडन त्यांस करतां येणार नाहीं, अशी आमची पक्की खातरी आहे. पण त्यांपाशीं जें एक हत्यार आहे तें आम्हांपाशीं नसल्यामुळें आमचें कांहीं चालत नाहीं. आम्हांकडे युक्ति आहे; त्यांच्याकडे रूढि आहे. पण रूढि ही शास्त्राहून बलीयसी आहे इतकेंच नाहीं, तर युक्तीहूनहीं ती प्रबलतर आहे. तथापि, पूर्वी ध्वनित केल्याप्रमाणें ज्याअर्थी, आज नाहीं उद्यां, युक्तीचा विजय होणार आहे, त्याअर्थी तरुण लोकांच्या हितासाठीं वृद्धांस अप्रिय असे लेख कधीं कधीं लिहिणें आम्ही आपलें कर्तव्य समजतों!

ज्यांना आपल्या सोंवळ्याओंवळ्याची हास्यास्पदता पहावयाची असेल त्यांनीं पुढील विशिष्ट उदाहरणांकडे किंचित् नजर फेंकावी. हरणाच्या कातड्यास पवित्र समजून आम्ही त्याचे तुकडे जानव्यांत घालतों. वृद्ध संन्यासी त्याचे जोडे करतात, व ते घालून ओंवळे न होतां पुढील जातात! पूजाब्रह्मयज्ञादि धर्मकर्मे करण्यास या कातड्यासारखी पवित्र आसनें नाहींत! या संबंधानें आमचा असा प्रश्न आहे कीं, हरणाच्या किंवा वाघाच्या कातड सच इतकी शुचिर्भूतता कोठून आली? ज्या गाईच्या मूत्रप्राशनानें आणि म लेपनानें आम्ही आपणांस श्रावणमासीं पुनीत करून घेतों त्या गाईच्या क ड्यांत हरणाच्या कातड्याइतकी पवित्रता कां नसावी? तसेंच, यज्ञांत ज्य मांस-भक्षण करून आम्हांस अनंत पितरांचा उद्धार करतां येतो, व कदाचि जन्ममरणाच्या क्लेशापासून सोडवणूक करून घेतां येते, त्या अजाच्या उत्त व कमावलेल्या कातड्यास हरणाच्या कातड्याइतकें पवित्र मानून संध्या कर्म करतांना त्याचीं आसनें कां वापरूं नयेत? आतां तंतुपटाच्या सोंवळ ओंवळ्याची थोडीशी चिकित्सा करूं. सध्यां यासंबंधानें सोंवळ्याच्या कल्पना रूढ आहेत, त्यांप्रमाणें नव्या धोतरास विटाळ नाहीं; कुणब्य स्पर्शानें धोतरें विटाळत नाहींत; क्षौर करून अंगरखा व पागोटें घाल

प्रत्यवाय नाहीं ! याप्रमाणें वनस्पतीपासून उत्पन्न होणाऱ्या तंतूंची हालहवाल आहे. या सदरांत कागद, बोटवाती, सूतपुतळ्या वगैरे कापसाच्या किरकोळ वस्तूंचा समावेश करण्यास हरकत नाहीं. शाईचा ठिपका पडला कीं कोरा कागद सोंवळा झाला ! जणुं काय या कृष्ण कलंकांतच शुचिर्भूतत्व आहे ! कुंकुमार्चनानें सूतपुतळ्या विधवांनीं सुद्धां सोंवळ्यांत वापरण्यासारख्या होतात. परटाकडील भाताची खळ लाविलेलीं चिरगुटें एका शितोडयानें शुद्ध होतात, हा एक सोंवळ्याचा चमत्कारिक प्रकार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे ! वास्तविक पहातां कृमिज तंतूंस किंवा जनावरांच्या लोंकरीपासून केलेल्या तंतूंस विशेष ओंवळेंपण चिकटलेलें असावें; पण त्यास कापसाच्या चिरगुटा-पेक्षां अधिक किंमत पडत असल्यामुळें त्यांचीं वस्त्रें कापसाच्या वस्त्रांहूनही शुद्ध होऊन बसलीं आहेत ! पीतांबराचें शुद्धत्व कशानेंच बिघडत नाहीं ! धाबळी तर सोंवळ्याची खाण होऊन बसली आहे ! हलक्या किंमतीच्या नित्य वापरण्याच्या मुकट्यांत व पीतांबरांत म्हणण्यासारखा फरक नसतां, एक दुसऱ्यापेक्षां अधिक शुद्ध ! अलीकडे वनस्पतिज तागी मुकटाही कृमिज मुकट्याशीं प्रतिस्पर्धा करूं लागला आहे ! ही वापरण्याच्या चिजांची स्थिति झाली. खाण्याच्या पिण्याच्या वस्तूंची दशाही यापेक्षां विशेष बरी आहे असें ...हीं. एका दृष्टीनें पहातां या खात्यांत जितका गोंधळ व जितकी असं-...ता आहे तितकी दुसरीकडे सहसा सांपडणार नाहीं ! हरभऱ्याची डाळ ...जवून वाटली, आणि तिची चटणी केली तर ती निर्लेप होऊन फरा-...स चालते ! पण तीच डाळ अगोदर भिजवून पाट्यावर न चिरडतां, ...गोदर जात्यात चिरडून मग तिच्या पिठांत पाणी घातलें कीं तें खरकटें ...लें ! त्याचें पिठलें मुकटा लावून घेतल्याशिवाय तोंडांत घालण्याची सोय नाहीं ! ...तुंजाकडच्या पोह्याकुरमुऱ्यासारख्या भाताच्या जाती राजरोसपणें खाण्यास ...हीं हरकत नाहीं ! पण बाजाराच्या भाजीभाताकडे किंवा पावबिसकुटांकडे ...णानें पाहाण्याची सोय नाहीं ! दवाखान्यांत कोणत्याही माणसानें कसलेंही ...ध दिलें तरी तें चालतें, पण ट्रेचरच्या दुकानचें लेमोनड किंवा सोडा-...र उघडपणें पिणें म्हणजे ब्राह्मण्याला हरताळ लावण्यासारखें होय ! आग-...नें किंवा साध्या गाडीनें प्रवास करतांना डब्यांतील दशम्यांस किंवा ...न अधिक मोलाच्या फराळास कशाचाही स्पर्श झाला तरी चालतो,

पण आपत्कालींही कुणबिणीनें केलेल्या भाकरीस स्पर्श करतां कामा नये! अशा प्रकारच्या खेकटीं किती म्हणून सांगावीं? याप्रमाणेंच मडकीं, चुली, मेणबत्त्या, साबणाच्या वड्या वगैरे दुसऱ्या प्रकारच्या वस्तूंचीही विलक्षण स्थिति आहे. यांपैकीं कित्येकांत चरबी असते हें ठाऊक असून त्या वापरण्याचा प्रघात पडत चालला आहे, व तसें करणें कोणासही वावगें दिसत नाहीं. अलीकडे व्हाइट मिक्श्चर, शापोटोचा बालकुक्कुटार्क व इतर मांसनिर्मित औषधें गुपचिपपणें घेण्याचा परिपाठ पडत आहे! असें असून ब्राह्मण्य जसेंच्या तसें कायम ठेवूं पहाणारांच्या धर्माभिमानास किंवा अविचारास काय म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. कसेंही झालें तरी थोड्या वर्षांत अशा प्रकारच्या सोंवळ्याओंवळ्याच्या संबंधानें बराच फेरफार होणार आहे व झाला पाहिजे, यांत शंका नाहीं. पण हा फेरफार बुद्धिपुरःसर प्रयत्न केल्याशिवाय हवा तसा व लौकर होण्याचा संभव नाहीं.

---

## सोंवळ्याओंवळ्याची पुरवणी : : : ५

### सीतोदकं च वह्निश्च नान्यतः शुद्धिमर्हतः।

एक पस्तीस वर्षांची विधवा काशीस जात होती. तिकिट थेटचें काढलें असल्यामुळें व किती मैल प्रवास झाल्यावर एक दिवसाची विश्रांति घेतां येते, हें ठाऊक नसल्यामुळें पुण्यास गाडींत पाय ठेवल्यापासून काशीच्या स्टेशनावर उतरेतोंपर्यंत या बाईनें सारा वेळ डब्यांत काढला! खांडव्याच्या पुढें गाडी जाऊन दक्षिणेकडील लोकांची गर्दी कमी झाल्यावर, तिनें असा विचार केला कीं, आतां पोटमार करण्यांत काय हांशील आहे! बोलूनचालून पापक्षालनाकरितां आपण काशीविश्वेश्वराच्या दर्शनार्थ चाललों आहों; तेव्हां ज्याच्या दर्शनेंकरून आपल्या हातून आजपर्यंत घडलेल्या पापांचा लय होणार, त्याला क्षुधेच्या त्रासानें आगगाडींत केलेल्या फराळापासून उत्पन्न होणाऱ्या पापाचें निरसन करण्यास अवघड पडणार आहे काय! हा तर्क मनांत येतांच, तिनें आपला मुकटा उभा लावून घेतला,

आणि बरोबर घेतलेल्या भाजणीच्या दशम्या आणि लोणचें यांचा फडशा करण्यास आरंभ केला! ही गोष्ट ज्या यात्रेकरूंनीं प्रत्यक्ष पाहून आम्हांस सांगितली, त्यांशिवाय इतरांस खरी सुद्धां वाटणार नाहीं; व आम्हांस देखील ती खरी न वाटती, पण ज्यांच्याकडून ती आम्हांस आली त्यांच्या सत्यपणाबद्दल कधींच शंका घेतां येणार नाहीं, अशा आप्तांकडून ती आम्हां-पर्यंत आली आहे. असो; या गोष्टीनें या विषयावरील या दुसऱ्या लेखाचा आरंभ करण्यांत इतकाच हेतु आहे कीं, आजमित्तीस सोंवळ्याचें संरक्षण करण्याची मुख्य जबाबदारी जरी आम्हीं स्त्रियांवर, व त्यांतूनही तारुण्यातीत विधवांवर, टाकिली आहे, तरी त्याही आपत्काल प्राप्त झाला असतां या प्रतिबंधाचा पीळ थोडासा सैल करण्यास मागेंपुढें पहात नाहींत! पण ही संकटावस्थेंतील गोष्ट झाली. अशी अडचण नसूनही, धर्माभिमानी म्हणव-णाऱ्या उच्च वर्गांतील स्त्रियांनीं व पुरुषांनीं सोंवळ्याओंवळ्याची अशी बज-बजपुरी करणें योग्य आहे काय? आम्हीं असा प्रश्न येथें घालणें बरोबर नव्हतें. पण आम्हीं असें ऐकतों कीं, या विषयावरील आमचा पहिला लेख लिहून गेल्यापासून कांहीं सोंवळी मंडळी आमच्यावर फारच खप्पा होऊन गेली आहेत व त्यांचें असें म्हणणें आहे कीं, त्या लेखांत दिलेलीं उदाहरणें आमच्या सोंवळ्याओंवळ्यांतील असंबद्धता सिद्ध करण्यास पुरेशीं नाहींत! हा दोषारोप खरा असेल तर त्यावर आमचें येवढेंच उत्तर आहे कीं, जें म्हणून जुनें आहे त्यावर कंटाळा येण्यासारखी टीका करीत बसणें हें आम्ही आपलें कर्तव्य समजत नाहीं. जुन्या आचारांवर जी टीका करावयाची ती त्यांचें अनुसरण करणारांस राग उत्पन्न करण्यासाठीं नव्हे, तर त्यांत जी असंबद्धता असेल ती त्यांच्या नजरेस आणून ती त्यांनीं दूर करण्याचा प्रयत्न करावा, व निर्दोष अशा नवीन आचारांचा स्वीकार करावा, यासाठीं होय; आणि या विषयावरील ही आजची पुरवणी काढण्याचा, व तींत जीं आणखी उदाहरणें दिलीं आहेत तीं देण्याचा दुसरा कोणताही हेतु नाहीं. जे कोणी या सोंवळ्याओंवळ्याच्या प्रश्नांत आपलें मन नीटपणें घालतील त्यांना या अडचणीमुळें आमच्या देशाचारांत प्रचंड विचारशून्यता ओतप्रोत भरून चालली आहे, असें कबूल केल्याशिवाय राहवणार नाहीं. ब्राह्मण लोक इतर जातींच्या हातचें पाणी पीत नाहींत, असें म्हणतात! आमचें असें म्हणणें आहे कीं, थोडा विचार

केला असतां ते तशा प्रकारचें पाणी पितात असें दाखवितां येईल इतकेंच नाहीं, तर एका प्रकारच्या जड पदार्थाचेंही सेवन करतात असें दाखवितां येईल. कोळ्याच्या किंवा तांबोळ्याच्या घरचा ओला चुना ज्यांनीं कधींही खाल्ला नाहीं, असे शुचिर्भूत ब्राह्मण किती सांपडतील ? गवळ्याच्या घरचें दूध न घेणारे किती ब्राह्मण निघतील ? तथापि गवळ्याच्या दुधांत पाणी पडतें, अशी कुरकुर ज्यांनीं कधींही केली नाहीं अशांची संख्या किती भरेल ? पण हेंही असो. मुंबईपुण्यासारख्या शहरांत ब्राह्मणमराठ्यांसाठीं अंगास अंग लागलेल्या ब्रह्मी जुळ्यांसारखे हौद किंवा तोट्या आहेत. या हौदांतील पाणी एकमेकांत यथेच्छ खेळत असतें; मात्र ज्या द्वारानें तें खेळत असतें तें द्वार सहसा दृष्टीस पडण्यासारखें नसतें. यामुळें आज कित्येक वर्षें दगडाच्या एकाच भांड्यांतून पाणी भरीत असतां, त्यांस आपण तें निरनिराळ्या सांठवणांतून भरीत आहों, असें वाटून सर्व उदकव्यवहार यथास्थितपणें चालला आहे ! ही सपाटीवरच्या पाण्याची गोष्ट झाली. धरण धरलेल्या किंवा तलाव केलेल्या ठिकाणाहून स्वयंपाकघराच्या मोरीपर्यंत पाणी येऊन पोचेंपर्यंत त्यास जागोजाग किती प्रकारच्या उदकाभेद्य द्रव्यांतून जावें लागतें, याचा कोणी कधीं विचार केला आहे काय ? रबर, कातडें, चरबी वगैरे निषिद्ध वस्तूंच्या साहाय्याशिवाय तोट्याचें पाणी दूरवर नीटपणें जात असेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि बूच फिरविला कीं पाणी पडूं लागण्यांत मोठी सोय व सुख असल्यामुळें, परंपरेनें घडलेल्या कातड्याचा संयोग, किंवा सूक्ष्मरूपानें मिसळून आलेले चरबीचे कण यांविषयीं विशेष चिकित्सा न करणें हें खऱ्या धर्माभिमान्यांस योग्य वाटूं लागलें आहे ! तसेंच, न्हाव्यांनीं किंवा गुरवांनीं आणलेल्या रसाच्या केळ्यांतील रस व महारांनीं आणिलेल्या उसाच्या मोळींतील ऊंस यांचा निःशंकपणें अंगीकार करणें हें तरी खऱ्या ब्राह्मणधर्मानुयायांस योग्य आहे काय ? तसेंच लसूण, कांदा वगैरे पदार्थास अत्यंत निषिद्ध मानणाऱ्या शुचिर्भूत ब्राह्मणांनीं हिंग, साबूदाणा, साखर, मीठ वगैरे पदार्थ तयार होऊन वाण्यांच्या दुकानांत येऊन पडततोंपर्यंत, त्यांचा किती अमंगल पदार्थांशीं संयोग घडत असतो, हें ठाऊक असूनही मोठमोठ्या उपवासांत व श्राद्धपक्षास त्यांचा बिनदिक्कत उपयोग करावा, हें केवढें आश्चर्य आहे ! तसेंच, मुळांच्या भावल्या, डोकीस

घालण्याच्या पगड्या, जिनें, खोगरें, खळ, पुस्तकें, जोडे वगैरे नित्य वापरण्याच्या वस्तु कोण तयार करितो, त्यांचे घटक काय आहेत, व त्यामुळें सोंवळ्याओंवळ्याची केवढी हानि होत आहे, याचा एक दिवस तरी कोणीं नीट विचार केला आहे काय ? सर्वांपेक्षां जोडयांची गोष्ट विशेष आश्चर्य करण्यासारखी आहे. जोडे मेलेल्या किंवा मारलेल्या जनावरांच्या कातडयाचे केलेले असून, कातडयाच्या किंवा सुताच्या दोरांनीं चांभारांनीं शिवलेले असतात, हें सर्वप्रसिद्ध आहेच ! या जोडयांचा आमचा सकाळ संध्याकाळ नित्य सहवास असतो ! पण चमत्कार हा कीं, हा सर्वोपयोगी पदार्थ तयार करणारे चर्मकार अपवित्रतेची खाण होऊन बसले आहेत ! यांच्या हातांतील जोडे घेतांना 'अरे दुरून टाक, दूर हो, विटाळ करशील', अशी एकच ओरड करून दिली पाहिजे ! मेलेल्या किंवा मारलेल्या जनावराच्या कातडयापेक्षां जिवंत मनुष्य विशेष अस्पर्श काय ? पण धर्मसंबंधांत विचार करतो कोण ? कुत्र्याप्रमाणेंच मांजरेंही मांसभक्षक आहेत; पण एकाला जेवणाचे ताटापाशीं घेऊन बसावयाचें, व चित्रावती खाऊं द्यावयाच्या, आणि दुसऱ्याला ओटीची पायरीच चढूं द्यावयाची नाहीं. केवढा हा पक्षपात ! कुत्रीं इमानानें नौकरी करतात, आणि मांजरें लहान मुलांच्या तेलकट वाळू चाटतात व चावतात म्हणून तर हा पक्षपात नसेलना ? हेंही असो; प्रत्येकास सकाळसंध्याकाळ परसांतल्या अमंगळ स्थानीं कांहीं वेळ काढणें भाग पडतें ! त्या ठिकाणीं असतां इकडून तिकडे व तिकडून इकडे घोंगवणाऱ्या धर्मभ्रष्ट माशांस दंड करण्याचा विचार कोणाच्या मनांत कधीं तरी येतो काय ? धारवाडाकडे धुतलेलें वस्त्र नेसलें असतां त्यावर कसलाही व्यवहार केला तरी तें ढुंगणाचें सुटेपर्यंत ओंवळें होत नाहीं, असें म्हणतात. वऱ्हाड खानदेशाकडे बाळंतिणीची पहिल्या बारा दिवसांतील कांहीं सेवा मांगिणीकडून करून घेण्याचा परिपाठ आहे, असें जें म्हणतात, तें जरी चुकीचें मानिलें तरी आपल्या इकडील बायकांचा तीन चार महिने कुणबिणीशीं हरएक प्रकारचा व्यवहार होत असतो, ही गोष्ट कोणालाही नाकबूल करितां येणार नाहीं ! या पुनः पुनः बाटणाऱ्या बायका पुनः पुनः सोंवळ्या कशा होतात, हें समजणें किंचित् कठीण आहे ! एखाद्या ब्राह्मणपुरुषानें दर दोन वर्षांत चार महिने अन्नोदकादि सर्व व्यवहार कुणबिणीशीं करावयाचे असें ठरविलें

तर चालेल काय ? पुरुषाला बाळंत व्हावयाचें नाहीं, हें आम्ही कबूल करितों ! पण बायकांना बाळंत व्हावयाचें असतें, म्हणून शूद्रांशीं व्यवहार केल्यानें त्या धर्मभ्रष्ट होत नाहींत, असें कसें म्हणतां येईल ? तसेंच, नगराकडे ब्राह्मण, शूद्र, मुसलमान वगैरे एकत्र पाणी भरण्याचा जो परिपाठ आहे तो, किंवा कोंकणपट्टींतील कांहीं भागांत थोड्या सवडीनें कुणब्याच्या हातचें पाणी घेण्याचा परिपाठ आहे तो, किंवा उत्तरहिंदुस्थानांत व आणखी कांहीं ठिकाणीं ब्राह्मणांनीं शूद्राचे हातचें पाणी निःशंकपणें वापरण्याचा जो परिपाठ आहे तो, शुद्ध ब्राह्मण्यास धरून आहे, असें कसें म्हणतां येईल ? या आचाराहूनही दुसरे आचार आहेत ते विशेष गमतीचे आहेत ! कथाकीर्तनांत न्हाव्याकडे मशाली धरण्याचें व दिवे साफ ठेवण्याचें काम राजरोसपणें सांगविण्यांत येतें ! अशा प्रसंगीं देवाच्या देवळांत शास्त्री-वैदिकांच्या रांगांमधून प्रशस्तपणें फिरण्याची त्यांस सनद आहे ! लग्नकार्यांत तर सोंवळ्याची समिधच शेकलेली असते ! देवक बसल्यापासून तें उठेतोंपर्यंत लग्नगृहांत ओंवळ्याला थारा नाहीं ! तसेंच नौकेंत, राजदरबारांत, व बाजारांत जो समाज जमतो, त्यामुळें ओंवळें इतकें पातळ होऊन जातें कीं, त्याचा निदान अलीकडे तरी कोणासही विधिनिषेध वाटेनासा झाला आहे !

या सर्व आचारांचा येथें उल्लेख करण्यांत येवढाच हेतु आहे कीं, आमच्या लोकांनीं हिंदु समाजांतील खालच्या वर्गांतल्या लोकांच्या ठायीं जी इतकी अपवित्रता व अस्पर्श्यता मानिली आहे ती कितपत सयुक्तिक आहे, याचा विचार करूं लागावें. अतिशूद्रादि लोक साहेब लोकांच्या नौकरीस रहातात; साहेब लोक आम्हांस अस्पर्श्य नाहींत; असें असूनही अतिशूद्राला स्पर्श करण्यास आमची छाती होत नाहीं, हा कोण व्यामोह ? तसेंच एका दृष्टीनें मुसलमान लोक हिंदूंतील कोणत्याही अतिनीच वर्णापेक्षां विशेष अस्पर्श्य आहेत, असें मानणें भाग आहे; कारण कोणताही हिंदु गोवध करून त्या मांसावर उपजीविका करीत नाहीं. मुसलमानास व युरोपिअनास तसें करण्यास प्रत्यवाय नसून म्हार, मांग, धेड, ढोर वगैरे हिंदूंपेक्षां ते आम्हांस पवित्र व स्पर्श्य वाटतात; त्यांच्याशीं आम्ही हरएक प्रकारचा बाह्य व्यवहार करतों; त्यांचीं व आमचीं मुलें एका शाळेंत व एका वर्गांत शिकतात; आणि ते व आम्ही सभांत, कौन्सिलांत, व कॉंग्रेसांत 'शेकहांड'

करतों, व एकत्र बसतों उठतों. असें असून कांहीं हिंदु जाति आम्हांस इतक्या अस्पर्श्य वाटाव्या हें नवल नाहीं काय ? या सर्व आचारांत विचाराचा भाग किती स्वल्प आहे बरें ? कोणी असें म्हणतील कीं म्हार, ढोर वगैरे जातींचे लोक जो निंद्य आहार व आचार करतात त्यामुळें त्यांस अस्पर्श्य मानणें स्वाभाविक आहे. असें असेल तर या आक्षेपावर फार सोपें उत्तर आहे. क्षणभर अशी कल्पना करा कीं, ढोर, भंगी, महार, धेड, व चांभार यांनीं आपापले धंदे कांहीं वेळ न करण्याचा कट केला, तर स्वतःस उच्च मानून घेणाऱ्यांची काय अवस्था होईल ? सारें उच्चनीचत्व एकीकडे ठेऊन प्रत्येक कुटुंबाला आपल्या घरांतील घाण कशी तरी काढावी लागणार नाहीं काय ? वासरूं किंवा रेडकूं मेलें असतां, तें आपण होऊन गांवाबाहेर ओढून नेऊन टाकावें लागणार नाहीं काय ? समाजाच्या विलक्षण रहाटीमुळें उच्चनीचत्व अस्तित्वांत येऊन तदनुसार जो व्यवसायविभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गांत जन्मास आलेल्या लोकांनीं नीच वर्गांत जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पर्श्य मानणें, याहून मनुष्याच्या विचारीपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाहीं. ' न वदेत् यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि ' येवढा ज्या महंमदीयांविषयीं आम्हांस तिरस्कार होता, त्या गोहत्या करणाऱ्या म्लेंछांचें व तत्समान युरोपिअनांचें, राज्याधिकारामुळें, आम्हांस कांहींच वाटेनासें होऊन, ज्यांना वैदिक धर्म शिरसावंद्य, ज्यांचा धर्म व आचार हिंदू, जे अनादि कालापासून हिंदुस्थानचे रहिवासी, ज्यांच्या हातून गोवध होत नाहीं, ज्यांना मदिरापानादि मनुष्यतेचा भ्रंश करणाऱ्या व्यसनांचा म्हणण्यासारखा नाद नाहीं, अशा हिंदूंचा आम्ही तिरस्कार करतों; त्यांना स्पर्श करण्यास भितों, आणि त्यांहून अनेक कारणांमुळें अस्पर्श्य अशा परकीयांस दृढालिंगन देतों, हा केवढा प्रमाद होय ! यावरून कोणीं असें समजूं नये कीं, हिंदूंतील श्रेष्ठ जातींनीं नीच हिंदूंप्रमाणें परकीयांचाही तिरस्कार करूं लागावें, असें आमचें म्हणणें आहे; आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, त्यांनीं वरच्यांशीं निदान परकीयांप्रमाणें तरी वागण्यास मागें पुढें पाहूं नये.

## [ व्यापारवृद्धि ]

आपल्या भाषेंतील 'व्यापार' शब्द अत्यंत व्यापक आहे. शरीराच्या व मनाच्या कोणत्याही चलनावस्थेस व्यापार म्हणतात. 'व्यापारा'च्या या मूळ अर्थापासून बाकीचे अर्थ निघालेले आहेत. सांप्रत निबंधावलींत त्याचा सार्वत्रिक अर्थ घेऊन तत्संबंधानें कांहीं विचार वाचकांपुढें आणण्याचा इरादा आहे.

ज्यांनीं सामाजिक स्थित्यंतरांचा लक्षपूर्वक विचार केलेला नसतो, त्यांस असें वाटत असतें कीं, मृगयेवर चरितार्थ करून राहणारे रानटी लोक, पशुपालन किंवा कृषिकर्म करून राहणाऱ्या लोकांपेक्षां विशेष उद्योगी असतील. पण ही त्यांची चुकीची समजूत आहे. मांस, स्तन्य, आणि धान्य हीं मनुष्यांच्या उपजीविकेचीं मुख्य साधनें होत. यांपैकीं कोणत्याही एकावर, दोहोंवर किंवा साऱ्या तिहींवर मनुष्यास आपला चरितार्थ करतां येतो. शिकार करणें, मेंढरें, गाई, म्हसे, कोंबडीं, डुकरें वगैरे जनावरें पाळणें व दूधदुभतें करणें, आणि जमीन तयार करून तींत धान्य, भाजीपाला व फळफळावळ उत्पन्न करणें—या तीन गोष्टींपैकीं पहिलीपेक्षां दुसरीस व दुसरीपेक्षां तिसरीस, अधिक श्रम, अधिक आत्मसंयमन व अधिक दूरदृष्टि लागतात, हें सहज समजण्यासारखें आहे. तेव्हां ज्या लोकांत उपजीविकेचीं हीं तिन्ही साधनें अस्तित्वांत आलीं असून त्यांची आवश्यकता पडूं लागली असेल, ते लोक पहिल्या, किंवा पहिल्या आणि दुसऱ्या साधनानें उपजीविका करणाऱ्या लोकांपेक्षां अधिक उद्योगी असले पाहिजेत, हें उघड आहे.

मनुष्याशिवाय इतर प्राण्यांपैकीं कांहीं केवळ मांसाहारी, कांहीं केवळ उद्भिज्जाहारी व कांहीं मांसोद्भिज्जाहारी असे आहेत. फक्त मनुष्य मात्र या तीन प्रकारांच्या आहारांपैकीं पाहिजे तो आहार करून राहूं शकतो. पण जसजशी त्याला उन्नतावस्था येत जाते, तसतसा त्याचा मांसाहार कमी होत जाऊन उद्भिज्जाहार वाढूं लागतो व शेवटीं तो केवळ उद्भिज्जाहारी होईल किंवा होणें त्यास भाग पडेल, असें कित्येकांचें मत आहे. पण येथें आपणांस त्याची चर्चा करीत बसण्याची गरज नाहीं. येथें इतकेंच ध्यानांत

ठेविलें पाहिजे कीं, मनुष्याशिवाय इतर प्राण्यांचे जे तीन वर्ग आहारभेदावरून वर केले आहेत, त्यांपैकीं कोणत्याही वर्गातील प्राण्यास आपलें भक्ष्य 'गोपालवृत्ती' चें किंवा 'कृषीवलवृत्ती' चें अवलंबन करून संपादितां येत नाहीं. अशा रीतीनें आपला चरितार्थ करण्याची बुद्धि व सामर्थ्य फक्त मनुष्यांतच आहे. मनुष्याशिवाय इतर प्राणिसंख्येची वृद्धि नैसर्गिक प्राण्युत्पत्तीवर व भूमिगत उद्भिज्जोत्पत्तीवर अवलंबून असते ती कमी झाली कीं त्यांची संख्या कमी होते व अधिक झाली कीं, अधिक होते. मनुष्याची तशी गोष्ट नाहीं. त्याच्या शरिराच्या व मनाच्या विशिष्ट रचनेमुळें त्याला आपल्या उपजीविकेस लागणाऱ्या वस्तु हव्या तितक्या उत्पन्न करतां येतात. यामुळें मनुष्यांची संख्या आणि त्यांस लागणारें अन्न हीं एकसारखीं वाढत आहेत.

मनुष्यांत व इतर प्राण्यांत दुसरा आणखी एक भेद आहे तो हा कीं, मनुष्यांची उपभोगेच्छा इतर प्राण्यांच्या उपभोगेच्छेसारखी मर्यादित नाहीं. इतर प्राण्यांस उदरपोषण आणि सजातिवर्धन यांशिवाय इतर सुखांची कल्पनाही नसते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें त्यांच्या या दोन क्षुधांचें समाधान होत असलें म्हणजे ते सुखी असतात. मनुष्यांची तशी गोष्ट नाहीं. इतरांप्रमाणें या दोन क्षुधांची पीडा त्यांच्या पाठीमागें लागली असून, शिवाय त्यांस अनेक प्रकारचे मानासिक व शारीरिक उपभोग घेतां येण्यासारखीं मनें व शरीरें प्राप्त झालीं आहेत, व या अनेकविध उपभोगांकडे त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति आहे. हे अनेक उपभोग घेण्याचें त्यांचे अंगीं जें सामर्थ्य आहे त्यामुळें ते इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी आहेत किंवा नाहींत हा वादग्रस्त प्रश्न आहे, व याचें समाधानकारक उत्तर देतां येईल असेंही वाटत नाहीं. थोड्या वासना आणि थोडी तृप्ति व पुष्कळ वासना आणि पुष्कळ तृप्ति—या दोन स्थितींपैकीं इष्टतर कोणती, याचा निर्णय करण्यास कोण समर्थ होणार आहे? या वादांत समंजस मनुष्यानें कधींही पडूं नये. मनुष्यास विचार करतां येऊं लागल्यापासून, कांहीं पहिला, व कांहीं दुसरा, पक्ष घेऊन भांडत आहेत, व तदनुरोधानें निवृत्ति व प्रवृत्ति असे दोन विचार व आचारपंथ झाले आहेत. फलमूलाशन करून रहावें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वतांच्या गुहांत वास करावा, आणि संसाराच्या मान-

गर्तेत पडूं नये, असें निवृत्तिपंथाचे प्रचारक आज शेंकडों वर्षें सांगत असतां, व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिकाधिक जात चाललें आहे. तेव्हां सामान्य विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, अनेक उपभोग भोगल्यापासून मनुष्य इतर प्राण्यांपेक्षां अधिक सुखी होवो किंवा न होवो, त्या गोष्टीचा निर्णय करण्याच्या भरीस मुळींच न पडतां, अनेक उपभोगांची वांच्छा करावी, ते प्राप्त होण्यासाठीं रात्रंदिवस झटावें, आणि त्यांपासून होईल तितकें सुख करून घ्यावें, असा मनुष्यांचा सामान्य स्वभाव आहे, व याच स्वभावामुळें मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या वर्तनांत इतकें अंतर पडलें आहे.

मनुष्यांच्या आहारवस्तु कष्टसाध्य आहेत व त्यांची उपभोगेच्छा अमर्याद आहे, येवढ्या दोन गोष्टी स्पष्टपणें ध्यानांत आल्या म्हणजे त्यांस इतर प्राण्यांपेक्षां शेंकडोंपट अधिक उद्योग कां केला पाहिजे, हें सहज समजणार आहे. हें ज्यास पक्कें समजून येईल तो सहसा निरुद्योगी होणार नाहीं. याशिवाय निरुद्योगी लोकांस उद्योगी लोकांच्या वश होऊन किती त्रास सोसावा लागतो, हें ज्यास कळलें असेल तो तर स्वतः उद्योगी होईल इतकेंच नाहीं, तर इतरांसही उद्योग करण्यास प्रवृत्त करील. विशेष उद्योगी मनुष्यांचें सान्निध्य नसल्यास सामान्य उद्योग करून आयुष्य घालविणें शक्य आहे. पण कोणत्याही कारणानें उद्योगी मनुष्याशीं गांठ पडल्यास, एक तर त्याच्याप्रमाणें उद्योग करण्यास, किंवा त्याच्या अधीन होऊन तो ठेवील त्या स्थितींत राहण्यास, तयार झालें पाहिजे. सध्यां आम्हां निरुद्योगी हिंदु लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशीं गांठ पडली आहे. तेव्हां एक तर आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झालें पाहिजे, किंवा ते ज्या स्थितींत ठेवतील त्या स्थितींत राहण्यास सिद्ध असलें पाहिजे. आमचें भावी स्वातंत्र्य, अथवा आमचें निरंतर दास्य, सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे.

मनुष्यांच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणीत मानसिक व शारीरिक चलनावलनांचे दोन भेद आहेत. एक नियामक व दुसरा उत्पादक. नियामक उद्योग म्हणजे ज्या उद्योगामुळें मनुष्यांस आपल्या समाजांत व्यवस्था ठेवतां येते. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलीस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे

लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे; म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत. शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागीर व धंदेवाले लोक दुसऱ्या वर्गांत येतात, म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील कांहीं लोक पहिल्या प्रकारचा, कांहीं दुसऱ्या प्रकारचा, व कांहीं दोन्ही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणें या निरनिराळ्या वर्गांतील लोकांचें प्रमाण कमी अधिक होत असतें. केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते, तो विशेष सुखी असतो. अमेरिकेंत सध्यां अशी स्थिति आहे त्यामुळें तेथील लोक इतर देशांतील लोकांपेक्षां प्रत्येक बाबतींत फार पुढें सरसावले आहेत. अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचें जणुं काय वेड लागून गेलें आहे, व त्यामुळें संयुक्त संस्थानें इंद्रलोकतुल्य होऊन गेलीं आहेत. या संस्थानांच्या खालोखाल इंग्लंड व फ्रान्स हे देश आहेत. सगळ्याच देशांतील लोकांस सारखा उद्योग करण्याचीं स्वाभाविक व कृत्रिम साधनें असतील, व साऱ्यांस सारखें वैभव प्राप्त करून घेतां येईल, असें आमचें म्हणणें नाहीं. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक आहे कीं, कोणत्याही देशांतील लोकांस प्राप्त होण्यासारखें जें सुख असेल तें त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीनें उद्योग केल्याशिवाय कधींही प्राप्त होणार नाहीं. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व कांहीं हौस असली तर नियामक उद्योगाची—असे लोक मोठेपणास कधींही चढणार नाहींत. पण सध्यां तर आमची तशी स्थिति होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हावयाला पाहिजे. सगळ्यांनींच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यावर चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ति व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करतां येणार? अंमलदार मुळींच नकोत असें आमचें म्हणणें नाहीं. पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ अशी स्थिति काय कामाची? १७८९ सालीं फ्रान्स देशांत जी मोठी राज्यक्रांति झाली तिच्या अनेक कारणांपैकीं फाजील अंमलदार हें एक मुख्य कारण होतें. जिकडे तिकडे अंमलदारांचा सुळसुळाट होऊन गेल्यामुळें

देशांतील वार्षिक संपत्तीचें उत्पन्न अगदीं संपुष्टांत आलें होतें इतकेंच नाहीं, तर जे थोडे उत्पादक लोक काबाडकष्ट करून थोडी बहुत संपत्ति उत्पन्न करीत, त्यांवर पराकाष्ठेचा जुलूम होऊं लागला होता. अंमलदार वाजवीपेक्षां अधिक झाल्यानें उत्पादक रयतेचें दोन प्रकारांनीं नुकसान होतें. एक, त्यांच्या पगारासाठीं तिला आपल्या प्राप्तीचा बराच वांटा द्यावा लागतो. दुसरें, त्यांच्या जुलमामुळें केलेलें उत्पन्न आपल्या हातीं लागेल किंवा नाहीं, अशा-विषयीं तिला संशय येऊं लागतो. या दोन कारणामुळें उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसें झालें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होतें. हाच परिणाम सरकारी अंमलदारांशिवाय इतर प्रकारचें अनुत्पादक लोक वाढल्या-नेंही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीतिप्रसारक, फाजील शिक्षक, फाजील अडते, फाजील लेखक ( पत्रकर्ते, पुस्तककर्ते, वगैरे ), फाजील वकील, फाजील राजकारस्थानी या सर्वांच्या फाजीलपणांत, म्हणजे त्यांची वाजवीपेक्षां जास्त संख्या होण्यांत, कष्टाळू रयतेचा फार तोटा आहे. अशा प्रकारचे लोक मुळींच नसावेत, असें आमचें म्हणणें नाहीं. तसें झाल्यास समाज मुळींच सुरळीत चालावयाचा नाहीं. पण त्यांचें कमीपण त्याला जितकें विघातक आहे तितकें त्यांचें अधिकपणही विघातक आहे. आमच्या इक-डील अलीकडल्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेविल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे बरें! हाडांचीं काडें करून, व शेंकडों रुपये खर्च करून, बी. ए. पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढें फळ काय? तर रेव्हिन्यू खात्यांत, किंवा शाळाखात्यांत, ३०।३५ रुपये दरमहाची नोकरी! चांगला सुतार मुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५।३० रुपये सहज मिळवितो, हें या ग्राजुएटांस समजूं नये काय! तसेंच कोठें १०।१२ रुपयांची जागा रिकामी झाली कीं, तीबद्दल शेंपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज! धिक् तुमची विद्या आणि तुमचें कर्तृत्व! कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा स्वस्त विक्रय करावयाचा काय! विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वतः-च्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आतां कोठें राहिली आहे!

गेल्या शुक्रवारच्या ग्रहणासारखी पर्वणी आली म्हणजे आमच्या समाजांत जी चलबिचल होऊन जाते, विशेषतः वरिष्ठ वर्गांतील अशिक्षित पुरुषांची व स्त्रियांची जी धांदल उडून गेलेली असते, ती पाहून आमच्या बुद्धीचें ग्रहण अद्यापि सुटलें नाहीं, असें कोणत्याही विचारी पुरुषास वाटणार आहे. अशा प्रसंगीं अगदीं अज्ञ लोकांचें वर्तन जसें व्हावें तसें आमचें वर्तन होत असतें. ज्या रानटी लोकांस सूर्य एका दिशेनें येऊन दुसऱ्या दिशेनें निघून जातो कसा; चंद्राच्या बिंबास क्षय व वृद्धि कशानें होते; एकाएकीं सूर्याच्या व चंद्राच्या भोंवतीं खळीं पडतात कशीं; उदककणवाही अभ्रांनीं आकाश व्यापृत झालें असतां, किंवा ईषत् वर्षाव होऊं लागला असतां, आकाशांतील ज्या प्रदेशांत सूर्य असेल त्याच्या उलट प्रदेशांत नाना तऱ्हेच्या रंगांची विशाल धनुराकृति कशी पडते; शुक्रासारखे कांहीं ग्रह कांहीं महिने क्षितिजापासून वर येत असल्यासारखे दिसत असून पुनः खालीं कसे उतरूं लागतात, व कांहीं दिवसांनीं मुळींच दिसेनासे कां होतात; आकाशस्थ कांहीं तारे परस्परांमधील अंतर कधींच बदलीत नाहींत, व कांहीं आज या तारकासमूहापाशीं, उद्यां त्या तारकासमूहापाशीं, अशीं एकसारखीं स्थानांतरें करीत असतात, याचें कारण काय; सूर्यप्रकाशांत उभें राहिलें असतां पडणारी छाया साऱ्या वर्षभर सारखी कां पडत नाहीं; तेजोमय शिखा किंवा पुच्छ असलेले असाधारण प्रचंड तारे एकाएकीं कोठून येतात, व थोडे दिवस दिसत राहून, मग नाहींसे कसे होतात, आणि इतर ताऱ्यांप्रमाणें फिरून लौकर कां दिसत नाहींत; एखाद्याच्या गळ्यांतील मौक्तिकहार तुटून पडावा, त्याप्रमाणें नभोमंडलांतील तारकहार त्रुटित होऊन, त्यांतील मध्य मणि अनेक दिशांस विदारल्यासारखे कशामुळें दिसतात; भलत्याच ठिकाणीं एखादे वेळीं उपलवृष्टि कशी होते; मोठमोठीं वादळें कशीं सुटतात; डोक्यावरील अफाट पोकळींत पाणी जमतें कसें, आणि पर्जन्यधारा येतात कोठून; चंद्र व सूर्य नित्याप्रमाणें शांतपणें आकाशपंथ आक्रमीत असतां, एकाएकीं त्यांच्या तेजाचा अपहार करून मनुष्यलोकांस कधीं गाढ तिमिरांत, व कधीं अर्धवट संध्येंत, चाचपण्यास कोण लावतो—वगैरे प्रश्नांचें समाधान.

कारक उत्तरें देतां येणें अशक्य असल्यामुळें, त्यांनीं आश्चर्यजनक दृग्विपर्या-विषयीं हवे तसे तर्क लढवून, त्यासंबंधानें आपल्या शोधक मनाची हवी तशी समजूत घालून घ्यावी, आणि त्या समजुतीच्या अनुरोधानें आचरण करावें, हें त्यांच्यासंबंधानें अगदीं स्वाभाविक आहे, व त्याबद्दल त्यांस अणुमात्र दोष लावतां येणार नाहीं; कारण तसें केल्याखेरीज त्यांस गत्यंतरच नाहीं. पण ज्या लोकांस या विषयांचें खरें ज्ञान झालें आहे, त्यांनींही त्यांच्याप्रमाणेंच वर्तन करणें म्हणजे अमूढ असून मूढाप्रमाणें आचरण करणें होत नाहीं काय ? कोणी असें म्हणतील कीं, ज्योतिःशास्त्राचें ज्ञान अद्यापि जितकें पसरावें तितकें पसरलें नाहीं, त्यामुळें सध्यांचा वेडेपणाचा प्रकार दृष्टीस पडतो. या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, कोणत्याही विषयाच्या संबंधानें कितीही ज्ञान वाढलें, व लोकांत त्याचा कितीही प्रसार झाला, तरी जुन्या पद्धति सोडून देऊन तदनुसार नव्या पद्धतीनें वागण्याचें धैर्य आल्या-शिवाय ज्ञानाच्या वृद्धीपासून किंवा त्याच्या प्रसारापासून म्हणण्यासारखा फायदा होत नाहीं. ग्रहणें कशीं होतात, चंद्रसूर्यास खळीं कशीं पडतात वगैरे गोष्टी युरोपांतील सर्व लोकांस समजल्या आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. पण जेवढ्यांस त्या पक्क्या कळून आल्या त्यांनीं पूर्वापार चालत आलेल्या रूढींस न जुमानतां, अगोदर आपलें वर्तन बदलून नंतर दुसऱ्यांचें वर्तन बदलण्याचा प्रयत्न केला, यामुळें तिकडील लोकांच्या बुद्धीस ज्या राहूनें ग्रासलें होतें त्याच्या जबड्यांतून त्यांचा लौकर मोक्ष झाला. आमच्या इकडील पंडितांची तशी गोष्ट नाहीं. त्यांना लोकापवादाचें भय फार अस-ल्यामुळें, ते आपल्या पांडित्यप्रदर्शनापलीकडे सहसा जात नाहींत. हा आमच्या राष्ट्रीय प्रकृतींत नैसर्गिक दोष आहे, व यामुळें आमचें अतिशय नुकसान होत आहे. कोणत्याही विषयाच्या संबंधानें जोंपर्यंत आपली पक्की खातरी झाली नाहीं तोंपर्यंत सामान्य लोकांच्या समजुतीप्रमाणें आचरण करणें दूष्य होणार नाहीं; कारण विनाकारण रूढ पद्धति सोडण्यांत कोण-त्याही प्रकारचा फायदा नाहीं. सर्व जुन्या राष्ट्रांत ज्योतिःशास्त्राविषयीं नाना-तऱ्हेचे भ्रम पसरलेले होते, व त्यांच्या अनुरोधानें त्यांचें वर्तन होत होतें. लढाईला जावयाचें झालें, विवाह करावयाचा झाला, कोणत्याही मोठ्या कामासाठीं बाहेर पडावयाचें झालें कीं, प्रथम त्या त्या गोष्टीस ग्रहांची

अनुकूलता कशी काय आहे, हें जोश्याकडून पहावयाचें आणि त्यानें ते अनुकूल आहेत, अशी खात्री दिल्यास मग तिला आरंभ करावयाचा, असा प्रकार आशिया व युरोपखंडांतील सर्व जुन्या लोकांत रूढ होता. मनुष्याचें मन जात्या शोधक असल्यामुळें, ज्या ठिकाणीं त्याची मति खुंटते त्या ठिकाणीं तें पाहिजे तसल्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास तयार होतें. पृथ्वीवर घडून येणाऱ्या मोठमोठ्या चमत्कारांची मीमांसा आतांप्रमाणें त्या वेळेस करतां येणें शक्य नसल्यामुळें आकाशांत भ्रमण करणाऱ्या तेजोनिधीकडून तें होत असावें, अशी कल्पना त्यावेळेस होणें फार साहजिक होतें. तसेंच अनेक वर्षे लक्षपूर्वक आकाशाचें अवलोकन केल्यावर तारे आणि ग्रह यांतील भेद लक्षांत यावा; ग्रह मागें पुढें होतात ते आम्हांस सुख किंवा दुःख देण्यासाठीं होत असावेत; श्वेत व रमणीय शुक्र सुखप्रद व बलवर्धक असावा; रक्तवर्ण मंगळास रुधिराची प्रीति असावी; मंद व निस्तेज शनीचा स्वभाव दुष्ट असून मनुष्यांना पीडा देण्यांत त्यास मोठा आनंद होत असावा—अशा कल्पना येऊं लागून अखेरीस मनुष्यांच्या मुख्य मुख्य वृत्तींचा आरोप, निरनिराळ्या ग्रहांवर, त्यांच्या त्यांच्या स्वरूपाच्या अनुरोधानें, व कवींच्या आणि जोश्यांच्या तर्काप्रमाणें, करण्यांत आला यांत कांहीं नवल नाहीं, व सामान्य लोकांनीं तत्कालीन श्रेष्ठ व सुज्ञ लोकांच्या पदपंक्तीचें अनुसरण केलें यांतही कांहीं वावगें झालें नाहीं. पण अमुक गोष्ट अमुक रीतीनें घडत नाहीं, अमुक रीतीनें घडते, असें ज्यास पक्कें समजून आलें आहे, तो जर लोकांचा गैरसमज दूर करण्याचें धैर्य न करील, तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार होऊन सुधारणा व सुखवृद्धि कशी व्हावी ? आपल्या इकडील तत्त्ववेत्त्यांत आणि शास्त्रज्ञांत एक मोठा दोष दिसून येतो तो हा कीं, त्यांना आपल्या समजुतीप्रमाणें आचरण करण्याची उत्कट इच्छा किंवा धैर्य होतें नाहीं. " पुराणांतलीं वांगीं पुराणांत " अशा पद्धतीनें आमच्यांतील विद्वान् म्हणविणाऱ्यांचें वर्तन बहुधा होत असल्यामुळें दुर्मति, दुराग्रह आणि दुष्ट चाली यांचें ठाणें या देशांत कायम झाल्यासारखें झालें आहे. बाकी ज्या देशांत भास्कराचार्यांसारखे ज्योतिषी होऊन गेले, त्या देशांत अजूनपर्यंत चंद्रग्रहण किंवा सूर्यग्रहण आलें असतां कांहीं वेळ थंड पाण्यांत निष्कारण बुड्या मारण्याची, उपवास करण्याची, भलभलत्या वस्तूंचीं दानें

करण्याची, मूर्खपणाच्या मंत्राचा जप व सिद्धि करण्याच्या फंदांत पडण्याची, पापडलोणच्यांवर व दहींदुधावर तुळशीपत्रें घालण्याची, आणि जणूंकाय आपणांस सुतक्यानेंच स्पर्श केला आहे कीं काय असें समजून स्त्रीपुरुषांनीं धोत्रापात्रांसकट डोक्यावरून पाणी घेण्याची चाल अजूनपर्यंत दृष्टीस पडावी काय? पण आमच्या भास्कराचार्यांसच हा प्रकार अप्रशस्त म्हणण्याची छाती कोठें होती! भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व फक्त वेधशाळेंत! आचार्य तिच्याबाहेर पडले कीं, "यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं ना करणीयं नाचरणीयम्" या उपदेशाचे अनुयायी! ग्यालीलिओकोपरनिकसादि युरोपीय ज्योतिर्विदांनीं अशा प्रकारचेंच आचरण केलें असतें तर युरोपांत ज्ञानरवीचा प्रकाश फांकून अज्ञानतिमिराचा विध्वंस झाला असता काय, व आज त्या खंडास जो सुदिन प्राप्त झाला आहे तो होता काय? तसें इकडे व्हावें अशी इच्छा असेल, तर लोकापवादाचें भय टाकून, आपल्या मनास शुद्ध दिसेल तें लोकांस सांगण्याचें, व तदनुसार वागण्याचें धैर्य केलें पाहिजे; आणि तसें पुष्कळांकडून होऊं लागलें, तरच अज्ञानराहूनें ग्रासलेल्या आमच्या हतभाग्य देशाचें ग्रहण लौकर —

---

## स्त्रियांस चरितार्थसंपादक शि

थोड्या दिवसांपूर्वी येथल्या व ... विषयाविषयीं मोठ्या मौजेचें ... मनुष्य मेला, तेव्हां त्याचे बायको ही गोष्ट बाहेर पडतांच कलमबद्ध करण्याची आयती नामी संधि ... लोकांस म्हणावें, हा होता. त्यांत कीं, नवऱ्याच्या मरणाची बातमी प्राणोत्क्रमण करते, ती पहिल्या नंब साठीं अप्रूपासल्या एखाद्या विसारी उदकनंबराची, प्रार्थना करावी ल त्याचे वर्तन निराळें होतें त्यांत

म्हटलेलें नाहीं. तथापि त्यांच्या लिहिण्याच्या झोंकावरून अशा स्त्रियांस काय म्हणावें, असा प्रश्न जर कोणी त्यांस करता तर अशा स्त्रियांस 'अधमाधमा', 'कुलांगारा', 'राक्षसकुलोद्भवा', 'पाषाणहृदया,' अशा प्रकारचीं नांवें दिलीं पाहिजेत, असें त्यांनीं बिनदिक्कत सांगितलें असतें !

पति मेला कीं 'संसार असार' व 'जगण्याचें कारण राहिलें नाहीं,' असें स्त्रियांस वाटून त्यांना सहज मृत्यु यावा, किंवा निदान त्यांनीं आत्महत्या तरी करून घ्यावी, याहून स्त्रियांस अत्यंत शुद्ध पातिव्रत्याचें किंवा सद्गुणाचें दुसरें निदर्शक नाहीं, असें मानणाऱ्याचे विचारांत चांगुलपणाचा भाग मुळींच नाहीं, असें कोणीही निःपक्षपाती मनुष्य म्हणूं शकणार नाहीं ! एकाच्या किंवा अनेकांच्या सुखासाठीं रात्रंदिवस कष्ट करण्यास सिद्ध असावें, त्यास यत्किंचित् दुःख झालें कीं, तें स्वतःस झाल्यासारखें वाटावें, स्वतःच्या सुखाविषयीं बेपर्वाई उत्पन्न होऊन दुसऱ्याकरितां तन, मन व धन ... आनंद वाटावा—ही मनुष्याच्या अंतःकरणाची अत्यंत विशेष प्रशंसनीय अशी दुसरी वृत्ति वृत्ति केवळ परोपकारबुद्धीनेंच उत्पन्न र तींत स्वार्थाचा अंश असेल तर ती ... मेला; आतां माझें काय होईल; ठी करून आजपर्यंत मजकडून ...मरण छळ करतील; व ज्या मी ...ची मुरवत ठेविली नाहीं त्या ...ढें तोंड वेंगाडावें लागून कोणीं बटकीप्रमाणें वागावें लागेल; सोन्या... लागतील, किंवा त्यांची ताडातोड ...तींत जगण्यापेक्षां मरणें हेंच बरें", ...डा केला तिला 'साध्वी' म्हणण्या...

...बुद्धीस जो महिमा प्राप्त झाला ...जी अनिर्वचनीय विपत्ति आहे

तिचा लय होत जाण्यास जशी ही बुद्धि उपयोगी पडणार आहे, तसें दुसरें कांहींही पडणार नाहीं, हें आम्हांस कबूल आहे. सृष्टींत प्रतिदिवशीं घडणारे कोट्यवधि अपघात, रोग, अज्ञान, दुष्ट लोकांची पीडा, अकाली मृत्यु, विषारी व हिंस्र प्राण्यांपासून होणारा त्रास इत्यादिकांमुळें बऱ्याच मनुष्यांस व्हावें तसें सुख होत नाहीं, व कांहींस तर त्यांचें जीवित दुःसह होतें; यामुळें जे कोणी स्वतः दुःख सोसून आमरण दुसऱ्याच्या सुखासाठीं झटत असतात, आणि गरज पडल्यास त्यांसाठीं मरण्यासही तयार होतात, ते मान्यता पावतात हे अगदीं नीट आहे; आणि अशा प्रकारचे लोक अधिकाधिक होत गेले तरच जगांतील बहुतेक विपत्तीचा बींमोड होण्याची आशा आहे. प्रस्तुत स्थितींत जो तो स्वार्थपरायण होईल तर जगांतील विपत्तीचा अंत कधींच होणार नाहीं. पण येवढ्यावरून असें होत नाहीं कीं, आज जी स्वहितत्यागास योग्यता प्राप्त झाली आहे तीच निरंतर राहील. आजमित्तीस जे परोपकाररत पुरुष हयातींत आहेत, किंवा जे पुढें होतील, त्यांच्या परिश्रमानें या जगांतील दुःखकारणें बरींच नाहींशीं झालीं, व दुसऱ्याकडून उपकार करून घेणें हें बहुतेकांना संकटावह वाटूं लागलें, व जो तो कोणाकडूनही उपकार करून न घेतां आपणच दुसऱ्यावर ते करण्याविषयीं आतुर होऊं लागला म्हणजे मग निरपेक्षबुद्धीचा दर कमी होणार नाहीं काय ! तेव्हां काय झालें कीं, आजच्या स्थितींत एकानें दुसऱ्याकरतां मरणास तयार होणें किंवा मरणें हें कितीही प्रशंसनीय किंवा अवश्य असलें तरी एकाला दुसऱ्याबद्दल कोणत्याही कारणानें मरावें लागणें किंवा मरावेंसें वाटणें, यांत कांहीं तरी उणेंपण आहे, व जगाच्या अत्युत्कृष्ट स्थितींत तसें कोणासही करावें लागणार नाहीं, व तसें करण्याची कल्पना कोणासही प्रशस्त वाटणार नाहीं, असें विचाराअंतीं कबूल करणें अवश्य आहे.

एकानें दुसऱ्याकरतां सहज मरणें, दुढया मारून घेणें, किंवा नाहीं नाहीं ते हाल भोगणें हें सर्वथैव इष्ट असेल तर, स्त्री मेल्यावर पुरुषानेंही तिच्याबद्दल प्राण सोडणें, प्राणहत्या करणें, किंवा वैधव्यव्रताचें सेवन करणें प्रशस्त होईल, किंवा झालें असतें ! बायको मेल्याची वार्ता येतांच बेशुद्ध होऊन परलोकवासी झालेल्या भार्यारतांचीं उदाहरणें कधीं तरी आपल्या ऐकण्यांत येतात काय ! किंवा स्त्रीबरोबर सहगमन केलेल्या प्रियैकरतांचीं उदाहरणें कोण-

त्याही देशाच्या पुराणांत किंवा इतिहासांत कोणीं वाचलीं आहेत काय? किंवा बायकोस देवाज्ञा झाल्यामुळें, नित्य भगवीं वस्त्रें परिधान करणारे, क्षौराच्या दिवशीं डोक्याच्या किंवा तोंडाच्या कोणत्याही भागावरील केंसांची काडीमात्र दयामाया न ठेवणारे, भाजणीच्या थालिपिठाशिवाय दुसऱ्या कोणत्याही आहारास स्पर्श न करणारे, अरिष्ट गुदरल्यापासून चारसहा महिने कोणास तोंड न दाखविणारे, पानतंबाखूची किंवा चिलीमविडीची त्या अत्यंत खेदजनक दिवसापासून आमरण समिध शेकणारे, व मंगलकार्यांत किंवा कामासाठीं घरांतून बाहेर पडणाऱ्या इसमापुढें येण्यास भिणारे नवरे कोणीं पाहिले आहेत काय? जर नसतील तर स्त्रियांची अशा तऱ्हेची वागणूक सतीत्वाची, साध्वीत्वाची, पतिव्रतात्वाची, एकनिष्ठ प्रेमाची, व अलौकिक सद्धर्मित्वाची साक्ष देणारी कशी होते, हें कोणी उघड करून सांगेल काय? जो सांगेल त्यास आम्ही बृहस्पतीचा बृहस्पति मानूं!

आमची तर अशी समजूत आहे कीं, नवरा मेल्यामुळें आमच्यांतील ज्या स्त्रिया आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात त्या पराकाष्ठेच्या अविचारी, साहसी, भेकड, किंवा आम्ही निष्ठुरपणें पुढें त्यांची जी छलना करतो तिच्या भयंकर स्वरूपानें घाबरून जाणाऱ्या अधीर स्त्रिया असल्या पाहिजेत. जिचा नवरा मेला तिचें होईल तितक्या उत्तम रीतीनें संगोपन करण्याची उदार चाल आमच्या देशांत असती, तर सहगमनाची रूढि येथें कधींच न पडती, इतकेंच नाहीं, तर पतिवियोगामुळें एकाएकीं प्राण सोडणारी किंवा आत्महत्या करणारी स्त्री देखील येथें कधींही दृष्टीस न पडती. व्यक्तीसाठीं किंवा व्यक्तिसमुदायासाठीं मरणें श्लाघ्य आहे, पण केव्हां? त्या मरणानें त्या व्यक्तिसमुदायाचें मरण टळत असेल, किंवा त्याला बऱ्याच चिरस्थायी सुखाचा लाभ होत असेल तर. असें नसतां, ज्या ठिकाणीं सहज किंवा बुद्धिपुरःसर एक इसम दुसऱ्याकरतां मरण्यास प्रवृत्त होत असेल त्या ठिकाणच्या रूढि अत्यंत अन्यायाच्या, दुष्टपणाच्या, व पराकाष्ठेच्या कोत्या समजुतीच्या असल्या पाहिजेत, हें उघड आहे. असलीं दुःखकारक उदाहरणें येथील खालच्या जातींतल्या स्त्रियांत किंवा कोणत्याही जातींतील पुरुषांत मुळींच सांपडत नाहींत. त्यांचा सारा भरणा ब्राह्मण, शेणवी, परभू इत्यादि वरिष्ठ जातींतील स्त्रियांत आहे; व त्यांतच तो आहे, याचें कारण त्यांचें

परावलंबन व स्वचरितार्थ इटकून चालवितां येईल अशा प्रकारचा कोणताही प्रशस्त धंदा त्यांस न येणें हें होय. या जातींतील सुखवस्तु घराण्यांतल्या स्त्रियांस विद्यानंदांत काळ घालविण्यास शिकविण्याचा परिपाठ पडेल व गरीब लोकांच्या मुलींस थोडेंबहुत लिहिणेंवाचणें शिकवून, त्याबरोबरच एकाद्या धंद्याचें ज्ञान करून देण्यांत येऊं लागेल, तर नवऱ्याच्या मृत्युवार्तेबरोबर आपोआप मरणारी किंवा मारून घेणारी स्त्री दिसेनाशी होईल इतकेंच नाहीं, तर ज्यांच्यावर दुर्दैवानें तो दुःखाचा डोंगर कोसळेल, त्या हळू हळू त्याचा भार विसरूं लागून आपलें, आपल्या मुलाबाळांचें, व इतरांचें अस्तित्व होईल तितकें सुखावह करण्यास झटूं लागतील !

---

## विवाहनिराकरण अथवा घटस्फोट : : १

चांगलें काय हें समजत असलें आणि मग तें जरी मिळण्यासारखें नसलें, तरी तें हवेंसें वाटतें. निरोगी हवा, सुरेख घर, सुदृढ प्रकृति, सदय अंतःकरण, तीव्र बुद्धि, छंदानुवर्ती बांधवजन, अवश्य द्रव्यानुकूलता, आणि ज्ञानसंग्रह व ज्ञानतृष्णा इत्यादि गोष्टींचें चांगलेंपण बहुधा सर्वांस समजत असल्यामुळें, त्या दुष्प्राप्य असल्या तरी अर्जनीय आहेत असें प्रत्येकास वाटतें. त्याप्रमाणेंच तारुण्य, सौंदर्य, स्वभावसाम्य, व स्वातंत्र्य इत्यादि वस्तूंतील रहस्य ज्यांस समजलें आहे त्यांस त्या मिळण्यासारख्या नसल्या तरी हव्याशा वाटतात. हे सामान्य विचार आमच्या देशांतील विवाहपद्धतीस जितके लागू पडतात तितके कदाचित् दुसऱ्या कशासही लागू पडत नसतील. आमचीं पुराणें, नाटकें, आणि काव्यें यांचें वाचन; प्रौढ वयांत विवाह करणाऱ्या इंग्रजी स्त्रीपुरुषांचीं प्रत्यक्ष उदाहरणें; जर्मनी, फ्रान्स, युनायटेड स्टेट्स् वगैरे देशांविषयीं यासंबंधानें साक्षात् किंवा परंपरेनें मिळविलेली माहिती; आणि प्रत्येकाचा थोडाबहुत स्वानुभव आणि अनुमान—यांमुळें आमचें बरेंच विचारांतर होऊन मनांतल्या मनांत ज्या प्रकारच्या पाणिग्रहणाचा अभिलाष आम्हांस उत्पन्न झाला आहे तें पाणिग्रहण एका तऱ्हेचें आहे, व ज्याच्या पाशानें येथील अप्राप्तयौवन असंख्य वधूवरें प्रतिवर्षीं जखडलीं जात आहेत तें पाणिग्रहण निराळ्याच तऱ्हेचें आहे. तारुण्यवसंत

प्राप्त होऊन शरीरद्रुमांवर पालवी, मोहर, व सूक्ष्म फलनिर्भर यांचा आविर्भाव झाला असतां ते किती रमणीय दिसतात, हें कोणास सांगायाला पाहिजे असें नाहीं. ही रमणीयता पराकाष्ठेची मोहक आहे, व हिच्या भरांत पाणिग्रहण केल्यानें कधीं कधीं प्रमाद होण्याचा संभव आहे हेंही आम्हांस कबूल आहे. पण याच गोष्टीबरोबर ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, विवाहापासून उत्पन्न होणाऱ्या अत्युत्कृष्ट सुखाचा उपभोग अशा ऋतुंत युवयुवतींस स्वेच्छेनुरूप पाणिग्रहण करूं दिल्यानेंच होण्याचा संभव आहे. निर्दोष अशी या जगांत कोणती वस्तु आहे? गुलाबाचें सुंदर फूल कांट्यांतून काढावें लागतें; मौक्तिकासाठीं समुद्रमज्जन करावें लागतें; सुवर्णकण मृत्कणाशीं मिसळलेले असतात; तात्पर्य काय कीं, येथली कोणतीही वस्तु, संस्था, रीति, किंवा स्थिति घ्या, तींत बिलकुल उणेपणा नाहीं, असें कधींही व्हावयाचें नाहीं. तेव्हां कोणत्याही गोष्टीचा अंगीकार किंवा त्याग करणें तो तींतील चांगलेवाईटपणाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. जींत वाईटपणाचा भाग अधिक असेल तिचा आपण अनादर करतों, व जींत चांगलेपणा विशेष असेल ती आपण स्वीकारतों. लग्न लहानपणीं करा, तरुणपणीं करा, किंवा उतारवयांत करा, तें करतांना कांहींतरी चुका व्हावयाच्याच! तें आपलें आपण करा किंवा दुसऱ्याकडून करवा—त्यांतही अनेक दोष असावयाचेच! पण येवढ्यावरून जर कोणी असें म्हणत असतील कीं सर्वच विवाहपद्धति सदोष आहेत; तर मग एक टाकून देऊन दुसरी घालण्यांत काय अर्थ आहे; तर त्यास असें उत्तर आहे कीं, सर्व विवाहपद्धति सदोष आहेत हें जरी खरें आहे, तरी त्या सर्वांत दोषाचा अंश सारखा आहे, हें खरें नाहीं. तो निरनिराळ्या पद्धतींत कमी अधिक आहे, व स्वयंवरांत तो अत्यल्प आहे!

हें आमचें मत प्रस्तुत कालीं बहुतेकांस पसंत होणार नाहीं हें आम्ही जाणून आहों; पण दुसऱ्या कोणत्याही विवाहपद्धतीपेक्षां या विवाहपद्धतीपासूनच मनुष्यास विशेष सुख होण्याचा संभव आहे, व सध्यां आम्हांत जी रूढ पद्धति आहे तीपासून आम्हांस फारच कमी सुख आणि अतिशय त्रास होत आहे, अशी आमची पक्की खातरी झाली आहे; म्हणून जेणेकरून पहिलीचा प्रचार लौकर पडेल, व दुसरीचा लोप होईल, तें सारें चांगलें मानण्याचा

आमच्या मनाचा कल होऊं लागला आहे; व ह्याच कल सांप्रत विषयाची चर्चा आरंभण्यास कारण झाला आहे.

कोणत्याही अप्रिय किंवा पीडादायक गोष्टीचा प्रतीकार करण्याचे उपाय दोन प्रकारचे असतात. एक, ती गोष्ट ज्या कारणांनीं घडत असते तीं कारणें नाहींशीं करणें; दुसरा, तीं कारणें नाहींशीं करतां येण्याजोगीं नसतील तर, त्या गोष्टीस बाहेरून कांहींतरी अडथळा आणणें. उदाहरणार्थ, एखाद्याचें मूल चोरटें असलें तर त्याची ती खोड दोन रीतींनीं घालवितां येईल. एक, त्याला चोरीचे परिणाम सांगून व सदुपदेश करून व्यसन टाकण्याविषयीं त्याचें मन वळविणें. दुसरा, त्याच्या वागणुकीवर नेहमीं डोळा ठेवणें, व त्याच्या हातीं कोणतीही मौल्यवान् वस्तु न पडेल असा बंदोबस्त राखणें. अशाच दोन मार्गांनीं आम्हांस अनेक वर्षें भोंवून राहिलेल्या बालविवाहरूप व्यसनाचाही प्रतीकार करतां येणार आहे. बालविवाहापासून होणारे दुष्परिणाम लोकांच्या मनांत भरवून, त्यापासून त्यांस परावृत्त करणें, हा निर्दोष व राजमार्ग होय. पण येवढ्यानें कार्यसिद्धि लौकर न होतां, त्यापासून अनेक वर्षें नुकसान होण्याचा संभव असेल तर त्याच्या मदतीला दुसऱ्या प्रतीचे कांहीं उपाय देतां येण्यासारखे आहेत. कांहीं दिवसापूर्वीं बालविवाहनिषेधार्थ कायद्याची वाटाघाट चालली होती ती या मार्गापैकींच होय. थोड्या दिवसांपूर्वीं मलबारी शेट यांनीं ऋतुप्राप्त न झालेल्या स्त्रीवर आगळीक करणाऱ्या नवऱ्यास शिक्षा करण्याबद्दल कायदा असावा, म्हणून जी चर्चा चालविली होती, तीही याच प्रकारची होय, व आज आम्ही जी शक्कल पुढें आणीत आहों तीही याच माळेची आहे! या आमच्या लिहिण्याच्या पद्धतीवरून कोणास असे वाटण्याचा संभव आहे कीं, ज्या उपायांवर खुद्द आमचाच भरंवसा नाहीं, असें कांहींतरी उपाय आम्ही उगीच लोकांपुढें स्वतःस हास्यास्पद करून घेण्याकरितां आणीत आहों; पण असें समजणें मोठी चूक होणार आहे. तथापि येवढें खरें आहे कीं, बालविवाहासारख्या दुष्ट चालीचा जरी आम्हांस पराकाष्ठेचा तिरस्कार आहे, तरी त्याचा प्रतीकार करतां येण्यासारखे जे अनेक उपाय आहेत, त्या साऱ्यांस एकाच माळेंत ओंवण्याइतक्या विचारपराङ्मुखतेचें अवलंबन करण्यास आम्ही तयार झालेले नाहीं. विचारशक्तीचा अगदींच लोप झाल्याशिवाय उत्तम, मध्यम, व कनिष्ठ या तीन

संज्ञा अभेद आहेत, असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. 'असें जर आहे तर मग राजमार्ग सोडून आड वाटेचें अवलंबन तुम्ही कां करतां? ' असा प्रश्न कोणी करील, त्यास आमचें असें उत्तर आहे कीं, देशाच्या, कालाच्या व व्यक्तीच्या विवक्षित स्थितींत सौम्योपायांचें अवलंबन न करतां, तीव्रोपाय करणेंच विशेष श्रेयस्कर असतें. अगदीं लहान मुलास वेदांताच्या गप्पा सांगून फळ नाहीं. त्याला तोंडाचा किंवा छडीचा धाकच दाखविला पाहिजे. तसेंच, एखाद्यास वेड लागून तो बेफाम झाला, तर त्यावर अगोदर तीव्र उपाय चालवून त्याचा वायु उतरला म्हणजे मग सौम्य औषधींनीं त्याचा रोग समूळ काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याला खून करण्याची खोड लागली आहे त्याला देहांतप्रायश्चित्ताशिवाय दुसरा दंड नाहीं. त्याप्रमाणेंच लोकांच्या आचारांत जेवढा अत्यंत क्रूरपणाचा व अविचाराचा भाग असेल तेवढा साधेल तर तीव्र उपायांनीं नाहींसा करण्यास हरकत नाहीं. आमच्यामधील सतीची चाल अशा प्रकारच्या सक्त उपायांनींच बंद करण्यासारखी होती; व आठदहा वर्षांच्या पोरींच्या गळ्याभोंवतीं विवाहाचे फांस घालून त्यांचा आमरण छल करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आईबापांचें मूर्खत्वही अशाच रीतीनें बंद करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें आमचें मत आहे. पण तें आमच्या सध्यांच्या नीचावस्थेंत कोणास पसंत पडणार ? सरकार तर बोलून चालून परकें. आम्ही आपल्या मुलींचे व मुलांचे गळे धर्माच्या नांवानें कापण्याचा आग्रहच धरून बसलों तर तसें न करण्यास्तव आम्हांवर सक्ती करून, आमच्या असंतोषानें आपल्या शांतींत व्यत्यय आणून घेण्याची त्यांस काय गरज पडली आहे ? त्यांच्या भूतदयेस व राज्यास कलंक आणण्यासारखी सतीची चाल होती तेवढी त्यांनीं आमच्या अधर्मी धर्मास आणि मूर्ख शहाणपणास एकीकडे गुंडाळून ठेऊन एकदम बंद केली; पण बालविवाहाची चाल तितकी अमानुष नसल्यामुळें त्यांनीं तींत आपलें मन घातलें नाहीं. त्यांना असें वाटलें कीं, शिक्षणाचा प्रसार झाल्यानें ही चाल सहज मोडण्यासारखी आहे. पण आम्ही कसले निगरगट्ट ! सरकार हात घालीत नाहीं, असें दिसल्याबरोबर आम्ही तट्ट फुगून गेलों, व जी गोष्ट सरकारानें केवळ मेहेरबानीखातर केली नाहीं, ती करण्याचा त्यास अधिकार नव्हता, किंवा ती त्यास करतां आली नसती, असें आम्ही प्रपादूं लागलों ! 'पण जर हें

ब्रिटिश सरकार अकबराप्रमाणें, ऋतु प्राप्त होण्यापूर्वी कोणीही आपल्या कन्येचा विवाह करूं नये, असा कायदा सतीच्या कायद्याबरोबर करून जातें, तर त्यास प्रतिबंध करण्याची आम्हांपैकीं कोणाची तरी प्राज्ञा होती काय ? दूर कशाला ? लॉर्ड ल्यान्सडौन यांनीं ऑफीशिअल सीक्रेट ॲक्टाप्रमाणें उद्यां तसला कायदा कायद्याच्या पिरटांतून एकाएकीं काढला, तर त्यास आड येण्यास आम्हांपैकीं एकाची तरी छाती होणार आहे काय ? "नाहीं देखिलें पंचानना, तोंवरी जंबूक करी गर्जना" अशी आमची स्थिति आहे ! आम्ही इतके धीट आहों कीं, चवदावें रत्न आमच्या दृष्टीस पडलें कीं पुरे; आम्ही आपले पाय लावून पळत सुटलोंच ! ! जशी बालविवाहाची, जशी विधवाविवाहाची, तशीच विवाहनिराकरणाची अथवा घटस्फोटाची गोष्ट होय. उद्यां जर सरकारनें असा कायदा केला कीं, 'अज्ञानपणीं आईबापांनीं केलेलें लग्न मला मान्य नाहीं' अशी फिर्याद कोर्टापुढें कोणी आणील तर कोर्टानें तें रद्द होण्याचा दावा दिला पाहिजे; तर आमचे लोक शुष्क वल्गनेहून विशेष कांहीं करूं शकतील काय ? "सुधारणा मुंगीच्या पायानें होते; उतावीळ सुधारकांचें वर्तन देशाच्या हितास कारण न होतां उलट नुकसानास कारण होतें; चांगल्यावाइटाचा भेदाभेद लोकांस समजूं लागून जें वाईट असेल तें त्यांनीं आपण होऊन टाकण्यांत व चांगलें असेल त्याचा स्वीकार करण्यांत त्यांचा विशेष फायदा आहे; सतीच्या कायद्यापासून कोणताही लाभ नाहीं" इत्यादि पोकळ तत्त्वज्ञानाच्या लांब लांब गप्पा मारण्यांत मोठें शहाणपण व भूषण आहे, असें आम्हांस वाटतें. पण दहाबारा वर्षांच्या पोरीस किंवा पंधरासोळा वर्षांच्या पोरास संसाराचे विंचू लावण्यांत, ज्या कन्यांना ऋतु देखील प्राप्त झाला नाहीं अशांस वैधव्याग्नीनें पोळण्यांत, अथवा एखादी जाईची कळी निवडुंगावर, किंवा सोनचाफ्याचें फूल कोरांटीवर, आणून टाकण्यांत काय शहाणपण व भूषण असेल तें असो !

---

## घटस्फोट अथवा काडीमोड : : : १०

या विषयावरील मागल्या अंकांतलें आर्टिकल प्रसिद्ध झाल्यापासून

आमच्याकडे जीं पत्रें आलीं आहेत, त्यांपैकीं कांहींत असा प्रश्न केला आहे कीं, याच प्रसंगीं हा वादग्रस्त विषय आम्हीं उपस्थित केला याचें कारण काय ? लौकरच "सामाजिक सुधारणा परिषद्" बालविवाहाच्या निषेधार्थ मंडळी स्थापन करून ती नोंदविणार आहे, व त्या मंडळीचे सभासद होऊं इच्छिणाऱ्या लोकांच्या सह्या घेण्याचा प्रयत्न चालू आहे. मुंबई ग्याझि-टानेंसुद्धां या मंडळीची स्तुति केली आहे, व हिनें आरंभिलेला उद्योग तडीस गेल्यास या प्रांतांतील लोकांचें पुष्कळ हित होणार आहे, असें म्हटलें असून आम्ही ही 'खाजवून नवी खरूज' कशासाठीं काढतों ? 'टेबलापाशीं बसून हवें तसे तारे तोडणारांच्या तब्येतीप्रमाणें किंवा इच्छे-प्रमाणें समाजाची गति होत नसते; समाजाची स्थिति भरलेल्या गाड्या-सारखी आहे. तो टपालाच्या टांग्याच्या वेगानें कधींही जाऊं शकणार नाहीं. त्याला ओढणारीं तट्टें फार बुजरट असतात; त्यांच्याकडून समाजशकट ओढण्याचें काम करून घ्यावयाचें असेल, तर त्यांना गोंजारून व चुचकारून तें त्यांकडून करून घेतलें पाहिजे. त्यांच्यावर विनाकारण शब्दप्रतोदप्रहार केल्यास, व त्यांना भंडावून सोडल्यास, तीं जूं फेंकून देऊन चार दिशांस उधळून जातील, किंवा शकटाशीं धिंगाणा घालून त्याची मोडतोड करतील! सबब, जें करणें व बोलणें तें धिमेपणाचें असलें पाहिजे. ज्या गोष्टी लोकांच्या हातून आज होण्याचा संभव नाहीं, त्या त्यांच्यापुढें आणून त्यांना भिवविण्यांत काय अर्थ आहे ? "उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग" असें करण्यांत कोणाचाही फायदा नाहीं. सबब, दुसरे लोक लग्नाची मर्यादा बेताबातानें वाढविण्याचे सौम्य उपाय करूं लागले असतां आम्ही स्वयंवराच्या आणि घटस्फोटाच्या वादविवादांत पडणें बरोबर नाहीं. किल्ल्याचा पहिला तट सर केल्यावर, त्यावर उभें राहून दुसरा तट घेण्याच्या मसलती चालवाव्या, कीं पायथ्यापाशीं उभें राहून त्याच्या अत्युच्च प्रदेशावर निशाण कसें फडक-वितां येईल, हें घाटीत बसावें ? '

चांगल्यावाइटाची निवडानिवड करण्याची ज्यांना शक्ति नाहीं, किंवा इच्छा नाहीं; नवीन गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे कड्यावरून उडी घेणें, असें ज्यांस वाटल्याशिवाय रहात नाहीं; जें बरें दिसेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य ज्यांचे अंगीं वसत नाहीं; गतानुगतिकत्व हें ज्यांच्या

वर्तनाचें आदितत्त्व; चरितार्थसंपादन, द्रव्यार्जन, व विषयोपभोग यांतच मनुष्यकर्तव्यतेची परमावधि आहे, असा ज्यांचा निश्चल समज; जुन्या कल्पनांची व आचारांची ज्यांच्या पायांस घट्ट मगरमिठी पडली आहे; व कोणी तरी फरफरून ओढल्याशिवाय ज्यांना आपल्या नित्यकर्दमांतून बाहेर पडण्याची इच्छा व्हावयाची नाहीं—अशा लोकांकडून वरच्याप्रमाणें कोटिक्रम होत असतो. त्यांच्या मतें समाजाच्या प्रकृतींतच आपल्या आपण पुढें सरण्याचें गूढ सामर्थ्य आहे! त्याच्या घटकांपैकीं कोणीही हालला नाहीं, तरी जसजसे दिवस लोटत जातील तसतसा तोही पुढें लोटत गेलाच पाहिजे! पण या अद्वितीय पंडितांना असें समजत नाहीं कीं, समाज ही कांहीं स्वतंत्र मूर्तिमंत वस्तु नाहीं. समाजांतील घटक हालले तर समाज हालतो, ते मंदावले तर तो मंदावतो, आणि ते मागें हटूं लागले तर तो मागें हटतो! त्यांची उन्नति ती याची उन्नति, व त्यांची अधोगति आणि ऱ्हास ती याची अधोगति आणि ऱ्हास. "मी स्वस्थ बसेन, बाकीच्यांनीं मात्र उद्योग करावा," असें जर समाजांतील प्रत्येक घटक म्हणूं लागेल, तर त्याचें पाऊल बिलकूल पुढें पडणार नाहीं, हें उघड आहे. तसेंच अमुक प्रकारचें आचरण सार्‍यांनीं करावें व अमुक प्रकारचें बोलणें सार्‍यांनीं बोलावें, असा नियम करण्यापासूनही समाजाचा फायदा न होतां, उलट मोठें नुकसान होण्याचा संभव आहे. बुद्धि ही कांहीं सर्वांस सारखी वाटलेली नाहीं. कोणाच्या डोक्यातून केव्हां काय कल्पना निघेल, आणि तीपासून समाजाचा केवढा फायदा होणार असेल, निदान ती कितीजणांना ग्राह्य होण्यासारखी असेल, हें निश्चयात्मक कधींही सांगतां येण्यासारखें नाहीं. सबब, सभ्यपणाची मर्यादा न सोडतां, समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्यानें उघडपणें बोलून दाखविणें यांतच समाजाचें कल्याण आहे. शिवाय, ज्या मतांस आपण तऱ्हेवाईक मतें असें म्हणतों, तीं त्यांच्या नवीनत्वामुळें बहुधा तऱ्हेवाईक वाटतात. तीं पुनः पुनः कानांवर पडूं लागलीं म्हणजे त्यांचा धाक वाटेनासा होऊन, हळू हळू त्यांतील गुणावगुणाचा विचार करण्याची बुद्धि होऊं लागते, आणि अखेरीस त्यांपैकीं जीं पसंत पडतील तीं अंगीकारण्याची इच्छा होते. दुसरें, समाजांतील सामान्य मनुष्यांपैकीं एखाद्यास जर कांहीं विशिष्ट मतें बरींशीं

वाटलीं तर तीं तशीं वाटण्यासारखे दुसरे पुष्कळ लोकही त्या समाजांत असले पाहिजेत, असें सिद्ध होतें. ज्याप्रमाणें भाताच्या एक दोन शितांवरून सारा भात शिजला आहे किंवा नाहीं, हें सांगतां येतें, त्याप्रमाणें समाजांतील पांचचार गृहस्थांच्या बोलण्याच्या व लिहिण्याच्या झोंकावरून, त्याचा मगदूर कसा काय आहे याचें अनुमान करतां येतें. सुधारकांत स्वयंवर हा विवाहाचा सर्वोत्तम मार्ग असें प्रतिपादण्यांत येणें यावरून त्याच्या चालकांचें तऱ्हेवाईकपण सिद्ध होत नाहीं, तर स्वयंवरपद्धति बरी असें वाटण्यास ज्या प्रकारचीं मतें असलीं पाहिजेत, तसलीं मतें या देशांत बरींच आहेत, व पुष्कळ सहज तशीं होण्यासारखीं आहेत, असें सिद्ध होतें. पण क्षणभर वादासाठीं असेंही मानिलें कीं, वास्तविक स्थिति अशी नाहीं, तरी सुद्धां आम्हांस जें बरें दिसत आहे तें आम्हीं कां न बोलावें, हें आम्हांस समजत नाहीं. ज्या कारणांनीं आमच्या देशाच्या पाठीमागें आज कित्येक युगें दास्यचक्र लागलें आहे; ज्या कारणांनीं आमच्या अंगीं स्त्रैण्य आलें आहे; ज्या कारणांनीं आमची संसारयात्रा अत्यंत नीरस किंवा कष्टावह झाली आहे; ज्या कारणांमुळें इतर राष्ट्रें आमची छीः थूः करीत आहेत, व ज्या कारणांमुळें आम्ही बुद्धीनें, नीतीनें, व शरीरसामर्थ्यानें अधिकाधिक क्षीण होत असून, थोड्या वर्षांत आमचा मुळींच मागमूस नाहींसा होईल कीं काय, अशी भीति वाटत आहे, तीं कारणें अल्प समजुतीच्या, कोत्या विचाराच्या स्वार्थी, भेकड, किंवा मत्सरी लोकांच्या दूषणाला भिऊन उघड सांगण्यास कचरणारे सारेच होतील तर या भारतीय समाजाचें किंवा त्यांतील कोणत्याही व्यक्तीचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं. पाण्याच्या धारेस लागलेली नाव झपाट्यानें खालीं जाऊं लागली असतां, तींतील एका व्यक्तीसच कोणत्याही तीरास कसें लागतां येणार? समाज सोडून दिल्याखेरीज त्याच्या उन्नतीचे व अधोगतीचे वांटेकरी न होणें हें अशक्य आहे. तेव्हां केवळ स्वार्थदृष्टीनें जरी या गोष्टीचा विचार केला, तरीही हें कबूल करावें लागतें कीं, ज्याच्या मनांत समाजांत राहून आपली उन्नति करून घ्यावी अशी उत्कट इच्छा झाली असेल त्यानें अगोदर समाजाची उन्नति करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजच खालीं खालीं जात असेल तर हाच वर कोठून येणार?

येणेंप्रमाणें अनेक गोष्टी मनांत आणून प्रस्तुत विषय आम्हीं हातीं घेतला आहे. तो सध्यांच हातीं घेण्याचें कारण येवढेंच कीं, 'सामाजिकसुधारणा-परिषदे' कडून बालविवाहनिषेधार्थ जी खटपट चालली आहे तीपासून आमच्या समजुतीप्रमाणें विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं. सर्व लोकांनीं दहा वर्षांच्या आंत मुलींचें आणि सोळा वर्षांच्या आंत मुलांचें लग्न करावयाचेंच नाहीं असा निश्चय केला असतां त्या यत्तेखालच्या कोणत्याही वर्षाच्या मुलीचा विवाह होऊन तिचा नवरा मेला असतां, तीवर जें वैधव्यसंकट येत असे, तेवढें या अल्पनिषेधानें टळणार आहे; म्हणजे दहा वर्षांपुढें मुलींचीं लग्नें होऊं लागल्यास सात आठ किंवा नऊ वर्षांच्या पोरींच्या कपाळाचें वैधव्य तेवढें टळेल. हळू हळू बारा वर्षांची इयत्ता रूढ झाल्यास आणखी कांहींची आपदा वांचेल पण दहा आणि बारा या दोन आंकड्यांच्या दरम्यानच जोंपर्यंत आम्ही भटकत आहों तोंपर्यंत प्रौढ वयांत वधूवरांनीं स्वसंमतीनें एकमेकांस वरल्यापासून होणाऱ्या गृहस्थावस्थेंतील अनुपमेय सुखाचा लाभ, आणि त्यामुळें समाजाच्या सविस्तर घटनेवर होणारे हितकारक परिणाम यांचा प्रादुर्भाव येथें कसा होऊं लागणार? बारापासून चौदावर आम्ही कसे जाणार? या दोहोंच्या दरम्यान धर्मानें जी अटकनदी घातली आहे ती कशी उतरणार? हें तें करून ती उतरून पलीकडे जाण्याचा निर्धार केल्याखेरीज, बालविवाह-निषेधार्थ केलेल्या तुमच्या लुटुपुटीच्या उपायापासून कांहींएक तात्त्विक फायदा होण्याची बिलकूल आशा नाहीं.

---

## स्वयंवर : : ११

विदुषी म्हणे म्हणा जा जरि कथिलें म्यां परोपरी पण ती ।
प्रणति प्रभूंस करितां अनुकंप्या मी स्वयंवरा म्हणती ॥
गांधर्वेण विवाहेन बह्वो राजर्षिकन्यकाः ।
श्रूयन्ते परिणीतास्ताः पितृभिश्चाभिनंदिताः ॥

कालेंकरून जो आचार रूढ झाला तो किती अभेद्य असतो. याचें उत्कृष्ट

उदाहरण आमची अलीकडील विवाहपद्धति आहे. आमचा पूर्वीचा इतिहास, परक्या लोकांचें वर्तन, व आमची सांप्रत जागृत झालेली झालेली विचारपद्धति हीं सारीं या अप्रशस्त चालीस प्रतिकूल आहेत, तरी आम्हांस ती झुगारून देण्याचें धैर्य होत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय ? किंवा आश्चर्य तरी कसलें ? " हा आमच्या वडिलांचा कूप, असें म्हणून खारें पाणी पीत बसणारे " आम्ही लोक आहों; तेव्हां जें रूढ झालें तें आम्हांस टाकवत नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. तथापि आमची प्रस्तुतची निकृष्टावस्था आम्हांस नको असेल तर सर्वांच्या अगोदर या अत्यंत अपायकारक प्रघाताचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या खटपटीपासून अनेक फायदे होणार आहेत. ज्याप्रमाणें यूरोपांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट या खिस्ती धर्माच्या दोन पंथांत उत्पन्न झालेल्या वादापासून पुढें महत्त्वाचे अनेक परिणाम घडून आले, त्याप्रमाणें आज जर आपण जाणूनबुजून बालविवाह रद्द करण्याच्या कामीं झटूं लागलों तर त्यापासून अनेक गोष्टी निष्पन्न होणार आहेत. विचारानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका बाबींत केला असतां, जें धैर्य अंगीं येतें तेंच पुढें तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करतें; आणि ही दुसरी गोष्ट करतांना धैर्याचें भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळें, पहिल्या प्रसंगाहून विशेष सुलभ रीतीनें यशःप्राप्ति होते. याप्रमाणें एका गोष्टींत यश आलें, दुसरींत आलें, तिसरींत आलें, असें होतां होतां नवीन नवीन गोष्टी करण्याचें धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याचा पाहिजे त्या कामीं उपयोग करायास उल्हास वाटूं लागतो. उन्हाळयाच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेढीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे; तें प्रत्येक दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट तें कमी होऊं लागलें म्हणजेही भूमितिश्रेढीनेंच कमी होतें ! ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो, त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एखाद्या व्यक्तीच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिकच ग्राशीत जातें ! तेव्हां बालवि[illegible] निकराचा हल्ला करण्यानें प्रथम आम्हांत मानसिक धैर्य उत्पन्न

होईल, व उत्तरोत्तर त्याची वृद्धि होत जाऊन इतर कामांकडेही त्याचा उपयोग करतां येऊं लागेल.

याशिवाय याच खटपटीनें दुसरा एक फायदा होणार आहे तो हा कीं, आज जे आम्ही चोहोंकडून धर्मपाशांनीं अगदीं जखडल्यासारखे झालो आहों त्या आम्हांस त्याच्या 'आशा कोठवर पाळाव्या' हें समजूं लागेल. बालविवाहाचें पूर्ण निर्मूलन आणि स्वयंवराची प्रस्थापना यांच्या दरम्यान बराच धर्मवाद उपस्थित होणार आहे, व तो करण्यानें पुढें पुष्कळ हित होणार आहे. बापाच्या घरीं मुलगी ऋतुस्नात होतां कामा नये व ऋतुस्नात झालेल्या मुलीचें यथासांग गर्भाधान झालेंच पाहिजे, नाहींतर उभय कुलांतील चाळीस पितरांस दुर्गति प्राप्त होते, असल्या अजागळपणाच्या धर्मसमजुतीचा ऱ्हास होईल तितक्या त्वरेनें होणें फार इष्ट आहे. असल्या वेडेपणाच्या समजुतींचा मोक्ष करण्यास पूर्वेतिहास आणि पूर्वाचार हे पुनः पुनः पुढें आणून त्यांचें फिरून अवलंबन करा असें सांगत न बसतां, अलीकडील न्यायाच्या भात्यांतून तीव्र बाण काढून त्यांचा त्यांवर संपात केला पाहिजे. कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे, व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाइटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें, तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेंच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार—अशा धर्तीवर हा वाद केला पाहिजे, व अशा धर्तीवर तो केल्यासच त्यापासून फायदा होणार आहे. एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषि हुडकीत बसण्यांत, व साऱ्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत, कांहीं अर्थ नाहीं. तसलें काम जे. इस्लीकरासारख्या शास्त्र्यांनीं जुन्या पद्धतीच्या लोकांसाठीं

खुशाल करीत बसावें! कोणत्याही विषयाचा ऐतिहासिक पद्धतीनें उहापोह करण्यांत फायदा आहे; नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धति म्हणजे काय, हें मुळींच ठाऊक नाहीं. त्यांना असें वाटतें कीं जगांत म्हणून जेवढें कांहीं ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूंकडे अंधार आहे! व त्यांना असें वाटणें हें कांहीं अंशीं स्वाभाविकही आहे. ज्याअर्थी दुसऱ्या भाषेंतील ज्ञानभांडारांचा गंधही त्यांस लागलेला नाहीं, त्याअर्थी त्यांना त्यांची महती कोठून कळणार? तेव्हां अर्थात् त्यांनीं आपल्यापाशीं असलेल्या छोटेखानी डबोल्यासच अखिल विश्वांतील संपत्समूह समजून त्याच्या महत्वाचे व अद्वितीयत्वाचे पवाडे गात सुटावें, हें साहजिक आहे. पण ज्या आमचे डोळे उघडले आहेत; ज्या आम्हांस हिंदुस्थानच्या बाहेर देश आहेत, व संस्कृत ग्रंथांच्या बाहेर विद्या आहे, हें पक्कें समजत आहे, त्या आम्हींही संकुचितदर्शनाच्या शास्त्रीवैदिकांप्रमाणें किंवा अगदीं मूढ जनांप्रमाणें वागत सुटावें ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे. तेव्हां बालविवाहाचें निर्दालन करण्याचा प्रयत्न आपण मनापासून आरंभिल्यास, बऱ्याच धर्मकल्पनांचें संशोधनही आपणांस करावें लागणार आहे; व या कामीं हें संशोधन करण्यास आरंभ केला, म्हणजे इतर गोष्टींतही तें करण्याची इच्छा होऊं लागेल, व विचाराच्या भट्टींत धर्मांत शिरलेल्या हीण धातू खाक होऊन त्यांतील सारसत्त्वरूप बावन्नकशी सोनें मात्र मागें उरेल!

बालविवाहाचें खंडन म्हणजे स्वयंवराचें मंडन. तेव्हां अर्थात् जे बालविवाहास प्रतिकूल असतील त्यांना स्वयंवरास प्रतिकूल असलेल्या लोकांच्या मतांचें समर्पक खंडन करतां आलें पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप घेतील, कीं बालविवाहापासून एकदम स्वयंवरावरच उडी कशाला मारावयाला पाहिजे? त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, जीं स्वयंवरें नाहींत त्या सर्वांस आम्ही बालविवाह समजतों! ज्याचें त्यानें लग्न करणें म्हणजें स्वयंवर! एकाचें दुसऱ्यानें करणें म्हणजे बालविवाह! अर्धें स्वयंवर आणि अर्धा बालविवाह; अशी लग्नाची पद्धत शक्य नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, फ्रान्स देशांत अशा प्रकारची विवाहपद्धति कांहीं वर्षांमागें रूढ होती. बापानें मुलाकरितां मुलगी पाहून ठेवावी, आणि मुलास ती पसंत झाल्यास

तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, किंवा मुलानें आपल्या मनाजोगी मुलगी पाहून ठेवावी, आणि ती बापास पसंत झाल्यास, तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, ही दिसण्यांत मध्यगामी पद्धत दिसते, व जे लोक बालविवाहांतून निघून स्वयंवराकडे येण्यास निघाले असतील, त्यांना कांहीं वर्षें या पद्धतीपाशीं मुक्काम करावा लागत असेल असें वाटतें! आम्हांत एके काळीं स्वयंवरपद्धति अत्यंत प्रचलित होती, अशाबद्दल पुष्कळ आधार आहे. आम्हांपैकीं बहुतेकांचीं लग्नें अकरांच्या आंतील वयाच्या मुलींशीं झालीं असल्यामुळें, सध्यां येथें बालविवाहाची पद्धत अमलांत आहे, याबद्दल पुरावा देण्याची मुळींच गरज नाहीं! एकदां आम्ही विवाहपर्वताच्या शिखरावर होतो; प्रस्तुत त्याच्या पायथ्याशीं येऊन पडलों आहों. पुनः वर चढून जावें, अशी कित्येकांना इच्छा होऊं लागली आहे; पण कित्येकांना असें वाटत आहे कीं तसें करण्याचा प्रयत्न केला असतां, आम्हांस घेरी येऊन, किंवा आमचा पाय निसरून, आम्ही पुनः पायथ्याशीं गडगडत येऊन पडूं! तेव्हां कित्येकांचें असें म्हणणें पडतें कीं, आपणाला पायथाही नको आणि शिखरही नको; आपण आपले या पर्वताच्या मध्यप्रदेशाला धरून असावें! प्रथमदर्शनी हा सल्ला मोठा नामी दिसतो; व त्याचप्रमाणें आचरण करण्यासही आमची कांहीं हरकत नाहीं. पण मनुष्यस्वभावाचें ज्यास अगदीं सामान्य ज्ञान आहे, तोही असें सांगूं शकेल कीं, मनुष्य हा प्राणी त्याला जी गोष्ट हितावह वाटूं लागली असेल तिचा पक्का छडानिशा केल्याखेरीज रहाणारा नाहीं. मध्य प्रदेशाशीं येऊन ठेपल्यावर आणखी एक टप्पा वर जावें असें त्यास साहजिकपणें वाटूं लागतें. येथें येऊन पोहोंचल्यावर पुनः तोच नाद! याप्रमाणें टप्प्याटप्प्यानें कां होईना, केव्हां तरी शिखरावर जाऊन थडकल्याखेरीज त्याचें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं! 'सामाजिक सुधारणापरिषदे'च्या मनांत जी बालविवाहनिषेधक मंडळी स्थापावयाची आहे, तिच्या पुरस्कर्त्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत १०, १२ व १४ हे जे मुलींच्या वयाचे आंकडे दिले आहेत, ते आमच्या मतें केवळ टप्पे आहेत! यांपैकीं शेवटचा आंकडा आम्हांस बराच पसंत आहे. पण खरें स्वयंवर ज्यांना येथें पुनः स्थापित व्हावयाला पाहिजे

संज्ञा अभेद आहेत, असें कोणीही म्हणूं शकणार नाहीं. ] 'असें जर आहे तर मग राजमार्ग सोडून आड वाटेचें अवलंबन तुम्ही कां करतां? ' असा प्रश्न कोणी करील, त्यास आमचें असें उत्तर आहे कीं, देशाच्या, कालाच्या व व्यक्तीच्या विवक्षित स्थितींत सौम्योपायांचें अवलंबन न करतां, तीव्रोपाय करणेंच विशेष श्रेयस्कर असतें. अगदीं लहान मुलास वेदांताच्या गप्पा सांगून फळ नाहीं. त्याला तोंडाचा किंवा छडीचा धाकच दाखविला पाहिजे. तसेंच, एखाद्यास वेड लागून तो बेफाम झाला, तर त्यावर अगोदर तीव्र उपाय चालवून त्याचा वायु उतरला म्हणजे मग सौम्य औषधींनीं त्याचा रोग समूळ काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याला खून करण्याची खोड लागली आहे त्याला देहांतप्रायश्चित्ताशिवाय दुसरा दंड नाहीं. त्याप्रमाणेंच लोकांच्या आचारांत जेवढा अत्यंत क्रूरपणाचा व अविचाराचा भाग असेल तेवढा साधेल तर तीव्र उपायांनीं नाहींसा करण्यास हरकत नाहीं. आमच्यामधील सतीची चाल अशा प्रकारच्या सक्त उपायांनींच बंद करण्यासारखी होती; व आठदहा वर्षांच्या पोरींच्या गळ्याभोंवतीं विवाहाचे फांस घालून त्यांचा आमरण छल करण्यास प्रवृत्त होणाऱ्या आईबापांचें मूर्खत्वही अशाच रीतीनें बंद करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें आमचें मत आहे. पण तें आमच्या सध्यांच्या नीचावस्थेंत कोणास पसंत पडणार ? सरकार तर बोलून चालून परकें. आम्ही आपल्या मुलींचे व मुलांचे गळे धर्माच्या नांवानें कापण्याचा आग्रहच धरून बसलों तर तसें न करण्यास्तव आम्हांवर सक्ती करून, आमच्या असंतोषानें आपल्या शांतींत व्यत्यय आणून घेण्याची त्यांस काय गरज पडली आहे ? त्यांच्या भूतदयेस व राज्यास कलंक आणण्यासारखी सतीची चाल होती तेवढी त्यांनीं आमच्या अधर्मी धर्मास आणि मूर्ख शहाणपणास एकीकडे गुंडाळून ठेऊन एकदम बंद केली; पण बालविवाहाची चाल तितकी अमानुष नसल्यामुळें त्यांनीं तींत आपलें मन घातलें नाहीं. त्यांना असें वाटलें कीं, शिक्षणाचा प्रसार झाल्यानें ही चाल सहज मोडण्यासारखी आहे. पण आम्ही कसले निगरगट्ट ! सरकार हात घालीत नाहीं, असें दिसल्याबरोबर आम्ही तट्ट फुगून गेलों, व जी गोष्ट सरकारानें केवळ मेहेरबानीखातर केली नाहीं, ती करण्याचा त्यास अधिकार नव्हता, किंवा ती त्यास करतां आली नसती, असें आम्ही प्रपादूं लागलों ! पण जर हे

ब्रिटिश सरकार अकबराप्रमाणें, ऋतु प्राप्त होण्यापूर्वी कोणीही आपल्या कन्येचा विवाह करूं नये, असा कायदा सतीच्या कायद्याबरोबर करून जातें, तर त्यास प्रतिबंध करण्याची आम्हांपैकीं कोणाची तरी प्राज्ञा होती काय ? दूर कशाला ? लॉर्ड ल्यान्सडौन यांनीं ऑफीशिअल सीक्रेट ॲक्टाप्रमाणें उद्यां तसला कायदा कायद्याच्या पिरटांतून एकाएकीं काढला, तर त्यास आड येण्यास आम्हांपैकीं एकाची तरी छाती होणार आहे काय ? " नाहीं देखिलें पंचानना, तोंवरी जंबूक करी गर्जना " अशी आमची स्थिति आहे ! आम्ही इतके धीट आहों कीं, चवदावें रत्न आमच्या दृष्टीस पडलें कीं पुरे; आम्ही आपले पाय लावून पळत सुटलोंच ! ! जशी बाल-विवाहाची, जशी विधवाविवाहाची, तशीच विवाहनिराकरणाची अथवा घटस्फोटाची गोष्ट होय. उद्यां जर सरकारनें असा कायदा केला कीं, ' अज्ञानपणीं आईबापांनीं केलेलें लग्न मला मान्य नाहीं ' अशी फिर्याद कोर्टापुढें कोणी आणील तर कोर्टानें तें रद्द होण्याचा दावा दिला पाहिजे; तर आमचे लोक शुष्क वल्गनेहून विशेष कांहीं करूं शकतील काय ? " सुधारणा मुंगीच्या पायानें होते; उतावीळ सुधारकांचें वर्तन देशाच्या हितास कारण न होतां उलट नुकसानास कारण होतें; चांगल्यावाइटाचा भेदाभेद लोकांस समजू लागून जें वाईट असेल तें त्यांनीं आपण होऊन टाकण्यांत व चांगलें असेल त्याचा स्वीकार करण्यांत त्यांचा विशेष फायदा आहे; सतीच्या कायद्यापासून कोणताही लाभ नाहीं " इत्यादि पोकळ तत्त्व-ज्ञानाच्या लांब लांब गप्पा मारण्यांत मोठें शहाणपण व भूषण आहे, असें आम्हांस वाटतें. पण दहाबारा वर्षांच्या पोरीस किंवा पंधरासोळा वर्षांच्या पोरास संसाराचे विंचू लावण्यांत, ज्या कन्यांना ऋतु देखील प्राप्त झाला नाहीं अशांस वैधव्याग्नीनें पोळण्यांत, अथवा एखादी जाईची कळी निखडुं-गावर, किंवा सोनचाफ्याचें फूल कोरांटीवर, आणून टाकण्यांत काय शहाण-पण व भूषण असेल तें असो !

---

## घटस्फोट अथवा काडीमोड : : : १०

या विषयावरील मागल्या अंकांतले आर्टिकल प्रसिद्ध झाल्यापासून

आमच्याकडे जीं पत्रें आलीं आहेत, त्यांपैकीं कांहींत असा प्रश्न केला आहे कीं, याच प्रसंगीं हा वादग्रस्त विषय आम्हीं उपस्थित केला याचें कारण काय ? लौकरच " सामाजिक सुधारणा परिषद् " बालविवाहाच्या निषेधार्थ मंडळी स्थापन करून ती नोंदविणार आहे, व त्या मंडळीचे सभासद होऊं इच्छिणाऱ्या लोकांच्या सह्या घेण्याचा प्रयत्न चालू आहे. मुंबई ग्याझिटानेंसुद्धां या मंडळीची स्तुति केली आहे, व हिनें आरंभिलेला उद्योग तडीस गेल्यास या प्रांतांतील लोकांचें पुष्कळ हित होणार आहे, असें म्हटलें असून आम्ही ही 'खाजवून नवी खरूज' कशासाठीं काढतों ? 'टेबलापाशीं बसून इवे तसे तारे तोडणारांच्या तब्येतीप्रमाणें किंवा इच्छेप्रमाणें समाजाची गति होत नसते; समाजाची स्थिति भरलेल्या गाड्यासारखी आहे. तो टपालाच्या टांग्याच्या वेगानें कधींही जाऊं शकणार नाहीं. त्याला ओढणारीं तट्टें फार बुजरट असतात; त्यांच्याकडून समाजशकट ओढण्याचें काम करून घ्यावयाचें असेल, तर त्यांना गोंजारून व चुचकारून तें त्यांकडून करून घेतलें पाहिजे. त्यांच्यावर विनाकारण शब्दप्रतोदप्रहार केल्यास, व त्यांना भेडावून सोडल्यास, तीं जूं फेंकून देऊन चार दिशांस उधळून जातील, किंवा शकटाशीं धिंगाणा घालून त्याची मोडतोड करतील ! सबब, जें करणें व बोलणें तें धिमेपणाचें असलें पाहिजे. ज्या गोष्टी लोकांच्या हातून आज होण्याचा संभव नाहीं, त्या त्यांच्यापुढें आणून त्यांना भिवविण्यांत काय अर्थ आहे ? "उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग" असें करण्यांत कोणाचाही फायदा नाहीं. सबब, दुसरे लोक लग्नाची मर्यादा बेताबातानें वाढविण्याचे सौम्य उपाय करूं लागले असतां आम्ही स्वयंवराच्या आणि घटस्फोटाच्या वादविवादांत पडणें बरोबर नाहीं. किल्ल्याचा पहिला तट सर केल्यावर, त्यावर उभें राहून दुसरा तट घेण्याच्या मसलती चालवाव्या, कीं पायथ्यापाशीं उभें राहून त्याच्या अत्युच्च प्रदेशावर निशाण कसें फडकवितां येईल, हें घाटींत बसावें ? '

चांगल्यावाइटाची निवडानिवड करण्याची ज्यांना शक्ति नाहीं, किंवा इच्छा नाहीं; नवीन गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें म्हणजे कड्याखालीं उडी घेणें, असें ज्यांस वाटल्याशिवाय रहात नाहीं; जें बरें दिसेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य ज्यांचे अंगीं वसत नाहीं; गतानुगतिकत्व हें ज्यांच्या

वर्तनाचें आदितत्त्व; चरितार्थसंपादन, द्रव्यार्जन, व विषयोपभोग यांतच मनुष्यकर्तव्यतेची परमावधि आहे, असा ज्यांचा निश्चल समज; जुन्या कल्पनांची व आचारांची ज्यांच्या पायांस घट्ट मगरमिठी पडली आहे; व कोणी तरी फरफरून ओढल्याशिवाय ज्यांना आपल्या नित्यकर्दमांतून बाहेर पडण्याची इच्छा व्हावयाची नाहीं—अशा लोकांकडून वरच्यासारखा कोटिक्रम होत असतो. त्यांच्या मतें समाजाच्या प्रकृतींतच आपल्या आपण पुढें सरण्याचें गूढ सामर्थ्य आहे! त्याच्या घटकांपैकीं कोणीही हालला नाहीं, तरी जसजसे दिवस लोटत जातील तसतसा तोही पुढें लोटत गेलाच पाहिजे! पण या अद्वितीय पंडितांना असें समजत नाहीं कीं, समाज ही कांहीं स्वतंत्र मूर्तिमंत वस्तु नाहीं. समाजांतील घटक हालले तर समाज हालतो, ते मंदावले तर तो मंदावतो, आणि ते मागें हटूं लागले तर तो मागें हटतो! त्यांची उन्नति ती याची उन्नति, व त्यांची अधोगति आणि ऱ्हास ती याची अधोगति आणि ऱ्हास. "मी स्वस्थ बसेन, बाकीच्यांनीं मात्र उद्योग करावा," असें जर समाजांतील प्रत्येक घटक म्हणूं लागेल, तर त्याचें पाऊल बिलकूल पुढें पडणार नाहीं, हें उघड आहे. तसेंच अमुक प्रकारचें आचरण साऱ्यांनीं करावें व अमुक प्रकारचें बोलणें साऱ्यांनीं बोलावें, असा नियम करण्यापासूनही समाजाचा फायदा न होतां, उलट मोठें नुकसान होण्याचा संभव आहे. बुद्धि ही कांहीं सर्वांस सारखी वाटलेली नाहीं. कोणाच्या डोक्यांतून केव्हां काय कल्पना निघेल, आणि तीपासून समाजाचा केवढा फायदा होणार असेल, निदान ती कितीजणांना ग्राह्य होण्यासारखी असेल, हें निश्चयात्मक कधींही सांगतां येण्यासारखें नाहीं. सबब, सभ्यपणाची मर्यादा न सोडतां, समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्यानें उघडपणें बोलून दाखविणें यांतच समाजाचें कल्याण आहे. शिवाय, ज्या मतांस आपण तऱ्हेवाईक मतें असें म्हणतों, तीं त्यांच्या नवीनत्वामुळें बहुधा तऱ्हेवाईक वाटतात. तीं पुनः पुनः कानांवर पडूं लागलीं म्हणजे त्यांचा धाक वाटेनासा होऊन, हळू हळू त्यांतील गुणावगुणाचा विचार करण्याची बुद्धि होऊं लागते, आणि अखेरीस त्यांपैकीं जीं पसंत पडतील तीं अंगीकारण्याची इच्छा होते. दुसरें, समाजांतील सामान्य मनुष्यांपैकीं एखाद्यास जर कांहीं विशिष्ट मतें बरीं

वाटलीं तर तीं तशीं वाटण्यासारखे दुसरे पुष्कळ लोकही त्या समाजांत असले पाहिजेत, असें सिद्ध होतें. ज्याप्रमाणें भाताच्या एक दोन शितांवरून सारा भात शिजला आहे किंवा नाहीं, हें सांगतां येतें, त्याप्रमाणें समाजांतील पांचचार गृहस्थांच्या बोलण्याच्या व लिहिण्याच्या झोंकावरून, त्याचा मगदूर कसा काय आहे याचें अनुमान करतां येतें. सुधारकांत स्वयंवर हा विवाहाचा सर्वोत्तम मार्ग असें प्रतिपादण्यांत येणें यावरून त्याच्या चालकांचें तऱ्हेवाईकपण सिद्ध होत नाहीं, तर स्वयंवरपद्धति बरी असें वाटण्यास ज्या प्रकारचीं मतें असलीं पाहिजेत, तसलीं मतें या देशांत बरींच आहेत, व पुष्कळ सहज तशीं होण्यासारखीं आहेत, असें सिद्ध होतें. पण क्षणभर वादासाठीं असेंही मानिलें कीं, वास्तविक स्थिति अशी नाहीं, तरी सुद्धां आम्हांस जें बरें दिसत आहे तें आम्हीं कां न बोलावें, हें आम्हांस समजत नाहीं. ज्या कारणांनीं आमच्या देशाच्या पाठीमागें आज कित्येक युगें दास्यचक्र लागलें आहे; ज्या कारणांनीं आमच्या अंगीं स्त्रैण्य आलें आहे; ज्या कारणांनीं आमची संसारयात्रा अत्यंत नीरस किंवा कष्टावह झाली आहे; ज्या कारणांमुळें इतर राष्ट्रें आमची छीः थूः करीत आहेत, व ज्या कारणांमुळें आम्ही बुद्धीनें, नीतीनें, व शरीरसामर्थ्यानें अधिकाधिक क्षीण होत असून, थोड्या वर्षांत आमचा मुळींच मागमूस नाहींसा होईल कीं काय, अशी भीति वाटत आहे, तीं कारणें अल्प समजुतीच्या, कोत्या विचाराच्या स्वार्थी, भेकड, किंवा मत्सरी लोकांच्या दूषणाला भिऊन उघड सांगण्यास कचरणारे सारेच होतील तर या भारतीय समाजाचें किंवा त्यांतील कोणत्याही व्यक्तीचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं. पाण्याच्या धारेस लागलेली नाव झपाट्यानें खालीं जाऊं लागली असतां, तींतील एका व्यक्तीसच कोणत्याही तीरास कसें लागतां येणार ? समाज सोडून दिल्याखेरीज त्याच्या उन्नतीचे व अधोगतीचे वांटेकरी न होणें हें अशक्य आहे. तेव्हां केवळ स्वार्थदृष्टीनें जरी या गोष्टीचा विचार केला, तरीही हें कबूल करावें लागतें कीं, ज्याच्या मनांत समाजांत राहून आपली उन्नति करून घ्यावी अशी उत्कट इच्छा झाली असेल त्यानें अगोदर समाजाची उन्नति करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजच खालीं खालीं जात असेल तर हाच वर कोठून येणार ?

येणेंप्रमाणें अनेक गोष्टी मनांत आणून प्रस्तुत विषय आम्ही हातीं घेतला आहे. तो सध्यांच हातीं घेण्याचें कारण येवढेंच कीं, 'सामाजिकसुधारणा-परिषदे' कडून बालविवाहनिषेधार्थ जी खटपट चालली आहे तीपासून आमच्या समजुतीप्रमाणें विशेष फायदा होण्याचा संभव नाहीं. सर्व लोकांनीं दहा वर्षांच्या आंत मुलींचें आणि सोळा वर्षांच्या आंत मुलांचें लग्न करावयाचेंच नाहीं असा निश्चय केला असतां त्या यत्तेखालच्या कोणत्याही वर्षाच्या मुलीचा विवाह होऊन तिचा नवरा मेला असतां, तीवर जें वैधव्यसंकट येत असे, तेवढें या अल्पनिषेधानें टळणार आहे; म्हणजे दहा वर्षांपुढें मुलींचीं लग्नें होऊं लागल्यास सात आठ किंवा नऊ वर्षांच्या पोरींच्या कपाळाचें वैधव्य तेवढें टळेल. हळू हळू बारा वर्षांची इयत्ता रूढ झाल्यास आणखी कांहींची आपदा वांचेल पण दहा आणि बारा या दोन आंकड्यांच्या दरम्यानच जोंपर्यंत आम्ही भटकत आहों तोंपर्यंत प्रौढ वयांत वधूवरांनीं स्वसंमतीनें एकमेकांस वरल्यापासून होणाऱ्या गृहस्थावस्थेंतील अनुपमेय सुखाचा लाभ, आणि त्यामुळें समाजाच्या सविस्तर घटनेवर होणारे हितकारक परिणाम यांचा प्रादुर्भाव येथें कसा होऊं लागणार? बारापासून चौदावर आम्ही कसे जाणार? या दोहोंच्या दरम्यान धर्मानें जी अटकनदी घातली आहे ती कशी उतरणार? हवें तें करून ती उतरून पलीकडे जाण्याचा निर्धार केल्याखेरीज, बालविवाह-निषेधार्थ केलेल्या तुमच्या लुटुपुटीच्या उपायापासून कांहींएक तात्त्विक फायदा होण्याची बिलकूल आशा नाहीं.

---

## स्वयंवर : : ११

विदुषी म्हणे म्हणा जा जरि कथिलें म्यां परोपरी पण ती ।
प्रणति प्रभूसि करितां अनुकंप्या मी स्वयंवरा म्हणती ॥
गांधर्वेण विवाहेन बहवो राजर्षिकन्यकाः ।
श्रूयन्ते परिणीतास्ताः पितृभिश्चाभिनंदिताः ॥

कालेंकरून जो आचार रूढ झाला तो किती अभेद्य असतो. याचें उत्कृष्ट

उदाहरण आमची अलीकडील विवाहपद्धति आहे. आमचा पूर्वीचा इतिहास, परक्या लोकांचें वर्तन, व आमची सांप्रत जागृत झालेली झालेली विचारपद्धति हीं सारीं या अप्रशस्त चालीस प्रतिकूल आहेत, तरी आम्हांस ती झुगारून देण्याचें धैर्य होत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय ? किंवा आश्चर्य तरी कसलें ? "हा आमच्या वडिलांचा कूप, असें म्हणून खारें पाणी पीत बसणारे" आम्ही लोक आहों; तेव्हां जें रूढ झालें तें आम्हांस टाकवत नाहीं, यांत कांहीं नवल नाहीं. तथापि आमची प्रस्तुतची निकृष्टावस्था आम्हांस नको असेल तर सर्वांच्या अगोदर या अत्यंत अपायकारक प्रघाताचें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या खटपटीपासून अनेक फायदे होणार आहेत. ज्याप्रमाणें यूरोपांत क्याथोलिक व प्रॉटेस्टंट या खिरती धर्माच्या दोन पंथांत उत्पन्न झालेल्या वादापासून पुढें महत्त्वाचे अनेक परिणाम घडून आले, त्याप्रमाणें आज जर आपण जाणूनबुजून बालविवाह रद्द करण्याच्या कामीं झटूं लागलों तर त्यापासून अनेक गोष्टी निष्पन्न होणार आहेत. विचारानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका बाबींत केला असतां, जें धैर्य अंगीं येतें तेंच पुढें तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करतें; आणि ही दुसरी गोष्ट करतांना धैर्याचें भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळें, पहिल्या प्रसंगाहून विशेष सुलभ रीतीनें यशःप्राप्ति होते. याप्रमाणें एका गोष्टींत यश आलें, दुसरींत आलें, तिसरींत आलें, असें होतां होतां नवीन नवीन गोष्टी करण्याचें धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याचा पाहिजे त्या कामीं उपयोग करायास उल्हास वाटूं लागतो. उन्हाळयाच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेढीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे; तें प्रत्येक दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट तें कमी होऊं लागलें म्हणजेही भूमितिश्रेढीनेंच कमी होतें ! ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो, त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एखाद्या व्यक्तीच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिकच ग्रासीत जातें ! तेव्हां बालविवाहावर निकराचा हल्ला करण्यानें प्रथम आम्हांत मानसिक धैर्य उत्पन्न

होईल, व उत्तरोत्तर त्याची वृद्धि होत जाऊन इतर कामांकडेही त्याचा उपयोग करतां येऊं लागेल.

याशिवाय याच खटपटीनें दुसरा एक फायदा होणार आहे तो हा कीं, आज जे आम्ही चोहोंकडून धर्मपाशांनीं अगदीं जखडल्यासारखे झालों आहों त्या आम्हांस त्याच्या 'आशा कोठवर पाळाव्या' हें समजूं लागेल. बालविवाहाचें पूर्ण निर्मूलन आणि स्वयंवराची प्रस्थापना यांच्या दरम्यान बराच धर्मवाद उपस्थित होणार आहे, व तो करण्यानें पुढें पुष्कळ हित होणार आहे. बापाच्या घरीं मुलगी ऋतुस्नात होतां कामा नये व ऋतुस्नात झालेल्या मुलीचें यथासांग गर्भाधान झालेंच पाहिजे, नाहींतर उभय कुलांतील चाळीस पिढ्यांस दुर्गति प्राप्त होते, असल्या अजागळपणाच्या धर्मसमजुतीचा ऱ्हास होईल तितक्या त्वरेनें होणें फार इष्ट आहे. असल्या वेडेपणाच्या समजुतींचा मोक्ष करण्यास पूर्वेतिहास आणि पूर्वाचार हे पुनः पुनः पुढें आणून त्यांचें फिरून अवलंबन करा असें सांगत न बसतां, अलीकडील न्यायाच्या भात्यांतून तीव्र बाण काढून त्यांचा त्यांवर संपात केला पाहिजे. कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे; पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे, व त्याच्याशीं त्यांचा जितका संबंध होता तितकाच आमचाही आहे; बऱ्यावाइटाची निवडानिवड करण्याची जितकी बुद्धि त्यांना होती तितकी किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे; अनुज्ञासाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचेंही कळवळत आहे; सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यास होतें, तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक ज्ञान आम्हांस आहे; सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेंच आम्ही पालन करणार, व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार—अशा धर्तीवर हा वाद नेला पाहिजे, व अशा धर्तीवर तो नेल्यासच त्यापासून फायदा होणार आहे. एका ऋषींविरुद्ध दुसरा ऋषि हुडकीत बसण्यांत, व सांच्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत, कांहीं अर्थ नाहीं. तसलें काम वे. हळकीकरासारख्या शास्त्रपांनीं जुन्या पद्धतीच्या लोकांसाठीं

खुशाल करीत बसावें! कोणत्याही विषयाचा ऐतिहासिक पद्धतीनें ऊहापोह करण्यांत फायदा आहे; नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. पण आमच्या बहुतेक जुन्या पंडितांस ऐतिहासिक पद्धति म्हणजे काय, हें मुळींच ठाऊक नाहीं. त्यांना असें वाटतें कीं जगांत म्हणून जेवढें कांहीं ज्ञान आहे तेवढें संस्कृत भाषेंतील ग्रंथसमूहांत भरलेलें आहे. त्याच्या बाहेर चहूंकडे अंधार आहे! व त्यांना असें वाटणें हें कांहीं अंशीं स्वाभाविकही आहे. ज्याअर्थी दुसऱ्या भाषेंतील ज्ञानभांडारांचा गंधही त्यांस लागलेला नाहीं, त्याअर्थी त्यांना त्यांची महती कोठून कळणार? तेव्हां अर्थात् त्यांनीं आपल्यापाशीं असलेल्या छोटेखानी डबोल्यासच अखिल विश्वांतील संपत्समूह समजून त्याच्या महत्वाचे व अद्वितीयत्वाचे पवाडे गात सुटावें, हें साहजिक आहे. पण ज्या आमचे डोळे उघडले आहेत; ज्या आम्हांस हिंदुस्थानच्या बाहेर देश आहेत, व संस्कृत ग्रंथांच्या बाहेर विद्या आहे, हें पक्कें समजत आहे, त्या आम्हींही संकुचितदर्शनाच्या शास्त्रीवैदिकांप्रमाणें किंवा अगदीं मूढ जनांप्रमाणें वागत सुटावें ही मोठ्या लाजेची गोष्ट आहे. तेव्हां बालविवाहाचें निर्दालन करण्याचा प्रयत्न आपण मनापासून आरंभिल्यास, बऱ्याच धर्मकल्पनांचें संशोधनही आपणांस करावें लागणार आहे; व या कामीं हें संशोधन करण्यास आरंभ केला, म्हणजे इतर गोष्टींतही तें करण्याची इच्छा होऊं लागेल, व विचाराच्या भट्टींत धर्मांत शिरलेल्या हीण धातू खाक होऊन त्यांतील सारसत्त्वरूप बावन्नकशी सोनें मात्र मागें उरेल!

बालविवाहाचें खंडन म्हणजे स्वयंवराचें मंडन. तेव्हां अर्थात् जे बालविवाहास प्रतिकूल असतील त्यांना स्वयंवरास प्रतिकूल असलेल्या लोकांच्या मतांचें समर्पक खंडन करतां आलें पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप घेतील, कीं बालविवाहापासून एकदम स्वयंवरावरच उडी कशाला मारावयाला पाहिजे? त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, जीं स्वयंवरें नाहींत त्या सर्वांस आम्ही बालविवाह समजतों! ज्याचें त्यानें लग्न करणें म्हणजे स्वयंवर! एकाचें दुसऱ्यानें करणें म्हणजे बालविवाह! अर्धें स्वयंवर आणि अर्धा बालविवाह; अशी लग्नाची पद्धत शक्य नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, फ्रान्स देशांत अशा प्रकारची विवाहपद्धति कांहीं वर्षांमागें रूढ होती. बापानें मुलाकरितां मुलगी पाहून ठेवावी, आणि मुलास ती पसंत झाल्यास

तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, किंवा मुलानें आपल्या मनाजोगी मुलगी पाहून ठेवावी, आणि ती बापास पसंत झाल्यास, तिचा त्याच्याशीं विवाह व्हावा, ही दिसण्यांत मध्यगामी पद्धत दिसते, व जे लोक बालविवाहांतून निघून स्वयंवराकडे येण्यास निघाले असतील, त्यांना कांहीं वर्षे या पद्धतीपाशीं मुक्काम करावा लागत असेल असें वाटतें ! आम्हांत एके काळीं स्वयंवरपद्धति अत्यंत प्रचलित होती, अशाबद्दल पुष्कळ आधार आहे. आम्हांपैकीं बहुतेकांचीं लग्नें अकरांच्या आंतील वयाच्या मुलींशीं झालीं असल्यामुळें, सध्यां येथें बालविवाहाची पद्धत अमलांत आहे, याबद्दल पुरावा देण्याची मुळींच गरज नाहीं ! एकदां आम्ही विवाहपर्वताच्या शिखरावर होतो; प्रस्तुत त्याच्या पायथ्याशीं येऊन पडलों आहों. पुनः वर चढून जावें, अशी कित्येकांना इच्छा होऊं लागली आहे; पण कित्येकांना असें वाटत आहे कीं तसें करण्याचा प्रयत्न केला असतां, आम्हांस घेरी येऊन, किंवा आमचा पाय निसरून, आम्ही पुनः पायथ्याशीं गडगडत येऊन पडूं ! तेव्हां कित्येकांचें असें म्हणणें पडतें कीं, आपणाला पायथाही नको आणि शिखरही नको; आपण आपले या पर्वताच्या मध्यप्रदेशाला धरून असावें ! प्रथमदर्शनीं हा सल्ला मोठा नामी दिसतो; व त्याचप्रमाणें आचरण करण्यासही आमची कांहीं हरकत नाहीं. पण मनुष्यस्वभावाचें ज्यास अगदीं सामान्य ज्ञान आहे, तोही असें सांगूं शकेल कीं, मनुष्य हा प्राणी त्याला जी गोष्ट हितावह वाटूं लागली असेल तिचा पक्का हहानिशा केल्याखेरीज रहाणारा नाहीं. मध्य प्रदेशाशीं येऊन ठेपल्यावर आणखी एक टप्पा वर जावें असें त्यास साहजिकपणें वाटूं लागतें. येथें येऊन पोहोंचल्यावर पुनः तोच नाद ! याप्रमाणें टप्प्याटप्प्यानें कां होईना, केव्हां तरी शिखरावर जाऊन थडकल्याखेरीज त्याचें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं ! 'सामाजिक सुधारणापरिषदे'च्या मनांत जी बालविवाहनिषेधक मंडळी स्थापावयाची आहे, तिच्या पुरस्कर्त्यांनीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत १०, १२ व १४ हे जे मुलींच्या वयाचे आंकडे दिले आहेत, ते आमच्या मतें केवळ टप्पे आहेत ! यांपैकीं शेवटचा आंकडा आम्हांस बराच पसंत आहे. पण खरें स्वयंवर ज्यांना येथें पुनः स्थापित व्हावयाला पाहिजे

आहे, त्यांना तो पसंत होण्यासारखा नाहीं. पण त्यांत एक विशेष आहे तो हा कीं, त्या वर्षापर्यंत जे आपल्या मुली अविवाहित ठेवण्यास राजी होतील त्यांनीं धर्मानें घातलेली अटकनदी उतरण्याचें कांहीं तरी साधन आपल्या मनाशीं तयार करून ठेवलें असावें, हें उघड आहे. बहुतेक हिंदु मुली १४ वर्षांच्या आंत ऋतुमती होतात, हें निर्विवाद आहे. तेव्हां १४ च्या आंतील वयाच्या मुलीचें लग्न न करण्याबद्दल शपथ घेणें, म्हणजे नहाण आलेल्या मुलीचें लग्न करण्याविषयीं शपथ घेणें होय! पण असे त्या पत्रकांत किती आहेत?

---

## प्रियाराधन : : : : १२

अन्नसेवनानें व्यक्तिसंरक्षण होतें व स्त्रीपुरुषसमागमानें जातिरक्षण होतें. प्रकृति व पुरुष किंवा परब्रह्म आणि माया यांचा संयोग झाला तेव्हां जगदुत्पत्ति झाली व जें समागमतत्त्व जगाच्या आद्योत्पत्तीस कारण झालें, तेंच त्यांतील चैतन्योत्पत्तीस कारण होत आहे. आकर्षण आणि निराकरण, किंवा स्नेह आणि द्वेष या दोन अनादि सामर्थ्यांमुळें जगांतील चैतन्यबीजापासून प्राणिवर्ग कसा उत्पन्न झाला व त्याच्या जाति आणि उपजाति कशा होत गेल्या, हें अलीकडील पुष्कळ युरोपीय ग्रंथकारांनीं दाखविलें आहे. पण परवा आमच्या वाचण्यांत एक लेख आला, त्यांत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता कीं, **स्वयंवराची** पद्धति प्राणिवर्गांतच दृष्टीस पडते असें नाहीं, तर कांहीं प्रकारच्या वनस्पतींतही दृष्टीस पडते! व चांगला शोध केला असतां, सर्व वनस्पतिवर्गासही ही पद्धत लागू आहे, असें कदाचित् दिसून येईल! युरोपांत व अमेरिकेंत होत असलेल्या असल्या विलक्षण शोधाचें वर्तमान ऐकून तरी आमचे लोक आपल्या विवाहपद्धतीकडे विचारपूर्वक पाहूं लागतील काय? स्त्रीझाडांचा पुरुषझाडांशीं, अन्योन्यांच्या संमतीशिवाय संयोग होत नाहीं व ती संमति मिळविण्यासाठीं तीं अतोनात प्रयत्न करीत असतात, हें सिद्ध होईल तर आम्ही अप्रबुद्ध झालों आहों, असें म्हणावें लागणार नाहीं काय? अन्नापासून प्राणत्राण होतें, तेव्हां चांगलें

अन्न सेविलें असतां चांगली शरीरपुष्टि होईल, व निःसत्त्व अन्नाचें सेवन केलें असतां, शरीरास क्षीणता येईल, हें पोरासोरास देखील समजण्यासारखें आहे. "अन्नमयप्राणः" व "प्राणमयपराक्रमः" ह्या दोन म्हणी या देशांत सर्वतोमुखीं झाल्या आहेत त्या अगदीं योग्य आहेत. आतां प्राणरक्षणाशीं अन्नसेवनाचा जितका संबंध आहे, तितकाच जातिरक्षणाशीं स्त्रीपुरुषसमागमाचा आहे, हें कोणीही कबूल करील; तसेंच हा समागम अत्यंत फलप्रद होण्यास म्हणजे त्यापासून विस्तृत जात्युत्पत्ति होण्यास, तो जसा व्हावा तसा झाला पाहिजे, हेंही प्रत्येक सुविचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे. वनस्पतींत व मनुष्याशिवाय इतर प्राण्यांत स्त्रीपुरुष किंवा नरमादी यांच्या संयोगांचे नेमलेले काळ किंवा ऋतु आहेत. ते काळ किंवा ऋतु प्राप्त झाल्याशिवाय, त्यांत संयोग होऊं शकत नाहीं, व संयोग न झाल्यामुळें संतानोत्पत्तिही होऊं शकत नाहीं. मनुष्याप्रमाणें त्यांतही हा संयोगकाल अत्यंत सुखावह असला पाहिजे, असें त्यांच्या त्या वेळच्या स्वरूपावरून व बाह्य वर्तनावरून स्पष्ट दिसतें. वसंत ऋतूच्या सुमारास बहुतेक झाडें किती मनोरम दिसूं लागतात हें पुष्कळांच्या पहाण्यांत असेलच; तसेंच पानांचा, फुलांचा व फळांचा बहार देऊन गेला म्हणजे तीं किती फिकट व निस्तेज दिसतात, हेंही पुष्कळांनीं पाहिलें असेल. कांहीं झाडें व किडे यांची संतानोत्पत्ति झाली म्हणजे त्यांचें चैतन्यसाफल्य होतें आणि त्यांच्या अस्तित्वाचा शेवट होतो. बहुतेक सारीं गवतें अशाच प्रकारचीं आहेत. जीं झाडें व जे प्राणी असे नाहींत, त्यांत दुसऱ्या प्रकारचे धरबंध आहेत. आम्हीं सुबुद्ध मनुष्यांनीं मात्र या कामीं अगदीं ताळ सोडिला आहे, व त्यांतल्या त्यांत आम्हां हिंदु लोकांनीं तर बेतालपणाची परमावधी केली आहे. सृष्टिनियम आपला अंमल थोडाबहुत आम्हा ज्ञानवान् मनुष्यजातीवरही चालवितात म्हणून बरें आहे, नाहीं तर आम्हीं शहाण्या हिंदु लोकांनीं एक महिन्याची मुलगी आणि दीड महिन्याचा मुलगा यांच्या गर्भाधानाचा सोहळा पहाण्यास सोडिलें नसतें! किंवा नव्वद वर्षांच्या थेरड्याबरोबर नव्वद दिवसांच्या पोरींचीं लग्नें लावून देऊन त्यांच्या 'अशुभाची' आणि 'अमंगलाची' मोठ्या उत्कंठेनें किंवा 'सावधान' चित्तानें वाट पहात बसलों असतों! पण काय करावें! महिन्याच्या पोरीच्या डोहाळ-

जेवणाचा समारंभ करण्यास सृष्टिनियम परवानगी देत नाहींत, यामुळें आमचा अगदीं नाइलाज होऊन गेला आहे! तथापि त्यांचें निराकरण आमच्या हातून जितकें होईल तितकें करण्याची आम्ही आपल्याकडून होईल तितकी काळजी घेत आहों. कित्येक गृहस्थ व बायका आपणांस पुढें होणाऱ्या मुलांच्या व मुलींच्या लग्नाचे ठराव, आपणांस मुलें होणार आहेत किंवा नाहींत, हें सिद्ध होऊं लागण्यापूर्वींच करीत असतात! व कांहींजण गर्भांतल्या पोरींचे व गर्भांतल्या पोरांचे वाग्निश्चय करून ठेवतात! व कांहीं-जण एक संवत्सराच्या आंत आपल्या संततीकडून पाणिग्रहण करवितात! अशा रितीनें तयार केलेलीं दादलाबायलें एके ठिकाणीं होतील केव्हां, आणि आपल्याप्रमाणें त्यांनाही गर्भांतल्या आणि बाहेरच्या पोरांच्या लग्नाचे ठराव करण्याचा नाद लागेल केव्हां-यांविषयीं येथील स्त्रीपुरुषांस पराकाष्ठेची आतुरता उत्पन्न झालेली असते! इतक्यांत सून किंवा कन्या ऋतुमती झाली म्हणजे मग त्या आनंदास काय पारावार! मुलीच्या बाजूनें मुलगा होण्याच्या या शक्यतेस 'मुलगा झाला' असें मानून, आप्तमित्रांस साखरेसह ही आनंदाची खबर द्यावयाची, आणि ताबडतोब मखराच्या आणि गर्भा-धानाच्या तयारीस लागावयाचें! सोळा दिवसांच्या आंत मुहूर्त पहाण्याचीही गरज नाहीं, असा शास्त्रार्थ आहे! मग लौकर लौकर सारी सिद्धता करून व जमतील तेवढे उभय पक्षांकडील लोक गोळा करून, त्या अवकाशाच्या आंत भटांनीं, आईबापांनीं, घरच्या व परघरच्या लहानमोठ्या बायांनीं, समवयस्क मित्रांनीं व मैत्रिणींनीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत होमहवनांत, ओंटया हळदकुंकवांत व जेवणफराळांत दिवस व रात्रीचा पूर्वभाग घालवून, दहा अकरांच्या सुमारास, ज्यांच्या अंगावरून कामवासनेची कधीं झुळूकही गेली नसेल, अशा दोन पोरांस रत्युपभोगासाठीं विशेष काळजीनें व खर्चानें शृंगारलेल्या अशा एका खोलींत जबरीनें ढकलून देऊन तिचीं दारें लावून घ्यावयाचीं आणि जन्मास येऊन जें पहावयाचें तें पाहिलें व करावयाचें तें केलें, अशा समाधानकारक विचारांत आपआपल्या स्थळीं जावयाचें, आणि मन्मथकारागृहांत कोंडलेल्या त्या पोरांची कशी स्थिति होईल, याच्या चिंतनांत अंथरुणावर अंग टाकून निद्राप्रियेची मर्जी सुप्रसन्न होण्यासाठीं, या अंगावरून त्या अंगावर लोळत रहावयाचें!

याहून स्त्रीपुरुषांच्या रतिसुखाचा भंडवडा आणि मातेरें करण्याची अधिक मूर्खपणाची रीत शक्य किंवा कल्पनीय असेल काय? ज्यांना या रीतींतील मूर्खपण कळत नाहीं व ज्यांना तदनुसार वर्तन करणें हेंच आपलें कर्तव्य आहे, असें वाटत आहे, त्यांना क्षमा केली पाहिजे. पण ज्या आम्हा अलीकडील सुशिक्षित लोकांस अशा अप्रौढ वयांत, कामविकार जागृत होण्यापूर्वी, बारा तेरा वर्षांच्या मुलींस व सोळासतरा वर्षांच्या मुलांस या नादीं लावण्यापासून त्यांचें किती नुकसान होतें, हें आमच्या देशाच्या 'पूर्वेतिहासाच्या वाचनानें व इतर लोकांच्या उदाहरणानें स्पष्टपणें कळूं लागलें आहे, त्या आम्हीही ही निंद्य चाल एकदम नाहींशी करण्याचा प्रयत्न करूं नये, व 'दहा बारा' आणि 'सोळा अठरा' करीत बसावें, ही अत्यंत शरमेची गोष्ट नाहीं काय! फ्रान्स जर्मनी, रशिया, इतली, ग्रीस, पोर्तुगाल, ऐर्लंड व ब्रॅझील येथील लोकांनीं राजकीय हक्क संपादण्यासाठीं केलेल्या व चालविलेल्या खटपटी पाहून, आम्हांसही महाजनसभा, सार्वजनिकसभा, प्रेसिडेन्सी असोसिएशन, इंडिया असोसिएशन--व साऱ्यांवर ताण करणारी पंचसांवत्सरिक राष्ट्रीयसभा-असल्या मंडळ्या स्थापण्यांत आपण मोठा पुरुषार्थ केला, असें वाटूं लागलें आहे! पण आमच्या मतें हा वृथा भ्रम आहे. आम्हीं अद्यापि टिकाऊ असें कांहींएक केलेलें नाहीं. या साऱ्या सभा पोकळ झाले आहेत! हे केव्हां थंडे होतील याचा भरंवसा नाहीं! राष्ट्राची खरी मजबुती कुटुंबाच्या आणि त्यांतील व्यक्तींच्या मजबुतीवर सर्वथैव अवलंबून आहे. त्या कुटुंबाची व त्याच्या लहान मोठ्या अवयवांची स्थिति जोंपर्यंत आतां आहे तशीच राहील, तोंपर्यंत राज्य, धर्म, नीति, उद्योग यांपैकीं कोणत्याही गोष्टींत आमचें पाऊल वास्तविकपणें पुढें पडलें असें कधींही म्हणतां येणार नाहीं! ज्या लोकांना कोणी तरी पसंत केलेल्या बायका चालतात; ज्या लोकांना रत्युपभोगासाठीं दुसऱ्यांनीं कोंडून घालावें लागतें; ज्या लोकांना ज्ञानसंपादन, द्रव्यसंपादन, लौकिकसंपादन, सामर्थ्यसंपादन, विषयसौख्यरसज्ञानसंपादन, यांपैकीं कोणतीही गोष्ट कमाविण्यापूर्वी, 'अबलेचा संभोग' करण्याची चटक लागली आहे, व ज्यांच्या हातून या पापामुळें प्रतिदिवशीं प्रेमाचे हजारों खून पडत आहेत, शारीरिक व मानसिक अनंत यातना भोगाव्या लागत आहेत, विद्या व वित्त संपादण्याची

बिलकुल कुवत राहिलेली नाहीं, खऱ्या जातिविशिष्टसुखाची कल्पना ज्यांच्या स्वप्नांतसुद्धां कधीं येत नाहीं, ज्यांना संसार असार होऊन गेला आहे, व आयुष्य हें ज्यांना दुर्वह ओझ्यासारखें वाटत आहे, अशा लोकांनीं राष्ट्रीय सभांच्या फंदांत पडून आपल्या मनासारखे राज्यकर्ते वरण्याची इच्छा कशाला धरावी?

---

## वल्लभोपासना : : : : १३

**ती शीतलोपचारीं जागी झाली हळूंच मग बोले॥**
**औषध नलगे मजला! परिसुनि जननी बरें म्हणुनि डोले ॥१॥**

मनुष्याच्या अंतःकरणाची खरी प्रवृत्ति कोणीकडे आहे, हें पहावयाचें असेल तर त्याला नकळत त्याच्या आचरणाचें अवलोकन केलें पाहिजे. कोणी संभावित गृहस्थानें कांहीं वस्तु लांबविली असावी, असा संशय आला असेल तर त्याला "अहो, तुम्ही अमुक वस्तु घेतली आहे काय?" असा प्रश्न विचारला असतां, तो तिचा पत्ता लागूं देईल, असें कधींही व्हावयाचें नाहीं! सबब असा गृहस्थ झोंपेंत काय चावळतो, किंवा गेलेल्या वस्तूविषयीं गोष्टी निघाल्या असतां, त्याची चर्या कशी होते, हें बारकाईनें पाहून, त्यावरून अनुमान बांधावें, असा जो व्यवहारदक्ष वडील माणसें उपदेश करीत असतात, त्यांत बराच ग्राह्यांश आहे! पुस्तक लिहीत असतां, सभेंत बोलत असतां, व दुसऱ्यासमक्ष कांहीं करीत असतां, प्रत्येक मनुष्य स्वतःचें व्यंग उघडें न पडूं देण्याविषयीं आपणाकडून होईल तितकी खबरदारी ठेवीत असतो. त्यामुळें त्याच्या लेखावरून, भाषणावरून, किंवा त्यानें दहाजणांपुढें केलेल्या आचरणावरून, त्याचे खरे विचार कसे असतील, हें हटकून सांगतां येणें कठिण आहे. तेव्हां कोणत्याही मनुष्याच्या वास्तविक आचाराची व विचाराची ठेवण कशी आहे, हें जाणावयाचें असेल तर, आपणावर कोणाचा डोळा नाहीं, असें त्यास वाटत असतां त्याचें जें वर्तन होत असतें, व त्याच्या तोंडातून जे उद्गार निघत असतात, ते लक्ष देऊन पाहिले तर, त्याच्या स्वाईक प्रकृतीची बिनचूक अटकळ सहज करितां

येणार आहे. कोटिक्रमार्च. असें पाजळून जो वादाला बसला, तो आपल्या खऱ्या मतांची दाद सहसा लागूं द्यावयाचा नाहीं ! आळस, निरुद्योगीपणा, धनातितृष्णा, परस्त्री–किंवा–परपुरुष–चिंतन या गोष्टी अत्यंत त्याज्य आहेत, हें कोणत्या सुशिक्षित स्त्रीस किंवा पुरुषास कळत नाहीं, किंवा त्या तशा आहेत, असें बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कोण म्हणत नाहीं ? तथापि या अमंगल गोष्टींचा आपणांस कधींही विटाळ झाला नाहीं, असें किती स्त्रिया व पुरुष छातीला हात लावून म्हणूं शकणार आहेत ? तात्पर्य, मनुष्यांच्या वास्तविक स्थितींत व जाणूनबुजून, दुसऱ्यापुढें त्यांचें जें बोलणेंचालणें होत असतें त्यांत, बरेंच अंतर असतें. हें अंतर नाहींसें होत जाणें, व सर्वकाळीं त्याचें एकच स्वरूप दिसूं लागणें हें एक त्यांच्या सुधारणेचें व्यंजक होय. ज्या लोकांत ही विषमता विशेष दृष्टीस पडते, ते लोक सुधारणेंत फार मागें आहेत असें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. कारण, त्या विषमतेवरून हें सिद्ध होतें कीं, जी गोष्ट विचारदृष्ट्या त्यांस बरी दिसते, तदनुसार वर्तन करण्यास ते तयार झालेले नाहींत. ते भेकड किंवा दांभिक आहेत !

हे विचार खरे असतील, तर एका गोष्टींत आम्हा हिंदूंसारखे भेकड अथवा दांभिक असे दुसरे कोणतेही लोक नसतील, असें म्हणणें भाग पडतें ! इंग्रजी कादंबऱ्या किंवा संस्कृत नाटकें वाचतांना, अथवा रंगभूमीवर त्यांचे प्रयोग पहात असतांना, ज्या गोष्टी वाचून व पाहून आम्हांस पराकाष्ठेचा आनंद होतो, त्यावरून विवाहपद्धतीविषयीं आमचे विचार कसे असतील, याविषयीं कोणी त्रयस्थ पुरुष अनुमान करूं लागेल, तर स्वयंवराचे आम्हा मोठे चहाते असलों पाहिजे, व तीच विवाहपद्धति आम्हांत रूढ असली पाहिजे, तसें असल्याखेरीज अशा प्रकारच्या कादंबऱ्या व नाटकांच्या वाचनापासून, किंवा त्यांचे प्रयोग पाहाण्यापासून इतका आनंद होण्याचा संभव नाहीं, असें त्यांस सहज वाटणार आहे ! पण खरी स्थिति किती उलट आहे ! मातापितरांची आज्ञा घेतल्याशिवाय कण्वदुहिता शकुंतला प्रियंवदेच्या सल्लयानें लतामंडपांत दुष्यन्ताची एकांतीं गांठ घेते, व तेथें त्यांचा गान्धर्व-विवाह होऊन त्याचा यथोचित परिणामहि घडतो, आणि तो सारा प्रकार आम्ही मोठ्या औत्सुक्यानें पहातो, व विशेष रसाच्या ठिकाणीं वन्स मो-अर ( आणखी एकवार ) असें म्हणून पात्रांकडून आपल्या पसतीस

उतरलेली चीज पुनः म्हणवितों, किंवा उत्तम वाटलेला अभिनय पुन: करवितों. मालतीमाधव वाचतांना अथवा त्याचा प्रयोग पहातांनाही आमची तशीच दशा होते. वडिलांच्या इच्छेविरुद्ध प्रेमानुरोधानें मालतीमाधवांचा झालेला विवाह, किंवा तो घडवून आणण्यासाठीं कामंदकीनें दिलेलं साहाय्य यांत आम्हांस अप्रशस्त असें कांहीं तरी वाटतें काय? हेंही असो. सुभद्रा काबीज करण्यासाठीं अर्जुनानें जो त्रिदंडी संन्यास धारण केला, व श्रीकृष्ण परमात्म्याच्या मदतीनें बलरामाच्या हातावर ज्या तुरी दिल्या, अथवा घटोत्कचादिकांच्या साहाय्यानें अभिमन्यूनें जें वत्सलाहरण केलें, तें पाहून तरी आम्हांस कधीं विषाद झाला आहे काय? देवांनीं घातलेल्या मागण्यांचा धिक्कार करून, दमयंतीनें जें नळास वरिलें त्याबद्दल मनांतल्या मनांत तरी तिच्या औद्धत्याबद्दल आम्ही तीवर कधीं रागावलों आहों काय? जर नसेल, तर स्वयंवराची रीत पुनः पाडावी, असें कोणी म्हटल्यास आमचें पित्त इतकें कां खवळतें बरें! शकुंतला, मालती, सुभद्रा, वत्सला, दमयंती किंवा इतर पौराणिक अथवा काल्पनिक स्त्रिया, व दुष्यंत, माधव, अर्जुन, अभिमन्यु, नल, अथवा इतर पौराणिक आणि काल्पनिक पुरुष यांच्या प्रकृतींत आणि आमच्या प्रकृतींत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे, असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं. तारुण्य, आरोग्य, बुद्धि, संपत्ति, स्वरूप, विद्या, व ललितकलानैपुण्य जितकें त्यांना प्रिय होतें तितकें आम्हांसही आहे. दुःखाचा कंटाळा आणि सुखाचा अभिलाष जितका त्यांना होता तितका आम्हांसही आहे. त्या वेळीं ज्या वयांत कामवासना जागृत होत असे, त्याच वयांत आतांही होते. त्या वेळीं वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांस आपापल्या मनास रुचेल त्याच्याशीं किंवा तिच्याशीं विवाह करण्यापासूनच आपणांस अत्युत्कृष्ट वैवाहिक सुख प्राप्त होईल, असें वाटून तीं कोणासही न जुमानतां, वाटेल तसा विवाह करीत, व सुखी होत, त्याप्रमाणें आतांही होण्याचा संभव आहे. असें असतां, नऊ दहा वर्षांच्या मुली व चौदा पंधरा वर्षांचे मुलगे यांच्या विवाहांत आपण पडून, मुलींस तेरावें आणि मुलांस सतरावें वर्ष लागलें नाहीं, तोंच त्यांना खोलींत कोंडून घालण्याविषयीं येवढा आग्रह आम्ही कशासाठीं धरून बसतो! असलें निंद्य नर्मसाचिव्य आम्हीं केलें नाहीं, तर सारी स्त्रीपुरुषें अविवाहित राहतील, प्रजोत्पत्ति बंद पडून जगाचा

अंतसमय येऊन ठेपेल, किंवा चहूंकडे अनीतीचें साम्राज्य होऊन, साऱ्या संततीस जारजत्वाचा कलंक लागेल—अशा भीतीनें तर आम्ही बालविवाहाचे इतके एकनिष्ठ भक्त बनलों नाहींना? स्वयंवरामुळें जर असला कहर पौराणिक कालांतील स्त्रीपुरुषांवर गुदरला नाहीं, व सध्यांही इतर देशांतील स्त्रीपुरुषांवर गुदरतो असें वाजवी रीतीनें म्हणतां येणार नाहीं, तर तो आम्हांवरच गुदरेल असें कसें म्हणतां येईल? कोणी असें म्हणतात कीं, स्वयंवराची किंवा संमतिविवाहाची चाल येथें पाडली असतां, इंग्लिश लोकांप्रमाणें आमची लिंगविशिष्ट नीति शिथिल होईल. या आक्षेपावर पहिलें उत्तर असें आहे कीं, इंग्लिश लोकांची नीति आम्हांहून शिथिल आहे, असें म्हणण्यास काय आधार आहे? त्यांच्या देशांत विवाहनिराकरणाचीं कोर्टें आहेत, व त्यांत प्रतिवर्षीं पुष्कळ फिर्यादी लागतात, येवढ्यावरून त्यांच्यामध्यें या संबंधाचा आम्हांहून अधिक अनाचार होत असेल, असा तर्क करणें न्याय्य नाहीं; किंवा तिकडील सेन्सस रिपोर्टांत जारजांची जी बरीच मोठी संख्या नमूद केलेली असते, तीवरूनही आम्ही या बाबतींत त्याहून अधिक शुद्ध आहों, असें खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. कारण, गुन्हे जगापुढें आलेले नाहींत, म्हणून ते घडत नाहींत, असें म्हणणें कधींही बरोबर होणार नाहीं. आमक्या आमक्याची बायको वाईट निघाली, किंवा अमकीतमकीचा नवरा 'शिनल' निघाला, असला दुर्लौकिक करून घेण्याची भीति वाटून, आमच्यामधील अनेक दुर्दैवी स्त्रिया आणि पुरुष जारपतींशीं किंवा जारिणीपत्नींशीं, कष्टानेंच कां होईना, आपलें आयुष्य कशावरून कंठीत नसतील! शिवाय, आमचा समाज जर इतका सोंवळा आहे, तर विधवांनीं गुप्त कर्मे छपविण्यासाठीं केलेले निर्दयपणाचे प्रयत्न उघडकीस कसे येतात! गतभर्तृकांनीं दुराचारी निघूं नये, म्हणून त्यांना आम्ही कारागृहांतल्या कैद्याप्रमाणें वागवितों. असें असून नद्यांत, रस्त्यांवर व अनाथगृहांत लहान मुलांचीं प्रेतें, आणि सजीव मुलें कोठून येऊन पडतात! फिरून आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे ती ही कीं, गतभर्तृका अथवा एक विवाहित स्त्री दुराचारी निघाली असतां, ती अनेक पुरुषांच्या सद्गुणास विघातक होते, व जेवढे तिच्या नादीं लागलेले असतात तेवढे सारे विवाहित असल्यास जारपति होतात, असें म्हटलें पाहिजे. अशा रीतीनें

गुप्त रीतीचा भ्रष्टपणा आमच्या समाजांत किती होतो व इंग्लिश समाजांत किती होतो, याचा स्पष्ट निर्णय कसा करतां येणार आहे ? पण हेंही असो; आज प्रत्येक शहरांत ज्या शेंकडों विश्वयोषिता दृष्टीस पडतात, त्यांचे आश्रयदाते कोण आहेत ? ज्याप्रमाणें दारूचें एक नवीन दुकान निघालें कीं, शेंकडों लोकांस मद्यपी होण्यास उत्तेजन मिळतें, त्याप्रमाणें एका वेश्येमुळें शेंकडों लोक बिघडत असतात, व ज्याअर्थी वेश्यागमनाचें व्यसन या देशांत इंग्लंडाहून कमी आहे, असें म्हणण्यास आम्हापाशीं कांहीं एक आधार नाहीं, त्याअर्थी लिंगविशिष्ट नीतीचा विध्वंस या व्यसनामुळें या देशांत इंग्लंडाइतकाच होत असेल, असें मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. युरोपिअन लोकांच्या या प्रकारच्या शुद्धतेविषयीं आम्ही ज्या कुकल्पना करतों त्या त्यांच्या समाजांच्या केवळ बाह्यस्वरूपावरून करतों हें उघड आहे. पण तसें करणें नीट नाहीं. बंगाली लोकांपेक्षां किंवा मुसलमान लोकांपेक्षां आम्ही आपल्या स्त्रियांस विशेष स्वातंत्र्य ठेविलें आहे. पण एवढ्यावरूनच जर ते लोक असें म्हणूं लागतील कीं, आमच्या नीतीहून महाराष्ट्रीयांची नीति क्षीणतर असलीच पाहिजे, तर त्यांचें म्हणणें जसें सप्रमाद होणार आहे, तसेंच युरोपिअन लोकांच्या नीतीविषयीं आमचें मत होणार आहे. तथापि वादासाठीं क्षणभर असेंही घेऊन चाललों कीं, युरोपिअन लोकांत आम्हापेक्षां पतित स्त्रियांची व पुरुषांची संख्या थोडी अधिक आहे. तरी तेवढ्यावरून असें कोण सिद्ध करून देईल कीं, त्यांच्यांत स्वयंवराची पद्धति रूढ आहे, म्हणून तेथें तसा प्रकार आहे व येथें बालविवाह रूढ आहे, म्हणून तसा प्रकार नाहीं ? क्षणभर असेंही मानिलें कीं, बालविवाहामुळेंच ही विशेष शुद्धि आम्हांत दृष्टीस पडत आहे, तर तेवढीसाठीं या दुष्ट चालीपासून दुसरे अनेक तोटे होत आहेत, ते करून घेण्यास आम्ही तयार व्हावें काय ? इंग्लंडांत शंभर कुलटा असल्या तर येथें पंचाण्णवच असाव्या, येवढ्यासाठीं बहुतेक स्त्रीपुरुषास नाउमेद, निरुत्साह, निःसत्त्व व निर्वीर्य करून सोडणें श्लाघ्य आहे काय ? ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे; ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागावर तारुण्याचें तेज चकाकत आहे; विषयवासना जागृत झाल्यामुळें उल्हासानें व उत्कंठेनें अननुभूत सुखास्वादाच्या अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत, दृष्टींत व चर्येत लज्जा,

अधीरता, साशंकपणा वगैरे परस्परविरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्यांचे हरएक प्रयत्न चालले आहेत; विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनीं आपणास होईल तितकें अलंकृत करून, अन्योन्यास मोह पाडण्याविषयीं जे अहोरात्र झटत आहेत; ज्यांना आपण रतिमन्मथाचे पुतळे आहों व विधात्यानें आपली विवाहमैत्री व्हावी, असें योजूनच त्यानें आपणास निर्माण केलें आणि आपल्याहून अधिक सुखी असें दंपत्य कोठेंही असूं शकण्याचा संभव नाहीं, असें वाटूं लागलें आहे; अन्योन्यसमागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यांस युगतुल्य झाला असून, जे सूर्याच्या अश्वास मंदगतित्वाबद्दल निंदूं लागले आहेत व यामिनीस आपली समागमकारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे जे डोळे लावून बसले आहेत; अशा स्त्री पुरुषांच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणिकडे, आणि पंतोजीचा मार खाणाऱ्या व अभ्यासाखालीं अर्धमेल्या झालेल्या, दुर्बल, भेकड आणि लुस्कान अशा आमच्या सोळा सतरा वर्षांच्या बहुतेक पोरांच्या आणि बाव्हलाबाव्हलीच्या व भातकुलीचा ज्यांचा खेळ नुकताच सुटला आहे, व नवरा म्हणून ज्याच्याशीं आपला एकाप्रकारें विशेष संबंध झाला आहे, असा पुरुषजातीपैकीं कोणी एक इसम आहे, असें कोठें नुकतेंच समजूं लागलें आहे, अशा आमच्या बारा तेरा वर्षांच्या निस्तेज, लाजाळू व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या मद्दालाची बहार कोणीकडे ? पण स्वतंत्रपणें विचार करून तदनुसार वर्तन करण्यास लागणाऱ्या धैर्यानें ज्या आम्हांस अनेक शतकें सोडलें आहे, त्या आम्हांस बलाढ्य रूढीच्या अमलाविरुद्ध बंड करून, दास्यशृंखला झुगारून देण्याची व उभय सुखांतील महदन्तराचा विचार करण्याची हिंमत कोठून असणार ! कोणी लोकापवादाला भिऊन, कोणी धर्माला भिऊन, कोणी अज्ञानामुळें कोणी स्वल्प अशा वर्तमानहिताच्या आशेनें, कोणी मूर्ख लोकांकडून बरें म्हणवून घेण्यासाठीं व कोणी यत्किंचित् स्वार्थासाठीं म्हणून कोणत्या तरी सबबीनें आम्ही आपल्या पोरांचें व पोरींचें जीवित निःसार करीत आहों, भावी संततीच्या दुःसह विपत्तीचा पाया घालीत आहों व दारिद्र्य, बुद्धिमांद्य, दौर्बल्य आणि पारतंत्र्य यांच्या पंक्तींत या भरतखंडास अधिकाधिक रोवीत आहों हें आम्हांस समजूं लागणार तरी कधीं !

## स्वातंत्र्याच्या वृथा वल्गना : : : १४

कायद्यानें बालविवाहाचा प्रतिबंध करणें म्हणजे सांप्रत काली लहान मुलांवर व मुलींवर त्यांच्या मातापितरांकडून व पालकांकडून जो जुलुम होत आहे तो दूर करणें याहून दुसरें कांहीं नाहीं. कोणासही स्वातंत्र्य देण्यासाठीं केलेला जो कायदा तो जुलमाचा कायदा कसा होईल ? तथापि आधुनिक अनेक मित सुधारकांचें असें म्हणणें पडतें कीं, अशा कामांत कायद्याचा प्रवेश होऊं देणें म्हणजे आईबापांस जें स्वातंत्र्य आहे त्याचा उच्छेद करणें होय ! वाहवा ! मूर्ख आईबापांनीं कधीं अज्ञानानें, कधीं लोकापवादभयानें, व कधीं लोभानें आपल्या अल्पवयस्क मुलांचें आमरण नुकसान करावें, आणि तें करण्याचा हक्क त्यांच्याकडे राहूं देण्याबद्दल सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या ‘ थंड्या ’ सुधारकांनीं अखिल वातावरण आपल्या अक्रोशांनीं भरुन सोडावें, याहून अधिक विस्मयजनक देखाव्याची कल्पना करणें देखील कठिण आहे! दुसऱ्यास कुरूप करण्याचा हक्क! पोटच्या पोरीचें कुंकू पुसण्याचा अधिकार! मुलाच्या बायकोस नापितापुढें बसविण्याचें स्वातंत्र्य! असले हक्क, असले अधिकार, असलें स्वातंत्र्य गाजविण्याबद्दल अकांडतांडव करणाऱ्यास हक्क, अधिकार व स्वातंत्र्य यांचा अर्थ व उपयोग मुळींच समजत नाहीं, आणि यासंबंधानें यांचे बोल स्वातंत्र्याच्या शुद्ध वल्गना होत, असें म्हणणें भाग आहे.

यावर कोणी असें उत्तर देतात कीं, विवाहाच्या व वपनाच्या संबंधानें आम्हांकडून ज्या चुका होत आहेत, त्या आमच्या आम्हांस कळूं लागल्या आहेत, व आमच्याकडून होईल तितकी आम्ही त्यांची दुरुस्तीही चालविली आहे. सबब जी गोष्ट आमची आम्ही करण्यास तयार झालों आहों, तींत सरकारनें पडूं नये, हें इष्ट आहे; सरकारच्या मध्यस्तीनें नफा न होतां उलट नुकसान होणार आहे. बालविवाहादि गोष्टी वाईट आहेत हें तुम्हांस कळूं लागलें आहे काय ? व त्या नाहींशा करण्यासाठीं तुमचे प्रयत्न चालू आहेत काय ? ठीक आहे. ज्यांना या दुष्ट रूढींतील दोष कळूं लागले असतील, व त्यांचें निर्दालन करण्याचा आपणांकडून होण्यासारखा प्रयत्न जे करूं लागले असतील, त्यांना आमचे कांहीं एक म्हणणें नाहीं. पण जर

असें करणारे कोणी नसतील, व चालू रूढीसच चिकटून राहण्याचा त्य निग्रह असेल तर त्यांच्यासंबंधानें काय करावयाचें! "पण असें होईल कसें! शिक्षणाची टांकी सतत चालली असतां, दुसऱ्यांचीं उदाहरणें नित्यशः डोळ्यांपुढें येऊं लागलीं असतां, मुलांकडून व मुलीकडून अडथळा येऊं लागला असतां जे यासंबंधानें आपला हक्क सोडण्यास किंवा आपलें वर्तन फिरविण्यास राजी होणार नाहींत, असें लोक सांपडणें अशक्य आहे. कालांतरानें या गृहसुधारणा सरकारच्या मध्यस्थीवांचून झाल्याशिवाय राहणार नाहींत. शिक्षणासारखी गृहव्याधीवर दुसरी जालीम मात्रा नाहीं. हिच्या योगानें पाहिजे ती सुधारणा थोड्या विलंबानें, पण कोणत्याही प्रकारचें नुकसान न होऊं देतां, करतां येणार आहे." या उत्तरावर आम्ही असा प्रश्न विचारतों कीं, तुमची शिक्षणाची जबर मात्रा तुम्ही गृहव्याधीसाठींच कां राखून ठेवतां? सर्व व्याधींचा नाश करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. लोकांस ज्ञान प्राप्त झालें, चांगलें व वाईट कळूं लागलें—म्हणजे त्यांच्या वर्तनांत आपोआपच सुधारणा होत जाणार आहे; सबब सरकारनें मांडलेलीं शेंकडों खातीं बंद करून, सर्व जमा शाळाखात्याकडेच कां लावूं नये? सारी प्रजा एकदां विद्वान् करून सोडली म्हणजे कशाचीही गरज उरली नाहीं. तोंपर्यंत थोडासा त्रास झाला तरी हरकत नाहीं. पण लोकांच्या मानसिक वृत्तींचा विकास होऊन, त्यांच्या अनुषंगानें झालेली जी सुधारणा ती जितकी रमणीय, चिरस्थायी व सुखावह होणार आहे तशी कायद्याच्या सक्तीनें घडवून आणविलेली सुधारणा कधींही होणार नाहीं. उद्यां सकाळीं लष्करी खातें, पोलीसखातें, न्यायखातें वगैरे टोलेजंग खर्चाच्या बाबी बंद केल्या, आणि सर्व प्रकारची व्यवस्था शाळापंतोजीच्या हातांत दिली तर किती खासें काम होणार आहे बरें! कोणीं कोणास शिवीगाळ केली, कोणीं कोणाशीं मारहाण केली, कोणीं कोणाच्या घरावर दरवडा घातला, कोणीं कोणाचा खून केला, कोणीं कोणावर स्वारी केली तरी काय हरकत आहे! अज्ञान आहे तोंपर्यंत अशा गोष्टी घडणारच! जसजसा शिक्षणाचा प्रसार होत जाईल तसतसे हे अनर्थ नाहींसे होत जातील! तो होईतोंपर्यंत त्यांपासून जेवढी पीडा होईल तेवढी निमूटपणें सोशिली पाहिजे! या गोष्टी वाईट आहेत हें आमचें आम्हांस कळत आहे, व त्या दूर करण्याचा प्रयत्न

आमचे आम्ही करीत आहों; सरकारच्या मध्यस्थीनें फायदा न होतां उलट नुकसान होणार आहे; कालांतरानें त्या आमच्या हातूनच तडीस जाणें इष्ट आहे एका शिक्षणाच्या आधीन सारें आहे तेवढें देण्याची तजवीज झाली म्हणजे झालें! गरम सुधारक, थंडे सुधारक, मिठे सुधारक, कडू सुधारक, दुर्धारक, सुधारणानिंदक, मठ्ठ, मूढ, व हेकड असे अनंत समाजघटक यांपैकीं किती जणांस वरील व्यवस्था मान्य होणार आहे! आमच्या मतें ती फारच थोड्यांस मान्य होईल. तात्पर्य काय कीं, ज्या गोष्टी सध्यां सरकारकडून होत आहेत, व ज्या सरकारकडून होण्यानें आमचा व्यवहार सुखावह होत असून त्या आज आम्हांस करतां येण्याचा संभव नाहीं, त्या आम्ही सरकारकडून करून घेणें पसंत करतों. कोणत्याही व्यक्तीस अमुक एक गोष्ट व्हावी, असें वाटत असलें, आणि ती त्यास स्वतः करतां येत नसली म्हणजे ती घडवून आणण्यांत दुसऱ्याचें साहाय्य घेण्याची इच्छा त्यास स्वाभाविकपणें उत्पन्न होते. अशा स्थितींत थोड्यांनीं किंवा पुष्कळांनीं तिसऱ्याचें साहाय्य घेण्यास प्रवृत्त होण्यांत कांहीं विशेष आहे, असें नाहीं. जी गोष्ट बहुतेकांना चांगली वाटली ती तरी त्यांनीं सरकारच्या मदतीनें थोड्यांवर कां लादावी? गांवांतल्या कांहीं लोकांस वाईट शौचकूप चालत असले, पण पुष्कळांस नको असले, तर पुष्कळांनीं थोड्यांवर ते पाडून टाकण्याबद्दल जुलूम कां करावा? यावर कोणी असें उत्तर देतील कीं, थोड्या लोकांच्या अमंगळपणामुळें पुष्कळांस त्रास होण्याचा संभव आहे; सबब पुष्कळ जणांनीं स्वसंरक्षणासाठीं थोड्यांवर जुलूम करणें, व त्यास आपल्या मनाप्रमाणें वागण्यास भाग पाडणें यांतच न्याय आहे. या म्हणण्याचा वास्तविक अर्थ असा आहे कीं, ज्या पक्षाकडे विशेष सामर्थ्य असेल त्यानें क्षीण पक्षाला हवें तसें वागविण्यांतच न्याय आहे! असें असेल तर थोड्या लोकांच्या हातीं पुष्कळ सामर्थ्य असल्यास त्यांनींही आपल्या तब्यतीप्रमाणें पुष्कळांस वागविण्यांत न्याय असला पाहिजे. पुष्कळ आईबापांस मुलांचीं इच्या त्या वयांत लग्नें करणें योग्य वाटत आहे, म्हणून त्यांना तसेंच करून देणें न्याय्य असेल, तर ज्या थोड्या लोकांस लहानपणीं लग्नें करणें अप्रशस्त वाटत आहे, त्यांनींही आपल्या परिश्रमानें व सरकारच्या साहाय्यानें आपल्या पक्षाकडे उलट पक्षापेक्षां अधिक सामर्थ्य संपादन करून घेऊन पुष्कळ लोकांस बालविवाह

टाकून देण्यास लावणें न्याय्य कां नाहीं, हें आम्हांस समजत नाहीं. सक्ती करण्यांत कोणत्या बाजूकडे किती व्यक्ति आहेत, हा मुख्य प्रश्न नाहीं; तर कोणत्या बाजूकडे किती शक्ति आहे, हा मुख्य प्रश्न आहे. वैवाहिक जुलूम पुष्कळांस बरा वाटत आहे, व त्यांचें एकवट झालेलें सामर्थ्य विशेष आहे, म्हणून ते आम्हां थोडयांवर सक्ती करीत आहेत, व आपल्या बाजूस न्याय आहे असें भांडत आहेत तेव्हां आम्हींही आपल्या बाजूस सरकारची मदत घेऊन, व तिचें सामर्थ्य उलट पक्षाच्या सामर्थ्याहून अधिक करून, जी गोष्ट समाजास अत्यंत हितावह होईल असें आम्हांस विचारपूर्वक वाटत आहे तिचा आमच्या उलट पक्षावर सक्ती करण्याचा प्रयत्न कां करूं नये ? इंग्रज सरकार गुलामांचा व्यापार बंद करूं लागलें, त्या वेळेस ज्या स्वार्थपरायण, अज्ञान, किंवा दुराग्रही लोकांनीं तो व्यापार बंद करण्यांत सरकाराकडून आपल्या स्वातंत्र्यावर हल्ला होतो, असा गिल्ला केला, त्या प्रकारचा गिल्ला आमचे प्रतिपक्षी करीत आहेत. ज्यांनीं गुलामांच्या व्यापाराविरुद्ध उचल केली व ब्रिटिश पार्लमेंटाचें मन वळवून त्याच्या द्वारें त्या व्यापाराचें निर्मूलन केलें त्यांच्या खटपटीसारखी आमची खटपट आहे. आम्ही सरकारच्या साह्यानें वैवाहिक गुलामगिरीचा अंत लौकर करूं पहात आहों; आमचे प्रतिपक्षी ती आपणांस वाटेल तितकीं वर्षें राखून ठेवण्याबद्दल धडपड करीत आहेत ! परके सरकार असल्यामुळें तें आमचें म्हणणें न्याय्य व हितावह असून, आमच्याकडे व्यक्तिसमुदाय मोठा नाहीं म्हणून आमचा पक्ष घेण्यास भीत आहे, व आमच्या प्रतिपक्ष्यांचें वर्तन निर्दय व अपायकारक असून त्यांकडे व्यक्तिसमुदाय मोठा आहे, म्हणून त्यांच्या झोकाप्रमाणें वागत आहे, ही शोचनीय स्थिति सरकारच्या परकेपणामुळें चालली आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड स्टेट्स वगैरे देशांत असल्या गुलामगिरीचा केव्हांच अंत झाला असता. या देशांत स्वराज्य असतें आणि त्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या डोक्यांत ही कल्पना येती तर त्यांनीं ती केव्हांच अमलांत आणून सोडली असती ! बारीक विचार करतां, युरोपांतही या क्षणीं देखील थोड्या शहाण्यांची पुष्कळ मूर्खांवर सत्ता चालली आहे, असें दाखवितां येईल. फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांतील राजसभांत जे ठराव होतात, ते त्या देशांतील बहुतेक लोकांस

मान्य होत असतीलच, असें म्हणण्यास विशेष आधार नाहीं. तथापि त्या सभांत जे ठराव होतात ते त्या सभांच्या सभासदांकडे अधिकार, शहाणपण व संपत्ति असल्यामुळें इतरांस निमूटपणें ऐकावे लागतात. सुदैवानें येथील सरकारची सामाजिक मतें आम्हांस इष्ट अशी आहेत; पण दुर्दैवानें तें परकें असल्यामुळें त्यांस पुष्कळांवर सक्ति करून, त्यांत असंतोष उत्पन्न करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेववत नाहीं व या त्यांच्या भेकडपणामुळें पुष्कळांचा जुलूम आम्हांस सहावा लागत आहे. खरें म्हटलें म्हणजे त्यांनीं आमच्या पक्षास पूर्ण साह्य करून, आमची शक्ति आमच्या प्रतिपक्ष्यांवर चालूं द्यावी. आम्ही स्वातंत्र्यस्थापनासाठीं सक्ती करूं पहात आहों, हें जसें आम्हांस तसें त्यांसही समजत आहे; पण परकेपणामुळें तें आमच्या म्हणण्यांत आपलें मन नीट घालीत नाहींत; आणि त्यांच्या या कर्तव्यपराङ्मुखतेमुळें आमच्या प्रतिपक्ष्यांचे येवढे ढंग चालले आहेत! नाहीं तर सतीची चाल बंद करण्याच्या कामीं त्यांच्याकडून आम्हांस जशी मदत मिळाली, तशी आतांही मिळती, तर नऊ दहा वर्षांच्या पोरी विधवा कशा होत्या, पंधरा सोळा वर्षांच्या मुली पांच चार मुलांच्या गलित आया कशा होत्या, सतरा अठरा वर्षांच्या मुलांस खोल्यांत ढकलून घालून भर्तृकर्तव्य उरकणें कसें भाग पडतें व पंधरा सोळा वर्षांच्या तरुणांगनांच्या अंगास स्पर्श करण्यास क्षुर नापित कसे धजावते, हें पाहिलें असतें! पण काय करावें? या देशांत सध्यां अक्कल व अंमल यांचा काडीमोड झाला आहे!

---

## सामाजिक स्थित्यंतरें : : १५

कोणत्याही समाजांत जीं चांगलीं किंवा वाईट स्थित्यंतरें होत असतात, तीं त्या समाजांतील मनुष्यांच्या चांगल्या वाईट क्रियांमुळें होत असतात. या क्रिया दोन प्रकारच्या आहेत; पहिल्या स्वप्रचोदित व दुसऱ्या परप्रचोदित. अमुक गोष्ट आपणाला व दुसऱ्याला, आतां व पुढें सुखावह होणार आहे, असें प्रत्येकास समजत असून तदनुसार साऱ्या किंवा बहुतेक लोकांचें वर्तन होत असणें ही समाजाची उत्तमावस्था होय, हें आम्हांस पूर्णपणें कबूल

आहे. तथापि ही स्थिति एका दिवसांत, महिन्यांत, वर्षांत किंवा शतकांत-सुद्धां प्राप्त होण्यासारखी नसते. मनुष्याच्या कोणत्याही समाजाला ती अद्यापि आलेली नाहीं. ज्या देशांना तुम्ही सुधारणेची माहेरघरें समजतां त्या देशांत-सुद्धां अनेक व्यक्तींच्या अनेक क्रिया स्वप्रचोदित नाहींत. इंग्लंड घ्या, फ्रान्स घ्या, पाहिजे तो देश घ्या, कोठेंही अमुक गोष्ट लोकांकडून सक्तीनें करवावी लागत नाहीं, असें दिसणार नाहीं. कोठें एखादा बलाढ्य इसम आणि त्याचे मदतनीस; कोठें शेंपन्नास श्रीमंत घराणीं; कोठें लष्करी अधिकारी; कोठें मध्यम स्थितींतले हजार पांचशें सुशिक्षित लोक; कोठें लोकनियुक्त प्रातिनिधिक सभा—राज्य करीत असून, आपणांस बऱ्या वाटतील त्या गोष्टी समाजांतील साऱ्या घटकांकडून सक्तीनें करवीत आहेत व त्या मानानें प्रत्येक ठिकाणीं थोडाबहुत जुलूम होत आहे. सबब, "जुलूम" या शब्दाचा एवढा धाक बाळगण्याची गरज नाहीं. बालविवाह व केशवपनादि निंद्य चाली कायद्यानें बंद केल्या असतां, आपणांवर मोठा जुलूम होईल म्हणून जे ओरड करीत असतात, ते नकळत या जुलमाहून दुस्तर जुलमानें ग्रासले आहेत हें कोठें त्यांच्या लक्षांत आहे! चौदापंधरा वर्षांच्या निरपराधी कन्येस किंवा स्नुषेस कुरूपता आणणें हें निंद्य कर्म होय, हें पुष्कळ आधुनिक विद्वान् कबूल करतात, व त्यांनीं थोडीशी गैरसोय सोसण्याचा निश्चय केला, किंवा लोकापवादाविषयीं थोडीशी बेपर्वा पतकरिली तर, कायद्याची मदत न घेतां, या समाजलांछनाचें निरसन त्यांस सहज करतां येणार आहे, असें आ. रा. ब. नूलकर यांचें म्हणणेंहि आहे.) हें जर खरें आहे तर वरील गोष्ट अत्यंत अप्रशस्त मानणारे सुशिक्षित ठिकठिकाणीं इतके दृष्टीस पडूं लागले असून, थोड्याशा मानसिक धैर्यानें व स्वल्प गैरसोय सोसण्यानें जे समाजदूषण व दुःखकारण सहज नाहींसें होणार आहे, त्याचा अजून जारी अंमल कां सुरू आहे! अमुक गोष्ट चांगली आहे अशी पक्की खातरी झाली असून, आपणास शहाणेसुतें म्हणवून घेणाऱ्या अनेक लोकांस तिला हात घालवत नसेल, तर क्रियाप्रवर्तक साऱ्या कारणांचा संनिधि त्या ठिकाणीं झाला नाहीं, असें अनुमान करणें, हेंच योग्य आहे. अलीकडे या देशांतील सुशिक्षित लोकांस अनेक चांगल्या गोष्टींचें ज्ञान झालें असून,

व त्यांचा प्रघात येथें पडणें अवश्य आहे, अशी पक्की खातरी झाली असून, त्या करूं लागण्यास त्यांची छाती होत नाहीं, हें आतां निर्विवाद झालें आहे. समाज तर प्रतिदिवशीं थोडाबहुत पुढें पुढें गेलाच पाहिजे. जो समाज पुढें जात नाहीं तो मागें जात असतो, म्हणजे ज्याची उन्नति होत नसते, त्याची अवनति होत असते. समाजाच्या उन्नतीची इच्छा धरणें, हें त्यांतील समंजस प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य आहे. कारण, सारी होडी पुढें गेल्याशिवाय, तींतील कोणत्याही उतारूस पुढें जातां येत नाहीं. आतां राष्ट्राची प्रगति त्यांतील लोकांच्या सत्क्रियांवर अवलंबून असते, हें कोणीही कबूल करील. सत्क्रियांत दुष्क्रिया वजा जातां, सत्क्रियांची जेवढी बाकी निघेल त्या मानानें प्रगति होत असते. या सत्क्रिया स्वेच्छेनें होत असोत किंवा दुसऱ्याच्या धाकानें होत असोत, ज्या देशांत यांचें दुष्क्रियांहून आधिक्य नसेल, तो देश अवनतीप्रत जात असलाच पाहिजे. पाश्चिमात्य शिक्षणाचा येथें बराच प्रसार झाल्यापासून, देशोन्नतीस अत्यवश्य गोष्टी कोणत्या व देशाचा ऱ्हास कोणत्या कारणांनीं होतो, हें आम्हांपैकीं बऱ्याच जणांस समजूं लागलें आहे. पण त्या अमलांत कशा आणाव्या, हें मात्र पुष्कळांस कळत नाहीं. त्यामुळें ज्ञान असून जिकडे तिकडे क्रियाशून्यता दृष्टीस पडत आहे. अनेक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, बराच विद्याप्रसार झाल्यावर आम्हांस जें पाहिजे आहे तें आपोआप घडून येऊं लागेल! पण आजपर्यंत जो विद्याप्रसार झाला आहे, त्यामुळें म्हणण्यासारख्या क्रियाप्रवृत्तीचा प्रादुर्भाव आम्हांत कां होऊं लागला नाहीं व शिक्षण किती फैलावलें म्हणजे तो होऊं लागेल, याचा नीट विचार कोणीच करीत नाहीं. ज्यानें उठावें त्यानें शिक्षण सर्वांच्या मुळाशीं आहे, स्वप्रचोदित क्रिया अत्यंत कल्याणकारक आहे, सरकारी सक्ती पराकाष्ठेची विघातक आहे असें सांगत सुटावें व हातानें कांहीं करूं नये, अशा प्रकारचा खुळा बाजार सर्वत्र माजला आहे! पण कोणत्या स्थितींत लोक आपण होऊन चांगल्या कामास प्रवृत्त होतात, राजानें आणि त्याच्या मंत्र्यांनीं चांगल्या गोष्टींत सक्ती करण्यास हरकत नाहीं अशी देशस्थिति कोणती, लोकप्रतिनिधींनीं बहुमतानें अंमल केला असतां कोणत्या देशस्थितींत तो सुखावह होतो, व सरकारी अंमल अगदीं संपुष्टांत आणून, बहुतेक क्रिया लोकांच्या लोकांस करूं देण्याचा काळ

कोणता, हें कोणीही पहात नाहीं. हा दुष्परिणाम आमच्या लोकांतील श्रेष्ठ जातींच्या पूर्वकालीन बुद्धिपरिणतत्वामुळें झाला आहे, असें आम्हांस वाटतें. जे लोक आर्ट्स् कॉलेजांत जातात, आणि स्पेन्सर व मिल्ल यांच्या ग्रंथासारखे ग्रंथ वाचतात, त्यांच्या मनावर त्या वाचनाचे विलक्षण परिणाम होतात. स्पेन्सरसारख्यांच्या ग्रंथांतील विषय या परिणतबुद्धीच्या वाचकांस कळण्यास मुळींच मुष्कील पडत नाहीं. पण ते वाचण्यांत त्यांची एक मोठी चूक होते ती ही कीं, त्यांचे कोणते विचार समाजाच्या कोणत्या स्थितीला लागू पडण्यासारखे आहेत, हें कोणी नीट पहात नाहीं. "जेथें सरकारचा अधिकार अत्यंत मर्यादित असेल, व बहुतेक चांगलीं कामें लोक आपलीं आपण करीत असतील, तो देश खरा सुधारलेला, व त्यांतील लोकांसच विशेष सुखप्राप्ति होण्याचा संभव आहे," असें स्पेन्सर म्हणतोना! ठीक आहे तर! आजपासून कोणत्याही सुधारणेच्या कामांत सरकारचा हात न शिरेल, अशी आपण खटपट करणार! स्पेन्सरमिल्लप्रभृति तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथवाचनानें असला वेडगळपणाचा परिणाम ज्यांच्या मनावर झाला नाहीं, असे या देशांत थोडेच सुशिक्षित असतील! हें अविचारी व अधीर वाचनाचें फळ! पाहिजे त्या समाजस्थितींत सरकारी अंमल संकुचित करणें व लोकांकडे क्रियास्वातंत्र्य ठेवणें, हें त्यास हितावह होणार आहे, असें त्या तत्त्वशोधकांनीं कोठेंही म्हटलेलें नाहीं. समाजाच्या कोणत्या स्थितींत सरकाराकडे कोणत्या प्रकारचा व किती अंमल असावा, याविषयीं आपल्या वाचकांचा गैरसमज न व्हावा, म्हणून त्यांनीं केवढी खबरदारी घेतली आहे! पण तिचा बिलकुल उपयोग होत नाहीं. ज्याला त्याला असें वाटतें कीं, त्यांनीं समाजाच्या उत्तमावस्थेचीं जीं चित्रें काढिलीं आहेत, व ती अवस्था प्राप्त होण्यास लोकांचा सरकाराशीं व सरकाराचा लोकांशीं जो संबंध असावा, म्हणून सांगितलें आहे, तो संबंध येथील सरकारांत व लोकांत स्थापण्याची धडपड केली म्हणजे ती उत्तमावस्था आपणांस सहज प्राप्त होईल! याहून विशेष मूर्खपणाचा भ्रम असणें शक्य आहे काय! पण त्यानें ज्यांना घेरलें नाहीं, असे सुशिक्षित या देशांत किती निघणार आहेत! फारच थोडे, असें आम्हांस वाटतें. ज्याच्या त्याच्या तोंडावाटें स्वातंत्र्याच्या वृथा वल्गनांचा अहोरात्र घोष चालला आहे!

सत्क्रियेच्या नांवानें मात्र आवळ्यायेवढें पूज्य! तथापि त्यांतल्या त्यांत मोठ्या आनंदाची ही गोष्ट कीं, जरी सर्व वस्तूंच्या संबंधानें हे अविचारी वाक्पटु स्वातंत्र्याची टिमकी पिटीत असतात, तरी सामाजिक गोष्टींशिवाय इतर गोष्टींत सरकारनें आपणांवर जुलूम करण्याबद्दल हे सरकारच्या घरीं खेटे घालण्यांत आपले जोडे नित्य फाडीत असतात! यांना जर लोकस्वातंत्र्याचें रहस्य इतकें समजलें आहे, तर त्यांनीं असें नादान कर्म कां करावें? "हे सरकारा, आम्ही गचाळ लोक आपण होऊन आपल्या धेनु कसायास विकतों. तेव्हां मेहेरबान होऊन गाई विकणारांस व त्या घेणारांस दंड कर! हे दयानिधे इलाखाधिपते, आम्ही प्रतिदिवशीं मदिरापाशांत अधिकाधिक गुरफटत आहों, याकरितां दारू पिणारांचें व विकणारांचें शासन कर! हे सर्वश्रेष्ठा राज्ञीप्रतिनिधे, आम्ही पामर लोक अज्ञानतिमिरांत ठेंचा खात आहों, व्यापारधंदा बुडाल्यामुळें उपाशीं मरत आहों, नीतीचा लय झाल्यामुळें पतित होत आहों, व धर्मभय सुटल्यामुळें पापनिधींत बुडतों आहों, याकरतां आमच्याकडून हवातेवढा कर चोपून घे, व हवेतसले प्रखर कायदे कर, पण घातलेल्या शाळा उठवूं नको; इतकेंच नाहीं, तर त्यांवर जितका अधिक खर्च करवेल तितका कर; आम्हांस उद्योग करतां येण्यासाठीं यंत्रशिक्षणाच्या व धंदेशिक्षणाच्या शाळा काढ; आमची नीति सुधारण्यासाठीं नीतिशिक्षक लाव, व आमच्या नास्तिक्याचें निरसन होण्यासाठीं वेदप्रणीत धर्मक्रिया आम्हांकडून नित्य करव," असलीं रडगाणीं आम्हांकडून सरकाराकडे जात नाहींत, असा एक दिवस तरी लोटत आहे काय? वाचाल मंद सुधारकांनो, या तुमच्या असंबद्ध वर्तनाचा विचार तुम्हीं कधीं केला आहे काय? सामाजिक सुधारणाविषयीं इंग्रज सरकार परकीयत्वामुळें अत्यंत उदासीन आहे, म्हणूनच त्यासंबंधानें स्वातंत्र्याची तुम्ही येवढी ऐट मिरवितां, हें खरें नाहीं काय? तसें नसेल व तुम्ही खरेच स्वातंत्र्यप्रिय असाल, तर मग इतर गोष्टींत सरकारची गुलामगिरी कां पतकरतां?

---

## करून कां दाखवीत नाहीं ? : : : १६

हे सुधारक लोक अमुक गोष्ट चांगली, तमुक गोष्ट वाईट; अमक्या गोष्टीसाठीं कायदा करावा, तमक्रीसाठीं मंडळी स्थापावी; अशी जी एकसारखी वटवट करीत असतात ती कशासाठी ? अमक्या अमक्या गोष्टी करण्यांत आपला व दुसऱ्यांचा फायदा आहे, अशी त्यांची पक्की खात्री झाली असेल तर त्यांनीं त्या करून दाखविण्यास कां प्रवृत्त होऊं नये ? असा प्रश्न वारंवार पुष्कळ लोक करीत असतात, व बोलण्याप्रमाणें सुधारकांचें आचरण नाहीं, तेव्हां त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा गर्वयुक्त प्रलाप करून, आपल्या कोत्या समजुतीनें आपलें समाधान करून घेत असतात ! या अज्ञान जातींत तीन प्रकारच्या लोकांचा समावेश होतो. एक, ज्यांना नवीन गोष्टींचें चांगलेपण कळण्याची अक्कलच नाहीं असे. असल्या लोकांच्या कानांपाशीं हवातितका आक्रोश करा, प्रमाणें दाखवा, मारा, तोडा—काय पाहिजे ते करा, हे म्हणून कांहीं केले तरी आपला ग्रह सोडावयाचे नाहींत ! गव्याच्या धावेसारखी यांची धांव असते. वयांत येईपर्यंत कसले बसले जे ग्रह झाले असतील ते यांची जन्माची पुंजी ! तींत नवें जुनें कधींही व्हावयाचें नाहीं ! यांनें ज्ञान अत्यंत स्वल्प असतांही, यांना सर्वज्ञतेची फारच मोठी घमेंड असते, व नवीन विचारांचा व ज्ञानाचा तिरस्कार करण्यांत हे कोणासही हार जाण्यासारखे नसतात ] सारांश, ओतीव लोखंडाप्रमाणें यांचे आचार व विचार असतात, व कोणाचाही यांच्याशीं सामना झाला असतां त्यापासून रागाच्या ठिणग्या पडण्याखेरीज दुसरा कोणताही परिणाम होत नाहीं ! दुसऱ्या प्रकारांत समंजस पण भेकड असे लोक येतात. यांना चांगलें काय व वाईट काय, त्याज्य काय व संग्रहणीय काय हें समजत असतें; पण जें योग्य वाटत असेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य यांच्या अंगीं बिलकूल नसतें. ते लोकापवादाच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले असतात. डोळे बांधलेला तेल्याचा बैल ज्याप्रमाणें घाण्याभोंवतीं एकसारख्या फेऱ्या घालीत असतो, त्याप्रमाणें हे पोटांत ज्ञान असूनही लोकलज्जेमुळें अंध होऊन पूर्वापार चालत आलेल्या रूढींचें व विचारांचें लोण पुढल्या पिढीपर्यंत पोंचवीत असतात ! एकीकडे तुम्ही यांच्याशीं वाद करीत

बसला असला, तर कदाचित् ते असे कबूल करतील कीं, तुमचें म्हणणें बरोबर आहे व तदनुसार लोकांचें वर्तन होऊं लागल्यास, त्यांत त्यांचें कल्याण होण्याचा संभव आहे; पण असलें काम करण्यास आम्ही प्रवृत्त होणार नाहीं व असल्या गोष्टींचा उघडपणें स्वीकार करण्याचें धैर्य आमच्या अंगीं नाहीं, असें ते तुम्हांस साफ सांगतील असले लोक बहुशः दुसऱ्यांच्या आचाराविषयीं व विचारांविषयीं उदासीन असतात. पण आणीबाणीचा प्रसंग आल्यास हे आपल्या विचारशक्तीस गुंडाळून ठेवून, पहिल्या प्रकारच्या अज्ञान, अविचारी व आग्रही लोकांचें अनुगमन करतात! या दोहोंशिवाय सुधारणानिंदकांचा आणखी एक प्रकार आहे, तो मात्र अतिशय खडतर आहे, असें म्हणणें भाग आहे. यांतील लोक पहिल्याप्रमाणें मूढ नसतात व दुसऱ्याप्रमाणें भेकड नसतात. बरेंवाईट यांस कळत असतें व उचित दिसेल तें करण्याचें किंवा बोलण्याचें धैर्य यांचे अंगीं असत नाहीं असें मानतां येत नाहीं. असें असतां सुधारणेस या लोकांकडून जितका अडथळा होतो, तितका दुसऱ्या कोणाकडूनही होत नाहीं. हा होण्याचें कारण यांची अमर्याद स्वार्थपरायणता. हिला तृप्त करण्यासाठीं हे काय करतील आणि काय करणार नाहींत, हें ब्रह्मदेवाला देखील सांगवणार नाहीं! यांची स्वार्थपरायणता म्हणजे यांचा द्रव्याभिलाषच नव्हे. यांना नुसत्या पैशाचाच हव्यास असता व त्यांच्या अंगीं तेवढाच दुर्गुण असता तर त्यांचें वर्तन जितकें निंद्य होत आहे तितकें कधींच होतें ना. त्यांची स्वार्थपरायणता पराकाष्ठेची व्यापक आहे. कोणतीही गोष्ट कितीही चांगली असली तरी जर तीपासून त्यांचे कोणत्याही प्रकारचें यत्किंचित् नुकसान होण्याचा संभव असला तर ते ती हाणून पाडण्यासाठीं आकाशपाताळ एक करून सोडण्याचा प्रयत्न करतील! यांच्या वर्तनाचा बराच भाग लबाडीचा असतो. पूजाअर्चा वगैरे सारे धर्मविचार झूट आहेत, अशी यांची पक्की खातरी झाली असून, हे प्रतिदिवशीं तास दोन तास संध्या ब्रह्मयज्ञांत घालवतील; सर्वांगाला भस्म फांसून घेतील; श्रावणीचे दिवशीं शेर दोन शेर पंचगव्य पितील व नखशिखांत शेणमाती चोपडतील! चौदा वर्षांच्या पोराचे गळ्यांत आठ वर्षांच्या पोरीचें लोढणें बांधणें म्हणजे त्याची सर्व प्रकारची पुढील गति खुंटविणें होय, हें यांस पक्कें समजत असून कर्ज काढून अल्पवयस्क पोरी विकतील, व

मनासारखी किंमत आल्यास आपले पोरगे विकत देतील! स्वतःच्या घेन्याचा किंवा मिशीचा एक केस फाजील कापला गेला तर जे नित्याच्या न्हाव्यावर वाघासारखे चवताळून जावयास सोडावयाचे नाहींत, व मातापितरांपैकीं एखाद्याचा अंत होऊन आपल्या मुखभूषणावर स्वल्पकालीन गदा आली, तर त्यांस मरणप्राय दुःख झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं, अशा या लोकांना, घरीं आलेल्या सुनेस किंवा मुलीस, जवळचें पर्व साधून जबरीनें न्हाव्याच्या ताब्यांत देण्यास काडीयेवढें देखील वाईट वाटावयाचें नाहीं ! चोरटेपणानें हे पाहिजे तसलीं कुकर्में करतील. एकांतांत किंवा ठरीव कंपूत इंग्रजी भाषेंतील ब्रँडी या शब्दांतून निघणाऱ्या व्यंत त्रयीपैकीं कोणतीही वस्तू यांना कदाचित् वर्ज्य असणार नाहीं; पण समाजांत हे अपेयपानाचा, अगम्यगमनाचा व अभक्ष्यभक्षणाचा इतका विटकारा दाखवतील कीं, तो पाहून एखाद्या भोळसटास हे शुद्धत्वाचे खंदकच आहेत कीं काय, असा भास होईल ! तात्पर्य, बहुसमाजाकडून 'शाबास' म्हणवून घेण्यासाठीं व आपल्या मिळकतीस धक्का पोंचूं न देण्यासाठीं दंभ, निष्ठुरता व अविचार यांचा हे किती अवलंब करतील, हें सांगतां येणे अशक्य आहे ! असल्या लोकांनीं सुधारकांस "तुम्हीं करून कां दाखवीत नाहीं, निराळी जात कां स्थापित नाहीं, उदाहरण कां घालून देत नाहीं," असे प्रश्न करण्यांत विशेष पुढारीपण घेऊन, आपण पूर्वाचाराचे भजक, तारक व प्रवर्तक आहों, अशी सामान्य लोकांस भुरळ पाडून त्यांस प्रतिदिवशीं चकवावें आणि स्वार्थसिद्धीसाठीं त्यांना हवेंतसें बुचाडून, सन्मार्गाकडे त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति सहसा होऊं देऊं नये, हें अत्यंत स्वाभाविक आहे !

या तीन प्रकारच्या सुधारणानिंदकांस आम्हीही 'करून कां दाखवीत नाहीं !' हाच प्रश्न घालतों. बालविवाह आणि केशवपन यांचा निषेध करण्यासाठीं कायद्याचें साहाय्य घेणें अप्रयोजक होय, असें यांचें म्हणणें आहे. सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें हें अपायकारक आहे, अशी यांची खात्री झाली असेल तर वेश्यागमन, मदिरापान वगैरे व्यसनें बंद करण्यास किंवा कमी करण्यास यांनीं सरकारचि कां आळवावें, हें समजत नाहीं ! विवाहित स्त्रीच्या नाकावर टिच्चून जो वण्यांगना घरांत ठेवील, किंवा प्रतिदिवशीं बुद्धिभ्रंशक आसवाचे नेमानें एकदोन ग्लास झोकील,

त्यास अमुक इनाम किंवा पदवी द्यावयाची, असें सरकारानें ठरविलें आहे, असें निदान आमच्या तरी ऐकण्यांत आलेलें नाहीं ! किंवा आम्ही ज्याप्रमाणें अल्पवयस्क मुलांस व मुलींस मदनहालांत जबरीनें कोंडून घालतों, त्याप्रमाणें कुलटावाटिकांत नागरिकांस किंवा जानपदास लोटण्यासाठीं, अथवा लहान मुलांस ज्याप्रमाणें आपण पायांवर घालून त्यांच्या मर्जीविरुद्ध कांहीं औषध पाजतों, त्याप्रमाणें आमच्या नाकपुड्या मिटून व आमचीं तोंडें उघडून, त्यांत दारूचे औंस दोन औंस ओतण्यासाठीं, सरकारनें एखादें स्वतंत्र खातें ठेविलें आहे, असेंही कोणास म्हणतां येणार नाहीं ! या व्यसनांविषयीं आम्हास जी आसक्ती उत्पन्न झाली आहे ती आमच्याच अविचाराचें फळ आहे. असें असून तिच्या शमनार्थ आम्हीं सरकारकडे धांव घ्यावी आणि आपला कमकुवतपणा उघडा करावा, हें योग्य आहे काय ? पण आम्हांस अक्कल कोठून असणार ? 'आपलें तें सोनें आणि दुसऱ्याचें तें कारटें' असें कोणत्या अविचारी मनुष्यांस वाटत नाहीं ? याचप्रमाणें बुद्धिविकासक शिक्षण, यांत्रिकशिक्षण, धंदेशिक्षण, व्यापार, आरोग्य, वगैरेंची गोष्ट होय. या कामांतही सरकाराकडे तुम्ही कां जातां ? यासंबंधानें ज्या सुधारणा तुम्हांस इष्ट असतील त्या तुमच्या तुम्ही कां करून दाखवीत नाहीं ? असा प्रश्न या तीन वर्गांतील लोकांस घालण्याचा अधिकार यांच्याच विचारशैलीप्रमाणें आम्हांस येत नाहीं काय ?

पण हेंही असो. ज्या गोष्टींविषयीं आतां कोणत्याही समाजांत मतभेद उरलेला नाहीं, म्हणजे ज्या अपायकारक व निंद्य आहेत, अशाविषयीं कोणासही शंका राहिलेली नाहीं, अशा गोष्टींच्या निषेधासाठीं तरी सरकार-ची मदत कशासाठीं मागावी ? चोरी करणें, खोटी साक्ष देणें, खोटे कागद करणें, करार मोडणें, शिवीगाळ करणें, अब्रू घेणें, दहशत घालणें, खोटें बोलणें, निरुद्योगी असणें, मारामार करणें वगैरे गोष्टी तर सर्वानुमतें वाईट ठरल्या आहेतना ? मग अशा प्रकारची आगळिक जर कोणाकडून झाली तर त्याला दंड करण्यासाठीं सरकारकडे कशासाठीं जावें ? पण ज्या देशांत अशा अपराधांबद्दल शिक्षा देण्याचें काम सरकाराकडे नाहीं, असा एकतरी सुधारलेला देश आहे काय ? किंवा अशा अपराधांची चौकशी करणें व त्यांबद्दल योग्य दंड करणें हें सरकारचें कर्तव्य नाहीं, असें प्रतिपादणारे

'षंढ सुधारक' कोणत्याही सुधारलेल्या देशांत असतील काय ? असतील असें आम्हांस वाटत नाहीं. उलट आमची अशी समजूत आहे कीं, कोणत्याही देशांत जों जों अधिकाधिक सुधारणा होत जाते तों तों त्यांतील लोकांच्या अंगीं अधिकाधिक सूक्ष्मवेदित्व किंवा शीघ्रग्राहित्व येत जातें व त्यामुळें त्यांचा एकमेकांपासून एकमेकांस जितका कमी त्रास होईल तितका होऊं देण्यासाठीं व प्रत्येकास अधिकाधिक स्वातंत्र्याचा उपभोग मिळण्यासाठीं, प्रतिदिवशीं नवीन नवीन गोष्टींत सरकारचें साहाय्य घेऊन, कायद्यांची संख्या वाढविण्याचा आणि त्याप्रमाणें न्याय देण्यासाठीं न्यायाधिशांचें काम अधिकाधिक कठीण करण्याचा क्रम एकसारखा चालू आहे अशा प्रकारच्या बाह्य बंधनांनीं मनुष्यांच्या अंतःकरणांतील दुष्प्रवृत्तींचा मोड हळू हळू होत जाऊन, त्यांचें बहुतेक वर्तन सहजगत्या नीतिमत किंवा न्यायानुसारी होऊं लागल्याशिवाय या क्रमास खळ पडणार नाहीं, असें वाटतें. समाज हा स्वाभाविकपणें ज्यास अनेक पैलू आहेत अशा खड्यासारखा आहे. असला खडा खाणींतून नुकताच काढला असल्यास, विशिष्ट आकार, सफाई किंवा तेज यांपैकीं कोणतेच गुण त्यांत नसतात; पण कल्पक सुवर्णकारांकडून जसजसें त्यावर घर्षण होत जातें तसतसें त्यास मोहक स्वरूप येत जातें. देशांतील विचारी लोक हे कल्पक सुवर्णकार होत व समाज हा त्यांच्या हातीं दिलेला पैलूदार खडा होय. या खड्यावर सरकारी साहाय्य, स्वतःचा प्रयत्न वगैरे हत्यारांनीं काम करून ते त्यास मोहकपणा आणितात. ज्या कामास ज्या वेळीं जें हत्यार पाहिजे असेल तें घेतलें पाहिजे. आजमितीस आमच्या समाजाची अशी दीनवाणी स्थिति झाली आहे कीं, प्रत्येक गोष्टींत, आमच्या मनांत असो किंवा नसो, थोडेंबहुत सरकारचें साहाय्य घेतल्याशिवाय आमच्या हातून कांहींएक होत नाहीं. कोणी लोकशिक्षणाचा पैलू घांसून वाटोळा करण्यासाठीं सरकारची मदत मागतात ! कोणी सद्गुणांच्या पैलूवरील मदिरादि व्यसनांचा मळ उडविण्यासाठीं तेंच करतात ! आम्हीं आमच्याकडे घेतलेल्या पैलूस इतर पैलूंप्रमाणें चांगला आकार व सफाई आणण्यासाठीं तेंच करीत आहों ! सबब आम्हीं मात्र तें काम सद्यःस्थितींत स्वप्रयत्नाच्या हत्यारानें करावें आणि दुसऱ्यांनीं सरकारी हत्याराची हवी तितकी मदत घ्यावी, हें म्हणणें बाजवी नाहीं ! सरकारी हत्यार न

वापरण्याचे दिवस येतील तेव्हां ते सान्यांसच येतील! आज त्यावांचून कोणाच्या हातून कांहींच होण्यासारखें नाहीं, हें सूक्ष्म विचाराअंतीं प्रत्येक समंजस मनुष्यास समजण्यासारखें आहे. सगळे पैलू साफ झाल्याखेरीज समाज-खडा कोहिनुराप्रमाणें कधींच चमकूं लागणार नाहीं, हें ज्यानें त्यानें ध्यानांत वागवून, आपपल्या पैलूवर होईल तितकी मेहनत करीत असावें, आणि मत्सर व क्षुद्र बुद्धि यांचा त्याग करून, दुसऱ्यास होईल तितका हातभार लावावा, हाच सुधारणेचा अत्यंत प्रशस्त मार्ग होय.

---

## जात कां करीत नाहीं? : : १७

[सुधारकांची विचारसरणी ज्यांस मोडून काढतां येत नाहीं, पण "तुमचें म्हणणें बरोबर आहे" असें उघडपणें कबूल करण्याची उदारता ज्यांचे अंगीं नाहीं, ते त्यास "तुम्हीं आपली जात कां करीत नाहीं" असा एक प्रश्न करीत असतात. हा प्रश्न करण्यांत या सुधारणाप्रतिपक्ष्यांची कमकुवत पूर्णपणें व्यक्त होते. बालविवाहाचें अपायकारित्व, विधवाविवाहनिषेधाचें मूर्खत्व, आणि तरुणांगनांच्या केशवपनाचें अमानुषत्व हीं आतां भूमितीच्या सिद्धांताप्रमाणें ठरून गेलीं असल्यामुळें, त्यांचें मंडन करण्याचें धैर्य पूर्व-पद्धतीच्या एखाद्या महामहोपाध्यायासच होऊं शकतें. ज्यावर पाश्चिमात्य विद्येचा थोडाबहुत संस्कार झाला आहे, त्यास वरील गोष्टी निर्दोष व संग्रहणीय आहेत, असें निदान उघडपणें तरी म्हणतां येत नाहीं. तेव्हां तो आपल्या-साठीं त्यांतल्या त्यांत सवड काढीत असतो. वरील सुधारणा अत्यंत इष्ट आहेत, पण त्याचा अनुक्रम करण्याचा अजून काळ आला नाहीं, ही एक त्यांची बोलण्याची पद्धत होय. कधीं कधीं तो आपण त्या करण्यास तयार आहों, पण इतरांची तयारी नसल्यामुळें आपणांस त्यांबरोबर रखडावें लागत आहे, असें म्हणत असतो. "मला अर्वाचीन शिक्षण मिळाल्यामुळें माझें मन विकासित झालें आहे व मला चांगलें वाईट कळूं लागलें आहे; पण शेकडों लोकांस त्या शिक्षणाचा फायदा मिळाला नसल्यामुळें त्या सुधारणांचें महत्त्व व आवश्यकता हीं त्यास समजत नाहींत, व तीं त्यांस आपल्या आपण समजूं लागेतोंपर्यंत त्यांवर त्या लादणें बरोबर नाहीं; याकरितां त्या सुधार-

णांचा स्वीकार करण्याची तयारी सर्वांकडून होईपर्यंत मलाही त्यांचेंच अनुसरण केलें पाहिजे. शुद्ध असलें तरी लोकाविरुद्ध असें आचरण करून त्यांतून बाहेर पडण्यांत काय अर्थ आहे! साऱ्या लोकांची जी सुधारणा ती खरी सुधारणा, तथापि "उतावीळ" सुधारकांना आपल्या सुधारणांचा अंमल लौकर बसावा, असें वाटत असेल तर त्यांनीं आपली एक लहानशी जात काढून, त्या सुधारणा प्रचारांत आणाव्या आणि त्या हितावह आहेत, असें प्रत्यक्षपणें लोकांच्या अनुभवास आणून द्यावें, म्हणजे लोकही त्यांचें तेव्हांच अनुकरण करूं लागतील; म्हटलें आहे, "बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें" इत्यादि. हें वाग्जाल पसरणारे दोन मतलब साधण्यास पहात असतात. दुसऱ्यांवर उलटून पडून आपलें भाणूबाईपण छपवावयाचें, आणि आपले विचार उदार असल्याबद्दल शेखी मिरवावयाची. आपण होऊन रूढचालीविरुद्ध प्रसिद्धपणें कांहीं बोलावयाचें नाहीं, व आचरणांत सामान्य लोकांच्यापुढें जावयाचें नाहीं, पण शिळोप्याच्या सभांत विचाराची बरीच उदारता जपून जपून प्रकट करावयाची—हा नेहमींचा थाट! एखादे प्रसंगीं कोणी घुलवीत घुलवीत गळ्यांत घोंगडें घालण्याचा प्रसंग आणिलाच, तर तद्दिशीं मोर्चा फिरवून "तुम्हीच कां करून दाखवीत नाहीं, तुम्ही स्वतंत्र जात कां स्थापीत नाहीं!" असा प्रलाप करूं लागावयाचें!

असले ढोंगी लोक "जात कां करीत नाहीं" म्हणून आपण आपल्या प्रतिपक्षांस जो प्रश्न करतात त्यांत त्यांचे अनेक प्रकारचे हेतु असतात. जे कोणी सुधारणेचें पाऊल पुढें पडावें म्हणून व्याख्यानें, संभाषणें, वाद किंवा लेखी चर्चा करीत असतात, त्यांचा आपणांस मोठा कंटाळा आहे, या लोकांस वेळ अवेळ समजत नाहीं, संसारांतल्या अडचणी त्यांस माहीत नाहींत, व्यर्थ वल्गना करण्याखेरीज त्यांचे हातून कांहीं होत नाहीं, अशी आपली पक्की खातरी होऊन गेली आहे, असें दाखविण्यासाठीं "उतावीळ" सुधारकांचें तोंड बंद करण्याच्या इरादानें हे हा दांभिकपणाचा प्रश्न त्यास करीत असतात, अशी त्याविषयीं आमची एक कल्पना आहे. दुसरे आम्हांस असें वाटतें कीं, हे खरोखरीच भेकड असतात. यांना अमुक सुधारणा चांगल्या आहेत, आणि त्या होतील तर फार चांगलें होणार आहे, असें खरोखरीच वाटत असतें. पण त्या करण्यास आपण होऊन हात घालण्याचें

धैर्य त्यांच्या अंगीं नसतें. आपण होऊन कोणतीही गोष्ट करूं लागण्याचें धैर्य तर एकीकडेच राहिलें; पण कोणतीही अरूढ गोष्ट प्रशस्त आहे, असें उघडपणें प्रतिपादण्याचें धैर्यही या बाबूंच्या अंगीं असत नाहीं. लोकांस अप्रिय असे बोलणें लोकांनीं बोलावें; त्यांपासून होईल ती नाचक्की करून घ्यावी; पाद्रयासारखा चिवटपणा करून वर्षानुवर्ष संक्षोभक विषयांची चर्चा चालवावी, व असें करतां करतां त्यासंबंधानें लोकांची नजर बरीच स्थिर झाली, म्हणजे तसले विषय कानीं आले असतां ते भांबावून न जातां त्यासंबंधाचा वाद, ते नाकें मुरडीत का होईना, पण थोडाबहुत ऐकूं लागले, म्हणजे मग हे एखादे वेळीं चोरूनमारून त्याला अनुकूल असा एखादा शब्द काढूं लागतात! पुढें आचरणाचा प्रसंग येतो! तो आला कीं यांचें घोडें अगदींच उभें रहातें. दुसऱ्यांनीं आरंभ करून अगदीं नवीन चाल पुरी प्ररूढ झाली म्हणजे मग हे महाजनाच्या ओघाबरोबर तिच्याप्रमाणें व्यवहार करूं लागणार! पर्वतीच्या तळ्यावर कोणी जवळ नसतां जर त्यांना तुम्ही असें विचाराल कीं, 'जेवायला बसतांना मुकटा लावून घेण्यांत कांहीं अर्थ आहे असें तुम्हांस वाटतें काय?' तर ते तुम्हांपाशीं असें कबूल करितील कीं, 'कांहीं अर्थ नाहीं,' पण याच कबुलीच्या जोरावर त्यांना तुम्ही पुढें जर असा प्रश्न कराल कीं, 'रावजी, जर त्यांत तुम्ही कांहीं अर्थ नाहीं असें म्हणतां, तर ज्या वेळेस तुम्ही आणि तुमची बायको येवढीं दोनच माणसें घरांत असतां, तेव्हां बायकोकडून ओंवळ्यानेंच स्वयंपाक कां करवीत नाहीं? व तुम्हीही ओंवळ्यानें कां जेवीत नाहीं?' अशा प्रश्नावर त्यांचेकडून असें उत्तर येईल कीं, 'छेः बोवा, तें आमच्यानें व्हावयाचें नाहीं. सारे लोक ओंवळ्यानें जेवूं लागले; घरांतील बायकांना ओंवळ्याचें कांहीं वाटेनासें झालें, मोठमोठ्या समाराधनांत, श्राद्धपंक्तींत व लग्नकार्यांतील मेजवान्यांत ओंवळ्यानें जेवावयास बसण्याचा प्रघात सर्वत्र सुरू झाला, म्हणजे मग आम्ही ओंवळ्यानें जेवायाला बसण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं! तोंपर्यंत आम्ही आपला आहे हा क्रम चालू ठेवणार! जर तुम्हांस धैर्य असेल तर तुम्ही आपले ओंवळ्यानें बसूं लागा, आणि आम्हींही तुमच्यासारखेच लौकर करूं लागावें, अशी तुमची इच्छा असेल, तर तुम्ही खटपट करून थोड्या दिवसांत बहुतेक लोक तदनुसार

वर्तन करतील, असें करा; म्हणजे आमची तयारी आहेच!" तात्पर्य काय कीं, कोणतीही सुधारणा झाल्यावर ती करूं लागण्यास प्रवृत्त होणारे हे 'थंडे' सुधारक होत! म्हणजे एखादी नवीन चांगली गोष्ट स्थापित होऊन तिला जुनेपणाचें स्वरूप येऊं लागलें, किंबहुना तीप्रमाणें आचरण न करणाराचा उपहास होण्याचे दिवस येऊन ठेपले, म्हणजे हे विचारी सुधारक पुढें सरसावून लोकापवादास न जुमानतां देशास कल्याणकारक अशा सुधारणेचा अवलंब करण्यास निघणार! अशा सुधारकांस सुधारक म्हणावें किंवा त्यांनीं काढलेल्या दुर्धारक संज्ञेनें त्यांचा व्यपदेश करावा, याचा निश्चय करणें वाचकांवरच सोंपवितों.

'जात कां करीत नाहीं?' असा प्रश्न करणारे आपण काय बरळतों याचा क्षणभर तरी विचार करतात काय? जात करणें म्हणजे कां चिखलाचें पार्थिव करून दोन घटकांनीं फेंकून देणें, कीं नदीला गढूळ पाणी आलें असतां, तिच्या कांठावर वाळूंत झरा उकरणें, का उन्हाळ्यासाठीं घरापुढलें अंगण खणून सारवून स्वच्छ करणें, कां चार दिवसांच्या उत्सवासाठीं लव्हाळ्यानें आच्छादिलेला मंडप घालणें—कीं आहे तरी काय? 'जात करा'! आजपर्यंत काय थोड्या जाती झाल्या आहेत? परब्रह्म आणि माया या पहिल्या दोन जाती! पुढें हिंदुस्थान वसविण्यासाठीं ब्रम्हदेवाच्या मुखांतून, बाहूंतून, ऊरूंतून, व पायांतून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार जाती अवतरल्या! या देवकृत चार जाती आम्हांस पुरेशा न होऊन आम्ही केवढा जातिपसारा करून ठेवला आहे! हें या प्रश्नकारांस ठाऊक नाही काय? जातीच्या अनेकपणापासून होणाऱ्या दुष्परिणामांचीं फळें आम्ही प्रतिदिवशीं भोगीत असतां, हे अविचारी, स्वार्थसाधु, किंवा भेकड लोक आम्हांस नवीन जात करावयास सांगतात, तेव्हां यांच्या शहाणपणाला काय म्हणावें! अथवा तें यांच्या अंगीं आहे किंवा नाहीं याचाच संशय आहे! जातीमुळें आपला देशाभिमान किती संकुचित झाला आहे; जातीमुळें ज्ञान, कला, शास्त्रें वगैरे जेथल्या तेथें कशी कोंडल्यासारखीं झालीं आहेत; जातीमुळें धर्मविचारांत व आचारांत किती मतभेद उत्पन्न होऊन तो परस्पर वैरास, छलास व मत्सरास कारण झाला आहे; जातीमुळें अन्नव्यवहार, विवाह वगैरेंच्या संबंधानें किती गैरसोय झाली

आहे; जातींमुळें देशांतल्या देशांत किंवा परदेशीं प्रवास करणें किती कठिण झालें आहे; जातींमुळें परद्वीपस्थ व परधर्मीय लोकांपासून अलग राहावें लागत असल्यामुळें केवढें नुकसान होत आहे; जातींमुळें आमची भूतदया, आमचें बंधुप्रेम, आमची उदारता, आमची धर्मबुद्धि, आमची परोपकाररति, आमचे विचार यांचें क्षेत्र किती मर्यादित झालें आहे, याची या 'धीर' सुधारकांच्या मनांत खरी कल्पना कधींच येत नाहीं काय? किंवा ती येत असूनही ते आम्हांस आणखी एक नवीन जात काढण्यास सांगतात काय? कदाचित् एके काळीं या इतक्या जाती कांहीं विशेष कारणामुळें अस्तित्वांत येणें अपरिहार्य होतें. पण येथून पुढें जो या देशांत नवीन जात काढण्याचा प्रयत्न करील तो त्याचा हितचिंतक न समजतां दुष्ट शत्रूच समजला पाहिजे. आज ज्या आम्ही अनेक विपत्ति भोगीत आहों त्यांपैकीं ज्यांचें जनन आमच्यां-जातिभेदापासून झालें नाहीं, असें म्हणतां येणार आहे, अशा फारच थोड्या असतील! धर्मविषयक किंवा राज्यविषयक गोष्टींच्या संबंधानें मतभेद होऊन निरनिराळे पंथ किंवा पक्ष उपस्थित होणें हा प्रकार आमच्यांतील जाती-भेदाहून फार निराळा आहे. तसेंच, अध्ययन व व्यवसाय यांच्या भेदाप्रमाणें तत्त्ववेत्ते, कवि, राजकारस्थानी, शिल्पी, वैद्य, वकील, सावकार, शेतकरी, ऋणको, धनको असे लोकसंख्येचे अनेक वर्ग होणें यांतही कोणत्याही प्रकारचा अस्वाभाविकपणा नाहीं. पण येथें ज्या प्रकारचा जातिभेद रूढ आहे त्या प्रकारचा जातिभेद वृद्धिंगत न होतां जितका क्षीण होत जाईल तितका बरा, असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. असें असतां, जो मतभेद दहा-पांच वर्षांत, चर्चेची टकळी चालली असतां, रसातळास जाणार व ज्या सुधारणा पाश्चिमात्य शिक्षणाचा सपाटा आणि ब्रिटिश अंमल यांमुळें शेंपन्नास वर्षांत सहज घडून येणार, त्यासाठीं नवीन जात करण्यास सल्ला देणारांचें सौजन्य किंवा दूरदर्शित्व यांचें काय वर्णन करावें!

---

## सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल : : १८

### सांप्रत काल

सुमारें तीन पिढ्यांपूर्वीं म्हणजे पाऊणशें वर्षांपूर्वीं आम्ही राष्ट्रीयस्वातंत्र्य-

शैलाच्या शिखरावर होतों. तें स्थान तरी आम्हीं मुसलमानांपासून मोठ्या कष्टानें काबीज करून घेतलें होतें. आमच्या अंगांत राज्यकौशल्य असतें, तर तें स्थान आम्हीं जाऊं दिलें नसतें. पण तसें कोठून होणार! पूर्वीपासून खऱ्या देशाभिमानाची कल्पना या हिंदु लोकांस नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ती असती तर मुसलमानांस देखील आम्हीं येथें पादशाही स्थापूं दिली नसती. पण तो 'राम' आम्हांत केव्हांही नव्हता. व्यक्तिशौर्य येथें आढळत नाहीं असें नाहीं. तें बरेंच आहे. तसेंच रजपुतासारख्या कांहीं जातीच्या जाती रणशूर आहेत. पण उपयोग काय! जेथें शौर्य आहे, तेथें अक्कल नाहीं, व जेथें अक्कल आहे तेथें शौर्य नाहीं, अशी आमची चिरकालीन स्थिति होऊन बसली आहे. कांहीं विशेष कारणांमुळें या महाराष्ट्र देशांतील लोकांत अक्कल आणि शौर्य यांचा स्वल्पकालीन संयोग झाल्यामुळें, त्यांनीं मुसलमानांचें पारतंत्र्यजूं झुगारून दिलें, व कांहीं वेळ स्वराज्याचा उपभोग घेतला. पण मुसलमानांहून वरिष्ठ शत्रूशीं झगडण्याचा प्रसंग आल्याबरोबर तेही आपलें कष्टार्जित स्वातंत्र्य गमावून बसले! इंग्रजासारख्याशीं आमची गांठ पडून, साऱ्या भारतीयांस परवशता आली, ही गोष्ट तर फार वाईट झाली, यांत संशय नाहीं. पण तीबद्दल विशेष खेद करणें आम्हांस बरोबर दिसत नाहींत. इंग्रजांपूर्वीं आम्ही मुसलमानांचे गुलाम कशासाठीं झालों! ज्या आम्हांला मुसलमानासारख्या शुद्ध दांडग्या व धर्मवेड्या लोकांपासून आपल्या स्वातंत्र्याचा बचाव करतां आला नाहीं, ते आम्ही बकऱ्यासारखे चतुर, शूर व कारस्थानी आंग्लभौमांच्या स्वाधीन झालों, यांत नवल तें कोणतें! मुसलमानांनीं आम्हांस पादाक्रांत केलें त्याच वेळेस असें सिद्ध झालें कीं, या भरतखंडांत राहणाऱ्या आर्य लोकांत स्वातंत्र्यरक्षणाचें सामर्थ्य राहिलें नाहीं. मुसलमानांच्या पाठीमागून आम्हांस इंग्रज न जिंकते, तर त्यांचे काका दुसरे कोणी तरी जिंकते! इंग्रजांबरोबरच किंवा त्यांच्या पूर्वीपासूनही पोर्तुगीज, डच, फ्रेंच वगैरे युरोपिअन लोक आपलें राज्य येथें स्थापण्याची खटपट करीतच होते! आज आम्ही इंग्रजांची प्रजा नसतों तर पोर्तुगीज, डच किंवा फ्रेंच लोकांची असतों! आणि उद्यां इंग्रजांचें राज्य नाहींसें झालें, तर आम्ही स्वतंत्र होणार आहों कीं काय? त्याचें नांव कशाला! ती गोष्ट स्वप्नांतसुद्धां आणण्याची गरज नाहीं! इंग्रज गेले

तर रूस आमच्या छातीवर पाय देण्यास तयार आहेतच! तात्पर्य काय कीं, राष्ट्रीय स्वातंत्र्य राखण्यास लागणाऱ्या गुणांचा आम्हांत पूर्णपणें लोप झाला आहे; व त्यांचा फिरून आविर्भाव होऊं लागून त्यांची बरीच वृद्धि होईतोंपर्यंत तें फिरून प्राप्त होण्याची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे. राजकीयस्वातंत्र्य जाणें ही अत्यंत खेदजनक गोष्ट खरी. हें जाणें म्हणजे शरीरांतील सर्व इंद्रियें आणि त्यांचे व्यापार यांचें पोषक असें जें चैतन्यसारतत्त्व तें नाहींसें होणें होय. पण तें गेलें म्हणून रुदन करीत बसण्यांत काय फायदा आहे? जगावयाचें असेल व जगणें तें चांगल्या प्रकारचें जगणें हवें असेल, तर तें चैतन्यसारतत्त्व फिरून आपल्या हातीं येण्याचा प्रयत्न केला पाहिजे व सांप्रत कालीं राष्ट्रसभादि साधनांच्या द्वारें तो जितका होण्यासारखा आहे तितका आम्ही करीत आहों. तेव्हां त्यासंबंधानें आज येथें विशेष लिहिण्याची आमची इच्छा नाहीं. चालू घटकेची आमची परवशता राजकीय दृष्टीनें अत्यंत शोच्य आहे, हें निर्विवाद आहे; पण कोणतीही स्थिति सर्वांशीं दुःखमय किंवा सुखमय असत नाहीं, असा जो पुरातन न्याय आहे, तदनुरोधानें आमची सांप्रत शोच्य परवशतासुद्धां केवळ दुःखमय आहे, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. या परवशतेमुळें राज्यप्रकरणांत आम्ही शून्यत्वाप्रत पावलों आहों, व त्या शून्यत्वामुळें आमच्या कर्तृत्वशक्तीचा बराच ऱ्हास होत आहे, हें निःसंशय आहे; तथापि आम्ही थोडे हातपाय हालवूं, तर याच परवशतेपासून आम्हांस आपलें फार दिवस नष्ट झालेलें सामाजिक व धार्मिक स्वातंत्र्य स्थापितां येणार आहे

जे लोक राजकीय प्रकरणांत स्वतंत्र असतात, ते सामाजिक व धार्मिक प्रकरणांत स्वतंत्र असतातच असा नियम नाहीं. किंबहुना राजकीय स्वातंत्र्य असूनही सामाजिक व धार्मिक गोष्टींत अत्यंत तीव्र दास्यपाशानें सर्व प्रकारें जखडलेले असे अनेक लोक असतात. कांहीं अंशीं नष्ट झालेलें राजकीय स्वातंत्र्य फिरून संपादणें सवघड आहे. कारण, तें हिरावणारा शत्रू परका असतो, व त्याचा मोड केला म्हणजे तें फिरून प्राप्त होण्यासारखें असतें. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीची तशी गोष्ट नाहीं. अगोदर फार वर्षांच्या सवईमुळें अशा प्रकारची गुलामगिरी, गुलामगिरी आहे, असें पुष्कळांस

वाटेनासें झालेलें असतें. ज्याप्रमाणें शरीरांत अनेक वर्षें ठाणें करून राहिलेल्या व्याधीपासून फारसा त्रास होईनासा होतो, त्याप्रमाणें जे कष्टावह सामाजिक व धार्मिक आचार-ते आपणांपाठीमागें केव्हां लागले, ते परिहार्य आहेत किंवा अपरिहार्य आहेत, त्यांचा अंमल आपणांवर कोणाकडून होत आहे, तो अंमल करण्याचा त्यास काय अधिकार आहे वगैरे गोष्टींविषयीं आपणास गूढ अज्ञान असतें-ते आचार त्रयस्थास कितीही पीडाकर वाटले तरी खुद्द आपणास ते तसे वाटत नाहींत. तथापि त्यापासून आपल्या शरीरावर व मनावर जे दुष्परिणाम होण्यासारखे असतात, ते होतच असतात. मादक द्रव्याचें सेवन नित्य करणाऱ्या मनुष्याच्या ज्ञानतंतूंस येणारी क्षीणता त्याची त्याला किंवा त्यासारख्या इतर व्यसनी लोकांना नीट समजली नाहीं, म्हणून ती येत नाहीं, असें म्हणणें ज्याप्रमाणें बरोबर होणार नाहीं, त्याप्रमाणें मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक आचारापासून राष्ट्रस्थितीवर होणारे दुष्परिणाम त्या राष्ट्रांतील लोकांच्या लक्षांत आले नाहींत, म्हणून ते होत नाहींत, असें म्हणणेंही बरोबर होणार नाहीं. जोपर्यंत अशा रीतीनें क्षीण झालेल्या लोकांस त्याहून श्रेष्ठ अशा लोकांशीं झगडण्याचा प्रसंग आलेला नसतो, तोंपर्यंत त्याची आयुष्ययात्रा केवळ कष्टमय असते, असें म्हणतां येत नाहीं. पण जेव्हा त्याचा वरिष्ठाशीं प्रसंग येऊन ठेपतो, तेव्हां त्यास आपल्या क्षीणतेचें भान होऊं लागतें, व एकाएकीं जागृदवस्था त्यास प्राप्त झाल्यासारखें होऊन, आपली अशी दशा कां झाली असावी, असे विचार त्याचे मनांत येऊं लागतात. हा उद्बोध योग्य वेळीं होणें ही दैवाधीन गोष्ट आहे. शरीरांतील व मनांतील सारा जोम नाहींसा झाल्यावर जर हा उद्बोध झाला, तर त्यापासून कांहीं एक फायदा होत नाहीं. नाड्या टार बंद पडल्यावर संजीवनीचें तरी काय चालणार? रुधिराभिसरण थोडेबहुत सुरू असले; छातींत, हातांत व पायांत तें चालू आहे असें यत्किंचित् जर व्यक्त होत असलें, तरच मात्राचे वेढे उगाळण्यात आणि ते जिभेला लावण्यांत कांहीं अर्थ आहे. शेवटच्या श्वासावाटें प्राणवायु बाहेर पडून सारें शरीर थंड झाल्यावर, मात्राचा मारा करीत सुटण्यात जसा कांहीं अर्थ नाहीं, त्याप्रमाणें फार प्राचीन धार्मिक व सामाजिक दुराचारामुळें ज्या राष्ट्रांतील सारा तकवा नाहींसा

झाला आहे, त्या राष्ट्रांतील लोकांचा सुधारलेल्या राष्ट्राशीं संबंध घडून त्यांचा मूर्खपणा त्यांस दिसूं लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्राणोत्क्रमणाचे वेळीं वाचा बसल्यावर कांहीं तरी बोलण्यासाठीं धडपड करणाऱ्या मरणोन्मुखाची जी स्थिति असते, ती असल्या लोकांची असते. वरिष्ठ लोकांच्या सान्निध्यामुळें असले लोक अखेरीस नामशेष होतात! आम्हांवर कसा प्रसंग गुदरणार आहे, हें आजच खात्रीनें सांगवत नाहीं. राजकीय दृष्टीनें सध्यां आम्ही मेल्यासारखेच आहों. पण ज्यांनीं आम्हांस राजकीय शून्यता आणिली आहे, त्यांच्याच सान्निध्यामुळें आमच्या धार्मिक व सामाजिक गाढ मूढतेस धक्के बसूं लागले आहेत! इंग्रज लोक आम्हांस जें शिक्षण देत आहेत, व त्यांच्या अमलांत विचारस्वातंत्र्याचा जो उपयोग आम्हास प्राप्त होत आहे, त्या शिक्षणाच्या आणि विचारस्वातंत्र्याच्या बळशांनीं आम्हांस जी जागृति होऊं लागली आहे, ती हवी असल्यास आम्हांस पाहिजे तितकी कल्याणकारक करून घेतां येणार आहे. पुष्कळांचा असा समज आहे कीं, सुधारणेचा आरंभ होणें तो राजविषयक सुधारणेपासून झाला पाहिजे. राजकीय सुधारणेविषयीं फारसा मतभेद असत नाहीं; त्यामुळें ती घडवून आणण्यासाठीं एकमेकांस मदत करण्याच्या कामीं एकाचा दुसऱ्याशीं म्हणण्यासारखा विरोध येऊं शकत नाहीं. स्वातंत्र्य हें सर्वांस प्रिय आहे. आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीविषयीं प्रयत्न करणें होय. ही गोष्ट जितकी आम्हां महाराष्ट्रीयांस तितकीच वंगवास्यांस, गुर्जरस्थांस, तेलंगणस्थांस, कर्नाटकीयांस, पारसीकांस, महंमदीयांस व इतरांस इष्ट असणें स्वाभाविक आहे, व म्हणून त्यांचें एकीकरण होणें शक्य आहे, व तें होऊं लागलें आहे. सामाजिक व धार्मिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. यासंबंधानें आमची कांहीं प्रिय वस्तु कोणीं नेली आहे, आणि आम्हांस फिरून ती संपादावयाची आहे, असें नाहीं. उलट आमची आहे ती स्थितीच उत्तम आहे, व तींत फेरफार करण्याचा प्रयत्न करणें हाच प्रमाद होय, असें आम्हांपैकीं पुष्कळांस वाटत असल्यामुळें, जे थोडे वेडेपीर सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या छंदास लागले आहेत, ते समाजांत निष्कारण असंतोष व कलह उत्पन्न करून, स्वतःस कांहीं फायदा नसतां अप्रिय करून घेत आहेत! हें असें न करतील तर सर्वांस इष्ट अशा ज्या

राजकीय, व्यापारीय, शिक्षणीय व इतर सामान्य सुधारणा, त्या एकमतानें करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होणार आहे. सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयीं तंटे उपस्थित केल्यामुळें, राजकीय गोष्टींत एकदिलानें वागणें दुरापास्त झालें आहे !

अशा प्रकारच्या आक्षेपकांस आम्ही असा प्रश्न करतो कीं, इंग्रज लोकांनीं तुम्हांस जिंकिलें त्यावेळेस तुम्हांत कोणत्याही प्रकारचे सामाजिक किंवा धार्मिक तंटे नव्हते. त्या वेळेस राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून, सामाजिक व धार्मिक प्रकरणांत तुमचें पूर्ण ऐकमत्य होतें. असें असून परशत्रूस तुम्ही हार कां गेला ? सैन्यबल, द्रव्यबल, संख्याबल इत्यादि यशाचीं बाह्योपकरणें तुमच्या हातीं असून, व धार्मिक आणि सामाजिक गोष्टींत तुम्हांत द्वैत माजलेलें नसून, तुमची अशी दाणादाण कां झाली ! व पंचवीसचाळीस वर्षांच्या आंत तुम्ही इतके वीर्यहीन कसे झालांत ! आम्हांस असें वाटतें कीं, देशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक व धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेंही आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहाण्यास, आम्हीं आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्यास अत्यंत अनुकूल काल सांप्रत काल आहे. चांगली राजकीय स्थिति ही चांगल्या गृहस्थितीचें व धर्मपद्धतीचें फळ आहे. सबब या दोहोंच्या सुधारणेस प्रथम लागलें पाहिजे.

---

## सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रतकाल : १९

### [ नंबर २ ]

गर्भस्थ पिंड पहिले कांहीं महिने एकरूप असतो. त्यांत अवयवभेद किंवा मज्जा, स्नायु, मांसपेशी, शिरा, नाड्या असा भेद नसतो. सारा पिंड एका द्रव्याचा गोळा असतो. पुढें त्यांत हळूं हळूं विकार होत जाऊन मेंदू, काळीज, फुप्फुसें, कोठा, असे शरीराच्या आंतल्या भागांत असणारे अवयव अस्तित्वांत येऊं लागतात, व हातपाय, नाकडोळे वगैरे बाह्य अवयवही हळूं हळूं दृग्गोचर होऊं लागतात. सारांश, एकरूपता आणि एकधर्मता यांचा क्रमाक्रमानें लोप होत जाऊन बहुरूपता आणि बहुधर्मता प्राप्त होत जाणें हा जसा वनस्पतींच्या व

झाला आहे, त्या राष्ट्रांतील लोकांचा सुधारलेल्या राष्ट्राशीं संबंध घडून त्यांचा मूर्खपणा त्यांस दिसूं लागण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्राणोत्क्रमणाचे वेळीं वाचा बसल्यावर कांहीं तरी बोलण्यासाठीं धडपड करणाऱ्या मरणोन्मुखाची जी स्थिति असते, ती असल्या लोकांची असते. वरिष्ठ लोकांच्या सान्निध्यामुळें असले लोक अखेरीस नामशेष होतात! आम्हावर कसा प्रसंग गुदरणार आहे, हें आजच खात्रीनें सांगवत नाहीं. राजकीय दृष्टीनें सध्यां आम्ही मेल्यासारखेच आहों. पण ज्यांनीं आम्हांस राजकीय शून्यता आणिली आहे, त्यांच्याच सान्निध्यामुळें आमच्या धार्मिक व सामाजिक गाढ मूढतेस धक्के बसूं लागले आहेत! इंग्रज लोक आम्हांस जें शिक्षण देत आहेत, व त्यांच्या अमलांत विचारस्वातंत्र्याचा जो उपयोग आम्हास प्राप्त होत आहे, त्या शिक्षणाच्या आणि विचारस्वातंत्र्याच्या वळशांनीं आम्हांस जी जागृति होऊं लागली आहे, ती हवी असल्यास आम्हांस पाहिजे तितकी कल्याणकारक करून घेतां येणार आहे. पुष्कळांचा असा समज आहे कीं, सुधारणेचा आरंभ होणें तो राजविषयक सुधारणेपासून झाला पाहिजे. राजकीय सुधारणेविषयीं फारसा मतभेद असत नाहीं; त्यामुळें ती घडवून आणण्यासाठीं एकमेकांस मदत करण्याच्या कामीं एकाचा दुसऱ्याशीं म्हणण्यासारखा विरोध येऊं शकत नाहीं. स्वातंत्र्य हें सर्वांस प्रिय आहे. आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीविषयीं प्रयत्न करणें होय. ही गोष्ट जितकी आम्हां महाराष्ट्रीयांस तितकीच वंगवास्यांस, गुर्जरस्थांस, तेलंगणस्थांस, कर्नाटकीयांस, पारसीकांस, महंमदीयांस व इतरांस इष्ट असणें स्वाभाविक आहे, व म्हणून त्यांचें एकीकरण होणें शक्य आहे, व तें होऊं लागलें आहे. सामाजिक व धार्मिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. यासंबंधानें आमची कांहीं प्रिय वस्तु कोणीं नेली आहे, आणि आम्हांस फिरून ती संपादावयाची आहे, असें नाहीं. उलट आमची आहे ती स्थितीच उत्तम आहे, व तींत फेरफार करण्याचा प्रयत्न करणें हाच प्रमाद होय, असें आम्हांपैकीं पुष्कळांस वाटत असल्यामुळें, जे थोडे वेडेपीर सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या छंदास लागले आहेत, ते समाजांत निष्कारण असंतोष व कलह उत्पन्न करून, स्वतःस कांहीं फायदा नसतां अप्रिय करून घेत आहेत! हें असें न करतील तर सर्वांस इष्ट अशा ज्या

राजकीय, व्यापारीय, शिक्षणीय व इतर सामान्य सुधारणा, त्या एकमतानें करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होणार आहे. सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयीं तंटे उपस्थित केल्यामुळें, राजकीय गोष्टींत एकदिलानें वागणें दुरापास्त झालें आहे!

अशा प्रकारच्या आक्षेपकांस आम्ही असा प्रश्न करतो कीं, इंग्रज लोकांनीं तुम्हांस जिंकिलें त्यावेळेस तुम्हांत कोणत्याही प्रकारचे सामाजिक किंवा धार्मिक तंटे नव्हते. त्या वेळेस राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून, सामाजिक व धार्मिक प्रकरणांत तुमचें पूर्ण ऐकमत्य होतें. असें असून परशत्रूस तुम्ही हार कां गेला? सैन्यबल, द्रव्यबल, संख्याबल इत्यादि यशाचीं बाह्योपकरणें तुमच्या हातीं असून, व धार्मिक आणि सामाजिक गोष्टींत तुम्हांत द्वैत माजलेलें नसून, तुमची अशी दाणादाण कां झाली? व पंचवीसचाळीस वर्षांच्या आंत तुम्ही इतके वीर्यहीन कसे झालांत? आम्हांस असें वाटतें कीं, पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक व धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेंही आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहाण्यास, आम्हीं आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्यास अत्यंत अनुकूल काल सांप्रत काल आहे. चांगली राजकीय स्थिति ही चांगल्या गृहस्थितीचें व धर्मपद्धतीचें फळ आहे. सबब या दोहोंच्या सुधारणेस प्रथम लागलें पाहिजे.

---

## सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काल, सांप्रतकाल : १९

### [ नंबर २ ]

गर्भस्थ पिंड पहिले कांहीं महिने एकरूप असतो. त्यांत अवयवभेद किंवा मज्जा, स्नायु, मांसपेशी, शिरा, नाड्या असा भेद नसतो. सारा पिंड एका द्रव्याचा गोळा असतो. पुढें त्यांत हळूं हळूं विकार होत जाऊन मेंदू, काळीज, फुप्फुसें, कोठा, असे शरीराच्या आंतल्या भागांत असणारे अवयव अस्तित्वांत येऊं लागतात, व हातपाय, नाकडोळे वगैरे बाह्य अवयवही हळूं हळूं दृग्गोचर होऊं लागतात. सारांश, एकरूपता आणि एकधर्मता यांचा क्रमाक्रमानें लोप होत जाऊन बहुरूपता आणि बहुधर्मता प्राप्त होत जाणें हा जसा वनस्पतींच्या व

प्राण्यांच्या शरीराचा अनादिसिद्ध नियम आहे, त्याप्रमाणेंच समाजदेहसुद्धां प्रथमावस्थेंत एकरूप असतो. प्राथमिक किंवा आद्य समाजांत राजकीय, सामाजिक आणि धार्मिक आचारांचें पृथक्करण झालेलें नसतें. मनूसारख्याचें धर्मशास्त्र घेतलें तर त्यांत राजकीय, सामाजिक व धार्मिक आचारांचा स्पष्ट भेद केला नसून त्या सर्वांस एका दावणींत गोवलें आहे, असें दिसून येतें. ज्याप्रमाणें समाजाच्या प्रथमावस्थेंत मनुष्यांना हे तीन आचार पृथक् आहेत असें वाटत नाहीं, त्याप्रमाणें त्या आचारांचें शासनही निरनिराळ्या व्यक्तींकडून करविण्याची कल्पना त्यांच्या मनांत येऊं शकत नाहीं. त्या स्थितींत समाजनायक म्हणजे 'राजा' हाच राजकीय, सामाजिक व धार्मिक आचारांचा शास्ता असतो. राष्ट्राच्या वतीनें सामदाम वगैरे करावयाचें झालें तरी तें राजानेंच करावयाचें; राष्ट्राच्या देवतांचें पूजन करावयाचें तेंही राजानेंच करावयाचें; एखाद्यानें रूढ धर्माविरुद्ध आचरण केलें तर त्याला जो दंड करावयाचा तोही राजानेंच करावयाचा. तसेंच कोणीं कोणत्या प्रकारचा पोषाख करावा, कोणीं कोणतीं पिकें करावीं, कोणीं कोणता व्यापार करावा, कोणीं कसें रहावें, कोणते खेळ खेळावे, कोणत्या करमणुकी चालू असाव्या, कोणत्या विद्या शिकाव्यात— वगैरे हरएक प्रकारच्या सामाजिक व्यवहाराचा निश्चयही राजाकडूनच होतो. ज्याप्रमाणें झाडाला फांद्या फुटूं लागण्यापूर्वी बरेच दिवस त्याचा एकच कोंब किंवा सोट असतो, व पुढें अस्तित्वांत येणाऱ्या शाखा तदन्तर्गत असतात, त्याप्रमाणें समाज बराच वाढला, अथवा जुना झाला, म्हणजे त्यांत ज्या निरनिराळ्या शाखा उद्भवतात आणि स्वतंत्र खातीं करून बसतात, त्या त्याच्या शैशवांत किंवा प्रथमावस्थेंत एकमेकांत गुंतून गेलेल्या असून, बुद्धीस त्यांतील भेद कळत नसतो. तेव्हां अशा स्थितींत अमुक सुधारणा आधीं होते, व अमुक मागाहून होते, असें आग्रहानें म्हणणें, हें शुद्ध साहस आहे. हे तीन आचार निराळे वाटूं लागून, त्यांत सुधारणा करण्याची इच्छा होणें हा प्रकार बहुधा एकाचकालीं घडूं लागला असावा, असें अनुमान करणें हेंच प्रशस्त आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं धर्म, राज्य आणि सामाजिक व्यवहार यांतील भेद एकसमयावच्छेदेंकरून होणारा आहे. समाजाच्या एकाच बुडख्याला या तीन खांद्या किंवा हे तीन अंकूर एकदम फुटतात. ते फुटल्या

वर पुढें असा प्रश्न निघतो की, त्यांपैकीं प्रथम कोणती खांदी वाढीस लागते, व कोणत्या खांदीच्या वाढीनें बाकीच्या खांद्यांच्या वाढीस मदत होते? या प्रश्नाविषयीं पुष्कळ मतभेद आहेत. कित्येकांचें असें म्हणणें पडतें कीं, ज्याप्रमाणें प्राण्याच्या शरीराचा कोणताही भाग विशेष पुष्ट होऊं लागला, म्हणजे रक्ताचा बराच भाग त्याच्या पोषणाकडे जाऊन बाकीच्यांस त्याचा स्वल्प अंश मिळूं लागतो, व त्या मानानें त्यांची वाढ मागसते, त्याप्रमाणें, धर्म, राज्य व सामाजिक व्यवहार ह्या ज्या समाजाच्या मुख्य तीन क्रियाशाखा, त्यांपैकीं कोणत्याही एकीच्या सुधारणेकडे समाजाचें विशेष लक्ष वेधलें, तर इतरांकडे तें तितकें कमी पडून, त्या मानानें त्यांची सुधारणा मागें पडते. दुसऱ्या कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, धार्मिक, राजकीय, आणि सामाजिक आचार यांचा उद्भव जरी सामान्य कारणापासून एकाच वेळीं होत असला, तरी पुढें त्यांपैकीं एकाची वाढ आधीं आणि बाकीच्यांची मागून होणें अवश्य असतें. प्राण्यांच्या शरीरांत ज्याप्रमाणें मेंदू, काळीज व कोठा हे मुख्य तीन भाग आहेत, त्याप्रमाणें समाजाच्या शरीराचे धर्माचार, राज्याचार आणि समाजाचार हे मुख्य तीन भाग आहेत; व दिसण्यांत जरी तीनही सारख्या महत्त्वाचे दिसतात, तरी सूक्ष्म विचार करतां ते कमी अधिक महत्त्वाचे आहेत, व त्यांत जो अधिक महत्त्वाचा असतो त्याच्या वाढीवर इतरांची वाढ अवलंबून असते, असें दिसून येतें. या मतानुरोधानें कित्येक असें म्हणतात कीं, प्राण्यांच्या शरीराचे व्यापार यथास्थित चालण्यास, ज्याप्रमाणें सर्वांआधीं त्याचा मेंदू साफ असणें जरूर आहे, त्याप्रमाणें समाजशरीर नीट चालण्यास त्याच्या मज्जास्थानीं किंवा मेंदूच्या जागीं असणारी जी त्याची शासनपद्धति म्हणजे राज्यव्यवस्था ती शाबूद पाहिजे. तींत यत्किंचित् बिघाड झाला कीं, साऱ्या शरीरास अस्वास्थ्य उत्पन्न होणार. दुसरे असें म्हणतात कीं, राज्यपद्धतीचा एवढा महिमा गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. रक्त शुद्ध करण्याचें साधन जें काळीज तें धड असेल, व त्यांत हवें तितकें चलन एकसारखें होत असेल, तरच प्रकृति दुरुस्त राहून, शरीरांतस्थ इतर करणांचें यथास्थित संगोपन व वृद्धि होणार आहेत! रक्त बिघडलें कीं सारें बिघडलें, व तें न बिघडणें हें काळिजाच्या बळकटीवर अवलंबून आहे. सबब ज्याप्रमाणें शरीरांतील दुसऱ्या इंद्रियांपेक्षां या इंद्रियाची विशेष काळजी वाहणें अवश्य आहे, त्याप्रमाणें समाजशरीराचें हृदय किंवा

काळीज जो धर्म त्याविषयीं लोकांनीं विशेष काळजी घेतली पाहिजे. धर्मसंशोधन हें लोकांचें आद्य कर्तव्य होय. धर्मग्लानि, धर्मकलुषता, धर्मशैथिल्य, धर्मावहेलना ही समाजाच्या अस्वास्थ्याची निश्चयात्मक निदर्शकें होत. तेव्हां ज्यांना समाजशरीराची पुष्टि राहून त्याचे सर्व व्यापार यथास्थित चालावे, अशी इच्छा असेल त्यांनीं त्याच्या धर्महृदयाची कोणत्याही प्रकारची हयगय करतां कामा नये. समाजाचें बरें वाईट सर्वथैव त्याच्या आधीन आहे. तिसरे म्हणतात कीं मेंदू व काळीज यांहून कोठ्याची मातब्बरी फार आहे. जीवित्वास आधार जें अन्नपाणी तें अगोदर या ठिकाणीं येतें. त्याचें पचन होऊन त्याचा एक प्रकारचा द्रव होतो. हा द्रव पुढें काळिजांत शुद्ध होऊन रक्त होतो, आणि सर्व शरीरभर पसरून सर्व अवयवांस जीवन देतो. हा द्रव या कोठ्यांत तयार न होईल तर काळीज असून नसल्यासारखेंच आहे. तेव्हां जीवित्वरक्षक रसांचा झरा जो कोठा किंवा पक्वाशय त्याहून कोणतेंही अंतरिंद्रिय अधिक महत्त्वाचें नाहीं. सबब त्याविषयीं सर्वांहून अधिक काळजी घेणें जसें अवश्यक आहे, तसेंच समाजशरीरांत पक्वाशयस्थानीय जो आचारसमूह त्यांबद्दल इतर आचारांहून अधिक खबरदारी ठेवणें फार अगत्याचें आहे. या आचारसमूहास कोणी गृहाचार किंवा कुटुंबस्थिति असें म्हणतात. ज्याप्रमाणें शरीराच्या सर्व प्रकारच्या पोषक रसांचा परिपाक कोठ्यांत होतो, त्याप्रमाणें समाजपोषक सर्व सामर्थ्यांचा संगम कुटुंबांत होऊन तेथें त्यांस परिपक्वता येते, येथून तीं कच्चीं किंवा सदोष अशीं बाहेर पडलीं तर त्यांनीं समाजशरीराचें चांगलें पोषण कधींच व्हावयाचें नाहीं. तेव्हां सर्वांआधीं गृहाचाराचें संशोधन केलें पाहिजे, म्हणजे कुटुंबस्थिति सुधारली पाहिजे. याप्रमाणें कोणी राजकीय, कोणी धार्मिक व कोणी सामाजिक आचारांस प्रमुखत्व देऊन, बाकीच्यांस तदनुषंगी करतात. थोड्या वर्षांपूर्वीं आ. का. त्रि. तेलंग यांनीं मुंबईस जें एक सुरस व्याख्यान दिलें, व जें त्यावेळीं लोकांस अत्यंत प्रिय झालें, त्यांत त्यांनीं सामाजिक सुधारणेच्या अगोदर राजकीय सुधारणा झाली पाहिजे व बहुशः होते, अशा मताचें प्रतिपादन केल्याचें स्मरतें, व हेंच मत ज्यांस मान्य आहे, असे युरोपांत पुष्कळ विद्वान् व विचारी लोक आहेत. उलट, धर्मसुधारणा झाल्याखेरीज दुसरी कोणतीही होणें शक्य नाहीं, असें प्रतिपादणारेही तिकडे पुष्कळ विद्वान् आहेत. हे विद्वान् नेहमीं असें

म्हणतात कीं, आज जी युरोपांत असामान्य सुधारणा दृष्टीस पडत आहे ती त्या खंडांत सोळाव्या शतकांत जी प्रचंड धर्मक्रांति झाली तिचें फळ होय. खिरती धर्मांत शिरलेल्या अप्रशस्त आचारांचा त्याग आणि मूर्ख मतांचें खंडन, हें करण्याचा त्या वेळीं ज्यांनीं निश्चय केला त्यांना त्याबद्दल जरी अनेक यातना व संकटें भोगावीं लागलीं तरी त्यांनीं आरला निश्चय यत्किंचितही ढळूं दिला नाहीं. या निश्चयाचा युरोपाच्या अलीकडील इतिहासावर केवढा परिणाम झाला आहे, हें अद्यापि पुष्कळांस बरोबर समजत नाहीं तथापि तत्त्वशोधक अनेक इतिहासकारांचें असें म्हणणें आहे कीं, सत्पक्षमंडनाचा जो आवेश त्या शतकांत उद्भूत झाला त्यामुळें अलीकडील बहुतेक राजकीय सुधारणा झाल्या आहेत व होत आहेत. या दोहोंहून भिन्न असा आणखी एक पक्ष आहे. त्याचें असें म्हणणें पडतें कीं, गृहसुधारणा झाल्याखेरीज खरी व टिकाऊ धर्मसुधारणा व राज्यसुधारणा कधींच व्हावयाची नाहीं. ज्याप्रमाणें व्यक्ति कुटुंबाचे घटक होत, त्याप्रमाणें कुटुंबें राष्ट्राचे घटक होत. कुटुंबें सुधारल्याखेरीज राष्ट्रसुधारणा किंवा राजकीय सुधारणा कधींच व्हावयाची नाहीं. ज्या देशांतील कुटुंबांत कुटुंबाधिपति सुलतान आणि कुटुंबांतील इतर सर्व माणसें गुलाम अथवा जेथले यचावत् प्राणपति भ्रतार आणि विवाहित स्त्रिया विनम्र दासी किंवा जेथें पुरुषांनीं सशास्त्र अथवा अशास्त्र रीतीनें हव्या तितक्या स्त्रियांशीं हव्या तेवढ्या वयापर्यंत रममाण व्हावें, परंतु जेथें अत्युच्च व सुशिक्षित वर्णांतील कोणत्याही वयाच्या स्त्रीचा भर्ता निवर्तला तर तिला फिरून पुरुषस्पर्श मिळावयाचा नाहीं इतकेंच नाहीं, तर तिच्या मनांत त्या सुखाची कल्पना न येऊं देण्यासाठीं किंवा तिला पहाणाराच्या मनांत तिच्याविषयीं तिरस्कार उत्पन्न होण्यासाठीं मुंडन, वसन व भोजन इत्यादि सर्व गोष्टींत तिला सन्याशाशीं प्रतिस्पर्धा करण्यास लावण्याचा प्रघात–अशा देशाची स्थाईक राजकीय सुधारणा कधींच व्हावयाची नाहीं; कारण, ती करण्यासारखे स्त्रीपुरुष अशा कुटुंबांत कधींच निपजावयाचे नाहींत, असें या पक्षांतील लोकांचें म्हणणे पडते व ते आम्हांस बऱ्याच अंशीं ग्रस्त आहेसें वाटतें. ज्या वस्तूचा प्रत्येक घटक सदोष आहे, ती सारी वस्तू सदोष असलीच पाहिजे. ज्या देशांतील कुटुंबांत गुलामगिरी व क्रौर्य यांचा अंमल जारीनें गाजत आहे, त्या देशांतील राज्यपद्धतींत ते दुर्गुण पूर्णपणें प्रतिबिंबित झालेच पाहिजेत व

तींत त्यांचे प्रतिबिंब पडलें म्हणजे त्या राष्ट्रास विकळा आलीच पाहिजे. अशा विकळेचें आज कित्येक शतकें आम्ही सर्वोत्कृष्ट भाजन होऊन बसलों आहों. ही भाजनता आम्हांस अलीकडे प्राप्त होत असलेल्या पाश्चिमात्य शिक्षणामुळें अप्रिय वाटूं लागली आहे. आम्हांस ती खरोखरीच नकोशी झाली आहे असें आजच आमच्यानें खात्रीनें सांगवत नाहीं. तसें असतें तर ती नाहींशी करण्याचा जो खरा उपाय आहे तो आम्ही केव्हांच करूं लागलों असतों. तो करण्यास अत्यंत अनुकूल असा काल प्राप्त झाला असूनही आम्ही आपले जागच्या जागीं झुलत आहों, याचा अर्थ काय हें आम्हांस समजत नाहीं! राजकीय, धार्मिक व सामाजिक सुधारणांपैकीं प्रथम कोणती होते व करावी, याविषयीं कितीही मतभेद असला तरी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास आज आम्हांस जितका अनुकूल काल प्राप्त झाला आहे तितका पूर्वी कधींच प्राप्त झाला नव्हता, याविषयीं मतभेद होण्याचें कारण नाहीं असें वाटतें, आणि हें खरें असेल तर या घटकेस हातपाय न हालविणें म्हणजे जाणूनबुजून आत्महत्या करण्यास प्रवृत्त होण्यासारखें होय!

---

## अशी वेळ कधीं आली नव्हती : : : २०

(राजकीय सुधारणा आधीं होते किंवा सामाजिक सुधारणा आधीं होते, हें जरी निश्चयानें सांगतां आलें नाहीं, तरी येवढें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, सामाजिक सुधारणा करण्यास आजमित्तीस आम्हांस जितकी अनुकूल वेळ आली आहे तितकी पूर्वी कधींही आली नव्हती. समाजाच्या प्राथमिक स्थितींत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचार व क्रिया एकमेकांत गुंतलेल्या असतात, व उत्तरोत्तर त्याचें पृथक्करण व विश्लेष होत जातो, हें मागें सांगितलेंच आहे. तशा प्रकारचा भेद येथें बराच झाला आहे. निदान राजकीय विषय सामाजिक व धार्मिक विषयांपासून स्पष्टपणें निराळे झाले असून, त्यांची व्यवस्था आमच्या सरकारनें आपल्या शिरावर घेतली आहे, व बाकी राहिलेले दोन भाग आम्हांकडे ठेविले आहेत. हे दोन भाग अजून चांगलेसे वेगळे करण्यासारखे झालेले नाहींत. यामुळें त्यांचा विचार एके ठिकाणीं करणें भाग पडतें.

सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास सांप्रत काल फार अनुकूल आहे, असें आम्ही जें एकसारखें म्हणत आहों, याचें कारण काय, असा प्रश्न आतांपर्यंत पुष्कळांनीं केला असेल व त्याचें उत्तर देणें जरूर आहे. देश स्वतंत्र असला म्हणजे ज्याप्रमाणें कांहीं प्रकारच्या सुधारणा करणें सुलभ असतें, त्याप्रमाणें कांहीं प्रकारच्या सुधारणा करणें अवघडही असतें. आम्ही स्वतंत्र असतों, तर अमेरिकेप्रमाणें परक्या देशांतून येणाऱ्या मालावर हवी तेवढी जकात आम्हांस ठेवतां आली असती व तसें करून या देशांतील कित्येक धंद्यांना उत्तेजन देतां येऊन, ते आम्हांस व इतर देशांस फायदेशीर होतील, अशी त्यांची स्थिति करतां आली असती. येथें कापूस पिकतो; मजुरीचे दर माफक आहेत; लांकूड व कोळसा हवा तितका पैदा होण्यासारखा आहे; असें असून येथला कापूस परदेशास जातो, आणि तेथें त्याचें सूत व कापड बनून तें येथें विकण्यास येतें व येथील कापडाहून तें सवंग मिळतें! वास्तविक पाहतां हिंदुस्थानांत उत्पन्न होणारें कापड अमेरिकेच्या कापडाइतकें सवंग पडायला पाहिजे आहे. पण ज्या साधनांनीं अमेरिकेंतील कापडाच्या कारखान्यांस उत्तेजन देतां आलें, तीं साधनें हिंदुस्थानांतील कापसाच्या कारखान्यांस उत्तेजन देण्याच्या कामीं लावण्याचें सामर्थ्य आमचे अंगीं नसल्यामुळें, सरकारच्या मर्जीवांचून ते जसे चालवितां येतील, तसे चालविणें आम्हांस भाग पडत आहे. याचप्रमाणें येथल्या इतर व्यापारीय व राजकीय सुधारणांची गोष्ट होय. जबरदस्त परक्या सरकारच्या हातींपायीं पडून किंवा त्याशीं थोडी बहुत वर्दळ घालून, त्यापासून जेवढें प्राप्त होईल तेवढ्यांत यासंबंधानें समाधान मानून घेणें याशिवाय आम्हांस सध्यांचे स्थितींत गत्यंतर नाहीं. पण सामाजिक व धार्मिक गोष्टींचा तसा प्रकार नाहीं. या कामांत सरकार ढुंकून सुद्धां पहात नाहीं. त्यासंबंधानें हवें तें करण्यास आज आम्हांस पूर्ण मुभा आहे. आम्ही स्वतंत्र असतों, तर असें झालें नसतें. आजमित्तीस जे सरकारी अधिकारी आमच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांच्यासंबंधानें अगदीं तिऱ्हाइताच्या वृत्तीचें अवलंबन करून बसले आहेत, तसें त्या स्थितींत झालें नसतें. आम्ही स्वतंत्र असतों, तर मोठमोठ्या अधिकाराच्या जागाही आमच्याच लोकांच्या हातीं असत्या; व या जागांवर असलेल्या अधिकाऱ्यांनीं आपला अधिकार व वजन आपणांस मानतील त्या सामाजिक व धार्मिक सुधारणांच्या

उत्कर्षाकडे लाविलें असतें व ज्या सुधारणा त्यांस मान्य झाल्या नसत्या त्यांचें डोकें वर निघूं न देण्यासाठीं त्याच अधिकाराचा व वजनाचा उपयोग त्यांनीं केला असता. तसेंच त्या स्थितींत म्हणजे आम्ही स्वतंत्र असतों तर, आमच्यांतील अनधिकारी पण धनाढय व वजनदार लोकांचें आणि धर्माधिकाऱ्यांचें वजनही आतांहून विशेष पडतें. पण आजच्या स्थितींत काय विलक्षण मौज झाली आहे पहा. स्वतंत्र स्थितींत समाजाग्रणी आणि धर्माधिकारी यांस सरकारी अधिकाऱ्यांचें बरेंच पाठबळ असतें. ज्या अधिकाऱ्यांस जीं धर्ममतें किंवा जे सामाजिक आचार ग्राह्य असतात त्या मतांचें व आचारांचें मंडन व प्रसार करण्यास त्याकडून समाजाग्रणींस आणि धर्माधिकाऱ्यांस पुष्कळ मदत होते. यामुळें त्या स्थितींत कोणत्याही रूढ मताविरुद्ध वागणें, बोलणें किंवा लिहिणें अतिशय कठिण असतें. येथें कोणी अशी शंका घेतील कीं, एका प्रकारच्या अधिकाऱ्यांस एका प्रकारचीं सामाजिक व धार्मिक मतें आवडलीं तर दुसऱ्यांस दुसऱ्या प्रकारचीं आवडतील; व त्यामुळें त्या स्थितींत प्रत्येक प्रकारच्या मतांस थोडेबहुत पुरस्कर्ते मिळण्याचा संभव आहे. पण दुर्दैवानें बहुशः असें होत नाहीं. सुदैवानें तसें झाल्यास स्वतंत्र देशांत राजकीय, सामाजिक, व धार्मिक सुधारणा होण्यास फारच थोडा काळ लागणार आहे. वास्तविक प्रकार बहुशः असा घडतो. जे सरकारी अधिकारी असतात ते सामाजिक व धार्मिक जुन्या मतांनाच नव्याण्णव वाट्यांनीं अनुकूल असतात. यामुळें स्वतंत्र देशांत सामाजिक व धार्मिक गोष्टींच्या संबंधानें नवीन मत स्थापणें किंवा नवीन आचार पाडणें फार कठिण असतें. तसें नसतें तर प्रत्येक स्वतंत्र देशांतील प्रसिद्ध आद्य सुधारकांचा इतका छळ कां झाला असता ? सरकारी अधिकाऱ्यांनीं व धर्माधिकाऱ्यांनीं अशा सुधारकांस जाळल्याचीं, पुरल्याचीं, तोडल्याचीं, सोलल्याचीं, कडयावरून लोटल्याचीं, हत्तीच्या पायाशीं बांधल्याचीं, व फांशीं दिल्याचीं अनेक उदाहरणें इतिहासांत सांपडण्यासारखीं आहेत. यावरून काय दिसतें कीं, सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास पारतंत्र्य जितकें अनुकूल आहे, तितकें स्वातंत्र्य नाहीं ! प्रथमदर्शनीं हा सिद्धान्त कांहीं अंशीं विपरीत वाटण्यासारखा आहे, हें आम्ही कबूल करतों. पण सूक्ष्म विचारांतीं त्यांत बरेंच तथ्य आहे, असें दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं अशी आमची खात्री आहे. एवढें खरें आहे कीं, स्वतंत्र

देशांतील प्रत्येक मनुष्याच्या अंगात परतंत्र देशांतील मनुष्यापेक्षां विशेष रग असते, व त्यांतील सुधारकांत तर तिची परमावधि झालेली असते, व त्यामुळें तसल्या देशांत कधीं कधीं एकटा मनुष्य साऱ्या देशाशीं लढण्यास व भांडण्यास तयार होतो, व सारें जग त्याविरुद्ध उलटलें तरी तो डगण्यासारखा नसतो. ग्यालिलिओ, ल्यूथर, ब्रूनो वगैरेंचीं चरित्रें अशा प्रकारचीं आहेत. यांच्या पक्षाकडे सत्य असल्यामुळें हळू हळू त्यांस अनुयायी मिळून पुढें तें सर्वत्र प्रस्थापित झालें ही गोष्ट वेगळी. पण आरंभीं या सुधारकांना किती छलना करून घ्यावी लागली हें सर्वांना ठाऊक आहेच.

तेव्हां आमचें सांप्रत पारतंत्र्य हेंच सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास कांहीं अंशीं अनुकूल झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वतंत्र देशांतील प्रत्येक पक्षांत व पंथांत वजनदार लोक असतात. यांच्या वजनामुळें त्यांना मोठमोठे अनुयायी वर्ग जडलेले असतात. पक्षाग्रणीनें कांहीं विशेष महत्त्वाची गोष्ट आपल्या अनुयायांपुढें आणिली, व तीविषयीं त्यांची समजूत घालून देऊन ती तुम्ही पत्करा, असें म्हटलें, तर त्यांना तिचा स्वीकार करणें भाग पडतें. उलट अनुयायांच्या मतासही थोडाबहुत मान देणें अग्रणीस अवश्य असतें. याप्रमाणें एकमेकांच्या साहाय्यानें साधारण सुधारणा स्वतंत्र देशांत, कायद्याच्या मदतीशिवाय, सहज होत असतात. आमच्या पारतंत्र्यामुळें आमची अगदीं वेगळी स्थिति झाली आहे. आमचें म्हणण्यासारखे सरकारी अधिकारी उरले नाहींत इतकेंच नाहीं, तर त्या अधिकारांच्या लोपाबरोबर आमचे धर्माधिकारी व समाजाग्रणीही दुर्बल झाले आहेत. ज्याप्रमाणें या भरतभूमीवर पसरलेल्या पारतंत्र्यरूप गाढ अंधतमसांत राजापासून रंकापर्यंत साऱ्यांस एकसारखी अवनतावस्था प्राप्त झाली आहे व तीपुढें कोणाचेंही तेज पडत नाहीं, ज्याप्रमाणें माळेचें सूत्र तुटलें असतां तींतील मणी चार दिशांस पसरतात, त्याप्रमाणें समाजघटकांस ग्रथित करणारें आमचें सरकारसूत्र भग्न झाल्यामुळें, आमची पराकाष्ठेची वाताहात झाली आहे, व इंग्रजांनीं आम्हां साऱ्यांस एकाच करंड्यांत भरून टेवलें आहे. आम्हां सर्वांला करंड्याच्या परिघाचा आळा आहे, व त्याबाहेर आम्ही पडूं शकत नाहीं, हें जरी खरें आहे, तरी आंतल्या आंत एक इसम दुसऱ्या इसमाशीं चिकटून रहात नाहीं हेंही खरें आहे. तात्पर्य, सध्याच्या आमच्या स्थितींत अमुक-

एकाचें अमुकावर वजन आहे, असें म्हणणें म्हणजे प्रमाद करण्यासारखें होय, असें दिसतें.

आमच्या पुढाऱ्यांचे व आमच्या धर्माधिकाऱ्यांचें वजन कमी होण्यास आणखी एक कारण झालें आहे, तें असेः— ज्या सामाजिक व धार्मिक सुधारणा व्हाव्या, असें आमच्या पाश्चिमात्य शिक्षणामुळें आम्हांस अलीकडे वाटूं लागलें आहे, त्या इंग्लंडांत केव्हांच होऊन गेल्या असल्यामुळें नुसत्या राजकीय खात्यांतच इंग्लिश लोक आमचे वरिष्ठ होऊन बसले आहेत असें नाहीं. सामाजिक व धार्मिक गोष्टींतही त्यांची आमच्यावर सरशी आहे. ज्यास पाश्चिमात्य शिक्षण मिळतें त्याच्या विचारांत मोठें अंतर पडून, त्यास आपल्या लोकांची सामाजिक व धार्मिक सुधारणा यूरोपाच्या वळणावर जावी, असें सहज वाटूं लागतें व तदनुसार त्याचें वर्तन होऊं लागलें असतां, सरकारास साहजिकपणें तें आवडतें होतें. जुन्या लोकांस हें शिक्षण मिळालें नसल्यामुळें राज्य, धर्म व समाज यांविषयीं त्यांच्या पहिल्याच कल्पना कायम आहेत. तसेंच, धर्माधिकारीवर्गांतही त्यांचा अजून प्रवेश झाला नाहीं, यामुळें तो वर्गही आपल्या पहिल्याच विचारांत अद्यापि दंग आहे. पण कांहींस पाश्चिमात्य शिक्षण मिळून त्यांचें विचारांतर होत असल्यामुळें व कांहीं जसेच्या तसे राहात असल्यामुळें, सुधारणेचा कोणताही प्रश्न निघाला कीं, उभयतांत कलह होण्यास आरंभ होतो व सरकार उदासीनपणें त्याकडे पहात बसतें! नवीन लोकांस हें पक्कें ठाऊक झालें आहे कीं, जुन्या लोकांचे धार्मिक व सामाजिक विचार सरकारास बिलकुल पसंत नाहींत. पण जुन्या लोकांस असें वाटत आहे कीं, अद्यापि आपल्या बाजूस बहुत समाज आहे, तेव्हां आपणांस या नव्या लोकांना हार जाण्याची गरज नाहीं. इकडे नव्या लोकांस असें वाटतें कीं, आपल्या मतास सरकारची अनुकूलता आहे, तेव्हां आपण जुन्या लोकांची फारशी प्रतिष्ठा बाळगण्याची गरज नाहीं. याप्रमाणें प्रत्येकास आग्रह धरून बसण्यास एकेक कारण सांपडलें असल्यामुळें, उभयतांत तडजोड होण्याची आशा मुळींच दिसेनाशी झाली आहे. तात्पर्य, सध्या जरी म्हणण्यासारखी सुधारणा होऊं लागली आहे असें नाहीं, तरी ती करण्यास अडथळा करणाऱ्या जुन्या लोकांवर हवें तसें तुटून पडण्यास सांपडावें, आणि कोणाचें पाठबळ नसल्यामुळें ते जेरीस येऊन

त्यांना आपले दुराग्रह हळू हळू सोडणें भाग पडावें, हा कांहीं लहान फायदा नाहीं.

---

## इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार : : २१

गेल्या चोविसाव्या तारखेच्या सुधारकांत बोलके सुधारक, कर्ते सुधारक आणि सुधारणानिंदक असे जे लोकांचे तीन वर्ग दिले आहेत व त्यांच्या उत्पत्तीचे जे काल सांगितले आहेत, ते वाचकांच्या स्मरणांत असतीलच. आज या पत्राच्या चालकास सुधारणेचा कोणता पंथ मान्य आहे, याचा विशेष खुलासा करावयाचा आहे. त्या खुलाशाचें सार "इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार" या शिरोलेखांत आणिलें आहे. पण त्यावरून साऱ्या वाचकांस स्पष्ट बोध होण्याचा संभव नाहीं, म्हणून थोडासा विस्तार करण्याची आवश्यकता आहे.

सांप्रत स्थितींत आपणांस कोणती गोष्ट प्रतिकूल आहे व कोणती अनुकूल होईल, ही गोष्ट बहुधा यचावत् प्राणिमात्रास सहज स्वभावधर्मानें समजते. भूक लागली असतां कांहीं तरी अन्न खावें, तहान लागली असतां पाणी प्यावें, ऊन लागलें असतां सावलींत जावें, थंडी लागूं लागल्यास उबाऱ्याची जागा पहावी, पीडा देणाराच्या हातून निसटून जाण्याचा प्रयत्न करावा—वगैरे जीवितरक्षणास अत्यवश्य लागणाऱ्या गोष्टींची संख्या अत्यंत स्वल्प आहे व ती सहजगत्या जंतूंच्या वर्तनावर परिणाम करते. किंबहुना तसें न होईल तर जीवाची उत्पत्ति व अभिवृद्धि ही अशक्य होणार आहे. तेव्हां इतर प्राण्यांच्या समवेत मनुष्यांनीं कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हें येथें सांगण्याची गरज नाहीं; कारण त्या न केल्या तर मनुष्यांची जातच राहणार नाहीं. तथापि जातां जातां ही गोष्ट येथें सांगण्यास हरकत नाहीं कीं, जरी इतर प्राण्यांप्रमाणें क्षुधादि इंद्रियसुखें हींच मनुष्यांची सारीं सुखें नाहींत, तरी तीं त्याच्या इतर सुखांस अत्यंत आधारभूत असल्यामुळें प्रत्येक देशांतील लोकांनीं तीं संपादण्याविषयीं अत्यंत दक्ष असलें पाहिजे. ज्या राष्ट्रांतील लोकांस पोटभर अन्न मिळत नाहीं व थंडीवाऱ्यापासून आपलें रक्षण करतां येत नाहीं, अशा राष्ट्रांतील लोकांस वरिष्ठ सुखें मिळणें अशक्य आहे. तेव्हां

बोलके सुधारक, कर्ते सुधारक व सुधारणानिंदक या तिघांचा, जीवितरक्षणास लागणाऱ्या अत्यंत अवश्य गोष्टींच्या संबंधानें तरी मतभेद होण्याचा संभव नाहीं. प्राण सर्वांस प्रिय आहेत व त्यांचें रक्षण करणें सर्वांसच इष्ट वाटत आहे. तेव्हां धान्याची समृद्धि होण्यासाठीं शेतकीची सुधारणा करणें, वस्त्रादि शीतोष्णनिवारक साधनांची समृद्धि होण्यास यंत्रांचे कारखाने घालणें आणि यांत्रिक शिक्षणाचा प्रसार करणें, व्याधींच्या शमनार्थ वैद्यकादि शास्त्रांचा अभ्यास चालू ठेवणें वगैरे गोष्टींस कोणत्याही पक्षाकडून हरकत होण्याचा संभव नाहीं; परंतु मनुष्यांच्या सुखांचा व सुधारणेचा वैषयिक सुखांपाशीं व सुधारणेपाशींच शेवट होत नसल्यामुळें, त्यांमध्यें वैमनस्यें उत्पन्न होण्यास कारणें होतात. इतर प्राण्यांच्या शरीररचनेपेक्षां मनुष्याची शरीररचना कांहीं निराळी असल्यामुळें किंवा झाल्यामुळें, आणि त्याची मानसिक रचना तर इतरांच्या रचनेहून फारच निराळी असल्यामुळें, इतर प्राण्यांच्या एका वर्गांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या आचरणांत जितका भेद दृष्टीस पडतो, त्याहून शेकडोंपट अधिक भेद मनुष्यवर्गांतील निरनिराळ्या व्यक्तींत दृष्टीस पडतो. धर्मकल्पना इतर प्राण्यांत असतील असें वाटत नाहीं, निदान त्या असल्या तरी आम्हांस समजण्याचा संभव नाहीं. संपत्ति जमविण्याची कल्पना किंवा साधन इतर प्राण्यांपाशीं नाहीं; तसेंच नानाप्रकारच्या सृष्टपदार्थांपासून नानाप्रकारचीं सुखें करून घेण्याचें सामर्थ्य त्यांस नाहीं; मनुष्यांच्या भाषेसारखी विस्तृत भाषा आणि भाषेहूनही कांहीं अंशीं विशेष उपयोगी अशी जी लेखनकला ती त्यांस अवगत व साध्य नाहीं. या व अशाच दुसऱ्या अनेक कारणांमुळें इतर प्राणिवर्गांतील व्यक्तींत मनुष्याइतका कलह दृष्टीस पडत नाहीं. मनुष्यांना आपल्या सुखांची वृद्धि करण्याचें व त्यांना चिरस्थाईपणा आणण्याचें सामर्थ्य आहे व एकमेकांस साहाय्य करून सर्वांस सारखा सुखोपभोग मिळेल अशी इच्छा धरून ती पुरविण्यासारखें वर्तन करण्याची अक्कल जरी त्यांना आहे, तरी याच गोष्टीमुळें इतर प्राण्यांपेक्षां त्यांच्या समाजांत विशेष क्रूर लढाया, विशेष श्रीमंती, विशेष दारिद्र्य, विशेष नीतिमत्ता, विशेष नीतिपराङ्मुखता, विशेष ज्ञान, विशेष अज्ञान, विशेष प्रेम, विशेष द्वेष—यांसारख्या समाजोपकारी आणि समाजापकारी वस्तूंचा आविर्भाव होतो. कोणता पाहिजे तो मनुष्यसमाज घ्या, त्यांत अशा प्रकारच्या गोष्टींनीं नित्य कमी अधिक रण

चाललें आहे असें दिसून येईल. हें एका समाजांतील व्यक्तींविषयीं झालें. पण दोन अथवा अधिक समाजांचा संबंध घेतला तरी त्यांतही हाच प्रकार दिसून येतो. (कोणत्याही दोन समाजांची स्थिति सर्वांशीं सारखी असत नाहीं. तसेंच, विषयसुखाच्या किंवा आधिभौतिक संपत्तीच्या संबंधानें तर एकाचा दुसऱ्याशीं सतत कलह चाललेला असतो, त्यामुळें दोन असमान राष्ट्रांपैकीं श्रेष्ठाचा कनिष्ठावर अंमल झाला, म्हणजे कनिष्ठास किती पीडा भोगावी लागेल, याचें अनुमान करणें कठिण आहे. तात्पर्य, मनुष्यसमाजांतील व्यक्तींत व समाजासमाजांत तंटे होण्यास अनंत कारणें आहेत. तीं दूर होऊन ऐकमत्य व्हावें आणि सर्वांनीं एकदिलानें वागावें हें फार इष्ट आहे. पण हा योग आणखी दहापांच हजार वर्षांशिवाय येईल असें वाटत नाहीं! व कधीं काळीं तो येणार असेल तर त्याला खऱ्या ज्ञानप्रसाराशिवाय दुसरें साधन नाहीं हें उघड आहे. यासाठीं ज्यांना आपल्या जातीचा म्हणजे मनुष्यजातीचा उद्धार व्हावा, असें मनापासून वाटत असेल त्यांनीं तो उद्धार होण्यासाठीं जीं साधनें आपणांस योग्य वाटत असतील त्यांचा निर्भीडपणें व निर्भयपणें रात्रंदिवस खल केला पाहिजे, आणि होतां होईलतों मनास शुद्ध वाटलेल्या रीतीप्रमाणें वागवून दाखविलें पाहिजे.

तेव्हां आतां हें निर्विवाद झालें कीं, आणखी अनेक युगें मनुष्यांचीं भिन्न मतें आणि भिन्न आचार अस्तित्वांत राहून त्यांमध्यें अर्थातच कमीअधिक कलह चालणार. हा कलह कधीं मोठ्या निकरानें चालतो, व कधीं अगदीं मंदपणानें चालतो. सध्यां धार्मिक विषयांच्या संबंधानें, विशेषतः त्यांशीं संलग्न असलेल्या सामाजिक विषयांच्या संबंधानें, तो मोठ्या निकरानें चालविण्याचा प्रसंग या देशांत प्राप्त झाला आहे. मुसलमानांच्या धर्मवेडामुळें त्यांच्याशीं धर्मयुद्धें करावीं लागलीं, सांप्रतकाळीं पाश्चिमात्य शिक्षणामुळें येथें नवीन धर्मकल्पनांचा, नवीन राज्यकल्पनांचा व नवीन सामाजिक कल्पनांचा प्रादुर्भाव झाला आहे. नवीन विद्यार्थ्यांपैकीं कांहीं लोक या कल्पनांचे कट्टे भक्त बनले आहेत. ज्यांना पाश्चिमात्य शिक्षणाचा संपर्क लागलेला नाहीं, असे लोक एका बाजूस आणि वरील कट्टे भक्त दुसऱ्या बाजूस, असे दोन तट झाले आहेत. ज्यांच्यापासून लोकांस हें पाश्चिमात्य शिक्षण मिळत आहे, त्या राज्यकर्त्यांनीं हिंदूंच्या धर्माचरणांत व सामाजिक आचारांत सहसा हात घालावयाचा नाहीं, असा संकल्प केला;

कारण तसें करणें हितावह आहे असें त्यास आपल्या इतिहासावरून व दुसऱ्यांच्या इतिहासावरून कळून आलें आहे. तथापि त्यांचा ओढा हिंदु सुधारकांकडे आहे, हें निर्विवाद आहे; कारण हे सुधारक त्यांचेकडून मिळत असलेल्या शिक्षणाचेंच फळ आहेत. जुन्या लोकांपैकीं समंजस लोकांस पाश्चिमात्यांची राज्यपद्धति व राज्यविषयक विचार पसंत पडूं लागून नवीन सुशिक्षितांबरोबर ते ती पद्धति आणि ते विचार अंगीकारूं लागले आहेत, हें राष्ट्रसभेस जी सामान्य अनुकूलता सर्वत्र दृष्टीस पडते तीवरून व्यक्त होत आहे. पण याच राष्ट्रसभेबरोबर किंवा वर्षभरानें तिच्या पाठीमागून अस्तित्वांत आलेली जी सामाजिक परिषद ती मात्र जुन्या लोकांस नको आहे! पण ती कशी टळणार? राष्ट्रसभा ज्या विद्येचें फळ आहे त्याच विद्येचें फळ सामाजिक परिषद आहे. ज्या ज्ञानामुळें तेलंग आणि रानडे यांस आमची राजकीय सुधारणा व्हावी असें वाटतें, त्याच ज्ञानामुळें त्यांस आमची सामाजिक सुधारणाही व्हावी, असें वाटतें व ज्या कारणामुळें त्यांचे राजकीय विचार आम्हांस मान्य होतात आणि ते व्यक्तिदृष्टीनें पूज्य वाटतात, त्याच कारणामुळें त्यांचे सामाजिक विचारही आम्हास मान्य होऊन, व्यक्तिदृष्टीनें ते आम्हांस पूज्य झाले पाहिजेत. पण एका प्रकारच्या गोष्टींत आम्ही त्यांचा उत्सव करीत असतों, पवाडे गातों, आणि त्यांस आपले पुढारी म्हणवून त्यांचें अनुकरण करण्यास तयार होतों; व दुसऱ्या प्रकारच्या गोष्टींत त्यांची टवाळी करण्यास, त्यांना अद्वातद्वा दोष देण्यास, आणि हे आमचे पुढारी नव्हत म्हणून हिंदुस्थानसरकाराकडे अर्ज करण्यास प्रवृत्त होतों, तेव्हां आमच्या असंबद्ध मूर्खपणास किंवा मूर्ख असंबद्धतेस काय म्हणावें कोण जाणें! धार्मिक व सामाजिक विषयांच्या संबंधानें आमच्या लोकांचें ज्ञान "अकटो" पर्यंत जाऊन थडकलें होतें; राज्यविषयक गोष्टींत मात्र आम्ही दीर्घश्रवे झालों; तेव्हां पाश्चात्यांपासून व पाश्चात्यविद्यांकित हिंदूंपासून राज्यविचारापलीकडे आम्हांस कांहींएक शिकावयाचें नाहीं, असा जुन्या पद्धतीच्या सर्व लोकांचा समज दिसतो! पाश्चिमात्य शिक्षण मिळालेल्या नवीन पिढींतील ज्या लोकांनीं धार्मिक किंवा सामाजिक विषयांचा विचार केलेला नाहीं, किंवा करून ज्यांस लोकसमुदायाची भीड तुटत नाहीं, असे लोकही रानडेतेलंगप्रभृति नवीन विद्वानांचा सामाजिक गोष्टींच्या संबंधानें उपहास करण्यास तयार

होतात; पण या जुन्या पद्धतीच्या सर्व बड्या लोकांनीं आणि आंधळे-पणानें त्यांच्या पाठीमागें जाणाऱ्या असंख्य मूढांनीं असें समजूं लागावें कीं, या देशांत ज्या विद्येचा पाय शिरला आहे ती आमच्या राज्यविषयक विचारांप्रमाणें आमच्या धार्मिक व सामाजिक विचारांतही प्रचंड क्रांति करणार आणि तदनुसार आमचें आचरण बदलत जाणार. हिंदुधर्मविचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांहीं खरोखर निर्दोष व हितावह आहे त्याला कशाचीही भीति नाहीं. मनु आणि पाराशर यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे. पण जें कांहीं सदोष व अहितकारक आहे, निदान सध्यांचे स्थितींत ज्याच्या अपकारित्वाबद्दल संशय नाहीं, तें सारें पाश्चिमात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार! एकाद्या दुसऱ्या मनूची आणि पाराशराची कथा काय! आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेंकडों मनूंचे व सहस्रावधी पाराशरांचे आधार दाखविलेत, व त्यांचा प्रसार न व्हावा, म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान, आणि उटावणीचे आरडे यांचे अडथळे आणून घातलेत तरी ज्याप्रमाणें पर्वताच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफानवेगानें कड्यावरून पडूं लाग-लेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतीस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळींच संभव नाहीं. उलट हेच त्यांत होर-पळले जाण्याचा संभव आहे!

---

## होऊंच द्या तर दोन हात ! : : : : २१

सध्या जें तुंबळ वादसंगर चाललें आहे, त्यांत आमच्या प्रतिरक्ष्यांची विशेष भिस्त त्यांच्या हातीं असलेल्या तीन तोफांवर आहे. या तीन तोफा आम्हीं सर केल्या तर त्यांना या रणांतून पळ काढून, प्राणत्राणाकरितां कोठें

तरी दडून बसावें लागेल, किंवा आमच्या स्वाधीन होऊन तहाची मागणी घालावी लागेल! * * * सांप्रतकालीं हिंदुस्थानसरकारनें, रा. रा. दा. अ. खरे आणि इतर अनेक समंजस लोक म्हणतात त्याप्रमाणें, अप्राप्त-तारुण्य भारतीय आर्यकन्यकांवर विषयलंपट, विचारशून्य, व अधीर नरपशूं-कडून जो जुलूम कित्येक शतकें होत आहे, तो थोडाबहुत तरी कमी व्हावा, म्हणून केवळ परोपकारबुद्धीनें कृपावंत होऊन, हिंदुस्थानच्या फौजदारी काय-द्यांतील एका कलमांत जो लहानसा फेरफार करण्याचा विचार चालविला आहे, तो फेरफार ताबडतोब अमलांत येण्यासाठीं ज्या पत्रांनीं व ज्या विद्वा-नांनीं खऱ्या धर्माचा, यथार्थ देशाभिमानाचा, व एकोणिसाव्या शतकांतील सुशिक्षित मनुष्यपणास अत्यंत उचित अशा भूतदयेचा पक्ष घेऊन प्रामाणिक-पणानें व आस्थेनें आपणांकडून होईल तेवढी खटपट करावयाला पाहिजे होती, तीं पत्रें व ते विद्वान श्रुतिस्मृतींचे भलभलते अर्थ करीत आहेत; जीं सामाजिक व राजकीय विचारतत्त्वें आमच्या मागसलेल्या, अज्ञानमग्न, व स्वावलंबनहीन देशास प्रस्तुतकालीं लागू केलीं असतां, अत्यंत विघातक होणार आहेत, तींच लावणें अवश्य आहे अशा विपरीत प्रतिपादनानें असंख्य अजाण लोकांस अपाय-कारक स्वातंत्र्याचें आमिष दाखवून, व मिथ्या धर्माभिमानाचे मादक चषक त्यांच्यापुढें धरून, त्यांच्या माथ्यांत मतिभ्रम उत्पन्न करीत आहेत; व हिंदुस्थान-सरकारानें हातांत घेतलेल्या बिलाविरुद्ध त्यांना होईल तितकें प्रतिकूल कर-ण्याचा, तें बिल बहुतेक लोकांस पसंत नाहीं, असा प्रचंड टाहो त्यांचेकडून फोडविण्याचा, त्या बिलामुळें १८५७ च्या जाहीरनाम्यास न जुमानतां, हिंदु-धर्मावर लोकांच्या मर्जीविरुद्ध सरकारानें हात घातला आहे असें सिद्ध करून दाखविण्यासाठीं धर्मशास्त्राची हवीतशी संगति लावून देण्याचा, व कांहीं कारण नसतां उदार, सदय, व लोककल्याणेच्छू सरकाराविषयीं राजनिष्ठ प्रजेचीं मतें कलुषित करण्याचा अप्रशस्त प्रयत्न करीत आहेत; ही गोष्ट **प्रो० सेल्बी** सारख्या त्रयस्थ परक्या गृहस्थास किंवा आपली दुःस्थिति दूर होण्याकरितां कळवळ्यानें परिश्रम करीत असलेल्या एतद्देशीय **सुधारकांस** कितीही शोच-नीय, कितीही निंद्य, व कितीही लज्जास्पद वाटली तरी त्यांना ती प्रशंसनीयच वाटली पाहिजे हें उघड आहे!

संमतीच्या बिलावर ज्या आक्षेपरूप तीन तोफा चालू केल्या आहेत

त्यांपैकीं फक्त एकीचा मारा उघड आहे व दोहोंचा आडून आहे. त्यांच्या गोलंदाजास असें वाटत आहे कीं, यांच्या माऱ्यानें सुधारकचमूची दाणादाण होऊन जाऊन त्यांस "त्राहि त्राहि" असें होईल. पण वास्तविक पहातां या तिघींचा मारा अंगावर घेणें, अथवा नित्यपेक्षां किंचित् जलदीचीं दोन पावलें टाकून त्या सर करणें, हें अगदीं स्वल्प काम आहे. आमच्यापैकीं दोघा-चौघांनीं फक्त हातपिस्तुलांचे पांच चार बार काढले नाहींत तों आमच्या प्रतिपक्ष्यांची कोण गाळण होऊन गेली आहे ती पहा! जर **मृत्युवदना, यमप्रिया, व विश्वघ्ना,** अशा तीन पराक्रमी शक्तींचें आपणांस साहाय्य आहे असें त्यांस वाटत असेल तर त्यांनीं एवढ्यांतच इतकें भेदरून कां जावें? "अरे उठा; ही का झोंप घेण्याची वेळ? ज्याप्रमाणें राहू चंद्रास ग्रासतो त्याप्रमाणें शत्रूनें आपल्या धर्मचंद्रास अगदीं ग्रासून टाकलें आहे; करतां जो कोणी खरा द्विजकुलोद्भव म्हणजे पक्का शंभर नंबरी ब्राह्मण असेल, त्यानें आपल्या विचाराकडे, कारुण्याकडे किंवा देशाच्या भावी नुकसानीकडे बिलकुल दृष्टि न देतां, पूर्वीच्या मुसलमानांचें वंद्य व अनुकरणीय उदाहरण ध्यानांत ठेवून, सरकारास वेळेवर अशी इशारत द्यावी कीं, आमच्या परम-पूज्य धर्मकर्त्यांनीं आमच्या अल्पवयस्क व कामानभिज्ञ कन्यकांची हवी तसली छलना व विटंबना करण्याचा आम्हांस जो अद्वितीय हक्क दिला आहे, व ज्याचा उपभोग आम्हीं कमींत कमी आज दोन अडीच हजार वर्षें घेत आहों, तो काढून घेण्याचें धाष्टर्य तुम्हीं करीत आहां; पण संभाळा; जर असल्या साहसानें सत्तावन सालचा दुर्धर प्रसंग तुम्हांवर फिरून गुदरला, तर त्याबद्दल आम्ही मग बिलकुल जबाबदार होणार नाहीं"—इत्यादि प्रकारचा जो आकांत या भेकड लोकांनीं चालविला आहे, व ठिकठिकाणीं वेड्या पिरांचे थवे गोळा करून हिंदुस्थानसरकाराकडे जे खलिते हे पाठवीत आहेत, त्यामुळें यांनीं घेतलेल्या धास्तीबद्दल यांची कींव करावी किंवा यांच्या सांद्र मौर्ख्याबद्दल हांसत रहावें, हें आम्हांस समजत नाहीं! असला दिस-ण्यांत भयंकर खटाटोप केल्यानें, हिंदुस्थानसरकार किंवा खरे सुधारक आपल्या कर्तव्यापासून अणुमात्र ढळतील, असें यांनीं स्वप्नांत सुद्धां आणूं नये. या हिंदुस्थानदेशाच्या क्षितिजावर ज्ञानार्काचा स्पष्ट उदय झाला आहे; तेव्हां अंधकारप्रिय वाघुळांनीं केवढाही किलकिलाट केला तरी तो अर्क क्षणोक्षणीं

वर येत जाऊन, व आपल्या पुण्य रश्मींनीं येथील अज्ञानतमाचा थोड्या वर्षांत ध्वंस करून सर्व ठिकाणीं न्याय व दया यांच्या वृद्धीस मदत करणार, यांत शंका नाहीं. पृथ्वीवरील इतर देशांत अशा प्रकारचें स्थित्यंतर एकसारखें होत आहे; ज्यांनीं या अपरिहार्य व अनिवार्य सृष्टिनियमाच्या उलट जाण्याचा प्रयत्न केला आहे ते नष्ट झाले आहेत; व जर हिंदुलोक अविचारी, मूर्ख, निर्दय, दुराग्रही व दुरभिमानी पुढाऱ्यांचे अंध गुलाम होऊन तसें करतील, तर त्यांचीही तीच दशा होईल हें त्यांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

आजमित्तीस संमतीच्या बिलाविरुद्ध येथील अज्ञान लोक आणि एका दृष्टीनें यांहूनही अधिक अज्ञान असे त्यांचे म्होरके जसल्या कोट्या लढवीत आहेत तसल्याच कोट्या **बेंटिक साहेबांनीं** सती जाण्याचा अमानुष प्रघात बंद केला, त्या वेळेसही करण्यांत आल्या होत्या, व पुनः ज्या ज्या प्रसंगीं अशा प्रकारची फार जुनी दुष्ट चाल कायद्यानें बंद करण्याचा प्रसंग येईल त्या वेळेसही धर्माच्या नांवावर तिचें मंडन करणारे, आणि सामाजिक व धार्मिक गोष्टींत लोकांची सुधारणा करणें हें कोणत्याही सरकारचें काम नव्हे, विशेषतः इंग्लिश सरकारासारख्या परधर्मी सरकारास हिंदूलोकांसारख्या पराभूत लोकांनीं आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवहारांत हात घालूं दिल्यास त्यांचें अमर्याद नुकसान होणार आहे, अशा थापा देऊन मूढ लोकांच्या मनांत सरकाराविषयीं व त्यांना निःसंशय अत्यंत हितावह अशा कायद्याविषयीं त्यांच्या मनांत द्वेषभाव उत्पन्न करणारे शेंकडो लोक निघतील. पण ज्या सरकारास भूतदयेच्या तंत्रानें चालावयाचें असेल त्यानें असल्या हेकड व अज्ञान लोकांच्या बरळण्याकडे बिलकूल लक्ष देऊं नये. असले लोक कांहीं वेळ ओरड करून स्वस्थ बसतात इतकेंच नाहीं, तर थोडयाच वर्षांत त्यांचा मूर्खपणाही त्यांच्या प्रत्ययांस येऊं लागतो. * * नवऱ्याच्या प्रेताबरोबर त्याच्या जिवंत बायकोस जाळणें किंवा जळूं देणें हें आज आम्हास जितकें भयंकर वाटत आहे, तितकेंच तीस-पसतीस वर्षांनीं, ऋतु प्राप्त झाला आहे येवढ्याच कारणासाठीं, बारा वर्षांच्या आंतील मुलीकडे पाहिजे त्या वयाच्या तिच्या नवऱ्यास शास्त्रप्रणीत गर्भाधान करण्यासाठीं जाऊं देऊन तिचा हवातसला छळ करण्याचा मार्ग खुला ठेवणें, व तो केल्याबद्दल त्याला कडक शिक्षा देतां न येणें हें त्यास भयंकर वाटणार आहे. दिवसेंदिवस मनु

ष्याची सदयता वाढत जात नसती, व कोणी कोणाचें मन अथवा शरीर विनाकारण दुखविणें अन्याय्य आहे, अशी लोकांची खात्री न होती, तर जुन्या ग्रीस देशांतील वक्त्यांप्रमाणें किंवा लेखकांप्रमाणें आतांच्या वक्त्यांनीं व लेखकांनीं पाहिजे त्याविरुद्ध पाहिजे तें लिहिणें व बोलणें अलीकडील कायद्यांत दंडनीय मानिलें गेलें नसतें, व अमुकानें त्याचें उलंघन केलें आहे असा न्यायाधिशानें किंवा पंचांनीं आपला अभिप्राय दिला तरी तशा व्यक्तीस डोंगरीची हवा खावी लागली नसती! पण यावर (हे म्होरके) कदाचित् असें म्हणतील कीं, जी गोष्ट बहुतांस पसंत वाटेल तिची बाकीच्यावर सक्ती करण्यास कांहीं हरकत नाहीं; बहुतेकांची इच्छा तोच न्याय, हेंच कायद्याचें मुख्य तत्त्व आहे! असें जर (बहुजन समाजाच्या या वकिलांचें) उत्तर असेल, तर त्याचा अर्थ इतकाच समजला पाहिजे कीं, कोणत्याही गोष्टीचें चांगलें-वाईटपण ठरविण्यास बहुमताशिवाय दुसरें साधनच नाहीं; व ज्याअर्थी सामर्थ्यही या बहुमताकडेच असण्याचा संभव आहे त्याअर्थी लघुमताकडील लोकांनीं बहुमताकडील लोकांचें म्हणणें निमूटपणें ऐकलें पाहिजे! तात्पर्य, 'जिकडे बल तिकडे न्याय' हाच टिळकांच्या प्रस्तुत वकिलीचा इत्यर्थ असेल, व त्याच्या जोरावर ते सांप्रत प्रकरणांत लोकांचा पक्ष घेऊन भांडत असतील, तर ते मोठा प्रमाद करीत आहेत, असें म्हणणें भाग आहे; कारण हिंदुस्थानच्या पंचवीस कोटी क्षुद्र जंतुकडे खरोखरीच बलाधिक्य असतें तर लाख सव्वालाख टोपीवाल्यांस हिंदुस्थानचें राज्य एक दिवस देखील चालवितां आलें नसतें! निदान 'जिकडे बळ तिकडे न्याय' हें तत्त्व सर्व बाबतींत ब्रिटिश सरकार तरी मान्य करण्यास व लागू करण्यास तयार नाहीं, म्हणूनच या संमतीच्या बिलाविरुद्ध इतक्या बाष्कळपणाची बडबड करण्याची सवलत आपणांस मिळत आहे, हें (या वकिलांच्या) अनेक मूढ पक्षकारांस न समजलें तरी खुद्द त्यांस समजलें पाहिजे! तात्पर्य, आजपर्यंत सरकारनें संमतीचा कायदा केला नाहीं, तो लोकांच्या भीतीनें केला नाहीं, असें कोणालाही वाटण्याची गरज नाहीं. सरकारास असें वाटलें होतें कीं, पांच पंचवीस वर्षें शिक्षण दिल्यानें, असल्या अनाचारांचें अमानुषत्व लोकांच्या नजरेस येऊन, ते अनाचार ते आपण होऊन बंद करतील; निदान सरकारनें ते बंद करण्याचा प्रयत्न केल्यास, सुशिक्षित लोकांकडून त्या कामीं त्यांस मदत मिळेल; पण चांगले सुशिक्षित

लोकच जर असले भयंकर प्रचार एकदम नाहींसे करण्याचे कामीं सरकारास मदत देणें तें एकीकडे गुंडाळून ठेऊन, त्यांत त्यास विरोध करण्यासाठीं असमंजस लोकांचें वकीलपत्र घेतील, आणि असल्या सत्कृत्याविरुद्ध व तें करण्यास निघालेल्या सरकारविरुद्ध त्यांचीं मनें क्षोभविण्यास प्रवृत्त होतील, तर असल्या सुशिक्षितांची सरकारनें एक क्षणभर तरी मुर्वत कां ठेवावी,हें आम्हांस समजत नाहीं! आम्हांस तर असें वाटलें होतें कीं, या मर्यादित बिलापासून जरी व्हावा तितका फायदा होण्याचा संभव नाहीं, तरी जर सरकारनें तें आपण होऊन लोकांपुढें आणिलें तर हिमालयाच्या पायथ्यापासून कन्याकुमारीपर्यंत ज्याला ज्याला म्हणून प्रत्यक्ष रीतीनें किंवा परंपरेनें पाश्चिमात्य उदार शिक्षणाचा गंध लागला असेल तो असल्या बिलास विरोध करणार नाहीं इतकेंच नाहीं, तर सुज्ञ व समजंस असे आपले देशबांधव यांच्यामध्यें पडून "या बिलांतील प्रतिबंधास धर्माची प्रतिकूलता नाहीं; या प्रतिबंधामुळें मुलांचें व मुलींचें व त्यांच्याद्वारें हिंदुस्थानांतील भावी संततीचें मोठें कल्याण होणार आहे, आणि आपल्या प्रिय देशाच्या मुखश्रीवरील एक मोठा कलंक नाहींसा होणार आहे; या बिलास विरोध करणें म्हणजे खऱ्या धर्माचें उल्लंघन करून, आपल्या अंतःकरणांतील पशुता व्यक्त करणें होय"--असा उपदेश तो त्यांस करीत सुटेल, व "देशांतील बहुतेक लोकांच्या पूर्ण संमतीनें हा कायदा आम्हांस पसार करितां आला, यावरून आम्ही त्यांस जें शिक्षण देत आहों त्याचे त्यांच्या बुद्धीवर व अंतःकरणावर उत्तम परिणाम होऊं लागले आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं", असें सर्टिफिकेट हिंदुस्थानसरकारकडून मिळविण्यास सहायभूत होईल! पण ही अटकळ करण्यांत आम्ही अगदीं ठकलों हें आतां आम्ही कबूल करतों, आणि सर रोमेशचंद्रासारखे पुरुष बंगाल इलाख्यांत, सर टी. माधवरावसारखे मद्रास इलाख्यांत, आणि रा. टिळकासारखे या इलाख्यांत, लोकांच्या नांवानें संमतीच्या बिलाचा पाडाव करण्यास उभे राहिले आहेत, हें पाहून खेदानें व लज्जेनें आपली मान खालीं घालतों!!

येथपर्यंत सारें ठीक आहे. पण; सुधारकबोवा, वर म्हटल्याप्रमाणें आपली मान आपल्याच गुडघ्यांत अडकवून देऊन, आपण मुळुमुळू करीत बसणार, आणि आपल्या शत्रूप्रमाणेंच आपल्या मनावरही पाश्चिमात्य उदार शिक्ष-

णाचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं, असें जगास जाहीर करणार, कीं ज्या बऱ्यावाईट कोट्यांनीं तुमचे प्रतिपक्षी लोकांचीं मनें बिघडवीत आहेत व भलतीकडे नेत आहेत, त्यांचें यथाशक्ति व यथावकाश खंडन करणार! कोण स्वस्थ बसणार! **सुधारक** अं! टांकांतून अर्थबोधक अक्षरें काढण्याचें सामर्थ्य असेल; व तीं वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोंपर्यंत तरी हें स्त्रैणकर्म **सुधारकाला** स्पर्श करूं शकणार नाहीं! धर्मसंबंधानें या पत्रांत आलेल्या मजकुरावर **केसरी**च्या गेल्या अंकांत जी चर्पटपंजरी केली आहे तीवर सशास्त्र उत्तर पुढल्या खेपेस देऊं. येथें या संमतीच्या बिलावर जे आडून दोन गोळे येत असतात त्यांचा थोडासा समाचार घेतों, आणि हा बराच वेळ चाललेला ससरव काथ्याकूट पुरा करतों!

एकानें सतत दुसऱ्याचें काम केलें असतां, दुसऱ्याला तें करितां येईनासें होऊन तो अगदीं पंगू होतो, आणि मग पहिल्यास त्यावर हवा तसा जुलूम करतां येतो; सबब सरकारानें होतां होईल तों सर्व गोष्टींत, विशेषतः सामाजिक व धार्मिक गोष्टींत हात घालूं नये; त्या लोकांच्या लोकांस करूं द्याव्या, असें **हरबर्ट स्पेन्सर** म्हणतो; नवऱ्यानें आपल्या बायकोकडे केव्हां जावें हें ठरविणें समाजाच्या किंवा धर्माच्या अखत्यारांतलें काम आहे; तेव्हां सरकारानें त्यांत पडणें अप्रशस्त आहे, हें सिद्ध झालें! **स्कोबलसाहेब**, बोला आतां या असूचिभेद्य कोटिक्रमावर तुम्हांस काय बोलावयाचें असेल तें! जर कांहीं बोलतां येत नसेल, आणि बोलतां येणारच नाहीं हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे, तर घ्या आपलें बिल मुकाट्यानें परत, आणि म्हणा माझी चुकी झाली! पण प्रतिपक्षांच्या या एकदेशीय चोरट्या कोटिक्रमावर उत्तर देण्यास **स्कोबलसाहेब** नको आहेत. ती कामगिरी या आपल्या गरीब खरडेघाशासही अगदीं निरुत्तर करण्याइतक्या सफाईनें करतां येण्यासारखी आहे!! "अमुक यज्ञ करून ब्राह्मणांनीं दारू प्यावी, मांस खावें, किंवा असलेंच दुसरें एकादें कर्म करावें" अशी स्पष्ट शास्त्राज्ञा असून, तीं लोकांपुढें मांडतांना जर तिचा एक भाग, आणि तो 'अमुक यज्ञ करून' हा मुख्य भाग, तुम्ही आपल्या डोक्यांत किंवा पोथींत चुकीनें किंवा बुध्या राहूं द्याल, आणि "ब्राम्हणांनीं मांस खावें व दारू प्यावी," असें लोकास सांगत फिराल, तर तुमच्या वाचनाविषयीं, बुद्धीविषयीं, विचारसरणीविषयीं, व

प्रामाणिकपणाविषयीं, जें त्यांस वाटेल, तेंच तुम्ही स्पेन्सरचें वरील विचार-तत्व आमच्या समाजास लावूं पहातां तेव्हां तुम्हांविषयीं आम्हांस वाटतें! तुम्ही तर स्पेन्सरच्या ग्रंथांचीं पारायणें केलीं आहेत, तेव्हां त्यानें "राजे निरर्थक आहेत; लोकसत्तात्मक राज्यपद्धतीसारखी राज्य-पद्धति नाहीं; लोकसत्तात्मक राज्यांतील लोकनियुक्त प्रतिनिधिसभेच्या अध्यक्षाकडेही म्हणण्यासारखे अधिकार असूं नयेत; लोकांस शिक्षण देणें हें सरकारचें काम; व्यापार, कलाकौशल्य, आगगाडया, सर्व-संग्रहालयें, पुस्तकालयें, दवाखाने वगैरे गोष्टींकडे सरकारनें आपल्या मना-प्रमाणें कराचा पैसा लावणें म्हणजे लोकांच्या पैशाचा अन्यायानें दुरुपयोग करणें होय;"—अशीं जीं विधानें केलीं आहेत तीं आपणांस अवगत नसतील, असें मानणें अशक्य आहे. तर मग त्यांवर आपलें काय म्हणणें आहे, व वरील कामांपैकीं कोणतीं कामें आपण हिंदुस्थानसरकाराकडून काढून घेण्यास तयार आहां, तें कृपा करून आम्हांस सांगा, आणि इंग्लिश लोकांस या देशांतून पिटाळून लावण्यासाठीं किंवा त्यांच्या डोक्यांस आज कित्येक शतकें बेजार करून टाकीत असलेला त्यांच्या राजघराण्याच्या खर्चाचा बोजा काढून टाकण्या-करितां काय उपाय चालविले आहेत तें येथील व इंग्लंडांतील लोकांस विदित करा, म्हणजे त्यांवर तुमचे मोठे उपकार होतील! लोकांस हितावह कोणती गोष्ट आहे, याचा निर्णय झाल्यावर ती करावी कोणीं अशी पंचाईत पडते. जर आपण होऊन लोक ती करण्यास धजत नसतील तर ती सरकारानें त्यांस करावयास लावण्यांत काय जुलूम आहे कोण जाणें! लोक करीत असतील तर सरकारनें ती न करावी, हें ठीक आहे. तुम्ही आपण होऊन सतीची चाल बंद करण्याचा, बालहत्येचा भयंकर प्रघात मोडण्याचा व भर्तृरूपी कामी राक्षसाच्या तावडींतून मुग्ध कुमारिकांस सोडविण्याचा प्रयत्न केला असता, तर सरकार तुमच्या वाटेस कशाला गेलें असतें बरें! लोक मठ्ठ असतात तों-पर्यंतच सरकारास सक्ती करतां येते; त्याच्या अंगीं तर्तरी आली म्हणजे त्यास स्वस्थ बसावें लागतें! लोक आणि सरकार यांचा अशा प्रकारचा अनादिसिद्ध संबंध आहे. तेव्हां सरकारनें कोणत्याही कामांत, विशेषतः धार्मिक व सामा-जिक कामांत पडूं नये अशी तुमची इच्छा असेल तर देशोन्नतीच्या ज्या गोष्टी-विषयीं ज्ञात्यांस शंका राहिलेली नाहीं, अशा गोष्टी आपण होऊन करूं लागा,

म्हणजे स्कोबलसाहेब आपलें चंबूगबाळें आटोपून आपल्या सांथ्यांसह चालते होतील! पण तुम्ही आपले जडभरतासारखे पडून रहाल, तर मात्र सरकार आणि सुधारक कायद्याच्या अटकेंत तुम्हांस दिल्याशिवाय कधींही सोडणार नाहींत! या आमच्या म्हणण्यालाही स्पेन्सराचा आधार देतां येईल अशी आमची खातरी आहे! तेव्हां तुमचा स्पेन्सर खरा कीं आमचा स्पेन्सर खरा? आमच्या मतें दोघेही खरे आहेत. भेद इतकाच कीं, सध्यां या देशांत **आमच्या स्पेन्सरच्या** धोरणानें चाललें पाहिजे, व **तुमचा स्पेन्सर** भावी सत्ययुगासाठीं "धवलगिरीच्या" हिमाच्छादित शिखरावर बर्फांत पुरून ठेविला पाहिजे!

आतां ब्रिटिश सरकाराला आपल्या धर्मांत हात घालूं देणें बरोबर नाहीं, या विधानांत किती जीव आहे तें पाहूं. धर्मांत हात घालणें म्हणजे त्यांत फेरफार करणें. लोकांच्या अन्य विचारांत फेरफार होत गेले म्हणजे त्यांच्या धर्मविचारांतही फेरफार होत जातात, हें कोणत्याही धर्माच्या इतिहासावरून सिद्ध करून देतां येणार आहे. पाश्चिमात्य शिक्षणामुळें व कारणांमुळें आम्हांसही आमच्या धर्मात थोडाबहुत फेरफार करावा, असें वाटूं लागलें आहे. तेव्हां हा आतां करावयाचा कोणीं? सारे शंकराचार्य निःसत्व होऊन बसले आहेत; सरकार परधर्माचें आहे; लोकांस आपण होऊन चळवळ करून नव्या स्मृति घालण्याचें सामर्थ्य नाहीं! तेव्हां सध्याच्या स्थितीस अनुकूल असे फेरफार कोण करणार? प्रतिपक्षी म्हणतात कीं, ते लोकांनीं करावे; आम्ही म्हणतों कीं मोठमोठे फेरफार सरकारच्या साहाय्यावांचून व्हावयाचेच नाहींत; निदान आम्हीं जसल्या स्थितींत आहों, तसल्या स्थितींत तरी व्हावयाचे नाहींत. धर्मसंबंधीं फेरफारांचा दुसऱ्या एक दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, त्यांपैकीं कांहीं लोकांच्या इच्छेनें कांहीं त्यांच्या इच्छेविरुद्ध व कांहीं सहजगत्या होत असतात. 'गाई माराव्या किंवा न माराव्या' 'कलालांचीं दुकानें घालावीं किंवा न घालावी,' 'यात्रांवर किंवा देवस्थानांवर कर बसवावे किंवा नाहीं,'—या व अशा प्रकारच्या इतर गोष्टींविषयीं सरकारनें आमचें मत विचारलें नाहीं, व आम्हीं कधीं दिलें नाहीं. घरांतल्या घरांत थोडीबहुत टुरटुर केली असेल, पण उघडपणें असल्या गोष्टींत सरकारास विरोध करण्याचें धैर्य आम्हीं कधींही दाखविलें नाहीं. या गोष्टी सरकारच्या फायद्याच्या होत्या, आणि त्यानें त्यांविषयीं

आमचें काय म्हणणें आहे, हें पहात न बसतां, त्या बेलाशक करून टाकल्या! यावरून असें दिसतें कीं, आमच्या तोंडांत मारणारा जबरदस्त इसम आम्हांला भेटला कीं, आम्हीं आपला गाल निमूटपणें त्याच्यापुढें करतों! पण जर तोच इसम केवळ आमच्या कल्याणाकरितां अमुक गोष्ट करूं कीं नको, असें आम्हांस विचारील तर आम्हीं आपल्या अधिकाराचा तोरा मिरविल्याशिवाय कधींही राहावयाचें नाहीं! भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदू लोकांनो, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती धर्म स्थापण्यासाठीं कोंकणपट्टींत तुमचे अनन्वित हाल केले, त्या वेळेस तुमचा धर्माभिमान कोठें गेला होता? विषयलंपट निःशक्त वाचाळ बाबूंनो, जेव्हां महंमदीयांनीं हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत साऱ्या हिंदू लोकांस आपल्या धर्मवेडानें जर्जर करून सोडलें व तुम्हां हिंदूंच्या मानांवर अधिसारा ठेऊन, तुम्हांकडून तुमच्या शेंडया काढविल्या आणि तुम्हांस गोमांस चारिलें, तेव्हां तुमच्या धर्मरक्षणासाठीं आतांप्रमाणें तुम्हीं नुसता आरडा तरी करावयाचा होता!. त्या मुसलमानांच्या भीतीनें अजून तुम्हीं आपल्या बायका कुलपांत घालून ठेवल्या आहेत, हें तुम्हांस कळत नाहीं काय? आणि आतां दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकारबुद्धीनें आपल्या लहान पोरींवर जुलूम करूं नका, येवढें अदबीनें सांगत असतां त्यावर तुम्हीं आपलें धर्मास्त्र सोडतां, आणि कामाच्या झपाटयांत निराश्रित कुमारिकांचीं अंगें विदारण्याचा हक्क आमच्या धर्मानें आम्हांस दिला आहे व जर सरकार तो काढून घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला आमच्या असंतोषाचें फळ भोगावें लागणार, अशी धमकी घालतां! धिक्कार असो तुम्हांला, तुमच्या धर्माला, आणि तुमच्या हक्काला!!! जर तुम्हांस तुमच्या धर्माची इतकी प्रतिष्ठा वाटत आहे, तर पूर्वीं ज्यांनीं त्याचें उल्लंघन केलें, त्यांचें तुम्हीं शासन कां केलें नाहींत? रजपुतांनीं आपल्या बायका मुसलमानांच्या घरांत कशासाठीं नेऊन घातल्या? थेट शनवारच्या वाड्यांत थोरल्या बाजीरावानें एका यवनीस आणून ठेऊन तिच्याशीं राजरोस व्यवहार ठेवला, तेव्हां त्याला वाळींत कां टाकलें नाहींत? शिवाजीनें प्रथम प्रथम केवळ द्रव्यलोभानें व अधिकारलोभानें ब्राह्मणांचे व इतर जातींचे जे खून केले, यांबद्दल त्यांस काय प्रायश्चित्त दिलेंत? पण तुमच्यासारख्या शेंदाड शिपायांवर असले शब्दप्रहार तरी करण्यांत काय अर्थ आहे?

हेंही असो; ही तुमच्या पौरुषाभावाची काहाणी झाली! पण अलीकडे जे तुम्ही सहजगत्या किंवा जाणूनबुजून धर्माच्या उलट जातां तें काय म्हणून? पोटांत कांटे भरतां येत नाहींत म्हणून! महार, धेड व मुसलमान यांना चाकरीस ठेवणाऱ्या साहेब लोकांचे बूट उचलण्यास नेहमीं एका पायावर तुम्ही उभे असतां, याबद्दल तुम्हांला जरी क्षमा केली, तरी जेव्हां तुम्ही बाजारांतून, आगगाडयांतून, आगबोटींतून, हपिसांतून पाहिजे त्याशीं अंग घासून घरीं परत येतां, तेव्हां सचैल स्नान न करण्यामुळें तुमच्या हातून धर्माचें जें उल्लंघन होतें, त्याबद्दल तुम्हांस कां क्षमा करावी? पण हेंही असो; नित्याच्या व्यवहाराच्या अपरिहार्यत्वामुळें अशा प्रकारच्या गोष्टींबद्दल आम्ही तुम्हांस फारसा दोष देत नाहीं. पण येवढयानें तुमची कर्मकथा संपली असें कोण समजेल? अलीकडे कांहीं कारण नसतां, तुम्ही आपण होऊन आपल्या धर्मरूप जिवाच्या कलिजाचे जे प्रतिदिवशीं असंख्य खून पाडीत असतां, ते कशासाठीं? कलालांचीं दुकानें सरकार काढतें म्हणून त्याच्या नांवानें खडे फोडतां! पण झक् मारायला तुम्ही त्या दुकानांकडे जातां कां, आणि आपल्या धर्माची, प्रकृतीची, चित्ताची व अब्रूची खराबी करून घेतां कां! दारू पिणारांस, मांस खाणारांस, पार्शी, मुसलमान किंवा ख्रिस्ती यांचे घरीं अन्नोदकसेवन करणारांस, प्रसिद्धपणें घरांत अंगवस्त्रें बाळगणारांस व गटारांत पडणारांस, आणि उघडपणें हॉटेलांत पुरवे झोडणारांस अपंक्त कां करीत नाहीं? पण तुमची अशी समजूत झाली आहे कीं, कोणी प्रतिवर्षी पळीभर पंचगव्य आनंदानें घेईल; अंडीं, ब्रँडी व गरज पडल्यास गोमांसाचा अर्क देखील केवळ औषधासाठीं घेतों म्हणून म्हणेल; वर्षातून एकदां किंवा दोनदां दहापांच भटांस पुढील बोलावून चांगलीशी दक्षणा देण्यास तयार असेल; विशिष्ट आप्त वारल्यास किंवा कोणत्याही कारणानें एखाद्या मोठ्या क्षेत्रीं गेल्यास क्षौर करून घेण्यास नाखूष नसेल; सारांश जो धर्माचें ढोंग करण्यास आणि भिक्षुकांचीं तोंडें दाबण्यास कबूल असेल त्यानें हवे ते अनाचार खुशाल करावे! त्याला तुम्ही धर्मोल्लंघनाबद्दल दोष देणार नाहीं इतकेंच नाहीं, तर असल्या भोंदूस धर्मरक्षक समजून त्याच्या पायांवर लोटांगणें घालाल, त्याचे स्तुतिपाठ व पवाडे सकाळसंध्याकाळ गाल, छबिना काढून त्याची मिरवणूक कराल, व त्याचा स्वार्थ बाहेर न पडेल तर धर्माच्या नांवावर

त्याला पाहिजे ते करूं द्याल इतकेंच नाहीं, तर आंधळ्याप्रमाणें त्याचा हात धरून तो नेईल तिकडे जाण्यास किंवा खाडयांत लोटून घेण्यासही राजी व्हाल! धिक्कार असो अशा प्रकारच्या तुमच्या व तुमच्या वाटाडयांच्या धर्मनिष्ठेला आणि पापभीरुत्वाला! तुम्ही खोटे, तुमचा धर्म खोटा! तुमचा धर्माभिमान त्याहून शतपट खोटा! अशा प्रकारच्या धर्महीन कपटपटू लोकांनीं धर्माचा बागुलबोवा करून संमतीच्या बिलासारख्या बिलास विरोध करावा, याहून अधिक असंबद्ध, अधिक उपहासास्पद, अधिक लज्जास्पद, व विशेष खेदजनक काय आहे, हें आम्हांस कळत नाहीं!

---

## शहाण्याचा मूर्खपणा अथवा आमचे प्रेतसंस्कार : : २२

एखाद्या राजाच्या किंवा त्यासारख्याच दुसऱ्या एखाद्या मोठ्या पुरुषाच्या प्रेताचें दहन करतांना किंवा त्याला समाधि देतांना शेंदोनशें बकरीं, बैल अथवा घोडे, पांचपन्नास दासी, लग्नाच्या बायका, किंवा ठेवलेल्या वेश्या, दहापांच स्नेही, प्रधान, किंवा अगदीं जवळचे आप्त—अशांचे तुकडे करून ते त्यांच्या स्वामीच्या शवाबरोबर जाळले किंवा पुरले तर तशा कृत्याला, वाचकहो, तुम्ही काय म्हणाल? अर्थात् रानटी किंवा क्रूर म्हणाल! कोणत्याही ठिकाणीं असा प्रघात असेल तर त्या ठिकाणचे लोक अत्यंत निष्ठुर, अत्यंत अविचारी व अत्यंत अज्ञान असें कोणाच्यानेंही म्हटल्यावांचून राहवणार नाहीं. पण हा 'कोण' अलीकडल्या शतकांतील एखाद्या सुधारलेल्या देशांतला इसमच असूं शकणार आहे. तीनचार हजार वर्षांपूर्वीचा एखादा आर्य किंवा हिंदुस्थानचा आद्य रहिवासी अशा आचारास क्रूर म्हणतो किंवा नाहीं, याचा संशय आहे. या घटकेस या पृथ्वीवर असे प्रदेश आहेत कीं जेथें असले आचार अत्यंत प्रशंसनीय, धर्मसंमत व अवश्य मानले जात असून, प्रतिदिवशीं ते घडून येत आहेत! अशा देशांत जेव्हां एखादा राजा, सेनापति, अथवा दुसरा कोणत्याही प्रमुख मनुष्य मरतो तेव्हां त्याच्या कुटुंबांतले व मित्रमंडळांतले कांहीं इसम मोठया खुषीनें त्याच्याबरोबर सती जाण्यास तयार होतात, व प्रजा, नोकर, गुलाम वगैरे त्याच्या ताब्यांतील कित्येक

लोक आणि पशु त्याचेबरोबर जुलमानें घालवितात! जे इसम अशा प्रसंगीं आपखुषीनें मरण्यास तयार होतात त्यांची अशी कल्पना असते कीं, ज्या धन्याची आपण इहलोकीं प्रेमपूर्वक सेवा केली, ज्या आप्तांचें सहवाससुख यथेच्छ भोगिलें, व ज्या मित्रास मोठमोठ्या लढायांत साहाय्य देऊन त्याची मर्जी सुप्रसन्न करून घेतली, त्याच्याशीं ते ते व्यवहार मरणोत्तर परलोकींही आपणांस येथल्याप्रमाणेंच करतां येतील! अलीकडील विचारी लोकांस ही कल्पना अज्ञानमूलक व हास्यास्पद वाटेल हें खरें आहे; तथापि तींत आश्चर्य वाटण्यासारखें किंवा शंका येण्यासारखें कांहींच नाहीं, असें मानणारे लोक आजमित्तीस अनेक रानटी प्रदेशांत अस्तित्वांत आहेत इतकेंच नाहीं, तर या सुधारलेल्या भरतखंडांतील लोकांच्या कल्पनाही अशाच होत्या, असें येथें सांप्रत कालीं रूढ असलेल्या प्रेतसंस्कारावरून करण्यास बिलकूल हरकत दिसत नाहीं. आम्हीं आपल्याला कितीही सुधारलेले किंवा शहाणे म्हणवीत असलों तरी या संबंधानें आपण अद्यापि बरेच मूर्ख आहों, असें विचाराअंतीं प्रत्येकास कबूल करावें लागेल!

आजपर्यंत ज्या बायका आपल्या नवऱ्यांबरोबर आपण होऊन सती गेल्या किंवा घालविल्या असतील, त्यांच्या सती जाण्यांत आणि वरील अमानुष आचारांत बरेच सादृश्य आहे, असें कोण म्हणणार नाहीं? सतीची चाल आपल्या देशांतली म्हणूनच तिचा पवाडा गावयाचा, आणि जिवंत मुलास किंवा मुलीस बापाबरोबर अथवा आईबरोबर मूठमाती देण्याची चाल परक्या ठिकाणची म्हणून तिची निंदा करावयाची—ही निःपक्षपातानें विचार करण्याची अलीकडील देशाभिमान्यांची व धर्माभिमान्यांची पद्धत सामान्य बुद्धीच्या व सामान्य विचारांच्या मनुष्यास पसंत नसल्यामुळें ते दोनही चालींस एकाच माळेंत गोवितात आणि सतीहून कमी निष्ठुर, पण सतीच्या तत्त्वाचाच ज्यास आधार आहे अशा दुसऱ्या चालींस ते दोष देतात. लोकांना अनेक शतकें पूर्णपणें मान्य झालेले आचार कितीही निर्दय किंवा गूढ असले तरी त्यांचें मंडण करीत सुटणें, हें अजागळ लोकांच्या शाबासकीस हपापलेल्या ढंकेखोरास, अथवा पाहिजे तें भाषण करून किंवा लेख लिहून दोन पैसे जोडण्यासाठीं रात्रंदिवस धडपड करणाऱ्या नीच लोभ्यासच योग्य आहे! लोकांचें अज्ञान कशांत आहे हें ज्यास समजलेसें वाटत आहे, व तें दूर होऊन सदाचार

आणि सुख यांचा त्यांमध्यें प्रसार व्हावा, अशी ज्यास बळकट इच्छा झाली आहे, तो लोकांच्या उपहासास व छलास न भितां, आपले विचार उघडपणें बोलत सुटेल, तरच त्याचा हेतु सिद्धीस जाण्याचा संभव आहे. विनाकारण कोणीं कोणाचें मन दुखविणें हें अश्लाघ्य होय; पण वैद्यानें रोग्याच्या व ज्ञात्यांनीं मूढांच्या तब्यतीप्रमाणें वागणें आणि त्यांना ग्रासून टाकणाऱ्या शारीर व मानसिक रोगाचा आपल्या शक्तीप्रमाणें परिहार करण्याचा निर्भिडपणें प्रयत्न न करणें हें अधिकच अश्लाघ्य होय, असें आम्हांस वाटतें; आणि म्हणूनच सध्यां "पांचजन्यांचा हंगाम" चालू आहे हें ठाऊक असतां, गतवर्षीं याच हंगामांत पुण्यांतील सुबंधूंनीं आपला प्रेतसंस्कार केला हें ध्यानांत असतां, या अप्रिय विषयाची चर्चा करण्याचें धैर्य आम्ही करीत आहों. 'प्रेतविधीं-विषयीं' आमचे पुढील विचार वाचून त्यांबद्दल प्रथमदर्शनीं आम्हांविषयीं जो संताप उत्पन्न होईल तो विसरण्याचा जे कोणी प्रयत्न करतील. आणि त्याची ऊर्मी जिरल्यावर या विचारांचें शांतपणानें जे चिंतन करतील, त्यांना त्यांत सत्याचा बराच अंश आहे असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. देश-परत्वें व धर्मपरत्वें उत्तरक्रियेचे अनेक प्रकार झाले आहेत. जाळणें, पुरणें, बुडविणें, सडविणें, किंवा गिधाडांकडून खावविणें हे मेलेल्या शरिरांची वाट लावण्याचे मुख्य पांच मार्ग होत. यांपैकीं कोणत्याही एका मार्गानें शवाचा निकाल लावला म्हणजे हें काम आटपतें तर त्या-बद्दल केव्हांही विशेष चर्चा करण्याची गरज पडतीना. पण प्रत्येक धर्मानें या दुःखदायक कामामागें त्याहूनही दुःखदायक अशा विधींचें दुष्टें लाऊन दिलें आहे. ख्रिस्ती, पारशी, मुसलमान, हिंदू, बुद्ध— सारांश, कोणत्या पाहिजे त्या धर्माचा मनुष्य घ्या. मेलेल्या मनुष्याच्या प्रेताचा चट्-दिशीं कांहीं तरी निकाल लाऊन मी आपला मोकळा होईन, असें कोणा-लाही म्हणतां येत नाहीं. प्रेताचे आणि आपले बरेच हाल केल्याशिवाय व करून घेतल्याशिवाय त्याचा शेवटचा निरोप घेणें अशक्य झालें आहे. पण त्यांतल्या त्यांत हिंदू लोकांनीं, विशेषतः वैदिक धर्माचे प्यारे भक्त जे ब्राह्मण त्या आम्हीं हें और्ध्वदैहिकप्रकरण करवेल तितकें भयप्रद, अमंगल व कष्टमय केलें आहे; निदान आम्हांस तरी आमच्या अंत्यक्रियापद्धतींत नांवाजण्यासारखें कांहींएक दिसत नाहीं. प्रेताला, प्रेताच्या आत्म्याला आणि

प्रेताच्या आतांला ब्राह्मणी प्रेतनिर्हार एकसारखा त्रासदायक आहे. प्रेत लहानाचें असो किंवा थोराचें असो; स्त्रीचें असो किंवा पुरुषाचें असो; निष्कारण त्रास म्हणून चुकावयाचा नाहीं. पोराच्या प्रेतास न्हाऊं घातलें पाहिजे; त्याची ताळू भरली पाहिजे; त्याला हळद लाविली पाहिजे. सवाष्ण स्त्रीला न्हाऊं घालून पातळ नेसविल्याशिवाय व मळवट भरून तिची ओटी भरल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. याप्रमाणेंच कमी अधिक त्रासाची थोरल्या पुरुषाच्या व विधवांच्या प्रेतांची प्राथमिक व्यवस्था.) नंतर तिरडीवर बांधणें व स्मशानांत नेणें वगैरे गोष्टीही शास्त्रविहित मार्गानेंच झाल्या पाहिजेत. पण स्मशानांत आल्यावर ज्या तिरस्कारक व संतापजनक गोष्टी कराव्या लागतात, त्यांपुढें येथपर्यंत झालें तें कांहींच नाहीं, असें म्हणावें लागतें. चितेच्या गोवऱ्या रचावयास लागण्यापासून प्रेताची राख होईपर्यंत विधीच विधि! हे भीषण, बीभत्स, अमंगल हिंदुधर्मा, तुझ्या आज्ञेनें आज शेंकडों वर्षें स्मशानभूमींत आम्हीं जीं क्षौरें केलीं, डोळ्यांतून पाणी गळत असतां कणकीचे गोळे करून जे प्रेताच्या अनेक भागांवर ठेविले; क्रव्यादाग्नीच्या भयाण ज्वालांभोंवतीं मातीच्या गळत्या घागरी डोक्यावर घेऊन ज्या प्रदक्षिणा घातल्या व उत्तरीनें गळ्यांत दगड बांधून घेऊन व तोंडाला हात लावून तुझ्या नांवानें बाढूं नये तसले जे ध्वनि काढले, त्या सर्वांबद्दल तूं आम्हांस काय दिलें आहेस! निर्दय वंचका! गाईचें दूध पिणें, नानाप्रकारचें जिन्नस यथेच्छ खाणें, पालखींत किंवा घोड्यावर बसणें, जोडा घालून सहल करणें, शवाबरोबर जाळलेल्या प्रियपत्नीच्या केंसाच्या धुराच्या वासावरूनच जी आपणास प्राप्त झाली आहे अशी कल्पना करून तिच्यासमवेत शय्येवर विहार करणें किंवा विश्रांति घेणें, मृत्युलोक सोडून वायुरूपानें पातालाकडे किंवा स्वर्गाकडे संचार करीत असतां कोणी शत्रु भेटला तर तलवारीनें किंवा सोडग्यानें त्याचा समाचार घेणें, व अनेक प्रकारच्या दुर्गंधी द्रव्यांच्या समुद्रांतून प्रवास करण्याचा प्रसंग आला असतां दर्भाच्या होडग्यांत बसणें, अथवा तहान लागली असतां मडक्यांत घालून दिलेल्या पाण्यानें ती भागविणें—असल्या गोष्टी मेलेल्या मनुष्याच्या आत्म्याकडून किंवा जिवाकडून घडण्याचा संभव तरी आहे काय! मुळींच नाहीं. पण जबरदस्त पंचाक्षऱ्याप्रमाणें आम्हा

साऱ्या अज्ञ लोकांस त्वा मारून टाकून केवळ गुलाम केलें असल्यामुळें, आज कित्येक युगें अगदीं अशक्य गोष्टी आम्ही शक्य मानीत आहों, व अत्यंत निंद्य कृत्यें वंद्य मानून तुझ्या संतोषाकरतां तीं बेलाशक करीत आहों! पण ध्यानांत ठेव; या तुझ्या अश्लाघ्य व निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल अगदीं समीप येऊन ठेपला आहे! आजपर्यंत त्वां आम्हांस ज्या असह्य यातना भोगण्यास लाविलें आहे,' व जीं अनन्वित कर्में आम्हांकडून करविलीं आहेस त्या सर्वांबद्दल तुझीं पाळें मुळें खणून काढून विचारकुंडांत पेटलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्होळांत तुझी आहुति देणाऱ्या नवीन ऋत्विग्वर्गाचा अवतार नुकताच झाला आहे! तेव्हां जर तुला आपल्या अस्तित्वाची आकांक्षा असेल तर वेळेवर शुद्धीवर ये आणि आमच्या सर्व शरीरभर कांचत असलेले तुझे पाश काढून घे; नाहीं तर भरतखंडांत तुझें नांव देखील रहाणार नाहीं! मित्रत्वाच्या नात्यानें आज तुला ही लहानशी नोटीस दिली आहे, व आमच्यानें होतील तेवढ्या आणखीही देण्यांत येतील. तेवढ्यांनीं तूं वृत्तीवर आलास आणि कालास उचित असें वर्तन करूं लागलास तर ठीकच आहे! नाहीं तर तुझें नशीब तुझ्याबरोबर!!

मनुष्य मेल्यानंतर त्याच्या प्रेताची कांहीं तरी वाट लावलीच पाहिजे, नाहीं तर तें सडून त्याला दुर्गंधी सुटेल, व त्यापाशीं उभें रहावेनासें होईल. तेव्हां ज्याची तुमची मृत्यूनें ताडातोड केली त्याचें शरीर तुम्हांस कितीही प्रिय असलें, आणि त्याच्या संवर्धनार्थ तुम्हीं कितीही खर्च व कष्ट केले असले तरी त्यांतला प्राण निघून गेल्याबरोबर, सर्व प्रेम एकीकडे ठेवून त्याचें दहन करण्याच्या, त्याला समाधि देण्याच्या, किंवा तें मूकोत्सेधांत अथवा निःशब्द मनोऱ्यांत (Tower of Silence) नेऊन ठेवण्याच्या तयारीस लागलें पाहिजे. मनुष्याच्या सुधारणेंत पाहिजे तेवढे फेरफार होवोत त्याचे हातीं अमरत्व आल्याशिवाय हा दुःखकारक प्रसंग कोणत्याही रीतीनें त्याला टाळतां येण्यासारखा नाहीं. आतां प्रश्न येवढाच आहे कीं, हा अनावर प्रसंग कमींत कमी दुःखप्रद कशानें करतां येईल? आमच्या लोकांत जे अमंगल प्रेतसंस्कार रूढ आहेत ते राहूं दिल्यानें किंवा त्यांना फाटा दिल्यानें? प्रेतांस मूठमाती देण्यापेक्षां किंवा निःशब्द मनोऱ्यांत तीं नेऊन तेथें गिधाडांकडून तीं खावविण्यापेक्षां चितेवर त्यांचें दहन करणें हें फार

चांगलें, हें कोणाही विचारी मनुष्यास कबूल करणें भाग आहे, व हळू हळू हा प्रघात सर्वत्र रूढ होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ख्रिस्त्यांप्रमाणें किंवा मुसलमानांप्रमाणें हिंदू लोकांनीं प्रायः प्रेतें पुरण्याची चाल पसंत न करतां तीं जाळण्याची रीति पाडली ही फार शहाणपणाची गोष्ट केली, आणि म्हणून ती अत्यंत रक्षणीय आहे असें आम्हांस वाटतें. पण यापलीकडे मात्र यासंबंधानें त्याची तारीफ करण्यांत यत्किंचित् देखील जागा नाहीं. सुधारलेल्या इतर लोकांत प्रेतसंस्कार आहेत, नाहींत असें नाहीं; पण आमच्याइतका तऱ्हेवाईक आचरटपणा बहुशः कोठेंही दृष्टीस पडावयाचा नाहीं! या आचरटपणांत एकदां श्रद्धेचा पुष्कळ अंश होता आणि अजूनही कांहीं आहे, हें आम्ही कबूल करतों. मरावयास टेंकलेल्या बऱ्याच हिंदु लोकांस आपल्या पाठीमागें आपली क्रिया नीट रीतीनें व्हावी असें वाटत असतें. इतकेंच नाहीं, तर तीबद्दल ते कधीं कधीं विशेष व्यवस्थाही करून ठेवतात. तसेंच, जे क्रिया करतात त्यांपैकीं कित्येकांना अशा क्रियेपासून मृतांना सद्गति प्राप्त होते, व स्वतःस पुण्य लागतें, निदान पाप लागत नाहीं, असें वाटतें! अशा प्रकारच्या लोकांवर तीक्ष्ण शब्दांचे प्रहार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. एकतर त्यांना जें बरें वाटत आहे तें करूं दिलें पाहिजे किंवा युक्तियुक्तीनें त्यांचें मन वळविलें पाहिजे; तथापि त्यांच्या कृत्यांत जेवढा निर्दयपणाचा किंवा अमानुषपणाचा भाग असेल तेवढ्याबद्दल त्यांची कानउघाडणी करणें जरूर आहे. कोणत्याही मनुष्यानें आपल्या बापाखातर, आईखातर, बायकोखातर किंवा दुसऱ्या कोणत्याही आप्ताखातर एक वेळेसच काय, पण दरपंधरवड्यास जरी नखशिखांत क्षौर केलें तर त्याबद्दल आम्ही त्यास फारसा दोष देणार नाहीं; पण जो कोणी दुसऱ्याच्या मर्जीविरुद्ध त्याच्या एका केसाला धक्का लावण्याचा प्रयत्न करील त्याला त्याबद्दल दोष दिला पाहिजे इतकेंच नाहीं, तर दंडही केला पाहिजे असें आम्ही समजतों! दुसऱ्याला त्रास होऊं न देता, ज्याला जी गोष्ट पसंत असेल त्याला ती करण्याचा पूर्ण हक्क आहे; पण अविचारी मनुष्याची वारंवार काय चुकी होत असते कीं, ज्या गोष्टी त्याला स्वतःला हितावह अशा वाटत असतात, त्या दुसऱ्यालाही तशा वाटत असतील अशा भ्रमानें तो आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून त्या दुसऱ्यावर

लादीत असतो. प्रेतसंस्काराच्या संबंधानें अशा प्रकारचा जुलूम आमच्या समाजांत जितका होत आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही समाजांत होत नसेल. मनुष्याला संकटावस्थेंत गांठून धर्मबुद्धीनें, लोभानें, मत्सरानें, किंवा दुसऱ्या कोणत्याही दुष्ट विकारानें त्याचा असा छळ करणें हा शुद्ध अधमपणा होय! जे लोक भाविकपणानें आज शेंकडों वर्षें अशा प्रकारचा जुलूम आपला आपल्यावर व दुसऱ्यावर करीत आहेत, त्यांना आम्ही विनयपूर्वक असें विचारतों, "तुम्ही इतके गतानुगतिक कशासाठीं होऊन बसला आहां? मनुष्याच्या जन्माला येऊन असें मेंषासारखें वर्तन कां करतां? डोक्यांत जो थोडाबहुत मेंदू असेल त्याच्याकडून कांहीं एक काम करून न घेतां त्याची माती किंवा राख कां होऊं देतां? तुम्ही जे प्रेतविधि करतां त्यांवरून जिवंत मनुष्य आणि मेलेला मनुष्य यांतला भेद तुम्हाला कळत नाहीं, असें म्हणणें भाग पडतें. जिवंत मनुष्याच्या आहारोपभोगास लागणारे पदार्थ तुम्ही मेलेल्या मनुष्यास अर्पण करतां याचा अर्थ काय? पहाणें, हुंगणें, खाणें, स्पर्श करणें, हिंडणें, फिरणें, बोलणेंसवरणें–हे सारे शरीरनिबद्ध व्यापार आहेत. मृत शरीराला अग्निकाष्ठ देऊन त्याची राख झाल्यावर त्याच्या नांवानें जें अन्नपाणी तुम्ही देतां त्याचा उपभोग कोण घेतों? मेलेल्यांच्या आत्म्याला डोळे, नाकें, तोंडें, त्वचा, हातपाय, व काळीज-फुप्फुसें आहेत कीं काय? जर नसतील तर तुम्हीं दिलेल्या अन्नोदकापासून त्यांना काय फायदा होत असेल? पण असतील तर त्यांच्या चेतनावस्थेंत आणि मृतावस्थेंत भेद काय? नसेल तर वर्षांतून फक्त एकदा परामर्श घेतल्यानें त्यांचा निभाव कसा लागेल? शिवाय, त्यांच्या रहाण्यासवरण्याची व्यवस्था काय? जिवंतपणीं त्यांना जसलीं घरें लागत, तसलींच मेल्यावरही बांधून देणें अवश्य नाहीं काय? तसेंच, दर आठवड्यास न्हावी, परीट वगैरे कारागीर त्यांच्या सेवेला हजर ठेवण्याची जरूर नाहीं काय? हेंही असो; तुम्हांला हें ठाऊक आहे कीं, ज्याप्रमाणें जनन आणि मरण यांची गांठ बांधलेली आहे, त्याप्रमाणेंच अन्न खाणाराच्या पाठीमागें बहिर्दिशेला जाणें लागलें आहे. ही त्यांची अडचण दूर करण्यासाठीं तुमच्याकडून आजपर्यंत कांहींच योजना झाली नाहीं हें कसें? पैशाचावस्थेंतील **सॅनिटरी कमिशनरांकडून** (आरोग्यरक्षक अधिकाऱ्यांकडून) तुमच्या अनंत पूर्वजांस प्रतिदिवशीं खडाखड दंड होत नसतील काय? पुनः इतक्यांनीं इतकीं वर्षें

उरकलेल्या देहधर्मामुळें उत्पन्न होणाऱ्या रोगजनक व.यूंचें निर्दलन करण्यासारखे फेनिलाचे प्रवाह चोहोंकडे वहात नसतील, आणि गंधकाच्या व डांबराच्या होळ्या जेथें तेथें पेटलेल्या नसतील, तर सारें वातावरण रोगकृमींनीं व्याप्त होऊन जाऊन, डेंग्यू, कॉलरा, इन्फ्ल्युएन्झा वगैरे प्राणनाशक सार्थीनीं ते जर्जर होऊन गेले नसतील काय! जर गेले असतील असें म.नणें स्वाभाविक आहे तर होमोपॅथिक, इलेक्ट्रोहोमोपॅथिक, किंवा ॲलोपॅथिक रामबाण टिंक्चरें किंवा ग्लोब्यूल्स् अथवा आर्यवैद्यकांतील खाशा खाशा मात्रा आणि काढे त्यांस देण्याची व कै० बापू मेहेंदळ्यासारख्या बहुतश्रुत वैद्यांकडून त्यांची परीक्षा करविण्याची कांहीं सोय कधीं केली आहे काय! अन्नवस्त्र तेवढें मधून मधून द्यावयाचें आणि बाकी सर्व गोष्टींविषयीं उदासीन रहावयाचें हें तुमच्यासारख्यांच्या पितृभक्तीस, धर्मबुद्धीस आणि विचारशीलतेस बिलकुल शोभत नाहीं! खुळ्यांनो, असे पोरांपेक्षां पोर कसे झालांत! तुमच्या वयाला निदान तीन–साडे–तीन हजार वर्षे झालीं असून मनुष्यपणाच्या शैशवावस्थेंत असलेल्या रानटी लोकांप्रमाणें विचार करण्यास व वागण्यास तुम्हांस लाज कशी वाटत नाहीं! गरुडपुराणांतल्या किळस आणणाऱ्या गप्पांवर भरंवसा ठेवणाऱ्या मूढांनो, आरबी भाषेंतील चमत्कारिक गोष्टींसारख्या गोष्टींवर श्रद्धा ठेऊन त्यांना पुराणाच्या पदवीस चढवाल तरी देखील कांहींसें बरें होणार आहे. तसें केल्यानें तुमच्या मनुष्यपणावरील थोडासा कलंक तरी धुऊन गेल्यासारखा होईल. मनुष्यांच्या आत्म्यांविषयीं तुमचा एवढा पक्षपात कशासाठीं! ज्या गाईचें दूधतूप खाऊन तुम्ही इतके धष्टपुष्ट होतां, ज्या बैलांच्या श्रमानें हजारों खंडी धान्य पिकवितां, ज्या घोड्यावर बसून युद्धास जातां आणि ज्या कुत्र्यांच्या साहाय्यानें आपल्या संपत्तीचें संरक्षण करतां त्या साऱ्या उपयोगी जनावरांचीं तुम्हीं श्राद्धें कां करीत नाहीं! त्यांच्यासाठीं उत्कुंभ कां देत नाहीं! गाईला आत्मा नाहीं (The cow has not a soul) असें पाद्र्यांप्रमाणें तुमचें तर मत नाहींना! जर नसेल तर या अत्यंत उपयोगी जनावरांच्या आत्म्यांविषयीं तुम्ही इतके उदासीन कसे! वास्तविक पहातां यांच्याकरतां तुम्हीं स्वतंत्र श्राद्धें करावयाला पाहिजे होतीं; पण तसें करणें अवघड झालें असल्यास निदान पितरांबरोबर त्यांची आठवण करण्यास काय हरकत आहे! मेलेल्या आईच्या, बापाच्या किंवा बायकोच्या पिंडाबरोबर देवाशा

झालेल्या आवडत्या गाईच्या, घोडयाच्या किंवा कुत्र्याच्या नांवानें दोन पिंड सोडलें म्हणून काय झालें? शिवाय, आणखी एक अशी शंका येते कीं, फार झालें तर तुम्ही आजापणजापर्यंत आपल्या पितरांचा समाचार घेतां; पण आजांच्या आजांची आणि पणजांच्या बापांची काय वाट? त्यांनीं थंडाफराळ करून नित्य दिगंबर असावें कीं काय? वास्तविक पहातां विशेष वार्धक्यामुळें त्यांचा समाचार अगोदर घेणें विशेष अगत्याचें असून तुम्ही त्यांचें नांव देखील काढीत नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय? किंवा तुमची अशी समजूत आहे काय कीं, अमुक वर्षें पिशाचयोनींत घालविल्यावर देवयोनींत किंवा मर्त्ययोनींत त्यांचा प्रवेश होतो? जर अशी तुमची समजूत असेल तर ती कशामुळें झाली आहे हें तुम्ही कोणास समजावून देऊं शकाल काय? पिशाचयोनीप्रत पावलेला जीव किती वर्षें त्या स्थितींत रहातो आणि पुढें त्याचें स्थित्यंतर होण्यास काय कारणें होतात, हें तुमच्यापैकीं कोणाची सांगण्याची प्राज्ञा आहे काय? अशा प्रकारचें स्थित्यंतर होत नाहीं असें तुमचें म्हणणें असेल तर ते पिशाचयोनींतच नेहमीं रहातात, असें अनुमान करणें भाग आहे; आणि असें अनुमान करण्याची मोकळीक घाल तर हे कोटयवधि पिशाचरूपी आप्तात्मे रहातात कोठें, आणि आपला चरितार्थ कसा चालवितात, हें सांगण्याची मेहेरबानी कराल काय? जर जुन्या भुतांना किंवा पिशाचांना अथवा मृतपित्रात्म्यांना अन्नपाण्याची, वस्त्रपात्राची, स्त्रीपुत्रांची, आप्तस्नेह्यांची, गडीमाणसांची, व घरागुरांची, गरज नसेल तर जे तुमच्या डोळ्यापुढें मरतात त्यांच्याकरतां तरी असले हास्यास्पद संस्कार तुम्ही कां करतां? हा सगळा मूर्खपणा तुमच्या हातून घडण्यास विचारशक्तीस तुम्ही करून दिलेला काडीमोड कारण होत आहे! आमचें ऐकून तिला फिरून घरांत घ्याल व प्रीतिपूर्वक नांदवूं लागाल तर तुमची वागणूक पूज्य व प्रशंसनीय होऊं लागेल!"

परलोक म्हणजे काय आणि तो आहे कोठें तें कोण जाणें! तथापि अशा प्रकारच्या अज्ञात परलोकीं प्रेताची ऊर्फ मेलेल्याची नीट व्यवस्था लागावी म्हणून येथें आम्ही जे अनेक उपाय करतों त्यांविषयीं आतांपर्यंत थोडीशी चर्चा झाली. परंतु आमची पितृभक्ति येवढ्यानेंच संपत नाहीं. देहाला जे उपभोग आवश्यक आहेत तेच विदेहाला किंवा देहातीतालाही आवश्यक आहेत अशी कल्पना करून ब्राह्मणद्वारानें, अग्निद्वारानें किंवा दुसऱ्या कोण-

त्याही द्वारानें जीं दानें आम्ही देतों तीं तर देतोंच; पण त्यांशिवाय आणखी एका विशेष प्रकारचीं दानें त्यांस देणें अपरिहार्य झालें आहे. हीं दानें कोणतीं म्हणाल तर मागें राहिलेल्या आत्म्यांस निष्कारण सोसावा लागणारा त्रास! या त्रासाचें प्रमाण आप्तपणाच्या सान्निध्यावर बरेंच अवलंबून आहे. हिंदु क्षौराचा आणि अशौचाचा जो कोणी तात्त्विक दृष्टीनें विचार करील त्याला हिंदु लोक मरणें हें एक प्रकारचें महापातक मानीत असावें असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं. समुद्रपर्यटन, अभक्ष्यभक्षण, अपेयपान, अभोग्यभोग वगैरे दोषांस क्षौरादिकांचीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत व ज्याअर्थीं प्रेताच्या मुलाला किंवा बायकोलाही तेंच प्रायश्चित्त घ्यावें लागतें त्याअर्थीं बाप किंवा नवरा मरणें हें मुलाच्या व बायकोच्या हातून घडणारें दंडनीय पातक आहे, असा आमच्या लोकांचा म्हणजे आम्हां सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या अत्यंत मूर्ख ब्राह्मण लोकांचा समज असला पाहिजे हें उघड आहे! विचाराची प्रतिष्ठा, नीतीची बढाई व अकलेची ऐट मिरविणाऱ्या मतिमंद ब्राह्मणांनो, अ गृहस्थाचा ब आप्त वारल्यानें अला कोणत्या कारणानिमित्त तुम्ही सुतकी किंवा अस्पर्श्य ठरवितां हें सांगूं शकाल काय? ब मेला यांत अनें काय केलें? बच्या मरणाबद्दल अला दहा दिवस वाळीत कां टाकतां? व पंचहौदमिशनांत अनें चहा घेतला नसून त्यानें क्षौर केलेंच पाहिजे, असा आग्रह धरून कां बसतां? विटाळ म्हणजे काय, हें तुम्हांला बिलकुल कळत नाहीं, असें वाटतें. जर तें तुम्हांला कळत असतें तर सुतकाहून सोयराचा विटाळ तुम्हीं अधिक दूष्य मानिला असता व ऋतुमती झालेल्या कन्येच्या उभय कुलांतील संबंध्यांस निदान एक महिनाभर तरी निराळें राहणें अवश्य करून ठेविलें असतें! जनन, मरण आणि ऋतुप्राप्ति या देहाच्या मुख्य तीन अवस्थांच्या विचारानें तुमचीं मार्थीं अगदीं बिघडून गेल्यासारखीं दिसतात! मेलेल्या बापाचा मुलाच्या मिशांशीं अर्थार्थीं काय संबंध आहे? डोकीचे, दाढीचे व मिशाचे तुटके तोळा दीड तोळा केंस प्रेताला कोणत्या रीतीनें उपयोगीं पडणार! पिशाचयोनीप्रत पावलेले अशरीरी जीव असले केंस खातात किंवा पांघरतात अशी कल्पना केल्याशिवाय त्यांना ते अर्पण करण्याचा हेतु काय असावा, हें समजणें फार कठिण आहे! कोणी असें म्हणतात कीं क्षौर केल्यानें प्रेताला स्नान दिल्यासारखा होतो. हें जर खरें असेल तर मेल्याबरोबर मनुष्याच्या

मानकल्पना बदलून जातात, असें समजलें पाहिजे. कोणालाही मान देणें म्हणजे आपल्या दर्शनानें त्याला बरें वाटेल अशा रीतीनें त्याच्यापुढें येणें हा मानाचा अर्थ आहे. दाढीमिशा काढून सारें तोंड असोल्या नारळासारखें गुळगुळित केलें आहे; गळयांत दगडाच्या पदकांची फडक्याची माळ घातली आहे; मातीची भोंक पाडलेली घागर डोक्यावर घेतली असून तिच्या भोंकांतून सर्वांगावर पाण्याची धार पडत आहे; ढुंगणास लावलेल्या एका पंचाशिवाय बाकी सारें अंग उघडें बंब केलें आहे; व क्वचित् प्रसंगीं पांचजन्यरव करीत आहे—अशा थाटानें जर कोणी कोणास भेटावयास गेला तर त्याला काय वाटेल? जिवंतपणीं असलें नटणें कोणास आवडत नसतां शेवटचा श्वासोच्छ्वास केल्याबरोबर मनुष्याच्या किंवा त्याच्या पिशाचाच्या सौंदर्यकल्पनांत येवढें अंतर कां पडावें हें समजत नाहीं! आम्हांस तर हे सारे विधि रानटी स्थितींतील दुष्ट आचारांचे अवशिष्ट प्रतिनिधि वाटतात. मेलेल्या इसमाबरोबर कांहीं इसम जाळण्याच्या किंवा पुरण्याच्या प्रघातांत हळू हळू बदल होत जातां जातां केशदान व वेणीदान हें त्याचें शेवटलें क्षीण रूप राहिलें आहे, यांत संशय नाहीं. प्रथम जनावरें व इतर माणसें मारण्याची चाल बंद पडली असेल; मग जवळचें आप्तही मरण्यास नाखूष दिसूं लागले असतील; पुढें हातपाय, कान-नाक, हातापायाचीं बोटें किंवा दुसरा एखादा अवयव देऊन मृताची समजूत करण्याची तोड निघाली असेल; अखेरीस असें करणेंही कष्टावह व निरर्थक आहे असें अनुभवास आल्यावरून एकदां काढले तरी महिन्याभरानें फिरून येणारे, कांहीं दिवस नसल्यानें मोठीशी गैरसोय न होणारे, विशेष कुरूपता उत्पन्न न करणारे, काढतांना म्हणण्यासारखा त्रास न पडणारे—असे केंस पूज्य व आवडत्या पितरांस द्यावे आणि तेवढ्यानें त्यांचें होईल तेवढें समाधान करावें—हाच मार्ग प्रशस्त व सुखावह आहे असें दिसून आलें असेल! आणखी थोडेसें पुढें जाण्यास जागा आहे, व कांहीं वर्षांनीं तसें घडून येईल असें या मागल्या इतिहासावरून मानण्यास बराच आधार वाटतो.

पण हें सारें पुरुषाच्या संबंधाचें झालें. बायकांची काय वाट? ज्याप्रमाणें पुरुषांच्या त्याप्रमाणें बायकांच्या पाठीमागेंही ही वपनपीडा लावली असून स्त्रियांचे वपनक्लेश पुरुषांच्या वपनक्लेशापेक्षां सहस्रपटीनें जास्त असह्य करून ठेवण्यांत आले आहेत. युरोपिअन लोकांपेक्षां आमच्या लोकांतील नवरा-

बायकोचें प्रेम विशेष दृढ असतें असा कित्येक अर्वाच्य देशाभिमानी प्रलाप करीत असतात; आणि त्याचें प्रमाण काय तर बायको मेल्यावर नवरा क्षौर करून घेऊन आमरण अविवाहित रहातो हें नव्हे, तर नवरा मेल्यावर त्याच्या बायकोला आम्ही हव्या त्या वयांत जुलमानें सोंवळी करून मरेतों-पर्यंत तिच्याकडून संन्यासवृत्तीचें आचरण करवितों! हे दयार्द्र ब्राह्मणांनो, खासें तुमचें प्रेम! खाशी तुमची दया!! आणि खासा तुमचा न्याय!!! निर्घृण मंदधींनो, ज्याला तुम्ही प्रेम म्हणतां तें प्रेम नव्हे, तर तुमच्या हाडा-मासांस खिळून गेलेला स्त्रीजातीविषयीं तो तुमचा प्रचंड मत्सर होय! ज्या प्रेमाच्या तुम्ही येवढया वल्गना करतां तें प्रेम तुमच्या अंतःकरणांत खरो-खरीच वसत असतें तर एका बायकोकरतां स्मशानांतून पिंड देऊन आला नाहीं तों दुसरीचा हात धरून बोहल्यावर चढतां काय! आणि अशी गोष्ट निर्लज्जपणानें पाहिजे त्या वयांत करण्यास राजी होतां काय! सर्वांगावर मृत्यूची दाट छाया पडली आहे असें स्पष्ट दिसत असून ज्या कन्येनें नात-वंडाप्रमाणें मांडीवर लोळावें अशीशीं बहुधा अस्तास गेलेल्या कामवासनेची तृप्ति करण्यासाठीं लग्न लावण्यास प्रवृत्त होऊन तिला न्हाव्याच्या तावडींत देण्याची आणि तिचे सर्व प्रकारचे आशांकुर खुडून टाकण्याची खात्रीची तयारी करून ठेवतां, हें तुमच्या स्त्रीप्रेमाचें स्तुत्य निदर्शनच असेल! जे लोक नीतीच्या, धर्माच्या, सोईच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही मिषानें पति-मरणोत्तर स्त्रियांवर वपनासारखा जुलूम करतात त्यांनीं स्त्रीप्रेमाच्या केवढया-ही वल्गना केल्या तरी ते लोक स्त्रियांविषयीं अत्यंत निष्ठुर व मत्सरी आहेत असें मानिलें पाहिजे. जिवंतपणीं बायकोचें दुसऱ्याशीं बोलणें किंवा दुसऱ्या-कडे पहाणें हें देखील ज्याला फारसें खपत नाहीं, त्याला आपल्या पाठीमागें आपल्या बायकोस आणि न्हाव्यास कोणी तरी एका खोलींत कोंडून घालून ती गाईप्रमाणें हंबरडा फोडीत असतां व आपणाकडून होईल तेवढा प्रतिकार करीत असतां तिच्या अंगास स्पर्श करून तिचे केस वस्तऱ्यानें उतरूं द्यावे यांत कांहींच वाटूं नये, हें खऱ्या स्त्रीप्रेमाचें चिन्ह नव्हे. आपल्या पाठीमागें आपल्या बायकोची अशी दशा होणार आहे, अशी कल्पना मनांत आल्या-बरोबर ज्याचें चित्त खवळून जात असेल, डोक्यापासून पायांपर्यंत ज्याच्या अंगास ताप आल्यासारखा होत असेल व असले राक्षसी प्रघात मोडून टाकण्यासाठीं

आपणाकडून होण्यासारखें असेल तें केलेंच पाहिजे, अशी वृत्ति ज्याच्या अंतःकरणांत निदान त्या वेळेपुरती तरी उत्पन्न होत असेल, त्याच्या अंतःकरणांत स्त्रीजातीबद्दल खऱ्या प्रीतीचें कांहीं बीज आहे, असें म्हटलें तर क्षणभर चालेल, पण दोन अथवा अधिक बायकांस एका शय्येवर घेऊन बसणाऱ्या, तोंडाचें बोळकें झालें तरी नऊ वर्षांच्या पोरीशीं लग्न लावणाऱ्या, पाहिजे त्या वयाच्या मुलीचें, सुनेचें किंवा भावजईचें वपन करणाऱ्या लोकांच्या अंतःकरणांत खरें स्त्रीप्रेम असूं शकेल असें मानणें, म्हणजे पृथ्वीच्या दक्षिण किंवा उत्तरध्रुवांजवळच्या हिममय प्रदेशांत विषुववृत्तांत अनुभवास येणारी सूर्यरश्मींची उष्णता मिळूं शकेल असेंच मानण्यासारखें होय! कांहीं लोक असें म्हणतात कीं, आम्ही शहाणेसुर्ते ब्राह्मण, स्त्रियांची जी अशी अकरुण विडंबना करतों, ती त्यांच्या व आमच्या नीतीच्या रक्षणासाठीं! स्त्रीपुरुषांच्या नीतींचा बचाव होण्यास विधवांचें नित्य क्षौर अपरिहार्य असेल तर ज्या लोकांत हा जुलूम रूढ नाहीं त्यांच्या साऱ्या विधवा जारिणी असून, त्यांच्या संसर्गदोषामुळें बायका असलेले बहुतेक लोकही स्वस्त्रीपराङ्मुख होऊन जार बनत असतील असें मानावयाचें कीं काय! अशीच कल्पना करणें वाजवी असेल तर नीतीचा प्रकाश काय तो विधवांचें मुंडण करविणाऱ्या आम्हां ब्राह्मण लोकांत झळकत आहे, आणि इतर लोकांत निबिड अनीतितम पसरलें आहे, असें मानणें जरूर नाहीं काय? गतभर्तृकांचे केंस काढून त्यांना कुरूप करण्यांत जर नीतीचें संरक्षण व संवर्धन होत असेल, तर ज्या मानानें ही कुरूपता अधिक होईल त्या मानानें नीतीचा अधिकाधिक फैलाव झाला पाहिजे, व तो करणें हें प्रत्येक नीतिप्रसारेच्छूनें आपलें कर्तव्य मानिलें पाहिजे. गतभर्तृकांची कृत्रिम कुरूपता राष्ट्राच्या नीत्युन्नतीस अवश्य आहे असें ज्यांचें मत असेल, ते त्यांचें वपनच करून का थांबतात कोण जाणे! शरीरांत कुरूपता आणिल्यानें वयपरत्वें कमीअधिक जोरानें पेट घेणाऱ्या विकाराग्नीचा उपशम करणें जर शक्य असेल तर गतभर्तृकांचे पाय तोडावे, म्हणजे त्या परक्याकडे जाणार नाहींत; डोळे काढावे म्हणजे त्या परपुरुषाकडे पाहूं शकणार नाहींत; हात तोडावे म्हणजे कोणतेंही दुष्कृत्य त्यांस करतां येणार नाहीं; त्यांच्या जिभा उतराव्या म्हणजे विषयवासनांविषयीं त्यांस उद्गार काढतां येणार नाहींत; त्यांचीं नाकें कापावीं म्हणजे त्यांच्या

हिडिस तोंडाकडे कोणी पहाणार नाहीं; त्यांना कांहीं खाऊं न घालतां कोंडून घालाव्या म्हणजे त्यांचे कामविकार प्रबल होणार नाहींत व त्यांना कोणाशीं संबंध ठेवतां येणार नाहीं; किंबहुना त्यांना अफूच्या लहानशा गोळ्या किंवा सोमलाच्या पुड्या देण्याचा प्रचार पाडला अथवा पूर्वीच्या सतीच्या चालीचा जीर्णोद्धार केला तर त्यांच्या हातून अनीति घडण्याचा मुळींच संभव रहाणार नाहीं, हें उघड आहे!!! जर हें करणें अमानुष असेल तर नवऱ्याचा जीव गेला नाहीं तों, आईबापांनीं सर्व अपत्यवात्सल्य एकीकडे गुंडाळून ठेऊन स्वप्राणाहून प्रिय मानलेल्या तरुण मुलींचीं डोकीं न्हाव्याच्या स्वाधीन करण्यास तयार होणें हें त्यांच्या मनुष्यपणास शोभतें, असें कसें म्हणतां येईल! शिवाय, स्त्रीच्या अनीतीपासून उत्पन्न होणारे अवान्तर दुष्परिणाम कितीही वाईट असले तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, स्त्रीच्या अनीतीबरोबर पुरुषासही अनीतीमान् व्हावें लागतें. पुरुष आपली नीति भ्रष्ट होऊं देणार नाहींत, तर स्त्रियांच्या हातून अनीति घडणें अशक्य होणार आहे. जातिविशिष्ट अनीतींत स्त्री व पुरुष या उभयतांकडून सारखा दोष घडत असून, आमच्या नीतिकर्त्यांनीं स्त्रियांचें वर्तनच इतकें दंड्य व दूष्य कां मानिलें आहे, हें समजत नाहीं. आम्हांस तर असें वाटतें कीं, पुरुषांचा स्वार्थ, पुरुषांचा मत्सर, व पुरुषांचें अधिक बल हें या पक्षपाताचें, या विषमतेचें, या गर्हणीय अन्यायाचें कारण होय. या निर्दय मात्सर्यामुळें वन्यपशूहून आम्ही अधिक क्रूर झालों आहों, आणि जोंपर्यंत हा क्रौर्य कलंक नाहींसा करण्याचा आम्ही प्रयत्न करणार नाहीं, तोंपर्यंत इतर सुधारलेलीं राष्ट्रें आमची फजीती उडविण्यास आणि आमच्या तोंडावर थुंकण्यास कधींही मागेंपुढें पहाणार नाहींत. आठदहा वर्षांच्या पोरीस साठसत्तर वर्षांच्या थेरड्याच्या कबजांत देणाऱ्या किंवा जिला बारावें वर्ष देखील लागलेलें नाहीं अशा मुलीच्या विपत्तीचा विचार न करितां तिच्याशीं संभोग करण्याचा हक्क नवऱ्यास आहे असें प्रपादणाऱ्या, अथवा नवऱ्याच्या प्रेताबरोबर त्याच्या बायकोचे केस जाळले तरच त्यास सद्गति मिळते, अशी बडबड करणाऱ्या अमानुष लोकांनीं इंग्लिश लोकांसारख्या स्वातंत्र्याभिलाषी, दयावान् व न्यायी लोकांपुढें आम्हांस राजकीय हक्क द्या म्हणून तोंडें वेंगाडणें आणि प्रत्येक वर्षीं लाखों रुपये खर्च करून राष्ट्रीय सभेचा गोंधळ घालणें हें अत्यंत विसंगत

व अस्वाभाविक आहे. बाहेरची गुलामगिरी नको असेल तर अगोदर घरची गुलामगिरी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गृहसुधारणेस प्रतिकूल असणाऱ्या लोकांनीं कांहीं काळपर्यंत केवढीही हुल्लड करून दिली तरी अखेरीस ते मागें पडल्याशिवाय रहात नाहींत; हें इजिप्शिअन, पर्शियन, मुसल्मान, वगैरे लोकांच्या इतिहासापासून समजण्यासारखें आहे. ज्या देशांतील गृहें पारतंत्र्याच्या आणि जुलमाच्या शाळा आहेत, त्या देशांत महापुरुषांची परंपरा निर्माण कशी व्हावी, आणि ज्ञान, कला, संपत्ति व स्वातंत्र्य वगैरे इष्ट वस्तूंची त्यांस प्राप्ति होऊन त्यांचा उपभोग त्यांना चिर काल कसा मिळावा, हें आम्हास समजत नाहीं. ब्राह्मणी विधवा ही हिंदु लोकांच्या निष्करुणेची, मात्सर्याची, अविचाराची, विपरीत व रानटी धर्म-श्रद्धेची, आणि त्यांच्या हाडास खिळलेल्या त्यांच्या अन्यायीपणाची खूण आहे. ही नाहींशी करण्याचें धैर्य आमचे अंगीं आल्याशिवाय आमच्या हातून म्हणण्यासारखें कांहींएक होणार नाहीं. पण ही नाहींशी करण्यास आम्ही आपल्या प्रेतसंस्कारांच्या एका भागाला गचाळ समजून अजीबात फांटा देण्यास तयार झालें पाहिजे. इतकी मर्दुमकी आमचे ठाईं उरली आहे, असें वाटत नाहीं.

आतांपर्यंत प्रेतसंस्कारांविषयीं जें अवश्य दिसलें तें लिहिलें. तथापि त्यांचा निरोप घेण्यापूर्वी त्यांशीं संलग्न असलेल्या चारपांच किरकोळ गोष्टींचा येथें उलेख करणें जरूर आहे असें वाटल्यावरून आणखी दोन अडीच कालमांचा बळी त्यांस देत आहों. येवढ्यानें त्यांचें समाधान होऊन आमच्या पाठी-मागचा त्यांचा त्रास चुकणार आहे असें नाहीं. या संस्कारपिशाचांनीं कमींत कमी तीन हजार वर्षें तरी आमचे झाड धरिलें आहे; तेव्हां अशा जुन्या वतनदारांना हुसकून लावण्याचें काम कांहीं सोपें नाहीं! सुधारकाहून शेकडोपटीनें बलवत्तर असे अनेक पंचाक्षरी अस्तित्वांत येऊन ते आपल्या मंत्रांनीं, तंत्रांनीं व प्रतोदांनीं शेंपन्नास वर्षें त्यांना बेदम करीत रहातील तेव्हां कदाचित् त्यांची वरची पीडा नाहींशी होईल! आम्हीं या सत्कृत्याचा आज केवळ उपक्रम केला आहे; तें तडीला नेणें पुढल्या पिढ्यांच्या परिश्रमावर अवलंबून आहे. तथापि या कामाचा साधेल तसला नकाशा कोणीं केव्हांही काढला तरी त्यापासून झाला तर थोडाबहुत फायदाच होणार आहे.

आमच्या लोकांत प्रेतें जाळण्याची जी चाल पडली आहे ती अत्यंत प्रशस्त आहे, हे मागें म्हटलेंच आहे. तथापि प्रेतें स्मशानांत नेण्याच्या व ती जाळण्याच्या कामांत सुधारणा करण्यास पुष्कळ जागा आहे. आसन्नमरण झालेल्या मनुष्याचें प्राणोत्क्रमण झाल्याबरोबर त्यासभोंवतीं बसलेले निकट आप्त दुःखानें व शोकानें अत्यंत विव्हल होतात, व दुःखाचा पहिला उमाळा येऊन जाईतोंपर्यंत पुढल्या तयारीस लागण्यास ते असमर्थ असतात. तो येऊन गेल्यावर त्यांत जो सर्वांत वडील पुरुष असतो तो आपला शोक आवरून अन्य आप्तमित्रांस बोलावणीं पाठवितो, आणि ते आल्यावर त्यांच्या साहाय्यानें पुढील कार्यभाग उरकतो. प्रेताची वाट लावण्याची आमच्यांतील ही सामान्य पद्धति झाली. पण कित्येक प्रसंगीं गरीब लोकांना मनुष्यबल अनुकूल नसल्यामुळें फारच त्रास पडतो. जिकडेतिकडे काळोखमिट्ट झालें आहे; थंडीचा कडाका पडला आहे अथवा पावसाची संतत धार लागली आहे; कोणास बोलावणें पाठविण्यास जवळ मनुष्य नाहीं, व हाक मारली असतां कोणी येईल अशी आशा नाहीं; दहनाची जागाही थोडया अंतरावर नाहीं व दहनापुरता जवळ पैसा नाहीं—अशा स्थितींत ज्याचा संबंधी मरतो तो केवढ्या संकटांत पडतो बरें! कुणबीवाणी वगैरे जातींत अशा संकटाचे वेळीं जी साहाय्यतत्परता दिसून येते, ती आम्ही शहाण्या व श्रेष्ठ म्हणविणाऱ्या ब्राह्मणांनीं खरोखरीच अनुकरण करण्यासारखी आहे. परोपकारबुद्धीनें प्रेताला खांदा देण्यास तयार होणें तर एकीकडेच राहूं द्या, मुंबईतले चाळवाले आणि पुण्यांतील बिऱ्हाडकरू आसपास कोणी मनुष्य मेला आहे किंवा तासअर्ध तासांत मरणार आहे, अशी बातमी लागतांच आपआपलीं दारें लाऊन घेऊन घाईनें जेवावयाला बसतील किंवा डोकीवर पगड्या टेऊन घरांतून बाहेर पडतील! असला निष्ठुरपणा फक्त आह्मा नागरिक ब्राह्मणांतच दृष्टीस पडतो. हें निर्दय व नीच औदासीन्य कदाचित् आमच्या वरिष्ठ सुधारणेचें फळ असेल; पण तें कोणत्याही प्रकारें कल्याणकारक किंवा प्रशंसनीय नाहीं, हें प्रत्येक समंजस मनुष्यास कबूल केलें पाहिजे. यासंबंधानें ब्राह्मण लोक आपण होऊन अधिक मनुष्यपणा दाखवूं लागतील तर बरेंच आहे; नाहीं तर साऱ्या जातीनें किंवा सरकारानें आमच्या अंगचा हा दुर्गुण घालविण्यासाठीं काहीं तरी कडक उपाय योजणें गैरशिस्त होणार नाहीं, असें

आम्हांस वाटतें. जुन्या ग्रीक व रोमन लोकांत यासंबंधानें फार सक्तीचे नियम असत, व येथेंही कांहीं जातींत तसेंच आहेत असें दिसतें. मुंबईतील कॉरोनरच्या पंचनाम्याकरितां ज्याप्रमाणें हवा त्याला पकडून आणितात, पोलिसानें छाप दिला कीं पुढें पाऊल टाकण्याची कोणाचीही प्राज्ञा होत नाहीं, त्याप्रमाणें प्रेताला मदत करण्यासाठीं कोणाकडूनही बोलणें आलें तरी त्याला नाहीं म्हणण्याची कोणाचीही छाती होऊं नये. अशा प्रकारचा निर्बंध जातीनें किंवा सरकारानें केल्यास कोणी विशेष हरकत घेईल असें वाटत नाहीं. कोणी कोणाला निष्कारण त्रास देऊं नये, हा सामान्यपणें चांगला नियम आहे, व त्याच्या अनुरोधानें बहुतेक सामाजिक व्यवहार चालतो. पण ज्याप्रमाणें इतर नियमांलाही कांहीं अपवाद असतात, त्याप्रमाणें यालाही हा संकटाचा प्रसंग अपवाद करणें प्रशस्त होणार आहे. जेव्हां एखाद्या भयंकर रोगाची सांथ येते, तेव्हां असल्या अपवादाची विशेष आवश्यकता दिसते. अशी सक्ती करणें नीट नसेल, तर गांवोंगांवीं आणि शहरोंशहरीं लोकांच्या किंवा सरकारच्या खर्चानें अनाथ प्रेतांचें दहन करण्याची कांहीं व्यवस्था झाली पाहिजे. लहानसहान गांवीं पाटीलकुळकर्ण्यांवर यासंबंधानें बरीच जबाबदारी टाकण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. मोठ्या शहरांत हें काम मामलतदारावर व पोलिस अधिकाऱ्यांवर सोंपवावें. होतां होईल तों जो तो आपली व्यवस्था आपण करतो व करीलच. पण जर क्वचित् प्रसंगीं एखाद्याला ती करतां येत नसली, तर वर सांगितलेल्या अधिकाऱ्यांपैकीं कोणा एकानें तरी अडचणींत असलेल्या मनुष्याकडून निरोप आल्याबरोबर, दहनापुरती लागेल तेवढी मदत त्यास विलंब न लावतां कोठेंही करून दिली पाहिजे; प्रसंगविशेषीं खुद्द त्यानें खांदा देण्यास तयार असलें पाहिजे.

स्मशानांत प्रेतें नेण्याच्या पद्धतींतही सुधारणा करण्यास पुष्कळ अवकाश आहे. कामाठी, जंगम, गोसावी वगैरे लोकांत प्रेतांचें स्वरूप होईल तितकें कमी भयंकर करण्याच्या व प्रेतांच्या आप्तांच्या दुःखास होईल तितका विसर पडण्याच्या इराद्यानें प्रेत नेण्याच्या योजना केल्या आहेत असें वाटतें. केळींचें मखर बांधणें, सिंहासन किंवा देव्हारा करणें, माळा घालणें, फुलें पसरणें, धूपदीप जाळणें व वाद्यें वाजविणें वगैरे गोष्टी केवळ आवश्यक आहेत असें नाहीं. तथापि कळकाच्या दोन तुकड्यांवर कडब्याची

पेंढी दांडपेंढी पसरून तीवर प्रेत ठेवणें आणि मग त्याचे हात, पाय, डोकें वगैरे अवयव सुतळीनें कचकून आवळून बांधून मानेपर्यंत एक कोरें फडकें पसरणें आणि तोंड उघडें ठेवून बोलो भाई रामाचा कर्णकटु आणि भयप्रद प्रचंड रव करीत तें स्मशानांत नेणें हेंही बरें नाहीं. प्रेताला अशा रीतीनें करकचून बांधण्याचा किंवा दोऱ्या कांचून तें खालीं पडण्याचा प्रसंग टाळतां येईल तर बरें होणार नाहीं काय? तसेंच, प्रत्येक प्रेताला नवीन तिरडी तरी करण्याची काय गरज आहे? ज्याप्रमाणें भिक्षावळीला किंवा वरातीला पुणें-मुंबईसारख्या शहरांत भाड्यानें पालख्या मिळतात त्याप्रमाणें प्रेतें नेण्यासाठीं विशेष रीतीनें तयार केलेल्या पालख्या आणि त्या वाहणारे प्रत्येक जातीचे भोई मिळूं लागले तर केवढी सोय होणार आहे? किंबहुना बैलाच्या लहानशा गाड्यांतून प्रेतें नेण्यास काय हरकत आहे? स्मशानांतील क्रिया चालविणाऱ्या कारल्यांनीं किंवा द्रव्य संपादण्यासाठीं येथें आलेल्या तेलंग्या ब्राह्मणांनीं अशा जिनसांचा संग्रह केला तर त्यांचा पुष्कळ फायदा होणार आहे; तसेंच, या लोकांनींच गोंवऱ्या, लांकडें, पेंड, कडबा, रॉकेल, कणीक, तीळ, गुलाल वगैरे वस्तु विक्रीस ठेवल्या तर नामी होणार नाहीं काय? सारांश, अमुक वयाच्या प्रेताच्या दहनाला अमुक रुपये दिले म्हणजे प्रेताच्या आप्तास कोणतीही दगदग पडेनाशी होईल तर श्रमविभागाच्या तत्त्वापासून आम्हांस अननुभूतपूर्व असें सुख होऊं लागणार आहे! ज्या ठिकाणीं प्रेत नेणारीं माणसें मिळत नाहींत, व प्रेतें जाळण्याची जागा फार दूर असते, त्या ठिकाणीं किती त्रास पडतो, याचा अनुभव साताऱ्च्या लोकांना पाहिजे तर विचारावा! आपल्या देशात प्रेतें गाडींत घालून नेण्याची चाल कधीं काळीं पडणार असेल तर ती प्रथम साताऱ्यास पडेल, यांत संशय नाहीं! गांवच्या बाहेर नदीच्या किंवा ओढ्याच्या कांठीं प्रेतें जाळण्याचा जो परिपाठ आहे तो फार चांगला आहे. पण नदीचा कांठ धुंडाळीत जावयाचें तरी किती? कोठें सातारा आणि कोठें माहुली? पण साताराचीं प्रेतें माहुलीस नेल्याशिवाय गत्यंतर नाहीं! बरें एक प्रेत नेऊन तरी कोठें आटपतें? दुसरें किंवा तिसरे दिवशीं राख गोळा करावयास गेलें पाहिजे, व दिवसही तेथेंच केले पाहिजेत!

राख गोळा करण्याचें काम म्युनिसिपालिट्यांकडे कां देऊं नये, हें आम्हांस

समजत नाहीं! नानाप्रकारच्या रोगी मनुष्यांच्या राखा व हाडें नदींत किंवा ओढ्यांत टाकून त्यांचें पाणी घाण करण्यापेक्षां म्युनिसिपालिटयांनीं असल्या राखा भरून नेण्याचा मक्ता एखाद्या केर वाहणाऱ्या कंत्राटदारास दिला तर गांवचें पाणी स्वच्छ राहून, म्युनिसिपालिट्यांसही थोडेंबहुत उत्पन्न होईल! यावर कदाचित् कोणी असा आक्षेप घेतील कीं, नदींत टाकलेल्या अस्थि परंपरेनें समुद्रास जाऊन मिळतात, व त्याच्या पुण्योदकानें त्या पावन होतात! यावर आमचें असें उत्तर आहे कीं, एक तर त्या अस्थि समुद्रास जाऊन पोहोंचतात याला अनुमानाशिवाय दुसरें कांहीं सबळ प्रमाण नाहीं; पोहोंचल्याच तर कदाचित् त्यांचा एखादा तुकडा किंवा कण पोहोंचत असेल. पण अशा प्रकारच्या अनिश्चित साधनावर अवलंबून राहण्यापेक्षां त्या खात्रीनें समुद्रांत किंवा गंगेत जाऊन पडतील अशी तजवीज करणें कांहीं कठिण नाहीं. मुंबईच्या कारटयांनीं व काशीच्या आणि प्रयागाच्या गयावळांनीं त्या समुद्राच्या किंवा गंगेच्या पाण्यांत टाकून देणाऱ्या एजन्स्या स्थापिल्या, व त्या टाकल्याबद्दल पावती पाठविण्याचा पत्कर घेतला तर थोड्या खर्चांत केवढी कामगिरी होणार आहे! म्युनिसिपालिटयांच्या नोकरांकडून पाहिजे तीं हाडें आणवून ठेवावीं, आणि सवडीप्रमाणें हरणाच्या कातड्याच्या किंवा रेशमाच्या लहानशा पिशवींत तीं घालून टपालानें मुंबईस, प्रयागास किंवा काशीस रजिस्टर करून पाठवावीं, म्हणजे दगदग न पडतां व पैसा खर्च न होतां, प्रेताचीं हाडें क्षेत्रांत पडून त्याला सद्गति प्राप्त होईल, व त्याला ती प्राप्त करून देणाऱ्या इसमाच्या पदरीं पुण्याची जोड होईल!

दुखवटयाच्या भेटी व लेख यांविषयीं येथें विशेष लिहिण्याची गरज नाहीं. निरनिराळ्या देशाचाराप्रमाणें अशा प्रसंगीं एकमेकांनीं एकमेकांस भेटावयास जाऊन दोन उपदेशपर गोष्टी सांगणें व हातून कांहीं मदत होण्यासारखी असल्यास ती करणें, हें सुधारलेल्या मनुष्यस्वभावास उचितच आहे. तथापि आमच्या देशांत या सभ्यपणाच्या रीतीपासून व्हावा तितका फायदा होत नाहीं. नवऱ्याच्या मरणासारखें स्त्रीवर दुसरें संकट नाहीं. तथापि अशा संकटाच्या वेळीं तिच्या नवऱ्याच्या अगदीं जिवलग मित्रासही तिच्या उपयोगीं पडतां येत नाहीं. नवरा जिवंत आहे तोंपर्यंत ज्यांच्याशीं बोलण्याचालण्यास व कांहीं काम सांगावयास देखील तिला संकोच वाटत असतो, त्या मित्रांना

नवरा मेल्याबरोबर तोंड दाखविणें सुद्धां ज्या तिला दुरापास्त होतें, तर त्यांच्यांशीं मन मोकळें करून बोलण्याचें धैर्य तिला कोठून होणार! काय करील बिचारी! केशकलाप दूर केलेलें मस्तक, कुंकू पुसलेलें कपाळ, कांकणें वाढविलेले हात, मंगळसूत्र तोडलेला गळा–अशा रीतीनें सर्व अवयवांस विकलता आणून एका तांबड्या वस्त्रानें झांकलेला व अत्यंत अशुभ मानलेला देह परपुरुषापुढें घेऊन येण्यास त्या अनाथ अबलेचें धैर्य कोठून होणार! **भारतीय आर्यांनो,** कुटुंबवात्सल्याविषयीं तुमची सर्वत्र प्रसिद्धि असून, अनाथ स्त्रीसंबंधानेंच तुम्ही इतके निष्करुण कां होतां बरें! स्त्री जात्याच अबला असल्यामुळें व ती तुमच्या आदरास नित्य पात्र असतां, दुःसह दुःखाच्या ऐन भरांत तुम्ही तिचा असा दुर्वह छल कां करतां! तुम्ही जें करतां तेंच सर्वथैव वंद्य व कल्याणकारक आहे असा हट्ट धरून बसूं नका. आपल्या सभोंवतालची वस्तुस्थिति प्रतिदिवशीं कशी बदलत चालली आहे तें डोळे उघडून पहा आणि खऱ्या तत्त्वविचारास, खऱ्या नीतीस व खऱ्या धर्मास मान्य अशा आचाराचा अंगीकार करा. श्राद्धानें, क्षौरानें व वपनानें मृताला सद्गति प्राप्त होते आणि परमात्मा समाधान पावतो, असल्या अज्ञानमय धर्मकल्पनांचा अव्हेर करा आणि स्वातंत्र्य, समता, करुणा वगैरे सर्वमान्य सद्गुणांचें संरक्षण व संवर्धन होऊन सर्वांची संसारयात्रा सुखावह होईल अशा धर्माचें अवलंबन करा. अशा रीतीनें लौकर वागूं लागलां तरच तराल; नाहीं तर ठार बुडाल!

---

## सुधारणा आणि कलह. : : २३

दुसरीकडे एका सोलापूरकर "अपरिचित मित्राचें" पत्र छापलें आहे. त्या पत्रावरून असें दिसेल कीं, अलीकडे समाजांत चाललेली चळवळ पाहून, विशेषतः सामाजिक अनेक प्रश्नांविषयीं जो चोहोंकडे खडाजंगी वादविवाद चालला आहे तो डोळ्यांपुढें येऊन, या आमच्या "अपरिचित मित्राचें" डोकें गुंचकळ्यांत पडल्यासारखें झालें आहे! आणि तें ठीकच आहे. आपणांस अमुक दिशेनें अमुक ठिकाणीं जावयाचें आहे, असा संकेत करून ठेवल्याशिवाय, जे कोणी अफाट दर्यांत आपला पडाव घालतात, त्यांची अशीच अवस्था होते!

वाऱ्याच्या प्रत्येक झुळकेनें त्यांच्या नौकेस हेलकावे बसतात इतकेंच नाहीं, तर तिच्या जोरानें ते भलत्याच दिशेस लागतात! आणि दुर्दैवानें एकादे प्रसंगीं सोसाट्याचा वारा लागला तर त्याची शिडें, वल्हीं व सुकाणूं हीं मोडून, एखाद्या अनपेक्षित खडकावर तें वहात जाऊन आदळतें, आणि त्यांतील उतारूंवर जलसमाधि घेण्याचा प्रसंग येऊन गुदरतो! तेव्हां ज्यांना निर्भयपणें दूरचें जलपर्यटण करावयाचें असेल, त्यांनीं त्या प्रवासास निघण्यापूर्वी सर्व प्रकारची नीटनेटकी तयारी केली पाहिजे. अगोदर ज्या बंदरास जावयाचें असेल तें आहे कोठें व किती लांब आहे; वाटेनें वरवा करण्याची किंवा वादळांत सांपडल्यास आश्रय घेण्यासारखीं कोणकोणतीं ठिकाणें आहेत; ज्या जहाजांत प्रवास करावयाचा तें मजबूत आहे किंवा नाहीं; ज्या खलाशांच्या आणि तांडेलांच्या स्वाधीन आपले प्राण करावयाचे ते आपल्या कामांत पक्के वाकब्गार आहेत किंवा नाहींत, आणि त्यांचेपाशीं होका वगैरे समुद्रतरणास अवश्य लागणाऱ्या साधनांची हवी तशी सामुग्री आहे किंवा नाहीं-इत्यादि गोष्टींची नीट चौकशी करून, मग जलधिगमनास जे प्रवृत्त होतील ते सहसा कोणत्याही प्रकारच्या धोक्यांत पडणार नाहींत; व पडले तरी त्यांतून सहज निभावतील! पण सामान्य लोक बहुधा इतकी काळजी घेत नाहींत, व त्यानीं ती घेणें शक्यही नाहीं. जगाच्या सध्याच्या स्थितींत त्यांतील नऊदशांश लोकांस शुद्ध अंधाप्रमाणें कसें तरी चांचपडत त्यांतून निघून जावें लागतें असें म्हणण्यास हरकत नाहीं! बहुतेकांची अशी दशा आहे, म्हणून आम्ही त्यांचा उपहास करतों, असें कोणीं समजूं नये. निरुपायास्तव त्यांना तसें करावें लागतें, हें आम्हांस पक्कें ठाऊक आहे. मनुष्य वयांत येण्यापूर्वी व बऱ्याच विषयांचें बरेंच ज्ञान संपादण्यापूर्वी संसारांत पडेल, आणि रात्रंदिवस त्यांत चूर होऊन राहील तर जग चाललें आहे कोणीकडे व त्यानें जावें कोणीकडे, हें त्याला नीटपणें समजण्याचा संभव नाहीं. ज्याप्रमाणें समोर येऊन भिडलेल्या शत्रूंशीं लढण्यांत निमग्न झालेल्या शिपायांस आपण आहों कोठें व चाललों आहों कोणीकडे, याचें भान रहात नाहीं, त्याप्रमाणें संसारसमरांत मेटाकुटीनें झगडणाऱ्या सामान्य सांसारिकास समाजाची खरी स्थिति आहे कशी आणि ती असावी कशी, हें समजत नाहीं. ज्याप्रमाणें समुद्रपृष्ठावर सुयंत्र नौका चालविणें हें सुकर्णधाराचें काम आहे किंवा लढाईंत गुंतलेल्या शिपायांस योग्य हुकूम

सोडणें हें थोड्या अंतरावरून रणदिनचर्येचें शांत दृष्टीनें अवलोकन करणाऱ्या सेनापतीचें काम आहे, त्याप्रमाणें समाजाची स्थिति कशी आहे व समाजास कोणतें वळण लागावें, याची चर्चा करून निश्चय करणें हेंही एका प्रकारच्या विशेष व्यक्तींचें काम आहे. जन्मास आल्यासारखें होईल तेवढें स्वहित साधण्यांत व अहोरात्र प्रपंचांत गढून असण्यांतच ज्यांना जीवितसार्थकता वाटत नाहीं; सुदैवानें ज्यांना दोन अक्षरें प्राप्त झालीं आहेत, विचार करण्याची ज्यांस हौस आहे व उद्योग करून ज्ञान संपादण्याचा ज्यांना छंद लागला आहे; प्राणिमात्राची, विशेषतः मनुष्याची आणि त्यांतल्या त्यात स्वदेशबांधवांची विपत्ति कमी व्हावी, अशी ज्यांना स्वाभाविक इच्छा असून, तदनुसार थोडेंबहुत तरी वर्तन करण्याची सोय आहे-अशांनीं सामाजिक विषयांच्या वाटाघाटींत पडणें विशेष श्रेयस्कर होणार आहे, असें आम्हांस वाटतें. पण बहुतेकांचा असा समज नसतो. वैद्यक, चित्रकला, गायन, सुतारकाम, वक्तृत्व, शिवणकाम किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही उद्योगास लागणारें चातुर्य अंगीं नसल्यास तें नाहीं. असें उघडपणें कबूल करण्यास किंवा तशा प्रकारचें एखादें काम कर, असें कोणी सांगितल्यास त्याची मला माहिती नाहीं, आणि म्हणूनच तें मला करतां येणार नाहीं, असें म्हणण्यास कोणालाही बहुधा लाज वाटत नाहीं. पण राजकीय,किंवा धार्मिक विषयांविषयीं अशा प्रकारचें अज्ञान कबूल करण्यांत बहुतेकांस मोठी शरम वाटते! दहा वर्षांच्या पोरापासून अक्षरशत्रु व विचारानभिज्ञ साठ वर्षांच्या म्हाताऱ्यापर्यंत किंवा म्हातारीपर्यंत वर सांगितलेल्या विषयांत, विशेषतः सामाजिक व धार्मिक विषयांत आपण पटाईत नाहीं, व दुसऱ्यास पढविण्याचा व नियम घालून देण्याचा आपणांस अधिकार नाहीं, असें वाटणारे शेंकडा पांच इसम निघतील किंवा नाहीं, याची बरीच शंका आहे! तथापि कांहीं अंशीं ज्याला त्याला असें वाटत असणें, हें अपरिहार्य आहे. राजकीय, सामाजिक, व धार्मिक आचारांची व कल्पनांची प्रत्येकास थोडीबहुत ओळख असते; तसेंच ज्या आचारांत (व)ज्या कल्पनांत आपण वाढतों त्या कितीही दोषार्ह असल्या तरी रोजच्या सहवासामुळें त्यांची दोषार्हता लक्षांत येत नाहीं इतकेंच नाहीं, तर त्याच प्रशंसनीय व सुखावह वाटूं लागतात, आणि त्यांहून भिन्न आचार व कल्पना

विशेष श्लाघ्य व कल्याणप्रद असतील, अशी शंका देखील येत नाहीं! उलट ज्याप्रमाणें ज्वर आलेल्या मनुष्यास जें अन्न स्वतःच्या तोंडांत घालवत नाहीं तें दुसरीं माणसें मोठया आवडीनें खात आहेत, असें पाहून मोठें आश्चर्य वाटतें इतकेंच नाहीं, तर त्यांचा तो आधाशीपणा पाहून कधीं कधीं कळमळूनही येतें, त्याप्रमाणें ज्यांना सामाजिक व धार्मिक विषयांविषयीं विशेष विचार करण्यास अवकाश सांपडलेला नाहीं, त्यांना आपणांस न रुचणारे तत्संबंधक विचार अत्यंत अमंगळ व तिरस्करणीय वाटतात यांत कांहीं नवल नाहीं (असल्या विचारांचें ताट त्याचेपुढें आलें कीं त्यांस उमळून येतें व त्यांचेंपुढें तें आणणारांवर ते क्रुद्ध होतात! तथापि ज्याप्रमाणें दुखणेकऱ्याचे हितचिंतक सुज्ञ आप्त किंवा ममताळू वैद्य त्यांच्याकडून त्यांतील पदार्थांचें होईल तेवढें सेवन कधीं धाकानें, व कधीं आर्जव करून करवितात, त्याप्रमाणें सामाजिक व धार्मिक भिषक् आपल्या विचाररूप 'अप्रिय पण पथ्यकारक' अन्नाचा स्वीकार आपल्या देशबांधवांकडून आलेंबळें करवितात.

वरील लेखांत गर्वोक्ति आहे,असें कोणींही समजूं नये अशी आमची प्रार्थना आहे.विषयाच्या ओघांत असें लिहिणें भाग पडल्यावरून लिहिलें आहे! राजकीय, धार्मिक व सामाजिक,विशेषतः शेवटल्या दोन विषयांविषयीं आज दोन अडीच वर्षे सुधारकांत जे विचार प्रसिद्ध होत आहेत, त्यांना वेडेवांकडें कसलें तरी एक ठरीव वळण आहे, येवढें तरी हें पत्र बरेच वेळां ज्यानीं वाचलें असेल त्यांच्या ध्यानांत येऊन चुकलें. सामान्य लोकमतांहून भिन्न मताचा स्वतः स्वीकार करून, शिवाय स्वदेशबांधवांत त्यांचा प्रसार करण्याच्या हेतूनें थोडाबहुत लोकापवाद, उपहास व त्रास सोसण्यास जे प्रवर्त होत असतील त्यांनीं ते भिन्न विचार जाणूनबुजून व बऱ्याच शोधाअंतीं पतकरले असतील, असें साधारण प्रतीच्या उदार व समंजस लोकांस कबूल करणें भाग आहे. तसेंच ज्यानें आपल्या मनाशीं बरीच "भवति न भवति" करून असल्या विचारांचा अंगीकार केला आहे, तो अडाणी म्हणजे अशा गोष्टींचा विशेष काथ्याकूट ज्यानें केला नाहीं अशा प्रतिपक्ष्यांनीं केलेल्या चमत्कारिक प्रश्नांस बुजणार नाहीं, किंवा त्यांची साफ उत्तरें देण्यास डगणार नाहीं, हेंही त्यांस मान्य केलें पाहिजे. आमच्या 'अपरिचित मित्रानें' आम्हांस जे प्रश्न केले आहेत, त्यासंबंधानें तो बराच 'अपरिचित' असावा,असें आम्हांस वाटतें,तथापि

अशा प्रकारच्या प्रश्नांला अम्ही उचित वाटतात तीं उत्तरें देऊन,आपल्या प्रतिपक्ष्याकडून किंवा उलट विचारांच्या लोकांकडून पक्षांतर किंवा विचारांतर करावें हाच या सुधारकाच्या अवताराचा मूळ हेतु असल्यामुळें, आजपर्यंत अशा प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें देण्यांत आलीं आहेत, व पुढेंही तसें करण्यांत येईल. यावरून आमच्या 'अपरिचित मित्रानें' असें समजूं नये कीं, ज्या शंका किंवा जे प्रश्न त्यास निरुत्तर किंवा अनुत्तर वाटताहेत त्यांचें समाधान करणें कांहीं तरी लपंडाव करून आम्ही कालांतरावर टाकतों आहों.) वास्तविक पहातां तसें करण्याचें बिलकूल प्रयोजन नाहीं. तथापि त्यानें हें ध्यानांत टेविलें पाहिजे कीं, पत्रें पाठविणारांकडून ज्या शंका येतील त्यांचीं उत्तरें देत बसण्याचा प्रघात पडल्यास, अशा विषयाविषयीं ज्या पद्धतीनें लिहीत गेलें असतां, तें आमच्या वाचकांस सुगम होतील असें आम्हांस वाटत आहे ती पद्धत आम्हांस सोडून द्यावी लागेल, आणि पत्रलेखकाच्या लहरीप्रमाणें या विषयावरून त्या विषयावर आम्हांस उतरावें लागेल. असा प्रकार आम्हांस सोईचा नाहीं, व वाचकांस आवडणार नाहीं. तथापि 'अपरिचित मित्रास' अगदींच निराश करणें हेंही बरें नाहीं, म्हणून त्याच्या प्रश्नांपैकीं कांहींस अगदीं स्वल्प उत्तरें देतों. एवढ्यानें त्याची समजूत होईलच असें नाहीं. तथापि नाइलाजास्तव त्यानें तेवढ्यांतच गुजारा करून घेतला पाहिजे. आमच्या सोलापूरकर 'अपरिचित मित्राचे' जे चार प्रश्न आहेत त्यावर आम्हीं दिलेलीं उत्तरें त्यास मानवतील, किंवा तीं सर्वांशीं बरोबर असतील, असाही आमचा अभिमान नाहीं. तथापि तीं चुकीचीं आहेत अशी आमची खातरी होईतोंपर्यंत आम्ही तीं बरोबरच समजणार! आमच्या मित्राच्या प्रश्नांस उत्तरें देण्याचा आरंभ करण्यापूर्वीं, पुराणप्रिय मनुष्यांच्या अंतःकरणांतील एका सामान्य प्रवृत्तीविषयीं येथें थोडासा उल्लेख करणें जरूर आहे. ती प्रवृत्ति ही,—कांहीं मनुष्यें जुन्या चालीस व जुन्या विचारांस चिकटून असतात, किंवा आपण त्यांस चिकटून आहों असें तरी त्यांना वाटत असतें. ही एका प्रकारच्या मनुष्यांची गोष्ट झाली. दुसऱ्या प्रकारचे लोक आसमंत स्थिति फिरली आहे असें पाहून तिला अनुकूळ असें वर्तनांतर आपण व दुसऱ्यांनीं करावें असें इच्छितात, आणि जेवढ्या हितावह नवीन गोष्टी आपल्या हातून होण्यासारख्या असतात, तेवढ्या स्वतः करूं लागून त्यांचा

चांगुलपणा लोकांच्या नजरेस आणितात, आणि त्या लोकांनीं कराव्या, असा उघडपणें उपदेश करतात. या दोन प्रकारच्या लोकांत वास्तविक पाहतां विशेष अंतर नसतें. दोघांचेही कमीअधिक प्रमाणानें वर्तनांतर होतच असतें; कारण आसमंत स्थिति बऱ्याच अंशीं बदलली असतां, वर्तनांतर होऊं न देणें ही मनुष्याच्या आटोक्याबाहेरची गोष्ट आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, येथें मुसलमानांचा अंमल होण्यापूर्वी येथील लोकांचें जें वर्तन होतें तें ५।६ शें वर्षांच्या अमलांत अगदीं कायम राहिलें असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. तसेंच, येथें इंग्रजी राज्याचा पाया पडल्यापासून आतांपर्यंत ज्यांच्या वर्तनावर त्यांच्या अंमलाचा बिलकुल परिणाम घडला नाहीं, असा एकही इसम मिळणार नाहीं असें वाटतें. इंग्लिश लोकांनीं स्थापिलेली राज्यपद्धति, इंग्लिश लोकांकडून मिळत असलेलें शिक्षण, इंग्लिश लोकांशीं होत असलेला सहवास, इंग्लिश पद्धतीचे कारखाने, गिरण्या, आगगाडया, तारायंत्रें, आगबोटी इत्यादि गोष्टींनीं येथील सर्व वर्गांतल्या, सर्व पदवींच्या व सर्व वयाच्या लोकांच्या वर्तनांत अलीकडील शंभर वर्षांच्या अंमलामुळें बराच फेरफार झाला आहे, यांत काडीमात्र संशय नाहीं. तथापि जे पुराणप्रिय लोक आहेत त्यांना आपण जशाचे तसेच आहों, असें वाटत आहे! ज्याप्रमाणें वेगानें चालणाऱ्या आगगाडींत किंवा आगबोटींत, अथवा झपाट्यानें उडणाऱ्या विमानांत बसणारांस आपण अगदीं स्थिर आहों, पण सभोंवतालच्या वस्तु मात्र वेगानें हालत आहेत, असा दृग्भ्रम होतो, त्याप्रमाणें या लोकांच्या मनाची स्थिति असते. यांत आणि सुधारकांत भेद एवढाच कीं, ज्या दिशेला हे लोक कधीं नकळत व कधीं निरुपायास्तव इच्छेविरुद्ध जात असतात, त्याच दिशेला सुधारक जाणूनबुजून, व मार्गांत जे अडथळे असतील ते होतील तितके दूर करून संतोषानें जात असतात. 'बालविवाहाचा' पगडा बराच कमी झाला आहे; 'स्त्रीशिक्षणा-'चा प्रसार झपाट्यानें होत आहे; 'विधवावपन' बरेंच मागें पडत चाललें आहे; शेंपन्नास 'स्त्रीपुनर्विवाह' झाले आहेत, व थोडया वर्षांत त्यांची संख्या बरीच होऊन त्यांतील अधर्मतेचा व अप्रशस्तपणाचा भाग नाहींसा होईल अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत; 'संमतिवयाचा' कायदा तर पसार होऊन गेला. या गोष्टी डोळ्यापुढें धडधडीत

घडून येत असतां किंवा आल्या असतां व कामधंद्याच्या आणि प्रवासाच्या निमित्तानें नानाप्रकारच्या जातींच्या व आचारविचारांच्या लोकांचें संघट्टन होतें त्यामुळें धर्मविषयक, समाजविषयक व राज्यविषयक विचारांत व कल्पनांत प्रतिदिवशीं अंतर पडत असतां, जे कोणी आम्ही आहों तेथेंच आहों, व तसेंच करणें आम्हांस हितावह आहे असें विधान करतात, त्यांस का अंध म्हणावें, का भ्रांतिष्ट म्हणावें, का वृथाभिमानी आणि हट्टी म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. तात्पर्य, सामान्य लोक कोणत्याही नवीन आचारास किंवा विचारास तो रूढ होईतोंपर्यंत नांवें ठेवीत असतात, व जेव्हां त्यांना नकळत किंवा समजूनउमजून ते त्याच्या कक्षेंत सांपडून तींत भ्रमण करूं लागतात, तेव्हां ते त्यास नांवें ठेवीनासे होतात, असा साधारण नियम आहे व हाच नियम त्यांस प्रत्येक गोष्टींत लागू पडतो, असें दिसून आलें आहे. तेव्हां स्त्रियांची दास्यस्थिति नाहींशी करणें, हिंदुधर्माचें संशोधन करून त्यास निर्विकल्प स्वरूप आणणें, किंवा जातिभेदाचें निर्मूलन करून ज्याला त्याला स्वतःच्या शारीरिक व मानासिक सामर्थ्यानुरूप स्वहितसाधन व परहितसाधन करूं देणें वगैरे ज्या सुधारणाविषयीं अर्वाचिन सुधारक विचार करूं लागले आहेत, उघडपणें बोलूं लागले आहेत व सामर्थ्यानुरूप आचरण करूं लागले आहेत, त्या सुधारणांच्या पाशांत हे स्वतःस 'सुधारणानिंदक' 'सुधारणाद्वेष्टे' किंवा 'पुराणप्रिय' म्हणवून घेणारे लोक सांपडले असून, त्यांच्या मनांत असो किंवा नसो, भारलेल्या किंवा तोंडें बांधलेल्या चालत्याबोलत्या वस्तूंप्रमाणें ते त्याच्या पाठीमागें जात असतां जाणूनबुजून त्यांचा अंगीकार करणारांचा ते उपहास करितात, किंवा कधीं कधीं त्यांचा छल करण्यासही प्रवृत्त होतात, हा केवढा चमत्कार! किंवा यांत चमत्कार तरी कसला! तो त्यांचा प्रकृतिगुणच आहे, आणि प्रकृतिगुणानुसार आचरण करण्याबद्दल त्यांना विशेष दोष लावणें हेंही उचित नाहीं. अशा लोकांकडून होणारा अडथळा व त्रास यांबद्दल त्यांचा तिरस्कार न करतां, **मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन ह्या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल त्यांनीं कोणांस न भितां, आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त, व कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें, आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें, हेंच त्यांस उचित आहे.** अशा रीतीनें

वागत असतां, जर पूर्वपद्धतीचा कोणी मनुष्य त्यास असा प्रश्न करील कीं, तुम्ही बोलतां त्याप्रमाणें वागत का नाहीं ! तर त्यावर असें उत्तर द्यावें कीं, हा प्रश्न विचारण्याचा तुम्हांस अधिकार नाहीं. तुम्हांस जी मतें मान्य आहेत त्याप्रमाणें, किंवा ज्या शास्त्रकारांस तुम्ही पूज्य मानतां, त्यांच्या आज्ञेप्रमाणें ज्या दिवशीं तुम्ही आपलें वर्तन ठेऊन दाखवाल, त्या दिवशीं हा प्रश्न तुम्ही मला करण्यास या. तोंपर्यंत तुम्हांला जो मार्ग प्रशस्त वाटेल त्यानें तुम्ही जा, आणि मला वाटेल त्यानें मी जातों ! असें खरमरीत उत्तर दिल्याशिवाय, उठल्याबसल्या सुधारकांच्या नांवानें खडे फोडणाऱ्या जुन्या कोल्ह्यांचें तोंड कोणासही बंद करतां येणार नाहीं ! जुन्या पिढींतील लोकांत दुराचार व अधर्म काय थोडा आहे ! खोटें बोलणें, पैसा खाणें, प्रशस्तपणें हिंदु किंवा अहिंदु जातीच्या अंगवस्त्राशीं व्यवहार ठेवणें वगैरे गोष्टी सदोष आहेत, असेंही त्यांपैकीं बऱ्याच जणांस वाटत नाहीं ! वर्षप्रतिपदेपासून फाल्गुन वद्य अमावास्येपर्यंत अशा प्रकारच्या आचारांत गढून गेलेल्या लोकांनीं हव्या त्या यात्रा करून दरपौर्णिमेला व अमावास्येला सगळ्या तोंडाचें क्षौर करविलें, महिन्यांतून चारपांच उपवास केले, मधून मधून ब्राह्मण जेवूं घातले, व प्रतिदिवशीं देवांच्या डोक्यावर फुलांच्या, दूर्वांच्या व बिल्वपत्रांच्या लाखोल्या वाहिल्या, किंवा श्रावणी पौर्णिमेस पंचगव्याच्या पंचपाग्याच्या पंचपाऱ्या पिऊन फस्त केल्या, तरी त्यांना अलीकडील आर्यसमाजाच्या, प्रार्थनासमाजाच्या, किंवा ब्रह्मसमाजाच्या कोणत्याही अनुयायास दोष देण्यास अधिकार प्राप्त होतो, असें आम्हांस वाटत नाहीं; तसेंच हलवायाच्या घरचीं मिठाई, आगगाडी-तल्या लाडू-करंज्या, आणि माळ्यांच्या गाडींतल्या किंवा तट्टावरच्या भाज-णीच्या दशम्या, शुद्ध म्हणून बिनदिक्कत खाणाऱ्या मनुष्यानें स्टेशनावरील घटांतलें ( चाटींतलें ) पाणी, सोडावॉटरची बाटली किंवा, मेसमनानें आणून दिलेला चहाचा पेला यांनीं आपली तहान भागविणाऱ्यास; किंवा पेपर-मिठाच्या वड्यांचा, जंताच्या मोदकांचा, आणि इंग्रजी दवाखान्यांतील हवें तें औषध निःशंकपणें घेणारानें भुलेश्वरच्या बाजारांतील भाज्या किंवा पुऱ्या विकत घेऊन, अथवा स्टेशनावरील एखाद्या फरनँडिसपासून किंवा नवरोजी-पासून बिस्कुटांचा डबा घेऊन त्यावर आपली भूक भागविणारास, धर्मभ्रष्ट म्हणून कां हंसावें, हें सांगणें कठिण आहे. तथापि धार्मिक व सामाजिक

विषयांत सामान्य लोक स्वतंत्रपणें विचार करणारे असते, व अंधपरंपरेसारखे गतानुगतिक नसते, तर येवढालीं धर्मयुद्धें आणि घनघोर सामाजिक कारणें कशाला झालीं असतीं! एकंदरींत, थोड्याबहुत कलहाशिवाय मनुष्याचें पाऊल पुढें पडून, त्यास कोणत्याही प्रकारची उन्नतावस्था येणें अशक्य दिसतें. हें खरें असेल तर स्थाणुवत् आचरण करणारे जुने लोक सुधारकांवर हरएक गोष्टींत तुटून पडूं लागले तर त्यांनीं तरी त्यांची येवढी मुर्वत कां ठेवावी, हें आम्हांस समजत नाहीं. प्रीति प्रीतीस व अवज्ञा अवज्ञेस प्रसवते, ही गोष्ट सर्वांनींच ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

आतां आमच्या मित्राच्या चार प्रश्नांस देववतील तितकीं स्वल्प उत्तरें देऊन या आजच्या सरमनाचा शेवट करून "आमेन" म्हणतों. सोलापूरकर 'अपरिचिता' चा पहिला प्रश्न असा आहे कीं, "समाजांत एकंदर सुधारणा हव्यात तरी कोणत्या?" सुधारकाला असा प्रश्न करणें म्हणजे, काय झालें असतां तूं 'सुधारक' या 'पदवी'चा त्याग करण्यास तयार होशील, असें त्यास विचारण्यासारखेंच आहे! यावर त्याचें उत्तर येवढेंच आहे कीं, बालविवाहाचें नांव नाहींसें झालें, प्रत्येक स्त्रीस शिक्षण मिळूं लागलें, विधवावपन अगदीं बंद झालें, स्त्रीपुनर्विवाह सर्वत्र रूढ झाला, व संमतिवयाच्या कायद्यासारखे अनेक कायदे पसार झाले तरी त्याची "तृप्ति" होण्याचा संभव नाहीं! त्याच्या सुधारणाबुभुक्षेस मर्यादाच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल! ज्याप्रमाणें समुद्राला नद्यांचा, चितेला प्रेतांचा, लोभ्याला द्रव्याचा, दुर्वासाला अन्नाचा, कर्णाला दानाचा, व धर्माला शांतीचा कंटाळा कधीं येत नाहीं किंवा आला नाहीं, त्याप्रमाणें खऱ्या सुधारकाला सुधारणेचा वीट येण्याचा कधींच संभव नाहीं. मनुष्याच्या स्थितीस पूर्णता येणें बहुधा अशक्य आहे; पण ती येईतोंपर्यंत सुधारकाच्या मनाची शांति व्हावयाची नाहीं! तेव्हां अमुक झालें म्हणजे तुम्ही आपलें तोंड बंद कराल काय! किंवा तमुक झालें म्हणजे स्वस्थ बसाल काय! असले वेडगळपणाचे प्रश्न त्यास करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्यास अवश्य वाटत असेल ती सुधारणा झाल्यावर तो कदाचित् कांहीं दिवस विश्रांति घेईल, किंवा इतर गोष्टींत दुसऱ्याशीं ऐक्य ठेवण्यासाठीं आपल्या विचाराचें घोडें फारसें पुढें दडपणार नाहीं; पण तेवढ्यावरून त्याला सुधारणेचा किळस आला

आहे असें कोणीही समजूं नये. सध्यां आपल्या देशांत ज्या सुधारणांची वाटाघाट चालली आहे त्या अमलांत आल्यावर, जातिभेद मोडणें, धर्मसुधारणा करणें, मदिरा व मांस यांचें सेवन बंद होणें वगैरे अनेक गोष्टींकडे लोकांचें लक्ष लागलें पाहिजे. सर्वांत सार्वजनिक शिक्षणाची फार आवश्यकता आहे. हिंदुस्थानांतील एकूण एक प्रौढ स्त्रीपुरुषांस लिहितां वाचतां आलें पाहिजे; तसेंच प्रत्येक व्यक्तीस आपला चरितार्थ चालविण्यासारखा एखादा तरी धंदा येत असला पाहिजे; सारांश, वयांत आलेल्या कोणत्याही व्यक्तीस आपल्या उदरनिर्वाहासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी येऊं नये असें झालें पाहिजे. इतकेंच नाहीं, तर सहजगत्या उदरपोषण करतां येऊन, दिवसाचा कांहीं वेळ आत्मचिंतनाकडे, आवडत्या शास्त्राच्या अभ्यासाकडे, मनास रुचेल ती करमणूक करण्याकडे, किंवा विश्रांतीकडे लावतां आला पाहिजे. या सर्व गोष्टी घडून येण्यास किती शतकें लागतील हें सांगतां येत नाहीं. पण ज्याअर्थी 'अपरिचित मित्रानें' समाजांत सुधारणा हव्यात तरी कोणत्या? असा प्रश्न केला आहे, त्या अर्थी काहीं ठळक सुधारणांचें येथें दिग्दर्शन करणें भाग पडलें.

सोलापूरकराचा दुसरा प्रश्न असा आहे कीं, सुधारक तरी म्हणावें कोणाला? यावर आमचा असा उलट प्रश्न आहे कीं, सुधारकांच्या वर्तनावर किंवा विचारावर टीका करण्यास अधिकार तरी आहे कोणाला? जोंपर्यंत या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कोणाकडूनही आलें नाहीं, तोंपर्यंत सुधारक कोणास म्हणावें? सुधारकाची पदवी मिळण्यास कोणत्या प्रकारची योग्यता अंगीं असली पाहिजे? स्वधर्माचा, स्वाचारविचारांचा व देवांचा कंटाळा करून सुधारकपण येतें कीं काय? इंग्लिश लोकांच्या अनुकरणांत सुधारकपणा किती आहे? वगैरे निंदाप्रचुर प्रश्नांचे उत्तर देत बसण्याची गरज नाहीं. या प्रश्नांत गर्भित केलेल्या अर्थाची व्याख्या कोणत्याही सुधारकानें दिलेली नाहीं. अशा अर्थाची व्याख्या सुधारकांचे निंदक करतात. निंदकांनीं केलेल्या व्याख्येकडे सुधारकांनीं लक्ष कां द्यावें हें समजत नाहीं. सुधारकांस निराळ्या प्रकारचें शिक्षण मिळालें असल्यामुळें त्यांचे राजकीय, सामाजिक, व धार्मिक विचार निराळ्या तऱ्हेचे बनले आणि म्हणून त्यांना पूर्वींचे विचार नापसंत होऊं लागले तर त्यांत त्यांचा काय दोष आहे? मेलेल्या जनावरांचें मांस खाऊन अति गलिच्छ रीतीनें जो महारवाड्यांत आपलें आयुष्य काढतो अशा मनु-

ष्याच्या आचारविचारांत आणि एखाद्या पर्वताच्या शैलावर पिकलेलीं पानें खाऊन आत्मानात्मविचारांत सर्व जन्म काढणाऱ्या योग्याच्या विचारांत केवढें अंतर असलें पाहिजे बरें ! सुधारणा करण्याचा विचार मनांत येण्यास आपल्या रीतींहून भिन्न रीति, आपल्या विचारांहून भिन्न विचार, आपल्या कल्पनांहून भिन्न कल्पना, आपल्या शास्त्राहून भिन्न शास्त्रें, आपल्या धर्मांहून भिन्न धर्म, आपल्या भाषेहून भिन्न भाषा, आपल्या पेहरावाहून भिन्न पेहराव, वगैरे अनेक गोष्टी अवलोकनांत येऊन त्यांपैकीं बऱ्या कोणत्या व वाईट कोणत्या, याचा निवाडा करतां येण्यासारखें बुद्धिसामर्थ्य असलें पाहिजे. इंग्रजांचें राज्य होऊन, आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून अशा प्रकारच्या तारतम्याचा विचार करण्यास आम्हांस बरीच संधि सांपडूं लागली आहे. पण इंग्लिश लोकांच्या आणि आमच्या आचारविचारांत बरीच तफावत असल्यामुळें, व चांगुलपणाचें पारडें त्यांच्या अंगास झुकत असल्यामुळें, त्यांचे आचारविचार उचलण्याकडे ज्यांच्या मनाची प्रवृत्ति होते ते, ज्यांना पाश्चिमात्य शिक्षण न मिळल्यामुळें ( जे ) जसेच्या तसेच राहिले आहेत अशा पूर्वपद्धतीच्या लोकांच्या द्वेषास पात्र होतात. पण या कलहाचा आणि द्वेषाचा लौकरच अंत होणार आहे. थोड्या वर्षांत पहिलीं खोडें नाहींशीं होतील, आणि नवीन आचारविचारांचें चोहोंकडे साम्राज्य होईल. असे झाल्यावर पिढीपिढींत जेवढा जेवढा मतभेद स्वाभाविकपणें होत जातो, तेवढयामुळेंच होणारा कलह मात्र या देशांत दृष्टीस पडूं लागेल. अशा प्रकारचा कलह सर्व काळीं सर्व देशांत कमी अधिक प्रमाणानें दृष्टीस पडतो. पण सध्यां अगदीं भिन्न अशा दोन सुधारणांचें संघट्टन झालें असल्यामुळें उभयतांचा मोठा संग्राम माजून राहिला आहे. थोड्या दिवसांनीं हिंदुसुधारणेच्या बऱ्याच भागांस पड खावी लागून रणांगणांतून आपला पाय काढून घ्यावा लागेल, आणि तिच्या जागीं विजयशाली पाश्चिमात्य सुधारणेचा बराच भाग स्थापित होईल. हिंदु लोकांच्या कमाईत जेवढा चांगला भाग आहे तेवढा गमावण्याची कोणासही भीति नको. जें चांगलें आहे तें कोणीही टाकीत नाहीं. तात्पर्य, फार थोड्या काळांत पूर्वपश्चिम सुधारणांतील अत्यंत हितकारी भाग जींत सामील झाले आहेत अशा एका नामी सुधारणेची येथें स्थापना होऊन, भारतीय आर्य अननुभूतपूर्व अशा आधिभौतिक व आध्यात्मिक सुखाचा उपभोग घेऊं लागतील असा आमचा तर्क आहे !

सोलापूरकराच्या तिसऱ्या व चौथ्या प्रश्नांचीं उत्तरें आतां निराळी देण्याची गरज उरली नाहीं. सुधारकांना हिंदुधर्माचा कंटाळा आला आहे कीं काय! धर्मावांचून मूढ जनांचा निर्वाह होईल किंवा नाहीं! श्री. शंकराचार्यांकडून धर्मसुधारणा करून घेतां येईल कीं नाहीं?–वगैरे नानाप्रकारच्या प्रश्नांस नानाप्रकारचे सुधारक नानाप्रकारचीं उत्तरें देऊं शकणार आहेत; व या नानात्वांतच सुधारणेचें रहस्य आहे! तथापि या प्रश्नांवर जीं आमचीं उत्तरें आहेत त्यांचा आम्हीं ध्वनि तर केलाच आहे. याहून ज्यांना आमचीं मतें विस्तृत रीतीनें जाणण्याची इच्छा असेल, त्यांनीं **सुधारकाचें** वाचन नित्य सुरू ठेवावें! याशिवाय त्यांचें समाधान करण्याचा दुसरा मार्ग नाहीं, याबद्दल आम्हांस मोठी दिलगिरी वाटते!

---

## गुलामांचें राष्ट्र : : २४

हिंदू लोक कायदे पाळणारे लोक आहेत, अशी साहेब लोकांच्या तोंडून आमची स्तुति कधीं कधीं ऐकूं येत असते. भाषेनें, धर्मानें, आचारानें, अगदीं भिन्न अशा देशांतील कांहीं इसमांनीं व्यापाराकरतां येथें येऊन शंभरास वर्षांत पहिली पादशाही व इतर अंमल पादाक्रांत केले व आजपर्यंत कोणत्याही लोकांस ठाऊक नाहीं अशी अफाट सार्वभौमसत्ता स्थापिली, ही ऐतिहासिक पूर्वपीठिका ध्यानांत ठेविली असतां, लॉर्ड क्लाइव्ह व वॉरन हेस्टिंग्ज यांचे जे तीन सव्वातीन लाख देशबांधव आजमित्तीस या देशांतील तीस कोटी प्रजेचें राज्य अव्याहत करीत आहेत, त्यांनीं आमच्या राजनिष्ठेची तारीफ करावी, आणि आम्हांस नियमभीरुत्वाचें वारंवार सर्टिफिकीट ऊर्फ शिफारसपत्र द्यावें हें अगदीं स्वाभाविक नाहीं काय! लोकांत कायदे पाळण्याची हौस असणें हा आम्हीही मोठा सद्गुण समजतों. ज्या लोकांच्या अंगीं हा सद्गुण नसेल त्यांना शांतीचा फारसा उपभोग मिळणार नाहीं व शांतीवर अवलंबून असणाऱ्या शास्त्रांचा व कलांचा प्रसार त्यांत होणार नाहीं. तात्पर्य, शास्त्यांनीं घालून दिलेल्या नियमांचा अंतःकरणपूर्वक प्रतिपाल करणें हेंच मनुष्यसुधारणेचें

मुख्य कारण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण हें पालन दोन भिन्न हेतूमुळे घडून येत असतें इतकेंच नाहीं, तर हेतुभेदाप्रमाणें त्याच्या परिणामांतही मोठा भेद दिसून येतो. कोणत्याही कायद्यामुळें जुलूम किंवा त्रास होत असला तर एकदम त्या कायद्याच्या विरुद्ध न जातां योग्य रीतीनें तो रद्द करविण्याची किंवा त्यांत फेरबदल करण्याची खटपट करणें आणि ती खटपट तडीस जाईतोंपर्यंत त्यापासून होणारी पीडा निमूटपणें साहणें हे नियमपालन, दंडाच्या, तुरुंगाच्या किंवा दुसऱ्या कोणात्याही शिक्षेच्या भयानें कायद्याचा जुलूम वर्षेंच्या वर्षें बिनतक्रार सोशीत रहाणें याहून अगदीं भिन्न आहे. हवा तो मनुष्य कायदा आपल्या हातांत घेऊन समाजांत अनवस्था उत्पन्न करील तर तीपासून सर्वांचेंच नुकसान होणार आहे, अशी पक्की खातरी झाल्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांचा अंमल न तोडणें हें जितकें प्रशंसनीय आहे, तितकेंच शुद्ध भेकडपणामुळें युगेंच्या युगें पारतंत्र्यांत रहाणें खऱ्या मनुष्यपणास अत्यंत लाजिरवाणें आहे. मनुष्यत्व प्राप्त झालें असून गृहपशूप्रमाणें सदैव वागणाऱ्या, व उन्नतावस्था प्राप्त होण्याबद्दल कोणत्याही प्रकारचें परिश्रम न करणाऱ्या लोकांस मनुष्य म्हणण्यापेक्षां पशूच म्हणणें विशेष प्रशस्त आहे, व असले मनुष्यपशु किंवा नरपशु जगांतून होतील तितके लौकर नष्ट होऊन त्यांचे जागीं स्वोन्नतीसाठीं एकसारखे झटणारे लोक येणें हेंच इष्ट आहे! शुष्क स्वाभिमान एकीकडे ठेवून जर आपण विचार करूं लागलों तर आपणांस असें कबूल करावें लागणार नाहीं काय कीं, हिंदुस्थान देशासारख्या प्रचंड देशांत हिंदू लोकांसारख्या भेकड, निरुद्योगी, उत्साहशून्य, व तारतम्य न जाणाऱ्या कोट्यवधि मनुष्यकीटकांनीं वास्तव्य करण्यापेक्षां इंग्लिश, फ्रेंच, जर्मन किंवा अमेरिकन लोकांसारख्या लोकांनीं ही भरतभूमि आपलीशी करण्यांत जगाचा विशेष फायदा आहे! जोंपर्यंत कोणताही रोग सुसाध्य किंवा कष्टसाध्य वाटत आहे, तोंपर्यंत त्याच्या परिहारासाठीं एकदां होईल तेवढा प्रयत्न करणें हें योग्य व अवश्य आहे; पण तो एकदां पराकाष्ठेचा दुःसह झाला व असाध्य ठरला म्हणजे त्याच्या अनंत यातना सोसणाऱ्या रोग्याचे डोळे जितके लौकर मिटतील तितके बरें, असें मनांत येणें दूषणीय आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच गुलामगिरी ज्या लोकांच्या हाडामांसास खिळून गेली

आहे, व स्वतंत्र राष्ट्रमालिकेंत जें राष्ट्र कधींही गुंफलें जाण्याची आशा नाहीं, असें राष्ट्र अजीबात नष्ट झालें तर कांहीं वावगें नाहीं, असें कोणी म्हणेल तर त्याला समर्पक प्रत्युत्तर देतां येणार नाहीं अशी आमची समजूत आहे. एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या नेहमीं अंकित रहाणें हें योग्य आहे असें समजणें म्हणजे मनुष्याच्या दोन पृथक् जाती आहेत, व एकीचें पशूंशीं विशेष साम्य असून सहजगत्या तीस मनुष्यपदवी देण्यांत आली आहे, असें म्हणण्यासारखेंच होय. प्लेटो, ॲरिस्टॉटल वगैरे जुन्या ग्रीक तत्ववेत्त्यांचा कांहीं अंशीं अशा प्रकारचा समज होता, व सांप्रत कालींही दुर्बल परक्या लोकांवर राज्य करणाऱ्या बलाढ्य राष्ट्रांतील कांहीं इसमांच्या तोंडूनही मधून मधून अशा प्रकारचे उद्गार निघतात. पण अलीकडे या मतास सामान्य विचारी मनुष्य बहुधा संमति देत नाहीं. हेलिनिक (ग्रीक) लोक मात्र राज्य करण्यास योग्य आहेत असा बुद्धिवाद आतां कोणी ऐकणार नाहीं. प्रयत्नानें पाहिजे त्या लोकांस पाहिजे ती स्थिति प्राप्त करून घेतां येणार आहे, असें वळण अलीकडील राज्याविषयक विचारास लागलें आहे. तथापि जर कोणी समाधानपूर्वक असें सिद्ध करून देईल, कीं अमुक लोकांचें पाऊल कांहीं केलें तरी पुढें पडण्याची आशा नाहीं, तर असे लोक केव्हां तरी समूळ नष्ट होतील असें म्हणणें हें खोटें तर्कशास्त्र नाहीं, किंवा असे लोक त्वरित नष्ट व्हावे अशी इच्छा करणें हें कोणत्याही नीतिशास्त्राला सदोष म्हणवणार नाहीं. हिंदुलोक या थराला येऊन पोंचलेले आहेत किंवा नाहींत याचा निश्चय आजच आमच्यानें करवत नाहीं; तथापि ते त्या अवस्थेप्रत पावले आहेत असें कोणास वाटत असेल तर तें बऱ्याच अंशीं सकारण होणार आहे. राष्ट्राचें ऐक्य होण्यास लागणारा एक तरी गुण आम्हांत भरपूर आहे काय! धैर्य नाहीं; उत्साह नाहीं; बल नाहीं; ज्ञान नाहीं; तर्क नाहीं; उद्योग नाहीं; कला नाहीं; खरा देशाभिमान नाहीं; खरी धर्मश्रद्धा नाहीं; खरें बोलण्याची किंवा खरें आचरण करण्याची संवय नाहीं; सारांश चांगलें असें कांहीं नाहीं. ज्याची त्याची अहोरात्र वर्तमान क्षुद्र स्वार्थावर दृष्टि लागली असल्यामुळें आपल्या विचाराचा व आचाराचा भावी संततीवर काय परिणाम होणार, याचा कोणीही फारसा विचार करीत नाहीं. उदाहरणार्थ, अलीकडील राष्ट्रसभेची चळवळ घ्या. ही चळवळ आम्हांस सर्वथैव कल्याणकारक व्हावी

अशी तिची योजना केली आहे. कोणालाही उघडपणें या चळवळींत जाऊन मिळण्यास हरकत दिसत नाहीं. असें असून तीविषयीं केवढी हेळसांड ती पहा! अगदीं खालच्या प्रतीच्या लोकांनीं अजून तिचें नांवही ऐकलें नसेल. तेव्हां त्यांच्याकडून तिला द्रव्यद्वारां मदत होण्याची अपेक्षा करणें दुधाच्या आशेनें पारच्या गाईचे आंचळ ओढीत बसण्यासारखें होय! जे मध्यम प्रतीचे लोक आहेत, व ज्यांना या संस्थेचें महत्त्व समजत आहे, ते देखील हिला हवी तेवढी मदत करीत नाहींत हें आश्चर्य नव्हे काय! ह्यांच्या कांसा शुष्क नाहींत; पण राष्ट्रसभा हें आपलें वासरूं आहे, असें यांस वाटत नसल्यामुळें हे आपल्या कांसेला त्यांस बिलकूल तोंड लावूं देत नाहींत! पण याहीपेक्षां विशेष चमत्कार व विस्मय वांटण्यासारखी गोष्ट ही कीं, ज्या ह्यूमसाहेबानें ही राष्ट्रसभा अस्तित्वांत आणिली, आणि आपलें सामर्थ्यसर्वस्व खर्च करून तिचें हरएक प्रकारें आज सात वर्षें संरक्षण केलें, त्यावर त्याच्या जातभाईनीं राजद्रोहाचा बडगा उचलतांच आमच्यांतले शहाणेसुते म्हणविणारे कांहीं लोकही त्यावर तुटून पडूं लागले! खासा न्याय! खासें धैर्य! खाशी देशभक्ति! हिंदुस्तानच्या काळीचें उत्पन्न सुमारें वीस कोटी रुपये आहे, व तेवढाच लष्करी खात्याचा खर्च आहे. हिंदुस्थानच्या सैन्याइतकें महागडें सैन्य दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं, व या सैन्यावर होणाऱ्या धिप्पाड खर्चाचा बराच भाग हिंदु लोकांच्या खिशांत पडत नाहीं. जवळ जवळ याचप्रमाणें इतर खात्यांचीही व्यवस्था आहे, त्यामुळें हिंदुस्थानच्या पाऊणशें किंवा ऐशीं कोटी उत्पन्नापैकीं सुमारें दोनतृतीयांश उत्पन्नापासून आम्हांस द्रव्यद्वारां कवडीचाही मोबदला मिळत नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असा प्रकार एक वर्ष नाहीं, दोन वर्षें नाहीं, सुमारें शंभर वर्षें चालला आहे. या शंभर वर्षांत हिंदुस्थानचें उत्पन्न सरासरीनें चाळीस कोटी पडलें असें धरिलें, आणि त्याचा फक्त अर्धा भाग प्रतिवर्षी इंग्लिश लोकांच्या खिशांत अचानक पडला असें मानिलें, तरी एका शतकांत दोन निखर्व रुपये या देशांतून परदेशांत गेले, असा हिशेब होतो. ज्या देशाच्या द्रव्याला असा पाझर लागला आहे त्या देशांतील लोकांना अन्नान्नदशा प्राप्त होणें हें किती स्वाभाविक आहे! इंग्रजी राज्यापासून या देशावर घडणाऱ्या या भयंकर परिणामाची पुरी कल्पना ज्यांच्या मनांत पक्की बिंबली

असेल त्यांना आणखी पांच पंचवीस वर्षे असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानांतील लोक एकमेकांस खाऊं लागतील, किंवा भुकेच्या दुःसह यातनांमुळें बेफाम होऊन जाऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचें जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील, असें डोळ्यांपुढें ढळढळीत दिसून आल्यावांचून राहील काय! व ज्यांच्या अंतःकरणांत खऱ्या देशाभिमानाचा व खऱ्या मनुष्यपणाचा कांहीं अंश आहे, त्याला ही गोष्ट उघडपणें बोलल्यावांचून रहावेल काय! ह्यूमसाहेबांनीं आपल्या पत्रांत याहून अधिक काय म्हटलें आहे! हिंदुस्थानच्या भयप्रद दारिद्र्याचें त्यांत जें भयंकर चित्र काढलें आहे तें खोटें आहे असें म्हणण्याची कोणाची छाती आहे! दादाभाई नौरोजी-सर एव्हेलिन बेअरिंग, डॉक्टर हन्टर, सर चार्लस डिल्क वगैरे बहुश्रुत गृहस्थ तर राजद्रोही नाहींत ना! पण त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या हिशेबावरूनही असें उघड होतें कीं, ब्रिटिश अमलांतील मनुष्याचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें तीन रुपयांपेक्षां अधिक नाहीं; तसेंच हिंदुस्थानांतील निम्मे किंवा दोनतृतीयांश लोक अर्ध्या पोटीं सारा जन्म काढतात! राजनिष्ठ लोकांनीं अशी जबानी दिली असून ॲंग्लोइंडियन पत्राबरोबर आमच्या लोकांनीं ह्यूमसाहेब अतिशयोक्ति करतात,ह्यूमसाहेब पराचा कावळा करतात, वार्धक्यामुळें ह्यूमसाहेबांस वेड लागल्यासारखें झालें आहे, असें बरळणें हा केवढा प्रमाद व कृतघ्नपणा होय! चार साहेब लोकांकडून बरें म्हणवून घेण्यासाठीं हिंदुस्थानाच्या व इंग्लंडच्या खऱ्या हितचिंतकावर अशा रीतीनें उलटून पडणें हें आम्हां भेकड, लोभी, अविचारी, व स्वार्थी हिंदु लोकांशिवाय दुसऱ्या कोणाच्यानेंही होण्यासारखें कर्म नाहीं. ज्यांनीं ह्यूमसाहेबांस भ्रमिष्ट ठरविलें आहे त्यांनाच तसें ठरविणें विशेष उचित होणार आहे! ह्यूमसाहेबांसारखी आमची आम्हांस कळकळ असती तर राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाही आरोप आपणावर आणून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास आम्ही तयार झालों असतों. ह्यूमसाहेबांस बेवकूफ ठरविणाऱ्या या वृद्ध शहाण्यांना येवढें तरी समजावयाला पाहिजे होतें कीं, ह्यूमसाहेबांस अगोदर फांशीं चढविल्याशिवाय फासाचे पदर आपल्या गळ्याभोंवतीं बसण्याचा संभव नाहीं. पण इतकें धैर्य आमच्या अंगीं असतें तर आमची सांप्रत दास्यावस्था आम्हांस कोठून आली असती!

कोणताही नवीन प्रघात दृढ होण्यापूर्वी त्याला तीन पहाऱ्यांतून जावें लागतें. पहिला पहारा मनाचा, दुसरा वाणीचा, आणि तिसरा आचरणाचा. यांपैकीं प्रत्येक पहाऱ्यांतून जात असतां त्याला 'मज्जाव' झाल्याखेरीज राहत नाहीं! लोकोत्तर पुरुषाची गोष्ट एकीकडे राहूं द्या; शेंकडा नव्याण्णव लोकांस नवीन कल्पना सुचत नाहीं, व सुचली तरी तिला डोक्यांत थारा द्यावा, असें त्यांस वाटत नाहीं. सामान्य मनुष्याचें डोकें पूर्वापार चालत आलेल्या व लहानपणापासून अनेक द्वारांनीं संपादिलेल्या साधारण कल्पनांनीं ठिकी-साररखें गच्च भरून गेलेलें असतें. त्यांत एखादी नवीन कल्पना शिरूं देण्यास त्याला अतिशय प्रयास पडतात. खचून भरलेल्या व सुतळीनें तोंड शिवलेल्या पोत्यांचे दोन तीन टांके तोडून त्यांतील पायली दोन पायली धान्य बाहेर काढल्याशिवाय ज्याप्रमाणें त्यांत नवीन धान्य सांठविणें शक्य नसतें, त्याप्रमाणें वेड्यावांकड्या विचारांनीं ज्याच्या मनांतील तिळन्तिळ जागा व्यापून टाकली आहे, त्याच्या मनांतील वतनदार होऊन बसलेल्या कांहीं विचारांस हुसकून लाविल्याशिवाय तेथें नवीन विचारांची डाळ मुळींच शिजत नाहीं! कोणतीही गोष्ट आचारांत आणण्यापूर्वीं किंवा तिजविषयीं लोकांत चर्चा सुरू करण्यापूर्वी ती चांगली आहे, अशी ज्याच्या त्याच्या मनांत पक्की खातरी झाली पाहिजे. एकांतांत बसला आहे; स्वच्छ उदकाप्रमाणें किंवा आरशाप्रमाणें मनाचें दर्पण पुढें मांडिलें आहे, आणि त्यांत प्रतिबिंबित झालेल्या विचारांचें व कल्पनांचें हुबेहुब स्वरूप अवलोकन करीत आहे; अशा स्थितींत एखाद्या आगंतुक विचाराचें प्रतिबिंब त्या दर्पणांत पडूं देऊन त्याच्या रूपाची व आकाराची इतरांच्या रूपाशीं व आकाराशीं तुलना करण्यास भीति कशा-साठीं वाटावी! अभ्यासाच्या खोलीचें दार लावून घेऊन मनाच्या कपाटाचीं दारें खुलीं टाकण्यास व त्यांतून पाहिजे त्या विचारांस बाहेर पडूं देण्यास व पाहिजे त्यांस आंत शिरूं देण्यास ज्याची छाती होत नाहीं, तो मनुष्य कुचक्या कसपटापेक्षांही नादान होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण असलेच मनुष्य जगाच्या सांप्रत स्थितींत जेथें तेथें फार आढळतात; निदान हिंदुस्थानांत तरी ते असावे त्यापेक्षां फार फाजील आहेत; आणि हा फाजील-पणाच आमच्या चिरकालीन दैन्यावस्थेस आद्य कारण झाला आहे. स्वतंत्रपणें विचार करतां करतां तो बोलून दाखविण्याचें धैर्य येतें, व बोलतां बोलतां

क्रिया करण्याचीही इच्छा उत्पन्न होते. मननाच्या देवडींतून जी कल्पना जोरानें निसटते ती वाचेच्या किंवा कायेच्या देवडीवरील रखवालदारांस फारशी डगणारी नसते! मनांतल्या मनांत पाहिजे त्या विषयाविषयीं हवा तसला विचार करण्यास कशाचीही भीति नसतां, पुष्कळांचीं मनें तसें करण्यास कां कचरतात कोण जाणें. बहुधा त्यांना अशी दहशत वाटत असेल कीं जे विचार लोकमतानें अश्लाघ्य किंवा त्याज्य मानले आहेत त्यांना आपण आपल्या मनांत आश्रय दिला तर कदाचित् आपल्या मनांतील चांगल्या विचारांस ते हुसकून लावून त्यांची जागा बळकावतील; आणि या आंगतुकांचें एकदां का वर्चस्व झालें म्हणजे आपल्या तोंडावाटे ते बाहेर पडूं लागतील, आणि न जाणों आपल्या आचरणावरही त्यांचा परिणाम होऊं लागून त्याबद्दल लोक आपणांस दूषण देऊं लागतील. नवीन विचाराविषयीं, मनुष्यांच्या मनांत जी दुर्मुखता दृष्टीस पडते तिचें खरें कारण हेंच असेल, व त्यामुळें इतके लोक विचाराच्या कामीं गतानुगतिक होत असतील तर आज आम्हांस जी स्थिति प्राप्त झाली आहे, ती अगदीं स्वाभाविकपणें प्राप्त झाली आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं; कारण या देशांत अशाच लोकांचा भरणा फार आहे; व ह्या भरण्याचें प्रमाण असेंच राहणार असेल तर या देशाचें डोकें वर निघण्याची आशा करणें शुद्ध वेडेपण होय. पृथ्वीवर आजपर्यंत जे स्वतंत्र व सुखी देश होऊन गेले आणि आजमित्तीस ज्या देशांत तीं सुखें नांदत आहेत, त्या देशांत मधून मधून स्वतंत्रपणें विचार करणारे अनेक पुरुष होऊन गेले व होत आहेत, हें स्पष्टपणें दाखवितां येणार आहे. अशा पुरुषांकडून वेळोवेळीं बऱ्यावाईटाची चर्चा झाल्याखेरीज कोणत्याही देशाची प्रगति होण्याचा संभव नाहीं. अपसर्गकारी कारणांचा लय आणि उत्सर्ग कारणांची उत्पत्ति व अभिवृद्धि झाल्याशिवाय जिला आपण सुधारणा म्हणतों ती कशी होणार? ज्या गोष्टीपासून त्रास किंवा अडचण होते त्या दूर करणें, आणि ज्यापासून सोय व सौख्य होतें त्या जवळ आणणें यांचेंच नांव सुधारणा. तेव्हां चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट कोणत्या, याचा विचार करण्यास जर कोणी तयार नसेल व यदाकदाचित् तसें करण्यास कोणी प्रवृत्त झाला असतां त्याची विटंबना होईल, तर चांगल्यावाईटाचें परीक्षण होणार कसें, आणि जें चांगलें असेल तें लोकांपुढें येऊन तें त्यांच्या अंगीकारास पात्र

होणार कसें ! कोणतीही गोष्ट अमलांत आणण्यापूर्वी तिचा हवा तितका खल करण्यास आमची बिलकूल हरकत नाहीं इतकेंच नाहीं, तर तसें झाल्याखेरीज सामान्य लोकांनीं कोणत्याही नवीन गोष्टीचा स्वीकार करूं नये असें आमचें मत आहे. पण जेवढें जुनें तेवढें निर्दोष व चांगलें असा आग्रह धरून बसून जर कोणी नवीन गोष्टीचें चिंतन व चर्चा करणार नाहीं, तर रूढ विचारांतले व आचारांतले प्रमाद दूर होणार कसे, व नवीन विचारांचें व आचारांचें चांगुलपण प्रस्थापित होऊन ते रूढ होणार कसें ! आपल्या देशांतील लोकांस नवीन विचारांची जशी भीति वाटते तशी दुसरी कोणत्याही देशांतील लोकांस वाटत नसेल. उदाहरणार्थ, देव आहे किंवा नाहीं, हा प्रश्न आपला आपणांस विचारण्याची कितीकांची छाती होणार आहे ! तसेंच, वेद पौरुष आहेत कीं अपौरुष आहेत; जातिभेद अस्तित्वांत कशामुळें आले, व ते चटसारे मोडून टाकले असतां काय परिणाम होतील; मुंज, लग्न वगैरे संस्कार, केव्हां कोणीं व कशासाठीं स्थापिले, आणि ते मुळींच नाहींसे केले तर काय होईल; पुरुषांप्रमाणें स्त्रियांनीं अविवाहित रहाण्यास, किंवा वाटेल तेव्हां हवें त्यांशीं लग्न करण्यास काय हरकत आहे; पुरुषांप्रमाणें स्त्रियांस सारे राजकीय हक्क कां देऊं नये; एका बायकोनें पांचचार नवरे करण्यास, अथवा दहापांच लोकांनीं पांचचार बायका ठेवण्यास किंवा करण्यास प्रत्यवाय कां असावा; जेवढीं रोगी व कुरूप मुलें अस्तित्वांत येतील तेवढीं एकदम मारून टाकण्याबद्दल कायदा कां नसावा; ज्या रोग्यांचे रोग वैद्यांच्या मतानें असाध्य ठरतील, व ज्या रोग्यांचें जीवित रोगांच्या असह्य यातनांमुळें अत्यंत कष्टमय झालें आहे, अशांस विष किंवा गोळी घालून यातनामुक्त कां करूं नये; रक्तपितीच्या रोग्यासारखे रोगी मोठ्या नदींत किंवा समुद्रांत बुडवून त्या रोगाचा बींमोड करण्यास काय हरकत आहे; पाहिजे त्याला पाहिजे त्या स्त्रीशीं समागम करण्याची परवानगी दिल्यास काय परिणाम घडतील; व्यक्तीचा अथवा कुटुंबाचा संपत्तीवरील हक्क नाहींसा करून देशांतील साऱ्या संपत्तीचे सारे लोक समाईक मालक कां न मानावे; आळीपाळीनें साऱ्यांस साऱ्या तऱ्हेचीं कामें करण्यास लावून उच्चनीचत्वाचा भाव मोडून टाकण्याचा प्रयत्न कां करूं नये; लोकसत्ताक राज्यपद्धतीशिवाय इतर प्रकारच्या राज्यपद्धति नाहींशा करण्यास काय हरकत आहे; वगैरे प्रश्नांचा

आपापल्या मनाशीं शांतपणानें विचार करण्याची गोष्ट तर राहूंच द्या, पण असले प्रश्न कानावर पडल्याबरोबर ज्याचें धाबें गडबडणार नाहीं, व हें ऐकल्यानें आपल्या हातून मोठें पाप घडलें असें ज्यांस वाटणार नाहीं, असे किती लोक सांपडणार आहेत ? तथापि एका कालीं वैभवाच्या शिखरास चढलेल्या युरोपांतील कित्येक देशांतल्या तत्त्ववेत्त्यांनीं, मनुष्यानें आपल्या आईशीं किंवा सख्ख्या बहिणीशीं लग्न करण्यास काय हरकत आहे किंवा ज्याला त्याला लग्न करण्याची व संतति वाढविण्याची सदर परवानगी असण्यापेक्षां ज्याप्रमाणें जातिवंत घोडे उत्पन्न करण्यास आपण विशेष प्रकारच्या व्यवस्था करतों, त्याप्रमाणें सदृढ व सुरूप मनुष्य उत्पन्न करण्यासाठीं मनुष्यपोळ संस्थानच्या खर्चानें कां ठेऊं नयेत, अशाही प्रश्नांचा यथास्थितपणें विचार केला आहे इतकेंच नाहीं, तर त्या प्रश्नांस त्या तत्त्ववेत्त्यांनीं जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांच्या अनुरोधानें त्या देशांतील राज्यकर्त्यांनीं अनेक विलक्षण संस्था स्थापून त्या देशाच्या विचारावर, नीतीवर, वर्तनावर व इतिहासावर आश्चर्यकारक परिणाम घडवून आणिला. युरोप खंडांतील जुन्या ग्रीक लोकांसारखे लोक या पृथ्वीतलावर पुनः अवतरतील किंवा नाहीं याची बरीच शंका आहे. या अद्भुत लोकांनीं आपल्या विचारविहंगमांस पाहिजे तेवढ्या उंचीच्या भराऱ्या हव्या त्या दिशेनें मारूं दिल्यामुळें, ते पराकाष्ठेचे काल्पनिक लोक ठरले आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांनीं आपल्या शौर्यानें जे पराक्रम केले व बुद्धिसामर्थ्यानें ज्या अनेक शास्त्रांचे पाये घातले, ते आज अडीच तीन हजार वर्षांनंतर शोधक विचारी लोकांच्या प्रशंसेस पात्र होत आहेत ! तसेंच, राजकीय विषयांत रोमन लोकांनीं जी कीर्ति संपादिली, ती मनुष्यजातीच्या अन्तापर्यंत टिकेल असें खात्रीनें म्हणतां येणार आहे. युरोपांतील अर्वाचीन राष्ट्रें आज हजारपांचशें वर्षें प्लेटो, अरिस्टॉटल, जस्टिनिअन वगैरेंच्या ग्रंथांचें प्रेमपुरस्सर चालन व अध्ययन करीत आहेत, पण अजून त्यांची तृतीच झाली नाहीं, तेव्हां त्यांचा त्यांस कंटाळा येण्याचें नांव कशाला पाहिजे ? बरें, पण अलीकडील युरोपिअन लोकांना ग्रीक व रोमन लोकांविषयीं येवढी पूज्यबुद्धि आहे, म्हणून ते त्यांचें दोषाविष्करण करण्यास मागेंपुढें पहातात, असें मात्र कोणी समजतां कामा नये. त्यांच्या करामतीबद्दल ते त्यांची अतिशय प्रशंसा करतात हें जरी खरें आहे, तरी त्यांचीं प्रमादस्थलें ते कधींही छपवीत नाहींत. असा प्रकार कोणाकडून

झालाच तर तो थोडाबहुत तिकडील धर्माभिमान्यांकडून होतो! आमची गोष्ट याहून अगदीं निराळी आहे. जें जें म्हणून जुनें आहे तें सारें आम्हांस निर्दोष, पूज्य व संरक्षणीय वाटतें. आमच्या मनाच्या या खोडीमुळें जमिनींत खोल पुरलेल्या खांबाप्रमाणें आमची स्थिति झाली आहे! जुन्या वेदांतापलीकडे वेदांत नाहीं; जुन्या गणितापुढें गणित नाहीं; जुन्या अलंकाराहून अलंकार नाहींत; जुन्या व्याकरणापुढें गति नाहीं; जुन्या न्यायापेक्षां दुसऱ्या न्यायांत अर्थ नाहीं! असल्या भ्रमामुळें आमचे डोळे बांधल्यासारखे होऊन आज कित्येक शतकें तेल्याच्या बैलाप्रमाणें आम्ही जुन्या शास्त्रांच्या आणि पुराणांच्या घाण्याभोंवतीं घिरट्या घालीत आहों! हें आमचें परिभ्रमण केव्हां संपेल तें संपो; पण यांतून आमची सुटका झाल्याखेरीज कोणत्याही शास्त्रांत किंवा कलेंत आमचें पाऊल पुढें पडण्याचा संभव नाहीं! सायणाचार्य, पाणिनी, मंमट, दंडी, चरक, सुश्रुत, भास्कराचार्य वगैरे फार मोठे पुरुष होऊन गेले असें रोज सकाळीं उठून म्हणा आणि त्यांस व त्यांच्या ग्रंथांस पाहिजे तर साष्टांग नमस्कार घाला. पण यापलीकडे त्यांच्या नांवाचे पवाडे गात बसण्यांत किंवा त्यांच्या ग्रंथांना पुनः पुनः प्रेमानें कवटाळण्यांत काय अर्थ आहे! त्यांत जेवढा ग्राह्यांश असेल तेवढा अलबत घ्या, व त्याचें काळजीपूर्वक रक्षण करा. पण त्यांच्या कृतींत जीं दोषस्थलें असतील तीं काढून टाकून तींत नवीन भर टाकण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तुमचा निभाव कसा लागेल! पुढील उपमेबद्दल कदाचित् कोणास वाईट वाटेल, पण सारासार विचार करतां एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवेप्रमाणें आम्हां भारतीयांची स्थिति झाली आहे, असें आम्हांस वाटतें! पतिनिधनामुळें नवीन संतानाची आशा खुंटलेली ती गतभर्तृका ज्याप्रमाणें असलेल्या अपत्यांचें वारंवार दृढालिंगन करून 'आमचे पुरुष असे होते, आमच्या पुरुषांनीं असें केलें, आमच्या पुरुषांनीं तसें केलें.' अशा प्रकारचे गुणानुवाद गाण्यांतच आपलें समाधान मानून घेते, व आपल्या जीविताची कृतार्थता समजते त्याप्रमाणें जुन्या थोर पुरुषांचे गुण गाण्यांतच आमच्या पुरुषार्थाची परमावधी होऊन बसली आहे!

आमचे लोकांस स्वतंत्रपणें विचार करण्याची संवय किती कमी आहे, आणि तीमुळें आमचें किती नुकसान होत आहे, हें मागल्या अंकांत

थोडक्यात सांगितलें. आज उघड बोलण्याच्या कामीं आम्ही किती भेकड आहों, हें पहावयाचें आहे.

आपल्या मनाशीं स्वतंत्रपणें विचार करण्यापेक्षां मनास शुद्ध वाटेल तें बेधडक बोलणें हें विशेष कठिण असल्यामुळें, त्या मानानें आमचा भेकडपणाही विशेष व्यक्त होतो. या भेकडपणास बहुधा तीन कारणें होतात; एक गुरुभय, दुसरें राजभय व तिसरें लोकभय. गुरु शब्दांत ज्या आप्तांवर आपण अवलंबून असतों, ज्यांनीं आपणांवर अनेक द्वारांनीं उपकार केलेले असतात, आणि ज्यांच्यापासून मागेंपुढें आपणांस पुष्कळ फायदा होण्याचा संभव असतो, अशांचें मन दुखावेल, आणि ते आपणावर रागावल्यामुळें आपलें नुकसान होईल, अशा प्रकारच्या भीतीस 'गुरुभय' म्हटलें आहे. वरिष्ठाची मर्जी खप्पा होईल, अधिकारी द्वेष करतील, व राजा दंड करील अशा भीतीनें त्यांना असंमत असलेल्या गोष्टींचा उच्चार न करणें हा राजभयाचा परिणाम म्हणण्यास हरकत नाहीं. या दोन भयांहून इतर साऱ्या भयांचा एका व्यापक लोकापवादभयांत समावेश केला तरी चालेल. देवभयाचा येथें विचार करण्याची गरज नाहीं; कारण दैविक दोषाचे परिणाम प्रत्यक्ष व तात्कालिक नाहींत! शिवाय वडील, राजा व लोक यांना ज्या गोष्टी अप्रशस्त वाटतात त्याच देवासही अप्रशस्त वाटतात. यांना प्रशस्त वाटत असून देवास अप्रशस्त वाटणारी गोष्ट सहसा सांपडावयाची नाहीं; आणि म्हणूनच जो ह्या ऐहिक त्रिकुटाची मर्जी खप्पा होऊं देणार नाहीं तो बहुतकरून देवांच्या मर्जीसही उतरल्यावांचून राहणार नाहीं.

चिंतन, चर्चा, आणि आचार यांचें राज्य, धर्म, व रीति हे तीन मुख्य विषय होत, व राजा, गुरु, आणि लोक हे त्यांचे मुख्य नियामक होत. या तिघांच्या अनुरोधानें पहिल्या तीन गोष्टी दुसऱ्या तीन विषयाच्या संबंधानें घडत असतात. पैकीं पहिली म्हणजे चिंतन अथवा मनन ज्यानें त्यानें आपापल्या तब्यतीप्रमाणें चालविण्यास हरकत नाहीं, असें आम्हास वाटतें. बापाला वैदिक धर्म मान्य असून मुलानें आपल्या मनांत बौद्ध धर्म चांगला आहे असें ठरविलें तर त्यानें पित्याची अवज्ञा केली असें कोणाच्यानेंही म्हणवणार नाहीं. लढाई करावी असें राजाचें मत असून तह करावा असें विचारांतीं प्रधानास वाटलें तर त्यावर राजद्रोहाचा आरोप

कोणीही ठेवणार नाहीं. चंद्राला ग्रहण लागतें, तें राहूनें त्यास ग्रासल्यामुळें लागतें, व स्नानावांचून आणि दानावांचून द्विजाचा तत्संबंधक दोषपरिहार होत नाहीं, असा सामान्य लोकांचा ग्रह असला तरी भास्कराचार्यासारख्या गणितज्ञानें राहू म्हणजे चंद्रावर पडणारी पृथ्वीची छाया असें मानण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं. जोपर्यंत हा सारा मतभेद ज्याच्या त्याच्या मनाशीं थबकून राहिला आहे तोंपर्यंत सारें ठीक आहे; कारण ज्याअर्थीं कोणत्याही व्यवहाराला त्यामुळें म्हणण्यासारखा बाध येत नाहीं, त्याअर्थीं तो असून नसल्यासारखाच आहे. तथापि व्यक्तिविशेषाला त्यापासून कांहींच फायदा नाहीं असें नाहीं. वरील तीन भयांपैकीं कोणत्याही भयामुळें मनुष्याला आपले विचार बोलून दाखविण्याची छाती होत नसली, तरी सामान्य लोकांचीं पावलें भ्रमामुळें व अज्ञानामुळें वेडीवांकडीं पडत आहेत; वारंवार त्यांस ठेंचा लागत आहेत; ज्ञानरश्मींचा मार्गदर्शक प्रकाश नसल्यामुळें मूढतेच्या गाढ विचारांत त्यांस चांचपडावें लागत आहे; व असे हाल सोसाव लागत असूनही आम्ही सरळ मार्गानें चाललों आहों, आम्हांला वाटाड्याची किंवा मशालीची गरज नाहीं, आणि अशा रीतीनें आयुःपथ आक्रमिला तरच आम्ही सुखी राहून आमचें वर्तन देवादिकांस मान्य होणार आहे–अशा प्रकारच्या वल्गनांचा अहोरात्र घोष करणाऱ्या मूर्खांची दुर्दशा पाहून ज्ञात्यास जो विस्मय व आनंद होतो त्याची गोडी त्यावांचून इतरांस कधींही समजावयाची नाहीं, व अशा गोडीचा उपभोग तो घेत असतां सामान्य ऐंद्रिय सुखांचें क्षुद्रत्व त्याच्या अनुभवास आल्यावांचून रहाणार नाहीं! आमच्या स्मशानांतील अत्यंत अमंगल व भयप्रद विधि; आमच्या गतभर्तृकांची अमानुष वागणूक; आमच्या श्रावण्यांतील हास्यास्पद कवायत; आमच्या लग्नांतील मूर्खपणाचे सोहळे; आमचे उत्सव व तत्संबंधक मुक्तद्वार अन्नव्यय; धुळवडीसारखे आमचे खेळ–वगैरे गोष्टींचें अवलोकन करून, अनेक प्राचीन व अर्वाचीन विचारी पुरुषांस आमच्या धार्मिक व सामाजिक विचारशून्यतेबद्दल वाईट वाटत असेल, तिरस्कार उत्पन्न झाला असेल, कदाचित् करुणाही आली असेल. ज्ञानबलामुळें मनाची जी अशा प्रकारची स्थिति होते तींत तें व्यग्र होऊन गेलें असतां तत्त्वज्ञास जें समाधान होतें त्यापुढें त्याला सार्व-

भौमतत्र देखील कसूपटाप्रमाणें वाटतें! तेव्हां स्वतंत्रपणें विचार करण्यापासून प्राप्त होणाऱ्या अशा प्रकारच्या असामान्य मानसिक सुखासाठीं व धैर्यासाठीं तरी मनास त्याची होईल तितकी संवय लावणें फार आवश्यक आहे. पण त्याचे परिणाम बहुधा येथेंच थांबत नाहींत. बाहेरील दडपण फारच जबरदस्त असलें तर मात्र गोष्ट निराळी; बाकी कोणत्याही प्रकारच्या विचारांचें मनांत पक्कें वर्चस्व प्रस्थापित झाल्यावर त्यांचा भाषणावर व आचरणावर परिणाम घडल्यावांचून रहात नाहीं; कारण, कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाच्या संबंधानें आपल्या जातिबांधवांची चूक होत आहे, त्यांतील खरें तत्त्व आपणांस पक्कें समजलें आहे, अशी ज्याची खातरी झाली आहे, त्याला मनाच्या स्वाभाविक चांचल्यामुळें वारंवार असा उमाळा येऊं लागतो कीं, आपणांस जें तत्त्व समजलें आहे त्याची होईल तितकी प्रसिद्धि करणें, व इतरांकडून हरएक प्रयत्नानें त्याचा अंगीकार करविणें हें आपलें आद्यकर्तव्य किंवा चैतन्य कारण आहे. असल्या विचाराचा मनांत एकवार संचार झाला म्हणजे तो चैन पडूं देत नाहीं. निजतांउठतां, बोलतांचालतां, खातांपितां, सारांश प्रत्येक क्रिया करतांना ती गोष्ट डोळ्यांपुढें दिसूं लागून ज्याप्रमाणें कंसाचें मन **कृष्णमय** झालें त्याप्रमाणें त्याचें तन्मय होतें. अशी अवस्था झाल्यावर कोणाच्याही भयास्तव मनुष्याला आपले विचार गुप्त ठेवणें अशक्य होतें! तेव्हां आतां प्रश्न असा आहे कीं, ज्याचें मन त्याच्या स्वाधीन आहे अशी कल्पना केली तर इतरांस असंमत असे आपले विचार त्यानें कोणासाठीं किती वेळ व्यक्त करूं नये.

पुष्कळांचें म्हणणें असे पडतें कीं, तुम्ही दुसऱ्या तिसऱ्याकरितां पाहिजे तर मुळींच पर्वा करूं नका, पण ज्या मातापितरांनीं तुम्हांस जन्म दिला; ज्यांनीं रात्रंदिवस खस्त खाऊन तुम्हांस लहानाचें थोर केलें; तुमच्यासाठीं ज्यांचा जीव तिळतिळ तुटतो; तुमचें कल्याण व्हावें, लोकांनीं तुम्हांस चांगलें म्हणावें; तुम्हांस व तुमच्या संततीस कोणत्याही प्रकारचे कष्ट पडूं नयेत;—सारांश तुम्हांस सर्व प्रकारचें ऐहिक व पारमार्थिक सुख प्राप्त व्हावें असें ज्यांचें अहोरात्र चिंतन चाल्तें, अशा मातापितरांस दुःख होण्यासारखे तुमचे विचार असतील तर तुम्ही ते त्यांचेपाशीं बोलूं नयेत, किंवा दुसऱ्यापाशीं बोलून तुम्ही त्या विचारांचे आहां, असें त्यांचे

कानावर येऊं देऊं नये; अशा प्रकारच्या स्नेहार्द्र मातापितरांनीं डोळे झांकले व तुमच्याकडे कुटुंबाधिपत्य आलें म्हणजे पाहिजे तर तुम्ही आपले विचार प्रसिद्ध करा. पण तो काल येण्यापूर्वी तसें करून त्यांच्या अंतःकरणास दुखवूं नका, व कृतघ्नपणानें त्यांविषयीं क्रूर निष्ठुरता प्रकट करूं नका. अशा प्रकारच्या निषेधक विधानांत बरेंच अवसान आहे हें आम्ही कबूल करतों. सामान्य दृष्टीस तर अशीं विधानें स्मृतितुल्य भासतात! पण केवळ तत्त्वदृष्ट्या त्यांचा विचार केला तर तीं दिसतात तितकीं मजबूत नाहींत असें लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. मनुष्याच्या कृतज्ञतेवर आईबापांचा जितका हक्क आहे तितका दुसऱ्या कोणाचाही नाहीं, हें आम्हांस कबूल आहे; तसेंच हा हक्क त्यांच्या निःसीम व निर्व्याज प्रेमामुळें त्यांस प्राप्त होतो, हेंही आम्हांस मान्य आहे. पण जर एखाद्या मातापितरांकडून अशा प्रकारचें प्रेम दाखविण्यांत आलें नसेल, व जन्म देण्यापलीकडे त्यांनीं मुलाकरतां कांहीं केलें नसेल तर मुलाच्या कृतज्ञतेवर त्यांचा तितका हक्क पोंचूं शकेल काय? पुष्कळ अविचारी गरीब आईबापें आपणास प्रतिपाल न करण्याइतकीं संतानें अस्तित्वांत आणितात आणि उपजल्यापासून मरेतोंपर्यंत त्यांचें जीवित त्यांस सुद्धां दुःखभार करून टेवतात. अशा आईबापांची कोरडी कळकळ काय कामाची! अशा आईबापांच्या अंतःकरणांत खरें अपत्यवात्सल्य असतें तर त्यांनीं असली संतति जगांत आणिलीच नसती. कित्येक लोक असें म्हणतात कीं मुलें होणें ही कांहीं कोणाच्या हातची गोष्ट नाहीं! नसेल बापडी! पण आम्हांला येवढें टाऊक आहे कीं जरी प्रत्येक लग्न अपत्यावह होतेंच असें नाहीं, तरी लग्नावांचून म्हणजे स्त्रीपुरुषांच्या संयोगावांचून अपत्योत्पत्ति होते असें नाहीं. पावसाप्रमाणें मुलें आकाशांतून पडत असतीं, आणि स्वेच्छेनें घडून येत असलेल्या स्त्रीपुरुषांच्या संयोगाशीं त्यांचा कांहीं संबंध नसून त्यांची पीडा त्यांच्या पाठीमागें लागत असती, तर आईबापांचें निःसीम व निर्व्याज प्रेम आणि त्याबद्दल मुलांची कृतज्ञता यांचें खरें महत्त्व कोणाच्याही मनांत बरोबर उतरलें असतें. मुलें अस्तित्वांत आणणें यांत मुलांवर आईबाप कोणता उपकार करतात हें समजणें थोडें कठिण आहे. जन्माच्या आधींची स्थिति ज्याची त्याला समजत असून कष्टमय असती, आणि तींतून मुक्त होण्यासाठीं मुलें आईबापाकडे प्रार्थना करण्यास येतीं, आणि आईबापें त्यांची विनंति मान्य

करून आपल्या संयोगामुळें त्यांस त्या कष्टावस्थेंतून मुक्त करतीं, तर त्यांच्या हातून मुलांवर मोठे उपकार होते खरे! पण वास्तविक तसा प्रकार नाहीं. जन्मास येऊन कळूं लागल्यावर मरणें सहसा बरें वाटत नाहीं, हें जरी निर्विवाद आहे, तरी जन्मास येण्यापूर्वी जन्मास जातां काय, असा कोणास प्रश्न केला तर त्याकडून 'होय' असें उत्तर खास येईल असें वाटत नाहीं! निदान ज्यांनीं आयुष्यांतील सुखदुःखें अनुभवलीं आहेत, ते तरी फिरून जन्मास येण्याबद्दल रुकार देण्यापूर्वी बराच विचार करतील! तात्पर्य, अन्य कारणामुळें घडलेल्या संयोगापासून अस्तित्वांत आलेल्या संततीचा, केवळ जन्म दिला येवढयाच मुद्दयाच्या आधारानें कृतज्ञतेवर म्हणण्यासारखा हक्क शाबीत करतां येत नाहीं! तसेंच, मुलें अजाण असतां मातापितरांनीं प्रीतिपूर्वक केलेलें त्यांचें संगोपनही त्या हक्काचें विशेष पुष्टीकरण करीत नाहीं! कारण एक तर मुलांना तें प्रेम कळत नसतें, आणि शिवाय आईबापांकडून तें प्रेम कर्तव्य म्हणून नव्हे तर सहज घडत असतें; म्हणजे तसें प्रेम करणें हा त्यांचा स्वभावधर्मच आहे; क्रूर वाघीण देखील आपल्या पिलांवर मनुष्यस्त्रीसारखें प्रेम करते. तेव्हां जो स्वभाव बहुधा सर्व जीवकोटीस साधारण आहे, त्याबद्दल मनुष्यसंततीनेंच विशेष कृतज्ञ कां असावें, हें समजत नाहीं! तथापि समजूं लागण्यापूर्वी किंवा समजूं लागल्यावर ज्यांनां ज्यांनीं निरपेक्ष प्रीति केली असेल, त्यांबद्दल समजूं लागल्यावर कृतज्ञता उत्पन्न होणें हाही मनुष्याचा स्वभावधर्म आहे व ज्याअर्थी आईबापांइतकी निःसीम व निर्व्याज प्रीति कोणीही करीत नाहीं, त्याअर्थी मुलांनीं आईबापांस होईल तितकें सुख देण्याविषयीं व दुःख न होऊं देण्याविषयीं तत्पर असावें, हें त्यांचें कर्तव्य आहे. तथापि येवढयावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, आपणांस कळूं लागल्यापासून आईबापें मरेतोंपर्यंत मुलांनीं हरएक गोष्टींत त्यांचे निखालस गुलाम होऊन रहावें. सामान्य गोष्टींत आईबापांची आज्ञा पाळणें, त्यांना गरज पडल्यास आपणाकडून होईल तेवढी मदत करणें, दुखणेंबाणें असल्यास प्रीतिपूर्वक त्यांस जपणें–सारांश होतां होईल तों त्यांस कोणत्याही प्रकारचे मानसिक किंवा शारीरिक क्लेश न होऊं देणें हें सुपुत्राचें कर्तव्य होय. पण येवढयावरून जर एखादा बाप आपल्या मुलास असें म्हणूं लागेल कीं, राजकीय, सामाजिक, व धार्मिक विचारांच्या संबंधानें माझ्या मतापलीकडे एक

तिळभर देखील तूं जाऊं नको, गेलास तर माझ्या मनाला पराकाष्ठेचे क्लेश होऊन मी मृत्यूच्या पंथास लागेन, किंवा त्यांच्या यातनांतून सुटण्यासाठीं मी आत्महत्या करून घेण्यास प्रवृत्त होईन, तर अशा बापापुढें त्या गरीब बिचाऱ्या मुलानें काय करावें ? संध्या न केल्यामुळें किंवा गंध न लाविल्या-मुळें विहिरींत उडी टाकणारा बाप भेटला तर त्याला तसें करूं देऊन पितृ-हत्येचा दोष माथीं मारून घेण्यापेक्षां गंध लावावें आणि संध्या करावी हें बरें, पण तें लावण्यांत आणि ती करण्यांत अशी कुचराई करावी कीं तीबद्दल त्याला वाईट तर वाटावें पण जीव देण्याची इच्छा मात्र होऊं नये ! अशा प्रकारें लहानसान गोष्टींत त्याला वाईट वाटून घेण्याची संवय लागली म्हणजे पुढें मोठ्या गोष्टींतही तसें होऊं लागेल; व ज्यामानानें ही त्याची संवय दृढ होत जाईल त्या मानानें मुलानें आपला पाय अधिकाधिक सरकावीत असावें ! जीं मुलें सापट आईबापांची खोड अशा रीतीनें काढून टाकण्याचा प्रयत्न करणार नाहींत, त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध एक ब्र देखील काढवणार नाहीं, व तीं मरेतोंपर्यंत आपले विचार आपल्याशीं धुमसत ठेऊन त्यापासून होणारे कष्ट सोसावे लागतील. पण अशा तंट्याच्या बाबींत असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, सारी पड मुलांनींच कां घ्यावी ? आईबापांचें म्हणणें सयु-क्तिक असेल तर त्यांचा हट्ट मुलांनीं पुरवावा हें योग्य आहे; पण ते भलतेंच कांहीं धरून बसतील तर सयुक्तिक विचार गुप्त ठेवण्यापासून होणारें सारें दुःख मुलांनींच कां सोसावें ! ज्याप्रमाणें मुलांनीं आईबापांविषयीं कृतज्ञ असणें अवश्य आहे त्याप्रमाणें आईबापांनींही मुलांच्या सुखाविषयीं आपली पराकाष्ठा करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. जीं आपलपोटीं, विचारशून्य आईबापें कालमानाचा विचार न करतां साऱ्या शहाणपणाचा गड्डा आपल्याच हातीं आहे असें समजून मुलांच्या मनाच्या स्थितीकडे न पहातां त्यांवर सुलतानगिरी चालवूं पहातात, अशा आईबापांस मुलांनींही जुलमी अंमलदारांस भोगाव्या लागणाऱ्या त्रासाची झांक दाखविण्याचा अल्पस्वल्प प्रयत्न केला तर त्यांस त्याबद्दल विशेष दोष देतां येणार नाहीं !

मागल्या अंकात गुरुजनांच्या भयामुळें तोंड कितपत आवरून धरावें याचा विचार केला आहे. आज राजभय आणि लोकभय यांचा पगडा आपणावर कोठंवर चालूं द्यावा, हें पहावयाचें आहे.

सामान्यपणें असा एक नियम घालतां येईल कीं, मनुष्याचे विचार कोणत्याही तऱ्हेचे का असेनात, जर तो ते प्रसिद्ध करतांना म्हणजे भाषणद्वारां किंवा लेखनद्वारां स्पष्ट करतांना बरीच खबरदारी घेईल तर त्याला ते प्रसिद्ध करण्यास मोठीशी पंचाईत पडणार नाहीं. "माझ्या सारख्यांनीं लहान तोंडीं मोठा घांस घेऊं नये; महान् महान् पूर्वाचार्यांनीं लिहून ठेविलेल्या वचनांस चूक म्हणणें हें मोठें धाडस आहे; मी जें म्हणत आहे तें बरोबर आहे असा माझा मुळींच आग्रह नाहीं; त्यांतील चुकीची दुरुस्ती करून घ्यावी, येवढाच माझा हेतु आहे. प्रत्येक गोष्टीस बहुधा दोन बाजू असतात; एका बाजूनें असें म्हटलें तर दुसऱ्या बाजूनें असें म्हणतां येईल येवढेंच सांगण्याचा माझा हेतु आहे"—अशा रीतीनें अत्यंत नम्रतापूर्वक जर उत्तरपक्ष केला तर बहुधा कोणत्याही प्रकारचे विचार बोलून दाखविण्याची पंचाईत पडणार नाहीं असें वाटतें. तसेंच, बोलणें तऱ्हेवाईक असून आचरण रूढ पद्धतीस धरून असेल, तर देखील रूढ विचारांच्या उलट पाहिजे तें बोलण्यास कोणी फारसा अडथळा करणार नाहीं. सूर्योदयापूर्वी स्नान करून होमकुंडांतील अग्नीस आहुति देणारानें, किंवा प्रतिदिवशीं नवीन तयार केलेल्या पार्थिवाची सहस्रबिल्वदलांसह यथासांग पूजा करणाऱ्यानें दुपारीं विद्यार्थीवर्गास चार्वाकमतांचा पाठ दिला तरी त्याला कोणी विशेष नांवें ठेवणार नाहीं. रूढ आचाराविरुद्ध सांगूनसवरून इंचभर जाणें आणि रूढ विचाराविरुद्ध टनभर बोलणें यांपैकीं दुसरें पुरवेल; पहिलें बिलकुल पुरवणार नाहीं! असें नसतें तर वेद पौरुष म्हणणारे धार्मिकांत मोडून जुन्या लोकांच्या स्तुतीस पात्र कां होते? व खिस्त्याच्या हातचें चहाच्या पाण्यासारखें निरुपद्रवी पाणी घेण्यास्तव नैसर्गिक पितृवात्सल्यास पराङ्मुख होऊन वृद्ध मातापितरें पोटच्या गोळ्यास घरांतून बाहेर काढण्यास तयार कां होतीं, व नुकत्याच शेवटास लागलेल्या ग्रामण्यासारखीं प्रकरणें कां माजतीं! अविचारी लोकांस पुष्कळ प्रतिकूल बुद्धिवादापेक्षां यत्किंचित् प्रतिकूल आचार फार विघातक आहे, असें वाटत असल्यामुळें असा परिणाम घडतो हें उघड आहे. तथापि सभ्यां लोकांस, अधिकाऱ्यांस व गुरुजनांस न रुचणारे विचार बोलतां येण्यास कोणत्या हिकमती उपयोगी पडतात, तेवढेंच सांगावयाचें असल्यामुळें या हिकमतशास्त्राची येथें विशेष चर्चा करण्याची गरज नाहीं! यांत

थोडीबहुत फसवणूक आहे, हें कबूल केलें पाहिजे; . पण जे लोक, किंवा जे अधिकारी, किंवा जे गुरुजन केवळ बुजऱ्या तट्टासारखे नवीन गोष्ट ऐकली कीं पाठीवरच्या स्वारीस फेंकून देण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्या डोळ्याला दांभिक आचरणाची झांपडें लावून व मिथ्या नम्रतेच्या शब्दांनीं त्यांस चुचकारून, शहाण्या मनुष्यानें आपलें काम करून घेतलें पाहिजे! भास्कराचार्यांसारख्या पूर्वीच्या अनेक विद्वानांनीं अशा प्रकारची हूल दाखवून समकालीन लोकांची आपणांवरील श्रद्धा उडूं न देतां आपल्या मताचा प्रसार केल्याचीं उदाहरणें या देशांत अगदींच ठाऊक नाहींत असें नाहीं! या गणित्यास चंद्रग्रहणाची खरी उपपत्ति अवगत असून व ज्योतिःशास्त्रविषयक त्याचे विचार सामान्य लोकांच्या समजुतीस अगदीं विरुद्ध असून, तो अत्यंत भाविकांत मोडे असें सांगतात! ठीकच आहे. चंद्रग्रहणांत लोक दोन स्नानें करीत असतील तर भास्कराचार्यांनीं तीन करून लोकांच्या दुप्पट दानें दिलीं म्हणजे ते आपल्या ग्रंथांत राहूला काय म्हणतात हें कोण पाहतो! तथापि हें दुहजबी वर्तन सर्वांनाच संमत होईल असें नाहीं. वागणें एका तऱ्हेचें आणि बोलणें दुसऱ्या तऱ्हेचें—असलें वैपरित्य बहुधा साऱ्यांच्या आचरणांत कमी अधिक प्रमाणानें दृष्टीस पडतें. तथापि तें हिंदु लोकांच्या वर्तनांत जितकें दृष्टीस पडतें तितकें दुसऱ्या कोणत्याही सुधारलेल्या लोकांच्या वर्तनांत दिसत नाहीं. भाषण व वर्तन यांतील परस्पर विरोध हा आमच्या लोकांचा राष्ट्रीय दोष आहे. पर्वा ह्यूमसाहेबांनीं काय सांगितलें तें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आपले खरे विचार उघडपणें बोलून दाखविण्याचें धैर्य आमच्या अंगीं नाहीं, ही आमच्या अंगीं एक मोठी गोम आहे, असें ते उघडपणें म्हणाले, आणि आम्हीं तें माना खालीं घालून निमूटपणें ऐकून घेतलें! अशा प्रकारचा अप्रामाणिकपणा आमच्या हाडामांसास खिळून गेलेला आहे. साहेबलोकांमध्यें आमचें वजन न राहण्यास जीं अनेक कारणें झालीं आहेत, त्यांत हें प्रधान कारण आहे. युरोपांतील मोठ्या लोकांस असल्या अप्रामाणिकपणाचा पराकाष्ठेचा कंटाळा असतो. मतें कितीही विपरीत असलीं म्हणून काय झालें! मनुष्याच्या अंगीं खरी योग्यता असेल व लोकांच्या कल्याणाबद्दल त्याला खरी कळकळ वाटत असेल, तर लोकांच्या रागाची पहिली लाट निघून गेल्यावर ते त्याच्या बोलण्याचा शांतपणानें

विचार करूं लागतात. या गोष्टीचें प्रत्यंतर हवें असल्यास अगदीं अलीकडलें मि. ब्रॅडलॉ यांचें उदाहरण घ्या. हा पुरुष पक्का नास्तिक होता. या नास्तिकपणामुळें त्याला प्रथम कितो हाल सोसावे लागले हें सर्वांना ठाऊक आहेच. पण कोणाची भीड किंवा मुर्वत न ठेवितां सत्यास निरंतर जागृत राहून, गरीब लोकांच्या उन्नतीसाठीं आपला देह झिजवावयाचा, असा याचा निश्चय असल्यामुळें, याशीं मारामारी करणारे, याला पार्लमेंटांतून घालवून लावणारे, याला कारागृहांत पाठविणारे-सारांश, याला मनुष्यरूपी सैतान मानून याचा पाहिजे त्या प्रकारचा छळ करणारे व करावणारे, याचे सामाजिक, राजकीय, व धार्मिक कट्टे शत्रु अखेरीस याला वचकूं लागले इतकेंच नाहीं तर पूज्य मानूं लागले. एकदां याच्या जिवावरचें दुखणें गेलें तेव्हां लोकांनीं व धर्माधिकाऱ्यांनीं देवालयांत जाऊन याच्या अनामयासाठीं प्रार्थना केल्या व घांटा वाजविल्या! पुढें या सत्यनिष्ठ पुरुषानें आमचा पक्ष घेतला तेव्हां आम्हीं त्याचा केवढा उत्सव केला हेंही सर्वश्रुत आहेच! हेंही असो. ग्लॅडस्टन—मोरले या जिवंत जोडप्याचें ठळठळीत उदाहरण या घटकेस आपल्या डोळ्यापुढें आहे. मि. मोरले यांचा नास्तिकपणा जसा सर्वांस श्रुत आहे तसाच मि. ग्लॅडस्टन यांची धर्मश्रद्धाही सर्वांस ठाऊक आहे. धर्मसंबंधानें उभयतांत शुद्ध छत्तीसाचा आंकडा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें असून राज्यप्रकरणांत, विशेषतः ऐरिश प्रकरणांत "शिवस्य हृदयं विष्णू विष्णुस्य हृदयं शिवः" या असंस्कृत सर्वप्रसिद्ध वचनाप्रमाणें यांची गट्टी जमली आहे! कांहीं गोष्टींच्या संबधानें, उदाहरणार्थ मनास शुद्ध वाटेल तें स्पष्ट बोलण्याच्या संबंधानें किंवा कोणत्याही प्रकारच्या लटपटी पासून अलिप्त राहण्यासंबंधानें इंग्रंज लोकांमध्यें मि. ग्लॅडस्टनपेक्षां मि. मोरले यांनाच कांकणभर अधिक मान मिळतो, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि हा सारा प्रकार मि. मोरले यांनीं आपलें नास्तिकपण कोणत्याही प्रकारें गुप्त ठेवलें नसून! तेव्हां काय दिसतें कीं, चार दोन गोष्टींत लोकांस न रुचणारे असे तुमचे विचार असले, आणि ते तुम्ही उघड बोललांत तर कांहीं दिवस ते तुम्हांस त्रास देतील, तुमचा तिरस्कार करतील व तुमचें बोलणें ऐकून घेणार नाहींत, हें जरी खरें आहे तरी सत्य तुमच्या पक्षांत असेल, निदान कोणत्याही क्षुल्लक स्वार्थासाठीं हातीं घेतलेल्या पक्षाच्या वतीनें

तुम्ही भांडत नसाल, लोकांच्या कल्याणाची खरी कळकळ तुमच्या अंतः-करणांत वसत असेल व तें कल्याण घडवून आणण्यासाठीं निरपेक्षबुद्धीनें तुम्ही आपल्या जिवापाड श्रम करीत असाल, तर तुमच्या हातून तें कल्याण होवो अथवा न होवो, तुमचे चांगले हेतु आणि तुमचे निर्लोभी कष्ट या-मुळें लोकांच्या मनांत तुमच्याविषयीं उत्पन्न झालेला पीळ हळूं हळूं नाहींसा होत जाऊन अखेरीस त्यांना तुमच्या गुणांचें महात्म्य समजूं लागेल, व तुम्हांपासून होणाऱ्या फायद्याबद्दल त्यांच्या मनांत तुम्हांविषयीं कृतज्ञता व पूज्यबुद्धि उत्पन्न होतील. तेव्हां कोणत्याही पक्षाच्या किंवा पंथाच्या निशाणा-खालीं जाऊन उभें रहाण्यापूर्वी तो कसा आहे याचा आपल्या मनाशीं पक्का विचार करावा, आणि तो सत्पक्ष आहे अशी आपली बालंबाल खात्री होईल तर बेलाशक त्याचा अंगीकार करावा, आणि त्याच्या प्रसाराकरतां भाषणद्वारा किंवा लेखनद्वारा आपणांकडून होईल तेवढी खटपट चालू करावी. कित्येक लोक असें विचारतात कीं, अशी खटपट करण्यापासून स्वतःच्या अन्नावरच पाय येत असेल तर ती करावी किंवा नाहीं! यावर आमचें साफ उत्तर असें आहे कीं, शेकडा नव्याण्णव लोकांनीं शेकडा नव्याण्णव बाबींत तसें करूं नये. जर तुमचें अन्नच नाहींसें होईल तर तुमच्या हातून पुढें काय होणार! रिकामपोटीं किंवा अर्धपोटीं कोणतेंही काम चांगलें वठावयाचें नाहीं. कांहीं झालें तरी पोटभर भाकर आणि अंगभर कपडा यांची वाण पडावयाची नाहीं, अशी खात्री झाल्यावर मतप्रसाराकरतां पुढें सरण्याचें धैर्य करावें. तोंपर्यंत आंतल्या आंत तयारी करीत असावें. कित्येकदां अकालीं वाफ दवडल्यापासून फार नुकसान होतें; तें थोडया घाईनें करून घेऊं नये. वर्ष दोन वर्षे दम न खाल्ला तर जें काम जेमतेम पांचचार वर्षे करतां येईल तें तो दम खाल्यानें जर पांच पंचवीस वर्षे सुरेखपणानें करतां येणें शक्य असेल, तर उतावीळपणानें मताभिमानाच्या आधीन होऊन अकालीं फुटून निघणें हें ज्याचे त्याला किंवा कोणालाच श्रेयस्कर नाहीं. असें समजा कीं, एका धनाढ्य गुजराचा किंवा ब्राह्मणाचा सोळा सतरा वर्षांचा मुलगा मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिकलेला असून, समाजांत अलीकडे नेहमीं चर्चा होत असलेल्या बालविवाहनिषेधादि विषयांच्या संबं-धानें नवीन लोकांच्या मतांसारखीं त्याचीं कांहीं मतें झालीं आहेत. त्याला

असें बाळकडू लागलें आहे कीं आपण आपलें लग्न स्वतःच्या कमाईनें आपल्या वयाच्या पंचवीस सत्ताविसावे वर्षी बऱ्याच वाढलेल्या म्हणजे अठरा एकुणीस वर्षांच्या वयाच्या मुलीशीं किंवा त्याच वयाच्या गतभर्तृकेशीं करावें. बाप तर असा हट्ट घेऊन बसला आहे कीं, करावयाचें असेल तर मी सांगतों त्या आठ दहा वर्षांच्या मुलीशीं लग्न करण्यास तयार हो, नाहीं तर या घटकेस माझ्या घरांतून नीघ आणि वाट फुटेल तिकडे भीक मागत चालता हो. माझें न ऐकशील तर माझ्या येवढ्या संपत्तीपैकीं एक कवडी देखील मी तुझ्या हातीं पडूं देणार नाहीं; मग येथून पुढें तुझ्या विद्याभ्यासाच्या खर्चाची गोष्ट कशाला पाहिजे! वाचकहो, अशा संकटांत अशा मुलानें काय करावें? आमचें तर असें म्हणणें आहे कीं, शेंकडा नव्याण्णव मुलांनीं अशा स्थितींत आपल्या आईबापांची आज्ञा निमूटपणें मानावी, आणि त्यांस संतुष्ट राखून त्यांनीं कमावलेल्या संपत्तीवर हवा तितका विद्याभ्यास करावा, आणि कालेंकरून त्यांचें डबोलें आपल्या हातीं आलें म्हणजे त्याच्या आणि विद्येच्या जोरावर आपल्या पिढींत हवी तितकी सुधारणा करावी. भाविक व अभाविक, सुधारक व दुर्धारक, धर्मनिष्ठ व पाखंड यांपैकीं नऊशें नव्याण्णव लोक ईझिगोइंग म्हणजे सुखालचेंडू असतात. कोणत्याही गोष्टीकरतां मानेवर खडा ठेवून घेऊन किंवा भूकतहान वगैरे पडतील ते हाल सोसून श्रम करण्याचा त्यांचा मगदूर नसतो. व्याख्यानास जावें, गोडगोड बोलावें; पांचचार वर्तमानपत्रांस किंवा एखाद्या दुसऱ्या पुस्तकास उदार आश्रय द्यावा; मनाची फारच प्रसन्नता असल्यास एखादें छोटेखानी व्याख्यान झोडावें किंवा लहानसें आर्टिकल खरडावें; आणि फारच झालें तर प्रसंगविशेषीं ज्यानें त्यानें पवित्र मानलेल्या कामाकरतां रुपया दोन रुपये वर्गणी द्यावी इतकें केलें म्हणजे बहुतेकांची शिकस्त होते. ज्यांचा इतपतच मगदूर आहे (आणि बहुतेकांचा इतपतच असतो) त्यांनीं आपली भाकरी कायम होईतोंपर्यंत आपल्या आईबापांची किंवा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी आपणावर खप्पा न होऊं देण्याबद्दल फार जपत असावें. कारण अशांना दैन्यावस्थेनें घेरलें तर त्यांच्या हातून पुढें कांहींच व्हावयाचें नाहीं. तेव्हां परावलंबन सुटेतोंपर्यंत किंवा स्वतंत्रता प्राप्त होईतोंपर्यंत अशा लोकांनीं बहुधा तोंडांस कुलूप घालून ठेवावें हेंच बरें. कधीं लाडक्या हट्टानें, कधीं गोडीगुलाबीनें, कधीं

बुद्धिवाद करून, कधीं मृदु भाषणानें अंतःकरणास पाझर आणून, कधीं खोटेंच रुसून बसून जर यांना आपलें काम करून घेतां येत असेल तर त्यांनीं तें खुशाल करून घ्यावें! पण कोणत्याही कारणानें त्यांनीं आपलें सर्वस्वीं नुकसान करून घेऊं नये. बुद्धिमंदिरांत सत्याचा दीप प्रकाशित झाल्याबरोबर वृत्ति आनंदमय होऊन एका प्रकारें ज्यांचें देहावसान सुटतें असा एखादा महात्माच आईबापांची, गणगोतांची, धनद्रव्याची, जातीची, देशाची, किंबहुना समग्र मनुष्यतेची पर्वा न ठेवतां अन्तरोत्थित अमर्याद प्रेरणा-बलाच्या भरंशावर हवें तेवढें महत्कृत्य हातीं घेऊन तें तडीस नेतो! सामान्य मनुष्यांनीं अशा नरवरांचें आश्चर्य करावें, पूजन करावें, स्मरण करावें, शिष्यत्व करावें, पण अनुकरण करूं नये. ज्यांच्या हातून कांहींच होत नाहीं व जे कोणाच्याही साहाय्यावांचून पाहिजे तें करूं शकतात अशा दक्षिणोत्तर ध्रुवापाशीं असणाऱ्या दोन प्रकारच्या व्यक्तींच्या दरम्यान निरनिराळ्या वृत्तांत पडणारे निरनिराळ्या प्रकृतींचे मनुष्य आहेत. तेव्हां ज्यानें त्यानें आपल्या अंगीं शीतोष्ण साहण्याचें कितपत सामर्थ्य आहे याचा नीट विचार करून आपल्या भाषणानें आपल्या गुरुजनांस, आपल्या अधिकाऱ्यांस, किंवा आपल्या लोकांस किती नाखुष करावयाचें याचें अनुमान करावें!

आजपर्यंत या विषयावर लिहून गेलेल्या चार निबंधांत विचार, उच्चार आणि आचार या त्रयींपैकीं पहिल्या दोहोंची बरीच चर्चा झाली आहे, हें वाचकांच्या ध्यानांत असेलच. आज आचारावर दोन ओळी लिहून तूर्त या विषयाचा निरोप घेण्याचा इरादा आहे.

शरीराच्या कोणत्याही भागांत परस्परांशीं संलग्न असलेलीं हाडें, स्नायु, आणि ज्ञानतंतु यांचा पृथक्त्वानें विचार कर्तव्य असला तरी ज्याप्रमाणें एकाच्या संबंधानें लिहीत असतां, दुसऱ्या दोहोंचा उल्लेख केल्यावांचून चालत नाहीं, त्याप्रमाणें विमर्षण, भाषण, आणि आचरण यांपैकीं एकाबद्दल भवति न भवति करीत असतां इतरांविषयीं थोडेंबहुत लिहिल्यावांचून रहावत नाहीं. आपल्या विचारांचा आपल्या उद्गारांवर, आणि त्या दोहोंचा आपल्या वागण्यावर कमी अधिक परिणाम न होणें अशक्य आहे. तेव्हां आतांपर्यंत जें लिहिण्यांत आलें आहे त्यांत आचार अगदींच अस्पृष्ट राहिला आहे असें

नाहीं. तथापि पहिल्या दोहोंपेक्षां हाच विशेष प्रमुख असल्यामुळें, त्याविषयीं थोडासा विस्तार करणें जरूर आहे.

विचाराच्या संबंधानें कोणीं कोणाची मुरवत ठेवण्याची गरज नाहीं; वाटेल त्यानें वाटेल त्या विषयावर वाटेल तसा विचार करावा, हें मत अलीकडील सर्व विचारी लोकांस मान्य झालें आहे. भाषणाच्या संबंधानें थोडा मतभेद आहे. पुष्कळांचें असें म्हणणें आहे कीं, खऱ्या कळवळ्यानें प्रीति करणाऱ्या मातापितरांस व ज्यांच्या सुप्रसन्नतेवर आपला चरितार्थ अवलंबून असतो अशा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस होतां होईल तों आपल्या भाषणानें दुखवूं नये. यांपैकीं दुसऱ्यांची म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांची आमच्या मतें फारशी परवा करण्याची गरज नाहीं. बडतर्फ होऊन घरीं बसण्याचा प्रसंग येणार असला, व दुसऱ्या कोणत्याही रीतीनें बायकांमुलांचें व स्वतःचें पोषण करण्याचा मार्ग नसला तर स्वमताविषयीं उघडपणें विशेष आग्रह धरून बसणें एकंदरीनें चांगलें नाहीं. पण जर स्वमतप्रकाशन या थराला जाण्याचा संभव नसेल तर तें बेलाशक प्रसिद्ध करावें. या दोहोंशिवाय तिसऱ्या कोणत्याही मनुष्याच्या भीतीनें मनास शुद्ध वाटेल तें बोलण्यास डगणें हें भित्रेपणाचेंच चिन्ह होय! वास्तविक पाहिलें तर ज्यांना आपण लोक म्हणतों व ज्यांच्या अपवादाला आपण भीत असतों, त्यांवर आपलें फारच थोडें अवलंबून असतें. लोकांना संतुष्ट राखण्याकरतां स्ववंचन करणें हें महापातक आहे असें समजलें पाहिजे. सामान्य लोक अंधासारखें गतानुगतिक असतात. विचारी पुरुष अशांच्या छंदानें नेहमीं वागतील तर सत्पक्षाचा प्रसार कधींच व्हावयाचा नाहीं. तेव्हां अज्ञानमग्न, अविचारी, आणि ज्यांच्याशीं आपला अर्थाअर्थीं संबंध नाहीं अशा लोकसमुदायाच्या निंदेकडे आणि स्तुतीकडे दुर्लक्ष करून, ज्याच्या मनाला जीं मतें प्रशस्त वाटत असतील त्यांचें त्यानें निर्भयपणें प्रतिपादन करावें. असें केल्यानें उलट पक्षांचें म्हणणें ऐकून घेण्याची व विचारपूर्वक सत्यासत्याचा निर्णय करण्याची संवय सर्वांस लागेल.

आतां कोणते विचार अमलांत आणावे, हा एक कठीण प्रश्न राहिला. यासंबंधानें बहुतेक देशांत फार मोठा मतभेद दृष्टीस पडतो. आचरण रूढ पद्धतीप्रमाणें असल्यास बोलणें तिला कितीही विरुद्ध असलें तरी खपतें, हें मागें एकदां सांगितलेंच आहे. तेव्हां आतां लोक वाईट म्हणतील म्हणून मळलेल्या

वाटेबाहेर पाऊल टाकण्याचा मुळींच प्रयत्न करूं नये कीं काय, व करणें योग्य असेल तर तो कसा व किती करावा याचा निश्चय करणें जरूर आहे. या प्रश्नाचा सहज रीतीनें उलगडा करतां यावा म्हणून मनुष्याच्या सामाजिक आचरणाचे दोन भाग करूं; एक ज्या आचरणाचा इतरांशीं प्रत्यक्ष संबंध आहे तें, व दुसरें ज्याचा तसा संबंध नाहीं तें. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं, समाजांत राहणाऱ्या कोणत्याही मनुष्याच्या आचरणाचा समाजाच्या बऱ्यावाईटाशीं मुळींच संबंध नाहीं असें कसें होईल? हा आक्षेप केवळ निःसत्व आहे असें आम्ही म्हणत नाहीं. तथापि सारासारविचार करून कोणत्या गोष्टींचा खासगी वर्तनांत आणि कोणत्यांचा लौकिक वर्तनांत समावेश केला पाहिजे हें ठरविणें केवळ अशक्य नाहीं. कोणीं किती व कसलें अन्न खावें; कसल्या घरांत रहावें; कोणत्या प्रकारचे कपडे वापरावे; कोणता धंदा करावा; दानधर्म किती करावा; कोणते खेळ खेळावे; कशा प्रकारचा व्यायाम करावा—वगैरे गोष्टींचा लोकांशीं म्हणण्यासारखा संबंध नाहीं. अशा गोष्टींत ज्याचें त्याला पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. याच्या उलट कोणत्याही मनुष्याशीं केलेले करार पाळणें; कोणासही निष्कारण पीडा न देणें; खरें बोलणें; शक्त्यनुसार परोपकार करणें; कायदे पाळणें; कर देणें वगैरे गोष्टींत लोकांशीं संबंध येतो, आणि म्हणून त्या गोष्टी रूढ, राजकीय व सामाजिक नियमांस अनुसरून करणें जरूर आहे. पण हे नियम ज्याला मान्य नसतील त्यानें काय करावें? या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी लौकिक वर्तनाचेही जे दोन पोटविभाग आहेत ते येथें सांगणें जरूर आहे. एक लोकांस संमत पण लोकांत अद्यापि रूढ न झालेलें वर्तन; दुसरें असंमत व अरूढ वर्तन. उदाहरणार्थ वेळाच्या संबंधानें कडक नियमितपणा हा गुण कोणालाही वाईट आहे असें तर म्हणवत नाहीं; पण त्याप्रमाणें वर्तन करणारा मनुष्य सहसा लोकप्रिय होत नाहीं. कारण बहुतेक लोकांस 'वेळाचें मोल' समजत नसतें! याप्रमाणेंच सत्य भाषण, प्रामाणिकपणा, व्यवस्थितपणा वगैरे लोकसंमत पण लोकांच्या प्रत्यक्ष आचरणांत बाताबेतानेंच दृष्टीस पडणाऱ्या गुणांची गोष्ट आहे. अशा गुणांच्या संबंधानें लोक आपणास काय म्हणतील याचा बिलकुल विचार करूं नये. ज्यानें त्यानें आपल्या अंगीं असेल तेवढ्या धैर्यानें असले

गुण आपल्या वर्तनांत आणून लोकांत त्यांचा पसारा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आतां लोकांस असंमत पण स्वतःस पसंत वाटणाऱ्या गोष्टींच्या-संबंधानें काय करावें, येवढ्या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें राहिलें व तें उत्तर इतकेंच आहे कीं, ज्या असंमत वर्तनाचा लोकांशीं प्रत्यक्ष संबंध नसेल, पण जें स्वतःच्या मनाला प्रशस्त वाटत असेल त्यांत त्यांच्या भीतीनें बिलकुल फेरफार करूं नये. **मनःपूतं समाचरेत्** या मंत्राच्या खऱ्या अर्थाच्या अनुरोधानें असलें वर्तन चालूं द्यावें. राहतां राहिलें लोकांशीं प्रत्यक्ष संबंध येण्यासारखें पण त्यांस पसंत न पडणारें वर्तन. असें वर्तन परिणामीं लोकांस खरोखरी कल्याणावह होणार आहे अशी ज्याची पक्की खातरी झाली असेल, त्यानें असा विचार केला पाहिजे कीं, जर आपण लोकांस न जुमानतां इवेतसे वागत सुटलों तर परिणामीं आपल्या वर्तनांतील चांगुलपण त्यांच्या नजरेस येऊन ते आपलें अनुकरण करतील किंवा त्यांस आपला तिटकारा येऊन ते आपणास मुळींच सोडून देतील. ज्याला बहिष्कार म्हणतों तो अशाच प्रकारच्या लोकांच्या तिटकाऱ्याचा परिणाम होय. ज्या बहिष्कारामुळें लोकांशीं मुळींच संबंध तुटण्याचा संभव आहे, म्हणजे ज्यामुळें बहिष्कृतांची कायमची निराळी जात होण्याचा संभव आहे, असा बहिष्कार होतां होईल तों टाळावा. कारण, लोकांची सुधारणा व्हावी अशी ज्यांची खरी इच्छा असेल ते लोकांपासून अजीबात तुटून निघाल्यानें ती कधींच होण्याचा संभव नाहीं. तथापि कांहीं वर्षें लोकांपासून निराळे राहिल्यानें, त्रास सोसल्यानें, ती होण्याची खात्री असेल, व त्या सुधारणेच्या चांगुलपणाचें उदाहरण त्यांस घालून देणें अवश्य असेल तर मनुष्यजातीचें हित चिंतणाऱ्या सत्यनिष्ठ धीरांनीं तसें करण्यास मागेंपुढें पहातां कामा नये. तात्पर्य काय कीं, लोकांच्या कल्याणाचा जो हेतु मनांत धरला असेल तो कोणत्या उपायानें लौकर तडीस जाईल व कोणत्या साधनानें एकंदरींत आपल्याला किंवा दुसऱ्याला कमींत कमी त्रास होईल याचा शांतपणानें निश्चय ठरवून तदनुसार वर्तन करावें, हेंच सत्पुरुषास योग्य आहे. हा निश्चय करतांना खरी सुधारणा कशांत आहे हें फारच काळजीनें ठरविलें पाहिजे. कारण वारंवार होतें काय कीं, विशिष्ट वासनाधीन किंवा मताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशांत आहे हें नीट न समजून,

जेवढें जुनें असेल तेवढें फेंकून देण्यांत व कसल्या तरी नवीन गोष्टींचा अंगीकार करण्यांत आपण सुधारणा करीत आहों असा भ्रम होतो! असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षां दुर्धारक म्हणणें हेंच बरें! उदाहरणार्थ, हिंदु धर्मांत बरींच व्यंगें आहेत म्हणून यहुदी, महंमदी, ख्रिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देतां येणार नाहीं. तसेंच, आमचे कांहीं रीतिरिवाज मूर्खपणाचे आहेत म्हणून प्रत्येक गोष्टींत परकीयांचें अनुकरण करणें हेंही कोणत्याही दृष्टीनें ज्याचें त्याला किंवा इतरांला परिणामीं विशेष सुखावह होण्याचा संभव नाहीं, असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ, कित्येक प्रसंगीं धोतरें नेसणें सोईस्कर नाहीं म्हणून युरोपिअन लोकांप्रमाणें दिवसभर पाटलोण घालून बसणें, किंवा ते लोक विशेष कामाकडे कागदांचा उपयोग करतात म्हणून आपणही तसें करणें हें केवढें मूर्खपण आहे बरें! ज्या देशांत आपले शेकडों पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले; ज्या देशांतील हजारों विद्वांनी अनेक गोष्टींत मोठ्या कष्टानें केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणांस ऐतेंच प्राप्त झालें—अशा देशांतील धर्माचा, रीतरिवाजांचा व लोकांचा सर्वथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधींही शोभणार नाहीं. स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत, आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवाच्या निंदेस किंवा छलास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहींत तर फक्त शृंखलांतर करतात! अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींही सुटावयाची नाहीं. भरतखंडांत अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षां तें आहे त्या प्रकारचेंच **गुलामांचें राष्ट्र** राहिलें तरी हरकत नाहीं! पण अलीकडील चिन्हांवरून आम्ही नवीन खोड्यांत आपले हातपाय अडकूं न देतां ते जुन्या खोड्यांतून बाताबेतानें काढून घेण्यास समर्थ होऊं, अशी आशा दिसत आहे! या उप्पर भवितव्यता काय असेल कोण जाणे!!

## शिक्षणाबद्दल सक्ती करावी काय? : : : : २५

"Educate the people" was the first admonition addressed by Penn to the colony which he founded. "Educate the people" was the legacy of Washington to the nation which he had saved. "Educate the people" was the unceasing exhortation of Jefferson.

Speech on Education delivered by Lord Macaulay in the House of Commons in 1847.

हौस ऑफ् कामन्स सभेंत लॉर्ड मेकॉले यांनीं लोकशिक्षणावर १८४७ त जें भाषण केलें त्यांतून वरील उतारा घेतला आहे. पेननं जी वसाहत केली तिला त्याचें पहिलें सांगणें असें होतें कीं, "लोकांस शिक्षण द्या;" ज्या राष्ट्राला **वाशिंग्टननें** दास्यांतून सोडविलें त्याकरतां "लोकांस शिक्षण द्या" या उपदेशाचें धन त्यानें मागें ठेविलें होतें. "लोकांस शिक्षण द्या" अशी **जेफरसन** याची अहर्निश प्रार्थना असे.

पेन्सिलव्हॅनिआ प्रांताचा प्रख्यात प्रस्थापक **केकर वुइलिअम पेन,** अमेरिकेस स्वातंत्र्य देणारा वीरमणि **जॉर्ज वॉशिंग्टन्** व अमेरिकेंत लोकसत्ताक राज्याचा मजबूत पाया घालण्यांसाठीं ज्यानें आपलें बुद्धिसर्वस्व खर्च केलें, तो सर्वश्रुत तिसरा प्रेसिडेंट **जेफरसन**-अशा तीन पुरुषांच्या नांवांचा उच्चार करण्यांत आपण आपल्या पक्षास मोठी सबळता आणीत आहों, असें लॉर्ड मेकॉले यास वाटून त्यांनीं हीं तीन मोठीं नांवें हौस ऑफ् कामन्स सभेंत काढलीं असावीं हें उघड आहे. १८४७ मध्यें इंग्लंडांत प्राथमिक शिक्षणाबद्दल सरकारनें सक्तीचा कायदा करावा किंवा नाहीं याविषयीं मोठया कडाक्याचा वाद चालला होता. मेकॉलेसाहेब अस्तिपक्षास होते. या प्रश्नाचा विचार करण्याकरितां जी कमिटी नेमिली होती तिचे ते सेक्रेटरी होते. विद्येपासून मनावर होणारे परिणाम आणि विद्याप्रसाराची आवश्यकता यांसंबंधानें मेकॉलेच्या विचारांइतके विशद व उदार विचार त्या पिढींत फारच थोडया विद्वान् लोकांचे होते. गरीब लोकांस थोडेबहुत शिक्षण सरकारानें देणें यांत

सरकाराकडून लोकांवर जुलूम होत नाहीं इतकेंच नाहीं, तर तशा प्रकारच्या शिक्षणाकरतां कमी अधिक सक्ती करणें हें सरकारचें कर्तव्य होय, असें त्याचें पक्कें मत झालेलें होतें. ज्यांना इंग्रजी येत असेल त्यांनीं मेकॉलेसाहेबांचें हें भाषण अवश्य वाचून पहावें. आम्हांस त्यांतील उतारा येथें घेण्याची बुद्धि होण्यास सध्यां बडोद्याकडे यासंबंधानें जी जागृति झाल्यासारखी दिसत आहे ती कारण झाली. बडोद्याच्या एजुकेशनकमिटीनें जे प्रश्न काढले आहेत त्यांत कंपल्सरी एजुकेशनबद्दल म्हणजे सरकारानें कांहीं एक प्रकारच्या शिक्षणाबद्दल लोकांवर सक्ती करणें योग्य आहे कीं नाहीं, असा प्रश्न घातला आहे; आणि शिक्षणाच्या संबंधानें दुसऱ्या कोणत्याही सूचना करण्यापूर्वी या प्रश्नाचें स्पष्ट उत्तर देणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें. लोकशिक्षणाशीं सरकाराचा संबंध असावा किंवा नाहीं, व तो असावा असें असेल तर प्रत्येक व्यक्तीस थोडेबहुत शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करणें हें सरकारचें कर्तव्य आहे किंवा नाहीं, हे प्रश्न सयामी जुळ्याप्रमाणें एकमेकांशीं संलग्न आहेत. महत्त्वाच्या इतर प्रश्नाप्रमाणें यांसही उपपत्ति आणि क्रिया अथवा शास्त्र आणि प्रयोग, अशीं दोन अंगें आहेत. गेल्या शतकाच्या अखेरीस व चालू शतकाच्या आरंभास या प्रश्नाविषयीं युरोपांत मोठा वादविवाद चालला होता. अलीकडे बहुतेक सुधारलेल्या लोकांत यासंबंधानें ऐकमत्य होऊन त्या वादाचा निरास झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. युरोपांतील बहुतेक देशांनीं लोकशिक्षण हें सरकाराचें कर्तव्य मानून तें अमलांत आणण्यासाठीं निरनिराळ्या तऱ्हेचे कायदे केले आहेत. फक्त रशिया देशांत शिक्षणाबद्दल सक्तीचा कायदा नाहीं. पण याचा परिणाम असा झाला आहे कीं, रशियासारखी अज्ञान प्रजा दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं. मुसलमानी तुर्कस्थानांत देखील यासंबंधानें सक्तीचा कायदा झालेला आहे. आतां त्या लोकांच्या विशिष्ट प्रकारच्या सामाजिक व धार्मिक स्थितीमुळें त्याचा नीट अंमल होत नाहीं ही गोष्ट निराळी. पण साऱ्या लोकांस लिहितां वाचतां व हिशेब करतां येणें हें अत्यंत उपयोगी आहे अशी या क्रूर, मिजासखोर, बेपर्वा, आळशी, स्त्रीमस्करी, व विषयासक्त लोकांतील मुत्सद्यांची व राजकारणी पुरुषांचीही खात्री झाली आहे ! आमच्या देशांत साऱ्या विद्येचा मक्ता ब्राह्मण जात बळकावून बसल्यामुळें, किंवा त्यांनी हा मक्ता बळकाविला त्यांना आणि त्यांच्या वंश-

जांना ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त होऊन बाकीचे लोक अक्षरशत्रु राहिल्यामुळें,या घटकेस या प्रश्नाहून अधिक महत्वाचा दुसरा प्रश्न दिसत नाहीं. आमच्या सांप्रत शोचनीय स्थितीचा जो कोणी शांतपणानें विचार करील त्याला लोकशिक्षणाशिवाय ही आमची स्थिति सुधारण्याचा दुसरा उपाय नाहीं असें दिसून आल्यावांचून राहणार नाहीं. सरकारपाशीं हें काम तडीस नेण्याइतके पैसे असोत किंवा नसोत; सरकारनें किंवा लोकांनीं हें काम मनापासून हातीं घेतल्याशिवाय आमची खरी,टिकाऊ व वाढत जाणारी सुधारणा होण्याचा बिलकूल संभव नाहीं. पण ही पैशाची अड्चण फक्त ब्रिटिश अमलांतल्या प्रजेसच लागू आहे; ती नेटिव संस्थानांस लागू नाहीं; कारण, इंग्लिश राज्यामुळें नेटिव संस्थानिकांस स्वसंस्थानांतर्गत शांतिमय सुधारणांशिवाय दुसरें कांहींच करावयाचें राहिलेलें नाहीं. बहुतेक संस्थानिक स्वसुखाभिलाषी बनून जाऊन या व इतर कर्तव्यांकडे मुळींच लक्ष देत नाहींत ही गोष्ट निराळी; पण देतील तर या किंवा दुसऱ्या खंडांतल्या कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रापेक्षांही त्यांस या कामांत विशेष यश कां मिळवितां येऊं नये हें आम्हास समजत नाहीं.

लोकशिक्षणाविषयीं विचार करतांना गोंधळ होऊं न देण्यासाठीं ज्या दोन गोष्टी नेहमीं डोळ्यापुढें ठेविल्या पाहिजेत त्या ह्या. लोकशिक्षण म्हणजे उच्चप्रतीचें किंवा धंदेशिक्षण नव्हे. लहानापासून थोरास व गरीबापासून श्रीमंतास नित्याच्या व्यवहाराला घडोघडी उपयोगी पडणारें असें जें बुद्धिविकासक अत्यंत स्वल्प प्राथमिक शिक्षण त्याचाच सक्तीच्या शिक्षणांत अंतर्भाव केला पाहिजे. कोणत्याही प्रकारच्या धर्ममतांशीं या शिक्षणाचा बिलकुल संबंध नाहीं; तसेंच या शिक्षणापासून चरितार्थ चालविण्यास उपयोगी पडणाऱ्या कोणत्याही धंद्याचें ज्ञान प्राप्त होत नाहीं. तसेंच अशा प्रकारच्या शिक्षणाविषयीं सक्ती करणें म्हणजे अमुक प्रकारच्या शाळांत, अमुक फी देऊन, अमुक वर्षें मुलें पाठविणें असाच केवळ अर्थ नाहीं; तर अमुकएक शिक्षण अमुकएक वयाच्या आंत प्रत्येक मुलीस व मुलास मिळण्याची खबरदारी त्यांच्या आईबापांनीं किंवा पालकांनीं घेतलीच पाहिजे, न घेतल्यास ते अमुक दंडास पात्र होतील, असा अर्थ आहे. प्रजेचें हित चिंतणाऱ्या प्रत्येक सरकारानें असा नियम करून तो अमलांत आणावा व त्याकरतां लागेल तेवढा खर्च आनंदानें करावा, असें आमचें मत आहे. तथापि कोणत्याही लोकांस

किंवा सरकारास ज्ञानाचें खरें महत्त्व समजून येऊन या गोष्टीची योग्यता कळण्यास बरींच वर्षें लोटावीं लागतात! स्पार्टन व अथीनिअन लोकांस लोकशिक्षणाची थोरवी चांगली समजली होती, व त्यामुळें त्या दोन्हीही लोकांनीं सर्व प्रतीच्या लोकांस प्राथमिक शिक्षण मिळण्याबद्दल फार वाखाण-ण्यासारख्या सोई केल्या होत्या. रोमन लोकांनीं अर्ध्या अधिक पृथ्वीचें राज्य केलें, पण लोकशिक्षणाचें खरें महत्त्व त्यांस शेवटपर्यंत समजलें नाहीं. अली-कडील युरोपीय राष्ट्रपद्धतीचा मूळ प्रस्थापक फ्रेंच लोकांचा इतिहासप्रसिद्ध राजा शार्लमेन यानें लोकांत विद्याप्रसार करण्यासाठीं पराकाष्ठेचे श्रम केले. त्यानंतर ल्यूथर व त्याचा मित्र मिलँक् थॉन यांसारखे या शिक्षणाचे कैवारी सोळाव्या शतकांपर्यंत युरोपाच्या इतिहासांत दृष्टीस पडत नाहींत. या धर्म-सुधारकांची बालंबाल अशी खात्री होऊन गेली होती कीं, रुग्णावस्थेप्रत पावलेल्या ख्रिस्ती धर्माचें संशोधन करण्यास विद्याप्रसाराहून दुसरें चांगलें साधन नाहीं. या दोघांनीं या कामीं जी मेहनत घेतली तीमुळें युरोपांतील इतर लोकांपेक्षां जर्मन लोकांस विद्येचें खरें महत्त्व अगोदर समजून आलें, आणि म्हणून अलीकडील युरोपीय राष्ट्रांत विद्यावृद्धीच्या व विद्याप्रसारच्या कामांत जर्म-नीचा पहिला नंबर आहे. इंग्लंड, इटली, ऑस्ट्रिया, युनायटेड स्टेट्स् वगैरे मोठमोठया देशांनीं प्राथमिक शिक्षणाकरतां सक्तीचे कायदे केले आहेत यांत कांहीं नवल नाहीं; पण पोर्तुगाल, स्वीडन, बेल्ज्यम, डेन्मार्क इत्यादि व म्हैसूर, बडोदें, किंवा (निझाम) हैद्राबादेसारख्या संस्थानतुल्य लहान लहान स्वतंत्र देशांनीं देखील प्रत्येक मुलास व मुलीस प्राथमिक शिक्षण मिळण्याकरतां नानातऱ्हेचे नियम करून त्यांचा बरोबर अंमल होण्यासाठीं मोठा खर्च टेविला आहे. इतर थोर पुरुषांप्रमाणें **पीटर धी ग्रेट** यालाही विद्याप्रसाराचें खरें महत्त्व समजलें होतें, पण रशियन लोकांच्या मूढ अज्ञाना-मुळें व रानटीपणामुळें त्याच्या प्रयत्नास यश आलें नाहीं. चिनी लोक पूर्वीपासून या गोष्टीची महती जाणून आहेत. जपानी लोकांनीं अलीकडे प्रत्येक चांगल्या गोष्टींत युरोपिअन व अमेरिकन लोकांचें अनुकरण झपाट्यानें चालविलें आहे हे आपणांस ऐकून व वाचून टाऊक झालेंच आहे. आरंभीं दिलेला उतारा वाचल्यावर युनायटेड स्टेट्समध्यें यासंबंधानें कशी व्यवस्था असेल हें कोणासही सांगावयास नको. या सर्व गोष्टी मनांत आणिल्या असतां काय दिसून येईल

कीं, आमच्या पूर्वेस आणि पश्चिमेस ज्ञानरवि कमीअधिक तेजानें प्रकाशूं लागला असून आम्ही मात्र अज्ञानाच्या गाढ तिमिरांत चांचपडत पडलों आहों! आम्ही खालसा मुलखांतले लोक त्यांतून केव्हां पार पडूं ते पडूं. पण मोठया संस्थानिकांनीं आपल्या संस्थानांत 'ज्ञानमय प्रदीपाचें' प्रज्वलन करण्यास मागेंपुढें कां पहावें हें समजत नाहीं. यासंबंधानें त्यांच्या मनांत येण्यासारख्या ज्या चारदोन शंका आहेत त्या सहज परिहार करण्यासारख्या आहेत, असें आजच दाखविलें असतें; पण स्थलसंकोचामुळें पुढल्या आठवड्यापर्यंत लेखणीस व मनास ओढून धरणें भाग पडत आहे.

---

## प्राथमिक शिक्षण सरकारचें अवश्य कर्तव्य आहे : २६

सरकारानें काय करावें आणि काय न करावें याविषयीं युरोपांत पुष्कळ मतभेद आहे; पण त्या मतभेदांत आम्हांस पडण्याची गरज नाहीं; कारण **राजा कालस्य कारणम्** या तत्त्वाचें आम्ही आशियाखंडांतील लोक परम भक्त आहों. कुटुंबाधिपतीला कुटुंबांत जो अधिकार असतो तो राजाला राष्ट्रांत असावा, अशी आमची फार जुनी समजूत आहे. प्रजा राजाचीं लेकरें; राजा प्रजेचा पिता; राजानें स्वापत्याप्रमाणें प्रजापालन करावें; सूर्याचे प्रखर किरण आपल्या शिरावर घेऊन ज्याप्रमाणें महावृक्ष आश्रयास येणाऱ्या पादचाऱ्यांस सुखकर छाया देतात त्याप्रमाणें राजांनीं रात्रंदिवस कष्ट साहून लोकाराधन करावें हीच त्यांची खरी वृत्ति होय; अशा प्रकारच्या राजधर्मसंबंधक कल्पना ज्यांच्या हाडास खिळून गेल्या आहेत त्यांना 'राजानें लोकांस प्राथमिक शिक्षण अवश्य दिलें पाहिजे' असें प्रतिपादणारा कांहीं तरी बहकतो आहे असें कधींच वाटण्याचा संभव नाहीं. दुसरें, युरोपिय लोकांनीं राजाच्या किंवा सरकाराच्या व्याख्येची व्याप्ति कितीही संकुचित केली तरी प्राथमिक शिक्षण तींत आल्यावांचून राहत नाहीं; कारण कर्तव्याची मर्यादा ज्यांनीं अत्यंत सूक्ष्म केली आहे त्यांचें देखील असें म्हणणें आहे कीं, लोकांच्या मालमत्तेचें आणि जीविताचें संरक्षण करणें हें सरकाराचें आद्य कर्तव्य होय. सरकाराच्या कोणत्याही व्याख्येंत ही गोष्ट येत नाहीं; असें होत नाहीं; आणि ही गोष्ट

घडवून आणण्यास लोकशिक्षणासारखें प्रशस्त साधन नाहीं. तेव्हां लोकशिक्षण हें सरकाराचें अवश्य कर्तव्य आहे हें सिद्ध झालें. यावरून काय दिसतें कीं, राजा अथवा सरकार यांच्या कर्तव्याविषयीं पाश्चिमात्य लोकांची समजूत घ्या, किंवा पूर्वात्य लोकांची समजूत घ्या; लोकांस थोडेंबहुत शिक्षण देण्याची जबाबदारी कोणत्याही शास्त्यास वाजवी रीतीनें टाळतां येणार नाहीं. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, हें कर्तव्य स्पष्ट आहे तर आजपर्यंत तें सर्व ठिकाणीं बजावण्यांत कां आलें नाहीं, व लोकांच्या मालमत्तेचें आणि जीवितांचें संरक्षण करण्यास लोकशिक्षणाइतकें दुसरें प्रशस्त साधन कशावरून नाहीं? यापैकीं पहिल्या शंकेचें उत्तर असें आहे कीं, आजपर्यंत खुद्द राजे लोकांस किंवा सरकारासच लोकशिक्षणाचें खरें महत्त्व नीट समजलें नव्हतें; तेव्हां त्याबद्दल त्यांनीं म्हणण्यासारखी दक्षता दाखविली नाहीं, याबद्दल त्यांच्याकडे दोष नाहीं, पण अलीकडे हें महत्त्व सर्वांस समजून आलें आहे किंवा समजावून देतां येण्यासारखी स्थिति प्राप्त झाली आहे; आणि म्हणून आतां किंवा येथून पुढें लोकानुशासनाचें काम ज्यांच्याकडे येईल त्यांनीं लोकशिक्षणाची जबाबदारी आपल्या अंगावर न घेणें अत्यंत दूषणीय होणार आहे. दुसऱ्या शंकेच्या संबंधानें आम्ही उलट असा प्रश्न करतों कीं, लोकशिक्षण हें लोकांच्या मालमत्तेच्या आणि जीविताच्या संरक्षणाचें प्रशस्त साधन नसेल तर दुसरें कोणतें आहे? फटके मारणें, खोड्यांत घालणें, मुसक्या बांधणें, अंधेऱ्या कोठडींत कोंडून घालून कांजी पाजणें, साध्या किंवा सक्त मजुरीची शिक्षा देणें, बिड्या ठोकणें, तोफेचे गोळे उचलावयास लावणें, काळ्या पाण्यावर धाडणें, फांशीं देणें, गोळ्या घालणें—हींच प्रशस्त साधनें आहेत कीं काय? रोग होऊं देऊन मग ते तीव्र उपायांनीं बरे करीत बसणें किंवा ते मुळींच न होऊं देणें हें प्रशस्त? रोगाविर्भाव झाल्यावर त्याचा प्रतिकार करणें प्रशस्त असेल तर देवी कशासाठीं काढूं देता? महारोग्यांस इतरांप्रमाणें समाजांत हवेंतसें मिसळूं कां देत नाहीं? घरांत व घराबाहेर घाण करणारास शिक्षा देण्याचे अधिकार म्युनिसिपालिट्यांस, लोकलबोर्डांस, पाटीलकुळकरण्यांस, मामलतदारांस आणि इतरांस कशासाठीं दिले आहेत? वाख्याच्या उपद्रवाचा आरंभ झाला नाहीं तों पाण्याची स्वच्छता राखण्याबद्दल, एका गांवचे लोक दुसऱ्या गांवांत जाऊं न

देण्याबद्दल, ठिकठिकाणीं डांबराच्या व गंधकाच्या भट्टया पेटवून फेनिलानें घाणीच्या जागा शिंपडण्याबद्दल इतकी घडपड कां करतां? कुजलेलें मांस, सडलेलीं फळें, व नासलेल्या भाज्या बाजारांत कां विकूं देत नाहीं? या सर्व गोष्टी झालेल्या रोगाच्या प्रतिकारार्थ आहेत, कीं ते न होऊं देण्याचे उपाय आहेत? तसेंच यासंबंधानें सरकारनें सक्ती करणें वाजवी आहे असें म्हणतां कीं गैरवाजवी आहे असें म्हणतां? जर या गोष्टी, रोगांची होतां होईल तों उत्पत्ति किंवा त्याचा प्रसार न होऊं देण्यासाठीं करण्यांत येत असतील, आणि त्या सरकारानें करणें प्रशस्त व अवश्य असेल तर बाकी साऱ्या रोगांहून अतिशय भयंकर व दुष्ट जो अज्ञानरोग तो नाहींसा करण्याबद्दल किंवा त्याचे दुष्परिणाम न घडूं देण्याबद्दल जो प्रशस्त उपाय आहे तो सरकारनें न करावा असें तुम्ही कोणत्या आधारावर म्हणणार? हा अज्ञानरोग तुम्हांस क्षुद्र वाटतो काय? जर तो तुम्हांस तसा वाटत असेल तर तुमच्या विचारांत मोठी चूक होत आहे. हा अज्ञानरोग सर्व शारीरिक रोगांच्या मुळाशीं आहे इतकेंच नाहीं, तर झाडून साऱ्या मानुषीय विपत्तीचें हाच बीज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पारतंत्र्याच्या यातना कोण सोशीत आहेत? दारिद्र्यानें कोण पीडिले आहेत? नित्याच्या चरितार्थाची कोणास पंचाईत पडते? दुसऱ्याच्या लाथाबुक्क्या नित्यशः कोणास खाव्या लागतात? यत्किंचित् कारणास्तव मारामाऱ्या करण्यास व खून पाडण्यास कोण तयार होतात? तुरुंग बहुधा कोणत्या प्रकारच्या लोकांनीं भरलेले असतात? वेडेपणाच्या धर्मसमजुतीनें नानाप्रकारचे देहदंड कोण सोसतात व धर्मसंबंधीं तंटे कोण माजवितात? अल्प वस्त्र, अल्प अन्न, व अमंगल वसति यांच्या योगानें होणारे अनंत हाल कोणास भोगावे लागतात? या सर्व विपत्ति विशेषतः अज्ञान लोकांस छळीत नाहींत असें जर कोणी सिद्ध करून देईल तर लोकशिक्षणांत सरकारनें हात घालण्याची किंवा तें आपलें अवश्य कर्तव्य आहे असें मानण्याची गरज नाहीं, असें आम्ही खुशाल कबूल करूं! कोणत्याही मनुष्यावर चोरीचा किंवा खुनाचा आरोप शाबीत झाला असतां त्याच्या अपराधाच्या मानानें त्याला हवी ती शिक्षा ठोठावण्याचा अधिकार न्यायाधिशाकडे ठेवण्यांत जर तुम्हांला अवघड वाटत नाहीं तर त्या मनुष्याला चोर किंवा खुनी न होऊं

देणाऱ्या साधनांचा उपयोग करण्याचा अधिकार त्याकडे ठेवण्यास तुम्ही इतके आढेवेढे कशासाठीं घ्यावे हें समजत नाहीं.

या विचारसरणीवर कित्येक लोक असा आक्षेप घेतील कीं, अगोदर शिक्षणापासून किंवा ज्ञानार्जनापासून हटकून चांगले परिणाम होतात असें कोणासही म्हणतां येणार नाहीं व ते होतात असें वादाकरितां क्षणभर मानिलें तरी तें शिक्षण सरकारानें सक्तीनें दिलेंच पाहिजे असें होत नाहीं; तें मुलाच्या आईबापांनीं किंवा लोकांचें लोकांनीं दिलें तरी चालणार आहे. अमुक गोष्ट चांगली आहे असें पक्कें समजल्यावर लोक ती आपण होऊन करतात; सरकारानें तीबद्दल सक्ती करण्याची गरज नाहीं. द्रव्य संपादन करणें, लौकिक मिळविणें, सुख भोगणें, रुचेल तो पदार्थ विकत घेणें वगैरे गोष्टी याप्रमाणें जात्या इष्ट असल्यामुळें ज्याचा तो त्या मिळविण्याचा प्रयत्न करतो व सरकारास त्याबद्दल सक्ती करावी लागत नाहीं, त्याप्रमाणेंच शिक्षण ही चांगली व इष्ट वस्तु आहे म्हणून ती ज्याचा तो आपल्या शक्त्यनुसार संपादन करील; तींत सरकारानें पडण्याची गरज नाहीं. या दोन आक्षेपांपैकीं दुसऱ्याचें उत्तर फार थोडक्यांत देण्यासारखें आहे तें असें:—शिक्षणाचें महत्त्व साऱ्या लोकांस चांगलें समजून आलें आहे, असें असेल तर आजपर्यंत त्याचा आपोआप प्रसार कां झाला नाहीं ? उदार लोकांच्या औदार्यानें किंवा समंजस लोकांच्या परिश्रमानें प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापण्यांत येऊन लोकसंख्येच्या मानानें त्यांची संख्या वाढत जाती तर या कामीं सरकारानें सक्ती करावी किंवा नाहीं, असा प्रश्न कधींच न उद्भवतां व कोणत्याही सरकारास त्यासंबंधानें सक्तीचे कायदे करावे न लागते. पण खरी स्थिति अशी आहे कीं, साऱ्या लोकांस शिक्षणाचें महत्त्व समजलेलें नाहीं व तें समजलें तरी तें सर्वांस प्राप्त होण्याची तजवीज त्यांच्या हातून घडून येणें या दोन अगदीं निराळ्या गोष्टी आहेत. आळस हा घातक आहे असें कळत असून आळसांत वर्षांच्या वर्षें लोटणारे, आणि ज्ञान फायदेशीर आहे हें समजत असून त्याची पर्वा न करणारे काय थोडे लोक आहेत ! त्याप्रमाणेंच प्राथमिक शिक्षण अत्यंत उपयोगी आहे अशी साऱ्या लोकांची पक्की खातरी झाली तरी सरकारानें थोडीबहुत सक्ती केल्याशिवाय प्रत्येक मुलीस व मुलास वयांत येण्यापूर्वीं तें शिक्षण देण्याची व्यवस्था लोकांच्या हातून होईल असें

आम्हांस वाटत नाहीं. मुलें घरच्या घरीं शिकोत; जर्मनीप्रमाणें स्थानिक कमिट्यांनीं किंवा खाजगी लोकांनीं घातलेल्या शाळांत शिकोत; किंवा इंग्लंडाप्रमाणें सरकारी किंवा मदतीच्या शाळांत शिकोत, सहा आणि चौदा किंवा आठ आणि चौदा वर्षांच्या दरम्यान त्यांस अमुक एक शिक्षण मिळालेंच असलें पाहिजे, अशी सरकारानें सक्ती केल्याशिवाय प्रत्येक प्रौढ स्त्रीस किंवा पुरुषास आपलें पत्र आपण लिहितां किंवा वाचतां येण्याची व आपल्या निशाणीची रेघ काढण्याकरतां दुसऱ्यास न बोलावण्याची वेळ कधींही येणार नाहीं. प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी कोणावरही पडो, तें दिलें आहे किंवा नाहीं, हें सरकारानें पाहिलेंच पाहिजे. लोकांकडून तें देण्याची तजवीज होईल तर सरकारानें त्यांत पडण्याची गरज नाहीं; पण त्यांच्याकडून तसें न होईल तर सरकारानें त्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतलीच पाहिजे. साखरेसारखी उपभोग्य वस्तु ज्याची त्यानें मिळवावी हें खरें; पण साखरेच्या आणि विद्येच्या खरेदींत फरक आहे. जो साखरेची खरेदी करीत नाहीं त्याला साखरेवांचून रहावें लागतें एवढेंच काय तें! पण जो शिक्षण संपादीत नाहीं तो स्वतः अशिक्षित रहातो येवढेंच नाहीं, तर त्याच्या अशिक्षणापासून इतरांस फार त्रास होतो. एकापासून दुसऱ्याला निष्कारण त्रास न होऊं देणें हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे व ज्या अर्थीं अशिक्षित मनुष्य इतरांस त्रासदायक होतो त्याअर्थीं त्याला सुशिक्षित किंवा सज्ञान करून तो इतरांस त्रासदायक न होईल असा करणें हें सरकारचें प्रमुख कर्तव्य आहे. आतां शिक्षणापासून नीति वाढतेच असें नाहीं, असा दुसरा आक्षेप राहिला. आम्हांस हें मत कांहीं अंशीं कबूल आहे. पण शिक्षणापासून नीति वाढत नसेल तर दुसऱ्या कोणत्या साधनानें वाढते, व शिक्षणापासून ती वाढत नसली तरी ती बिघडते कीं काय, असा आम्ही उलट प्रश्न करतों. नीत्याचारानें नीति वाढते असें कोणाचें म्हणणें असेल तर अमुक गोष्ट नीतीची आहे आणि अमुक अनीतीची आहे, हें तरी कोण ठरवणार? शिवाय शिक्षणापासून नीति वाढत नाहीं असें मानिलें, तरी त्यापासून जे दुसरे शेंकडों फायदे होतात त्यासाठीं तें देणें अवश्य नाहीं काय? बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता हे मनुष्याच्या मनाचे निराळे धर्म आहेत असें मानिलें तरी त्याचा एकमेकांवर कांहींच परिणाम घडत नाहीं असें म्हणणें मोठी चूक आहे. ज्याची दुराचरणाकडे

स्वाभाविक प्रवृत्ति आहे त्याला सुशिक्षण मिळालें तर त्याच्या हातून फार थोडा दुराचार घडेल, व ज्याला सदाचरणाची नैसर्गिक आवड आहे त्याची ती सुशिक्षणानें दुप्पट होईल, असा मानसशास्त्र-विशारदांनीं पुष्कळ अनुभवांतीं ठाम सिद्धांत ठरवून ठेविला आहे. तेव्हां शिक्षणाच्या कमी अधिक प्रमाणाप्रमाणें नीतीस अडथळा न येतां उलट तिला त्यापासून साहाय्यच होणार आहे हें ध्यानांत ठेवून, सर्व राजांनीं व सरकारांनीं आपल्या प्रजेस निदान प्राथमिक शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्ञानाचा नीतीवर कसला व किती परिणाम घडतो हा प्रश्न येथें काढण्याची गरज नाहीं. कारण त्यापासून जे दुसरे शेंकडों फायदे होतात त्यांसाठींच तें संपादन करणें अवश्य आहे हें आतांपर्यंत तत्संबंधानें केलेल्या चर्चेवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. मनुष्याचा व्यवहार सुरळीत चालण्यास व उत्तरोत्तर त्याचें पाऊल पुढें पडत जाण्यास ज्ञानवृद्धि आणि ज्ञानप्रसार यांसारखें साधन नाहीं, हें कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्राकडे नजर फेंकली असतां ध्यानांत येणार आहे. मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधानें वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासारखे हजारो पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध—इत्यादिकांनीं गांजून, पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशास शिक्षणावांचून दुसरा तरणोपाय आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

---

## मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता : : २७

गेल्या दोन अंकांत प्राथमिक शिक्षणाविषयीं सरकारानें सक्ती करावी असें जे म्हटलें आहे, तें मुलगे व मुली या उभयतांच्या शिक्षणाविषयीं म्हटलें आहे, हें वाचकांच्या ध्यानांत आलें असेलच. नसलें आल्यास आमच्या लिहिण्याचा तसाच भाव होता, हें येथें उघडपणें सांगतों! लहान मुलांच्या शिक्षणाबद्दल सरकारानें जितकी सक्ती केली पाहिजे तितकी मुलींच्या शिकण्याबद्दलही केली पाहिजे; किंबहुना मुलींच्या शिकण्याबद्दल थोडीशी अधिक केली पाहिजे! मुलींना मुलांबरोबर युनिव्हर्सिटीच्या मोठमोठ्या परीक्षा देण्यास

व पदव्या मिळविण्यास सदर परवानगी असावी किंवा नाहीं, असा प्रश्न सध्यां आपल्यापुढें नाहीं; तूर्त प्राथमिक शिक्षणाच्या संबंधानें विचार चालला आहे व हें शिक्षण वास्तविक पहातां मुलांपेक्षा मुलींस विशेष जरूरीचें आहे, असें विचाराअंतीं प्रत्येकास दिसून येणार आहे. अपत्यसंगोपनाची खरी जबाबदारी आईवर असते. आईच्या प्रकृतीचे, स्वभावाचे व आचरणाचे परिणाम मुलीच्या प्रकृतीवर थेट गर्भाधानापासून होऊं लागतात. बायकोच्या व मुलांच्या चरितार्थास लागणारें द्रव्य बाप संपादितो; मुलें दुखणेकरी असलीं तर थोडीबहुत काळजी घेतो; बाहेर थकलाभागलेला घरीं परत आला म्हणजे कदाचित् त्यांचे लाड करून आनंद पावतो. हें सारें बाप करतो, व त्यानें तें करणें जरूर आहे! पण मुलें स्वावलंबी होततोंपर्यंत त्याबद्दल जी अहोरात्र खस्त खावी लागते ती आईला किंवा कारण-परत्वें तत्स्थानापन्न जी स्त्री झाली असेल तिलाच खावी लागते. पाप-णीला पापणी लागूं न देतां उभ्या रात्री जागत काढणें, मोटाच्या मोटा धुणीं धुणें, कोणत्याही प्रकारच्या देहधर्मास कधींही कंटाळून न जाणें-तात्पर्य आपल्या प्राणापेक्षां, ज्याला आपण पोर म्हणतों त्यास जपणें हें अवघड काम स्त्रीच करते व तीच करूं शकणार आहे. पुरुषाच्यानें तें दोन दिवस देखील निभावयाचें नाहीं! तेव्हां ज्या स्त्रीवर अपत्यसंगोपनाचें येवढें जबाबदारीचें काम आपण सोंपवितों तिला अक्षरशत्रु असूं देणें हें अत्यंत अहितकर आहे असें आम्हास वाटतें. सोल्जरांची कवाईत पुष्कळांनीं पाहि-लीच असेल. या कवाइतीच्या ओनाम्याचा धडा प्राथमिक शिक्षण मिळालेल्या कांहीं इसमांस,व तें न मिळालेल्या कांहीं इसमांस बरोबर दिला, तर थोड्या दिवसांत ज्यांना प्राथमिक शिक्षण मिळालेलें आहे त्यांचा धडा तें शिक्षण ज्यांना मिळालेलें नाहीं त्यांपेक्षां विशेष चांगला वठूं लागतो, हें जर्मन, फ्रेंच व इंग्लिश पलटणींत फिरफिरून घेतलेल्या अनुभवावरून पूर्णपणें सिद्ध झालें आहे. व्यव-स्थित रीतीनें हातपाय हलविण्याच्या कामांत प्राथमिक शिक्षणाचा जर येवढा परिणाम घडतो तर चैतन्यवृक्षाचें बीजारोपण झाल्यापासून तो स्वावलंबी होईतोंपर्यंत त्याच्या संगोपनाचें काम जिच्यावर पडतें तीवर प्राथमिक शिक्ष-णाचा निदान नवशिक्या कवाईतवाल्याइतका तरी परिणाम झालाच पाहिजे! सरासरीनें इतर गोष्टींत सारख्याच स्थितींत असलेल्या वीस स्त्रियांपैकीं

दहांना थोडेंबहुत शिक्षण मिळालें आहे आणि दहांना त्याचा स्पर्श झालेला नाहीं—अशी स्थिति कोठें असेल तर तेथें शिकलेल्या स्त्रियांच्या मुलांचें संगोपन विशेष चांगल्या रीतीनें होत असून एकंदरीत त्यांचे संसारही अधिक चांगल्या पद्धतीनें चालले आहेत असें दिसून आल्यावांचून रहाणार नाहीं. "लहानपणीं लग्नें केलीं म्हणून काय होतें! स्त्रियांना स्वातंत्र्य नसलें म्हणून काय होतें! स्त्रियांना अक्षरशत्रु ठेवल्या म्हणून काय होतें!" अशा रीतीचा निरर्गल प्रलाप करणाऱ्या विचारशून्य, मतलबी, किंवा मत्सरी लोकांचीं तोंडें एकदम बंद करितां येत नाहींत, याचें कारण असें आहे कीं, राजकीय, धार्मिक व सामाजिक गोष्टींत पदार्थविज्ञान शास्त्रांतल्या प्रयोगांसारखे तत्काल खात्री करून देणारे प्रयोग करतां येत नाहींत. या गोष्टींतील बराच भाग अनुमानावर सोंपवावा लागतो; आणि हा पंथ एकदां पतकरला म्हणजे मग पाहिजे त्यानें पाहिजे तसें बहकत सुटावें अशी अनवस्था होऊन जाते! या अनवस्थेचा परिणाम असा होतो कीं, परस्परांशीं अगदीं उलट असे दोन सिद्धांत दोन प्रकारच्या लोकांस बरोबर दिसूं लागतात व तदनुसार त्यांच्या आचारांतही फरक पडतो! तथापि हा सारा गोंधळ कल्पनेच्या अनावरपणामुळें घडून येत असतो. अनुभव वाढत जाऊन कल्पनेचा जोर कमी होऊं लागला, आणि सारासार विचार वाढत चालला म्हणजे खऱ्या उपयुक्त गोष्टी सर्वांस ग्राह्य होऊं लागतात, इतकेंच नाहीं, तर त्या अमलांत आणण्याबद्दल सारे साहाय्य करूं लागतात. लोकशिक्षण व स्त्रीशिक्षण यासंबंधानें अमेरिकेंत व युरोपांत वादी लोकांचीं अनेक तुंबळ रणें होऊन अखेरीस उभयपक्षांची आपापसांत समजी झाल्यासारखी दिसते. निदान प्राथमिक शिक्षणाच्या संबंधानें तरी आतां फारसा मतभेद राहिलेला दिसत नाहीं. प्रत्येक मुलीस व मुलास चवदाव्या वर्षापर्यंत कोणाकडून तरी अमुक ज्ञान प्राप्त झालें आहे, हें पहाण्याची जबाबदारी सरकारानें किंवा संस्थानानें आपल्या शिरावर घेतली पाहिजे असें सारे लोक कबूल करतात. येथें अजून तें रण माजावयाचें आहे. पण ज्याप्रमाणें इतर गोष्टींत त्याप्रमाणेंच हींतही आम्ही पाश्चिमात्य लोकांच्या परिश्रमाचा फायदा घेतला, तर कष्ट न करितां त्याच्या फलाचा उपयोग आम्हांस आजच्या आज घेतां येणार आहे.

सार्वजनिक शिक्षणाची आवश्यकता ही अगदीं अलीकडली कल्पना अस-

त्यामुळें कोणत्याही जुन्या राष्ट्रांत स्त्रियांच्या शिक्षणाकडे लोकांचें मन गेलें नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. असीरिआ, इराण, ईजिप्त, हिंदुस्थान, चीन वगैरे जुन्या देशांत ज्ञानाचा बराच प्रसार झाला होता. पण तें ज्ञान त्या त्या लोकांतील एक किंवा अधिक वर्गांच्या हातीं असे; त्याशिवाय बाकीचे सारे लोक केवळ अडाणी असत, गार्गीवाचक्नवी किंवा वडवाप्रतियेयी अशा पूर्वकालीन स्त्रियांच्या नांवांवरून किंवा रामायणमहाभारतादि पुराणांत अथवा कालिदासभवभूत्यादिकांच्या ग्रंथांत स्त्रीशिक्षणाचा जो अप्रत्यक्ष उल्लेख आला असेल त्यावरून भरतखंडांत बायकांस शिक्षण देण्याचा परिपाठ होता, असें म्हणणें म्हणजे झांशीच्या लक्ष्मीबाईच्या उदाहरणावरून साऱ्या हिंदु स्त्रिया लढाऊ आहेत, किंवा अहिल्याबाईच्या उदाहरणावरून त्या राज्यकार्यकुशल आहेत असें म्हणण्यासारखेंच होय. पंडिता रमाबाईच्या वडिलांसारख्या कांहीं असामान्य पुरुषांनीं आपल्या बायकांस, मुलींस, सुनांस, किंवा बहिणींस त्या काळीं उपलब्ध असलेली सारी विद्या दिली असेल, कित्येक राजघराण्यांतील स्त्रियांस नर्तनगायनवादनादि कलांबरोबर वाचनलेखनादि कला शिकविण्याची रूढि असेल, वेदांतविषयांकडे मनाची विशेष प्रवृत्ति असल्यामुळें मुक्ताबाईसारख्या कांहीं भाविक स्त्रियांनीं तत्त्वज्ञानसंपादनाच्या अत्युत्कट इच्छेनें कित्येक ग्रंथांचें अवलोकन केलें असेल, पण तेवढ्यावरून मुलींस शाळेंत पाठविण्याचा किंवा घरच्या घरीं लिहिण्यावाचण्यास शिकविण्याचा प्रचार कोणत्याही वर्गांत रूढ होता, असें दाखविण्यास आम्हांपाशीं पुरावा नाहीं. सर्व देशांतील सामान्य लोकांच्या स्त्रिया अशिक्षित असत. नाहीं म्हणायला स्पार्टन लोकांत मात्र पुरुषांप्रमाणें स्त्रियांस हरएक प्रकारचें शिक्षण देण्याचा परिपाठ होता. या परिपाठामुळें स्पार्टन कुटुंबांत स्त्रियांचें जितकें वजन असे, व त्यांच्या सुशिक्षितपणाचा त्यांच्या संततीवर जितका परिणाम घडे, तितकें वजन व तसा परिणाम दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रांत दिसून आला नाहीं. आम्हांप्रमाणेंच अथेन्सचे लोक प्रसंगविशेषाशिवाय स्त्रियांस मोकळेपणानें समाजांत वावरूं देत नसत. स्पार्टन लोकांवर त्यांच्या स्त्रियांचा जो दाब असे त्याबद्दल त्यांना टोंचून बोलतांना "हे स्त्रीराज्यांतले लोक" असें अथीनिअन्स म्हणत. रोमन लोकांत स्त्रियांना मोठा मान देत इतकेंच नाहीं तर लहान मुलांप्रमाणें ते मुलींनाही शाळेंत धाडीत असत.

असें म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. तथापि हा प्रचार सर्व वर्गांतील रोमन लोकांत रूढ असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. ग्रीक व रोमन लोकांचीं राज्यें लयास गेल्यावर जी अलीकडील राज्यपद्धति स्थापित झाली, तिचा मूळ पाया घालणारा राजा शार्लमेन यानें मुलांप्रमाणें मुलींच्या शिक्षणाबद्दलही पुष्कळ व्यवस्था केल्या होत्या. तथापि युरोपांत धर्मक्रांति होईतोंपर्यंत स्त्री-शिक्षणाकडे लोकांनीं फार लक्ष दिलें नाहीं. ज्याप्रमाणें पुरुषांच्या त्याप्रमाणेंच स्त्रियांच्या शिक्षणाविषयींही ल्यूथरचा मोठा आग्रह असे. बायबलांतील खरें रहस्य जसें पुरुषांना तसें स्त्रियांना कळल्याशिवाय खरी धर्मसुधारणा होणार नाहीं; अतएव सर्वांनीं बायबल वाचण्यास शिकलें पाहिजे; अशा मुद्यावर तो सुधारक त्यावेळेस भांडत होता. युरोपियन धर्ममठांत ईश्वरभक्तिपरायण ज्या स्त्रिया असतात त्यांस नन्स म्हणतात. या नन्स स्वतः सुशिक्षित असून इतर स्त्रियांसही त्या शिक्षण देत असत. तथापि अशाच्या परिश्रमानें स्त्री-शिक्षणाचा हाव तेवढा प्रसार होण्याचा संभव नव्हता व तो कधींही झाला नाहीं. स्त्रियांचें शिक्षण पुरुषांच्या शिक्षणाच्या मागून किंवा फार झालें तर बरोबर येणारें आहे. आपल्या हातीं सत्ता असून आपण अज्ञान रहाणें आणि स्त्रियांस सज्ञान होऊं देणें इतकी परोपकारबुद्धि पुरुषांच्या हृदयांत क्वचित वसत नाहीं. एका बाजूस ज्ञानाचा मुळीच गंध नाहीं व दुसऱ्या बाजूस पुरुषांप्रमाणें मोठमोठ्या विद्यालयांत पढून हव्या त्या पदव्या संपादण्याची व पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करण्याची सदर परवानगी, अशी जी विलक्षण स्थिति सांप्रत कालीं पृथ्वीच्या पाटीवर दिसत आहे तीवरून अनुमान करतां, पुरुषांप्रमाणें स्त्रियांना ज्ञानमंदिराचीं द्वारें आम्हांस आज नाहीं उद्यां, खुलीं करून द्यावीं लागणार हे ध्यानांत आणून श्री. सयाजीराव महाराज गायकवाड मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबद्दलही सक्तीचा कायदा करतील तर उच्च कुलांतल्या मराठ्यांनीं आपल्या स्त्रियांस आजपर्यंत गोषांत कोंडून घातल्यामुळें जी अपकीर्ति संपादली आहे तिचें परिमार्जन होऊन प्रख्यात लोकशास्त्यांच्या नामावलिकेंत त्यांचें नांव चिरस्थाई होऊन बसेल.

---

## स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाहीं ? : : २८

या देशांत या प्रश्नांची एव्हां चर्चा करीत बसणें म्हणजे कांहीं अंशीं वेडेपणच आहे ! विद्या ही एकप्रकारचें धन आहे, व इतर धनिकांप्रमाणें विद्यारूप धन ज्यांस प्राप्त झालें आहे त्यांपैकीं कित्येकांना तें दुसऱ्यांस येऊं नये असें वाटतें. ग्रीक लोकांशिवाय इतर लोक विद्याधन संपादण्यास अपात्र आहेत असें अरिस्टॉटलचें मत होतें. ग्रीक लोकांनीं शास्त्रें पढावीं, ज्ञान संपादावें, ऐषआराम भोगावे व अंमल करावा, आणि इतर लोकांनीं ग्रीक लोकांचे गुलाम होऊन रहावें; कारण ग्रीक लोकांच्या बरोबरीनें रहाण्यास ते जात्याच असमर्थ आहेत असा त्या जगत्प्रसिद्ध अथीनिअन तत्त्ववेत्याचा पूर्ण ग्रह झालेला होता. गुलामांचा व्यापार बंद होईतोंपर्यंत आफ्रिकेंतील नीग्रो लोकांविषयीं अनेक ख्रिस्ती लोकांचेंही असेंच म्हणणें होतें, इतकेंच नाहीं, तर तदनुसार आचरणही होतें. राज्यविस्तार करण्याची महत्त्वाकांक्षा अद्यापि पूर्ण तृप्त झाली नाहीं, अशा कित्येक राष्ट्रांस या घटकेस असें वाटत आहे कीं, कांहीं लोकांनीं बादशाही मिरवावी आणि कांहींनीं नेहमीं त्यांचें पादांकित होऊन रहावें, हा निःसंशय सृष्टिनियम आहे ! ब्राह्मणांनीं विद्या संपादावी; क्षत्रियांनीं राज्य करावें, वैश्यांनीं व्यापार करावा; आणि शूद्रांनीं कनिष्ठ प्रतीची सेवा करावी—ही आमची पूर्वीची व्यवस्था. तात्पर्य काय कीं, संपत्ति, अधिकार व विद्या हीं ज्यांस प्राप्त होतात त्यांस तीं आपणच बळकावून बसावें असें वाटूं लागतें ! तसें करणें आपला हक्क आहे; तसें करण्यांत आपलें व दुसऱ्याचें परमहित आहे; अशीच व्यवस्था असावी असा परमेश्वराचा किंवा सृष्टीचा आद्य हेतु होता किंवा आहे, असा तर्कवाद मोठमोठे विद्वान, धनिक, व अधिकारी दिवसाढवळ्या बेलाशक करीत आले आहेत व आणखी अनेक शतकें करीत राहतील ! पण वारंवार होतें काय कीं, यांच्याच कंपूंतून कांहीं इसम फितुर होऊन उलट पक्षांस मिळतात, आणि त्यांचे पुढारी होऊन त्यांच्या वतीनें पूर्वीच्या आपल्या जातभाईशीं भांडूं लागतात ! कालांतरानें उलट पक्षांतही फांकडे लढवय्ये तयार होऊन हक्कवाल्या थोड्याचा बिन हक्कवाल्या बहुतांशीं तुंबळ संग्राम होऊं लागतो, आणि बिन हक्कवाल्या सामान्य लोकांचा हक्कवाल्या मर्यादित वर्गाच्या गोटांत शिरकाव होतो. बहु-

जनसमाजाचें पाऊल जें हळूं हळूं पुढें पडत चाललें आहे तें या रीतीनें पडत चाललें आहे. आपापल्या हिताकरतां होत असलेला कलह जसा कैलासपतीच्या घरीं तसाच सर्व पृथ्वीच्या पाठीवर रात्रंदिवस चालू आहे! 'अमुक गोष्ट करूं नको, त्यांत तुझा फायदा नाहीं'–असा मायावी वेदांत एक दुसऱ्यास सांगत रहाणार; व दुसरा आपल्या हितावर नजर देऊन पहिल्याशीं भांडत रहाणार;–हें या मृत्युलोकींचें शाश्वत चिन्हच असें म्हणण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत पुरुषापुरुषांचा संग्राम चालला आहे; येथून पुढें तो स्त्रीपुरुषांत सुरू होणार आहे; किंबहुना कित्येक देशांत तो सुरू झाला आहे. येथें त्याचा प्रादुर्भाव होण्यास अजून बरींच वर्षें लागतील. इतर सुधारलेल्या राष्ट्रांना एवढें तरी वाटूं लागलें आहे कीं झाडून साऱ्या स्त्रियांना व पुरुषांना व मुलांना आणि मुलींना प्राथमिक शिक्षण मिळालेलें असावें अगर मिळावें. आमच्या येथें अजून असें वाटूं लागावयाचें आहे. ब्राह्मणेतर प्रत्येक जातीच्या मनुष्यास थोडेबहुत शिक्षण मिळालें तर हिंदुस्थानावर दुर्धर प्रसंग गुदरणार नाहीं, अशी आमच्यांतील कित्येक शहाण्या म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांची व लोकमत लोकांपुढें व सरकारापुढें आणणाऱ्या आणि त्यास योग्य वळण लावणाऱ्या पत्रकर्त्यांची खातरी झाली पाहिजे. ती होण्यास निदान पांचपंचवीस वर्षें तरी लोटलीं पाहिजेत. ती झाल्यावर स्त्रीशिक्षणाचा विचार! किंवा सुदैवानें मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्या शिक्षणाविषयींही चर्चा सुरू झाली तर मुलांप्रमाणेंच साऱ्या मुलींसही प्राथमिक शिक्षण जरूर आहे, अशी या लोकमतप्रकाशकांची किंवा स्वनियुक्त लोकप्रतिनिधींची खातरी होण्यास किती काळ लागेल कोण जाणे! बहुधा साऱ्या मुलींस प्राथमिक शिक्षण मिळालें पाहिजे, हें विधान त्यांच्या पसंतीस पूर्णपणें कधींही उतरणार नाहीं, पण लाजेकाजेस्तव ते त्याला आपली बाह्यात्कारी कबूली दाखवूं लागले, तरी ज्या वेळेस मुलींस मुलांप्रमाणें मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण द्यावें किंवा नाहीं असा प्रश्न निघेल तेव्हां ते त्याचा निषेध करण्यासाटीं आपल्या बुद्धिसामर्थ्याची, लेखनकुशलतेची, वाक्पांडित्याची पराकाष्ठा करून सोडतील याविषयीं आम्हास शंका नाहीं! पुढें मागें इतर न्याय्य, अवश्य, कल्याणप्रद गोष्टींप्रमाणें या गोष्टींतही सुधारकांचा वरचष्मा होऊन या हताश, विचारशून्य, मत्सरी, भेकड, मूर्ख अथवा आपमतलबी आणि कोडग्या लोकांस आपलीं डोकीं गुडघ्यांत घालून मुळू मुळू रडत

बसावें लागेल हें तर त्यांचें कपाळ ठरलेलेंच आहे! पण ते तशी वेळ येईतोंपर्यंत आपल्याकडून होईल तितक्या गमजा, टिवल्याभावल्या व व्रात्यपणा केल्यावांचून रहावयाचें नाहींत! ज्याप्रमाणें प्रत्येक मुलास व मुलीस आईबापांनीं किंवा बापानें प्राथमिक शिक्षण दिलें पाहिजे, असें अलीकडे लोकमत सर्वत्र झालें आहे, त्याप्रमाणेंच स्त्रियांनीं व पुरुषांनीं पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा; पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या; आणि पाहिजे तेव्हां लग्नें करून हवा तसा संसार करावा अशी मोकळीक कालांतरानें सर्वांस मिळणार आहे, याची जरी आम्हांस शंका नाहीं तरी या निबंधांच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणें हिंदु स्त्रियांस वरिष्ठ शिक्षणाचीं द्वारें खुलीं असावीं कीं नाहीं या प्रश्नाच्या चर्चेंत आज विशेष वेळ दवडणें म्हणजे त्याचा थोडासा दुरुपयोग करण्यासारखेंच आहे; कारण, मध्यम प्रतीचें किंवा वरिष्ठ प्रतीचें शिक्षण स्त्रियांना देण्याचा प्रघात पडण्यापूर्वीं, आमच्या विवाहकालांत व विवाहपद्धतींत बराच फरक होणें अवश्य आहे. लग्न झालेले मुलगे हायस्कूलांत व कॉलेजांत असून मध्यम व वरिष्ठ प्रतीचें शिक्षण संपादीत असतात हें खरें आहे; पण मुलींना तसें करतां येणार नाहीं. बायकोला नहाण आलें असो, बायको गर्भार असो, किंवा बायकोला मूल झालें असो, मुलाचें लक्ष त्रिचेकडे असेल तर त्याची ही विलक्षण गृहस्थिति त्याच्या मार्गांत फारशी येत नाहीं. अल्पवयांत प्राप्त झालेली गृहस्थता किंवा पितृता विद्यार्थिपणास केवळ विघातक होत नाहीं, असा पुष्कळांचा अनुभव आहे. पण जर तेराव्या किंवा चौदाव्या वर्षापासून मुलीच्या पाठीमागें गर्भारपण, बाळंतपण व अपत्यसंगोपन हीं लचांडें लागलीं असतील तर तिनें हायस्कुलांत किंवा कॉलेजांत जावें कसें? आणि मॅट्रिक्युलेशनची, बी. ए. ची, एल्. एम्. ॲन्ड एस्ची, एल्. सी. ईची, अथवा एल् एल्. बीची परीक्षा द्यावी कशी? मुलींकडून असल्या परीक्षांचा अभ्यास होण्यास त्या परीक्षा आटपतपर्यंत त्या अविवाहित राहिल्या पाहिजेत; किंवा विवाहित असून त्यास अविवाहितासारखे त्यांच्या नवऱ्यांनीं व सासुसासऱ्यांनीं राहूं दिलें पाहिजे. पण या पिढींत हें होणें शक्य दिसत नाहीं. रजोदर्शनापूर्वीं साऱ्या मुलींचीं लग्नें झालींच पाहिजेत व रजोदर्शन झाल्याबरोबर गर्भाधानविधि उरकलाच पाहिजे; तसें न केलें तर मुलीकडल्या

चाळीस पिढ्यास दुर्गति प्राप्त होते, अशा प्रकारच्या अधर्मी धर्मापुढें लोटांगणें घालणारे आणि त्याचे आशापाश काळजाला जाऊन भिडले तरी बिलकूल कांकूं न करतां, त्या क्लेशालाच सुख मानणारे वेडेपीर जोंपर्यंत नाहींसे झाले नाहींत तोंपर्यंत आमच्या मुलांप्रमाणें मुलींना मध्यम किंवा वरिष्ठ शिक्षण संपादितां येणार नाहीं. अगोदर हें सासुरवासाचे घोडे मुळींच नाहींसें झालें पाहिजे. लग्न झाल्यावर मुलीनें आईबापांचें घर सोडावें तें एकदम नवऱ्याच्या संसाराचें स्वतंत्र आधिपत्य पत्करावें. तिला मध्यंतरी सासुसासऱ्याच्या हाताखालीं म्हणजे सासुरवासांत उमेदवारी करण्याची मुळींच गरज पडूं नये. आणि खरेंच पाहिले तर आईबापांनीं मुलांच्या विद्येकडे व आपल्या सुखाकडे लक्ष द्यावयाचें सोडून, त्यांना लौकर लौकर आईबाप करून टाकण्याचा व त्यांच्या पोरांची नसती जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन सगळ्यानाच हालांत पाडण्याचा आग्रह कशासाठीं धरावा, हें आम्हांस समजत नाहीं. जातिविशिष्ट सुखाविषयीं आईबापांनीं व भटांनीं इतकी काळजी वाहण्याची गरज नाहीं. त्या सुखाचें बीज स्त्रीपुरुषाच्या प्रकृतींत विधात्यानें फार काळजीपूर्वक पेरलेलें आहे. या देशांतील दूष्य व निंद्य वैवाहिक संस्थांमुळें आणि आचारांमुळें मात्र त्याची प्रथम हवीतशी वाढ आणि पुढें पुष्ट फलनिष्पत्ति होत नाहीं. मुली व जावई यांचें अल्प वयांत सुखसोहाळे पाहण्याची आम्हांस जी दुष्ट अभिरुचि किंवा खोड लागली आहे तीमुळें आम्ही आपल्या मुलांमुलींचें आणि त्याबरोबर साऱ्या राष्ट्राचें अतोनात नुकसान करीत आहोंत हें आमच्या लक्षांत येऊं नये, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. आमची ही खोड गेल्याशिवाय या देशांत अनेक मोठया स्त्रिया किंवा मोठे पुरुष उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. आणि तसल्या स्त्रीपुरुषाशिवाय कोणत्याही देशास चिरस्थाई मोठेपणा यावयाचा नाहीं. तेव्हां स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाहीं या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी आम्ही त्यांचा विवाहकाल वाढविण्यास तयार होण्यास तयार होणार किंवा नाहीं याचें उत्तर देण्यास तयार झालें पाहिजे !

## स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें, व तेंही एकत्र द्यावें ! २९

आजच्या निबंधाचा मथळा दृष्टीस पडल्याबरोबर कित्येकांच्या चित्तवृत्तींत कल्होळ झाल्यावांचून रहाणार नाहीं. पण त्याला आमचा इलाज नाहीं. आम्हांस जें प्रशस्त वाटत आहे तेंच लिहिणें भाग आहे. स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण दिल्यामुळें कित्येक पुरुषांस घरीं बसून मुलें खेळविण्याचें; लुगडीं धुण्याचें; भांडीं घांसण्याचें; स्वयंपाक करण्याचें व दळणकांडण करण्याचें काम करावें लागतें तर त्याला आम्ही काय करणार ? असलीं कामें स्त्रियांनींच करावीं हा कांहीं ईश्वरी नियम नाहीं ! तसेंच मुलें जीं होतात तीं स्त्रियांना होतात, म्हणून त्यांनींच तीं कामें केलीं पाहिजेत असेंही कोणास सिद्ध करून देतां येणार नाहीं ! श्रीमंतांच्या बायकांस कितीही मुलें झालीं तरी त्यांना बहुधा असलीं कामें करावीं लागत नाहींत, हें आपण नित्यशः पहातों. साहेब लोकांत मुलें पाजण्याचें कामसुद्धां भाड्याच्या उपमातांकडून करविण्याचा प्रघात पुष्कळ रूढ आहे, हेंही आपणांस ठाऊक आहे. तेव्हां मुलें फार होणें आणि प्रपंचांतील हलकीं कामें अवश्य करावीं लागणें यांचा अपरिहार्य संबंध आहे असें नाहीं. पण प्रत्येक स्त्रीला दहा किंवा बारा वेतें झालींच पाहिजेत, असें तरी आपण कां घेऊन चालावें ! सध्यां स्त्रियांना जीं इतकीं मुलें होतात तीं त्यांच्या संतोषानें होतात असें आम्हांस वाटत नाहीं. यासंबंधानें पुरुषांकडून स्त्रियांवर जुलूम होतो असा आमचा समज आहे. बाळंतपणाच्या क्लेशांची यत्किंचित् झांक पुरुषांच्या स्वप्रत्ययास येण्यासारखी असती तर त्यांनीं आपल्या मनोविकारांस इतकें सईल सोडिलें नसतें ! "परदुःख शीतळ" या तत्त्वावर सध्यां त्यांचें वर्तन चाललें आहे. स्त्रियांप्रमाणेंच त्यांनाही कधीं कधीं प्रसूतिवैराग्य होण्याचा संभव असता, तर उभयतांच्या संयमानें बराच भूभार कमी होता. तथापि हा सांप्रतचा अन्याय फार दिवस चालेल असें दिसत नाहीं. जसाजसा पुरुषांत विद्येचा अधिकाधिक प्रसार होत जाईल तसतसा स्त्रियांतही त्याचा उपक्रम होऊन तो वाढत जाणार. तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांस आपलें खरें हित कशांत आहे आणि तें साधावें कसें हें समजूं लागणार, आणि तें समजूं लागलें कीं, पुरुषांस हा आपला सांततिक जुलूम सोडून द्यावा लागणार ! विवाहाच्या कामीं स्त्री-पुरुषांची संमति जितकी अवश्य

आहे तितकीच संमति विवाहाच्या अमलांतही दृष्टीस पडूं लागली पाहिजे. तसें होऊं लागेल तेव्हांच स्त्रियांची पुष्कळ विपत्ति टळेल. हें सारें घडून येण्यास एकच उपाय आहे तो हा कीं, सध्यां ज्या प्रकारचें शिक्षण पुरुषांस मिळत आहे त्याच प्रकारचें शिक्षण स्त्रियांस मुबलक मिळालें पाहिजे. स्त्रियांस शिक्षण देण्याचा विचार निघाल्यापासून प्रत्येक देशांत त्यांस कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. लिहिणें, वाचणें व हिशेब करणें या तीन गोष्टी साऱ्या मुलांप्रमाणें साऱ्या मुलींस शिकविण्यास कांहीं हरकत नाहीं, असें सामान्य मत आहे. पण येथून पुढें मतभेदास आरंभ होतो; व वरिष्ठ शिक्षणाच्या संबंधानें त्याचा कळस होतो. प्राथमिक शिक्षण आटपलें म्हणजे मुलींना घरीं ठेवून घेऊन प्रपंचव्यवस्था शिकवावी असें कित्येकांचें मत आहे. तसें नच करावयाचें असेल आणि त्यांना शाळेंत पाठवाव्या असा आग्रहच असेल तर निदान ज्या शाळेंत शिवणकाम, गायन, पाकसिद्धि, गृहव्यवस्था, रेशमाचीं, लोकरीचीं किंवा अशाच प्रकारच्या कसल्यातरी धाग्याचीं वस्त्रें विणण्याचें काम; वेत, गवत वगैरे तंत्वात्मक द्रव्यांनीं होणारीं करंड्या वगैरे नक्षीचीं व साधीं कामें; लहान मुलांचें संगोपन व रोगचिकित्सा; स्त्रियांचे रोग व त्यांवर औषधोपचार इत्यादि विषय ज्या शाळांत शिकवितात अशांतच त्यांस पाठवाव्या; भूगोल, इतिहास, गणित, पदार्थविज्ञान, ज्योतिष वगैरे मेंदूचा खराबा करणारे विषय त्यांच्यापुढें कधींही आणूं नयेत. त्यांत त्यांचा व जगाचा मुळींच फायदा नाहीं. कोणतेंही शिक्षण देतांना ज्याला तें द्यावयाचें त्याच्या मानसिक व शारीरिक शक्ति जात्या कशा आहेत याचा विचार केला पाहिजे इतकेंच नाहीं, तर त्या व्यक्तीस आपलें आयुष्य कोणत्या स्थितींत घालवावें लागणार याचाही विचार केला पाहिजे; पुरुषांच्या विचारशक्तीपेक्षां स्त्रियांची विचारशक्ति स्वाभाविकपणें कमकुवत आहे, व मुलें होण्याचें आणि त्यांना वाढविण्याचें काम विधात्यानें त्यांचेकडे ठेविलें असल्यामुळें, त्यांना पुरुषांशीं स्पर्धा करूं न देतां, त्यांच्या नैसर्गिक क्षीण बुद्धिमत्तेस व त्यांच्या वाट्यांस आलेल्या स्वाभाविक कामास योग्य असेंच शिक्षण त्यांस दिलें पाहिजे; ज्याला जें करतां येणार आहे तेंच त्याला करूं देण्यांत कोणत्याही प्रकारचा अन्याय नाहीं इतकेंच नाहीं, तर उलट त्याचें हित आहे; पालकांनीं विद्या शिकून बाहेरचीं कामें करावीं, आणि पुरुषांनीं

अक्षरशून्य राहून घरचीं कामें करावीं, असा व्युत्क्रम करण्यांत दोघांचेही नुकसान आहे. पुरुषांच्या सुदृढ हातांनीं व पायांनीं बाहेरचे धक्के बुक्के खावे; उन्हाचा, थंडीचा, व वाऱ्याचा त्रास सोसावा; तात्पर्य, बायकांच्या, मुलांच्या, व आपल्या चरितार्थांकरितां लागतील तितके मानसिक व शारीरिक कष्ट करून द्रव्य संपादावें हें जसें त्यांना उचित आहे, त्याप्रमाणेच कोमलांगी स्त्रियांनीं सुखकर गृहछायेंत राहून पुरुषांनीं कमावून आणिलेल्या जिनसांची व्यवस्था लावावी; थकल्याभागलेल्या पतीस सुग्रास करून घालून त्यांचें पादसंवाहन करावें; मुलांबाळांची खस्त खाऊन त्यांस चांगल्या रीतीनें वाढवावें, आणि प्राणप्रियाच्या इच्छेनुरूप अष्ट, दश, किंवा द्वादशपुत्रा सौभाग्यवती म्हणवून घेण्यास एका पायावर उभें असावें, यांतच स्त्रियांचें खरें हित व सुख आहे: म्हणजे सध्यां जी रूढ रहाटी आहे तीच उत्तम आहे; तींत फेरफार करणें इष्ट नाहीं, असें पुष्कळांचें मत आहे. या मतास अनेक डाक्टर लोकांची संमति पडली असल्यामुळें कित्येकांच्या समजुतीनें त्यास वेदवाक्याची प्रमाणता प्राप्त झाली आहे! परंतु असला आग्रह काय कामाचा!. असल्या एकदेशीय तत्त्वज्ञानास कोण विचारतो? पाहिजे त्या पुरुषानें पाहिजे ती विद्या संपादावी या मतास तरी साऱ्यांची अनुकूलता कोठें आहे? व जी आहे ती तरी त्यास एकाएकीं थोडीच प्राप्त झाली आहे? स्त्रियांना प्राथमिक शिक्षण देण्यास हरकत नाहीं, येवढा रुकार पुरुषांकडून मिळण्यास काय थोडें रण करावें लागलें! सत्ता वापरण्याची अक्कल अंगीं असो वा नसो, ज्यास ती प्राप्त झाली आहे, त्यांस ती सोडूं नये, असें वाटतें. अनेक कारणामुळें स्त्रियांवर पुरुषांचें वर्चस्व स्थापण्यांत आलें आहे, व त्यांना त्याची गोडी समजून चुकली आहे, तेव्हां त्यांस तें आपल्या हातून जाऊं नये असें वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. स्त्रियांच्या संबंधानें पुरुषास पॅट्रिशिअन्स आणि पुरुषांच्या संबंधानें स्त्रियांस प्लिबिअन्स म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ज्याप्रमाणें जुन्या रोमन लोकांतील हा विलक्षण स्वामिसेवकसंबंध हळूं हळूं लयास गेला, त्याप्रमाणेंच स्त्रीपुरुषांतील सेव्यसेवक संबंध कालांतरानें नाहींसा होणार आहे. सध्यां पुरुष जीं कामें करतात तीं रोमन पॅट्रिशिअन्स म्हणजे उच्च कुलांतील लोक करीत असत; व सध्यां बायकांस जीं कामें करावीं लागतात तीं प्लिबियन म्हणजे तेथला दासवर्ग करीत असे. रोमन लोकांची

प्राथमिक स्थिति जाऊन ते जसजसे उन्नतावस्थेप्रत जाऊं लागले तसतसा हा स्वामिसेवक संबंध कमी होत जाऊन अखेरीस बुद्धीनें, अनुभवानें, कर्तबगारीनें जे श्रेष्ठ ठरले त्यांस संस्थानांतील अधिकार त्यांच्या योग्यतेप्रमाणें मिळूं लागले आणि प्लिबिअन्स व पॅट्रीशिअन्स हा भेद शेवटीं नाहींसा झाला! होतां होतां स्त्रीपुरुषांमही ज्याच्या त्याच्या किंवा जिच्या तिच्या योग्यतेप्रमाणें अधिकार प्राप्त होऊं लागतील. पुरुषांच्या मेंदूपेक्षां स्त्रियांचा मेंदू सरासरीनें कमी वजनाचा आहे, आणि स्त्रीपुरुषांमधील कामाची वांटणी त्यांच्या मेंदूच्या वजनावर अवलंबून असावी हें योग्य आहे असें जरी मानिलें, तरी साऱ्या पुरुषांचे मेंदू साऱ्या स्त्रियांच्या मेंदूपेक्षां अधिक जड आहेत, असें प्रतिपादण्याचें धारिष्ट अत्यंत अधिकारलोलुप पुरुषांस देखील करतां येणार नाहीं. अनेक स्त्रियांचे मेंदू अनेक पुरुषांच्या मेंदूहून जड भरतील यांत संशय नाहीं. तेव्हां मेंदूच्या मुद्यावरच स्त्रियांनीं अमुक कामें करावीं आणि पुरुषांनीं अमुक कामें करावीं, असा निर्बंध करणें शुद्ध अन्याय व क्रूरपणा आहे. ज्याला जें काम साधेल त्यानें तें करावें अशी प्रत्येकास मोकळीक देण्यांत तें करणाराचा अथवा करणारीचा आणि जगाचा फायदा आहे. सध्यां पुष्कळ स्त्रियांच्या बुद्धिमत्तेची विनाकारण नासाडी होत आहे. ज्या कामास जे पुरुष बुद्धिसामर्थ्यानें योग्य नाहींत त्यांच्यांकडून तीं कामें होत असल्यामुळें व स्त्रियांस तीं करण्याची परवानगी नसल्यामुळें एकंदरींत तीं कामें व्हावीं तशीं होत नाहींत, व तसें न झाल्यामुळें मनुष्यजातीच्या सुखास चट्टा बसत आहे. हरएक शास्त्रांत, कलेंत, व धंद्यांत स्त्रीपुरुषांची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरूप व्यवस्था लागली पाहिजे. शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यास स्त्रिया असमर्थ असतील तर त्या तशा ठरतील पण अनुभवानें तसें ठरेतोंपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करणें हा शुद्ध मुलतानी दांडगेपणा होय. अमेरिकेंत मुलांप्रमाणें मुलींस वरिष्ठ शिक्षण देण्याचा उपक्रम केल्यापासून जे परिणाम घडून आले आहेत, त्याचें अवलोकन केलें असतां असें दिसून येईल कीं, जीं शास्त्रें व ज्या कला केवळ पुरुषांसच सुसाध्य आहेत असें आपणास वाटत होतें, तीं शास्त्रें व त्या कला स्त्रियांसही तितक्याच सुसाध्य आहेत, व शास्त्रकलांच्या अभ्यासामुळें स्त्रियांचेंही नैसर्गिक चारुत्व कमी होऊन अपत्यसंगोपनाचें काम त्यांच्यानें बरोबर वठेनासें

होईल अशी जी आपणास भीति होती ती केवळ निराधार होती—या दोन गोष्टी उत्तम रीतीनें सिद्ध झाल्या आहेत. अमुक कामें स्त्रियांनीं करावीं आणि अमुक पुरुषांनीं करावीं, असा आपल्या बुद्धींत सध्यां जो आग्रह उत्पन्न होतो त्याचें बरेंच कारण कामाची वांटणी करण्याचें काम आमच्या हातीं आहे हें होय. ती बायकांच्या हातीं असती तर त्यांनींही अशीच एकदेशीय वांटणी करून आपणांकडे उंच कामें आणि आम्हांकडे हलकीं कामें ठेवलीं असतीं! कोणत्याही विद्वान् व विचारी स्त्रीचें मत घ्या. ती कधींही असें म्हणणार नाहीं कीं, स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण देण्यांत स्त्रियांचें नुकसान आहे. हा स्त्रीपुरुषांत चालत आलेला वाद नाहींसा करण्याचा एकच उपाय आहे तो हा कीं, मुलांना व मुलींना हव्या त्या शाळेंत जाऊन हवें तें ज्ञान पाहिजे तितकें संपादूं द्यावें. श्रीमंत सयाजीराव महाराजांस हें मत पसंत पडेल किंवा नाहीं याची आम्हास बरीच शंका आहे. तथापि त्यांच्या कमिटीनें पुढें आणलेल्या प्रश्नास जें उत्तर देणें आम्हास बरोबर वाटलें तें आम्हीं दिलें आहे. गायकवाडांच्या विद्याखात्याला रुचावें म्हणून तें दिलेलें नाहीं, तर आमच्या वाचकांच्या वाचण्यांत तें येऊन त्याविषयीं त्यांनीं विचार करावा यासाठीं तें दिलें आहे. असो. आजच्या निबंधाचा उत्तरभाग पुढल्या खेपेवर टाकणें किती अवश्य आहे हें वरील लेखाच्या लांबीवरून उघड होतच आहे, तेव्हां त्याबद्दल जास्त लिहिण्याची गरज नाहीं.

मागल्या अंकांत स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण देणें कां योग्य आहे हें दाखविलें आहे. आज त्यांना एकाच ठिकाणीं शिकविणें योग्य आहे, हें दाखवावयाचें आहे.

गायकवाडी दरबाराला व खुद्द महाराजाना हें आमचें मत केवळ हास्यास्पद आहे असें प्रथमदर्शनीं वाटणार आहे. पण श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं युरोपखंडांत पुष्कळ दिवस घालविले असल्यामुळें व तेथील अनेक संस्था पाहिल्या असल्यामुळें, त्यांना हें मत इतकें विपरीत वाटण्याची गरज नाहीं. युरोपांतील समाजघटना अथवा समाजरहाटी येथील समाजरहाटीहून अगदीं निराळी आहे. आम्ही आपल्या भाषणांत स्त्रियांना अर्धांगी म्हणतों, व धर्म, अर्थ, काम वगैरे गोष्टींत त्यांस सहचारिणीत्व देतों. पण हीं दोन अर्धांगें बहुधा पोकळ धर्मज्ञापलीकडे कधींही जात नाहींत. बायकांनीं घराबाहेरच्या

पंचायतींत पडणें योग्य नाहीं, हें जें विलक्षण मत आम्हां पूर्वेकडील लोकांच्या मनांत हजारों वर्षें खिळून राहिलें आहे, त्यामुळें व आणखी कांहीं कारणांमुळें, स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज आम्हांस अगदीं नापसंत वाटतो. स्त्रीपुरुषांस मोकळेपणीं एकत्र वागूं दिलें असतां समाजावर मोठा दुर्धर प्रसंग गुदरेल असा आमचा पक्का ग्रह होऊन गेला आहे. युरोपांत असा परिणाम घडत नाहीं ही गोष्ट प्रत्यक्ष आमच्या पुढें असून आम्ही इतकें घाबरून जातों, हें तरी आमच्या अविचाराचें निदर्शनच आहे. पण त्यांतल्या त्यांत ध्यानांत ठेवण्यासारखी एक मौज अशी आहे. कीं, ज्या युरोपखंडांत कोणताही ठळक सामाजिक समारंभ किंवा विधि स्त्रियांच्या सांनिध्यावांचून होत नाहीं त्या युरोपखंडांतही स्त्रीपुरुषांस एकत्र शिक्षण द्यावें किंवा नाहीं याविषयीं मोठा मतभेद आहे. घोड्यांच्या शर्यती, चेंडूफळीचे खेळ, बक्षिसें वाटणें, पाये घालणें, इमारती उघडणें, व्याख्यानें देणें, लग्नसमारंभ, प्रेतसंस्कार, मोठमोठ्या मेजवान्या, प्रदर्शनें, नानाप्रकारच्या पार्ट्या व नाच—या व अशाच प्रकारच्या अनेक युरोपीय समारंभास व विधीस स्त्रिया न येतील तर त्या लोकांत हे समारंभ व विधि मुळींच नकोसे वाटतील. युरोपीय समाजास जी एका प्रकारची उल्हासवृत्ति प्राप्त झाली आहे, ती त्याच्या मिश्रणामुळें प्राप्त झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मिश्र समाजाचा प्रत्यक्ष अनुभव नाहीं त्यांचें हें मत आहे येवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे. गोषाबाहेर किंवा जनान्याबाहेर नीति असण्याचा संभव नाहीं. हें बोलणें जितक्या शहाणपणाचें आहे तितक्याच शहाणपणाचें वरील मत आहे. स्त्रीपुरुषांचें पाऊल वांकडें न पडणें यांत समाजाचें मोठें हित आहे, हें आम्ही कबूल करतों. पण तें हित साधण्यासाठीं बायकांस मागल्या दारीं कोंडून घालण्याची अवश्यकता आहे, किंबहुना तसें केल्यानें नीतीचें रक्षण होणारच आहे, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. जी वस्तु दुष्प्राप्य असते तीविषयीं आपल्या मनांत नसतें महत्त्व उत्पन्न होऊन आपण तिच्या प्राप्तीविषयीं फार उत्सुक होतों. तीच हवी तेव्हां मिळण्यासारखी असेल तर तिचा दुःहंस आठवणदेखील होणार नाहीं. एखाद्याला जर असें सांगितलें कीं दुसऱ्या महिन्यानंतर अमुक ठिकाणीं जाण्याची मनाई केली आहे, तर त्याला त्या ठिकाणीं वर्षोगणती जाण्याचें कांहींएक कारण नसून, या मनाईमुळें आपलें स्वातंत्र्य गेलें व फारमोठें नुकसान झालें, असें वाटूं लागणार आहे.

निःपक्षपातदृष्टीनें विचार करतां कदाचित् असें कबूल करावें लागेल कीं, ज्या लोकांत स्त्रियांना जनान्यांत, पडद्यांत, किंवा गोषांत कोंडून ठेवण्याची चाल आहे, त्यांतच युरोपीयन लोकांपेक्षां कमी नीतिमत्ता असण्याचा संभव आहे. क्षणोक्षणीं, हरप्रसंगीं, सर्वत्र ठिकाणीं स्त्रीपुरुषें एकमेकांस भेटूं लागलीं म्हणजे विषयवासनेचा विचार त्यांच्या मनांत फार क्वचित् येण्याचा संभव आहे. चैत्रमासीं हळदीकुंकवास जाणाऱ्या येणाऱ्या बायका, अक्षतीस किंवा पाय-घड्यांस निघालेल्या बायका, स्टेशनावर गाड्यांत जाणाऱ्या बायका, किंवा शाळेंत येणाऱ्या मोठ्या मुली यांकडे सभ्य म्हणविणारे लोक वाकड्या नजरेनें व निर्लज्ज लोक बेलाशक टक लावून पहातात, याचें कारण येवढेंच आहे कीं, या खंडांतील इतर लोकांप्रमाणें आम्हां हिंदू लोकांस घडोघडीं स्त्रियांचा समागम घडत नाहीं. तसें होईल तर आमच्या असभ्यपणाच्या खोडी जातील इतकेंच नाहीं, तर आमच्या भाषणांत आणि वर्तनांत आतांपेक्षां पुष्कळ सभ्य-पणा येईल. अत्यंत सहनशील दहापांच लोकांची गोष्ट सोडून द्या; शेंकडा नव्वद हिंदूच्या-निदान महाराष्ट्रीयांच्या सामान्य भाषणांत बरीच अश्लीलता असते असें आम्हांस वाटतें. आमच्या समाजांत स्त्रीपुरुषांच्या गांठी वारंवार पडूं लागतील तर ही अश्लीलता नाहींशी होईल याविषयीं आम्हांस शंका नाहीं. युरोपांत प्रवास करून आलेल्या अनेक लोकांशीं आम्ही यासंबंधानें बोललों आहों व त्या सर्वांचें असें म्हणणें आहे कीं, येथील अत्युच्च वर्णांतील पुरुषांच्या व इतर वर्गांतील पुरुषांच्या व स्त्रियांच्या बोलण्यांत जो अमर्याद विचकटपणा दिसून येतो, त्याचा एक शतांश विचकटपणाही युरोपांतील कनिष्ठ प्रतीच्या लोकांच्या भाषणांत असत नाहीं. तात्पर्य, मिश्र समाजपद्धति आम्हांस वाटते त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या नीतिमत्तेस प्रतिकूल नसतां उलट अनुकूल आहे यांत शंका नाहीं. तथापि मनुष्यांच्या शरीराप्रमाणेंच कांहीं अंशीं त्याच्या समाजाची स्थिति असते. शरीर वाढींत आहे तोंपर्यंत त्याला कसलेंही वळण लावणें कठीण पडत नाहीं. पण एकदा त्याची वाढ खुंटून त्याच्या अंगीं ताठपणा आला म्हणजे त्याला नवीन वळण लावण्याची आशा खुंटली असें समजावें. समाजाची तशीच गत आहे. मुसलमानांप्रमाणें कित्येक लोकांस स्त्रियांना पुरुषदर्शन देखील होण्याची भीति वाटते! आम्हांस मिश्र समाजापासून घोर परिणाम घडतील अशी भीति आहे. स्त्रीपुरुषांस

एकत्र शिक्षण दिलें असतां त्याचा चांगला परिणाम घडेलच, अशी युरोपियन लोकांची खात्री झालेली नाहीं. अमेरिकेन लोकांनाही ही शंका बरींच वर्षे होती; पण अलीकडील प्रत्यक्ष अनुभवावरून तिचा परिहार होत चालला आहे. ज्या खेडयांत मुलांकरता व मुलींकरतां दोन स्वतंत्र शाळा घालण्याची सोय नाहीं, त्या खेडयांतील लोक लहान मुलींस व मुलांस एकाच शाळेंत घाडण्याबद्दल युरोपांत व अमेरिकेंत फारशी हरकत घेत नाहींत; व आमचे लोकही बहुधा तसें करणार नाहींत असें वाटतें. आठदहा वर्षांचीं मुलें एकत्र वागूं देण्यास कोणाच्याही मनांत विशेष शंका येत नाहीं, व ती येण्याचें कारणही नाहीं; आणि याच वयाचीं मुलें बहुधा प्राथमिक शाळांत असावयाचीं. पण त्यांतही कित्येक दोष काढतात. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, ज्याअर्थी स्त्रीपुरुषांचा आयुष्यक्रम अगदीं निराळा आहे, त्याअर्थी त्याना भिन्न शिक्षण भिन्न स्थळींच पहिल्यापासून दिलें पाहिजे. पण या दुराग्रहाच्या मताला अलीकडे कोणी जुमानीनासें झाल्यामुळें तें मंदगतीनें अस्ताचलास जात आहे ! ही प्राथमिक शिक्षणाची हालहवाल झाली. मध्यम व वरिष्ठ शिक्षण संपादणाऱ्या विद्यार्थिणी व विद्यार्थी एका टिकाणीं असूंच नयेत, हें मत युरोपखंडांतील बहुतेक देशांत व युनायटेडस्टेट्सूच्याही कांहीं भागांत कायम आहे. एकंदरीनें विचार करतां या मताची रचना अनुभवावर न करता तर्कावर लोक करतात असें आम्हास वाटतें. तरुण स्त्रिया व तरुण पुरुष यांस एका वर्गांत बसवून त्यांना एकाच शिक्षकाकडून व्याख्यानें देवविण्याचा अनुभव प्रथम अमेरिकेनें घेऊन पाहिला व तो वाटला होता त्याहून अधिक फलप्रद दिसून आला. एकत्र शिक्षणाचे शत्रु बहुधा पुढील तीन मुद्यांवर मांडतातः—१ ला–स्त्रीपुरुषांत नैसर्गिक मोठा भेद आहे. तेव्हां त्यास एकत्र शिक्षण दिल्यानें त्या भेदानुरूप त्या शिक्षणांत जो फरक करणें जरूर आहे तो कधींही करतां येणार नाहीं. २ रा–मुलांच्या दांडग्या वर्तनाचा मुलींच्या मर्यादशील वर्तनावर मात्र दुष्परिणाम होतो. मुलींच्या सहवासानें मुलांस कांहीं फायदा होत नाहीं. ३ रा–अल्पवयांत मुलगे व मुली वारंवार एकत्र येऊं लागतील तर त्यांच्या विषयवासना लौकर जागृत होऊन त्यांचे दुःखकारक परिणाम त्यांच्या वर्तनांवर घडूं लागतील. वयांत आलेल्या मुली व मुलगे एकाच वर्गांत बसत असून जर त्या वर्गाची व्यवस्था नीट

ठेवण्यांत येत नसेल तर कदाचित् वरच्यासारखे परिणाम क्वचित प्रसंगीं घडून येण्याचा संभव आहे. पण उत्तम व्यवस्था असली कीं फारच चांगले परिणाम घडून येतात असें विस्तृत्व अनुभवावरून सिद्ध झालें आहे. जे या पद्धतीचे अनुभवावरून मोठे कट्टे भक्त बनले आहेत, ते असें म्हणतात कीं (१) मुलांस व मुलींस एके ठिकाणीं शिकविल्यानें मुलांना धाक लावणें फार सोपें जातें. मुलांचा हट्टीपणा, उद्धटपणा, व दांडगेपणा, हा मुलींच्या सान्निध्यामुळें कमी होतो. (२) मुलगे आणि मुली यांस एके ठिकाणीं पढवावयाचें असलें म्हणजे उभयतांस समजेल अशा शिक्षणपद्धतीचा अंगीकार करणें अवश्य होऊन खुद्द मुलांकरितां शिक्षणाच्या ज्या विलक्षण पद्धति अस्तित्वांत आल्या आहेत त्यांची निःसत्वता आणि एकदेशीयता व्यक्त होते. मुलगे आणि मुली नेहमीं एकत्र वागल्यानें त्यांच्या विषयवासनेवर अपायकारक परिणाम न घडतां उलट त्या शांत व गंभीर होतात, आणि उभयतांच्या मैत्रीचा पाया कोणत्याही बाह्यांगावर न घालतां अंतरंगाची चांगली परीक्षा करून त्यावर तो घालण्याचा त्यांचा कल होतो.

---

## वडिलपणाचे हक्क. : : : ३०

ज्या देशांतील सुधारणेस खळ पडलेला नाहीं त्या देशांतील जुन्या व नव्या पिढीच्या लोकांत मतांतर असल्यावांचून रहात नाहीं; आणि ज्या मानानें हें मतांतर कमी अधिक असतें त्या मानानें उभयतांत कमी अधिक कलह दृष्टीस पडतो. तथापि अशा प्रकारचा कलहच वाढत्या सुधारणेस अवश्यक आहे. ज्या ठिकाणीं हा कलह दृष्टीस पडेनासा होतो त्या ठिकाणीं सुधारणेची वाढ खुंटते. पूर्वजांनीं किंवा वाडवडिलांनीं घालून दिलेल्या मार्गाचे डोळे मिटून अवलंबन करण्यापासून एक चांगला परिणाम होतो व एक वाईट परिणाम होतो. पूर्वापार चालत आलेल्या पद्धतीनें पुढें जाण्यांत समाजाची स्थिरता रहाते. पण याच स्थिरतेपासून नवीन काळास योग्य अशा फेरफारास प्रत्यवाय घडतो. तेव्हां स्थिरतेपासून होणारा फायदा न गमावतां स्थित्यंतरामुळें अवश्य वाटूं लागलेला फेरबदल कसा करावा हा मोठा गूढ प्रश्न आहे. ज्या समाजाची साधा-

रम सुस्थिति आहे त्यांत हीं दोन परस्परविरुद्ध कामें दोन प्रकारच्या लोकांकडून होत असतात. अशा समाजांतील जुन्या पिढींतले किंवा वृद्ध लोक जुन्या आचारविचारांचे कट्टे भक्त असून ते राखण्याबद्दल झटत असतात; व नव्या पिढींतले किंवा तरुण लोक समयानुरूप नवीन आचारविचारांचा उपक्रम करण्यासाठीं आपली पराकाष्ठा करीत असतात. एकाचें सामर्थ्य समाजाची स्थिरता राखण्याकडे लागलेलें असतें; व दुसऱ्याचें सामर्थ्य त्याला गति देत असतें. ज्याप्रमाणें तारवांतील ओझ्यानें त्याला स्थिरता येते व शिडानें गति मिळते, त्याप्रमाणें समाजरूप तारवावर नव्या-जुन्या लोकांच्या सामर्थ्यांचे उलट परिणाम घडत असून निरुपयोगी झालेल्या आचारविचारांचा लय आणि उपयुक्त अशा नवीन आचारविचारांचा प्रादुर्भाव होत असतो. समाजाच्या सुस्थितीस दोन्ही सामर्थ्ये अवश्य आहेत व समंजस लोक उभयतांचाही प्रतिपाळ करण्यास तयार असतात.

पण या सानोपचाराच्या गोष्टी ज्या समाजाच्या अंगांत कांहीं लवचिकपणा असेल त्यासच लागू पडतात. जुने लोक जरठ लांकडाप्रमाणें किंवा दगडाप्रमाणें कठीण होऊन गेले असतील व नवीन पिढींतील लोकांच्या गरजांचा विचार करण्यास बिल्कुल नाराज असतील तर वर सांगितलेल्या बिनबोभाट रीतीनें समाजाच्या स्थितींत फेरबदल होत जाणें अशक्य आहे. आमच्या समाजांत अशा प्रकारची आवश्यकता बऱ्याच गोष्टींत दृष्टीस पडूं लागली आहे. जुन्या लोकांस आपला हेका सोडावा असें वाटत नाहीं. नव्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणें चालतां येत नाहीं. जुन्यांना नवें आवडत नाहीं व नव्यांना जुनें आवडत नाहीं! हरएक बाबतींत नव्यांचे विचार जुन्यांच्या विचारांहून अगदीं निराळे होत चालले आहेत व आणखी कांहीं वर्षांनीं त्यांत केवढें अंतर पडेल हें कोणासही सांगतां येणार नाहीं. या अंतरास आमचें पाश्चिमात्य शिक्षण कारण झालें आहे हें आम्ही कबूल करतों. पण त्याबद्दल आम्हांस बिलकूल खेद वाटत नाहीं! ब्रिटिश अमलामुळें या देशांत ज्या दोन सुधारणांचा एकाएकीं संगम झाला आहे त्यास एका दर्जाच्या दोन भिन्न सुधारणा म्हणण्यापेक्षां पाश्चिमात्य सुधारणेला फार पुढें गेलेली सुधारणा आणि हिंदुस्थानच्या सुधारणेला मागें राहिलेली सुधारणा म्हटल्यास बरें होणार आहे. आमच्या मतें सुधारणेंत जातिभेद नाहीं, अंश-

भेद मात्र आहे; ज्यांच्या अंतःकरणांत पाश्चिमात्य विद्येचें खरें हृद्गत प्रतिबिंबित झालें आहे, त्यांचा आणि जुन्या लोकांचा खरा समेट होणें अशक्य आहे. पाश्चिमात्य ज्ञानरवीचे किरण ज्याच्या नेत्रपटलावर पडून ज्याच्या डोक्यांत प्रकाश झालेला नाहीं, त्याला अर्वाचीन विचारांचें व आचारांचें महत्त्व समजण्याचा संभवच नाहीं. असल्या मनुष्याचें मतांतर करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां त्याच्या विचाराप्रमाणें त्याला वागूं द्यावें, आणि पश्चात् सुधारणेचा उपक्रम अर्वाचीनांनीं आपल्या कुटुंबांत करावा हें आम्हांस बरें दिसतें. तथापि तसा दिवस येईतोंपर्यंत जेठा मारून केवळ स्वस्थच बसावें असें आम्ही सांगत नाहीं. पूज्य वडिलांचें डोकें फिरूं न देतां अथवा त्यांची अत्यंत अप्रीति करून न घेतां ज्यानें त्यानें नवीन सुधारणेचें घोडें आपल्या घरांत जितकें घालवेल तितकें घातलेंच पाहिजे! हें अवघड काम विशेष त्रासावांचून करण्याचे दोन तीन मार्ग आहेत ते असे.

ज्यांच्यावर आईबापांचे किंवा दुसऱ्या कोणत्याही निकट आप्तांचे विशेष उपकार असतील त्यांना कृतज्ञतेमुळें त्यांस विशेष दुखवितां येणार नाहीं व त्यांनीं तसें न करावें हेंच बरें. ज्या आईबापांनीं आपल्या मुलांसाठीं विशेष खस्त खाल्ली आहे; ज्यांनीं त्यांच्या विद्याभ्यासाठीं आपल्या सुखाकडे न पहातां बरीच माया जोडून ठेविली आहे—अशा आईबापांच्या मुलांचीं मतें त्यांच्या मतांहून कितीही निराळीं झालीं असलीं तरी त्यांना त्यांच्या मर्जीबाहेर विशेष जातां येणार नाहीं. असलीं मुलें—अथवा असले तरुण सुशिक्षित लोक हे नवीन सुधारणेचे मुख्य प्रचारक नव्हत. यांच्यानें त्या सुधारणेचा उघडपणें अंगीकार होणें अशक्य आहे. तथापि आपल्या हातून ती थोडीबहुत व्हावी अशी त्यांची उत्कट इच्छा असेल तर त्यांनीं उद्योगाच्या किंवा दुसऱ्या कोणत्या तरी निमित्तानें आपला संसार दुसऱ्या ठिकाणीं स्थापावा आणि तेथें आपल्या मर्जीप्रमाणें वर्तन करावें व त्याची बातमी दुसऱ्यांच्या तोंडून आपल्या वडिलांच्या कानीं जाऊं द्यावी! आपणांस वडिलांकडे जाण्याचा प्रसंग आल्यास किंवा ते आपल्या घरीं आल्यास तेवढ्यापुरतें त्यांच्या इच्छेप्रमाणें वागावें पण त्यांचा समागम सुटला कीं, फिरून आपला पूर्वक्रम सुरू करावा! असें करणारांनीं आपणांस अति प्रिय अशा ज्या एक दोन सुधारणा असतील त्या-

शिवाय इतर बाबींत आपल्या वडिलांची मर्जी आपणांवर अत्यंत सुप्रसन्न राहील अशा प्रकारचें वर्तन त्यांशीं ठेवावें. फाजील पैसा त्यांच्या हवालीं करावा; खर्च त्यांच्या विचारानें करावा; दागदागिने त्यांच्याकडून करवावे; त्यांच्याशीं ममतेचा पत्रव्यवहार ठेवावा; त्यांच्याशीं मोठ्या आदबीनें व प्रीतीनें वागावें; दुखण्याबाण्यांत त्यांची उत्तम प्रकारची बरदास्त स्वतः ठेवावी; त्यांनीं एखादें धर्मकृत्य आरंभिलें असल्यास त्याला आपल्याकडून होईल तितकी मदत करावी. अशा रीतीनें बाकी साऱ्या गोष्टींत त्यांचें मन जितकें संतुष्ट ठेववेल तितकें ठेवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या मनांतही प्रेम व कृतज्ञता उत्पन्न होऊन तुमच्या अप्रिय वर्तनाकडे कानाडोळा करण्याची किंवा त्याबद्दल तुम्हांस क्षमा करण्याची इच्छा त्यांस होईल; आणि एकदां तें तसें करूं लागले म्हणजे तुम्हांस बाताबेतानें हवेतसें पुढें सरकतां येणार आहे! एकंदरींत हें मोठें नाजूक काम आहे व तें फार जपून केलें पाहिजे. ज्या मुलाच्या आईबापांनीं त्यांच्यासाठीं विशेष झीज सोसलेली नाहीं, त्यांना आपले विचार बऱ्याच सहज रीतीनें अमलांत आणितां येतात. आईबापांचा त्यांच्या कृतज्ञतेवर म्हणण्यासारखा हक्क नसतो; आणि मुलांना त्यांच्या मर्जीविरुद्ध जाण्यास फारसें अवघड वाटत नाहीं, व त्यांनाही त्यांनीं तसें केल्याबद्दल फारसा विषाद वाटत नाहीं! "आपण प्रीति दिली नाहीं तर ती आपणांस उलट मिळणार कोठून!" असें म्हणून तीं आपलें समाधान करून घेतात! पण अशा प्रकारच्या आईबापांच्या मुलांनींही आपणांस ज्या सुधारणा अत्यंत अवश्यक वाटत असतील तेवढ्याशिवाय इतर गोष्टींत त्यांचें मन बिलकुल दुखवूं नये; इतकेंच नाहीं, तर तें जितकें सुप्रसन्न ठेववेल तितकें ठेवण्याचा प्रयत्न करावा. असें केल्यानें असलीं आईबापें उपकृत झाल्यासारखीं होऊन आपल्या मुलाचें मन दुखविण्यास फार भितात आणि कधीं कधीं तर त्याच्या मर्जीप्रमाणें आपणच वागूं लागतात! एकाच कुटुंबांत माणसांपैकीं कुटुंबाधिपतींचे अथवा वडिल माणसाचे अशा प्रकारचे हक्क आहे. आणि त्याचें तरुणांनीं होईल तितकें संगोपन केलें पाहिजे. पण हें सारें ज्याच्या त्याच्या वडिल माणसांबद्दल झालें. समाजांतील एकंदर तरुणांनीं एकंदर वडिलांबद्दल कसें वागावें हा अगदीं निराळा प्रश्न आहे व त्याचें उत्तरही फार निराळें आहे! तें लवकरच देण्यांत येईल!

## आमचे दोष आम्हांस कधीं दिसूं लागतील? : : ३१

अलीकडे देशाभिमान्यांची जी एक जात निघाली आहे; तिच्यापुढें इंग्रजांची किंवा दुसऱ्या कोणत्याही अर्वाचीन, युरोपिअन लोकांची उद्योगाबद्दल, ज्ञानाबद्दल, किंवा राज्यव्यवस्थेबद्दल प्रशंसा केली कीं, तिचें पित्त खवळून जातें! या जातवाल्यांना दुसऱ्याचा उत्कर्ष किंवा त्याची स्तुति साहण्याचें बिलकूल सामर्थ्य नाहीं! पण करतात काय बिचारे! सूर्याला सूर्य म्हटल्याखेरीज जसें गत्यंतर नाहीं, तसें युरोपिअन लोकांचें श्रेष्ठत्व या घटकेस तरी नाकबूल केल्यास आपलें हंसें झाल्यावांचून राहणार नाहीं, हें त्यांना पक्कें ठाऊक आहे! तेव्हां ते काय हिकमत करितात कीं नेटिव-युरोपियनांची तुलना करण्याची वेळ आली कीं, ते आपल्या गतवैभवाचें गाणें गाऊं लागतात! इंग्रज लोक अंगाला रंग चोपडीत होते; इंग्रज लोक कच्चें मांस खात होते; इंग्रज लोक कातडीं पांघरीत होते; इंग्रज लोकांस लिहिण्याची कला ठाऊक नव्हती त्या वेळेस आम्ही मोठमोठाल्या हवेल्या बांधून रहात होतों; कापसाच्या किंवा लोंकरीच्या धाग्यापासून मोठ्या परिश्रमानें विणून तयार केलेलीं वस्त्रें वापरीत होतों; बैलांकडून जमीन नांगरून तींत नानाप्रकारचीं धान्यें, कंदमुळें, व फळें उत्पन्न करीत होतों; आणि रानटी लोकांप्रमाणें मांसावर अवलंबून न राहतां आपला बराच चरितार्थ वनस्पत्यांवर चालवीत होतों. यावरून मांसाहार आम्हीं अगदींच टाकला होता असें कोणी समजूं नये. ज्या गाईच्या संरक्षणासाठीं सांप्रत काळीं जिकडे तिकडे ओरड होऊन राहिली आहे, व जें संरक्षण कित्येकांच्या मतें हिंदुमुसलमानांचा बेबनाव होण्यास बऱ्याच अंशीं कारण होत आहे, त्या गाईचा देखील ? ,, प्रसंगविशेषीं समाचार घेण्यास मागेंपुढें पहात नव्हतों! कोणी विशेष ...ीचा मित्र किंवा आप्त पाहुणा आला आणि बाजारांत हवातसा जिन्नस न मिळाला म्हणजे लहानपणापासून चारा घालून व पाणी पाजून वाढविलेल्या गोऱ्ह्याच्या अथवा कालवडीच्या मानेवर सुरी ठेवण्यास आम्हांस भीति वाटत नव्हती! आतां येवढें खरें आहे कीं हें गोमांस रानटी लोकांप्रमाणें आम्ही हिरवें कच्चें खात नव्हतों! तर सुधारलेल्या लोकांप्रमाणें त्यांत निरनिराळ्या तऱ्हेचे मसाले घालून व त्याला नानाप्रकारच्या फोडण्या देऊन तें अत्यंत

स्वादिष्ट करून खात होतों ! मत्स्याशनही आम्हांस ठाऊक नव्हतें असें नाहीं ! कोणत्या मांसाची रसई कोणत्या रीतीनें करावी याबद्दल आम्हांपाशीं फार पुरातन नियम सांपडतात ! मांसभक्षणानंतर उत्तम मद्यप्राशन केल्यास फार मौज होते म्हणून सांगतात ! आमच्या पूर्वजांस ही मौजही ठाऊक नव्हती असें नाहीं ! सोमरस हा मादक पेय असो अथवा नसो; त्याशिवाय दुसरीं कसलीं तरी मादक पेयें येथें वहिवाटींत होतीं अशाबद्दल जुन्या ग्रंथांत भरपूर आधार सांपडतो. याप्रमाणें आम्ही खाण्यापिण्याच्या कामांत अगदीं पुरातन कालीं सुद्धां पुरे पटाईत होऊन गेलों होतों. लिहिण्यापुसण्यांत व कुटुंबव्यवस्थेंत आणि ग्रामव्यवस्थेंतही आम्ही अगदीं अनभिज्ञ होतों असें नाहीं. लेखनकला आम्हांस केव्हां आली हें जरी खात्रीनें सांगतां येत नाहीं तरी ती इतिहासकालापूर्वींच आम्हांस प्राप्त झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेखनकला अभ्युदयास आणून नीति, न्याय, नाटक, अलंकार, व्याकरण, गणित व वैद्यक इत्यादि शास्त्रांतही आमची बरीच गति झाली होती. आम्हांमध्यें उत्तम प्रकारची कुटुंबव्यवस्था व ग्रामव्यवस्था स्थापण्यांत आली असून राष्ट्र म्हणजे काय हें आम्हांस कळूं लागलें होतें. आमच्यांत स्वतंत्र व मांडलिक राजे असून त्यांच्या पदरीं चतुरंग सेना असत. मोठमोठे दुर्ग बांधण्याची कला त्यांस अवगत होती. साम, दाम, दंड, भेद इत्यादि शत्रूस वळणीस आणण्याचीं साधनें तें वारंवार उपयोगांत आणीत असत. यावरून काय दिसतें कीं, अलीकडल्या इंग्रज लोकांनीं किंवा युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही लोकांनीं कितीही शेखी मिरविली तरी ज्या आम्हीं इतक्या पुरातन कालीं येवढी मोठी सुधारणा करून बसलों त्या आमच्यापुढें त्यांची मात्रा बिलकुल चालावयाची नाहीं ! न चाले बिचारी ! पण या एककल्ली देशाभिमान्यांना आम्ही असें विचारितों कीं, बाबांनो, तुम्ही अशा प्रकारें गतवैभवाचें गाणें गाऊं लागलां म्हणजे तुमच्या पक्षाचें मंडन न होतां उलट मुंडण होतें ! इंग्रज लोक रानटी होते त्या वेळेस जर तुम्ही इतके सुधारलेले होतां, तर आतांही त्यांच्यापेक्षां अधिक सुधारलेले असायला पाहिजे होतां. पण तसे तर तुम्ही खचित नाहीं ! तेव्हां हें सिद्ध आहे कीं केव्हां तरी तुमच्या सुधारणेस खळ पडला असावा; किंवहुना ती मागेंच हटूं लागली असावी; कारण सुधारणा ही स्थिर वस्तु नाहीं;

ती पुढें चालेल किंवा मागें सरेल! आमची सुधारणा क्षणैक निश्चळ होऊन मग तिची पिछेहाट होऊं लागली असावी असें मानिल्याखेरीज ज्यांस आम्ही रानटी म्हणत होतों तीं राष्ट्रें दोन हजार वर्षांच्या अवकाशांत आम्हांपुढें इतकीं कशीं गेलीं याचा उलगडा होत नाहीं. सुधारणेच्या शर्यतींत जे एकदां आमच्या फार पाठीमागें होते, त्यांनीं आम्हांस गांठलें इतकेंच नाहीं, तर पाठीमागें टाकलें, असें आपल्या स्थितीवरून कबूल करावें लागलें यांत आमच्या मतें प्रतिष्ठा मारण्यासारखें कांहीं नाहीं. "दुसरे लोक रानटी होते तेव्हां आम्ही फार सुधारलेले होतों!" असाल कदाचित्. पुनः पुनः गत गोष्टीबद्दल मिटक्या मारीत बसण्यांत काय अर्थ आहे! आम्हांस तर असल्या निरुपयोगी प्रतिष्ठेचा मनापासून कंटाळा येतो. असल्या प्रतिष्ठेमुळें स्वदोष दिसेनासे होतात इतकेंच नाहीं, तर आपण सर्वगुणसंपन्न आहों, आपणांस कशाचीही उणीव नाहीं, असें वाटूं लागून उद्योग करण्याची हौस नाहींशी होते, मानसिक व शारीरिक श्रमाचा तिरस्कार येऊं लागतो, बढाईखोर नुसत्या गप्पा मारीत बसण्यांत मोठा आनंद वाटतो, आणि दिवसेंदिवस वाढत चाललेल्या दारिद्र्याचा व आपत्तीचा परिहार करण्याचा विचार देखील मनांत येईनासा होतो! पण या आत्मवंचक व परवंचक देशाभिमान्यांचा आम्हांस. जो विशेष राग येतो तो यासाठीं कीं, आपल्या जुन्या सुधारणेची तुलना न करितां ते आपलीच सुधारणा सर्वांत श्रेष्ठ होती असें घेऊन चालून तिचे पवाडे गात सुटतात! लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांत ज्यानां दुसऱ्या देशाविषयीं कमींत कमी माहिती आहे असें कोणी लोक असतील तर ते हिंदुलोक होत. यांना स्वतःस इतिहास लिहिण्याची अवश्यकता कधींही वाटली नाहीं, व लिहिण्याची अक्कल आली नाहीं. इतकेंच नाहीं, तर दुसऱ्यांचे इतिहास अवलोकन करून त्यापासून आपली सुधारणा करण्याची पर्वाही त्यांनीं कधीं केली नाहीं. एकंदरींत यांना इतिहासाचें माहात्म्यच समजलें नाहीं असें तरी कां म्हणूं नये! अथवा त्यांना तें समजलें नाहीं यांत त्यांच्याकडे फारसा दोष नाहीं. इतिहास म्हणजे व्यक्तींनीं किंवा राष्ट्रांनीं केलेल्या मोठमोठ्या पराक्रमांचें वर्णन. आतां ज्या देशांतील व्यक्तींनीं किंवा व्यक्तिसमुदायांनीं केव्हांही मोठमोठे पराक्रम केलेले नाहींत, ते इतिहास लिहिणार कशाविषयीं आणि वाचणार काय! पौराणिक कालांत भारतीय आर्यांनीं जे

पराक्रम केले त्यांची गाथा भारत–रामायणरूपानें व्यासवाल्मीकांनी करून ठेविली आहे. अशाच प्रकारची ग्रीक आर्यांची गाथा होमर कवीनें रचिली आहे. पण या गाथ्यांत काव्य आणि इतिहास यांचें इतकें संमिश्रण झालें आहे कीं, यांना काव्य अथवा इतिहास यांपैकीं कोणती संज्ञा द्यावी याचा संशय पडतो. शिवाय आमच्या पुराणांत धर्म व वेदांत यांचा प्रवेश होऊन यांचें एक विलक्षण घडन झालें आहे. तें तो पाहिजे त्या कामाला वापरतो. तथापि असल्या पुराणांचीं पारायणें करून अर्वाचीन विचारपद्धतीप्रमाणें त्यांपासून निघण्यासारखीं असतील तितकीं सारीं अनुमानें काढलीं आणि तीं एकवट केलीं तरी त्यांपासून आम्ही अगदीं सुधारणाचढाच्या शिखरास पोंचलो होतों आणि त्यापुढें जाण्यास आम्हास अवकाश राहिला नव्हता, असें सिद्ध होण्याचा कांहीं संभव नाहीं. आमच्या आणि ग्रीक लोकांच्या पौराणिक स्थितींत विशेष अंतर होतें असें आम्हांस आमच्या पुराणांची आणि होमरच्या काव्याची जी कुडबी माहिती आहे तीवरून वाटतें. पण पौराणिक काल उलटून गेल्यावर, ग्रीक लोकांनीं सुधारणेचे कामांत जो झपाटा मारिला त्याच्या एक-चतुर्थांश झपाटाही आमच्यानें मारवला नाहीं. जुन्या ग्रीक व रोमन लोकांच्या राज्यविषयक कल्पना अद्यापि आम्हांस आल्या नाहींत व आम्हांस कळूं लागल्या नाहींत; तेव्हां तीन हजार वर्षांपूर्वी त्या आमच्या स्वप्नांतही आल्या नसतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण इतर गोष्टींत तरी आम्ही ग्रीक लोकांहून श्रेष्ठ किंवा त्यांच्या बरोबरीचे होतों का ? आमच्या मतें खचित नाहीं. त्या कालीं ठाऊक असलेल्या बहुतेक कलांत व शास्त्रांत ग्रीक लोकच सर्वांत श्रेष्ठ होते असा आमचा ग्रह झाला आहे, आणि तो साधारण असेल तर जुन्याचें वृथा प्रस्थ माजविणाऱ्यांचा आम्हांस तिरस्कार येणें स्वाभाविक नाहीं काय !

पौराणिक कालांत आमची व ग्रीक लोकांची स्थिति सारखीच होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. वर्तमानपत्रांत अशा विषयांचा यथास्थितपणें ऊहापोह करतां येत नाहीं हेंदेखील नड आहे. नाहीं तर ग्रीक पुराणांतल्या आणि भारतीय पुराणांतल्या अनेक कथा घेऊन त्यांचें साम्य दाखविलें असतें; व त्यावरून त्या लोकांचें आणि आमचे आचार व विचार किती एकसारखे होते हें वाचकांच्या डोळ्यापुढें उभें केलें असतें. तथापि होमरच्या महा-

काव्याचा आणि वाल्मीकीच्या रामायणाचा येथें उल्लेख करण्यास हरकत दिसत नाहीं. या दोन महाकवींच्या मुख्य कथानकांत इतकें साम्य आहे कीं, युरोपियन कवींचा स्वाभाविकपणें पक्षपात करूं इच्छिणाऱ्या कित्येक अर्वाचीन युरोपियन पंडितांनीं अशी शंका प्रदर्शित केली आहे कीं, रामायणाचें कथानक भारतीय कवीनें बहुधा ग्रीक कवीच्या **इलिअड**पासून घेतलें असावें. **रामायणांत** ज्याप्रमाणें रामाची सीता रावणानें हरण करून नेली, व ती लंकेहून परत आणण्यासाठीं रामानें राक्षसांशीं तुंबळ युद्ध केलें; त्याप्रमाणेंच **इलिअड**मध्येंही एका राजानें दुसऱ्या राजाची सुंदर स्त्री पळवून नेली, व ती फिरून काबीज करण्यासाठीं त्या चंचल वनितेच्या नवऱ्यानें घनघोर युद्ध केलें, अशी मुख्य गोष्ट आहे. प्रधान कथानकांत एवढें साम्य दिसून आल्यावर तें एकानें दुसऱ्यापासून उचललें असावें, अशी शंका येणें स्वाभाविक आहे; आणि त्याप्रमाणें ती एका प्रसिद्ध जर्मन पंडीताला आली यांत कांहीं नवल नाहीं. पण अशा प्रकारच्या वादांत मूळ रचना कोणाची असावी, आणि तिचें अनुकरण करणारा कोण असावा—याचा निर्णय करण्याची मोठी मारामार पडते. कथानकाच्या साम्यावाचून दुसरा पुरावा नसेल तर वाचकांच्या किंवा टीकाकारांच्या तब्यतीप्रमाणें पाहिजे त्याकडे आद्यत्व देतां येतें! ज्या वेळेस जर्मन पंडितानें रामायण होमरपासून उतरलें असावें असें आपलें मत दिलें त्या वेळेस वाल्मीकीपासून **इलिअड** उतरलें असावें असें मत देणेंही तितकेंच योग्य होणार आहे, असा विचार त्यांच्या मनांत कसा नाहीं आला कोण जाणे! कै. आ. मि. जस्टिस तेलंग यांनीं आपल्या मनाला हाच प्रश्न घातला; आणि पुष्कळ शोध करून असें सिद्ध करून दाखविलें कीं होमर व वाल्मीकि यांपैकीं एकानें दुसऱ्याची प्रत किंवा नक्कल केली असें म्हणणें शक्य असेल तर ती होमरनें म्हणजे ग्रीक कवीनें केली असावी, हें विशेष संभवनीय आहे! ज्यांना या वादाविषयीं विशेष माहिती हवी असेल, व तो करण्यांत मि. तेलंग यांना बुद्धीचें किती कुशाग्रत्व दाखविलें आहे हें पहाण्याची इच्छा असेल त्यांनीं त्यांचा "Is Ramayana copied from Homer?" (रामायण होमरवरून उतरलें आहे काय!) या नांवाचा निबंध वाचावा.

असो; प्रस्तुत विषयाच्या संबंधानें ह्या गोष्टीचा आम्हीं येथें एवढ्यासाठींच

उल्लेख केला आहे कीं, पौराणिक कालांत आमचें ग्रीक लोकांशीं इतकें साम्य असतां पुढें आम्हां उभयतांत जे अंतर पडत गेलें त्यामुळें त्यांच्या व आमच्या इतिहासास पराकाष्ठेची विभिन्नता आली. कांही कलांत व विद्यांत अजरामर कीर्ति संपादून व त्या कलांचें आणि विद्यांचें बीं नवीन लोकांत लावून, जुने ग्रीक लोक अंतर्धान पावले! आम्ही आमची जी थोडीबहुत पुंजी होती तिला घट्ट मिठी मारून काळाच्या तीव्र प्रहारांस न जुमानतां, आजपर्यंत कशी तरी प्राणयात्रा करीत आलों! अशा रीतीनें युगेंच्या युगें जगणें हें चांगलें, किंवा थोडींच शतकें कां होईना, पण स्वतःचें नांव अमर करून व जगाच्या इतिहासाला चांगलेपणाचें वळण लावून नाहींसें होणें चांगलें, याचा निश्चय करणें फार कठीण आहे! तथापि येवढें खास म्हणतां येईल कीं, आमच्या सुधारणेस खळ पडल्यापासून ज्या स्थितींत आम्ही कुजत पडलों आहों त्याच स्थितींत आम्हांस युगेंच्या युगें लोटावयाचीं असतील तर आम्ही एकदम नाहींसे व्हावें हें इष्ट आहे! ज्यांना कधींही चांगला दिवस बिलकुल येण्याची आशा नाहीं, त्यांनीं चैतन्याला बिलगून रहाणें हें शुद्ध विमेपण नव्हे काय! आम्हांस अशी दशा येऊन टेपली आहे असें आम्ही पाहिजे तर म्हणत नाहीं, पण गेल्या दोन हजार वर्षांचा आमचा जो इतिहास आहे त्यावरून पहातां केवळ जीवरक्षणापलीकडे आम्हीं कांहींएक केलें नाहीं, असें म्हणणें भाग पडेल! आणि पुढेंही जर अशाच रीतीनें वागण्याचा आमचा विचार असेल तर आम्ही मोठे अद्वितीय जंतु आहों असें मानिलें पाहिजे!

पुष्कळ देशाभिमान्यांस अशा प्रकारचें लिहिणें आवडत नाहीं! पण आम्ही त्याला काय करावें! जी गोष्ट उघडपणें बोलून न दाखविणें म्हणजे आजमितीस मोठा अपराध करणें असें आम्हांस वाटतें, ती बोलून टाकल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं, याला आमचा काय इलाज आहे! ज्या लोकांना आमची ही आत्मनिंदा रुचत नाहीं, त्यांनीं आम्हांस आत्मस्तुति करण्यासारखें आम्हीं गेल्या दोन हजार वर्षांत काय केलें आहे हें दाखविण्याची कृपा करावी. ज्या देशांत प्रतिवर्षी कोट्यवधि मनुष्यप्राणी जन्मास येत आहेत व परलोकास जात आहेत, त्या देशाच्या एखाद्या कोपऱ्यांत एखाद्या शतकांत एखाद्या व्यक्तीनें किंवा लहानशा व्यक्तिसमुदायानें थोडीशी चळवळ केली तर तेवढ्यावरून येवढें विस्तीर्ण राष्ट्र वारंवार सचेतन असून

त्याची प्रगति होत आहे असें म्हणतां येत नाहीं. चंद्रगुप्तापासून रावबाजी-पर्यंत जो आमचा लांबच्यालांब इतिहास आहे किंवा जो आम्ही लांबच्यालांब काळ घालविला त्यांत तोडरमल्ल, पूर्णय्या, किंवा भवभूति यांसारखे कांहीं पुरुष होऊन गेले, अथवा राजपुतान्यांतील रजपुतांसारखे किंवा महाराष्ट्रदेशांतील मराठ्यांसारखे कांहीं लढवय्ये होऊन गेले, असें सांगितल्यानें आमच्या ऐतिहासिक शून्यतेस विशेष बाध येतो असें आम्हास वाटत नाहीं. खरें म्हटलें तर चंद्रगुप्तापूर्वींच आमचा राष्ट्रचंद्र मावळला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दोन किंवा अडीच हजार वर्षांपूर्वीं ज्या प्रकारच्या राज्यविचारांनीं, धर्मविचारांनीं व सामाजिक विचारांनीं आम्ही निगडित झालों होतों, व त्या वेळीं ज्या आचारांचे आम्ही गुलाम होतों तेच आचार व तेच विचार अद्यापि आम्हांस बहुधा आपल्या कह्यांत ठेवीत नाहींत काय? कोणतीही अचेतन वस्तु बहुधा दोन हजार वर्षें टिकत नाहीं. पण टिकलीच तर तींत जमीन-अस्मानाचें अंतर झाल्याखेरीज राहावयाचें नाहीं. पण आम्ही पहा कसे आकाशासारखे अथवा समुद्रासारखे जसेच्या तसे! बिचाऱ्या आकाशाच्या किंवा समुद्राच्या स्थितींत देखील येवढ्या कालांतरानें शास्त्रज्ञ प्रेक्षकांच्या नजरेस येण्यासारखा फेरफार होत असेल किंवा झाला असेल. पण आमच्या शोचनीय राष्ट्रस्थितींत गेल्या दोन हजार वर्षांत म्हणण्यासारखा फेरफार झाला आहे, असें बहुधा कोणाही विचारी पुरुषास म्हणतां येणार नाहीं! येथें राहणाऱ्या पांच कोटी लोकांच्या जागीं दहा कोटी लोक झाले असतील, किंवा दहांचे जागीं वीस कोटी झाले असतील; सिथिअन लोकांनीं आमची मानगुटी सोडली असेल तर ती मुसलमानांनीं धरली असेल, व मुसलमानांनीं ती सोडली असेल, तर ती इंग्रजांनीं धरली असेल; जेथें पूर्वीं जमिनीचा एक बिघा लागवडींत होता तेथें आतां तीन असतील; व जेथें पूर्वीं दहा खोपटीं होतीं तेथें आतां कदाचित् शंभर असतील; कधीं मुसलमानांपुढें घट्ट तुमान व लांब आंगरखा घालून कोंपरापासून सलाम करीत पळावें लागत असेल, तर कधीं पाटलून व बूट चढवून आणि कोट घालून विलायतेच्या गोऱ्यांपुढें धांवावें लागत असेल; पूर्वीं मर्जीविरुद्ध कर द्यावे लागत असले, तर आतां कदाचित् ते कायद्यानें द्यावे लागत असतील; पूर्वींचे राज्यकर्ते उघड उघड पक्षपात करीत असले, तर आतांचे कदाचित् न्यायाच्या पांघरुणाआड करीत अस-

तील—पण असल्या स्थित्यंतरास स्थित्यंतर म्हणावें किंवा नाहीं याचा आम्हास बराच संशय आहे. अगदीं अलीकडे लाखपन्नास हजार लोकांच्या आचारविचारांत जें अंतर पडलें आहे तें सोडून द्या. तें पडूं लागेतोंपर्यंत आमचा म्हणण्यासारखा काय फेरफार झाला होता, व या घटकेस देखील सामान्य लोकांच्या स्थितींत म्हणण्यासारखा काय फरक पडला आहे हें आम्हांस कोणी समजाऊन सांगेल तर आम्ही त्याचे मोठे आभारी होऊं. 'राजा कालस्य कारणम्" राजा आई, राजा बाप, राजा करील ती पूर्वदिशा, लोक राजाचे गुलाम—ह्या ज्या आमच्या नीच राजकीय कल्पना त्या जशा रामराज्यांत तशा अजूनही कायम आहेत. ज्याला ह्याचें प्रत्यंतर पाहिजे असेल त्यानें बडोदें, लष्कर, हैदराबाद, म्हैसूर वगैरे पाहिजे त्या लहान मोठ्या नेटिव संस्थानाची फेरी करून तेथील जुन्या पद्धतीच्या लोकांचे विचार व आचार कसे आहेत याची बारकाईनें चौकशी करावी. या संस्थानच्या शास्त्यांपैकीं एखाद्यानें आपल्या प्रजेपैकीं एकाद्याला केवळ चैनीखातर चाबकाचा खरपूस मार दिला, अथवा राखेचा तोबरा चढवून पाटीवर भला मोटा दगड दिला, किंवा प्रसंगविशेषीं एखाद्याचे नाहीं तसले हाल करून खूनही केला तरी देखील भोगणाऱ्याचे आप्त किंवा इतर लोक आपल्या स्वामीविरुद्ध उटावयाचे नाहींत ! ही आमची राजभक्ति आणि राजनिष्ठा ! धिक्कार असो आह्मांला, आमच्या राजभक्तीला आणि आमच्या शास्त्यांला ! सारेच एका माळेचे मणि ! आजमित्तीस कोणत्याही नेटिव संस्थानांत ब्रिटिश पोलिटिकल एजंटच्या सान्निध्यांत असा प्रकार घडत असेल असें आम्ही म्हणत नाहीं. पण घडल्यास निदान आमचे लोक तरी आपण होऊन त्याबद्दल बोभाटा करणार नाहींत अशी आमची पक्की खातरी आहे. अशा राजभक्तांनीं परक्या लोकांच्या झुंडींच्या झुंडी आपल्या देशांत येऊं दिल्या आणि एकाच्या जुलमाचें जूं निघालें नाहीं तोंच दुसऱ्याच्या जुलमाचें जूं मानेवर घेतलें आणि आपल्या बायकांपोरांसह शतकेंच्या शतकें, हवे तसले हाल सोशीत हीन दास्यावस्थेंत काढली यांत नवल तें काय ! ग्रीक लोकांना अशा स्थितींत एक वर्ष देखील काढवलें नसतें, मग शतकांची काय कथा !

समाप्त